म.ग्रं.सं. ठाणे
विषय : इतिहास
सं. क्र. : ८०८८

# अठराशें सत्तावनची
# शिपाईगर्दी

नाटक

REFBK-0009981

# अठराशें सत्तावनची शिपाई गर्दी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .......... वि. ..........
क्रमांक .................. नों: दि: ..........

लेखक

नरहर रघुनाथ फाटक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. ८८८९
शाखा

REFBK-0009981

किंमत १२·५०

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

किंमत :
बारा रुपये पन्नास नये पैसे

प्रथमावृत्ति :
मार्च १९५८

सर्व हक्क स्वाधीन

2372.5 वि. 606. नों दि: 6-15-1942

# प्रास्ताविक

१९५७ मध्यें फेब्रुवारीच्या प्रारंभीं चित्रशाळा संस्थेचे दोघे विश्वस्त श्री. दा. पां. रानडे व दा. त्र्यं. जोशी यांनीं १८५७ तील शिपायांच्या उठावाचा इतिहास लिहिण्याबद्दल स्वयंस्फूर्त प्रेमाग्रहानें सुचविल्यावरून लेखनाला सुरुवात केली. या विषयाकडे १९१५ पासून लक्ष असलें व वाचलेल्या पुस्तकांचीं टिपणें केलेलीं असलीं तरी पुस्तक लिहिण्याचा उद्देश नसल्यानें ही आकस्मिक सूचना अंमलांत आणतांना हवीं तीं पुस्तकें जवळ नाहींत आणि टिपणांपैकीं कांहीं हरवलेलीं या अडचणींतून केवळ स्मरणावर भिस्त ठेवून मार्ग काढावा लागला. प्रस्तुत विषयाचा पुरेसा अभ्यास झाल्यावर वेळोवेळीं त्यासंबंधीं व्याख्यानें देण्याची संधि मिळाल्यानें व मधून मधून मित्र-वर्गांत चर्चा होत राहिल्यानें स्मरण-बळावर विश्वास ठेवतां आला व लेखनाचें काम चालू झालें. नंतर पुस्तकें व टिपणें जमत गेलीं. प्रथम ता. १० मेला पुस्तक प्रसिद्ध करावें असा प्रकाशकांचा संकेत होता. तो सफळ होणें साहजिकच शक्य नव्हतें. नंतर १५ ऑगस्ट हा दिवस प्रकाशनाला योग्य असें ठरलें, पण उभयपक्षीं कित्येक अडचणी उद्‌भवून दिरंगाई झाल्यानें आतां हें पुस्तक लोकांना सादर करण्याचा योग आला आहे. ही दिरंगाई एक प्रकारें फायद्याची ठरली. १९५७ मध्यें पुष्कळ नवीं पुस्तकें बाहेर पडलीं व त्यांची पाहणी करतां आली. हा दिरंगाईचा फायदा समजावा लागतो. ऑक्टोबरांत कलकत्त्यास जाणें घडलें तेव्हां तेथें नॅशनल लायब्ररींतील या विषयाचा ग्रंथ-संग्रह अवलोकनांत आला. १९१२ पर्यंत कलकत्ता हें भारताचें राजपाटन असल्यानें तेथें प्रस्तुत विषयाचें साधन-साहित्य पुष्कळ असावें हें स्वाभाविक आहे. जें साहित्य अन्यत्र दुर्लभ तें तेथें दृष्टीखालीं घालतां आलें. कलकत्त्याच्या वास्तव्याचा आणखी एक लाभ म्हणजे पुस्तक-विक्रेते व प्रकाशक श्री. के. एल्. मुखोपाध्याय यांचा परिचय. त्यांनीं बरींच बहुमोल दुर्मिळ पुस्तकें दाखविलीं व दिलीं.

साधारणपणें असें म्हणतां येतें कीं पूर्वीच्या इंग्रज इतिहासकारांनीं लिहिलेल्या पुस्तकांतील माहिती साफ बाद करायला किंवा फिरवायला लावील असें साधन-साहित्य मिळण्याची आशा धरण्यांत हंशील नाहीं. पूर्वीचे इतिहास व आतां स्वराज्यांत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें यांची तुलना केल्यास लेखकाच्या दृष्टिभेदानुसार माहितीच्या मांडणीचा भेद एवढाच प्रकार नवा आढळतो. इंग्रजांचें लेखन एकतर्फी असतें या कल्पनेला धरून त्याच्या विश्वसनीयतेबद्दल साशंकता व्यक्त करणें हें एक देशभक्तीचें व स्वाभिमानाचें लक्षण समजलें जातें, परंतु शिपायांच्या उठावाला स्वातंत्र्ययुद्ध ठरवूं पाहणारांनादेखील इंग्रजी साहित्यालाच शरण जावें लागतें हें विसरून चालणार नाहीं. इंग्रज लेखकांची कांस धरूनच शिपाई-प्रकरणाला स्वातंत्र्य-

युद्ध मानणारी मंडळी तावातावानें आपलें काम पार पाडतात. अशीं उदाहरणें कितीतरी दाखवितां येतील. इंग्रजांनीं आपल्या पराक्रमाबरोबरच अत्याचारसुद्धां मोकळेपणानें वर्णिले आहेत. त्यांच्या राज्याची स्थापना झाल्यापासून चाललेल्या कारभारांतील दोषांचा व त्याच्या संभाव्य दुष्परिणामाचा ऊहापोह लहानमोठ्या राज्यकर्त्यांनीं उघडपणें लेख लिहून सुरू ठेवला होता व त्याचाच उपयोग कालचे देशभक्त इंग्रजांविरुद्ध करीत होते व आजचे देशभक्त करीत असतात. हा प्रकार इतिहासाच्या प्रेमाचा नसून एकदां इंग्रजांचें राज्य होतें या स्थितीचें द्वेषांत परिणमलेल्या मताचें हीनत्व व्यक्त करणारा आहे. स्वराज्यसंपन्नांना इंग्रजांचें राज्य संपल्यानंतर नऊ-दहा वर्षांनीं त्याविषयीं जसा लोभ तसाच द्वेष बाळगण्याची आवश्यकता नाहीं. परंतु स्वराज्य-संपन्नतेच्या कृतार्थ धन्यतेऐवजीं आपण एकदां इंग्रजांचे दास होतों याची निरर्थक लज्जास्पद जाणीव ज्यांच्या हृदयांतून गेलेली नाहीं, अशा प्रकृतीचे लेखक १८५७ बद्दल आपल्या लेखणीकरवीं इंग्रजांच्या द्वेषाचें व तिरस्कारानें प्रदर्शन घडवितात. राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्धाची कल्पना ही त्या प्रदर्शनांतलीच एक चीज आहे. या प्रदर्शनाचे दाखले आणखी पुष्कळ आहेत, पण उत्तर प्रदेश सरकारच्या एका पुस्तकांतील–संघर्षकालीन नेताओं की जीवनियाँ–एका चुटक्यानें काम भागेल. कानपुरास झालेल्या इंग्रजांच्या कत्तलीवर पांघरूण घालून ता. १२ जुलईपासून हेवलॉकशीं झालेल्या लढायांत शिपायांनीं मार खाऊन पळ काढला, याची हकीकत नमूद करतांना शिपायांची पीछेहाट झाली, त्यांना माघार घ्यावी लागली, 'घमासान' लढाई झाली पण रणक्षेत्र इंग्रजांच्या हातीं गेलें, बिठूरास इंग्रज गेले तेव्हां तें गांव शिपायांनीं मोकळें टाकलेलें आढळलें, यासारख्या वाक्यांनीं शिपायांच्या शौर्याचा मान जीवनियांच्या लेखकांनीं राखण्याचा यत्न केला आहे. असल्या लटपटीनें शिपायांचा तर गरिमा वाढत नाहींच पण लेखकांचा अप्रामाणिकपणा व निस्सीम पक्षपात उघडकीस येतो. असली लेखन-पद्धति इंग्रजी साहित्याची अविश्वसनीयता पटविणारी नाहीं. भारतीयांपैकीं ज्या हिंदु-मुसलमानांनीं आपले अनुभव लिहून काढले ते इंग्रजांच्या माहितीला दुजोरा देणारे आहेत. उपलब्ध देशी साहित्याच्या साह्यानें इंग्रजी साहित्याचा तारतम्यपूर्वक विश्वास बाळगूनच शिपायांच्या उठावाचा विचार करावा लागतो.

शिपायांच्या १८५७ तील प्रसंगाला 'गर्दी' हा शब्द लावतांना मराठेशाहींतील पानपतच्या प्रसंगाला भाऊगर्दी हा शब्द ज्या अर्थानें योजतात तो अर्थ डोळ्यासमोर होता. या विषयांचें वाङ्मय पाहात असतां लो. टिळकांनीं पारसनिस-लिखित लक्ष्मीबाईच्या चरित्रावर अभिप्राय लिहितांना आरंभींच 'गर्दी' या शब्दानें त्या प्रसंगाचा उल्लेख केला आहे. बंड हा शब्द प्रचलित लोकाभिरुचीला आवडत नाहीं आणि स्वातंत्र्य-युद्धाचीं लक्षणें शिपायांच्या उठावांत दिसत नाहींत, तरी त्या योगानें रक्तपात घडून शेवटीं शिपायांना पराभवाचे धनी व्हावें लागेल.

हा परिणाम आणि आधींची धरसोड व नंतरची गडबड, गोंधळ, धुमाकूळ, धांदल, पळापळ वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन भाऊगर्दीची ही एक तऱ्हा समजणें भाग पडलें. जे शिपायांना स्वातंत्र्ययुद्धांचे पुरस्कर्ते मानतात त्यांना हें नांव पाहून पित्तप्रकोप होईल; परंतु त्यांच्याकरितां हें पुस्तक नाहीं. म्हणून त्यांच्या अनभ्यस्त निरर्गल मत-प्रलापांचाहि विचार करायला नको. शिपायांच्या उठावाची वस्तुस्थिति समजावून द्यावी एवढाच या पुस्तकाचा उद्देश आहे. शिपाई, त्यांचे पुढारी आणि इंग्रज या दोन्ही पक्षांची स्तुति वा निंदा टाळून वस्तुस्थिति मांडण्याचा यामध्यें प्रयत्न केला आहे. इंग्रज हा शिपायांचा शत्रु असूनहि 'शत्रोरपि गुणा वाच्याः' या न्यायानें जेथें त्यानें शिपायांची व त्यांच्या पुढाऱ्यांची स्तुति गाइली तेथें तिचा उच्चार केला आहे. शिपायांना व इतर जनतेला जिंकण्याच्या आवेशांत ब्रिटिशांनीं केलेले अत्याचारहि सांगितले आहेत. जेव्हां वंश ( Race ) व धर्म या निमित्तानें लढाई माजते तेव्हां एकमेकाला निर्बीज करून सोडण्याची भावना उभयपक्षीं तीव्र असते हा अनुभव ब्रिटिश लेखकांना मान्य असल्यामुळें शिपायांनीं केलेल्या कत्तलीबद्दल त्यांना दोष लावलेला नाहीं, उलट शिपायांनीं व खेड्याच्या जनतेनें जी पळपुट्या इंग्रजां-संबंधांत निरपेक्ष सदयता दाखविली तिची गौरवानें वाच्यता केलेली आहे. शिपाई-गर्दीतील कांहीं प्रमुख पुढाऱ्यांच्या कर्तृत्वाचें आणि चारित्र्याचें स्वतंत्र विवेचन अवश्य वाटलें म्हणून केलें आहे. या इतिहासांत जेवढीं नांवें गांवें येतात तेवढीं नमूद केल्यास वाचकांचा घोटाळा होईल म्हणून तीं शक्य तेवढीं टाळलीं आहेत. वाचकाला जास्तींत जास्त माहिती मिळावी आणि पाल्हाळ गाळावा अशी दृष्टि बाळगून शिपाईगर्दीचा वृत्तान्त सादर केला आहे. हें काम पार पाडतांना ऐतिहासिक साधनें पाहतां आलीं तेवढीं पाहिलीं. पुस्तकाच्या मजकुरांत अपरिहार्यतेनें पुनरुक्ति झाली आहे. भाषाशैलीबद्दल लेखकाचा दावा नाहीं. पुस्तकांतील न्यूनांची त्याला जाणीव आहे व दुसऱ्या आवृत्तीचें भाग्य लाभल्यास हीं न्यूनें घालविण्याचा प्रयत्न होईल.

हें काम चालू असतां ज्यांनीं मनःपूर्वक मदत केली त्यांचे आभार मानायचे तर ते कोणाचे किती व कसे मानायचे हेंच कळत नाहीं. मुंबईतील रामनारायण रूइया कॉलेजाचे ग्रंथालय, रॉयल एशियाटिक सोसायटीचें ग्रंथालय, विद्यापीठाचें ग्रंथालय, सचिवालयांतील ग्रंथसंग्रह यांचे ग्रंथपाल, पॉप्युलर व बॅंबे बुकडेपो यांचे व्यवस्थापक, पुण्याच्या इंटर नॅशनल बुकसर्व्हिसचे श्री. विठ्ठलराव दीक्षित, मुंबईच्या स्वातंत्र्येतिहास कार्यालयाचे अधिकारी, कलकत्त्याच्या नॅशनल, लायब्ररीचे श्री. मुळे, मराठे, जोशी, कुळकर्णी, पुण्याच्या मध्यवर्ती मराठी ग्रंथालयाचे श्री. कोल्हटकर आणि ग्रंथसूचीकार श्री. दाते, पुण्याचे तुकाराम चरित्र संशोधक व ४५ वर्षांचे सन्मित्र श्री. वा. सी. बेंद्रे या सर्वांनीं अतिशय उत्साहानें साह्य केलें नसतें तर असलेल्या उणीवांहून जास्त उणीवा राहिल्या असत्या. श्री. बेंद्रे यांनीं १९३७-३८ मध्यें विलायतेस असतांना कांहीं दुर्मिळ पुस्तकें व चित्रें मिळविलीं. डॉ. सेन यांच्या पुस्तकांतील

तात्या टोप्यांचें चित्र त्यांनीं तेव्हांच आपल्या संग्रहांत दाखल करून ठेवलें होतें. मराठी ग्रंथालयांतील श्री. दात्यांच्या विभाग १८७५ पूर्वीच्या ग्रंथासंबंधांत अमूल्य आहे. कलकत्त्यास बंगाली पुस्तकांचें वाचन श्री. कुळकर्णी यांनीं केलें, तर मुंबई राज्याच्या शिक्षणखात्याचे डे. सेक्रेटरी श्री. सेतुमाधवराव पगडी यांनीं उर्दू भाषेच्या ग्रंथांतील माहिती पुरविण्यासाठीं वेळ मोडून श्रम घेतले. ते सरकारी अधिकारी असल्यानें त्यांच्या योग्यतेबद्दल अधिक लिहिण्याचा मोह आवरावा लागत आहे. गांधीजींचा 'महात्मा' या नांवानें प्रचंड चारित्र-ग्रंथ सिद्ध करणारे श्री. दि. गो. तेंडुलकर यांनीं तर जणूं काय आपलेंच काम अशा भावनेनें त्यांच्या अवलोकनांतील देशी विदेशी नियतकालिकांमध्यें कोठें कांहीं आलें कीं, त्याची वार्ता व कधीं ऐनजिनसी त्या नियतकालिकाची प्रत आणून देण्याला मागें पुढें पाहिलें नाहीं. अशा तऱ्हेची मदत रूइया कॉलेजांतील मराठीचे प्राध्यापक श्री. पु. भागवत यांनींहि केली. डॉ. अधिकारी व प्रा. डी. के. बेडेकर यांचा त्यांनीं चर्चेच्या रूपानें मदत केली म्हणून कृतज्ञतेनें उल्लेख करणें, हें कर्तव्य आहे. कलकत्त्याचे श्री. के. एल्. मुखोपाध्याय यांचा निर्देश दुसरीकडे केला आहे. दुर्मिळ पुस्तकें निर्लोभ वृत्तीनें दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. गुजराती भाषेंतील इतिहास अहमदाबादचे दुर्मिळ पुस्तकांचे विक्रेते श्री. भूरालाल यांनीं पुरवून उपकार केला. 'शिपाईगर्दी'ची रचना होत असतां त्यांतील विचारसरणी दर आठवड्यास लेख छापून लोकांपुढें ठेवण्याची संधि दिल्याबद्दल 'नवाकाळ' दैनिकाचे संपादक व पूर्वाश्रमीच्या कार्यानुबंधानें एकप्रकारें सुहृद् श्री. आप्पासाहेब खाडिलकर यांनीं, चित्रमयजगत्च्या संपादकांनीं, त्याचप्रमाणें ज्या संस्थांनीं व शाळांनीं व्याख्यानें करविलीं त्या भारत इतिहास संशोधक मंडळा-दिकांचे आभार मानणें अपरिहार्य आहे. हें आभाराचें कर्तव्य बजावतांना येथील रॉ. ए. सोसायटीचे एका वेळचे ग्रंथपाल श्री. ल. ल. कापडी यांचेविषयीं कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय या मजकुराला पूर्तता येणार नाहीं. त्यांनीं पुस्तकें देतांना संख्येचें बंधन अवश्य तेव्हां आपल्या मदतीआड येऊं दिलें नाहीं. कितीहि आभार मानले तरी उपकाराची फेड होऊं शकत नाहीं. आभार हा कृतज्ञतेचा दुबळा आविष्कार असतो.

सुमारें ४० वर्षें ज्या विषयासंबंधीं ग्रंथ पाहून विचार चालू होता, तो विषय ग्रंथरूपानें प्रकाशांत आणण्याची जबाबदारी चित्रशाळा संस्थेनें स्वीकारून शेवटास न्यावी, यामुळें जें सहजगत्या औचित्य साधलें त्याची वाच्यता कांहींशीं मनोरंजक वाटेल. त्या गोष्टीला जवळ जवळ वीस वर्षें लोटलीं. चित्रशाळेच्या कै. वासुकाकांशीं बोलतांना १८५७ चा विषय निघून त्यांनीं त्यासंबंधांत एक लेख कांहींशा आग्रहानें—सक्तीनें म्हटल्यास शोभेल—लिहून घेतला. त्या वेळीं पुस्तक लिहिल्यास चित्रशाळा प्रसिद्ध करील असें आश्वासन त्यांनीं उच्चारलें होतें. पुस्तक लिहिण्याचा उत्साह प्रस्तुत लेख-

काच्या ठिकाणीं नाहींसा पाहून दुसऱ्याच्या ऋणांत मरणें हें पाप आहे असें ते कळवळयानें म्हणाले. नंतर त्यांनीं खुलासा केला कीं, ज्यांच्याकडून ज्ञान घेतलें त्यांचे आपण ऋणी आहों असें वाटायला पाहिजे. त्या ऋणाची फेड ज्ञानदानाशिवाय होणार नाहीं. आपलें ज्ञान जनतेला देणें हाच तें ऋण फेडण्याचा मार्ग आहे. कै. वासुकाकांचा हा अभिप्राय मनाला झोंबण्याजोगा असूनहि त्याप्रमाणें वागण्याचें त्यांच्या हयातींत जमलें नाहीं. तथापि व्याख्यानांच्या व लेखनाच्या द्वारें अनृणी होण्याचा मार्ग परेच्छेनें चोखाळला जात होता. गेल्या वर्षी जर चित्रशाळेच्या दोघां विश्वस्त दामुअण्णांनीं प्रेरणा देऊन पिच्छा पुरविला नसता तर ग्रंथलेखन झालें असतें कीं नाहीं, याची वानवाच होती. त्यांची प्रेरणा मनावर घेतांना शिपायांचा उठाव हा स्वातंत्र्ययुद्धाचा प्रयत्न नव्हता हें लेखकाचें निश्चित तात्पर्य त्यांना सांगितलें, तेव्हां तात्पर्य लेखकाचें व प्रकाशन चित्रशाळेचें अशी जबाबदारीची वाटणी ठरली. पुढें चित्रशाळेचे प्रमुख विश्वस्त श्री. मामासाहेब देवगिरीकर यांचेंहि प्रोत्साहन मिळालें. याप्रमाणें कै. वासुकाकांची इच्छा त्यांच्या पश्चात् अनेक वर्षांनीं सफळ झाली आहे. कै. वासुकाकांचा अकृत्रिम स्नेहभाव पुढें तसाच कायम ठेवून पूर्वोक्त विश्वस्तांनीं वासुकाकांच्या अभिप्रायानुसार ज्ञानाच्या क्षेत्रापुरतें अंशतः अनृणी होण्याचें भाग्य लेखकास लाभूं दिलें, याबद्दल त्या विश्वस्तांना आभाराचा धन्यवाद मनःपूर्वक दिला पाहिजे.

न. र. फाटक.

## चुकीची दुरुस्ती

पान १४ वर तळाशीं झांशीच्या राणीचा तनखा सालिना सहा लाख असल्याच्या अर्थाचा मजकूर आहे. तो तनखा ६० हजार होता.

# अनुक्रमणिका

## वृत्तान्त

### १. वादळापूर्वी

(१) पहिला उठाव १. वेलोरचा रक्तपात २. त्याचीं कारणें ३. उठावणीची परंपरा ४. (२) शिपायांचें लष्कर ५. त्यांत दोषांची वाढ ६. शिपायांचीं दुःखें ७-८ (३) सामाजिक सुधारणा ९ नवें शिक्षण व धर्म-हानीचें भय १०-११ आगगाड्या, तारायंत्रें, आगबोटी १२. (४) अजिंक्यपणाला धक्का १३ संस्थानें व इंग्रज १४. वतनदारांची दुर्दशा १५-१६. स्वदेशाबाहेरच्या लढाया, शंभर वर्षें भरल्याची समजूत, चपात्या व कमळें १७. ब्राह्मण शूद्र संवाद व चरबी दार काडतुसानिमित्त शिपायांचा क्षोभ १८. मंगल पांडे १९-२०. एका तुकडीची बडतर्फी, बेहरामपुरांतील प्रकार २१. अंबाला-मीरतची गडबड २२. लखनौस अस्वस्थता व नानासाहेबांची फेरी २३. मीरत ९-१० मे-शिपायांचा उठाव २४-२७.

### २. 'चलो दिल्ली'

(१) मीरतच्या उठावाचा धडा २८. दिल्लीची दंगल २९-३०. (२) दिल्लीच्या बादशाही भपक्याचा संक्षेप ३१. बहादुरशहाचे वारस ३२. शिपायांचें पुढारीपण ३३. बहादुरशहा व हिंदु-मुसलमानांचें ऐक्य ३४. बहादुरशहाची बादशाही व योग्यता ३४-३५ बहादुरशहा व शिपाई ३६. (३) दिल्लींतील शिपाई-गर्दी ३७. इंग्रजांची मोहीम सुरू ३८. दिल्लीच्या लढाया ३९. शिपायांचा निरुत्साह ४०. इंग्रजांची हालहवाल ४१. इंग्रजांचा दिल्लींत प्रवेश व तेथील दारू ४२. दिल्लीची निर्जनता व लूट. ४३-४४.

### ३. कानपूर व लखनौ

(१) कानपूर व बिठूर, नाना व अझीमुल्ला ४५-४६. लखनौचा उठाव व कानपूरचीं खलबतें, नानांची इंग्रजांना मदत ४६-४७. शिपाई व नाना ४७. शिपायांचें पुढारीपण संपादून नानांचा इंग्रजांना लढण्याविषयीं निरोप, २१ दिवस इंग्रज लढतो ४८. इंग्रजांची कत्तल ४९. इंग्रज बायका-मुलांना कैद, पेशवाईची घोषणा, नानांचे हुकूम व जाहीरनामे ५०. कानपूरची स्थिति व इंग्रजांची कानपूरवर चाल ५१. फत्तेपूरची व कानपूरची लढाई ५२. गोऱ्या बायकामुलांची कत्तल ५३. नानांचें बिठूरहून प्रयाण ५४. नाना व कत्तल ५५. (२) नानांच्या गोऱ्यांबद्दल कल्पना ५६. कलकत्त्यास नील येतो, २३ मे कलकत्त्याचा स्टेशन-मास्तर नील बनारसला पोचतो व उठाव मोडतो ५७-५८. अलाहाबादचा उठाव ५८-५९.

अनुक्रमांक (११) 23233 वि ... नों: दि: ...

अलाहाबादचा मौलवी, नील २१ जूनला येऊन बंदोबस्त करतो, रेनोची (Renaud) कानपूरकडे रवानगी ६०-६१. हेवलॉकची स्वारी व योग्यता ६२. लखनौचा कठिण मार्ग, हेवलॉकच्या लढाया ६३-६४. हेवलॉकची माघार, नीलचा खटका, हेवलॉकचें आगेकूच व पुनः माघार ६४-६५. ( ३ ) ब्रिठूरची लढाई १६ ऑगस्ट ६५. कानपूरला आउटरॅम, लखनौची नवी मोहीम ६५-६६. आउटरॅमचा दिलदारपणा ६६-६७. लखनौच्या लढाया व तेथल्या कोंडींत शिरकाव २०-२५ सप्टेंबर ६८. लखनौची कोंडी ६९. कोंडींतून लढाई ६९-७०. कोंडींतले हाल ७१. वार्ताहर अंगद ७२-७३. हेवलॉक-आउटरॅम यांनीं कोंडीचा विस्तार केला ७४. सर सेनापति कॅम्बेल व कोंडींतून सुटका ७५. हेवलॉकचा मृत्यु ७६.

## ४. केंद्रीय सत्तेचें शक्तिचक्र

( १ ) प्रास्ताविक ७७. कॅनिंगचा स्वभाव ७८. गोऱ्या काळ्या फौजेंतील संख्याभेद ७९. शिपायांबद्दल गोऱ्यांच्या भावना ८०. उठाव, प्रतिकार व कलकत्ता ८१. सैन्याची जुळवाजुळव ८२. शीख, शिपाई व पंजाब ८३-८४. पठाणांचें धोरण ८५. शीख, पंजाबांतील कर्ज ८६. कॅनिंगचें धोरण इंग्रजाकडून नालस्ती ८७-८९. दीनापूरचा उठाव ९०. व्हिन्सेंट आयरची तडफ ९१. कुंवरसिंगाचा पराजय व पळ ९२-९३.

## ५. बेबंदशाहीचा पसारा

( १ ) वायव्य प्रदेश—उठावामागून बेबंदशाही ९४-९५. मीरतचा खाकी रिसाला ९६. नबाब व हिंदु ९७. बरेलीचा खानबहादुर ९८. दिखाऊ राज्यांचा नकली कारभार, खिस्त्यांची कत्तल ९९-१००. हिंदु-मुस्लिम बेबनाव १०१-१०२. फैजाबादच्या मौलवीचा वध १०३. मुसलमानांना प्रायश्चित्त १०४. उठावांतील मौजा १०४-१०६. दंग्याचा रंगपालट १०७. चर्चर, डामरसिंह, तेजसिंह १०७-१०९. मथुरेचा देवीसिंह ११०. इटाव्याची धामधूम व ह्यूम १११. ( २ ) आग्र्याचें वायव्य सरकार मोडलें १११-११३. इंग्रजांचा पराभव ५ जुलई, जीहाद ११४. किल्ल्यांतील गोऱ्यांची जीवनयात्रा ११४-११६, अंमलदारीचा फेरफटका ११७-११८. आग्र्याची दुसरी लढाई १० ऑक्टोबर ११९. शिपायांचा पराभव आणि गोऱ्यांचा अंमल ११९-१२०. ( ३ ) फत्तेगड १२०. फत्तेपूर, अलाहाबाद, बनारस जिल्ह्यांतील अंदाधुंदी १२१-१२२. बनारसचे हिंदु साह्यकर्ते व तेथील वातावरण १२३. बनारसजवळचे जिल्हे १२४-१२५.

## ६. राजमंडळाचा सहकार

( १ ) पंजाबचे राजे, नसीराबादचे उठाव.—२८ मे व १० ऑगस्ट—१२७-१२८. नीमचचे उठाव ३ जून व १२ ऑगस्ट १२८. जार्ज लॉरेन्सची

उपाययोजना १२९. अवूच्या धुक्यांतील धामधूम १३०. एरिनपुऱ्यांतील खेळ १३१. जोधपुरी सैन्याची वाताहत ८ सप्टेंबर १३२. लॉरेन्सचा पराभव १३३. कोट्यांत शिपायांचें राज्य १३४. फेरोजशहा, इंग्रजांची हार २३ ऑक्टोबर १३५. नीमचची लढाई १३५.( २ ) इंदूरचा उठाव, इंग्रजांचा पळ १ जुलई १३६-१३७. इंदूरच्या महाराजांचें धोरण १३८. ( ३ ) ग्वालेरचे शिंदे. त्यांचे सल्लागार व संस्कार १३९-१४०. ग्वालेरला शिपायांचा उठाव. १४ जून १४१. शिंदे व शिपाई यांचा व्यवहार १४२-१४४. ( ४ ) निजामशाही, औरंगाबादचा उठाव. १४५. हैद्राबादची गडबड १७ जुलई व इंग्रज-निजाम सलोखा १४५-१४६. सुरापुराची हकीकत १४७-१४८. ( ५ ) कोल्हापूर ३१ जुलई १४८-१५०.

## ७. झांशी-बुंदेलखंडांतील घडामोडी

( १ ) असंतोषाचीं कारणें १५१-१५२. गोंडराजाचा दिलदारपणा १५२. बाणपुराचा साहसी राजा १५३-१५४. सागरच्या दोन परस्परविरोधी पलटणी १५५. इंग्रजांची दुर्दशा १५६ बांदा नबाब, नागोद जबलपुराचे शिपाई १५७-१५८. शंकरशहाचें देवीस्तोत्र १५९. जबलपुरास उठाव. १८ सप्टेंबर, नरसिंगपुरांतले वीर १६०. नागपूरची गडबड १६१. ( २ ) झांशी-प्रास्ताविक १६२. लक्ष्मीबाईचें चरित्र १६३. बाईची वेषभूषा १६४. बाईचें चारित्र्य, दैनंदिन वर्तन १६५-१६६. झांशीचा उठाव १६६-१६७. बाईचीं इंग्रजास पत्रें १६८. इंग्रजांसाठीं राज्यकारभार १६९. इंग्रजांची दगलबाजी १७०. माळव्यांतील उठावाच्या गांठी १७१-१७२. धारेवर चढाई २२-३१. आक्टोबर १७३-१७४. महीदपुराची वासलात, निधड्या छातीचे दाखले १७४-१७५. नीमचचा वेढा उठलला १७५-१७६. माळव्यांतील संकटसमाप्ति १७६-१७७.( ३) ह्यू रोज मोहीम १७७-१७९. झांशीचा संग्राम २५ मार्च १७९-१८०. तात्याची लढाई १८०-१८२. इंग्रज शहरांत घुसले ३ एप्रिल १८३. लक्ष्मीबाईनीं झांशी सोडली १८४. बाई वेढ्यांतून कशा निसटल्या ? १८५. मोरोपंत तांबे यांस फांशी १८६. झांशीचा विध्वंस १८६-१८८. ( ४ ) काल्पीची दौड, उन्हांत लढाई १८८. कूंचची लढाई, शिपायांची बहादुरी १८९. काल्पी इंग्रजांचे हाल. शिपाई व त्यांचे पुढारी १९०-१९१. शिपायांचा कुशल पराक्रम १९१-१९२. बांदा-किरवीचा निःपात १९३-१९६. किरवीशीं विश्वासघात १९६. (५) शिपाई ग्वालेर घेतात १९७. नाट्यपूर्ण प्रसंग १९८-२००. रावसाहेबांचें संयमशील धोरण २०१. ह्यू रोजची धडाडी २०२. लक्ष्मीबाईचें देहावसान, वीरश्री निमाली २०३-२०५. शिपायांनीं ग्वालेर सोडलें २०५-२०६. शिंद्यांच्या स्वागताला रक्ताचें गालबोट २०७. शिंदे व टोपे, ह्यू रोजचें मत २०८. तात्यांचे नातलग २०९. ह्यू रोजचे कांहीं अनुभव २०९.

## ८. लखनौ शहराची व मुलखाची अखेर

( १ ) प्रास्ताविक २११. कानपुरास तात्यांचा पराक्रम, इंग्रजांचा पराभव २१२-२१३. इंग्रजांचा विजय ६ डिसेंबर २१४. संचारी दलांची योजना २१४-२१५. दिल्लीहून कुमक २१५. पटियालीची लढाई २१६. हॉडसन व भिकारी २१७. कॅम्बेलचें फत्तेगडास प्रयाण २१८. शिक्षासत्र २१९-२२०. शम्साबादची लढाई २२१. लखनौ कीं रोहिलखंड २२२. आलमबागच्या झटापटी २२३. पूर्वेकडील कुमक २२४. लखनौचा पाडाव २२५-२२८. बायकांची शिपाईगिरी २२९. लखनौची लूट २३०-२३२. लखनौचे पुढारी २३३-२३४. कॅनिंगचा जाहीरनामा २३५-२३७. ( २ ) रोहिलखंडावर स्वारी २३७. रूइयाचा नरपतसिंग २३८. धाडसी जमादार २३९. पोवाखाच्या साम्याचें प्रायश्चित्त २४०. फेरोजशहाला खेड्याचा प्रतिकार २४१. बरेलीच्या गाझींची मुसंडी २४२-२४३. मौलवीची हिकमती कामगिरी २४४-२४५. जमीनदारी लढवय्यांचा पराक्रम २४६. राजा मानसिंग २४७-२४८. पावसाळ्याचे किरकोळ उठाव २४८. संडेलाचे पठाण २४९. कॅम्बेलची हिवाळी मोहीम २५०. वेणीमाधवाची नबाबनिष्ठा २५१. फेरोजशहाची झुकांडी २५२. जमीनदारांची शरणागति २५३. इंग्रजांचा चढेलपणा २५४. (३) पूर्वेकडील इतिवृत्त २५५-२५७. वृद्ध वीर कुंवरसिंग—लढाया, पळ, पाठलाग क्वचित् विजय व मृत्यु २५७-२६३. शहागडांतील दंगल २६३-२६४.

## ९. तात्यांची भरारी—महाराष्ट्र

( १ ) झालरापाटण झडपलें २६६. दक्षिणेस उतरण्याचा संकेत २६७. बांसवाड्याचा वनवास २६८. आपसांतील बेबनाव २६९. मानसिंग व इंग्रज २७०. तात्यांची धरपकड ७ एप्रिल २७१. तात्यांचा अंतकालीन स्वाभिमान २७२. तात्यांचें स्वरूप २७३-२७४. ह्यू रोजचा अभिप्राय २७५. (२) मुंबईतील मोहरम व दिवाळी २७५-२७८. पुनः एकदां कोल्हापूर २७८. कोल्हापूरचे चिमासाहेब २७९. बेळगांवचा कट २८०. नरगुंदचे भावे २८१. सिंधांत वावटळीची झुळूक २८२-२८४. दिलमुराद व दर्याखान कटवाले २८४-२८५. सातारा २८६. रंगो बापूजी २८६-२९३. भिल्ल, कोळी, बेरड २९३-२९५.

## १०. दडपशाहीचा कारभार

( १ ) पंजाबांतून पुर्भय्यांची हकालपट्टी २९६-२९८. दिल्लीकडील अत्याचार २९८-३०२. कानपूरच्या वाटेवर ३०२. रक्त चाटण्याची शिक्षा ३०३. जीवंत जाळण्याची करमणूक ३०४. सरकारी मालाचे इंग्रज चोर ३०५. दडपशाहीचे कायदे ३०६-३०७. दडपशाही ब्रिटिश लोकमत ३०७-३०८. उठावाचे सन्मान्य शत्रु ३०९. हत्यारांची जप्ती ३१०. हिंसेचें समर्थन ३११. इंग्रजी राज्याचें पुनरुज्जीवन पण कंपनी राज्याची समाप्ति ३११-३१२.

## विवेचन

**पुढारी : शिपाई** ३१५. क्षोभप्रसाराचीं केंद्रें ३१६. इंग्रजांचा वचक ३१७. धर्महानीचा कस ३१८. उठावांतील धरसोड ३१९—३२३. शिपाई व खजीने ३२३. दिल्लीची बेबंदशाही ३२४. शिपाई व जनता ३२७. शिपायांच्या स्वाभिमानांतील दोष ३२८. शीख व पुर्भय्या शिपाई ३३०. इंग्रजांचा विनायास लाभ ३३१. योग्य पुढाऱ्यांचा अभाव ३३४. शिपाई आणि 'विलायती' ३३६. **बहादुरशहा** इंग्रजांशीं सूत्र ३३७. शिराळशेटी बादशाहीचा गोंधळ ३३८. बादशहाचा बंदिवास व खटला ३४१. संघराज्याची बेगडी कल्पना ३४३. **धोंडोपंत नानासाहेब** ३४५. नानांचें रूप आणि वर्तन ३४६. नानांच्या डौलाची काटछाट ३४८. तीर्थयात्रेचा पोकळ दावा ३४८. नानांचा राज्यकारभार ३४९. नानांचा शेवट ३५०. नानांचीं पत्रें ३५१. नानांचे हस्तक ३५३. नानांविषयीं एक मत ३५४. **लक्ष्मीबाई** ३५५. लो. टिळकांचें मत ३५६. विविधज्ञानविस्तार व लक्ष्मीबाई ३५७. प. वा. केळकरांचे उद्गार ३५८. **बेगम हजरत महाल** ३५९. बेगमेचें एक वक्तृत्व ३६०. बेगमेचा जाहीरनामा ३६१. **मौ० अबदुल्लाशहा** मौलवीचें व्यवहारचातुर्य ३६४. लखनौंतील पुढारीपणा ३६५. **खानबहादुरखान** ३६६. बरेलीचे हिंदुमुसलमान ३६७. **बाबू कुंवरसिंह** ३६८-३६९. **पुढाऱ्यांचें समालोचन** ३७०-३७१. शिपाईगर्दीचें स्वराज्य ३७१-३७२. अनेक राज्यघोषणा ३७२-३७३. इस्लामका बोलबाला ३७३-३७४. शिपाई व जनता ३७४-३७६. इंग्रज व जनता ३७६-३७७. इंग्रजांचे बिनलष्करी नोकर ३७८. इंग्रजांच्या खाद्यपेयांचा बाजार ३७९. कानपूर, लखनौची हीच कथा ३७९-३८१. जनतेची स्वयंसेवा ३८१-३८२. शिपाई व खेडीं ३८२-३८३. हिंदुमुसलमान ३८३-३८४. शिपाईगर्दीचें विस्मरण ३८४. **'राष्ट्रीय' शब्दाची मीमांसा** ३८७. इंग्रजांचे अभिप्राय ३९१. हिंदी विद्वान् मानवेंद्र रॉय ३९३. पं. जवाहरलाल नेहरू ३९४. श्री. अशोक मेहता ३९५. डॉ. सुरेंद्रनाथ सेन ३९६. डॉ. आर. सी. मुजुमदार ३९९. कम्युनिस्ट लेखसंग्रह ४०२. सरदार पाणिक्कर ४०४. श्री. ताराचंद ४०५. अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध ४०६. **उपसंहार** ४०९.

## परिशिष्टें

**परिशिष्ट १ :** संदर्भसाहित्याची माहिती ४१३ ते ४२४.

**परिशिष्ट २ :** शिपायांच्या उठवाचा कालानुक्रम ४२४ ते ४३६.

**परिशिष्ट ३ :** इंग्रजांची मोहीम ४३७ ते ४४१.

• • •

# वृत्तान्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ~ १ ~

# वादळापूर्वी

### पहिला उठाव

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटींत १८५७ मध्यें झाला तो लष्करी शिपायांच्या असंतोषाचा स्फोट पहिला नव्हता. कर्नाटक मद्रासच्या भागांत फ्रेंच इंग्रजांचें वैमनस्य लढाईच्या रूपानें प्रगट होऊं लागल्यावर या दोन्ही पक्षांनीं एतद्देशियांच्या फौजा निर्माण केल्या. क्लाइवनें १७५७ सालीं प्लासी येथें बंगालच्या मोंगल सुभेदाराचा पराभव केला त्या वेळीं त्याच्या हाताखालीं हिंदी सैनिक होते, हें प्रसिद्ध आहे. सुरवातीस फ्रेंच-इंग्रजांनीं आपल्या व्यापारासाठीं स्थापलेल्या वखारींच्या संरक्षणार्थ नोकरीस ठेवलेल्या साध्या शिबंदीचे थोडेसे हिंदी लोक आपसांतील राजकीय वर्चस्वाच्या स्पर्धेनिमित्त त्यांना हळू हळू वाढवावे लागले. या लोकांनीं हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या लष्कराचा पाया घातला. इंग्रजी लष्कराची संघटना देशी राज्यांच्या लष्करापेक्षां निराळी होती. शिपायांची संख्या थोडी असली तरी त्यांची जूट राखणारी शिस्त व युद्ध-कौशल्याची कवाईत भिन्न होती आणि या एकंदर व्यवस्थेंतच शिपायांमधील असंतोषाच्या संहारशील स्फोटाला प्रेरणा पुरविणारें सामर्थ्य होतें. हें सामर्थ्य जागृत करणारा धडा हिंदी सैनिक आपल्या अंमलदार इंग्रजाकडूनच शिकले. प्लासीच्या लढाईनंतर गोऱ्या लष्करी अधिकाऱ्यांनीं जो बंडाळीचा यत्न केला, त्याचा परिणाम हिंदी शिपायांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. इ. स. १७६४ मध्यें इंग्रजी शिस्तीच्या हिंदी सैनिकांनीं

आपल्या इंग्रज व्यवसायबंधूंचा कित्ता गिरविला. या वेळीं मुर्शिदाबादेच्या नबाबाकडून मिळणाऱ्या द्रव्याच्या वांटणींत इंग्रज सोजराच्या मानानें आपला हिस्सा अगदींच क्षुद्र ठेवल्यावरून हिंदी शिपाई बिथरले. त्यांनीं इंग्रजी हुकमतीला धक्का दिला. शेवटीं इंग्रजांच्या निम्म्यानें हिंदी शिपायाचा वांटा याप्रमाणें तडजोड निघाली तेव्हां हा तंटा मिटला; परंतु हिंदी सैनिकांना आपल्या दंडेल अडवणुकीच्या वागणुकीबद्दल त्यावेळीं जबर प्रायश्चित्त भोगावें लागलें. शिपायांना बिथरविणाऱ्या पुढाऱ्यांना इंग्रजांनीं तोफेच्या तोंडीं दिलें. या प्रसंगीं २४ शिपायांच्या प्राणावर गदा आली.

## वेलोरचा रक्तपात

यानंतर १८०६ मध्यें मद्रासच्या भागांत वेलोर, हैद्राबाद, पालमकोटा, नंदीदुर्ग, वलाजाबाद या ठिकाणीं शिपायांच्या बंडाळीचा इंग्रजांना अनुभव आला. त्यांतली वेलोरची दुसरी उठावणी जास्त गंभीर स्वरूपाची होती. १७५७ पासून पुढील पन्नास वर्षांत इंग्रजांनीं केलेला राज्यविस्तार सदर उठावणीचा विचार करतांना ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. इंग्रजांनीं पंजाब सोडल्यास बाकीचा सर्व देश आपल्या वर्चस्वाखालीं आणला होता. म्हैसूरच्या टिपू सुलतानाची सत्ता त्यांनीं १७९९ मध्यें साफ उखडून काढली तर मराठ्यांची पेशवाई १८०३ च्या वसई येथील तहानें आपल्या शहांत आणून सोडली. दिल्लीची बादशाही, अयोध्येची नबाबशाही भरतपूरचे जाट, दक्षिणेंतील निजाम, मध्यभारतीय शिंदे होळकर, या सर्वांना इंग्रजांच्या धाकानें वागावें लागत होतें. इंग्रजांची देशभर राजकीय शिरजोरी ज्यांनीं वाढविली ते शिपाई मात्र हिंदी होते. एवढेंच नव्हे तर मोठ्या प्रमाणांत रजपूत व ब्राह्मणजातीचे होते. त्यांना शौर्याबरोबरच आपल्या धर्माची तीव्र आस्था होती. मुसलमान शिपायांनादेखील इंग्रजी राज्याचें मन्वन्तर आपल्या गौरवाला धुळीस मिळवीत असल्याबद्दल एकीकडे हळहळ, तर हें नवें युग आपला धर्म बुडवील अशी दुसरीकडे भीति वाटत होती. वेलोरला १८०६ मध्यें जें बंड झालें त्याच्या मुळाशीं स्वधर्मनाशाचें भय हें मुख्य कारण होतें.

नवी कवाईत, नवीं हत्यारें, नवा पोषाख, कडक शिस्त इत्यादि प्रकारांमुळें या वेळीं हिंदी शिपाई नाराज बनलेला होता. शिपायांनीं आपल्या कपाळीं चंदन लावूं नये, दाढीमिशा अधिकारी ठरवितील त्या

मापाच्या व थाटाच्या राखाव्या; त्यांनीं कानाचे दागिने वापरूं नयेत, अशा धोरणाचे नियम मद्रासकडे जारी करण्यांत आले होते. ही धर्मांतराची पूर्व-तयारी आहे, या भीतीला त्यांच्या पोषाखांतील शिरस्त्राणाचा दुजोरा मिळाला. हें शिरस्त्राण टोपीवजा होतें. शिपाई त्याला 'टोपी'च म्हणत. इंग्रजांनीं हिंदी शिपाई हाताशीं धरले तेव्हां त्यांना आपल्या पोषाखासंबंधांत विशेष फरक जाणवला नाहीं. आपल्या अंगवळणीं पडलेल्या पोषाखांत इंग्रजांनीं फारसा बदल केला नव्हता. बदल चालू होता, पण आपल्याला पोषाखाच्या द्वारें इंग्रज ख्रिस्ती धर्माची दीक्षा देऊं पाहात आहे अशी शंका बळावण्या-इतका तो बदल ठळक नव्हता. टोपीपर्यंत मजल पोचली तेव्हां शिपायांच्या डोक्यांत धर्मान्तराच्या भीतीनें ठाण मांडलें. या टोपीला जो कातडी पट्टा होता, तो गाईच्या कातड्याचा असा हिंदूंचा तर डुकराच्या कातड्याचा असा मुसलमानांचा ग्रह झाला. या संशयाच्या पिशाचाला खेळविणारा वर्ग छावणी-बाहेरच्या समाजांत होताच. फकीर, गोसावी, कटपुतळ्या नाचविणारे, लावण्या-पोवाडे गाणारे आणि भविष्यवादी; इत्यादिकांनीं शिपायांचा संशय वाढविण्याची संधि घेतली. धर्मान्तराची कल्पना गोसावी फकिरांनीं माजवावी, शौर्यवैभव गेल्याचे सूर गाणारांनीं आळवावे, दिल्लीची बादशाही, टिपूची सुलतानशाही इंग्रजांच्या पायाशीं लोळण घेत असल्याचे देखावे कटपुतळ्यांनीं शिपायांच्या डोळ्यांसमोर मांडावे आणि इंग्रजांच्या राज्याचीं शंभर वर्षें भरलीं, असें भाकीत भविष्यवाद्यांनीं सर्वत्र कुजबुजावे, याप्रमाणें वेलोरच्या भागांत त्या वेळीं गडबड चालू असल्याची इतिहासांत नोंद आहे. ज्यांनीं बंड केलें ते शिपाई वेलोरच्या किल्ल्यांत होते. तेथेंच टिपूचे मुलगे व इतर आश्रित लोक इंग्रजांनीं कोंडले असल्यानें गतवैभवाचीं हीं जीवंत स्मारकें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें शिपायांची नाराजी चेतवीत असतील, हें सहज समजण्याजोगें आहे. शेवटीं १८०६ तील जुलई महिन्याच्या १० व्या तारखेला शिपायांनीं रात्रीं जवळच्या इंग्रज सोजिरांवर हल्ला केला. बरेच सोजीर व अधिकारी त्यांनीं मारले. तत्काळ किल्ल्यावर टिपूचें निशाण फडकलें. पण हा विजय फार वेळ टिकला नाहीं. एक दोन दिवसांत अर्काटच्या इंग्रजांनीं हा विजय हिंदी शिपायांना झोडपून होता कीं नव्हतासा करून टाकला. मारलेल्या इंग्रजांच्या रक्तानें भिजलेली जमीन वाळण्यापूर्वींच या विजयाचे प्रमुख भागीदार प्राणान्तक लष्करी न्यायाला बळी पडले. वेलोरला जुलईपूर्वीं मे महिन्यांत हिंदी शिपायांचें मन

ताळ्यावर नसल्याचा उघड अनुभव आला होता. मात्र तो अनुभव जुलईप्रमाणें उग्र नव्हता. हैद्राबाद, पालमकोटा, नंदीदुर्ग, वगैरे ठिकाणीं शिपायांची उठावणी थोडक्यांत दवल्यामुळें तिची हकीकत तपशीलवार सांगण्याची गरज नाहीं. १८०९ मध्यें मद्रासच्या इंग्रज लष्करी अंमलदारांनीं बंडाळी करून पाहिली. परंतु ती वाढली नाहीं. हिंदी शिपायांना तिचें ज्ञान होतें, तथापि तिच्याबद्दल त्यांना सहानुभूति वाटली नाहीं.

### उठावणीची परंपरा

यामागून १८५२ सालापर्यंत शिपायांच्या उठावांची परंपरा सांगतां येते. त्या उठावांचीं वेलोरच्यासारखींच कारणें आहेत. केव्हां द्रव्यार्जनाला अडथळा तर केव्हां धर्महानीचें भय. १८२४ मध्यें बराकपुरास शिपायांनीं हुकूम मोडण्याचें जें धाडस उघडकीस आणलें त्याच्यामागें धर्महानीचें भय होतें. इंग्रजांची व ब्रह्मी राज्याची कटकट उपस्थित होऊन हिंदी सैनिकांना ब्रह्मदेशाच्या स्वारीवर जाण्याचा हुकूम सुटला. ब्रह्मदेशाला जाण्यासाठीं जमिनीचा मार्ग असला तरी तो डोंगर जंगल दलदलींनीं व्यापलेला अर्थात् सुगम नव्हे म्हणून जहाजांचा उपयोग झाल्यास समुद्रपर्यटनाचा धार्मिक निषेध मोडतो आणि पाप घडतें, यासाठीं हिंदु शिपाई स्वारीवर निघायला तयार होईनात, असें त्या सालच्या हुकूमभंगाचें कारण होतें. १८५२ मध्यें पुनः एकवार ब्रह्मी सरकारशीं लढाई जुंपली तेव्हां १८२४ ची आवृत्ति शिपायांच्या वर्तनांत प्रगटली. या वेळीं शिपायांच्या हट्टापुढें इंग्रज सरकारला नमतें घ्यावें लागलें. पूर्वीच्या हुकूमभंगाला तोफांचा मार बसला व ज्या पलटणीनें हा प्रकार केला, ती पलटण लष्करी पटावरून खरडून टाकण्यांत आली. १८५२ मध्यें हिंदी सैनिकांना निकालांत निघावें लागलें नाहीं.

१८४३–४४, १८४९–१८५० मध्यें जबलपूर, फेरोजपूर इत्यादि ठिकाणीं शिपायांनीं जी बंडाळी केली, तिचें मूळ पहावयाचें तर इंग्रजी राज्यविस्तारानें शिपायांच्या कमाईवर चालविलेल्या कात्रीकडे वळणें भाग आहे. इंग्रजांचें राज्य लहान होतें, त्या वेळीं सरहद्दीपलीकडचा सर्व मुलूख परका व तो जिंकण्यासाठीं शिपाई निघाले कीं, त्यांना निराळा जादा भत्ता मिळे. जो मुलूख काल एकप्रकारें परदेश होता, तोच जिंकून इंग्रजांनीं आपलासा केला कीं, शिपाई तेथल्या भत्त्याला मुकायचे. महाराष्ट्र, कर्नाटक,

पंजाब, सिंध हे प्रदेश एकदां परदेश होते. १८५० पर्यंत हे सर्व इंग्रजांनीं काबीज केले. यामुळें पूर्वीं पेशव्यावर, हैदर टिपूवर, शिखांवर, सिंधवर चालून जातांना शिपायांना द्रव्यदृष्ट्या जो लाभ मिळत होता, तो साहाजिकच १८५० नंतर गेला. लष्करी खर्चाची काटकसर, असेंहि भत्ताकटाईचें एक कारण सांगतां येतें. भत्ताकाट ही गोऱ्याकाळ्यांना सारखीच लागू होती. पूर्वोक्त वर्षांमध्यें शिपायांनीं भत्त्यानिमित्त अधिकाऱ्यांची अवज्ञापूर्वक अडवणूक केली. कधीं त्यांना यश आलें तर कधीं ते शिक्षेचे धनी बनले. १८५७ सालीं शिपायांनीं जें केलें त्यांत अपूर्वता असलीच तर ती व्यापकतेची आहे. त्यापूर्वींचे उठाव त्या त्या ठिकाणींच जिरले.

— २ —

येथवर केलेल्या समालोचनांत शिपायांच्या असंतोषाचीं जीं कारणें दाखविलीं आहेत तीं १८०६ नंतरच्या पन्नास वर्षांत कोणत्या रीतीनें पोसलीं गेलीं व त्यांना सामान्य जनतेच्या असंतोषाची मदत कशी झाली याचें अधिक निरीक्षण केल्याखेरीज १८५७ च्या भडक्याचा नीट उलगडा होणार नाहीं. त्यासाठीं आधीं शिपायांच्या चित्तविक्षेपाचीं तपासणी करणें बरें.

**लष्करी उभारणीचा वृत्तान्त**

बंगालची फौज हा शब्द बंगालच्या इंग्रज राज्यकर्त्यांनीं आस्तित्वांत आणलेली फौज एवढ्याच अर्थानें खरा आहे. प्रत्यक्ष बंगालचा एकहि रहिवासी या फौजेंत शिपाई या नात्यानें दाखल झालेला नव्हता. अयोध्येच्या नबाबशाही मुलखांतील आणि बिहार प्रांतांतील ब्राह्मण व रजपूत या दोन जातींचा अतिशय मोठा भरणा इंग्रजांच्या पायदळांत होता. घोडदळ हें प्रामुख्यानें मुसलमानांच्या नोकरीचें मैदान होतें. तोफखान्यांतसुद्धां या दोन्ही समाजांना जागा देण्याची प्रथा होती. हिंदुमुसलमान शिपायांची निवड प्रायः बिहार व अयोध्येचा प्रांत यांतूनच अधिक होत असल्यानें त्यांच्यांत स्नेहसंबंध असावे, हें सरळ आहे. धर्मदृष्ट्या यामध्यें भेद असूनहि रोजच्या जीवनव्यवहारांत त्यांच्या लाभहानीचे प्रसंग सारखेच होते. फौजेपुरतें बोलायचें तर लाभहानीचें समान प्रसंग कोणतें याचें स्पष्टीकरण अवश्य आहे.

द्रव्यप्राप्ति हा दोन्ही समाजाच्या शिपायांचा समान हेतु होता. द्रव्यलाभ आणि प्रतिष्ठा यांचें साहचर्य ध्यानांत घेतल्यास शिपाईगिरींतील वरच्या

अधिकाराची अपेक्षा शिपायांनीं बाळगावी हें साहजिक आहे. हिंदी लष्कर उभारलें तेव्हां सुरुवातीच्या कांहीं वर्षांत शिपायांच्या अधिकाराला निश्चित मर्यादा नव्हती. पुढें ही मर्यादा आखडून शिपायांची बढती खुरटली. अधिकारक्षेत्रांत वाटेल तेवढ्या उंचीवर जाण्याला जशी इंग्रजाला यथाशक्ति मोकळीक होती, तशी मोकळीक हिंदी शिपायाला नव्हती, तरीसुद्धां हिंदी शिपायांच्या समाधानांत विशेष अंतर पडलें नाहीं. कारण त्यांचे गोरे अधिकारी शिपायांशीं अतिशय खेळीमेळीनें वागत असत. शिपाई व गोरे अंमलदार हे जणूं काय एका कुटुंबाचे घटक. शिपाई मुलांसारखे तर अधिकारी मुलांच्या सुखदु:खाची काळजी वहाणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळीसारखे, याप्रमाणें सुरवातीचीं अनेक वर्षे त्यांचा आपसांत व्यवहार होता. या व्यवहारांत १७९६ सालीं खंड पडला. इंग्रज अधिकाऱ्यांसाठीं देण्यांत आलेल्या सवलतीच्या कायद्यापायीं हिंदी लष्करांतले बरेचसे जुने अधिकारी त्या वर्षीं स्वदेशीं निघून गेले. नवा प्रदेश पादाक्रान्त केला म्हणजे तेथें लष्करांतील जुने अनुभवी अधिकारी राज्यकारभारासाठीं नेमण्याच्या प्रघातामुळें लष्कराचे अंमलदार सारखे कमी होत असत. त्यांच्या जागीं जे नवे अधिकारी येत त्यांना पूर्वीच्या अधिकाऱ्यांप्रमाणें हिंदी शिपायांच्या स्वभावांतील गुण-दोषांचीं व सुखदु:खांची दाट ओळख करून घेण्यासारखी परिस्थिति काल-मानानें उरली नव्हती. पूर्वीचा अधिकारी हा शिपायांतच वाढलेला असे. शिपायांचा अभिमान त्याला तर त्याविषयीं प्रेमादर शिपायाला. ही स्थिति १७९६ नंतर पालटली. तेव्हांपासून अधिकाऱ्यांचे व शिपायांचे संबंध दुरावण्याला प्रारंभ झाला. एकदां शिपाई व बरोबरचे अधिकारी याखेरीज अधिकाऱ्यांना दुसरें कोणी सहवासीच नव्हते. शिपायांत बसणें उठणें हें अधिकाऱ्यांच्या करमणुकीचें मोठें साधन होतें. इंग्रजी वाङ्मय दुर्लभ होतें. दळणवळणाच्या सोयी नव्हत्या. गोऱ्या स्त्रियांचाहि अभाव होता. गोऱ्यांच्या काळ्या रखेल्या या प्रकाराला मनाई नव्हती. या स्त्रियांच्या मार्फत हिंदी शिपाई आपलीं गाऱ्हाणीं अंमलदारांच्या कानीं घालून दाद मिळवीत, अशी इतिहासाची साक्ष आहे. जेव्हां दळणवळणाची दिरंगाई कमी झाली; आगबोटी इकडे येऊं लागल्या तेव्हां गोऱ्या बायकांची संख्या वाढत चालली; गोऱ्यांचा काळा जनाना ही स्थिति संपली मग अंमलदारांच्या गोऱ्या बायका हें नवें

आकर्षण निर्माण होऊन साहजिकच शिपायाशीं अधिकाऱ्यांची पूर्वीप्रमाणें सलगी उरली नाहीं. शिपायांचा असंतोष वाढविणाऱ्या कारणांत या गोष्टीची नोंद आहे.

## शिपायांचीं दुःखें

शिपायांच्या हृदयाला आणखी एक प्रकार पिढ्यान्‌पिढ्या झोंबत होता. शिपायांच्या जीवावर इंग्रजांचें राज्य वाढावें आणि त्याचा यथेच्छ फायदा मुलकी अधिकाऱ्यांनीं (सिव्हिल सर्व्हिसनें) उकळावा; सिव्हिल सर्व्हंटाच्या हुजऱ्याचा पगार शिपायाहून जास्त, हा पंक्तिप्रपंच कळण्याइतका शिपाई सुबुद्ध असल्यानें तो कधीं कधीं आपलें गाऱ्हाणें वरिष्ठाच्या डोळ्यावर घालीत असे. ‘ खानेको हम और लडनेको मेरा भाई ’ ही स्थिति शिपायाला क्षोभवीत होती, पण वरिष्ठांनीं या स्थितीचा योग्य विचार करण्याऐवजीं अधिकाऱ्यांबद्दल अनादर वाढविणारे निराळे उपाय अंमलांत आणले. शिपायांना फटके मारूं नयेत; त्यांच्या तक्रारींचा निकाल जवळच्या अधिकाऱ्यांऐवजीं दूरच्या वरिष्ठांनीं करावा, असे नियम सुरू केल्यानें शिपायांना जवळच्या अधिकाऱ्यांची कदर बाळगण्याची गरज उरली नाहीं. आपल्याला फटक्याची शिक्षा नाहीं व गोऱ्या सोजराला ती भोगावी लागते याच्या परिणामीं शिपाई फुशारला. ( पुढें कांहीं वर्षांनीं काळ्या सैनिकांना फटके मारावे, असा नियम करण्यांत आला. ) गोऱ्या अंमलदारांनीं शिपायांना कवाइतीच्या मैदानावर सुचतील त्या गलिच्छ शिव्या द्याव्या; काळे अंमलदार गोऱ्यांच्या बंगल्यावर गेल्यास त्यांना त्यांनीं उभे तिष्ठत ठेवावे. गोऱ्या अधिकाऱ्याला काळ्यांनीं-शिपायापासून-सुभेदारापर्यंत सर्वांनीं-सलाम करावा व सामान्य गोऱ्या सोजरांनीं हिंदी अधिकाऱ्याचा उपमर्द निःशंकपणें आचरावा, हे प्रकार हिंदी सैनिकाला जाचत होते. हिंदी अधिकाऱ्याला स्वतंत्र डेरे राहुट्या नाहींत, त्यानें शिपायांच्या निवाऱ्यावर भागवावे; प्रवासांत त्याला स्वतःच्या खर्चानेंसुद्धां वाहनाचा उपयोग करतां येऊं नये; सोजरांनीं वाहनाच्या सुखांत मजल मारावी, हे अनुभव सकृद्दर्शनीं क्षुल्लक वाटण्याजोगे आहेत; पण शिपायांना ते रुचत नव्हते, उलट त्यांच्या संतापांत भर टाकीत होते. ज्या काळाचा हा वृत्तान्त आहे, त्या काळांत बरींच स्वतंत्र देशी राज्यें टिकून होतीं. त्या राज्यांतल्या शिपायांच्या स्थितीशीं इंग्रजी हुकमाचा शिपाई आपल्या स्थितीशीं तुलना

करूं शकत होता. आपली स्थिति शेजारच्या देशी राज्यांतील शिपायाच्या मानानें निकृष्ट आहे, त्या राज्यांत शिपाईगिरीच्या पराक्रमाला वंशपरंपराची जहागीर मिळण्याला प्रतिबंध नाहीं. इंग्रजांच्या शिपायानें आपल्या पराक्रमाची शिकस्त केल्यासहि त्याला जहागिरीची तर नाहींच, पण साध्या घसघशीत रोकड बक्षिसाची देखील आशा धरतां येत नव्हती. एकदां लढाईत मरणाऱ्या हिंदी शिपायांच्या बायकामुलांची तरतूद हें कलम इंग्रजांच्या कारभारांत नव्हतें. हा अन्याय कालान्तरानें नाहींसा करण्यांत आला. त्याला पेन्शन मिळूं लागलें व तो लढाईत मेल्यास त्याच्या बायकामुलांच्या संगोपनाची व्यवस्था जारी झाली. अर्थात् ही व्यवस्था डोळ्यांत भरणारी नव्हती. येथें वर्णिलेल्या व्यवहारांत हिंदु-मुसल्मान दोघेहि सारखेच भागीदार होते.

लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दीच्या शेवटीं (१३ फेब्रुवारी १८५६) अयोध्येची नबाबशाही नष्ट करण्यांत आली व तेथें शेतवाडी, घरेंदारें असणाऱ्या शिपायांचे कांहीं विशेष हक्क रद्द झाले. नबाबशाहींत इंग्रजाच्या शिपायाचे खटले इतरांच्या आधीं विचारांत घेतले जावे, असा एक हक्क होता; त्याला न्यायासनापुढें जाण्याला सवड नसेल तर ते बाजूस ठेवावे, त्याला टपालखर्च द्यावा लागत नव्हता, हें इंग्रजी शिपायाचे लाड नबाबशाहीबरोबरच कायमचे मावळले. हा शिपाई नबाबशाहीच्या काळांत रजा घेऊन किंवा नोकरी संपवून घरीं गेला कीं गांवकऱ्यांतर्फे त्याचा जो मानमरातब राखला जाई तो नबाब-शाहीनंतर संपुष्टांत आला. नबाबशाहींत गांवोगांवचे शेतकरी व तालुकदार यांचे पिढ्यान्‌पिढ्या ऋणानुबंध वाढलेले होते. तालुकदार हे नबाबाच्या प्रतिमा होते. त्यांच्या वैभवशाली राहणीशीं गांवकऱ्यांचा निकट संबंध असे. इंग्रजांनीं नबाबशाहीचा प्रदेश ताब्यांत घेऊन प्रथम तालुकदारांच्या शेती-वाडीची काटछाट आरंभली; त्यामुळें त्यांच्या वहिवाटींतील शेंकडों गांवांच्या शेतकरी रहिवाशांना भांबावून सोडलें. इंग्रजांचे शिपाई या शेतकरी वर्गांतलेच असल्यानें तेहि दुखावले. तालुकदारांच्या अवदशेनें सामान्य शेतकऱ्याचा कदाचित् थोडा फायदा झाला असेल, पण तो समजून इंग्रजाविषयीं कृतज्ञता वाटण्याइतका शेतकरी शिपाई सज्ञान नव्हता. शिवाय इंग्रजांचा शिपाई या नात्याचे त्याचे लोकांतील मानसन्मानाचे स्वतंत्र हक्क बुडाले, असें त्याचें स्वतःचें दुःख होतेंच.

— ३ —

## सामाजिक सुधारणा

आर्थिक व इतर व्यवहाराच्या दृष्टीनें शिपायांत जी असंतोषाची आग पेटत होती, तिला इंग्रजी राज्यांतील सामाजिक कायद्याचें सर्पण मिळालें. साधारणपणें अठराव्या शतकाच्या शेवटीं इंग्रज राज्यकर्त्यांनीं आपल्या हिंदी प्रजेंतील अमानुष दुराचाराचीं पाळेंमुळें खणून काढायला सुरुवात केली. हे दुराचार धर्माच्या नांवानें प्रचलित होते. कायदा ब्राह्मण्याच्या वरचढपणाची मुर्वत बाळगीनासा झाला; गंगाकिनारीं मरणोन्मुखांना असहाय दशेंत टाकण्याची प्रथा बंद पडली; बायकांना सती जाण्याची मुभा उरली नाहीं; कित्येक ठिकाणीं धर्माच्या मान्यतेनें शतकानुशतकें चाललेल्या नरमेधाला इंग्रजांनीं निकालांत काढलें; कांहीं ठिकाणीं मुली उपजतांक्षणीं मारण्याचा जो लोकसंमत आचार होता त्याला त्यांनीं प्रतिबंध केला; एकदां तुरुंगांत कैद्यांना स्वतंत्रपणें आपल्यापुरतें अन्न शिजवून खाण्याची परवानगी होती; त्या ऐवजीं सर्वांसाठीं जातवारीनें एकत्र अन्न शिजवून ते वाटण्यांत यावे, अशी नवी रीत इंग्रजांनीं अंमलांत आणली. इंग्रज आपल्याला बाटविण्याचीं कारस्थानें करीत आहे, या भीतीला प्रस्तुत रीतीमुळें आधार मिळाला. तुरुंगांतली पाक-सिद्धि ब्राह्मणानें केली असली तरी त्यावर कैद्यांचा विश्वास बसेना; सामुदायिक स्वयंपाकाच्या मुळाशीं दुष्ट हेतूचें पाणी मुरत असल्याच्या संशयाचें निरसन होईना; उत्तर भारतीय ब्राह्मणादि उच्च ठरलेल्या जातीचे लोक पाण्यासाठीं आपापल्यापुरतें प्रत्येकीं निराळें भांडें बाळगतात. तसें धातुपात्र अर्थात् लोटा तुरुंगांतहि जवळ ठेवण्याची त्यांना एकदां सवलत होती. पण या लोट्यांचा आपसांत किंवा अधिकाऱ्याविरुद्ध शस्त्रासारखा घातकपणें कैद्यांनीं उपयोग केल्याचीं क्वचित् उदाहरणें घडतांच इंग्रजांनीं धातूच्या ऐवजीं मातीचे लोटे त्यांना देऊं केले. उच्च जातीच्या कैद्यांचा धर्मान्तरविषयक संशय वाढण्याला हें नवें कारण लाभलें. येथें हे कैदी व शिपाई यांची जात सामान्यपणें एकच हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. विधवाविवाहाला कायद्याचें पाठबळ, धर्मान्तर करणाराला पूर्व धर्मांतील मालमत्तेचा हिस्सा मिळण्याचा कायदेशीर हक्क, अनेक भार्याप्रतिबंधाचा धोका इत्यादि गोष्टी स्वधर्माला पोखरून ढिला करीत असल्याबद्दलचा खात्रीनें हिंदुसमाजाच्या चित्तावर पगडा बसविला.

१८५२ सालीं शिपायांनीं परदेशीं जाण्याला हट्टी नकार दर्शवून त्यापुढें इंग्रज राज्यकर्त्यांना वाकायला भाग पडल्यावर इंग्रजांनीं नवे शिपाई

फौजेंत दाखल करतांना त्यांना वाटेल तेथें जावें लागेल अशी अट लष्करी नियमांत घातली. यामुळें अयोध्या व बिहार येथील हिंदु शिपायांनीं इतःपर आपल्या वंशजांना लष्करी नोकरीचा रस्ता खुला नाहीं, असा बाजवी समज करून घेतला. देशांत शिक्षण सुरू झाल्यावर ज्याला लिहितां वाचतां येत नाहीं, त्या सैनिकाला बढती नाहीं, असा हुकूम लष्करी खात्यानें काढल्यावर शिकण्याच्या वयापलीकडे गेलेल्या शेकडो हिंदी सैनिकांवर आपल्या भवितव्याविषयीं खडतर निराशा सोसण्याची पाळी आली. हिंदु शिपाई पिढ्यान्-पिढ्या इंग्रजांच्या लष्करांत वाढले होते. आजा, मुलगा, नातू या क्रमानें ज्यांनीं नोकरी बजावली, त्यांच्या समोर लष्कर भरतीच्या नव्या नियमान्वयें आपल्या देशाबाहेर जाण्याचें धर्मद्रोही संकट उभें राहून धर्म बुडवावा कीं वंशपरंपरेच्या नोकरीला कायमचे पाठमोरे व्हावे, अशा पेचामुळें असंतोषाचें प्रमाण वाढवलें, यांत आश्चर्य कसलें ? हे ब्राह्मण व रजपूत शिपाई आपल्या धर्माचा आब संभाळण्याची खबरदारी कशी बाळगीत असत याचें एक उदाहरण येथें सांगण्याजोगें आहे. ब्रह्मदेशाकडे भूमार्गानें जातांना आराकान येथें वस्तीसाठीं शिपायांनीं आपल्या झोपड्या स्वतः बांधाव्या, असा हुकूम फर्मावण्यांत आला. इंग्रजी शिपाई ताबडतोब या उद्योगास लागले व हिंदु शिपाई या कामांत धर्महानि आहे, अशा कल्पनेनें अडले. अधिकाऱ्यांनी मनधरणी करून शहाणपणानें शिपायांची समजूत काढली तेव्हां त्यांनीं झोपड्या बांधण्याच्या कामास हात घातला. आपण श्रेष्ठ, घरें बांधण्याचें हलकें काम आपलें नव्हे, धर्माची याला संमति नाहीं, अशा कल्पना उराशीं बाळगणारा समाज मागसलेला होता, असें आज म्हणतां येतें. त्या वेळीं अडलेल्या ब्राह्मणरजपुतांचे वंशज आपल्या त्या पूर्वजांच्या वागणुकीचा आज विशेष आदरबुद्धीनें विचार करणार नाहींत, पण तेव्हां धर्मनिष्ठा किती नाजूक होती, हें ध्यानांत येण्याला वरील घरें बांधण्यासंबंधांतली गोष्ट उपयोगी आहे.

### धर्महानीचें भय

सत्तावनपूर्वीच्या काळांतील हिंदु-मुसलमानांच्या मतें इंग्रजी शाळांच्या द्वारें नव्या पिढीला दिलें जाणारें शिक्षण हें स्वधर्मनाशाचें अमोघ साधन होतें. इंग्रजांची विद्या पौराणिक ज्ञानाचा पोकळपणा निदर्शनास आणून

स्थळप्रत.
अनुक्रमांक 23233 दि. [illegible]
क्रमांक [illegible] नों. दि. [illegible]

नव्या पिढीला बिघडवीत आहे, याबद्दल तत्कालीन वृद्धांना मुळींच संशय नव्हता. आमचीं आयुर्वेदरसायनादि शास्त्रें, आमचा भूगोल, आमचें पदार्थ-विज्ञान (याचा बहुतांशीं अभावच होता) आमचा धार्मिक व सामाजिक आचार-विचार, इत्यादि भारतीय ज्ञानाच्या शाखोपशाखांची नव्या पिढीनें थट्टा करावी, तीं कुचकामाचीं असल्याचा दावा मांडावा; इंग्रजी पेहराव, इंग्रजी रीतरिवाज स्वीकारावा, असा अनुभव पुष्कळ घरांतून प्रत्यक्षपणें येत होता. एक वेळ पुरुषांवर होणारा इंग्रजी विद्येचा अनिष्ट परिणाम सहन करणें शक्य होतें. पण तसेंच शिक्षण स्त्रियांना देणें हा प्रकार तत्कालीन वृद्ध धर्मनैष्ठिकांच्या श्रद्धेला असह्य, अश्लाघ्य किंबहुना अक्षम्य वाटला असल्यास नवल नाहीं. पण या शिक्षणाला इंग्रज सत्ताधारी उघड उघड प्रोत्साहन देत असल्याचें पाहून तेव्हांची जनता स्वधर्माच्या अस्तित्वासंबंधांत निराश झाली, असें सुचविणारा पुरावा सांपडतो. सरकारी शिक्षणसंस्थांहून मिशनऱ्यांच्या शाळांचें धर्मनिष्ठांना अधिक भय वाटणें स्वाभाविक आहे. मिशनरी आपल्या शाळांतून खिस्ती धर्माचा प्रसार करीत होते. हिंदु-मुसलमानांच्या धार्मिक आचार-विचारांतील दोष दाखविण्याचा त्यांना संकोच वाटत नसल्यानें त्यांच्या शाळांतून शिकणारी अपक्व बुद्धीची पिढी स्वधर्माच्या अवमानाला प्रवृत्त व्हावी, हें क्रमप्राप्त समजावें लागतें. मिशनऱ्यांनीं चालविलेली बाटवाबाटवी, त्यांच्या संस्थाविषयीं सरकारी अंमलदारांच्या द्वारें व्यक्त होणारी सहानुभूति, त्यांच्या शाळांतील हिंदु-मुसलमान धर्माचा अनादर शिकविणारी पद्धति; सरकारी शाळांतून कोणत्याच धर्माला थारा नाहीं; शिकलेल्या व्यक्तींनीं काढलेला नवा ब्राह्म संप्रदाय व त्याच्या मार्फत सरकारच्या समाज सुधारणा-विषयक कायद्यांना मिळणारा पाठिंबा, या सगळ्या हालचालींचें पर्यवसान सगळा देश खिस्ती धर्माच्या जाळ्यांत जावा, हें निश्चित असण्याच्या भीतीनें जनतेला ग्रासलें होतें.

धर्महानीच्या भीतीला आगगाड्या, तारायंत्राची नवी जोड मिळाली. डलहौसीनें साऱ्या देशांत तारायंत्राची उभारणी केली. त्यानें हिंदुस्थान सोडलें तेव्हां कलकत्याहून पेशावर, मद्रास, सीलोन येथवर तारायंत्रानें बातम्यांची आवजाव सुरू झाली होती. दळणवळणच्या पक्क्या मोठाल्या सडका आधीं तयार होत्या. त्यांचें काम आगगाड्यांच्याद्वारें सोपें व जलद

करून सोडण्याचा पाया डलहौसीनें घातला. त्याच्या कारकिर्दींत (१८५३–५४) कलकत्त्याहून राणीगंज (सुमारें १७० मैल) आणि मुंबईहून ठाणें (२१ मैल) याप्रमाणें आगगाड्यांची रहदारी चालू होऊन देशभर रूळ टाकण्याचा धडाका सुरू होता. आगगाडीचा लोहमार्ग हा शिक्षणापेक्षां जातिभेद खिळखिळा करणारा जास्त जालीम उपाय, असें हिंदूंना वाटलें. तर मिशनऱ्यांनीं तशा अर्थाचा जाहीरनामा काढला. आगगाडींत स्पर्शास्पर्श-विचार संभाळण्याला जागा नाहीं, सर्व जातींनीं एका डब्यांत एकमेकांना खेटून बसण्याशिवाय गत्यंतर नव्हतें, म्हणजे शिवाशीव गेली. ज्या काळीं विटाळ-चंडाळाचें माहात्म्य विलक्षण प्रबळ होतें, त्या काळीं आगगाडीच्या प्रवासानें धर्माभिमान्यांच्या चित्तावर केवढा प्रखर आघात केला असेल याची कल्पना करणें चांगलें. एकमेकाला चिकटून बसण्याच्या प्रत्यक्ष प्रसंगाहून अप्रत्यक्षपणें धर्मभावनांची दुर्दशा करून सोडणारा एक परिणाम येथें सांगायला हवा. वाफेनें चालणाऱ्या गाड्या हा चमत्कार ख्रिस्ती धर्माचा, असा अनेकांचा ग्रह होऊन बसला. तारायंत्राचा व्यवहार आगगाडीला मागें टाकणारा म्हणून पराकाष्ठेचा विस्मयकारक ठरला. या आश्चर्यकारक घटनांवरून ख्रिस्तीधर्मा-बद्दल अनुकूलता वाढणार व ती अनुकूलता शेवटीं आपला धर्म नाहींसा करणार, अशी देखील एक कल्पना तेव्हां लोकांमध्यें पसरत होती. आगबोटींची ये जा १८४२ पासून सुरू झाली असली तरी १८२४ मध्यें छोट्या आग-बोटींचा प्रादुर्भाव हिंदी समुद्रांत झाला व पहिल्या ब्रह्मी युद्धांत त्यांचें साह्य इंग्रजांना घेतां आलें. याच सुमारास मद्रासला एका आगबोटीचा पहिला संचार पाहण्यासाठीं हजारों लोक समुद्राच्या कांठीं जमल्याचा वृत्तान्त इतिहासांत पहायला सांपडतो. इंग्रजाला वीज, आग हीं निसर्गाचीं सामर्थ्यें वश आहेत. रावणाच्या कथेंत जे ऐकतवाचीत होतो, त्यांतले कांहीं चमत्कार इंग्रज करून दाखवितो, अर्थात् तो दैत्याचा अवतार आहे आणि दैत्याचें कार्य देवधर्माच्या छळाशिवाय दुसरें नाहीं, असा निष्कर्ष काढण्या-कडे लोकांचें लक्ष वळलें. इंग्रज बाया, इंग्रजी वृत्तपत्रें, इंग्रजी वाङ्मय, इत्यादिकांचा प्रवेश हिंदुस्थानांत होऊन शिपाई व त्यांचें गोरे अधिकारी यांच्या स्नेहसंबंधांत आगबोटीमुळें जो फरक पडला त्याची वाच्यता पूर्वीं केलेली आहे.

— ४ —

### अजिंक्यपणाला धक्का

शौर्याची पूजा हा मानवाचा स्वभावविशेष शिपायांतहि होता. इंग्रजाच्या साहसाला, शौर्याला, पराक्रमाला पहिल्या शंभर वर्षांत सामान्यपणें एकहि धक्का बसला नव्हता. इंग्रजी नेतृत्वाला व शौर्याला पराभव माहीत नाहीं, ही शिपायांची श्रद्धा १८४०–४२ च्या अफगाण युद्धांत ऱ्हास पावली. इंग्रजांना तेव्हां कांहीं वेळ सडकून मार खाल्ला, त्यांची पीच्छेहाट झाली, हें पाहून शिपायांना वाटणारा त्याच्या अजिंक्यपणाचा दरारा मावळला. प्रत्येक लढाईत थोडेसे इंग्रज आणि मोठी फौज शिपायांची; इंग्रज पराक्रमी खरा पण त्याला हिंदी शिपायांच्या शौर्याची साथ असल्यामुळें इंग्रज विजयाचा धनी बनतो, याची ओळख दीर्घ साहचर्यानें शिपायाला पटूं लागली होती. अफगाण वीरांना जिकतांना आपलें शौर्य जवळ नसतें तर इंग्रजांची धडगत नव्हती, हें स्वाभिमान जागृत करणारें तात्पर्य अत्यंत अस्पष्टपणें शिपायाच्या हृदयावर अफगाण युद्धाच्या वेळीं ठसलें. त्यामागून शीखांच्या लढायांत प्रस्तुत तात्पर्याला जास्त स्पष्टता आली. पंजाब जिंकल्यावर इंग्रजांच्या सैन्यांत शीख, पंजावी, पठाण, मुसलमान, यांची भरती होऊं लागली; या प्रकारानें अवधी व बिहारी शिपायांमध्यें वैषम्याचें बीज रुजलें. गुरख्यांचा प्रवेश पंजाबांतील शीख मुसलमानांच्या पूर्वींच लहानशा प्रमाणांत झालेला होता. आपला पूर्वींचा लष्करी एकजिनसीपणा यापुढें मोडणार आणि आपली महती जाणार या संकटानें अवधी बिहारी शिपायांना घेरलें. पण आपली संख्या मोठी असून ती एकदम खालावणार नाहीं, असाहि या शिपायांना विश्वास होता. तरी सुद्धां इंग्रजाला वचक बसविला पाहिजे, म्हणून शिपाई आपापसांत किरकोळ कच्चीं खलवतें करीत होता. १८५० नंतर वातावरण वरून शांत होतें. तथापि या खलबतांचे निःश्वास ह्या वातावरणांत मिसळत होते. १८५६ सालीं या खलबतांचीं आंदोलनें वातावरणांत उठलीं.

### संस्थानें व इंग्रज

१८५६ मध्यें अयोध्येच्या नबाबशाहिवर कायमचें राम म्हणण्याची पाळी आली. यापूर्वी सातारा (१८४८) झांशी, नागपूरची भोसलेशाही (१८५३) हीं राज्यें इंग्रजांनीं गिळून पचवून टाकलेलीं होतीं. दुसऱ्या

बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याला मिळणारें सालीना आठ लाखाचें पेन्शन इंग्रजांनीं त्याच्या दत्तक मुलाला द्यावयाचें नाहीं, असा निश्चय अंमलांत आणला. सातारा, झांशी, नागपूर या राज्यासंबंधांत दत्तकाच्या हक्काचा प्रश्न होताच. सांप्रत देशांतील सारीं राज्यें विलयास गेल्यानें इंग्रजांनीं कांहीं राज्यें शंभर वर्षांपूर्वीं खालसा करतांना जें धोरण स्वीकारलें त्याच्या न्यायान्यायाची तात्त्विक चर्चा करण्याची आतां गरज नाहीं. त्यांतल्यात्यांत झांशीची राणी, अयोध्येची बेगम व दुसऱ्या बाजीरावाचा दत्तक पुत्र धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब या तिघांचा १८५७ च्या शिपाई-गर्दीशीं संबंध असल्यानें तेवढ्यांचा विचार केल्यास चालेल. इंग्रजांनीं देशी राज्याविषयीं आपल्या कृपेचीं व परंपरागत असा सूक्ष्म भेद निर्माण केला होता. झांशी, सातारा, नागपूर हीं आपल्या कृपेचीं राज्यें नीट चालतील तर जिवंत ठेवावीं; त्यामध्यें अंदाधुंदी असेल तर तीं आपल्या ताब्यांत घ्यावीं, या सिद्धान्तानुसार हीं राज्यें प्रजेला सुखाचीं नाहींत, या सबबीवर इंग्रजानें खालसा केलीं. तेथें कोणाला दत्तक पुत्र असेल तर त्यानें वडिलार्जित खाजगी मिळकत खुशाल भोगावी, पण तो राज्याचा अधिकारी होऊं शकत नाहीं, असा इंग्रजी राजनीतीमध्यें दत्तक पुत्राविषयीं एक श्लेष होता. दुसऱ्या बाजीरावाला जो तनखा ठरला तो त्याच्या हयातीपुरताच असल्यानें त्याच्या पुत्राला तो देण्याला आपण केव्हांच बांधलेले नव्हतों, असा इंग्रजांचा पक्ष होता. झांशीच्या राणीला सालीना सहा लाखांचा तनखा इंग्रजांनीं मंजूर केला व तें राज्य हिरावून घेतलें. राणीनें 'माझी झांशी मी तुम्हांला कधींच देणार नाहीं' असा राज्य खालसा होतांना उद्‌गार काढला, पण १८५७ सालीं शिपायांनीं घडवून आणलेलें स्थित्यंतर उद्भवलें नसतें तर तो उद्‌गार सार्थ होण्याची संधीच तिला नव्हती. येथें राणीसंबंधांतला इंग्रज राज्यकर्त्यांच्या नीच वृत्तीचा एक मासला नमूद करणें अवश्य आहे. त्यांनीं मयत राजाचें कर्ज फेडण्याची जबाबदारी राणीच्या तनख्यावर टाकली. राजाचें कर्ज राज्याच्या उत्पन्नांतून फेडणें हा नीतीचा व सौजन्याचा मार्ग इंग्रजांनीं सोडला. हिंदु देवस्थानांचीं उत्पन्नें बंद केलीं. झांशीस गोवध होऊं नये, असें राणीचें म्हणणें होतें, तें इंग्रजांनीं झिडकारलें. एक वेळ राज्य गेल्याचें दुःख राणीसाहेबांनीं कसेंबसें सोसलें असते, परंतु दरसालच्या सहालाख तनख्याला कर्जफेडीचें जें खिंडार पडत होतें, तें द्रव्य-हानीपेक्षां अपमानाचें म्हणून जास्त असह्य होतें. त्या तनख्यांतून इंग्रज

अधिकारी कर्जफेडीचा हप्ता परभारें कापून घेत होता. राणीनें उद्वेगाच्या भरांत हा तनखा प्रथम नाकारला, पण मागून स्वीकारण्याला प्रारंभ केला.

अंदाधुंदी, जुलूम जबरदस्ती, हीं कारणें पुढें करून अयोध्येची नबाबशाही इंग्रजांनीं नष्ट केली. राज्यांतला वेदाद बेफाम अस्ताव्यस्तपणा न मोडल्यास इंग्रजांकडून राज्य खालसा होईल, असा इशारा नबाबांना पिढी दर पिढीस दिला जात असूनहि नबाबांवर ह्याचा योग्य परिणाम झाला नाहीं. राज्यांत अंदाधुंदी व नबाबाची चैनबाजी ही स्थिति इषारे देऊनसुद्धां कायम असल्याचें पाहून डलहौसीला नबाबशाही निकालांत काढण्याचा विलायतच्या वरिष्ठां-कडून आदेश आला व त्याप्रमाणें अयोध्येचा नबाब वाजीद अलीखान याला राज्यांतून काढून डलहौसीनें कलकत्त्यास नेऊन ठेवलें. नबाबाला सालीना १५ लाख रुपये देण्याच्या ठरावाबरोबर त्याच्या आश्रित परिवारांवर भिक्षा मागण्याची पाळी येऊं नये म्हणून योग्य तरतूद व्हावी, असा जो सरकारी निश्चय होता, तो निश्चय नबाबशाहीची धुरा ज्याच्याकडे सोपविली त्या स्थानिक इंग्रज अधिका-ऱ्यानें अंमलांत आणला नाहीं. जे एकदां राज्यवैभवांत वाढले, ते एकदम भिकेस लागावे, हा त्या अधिकाऱ्याच्या वागणुकीचा परिणाम सामान्य जनतेलासुद्धां खवळून सोडणारा होता. नबाबशाहींत वाढलेल्या थोरामोठ्यांच्या घराण्यांतील स्त्रीपुरुषांना शेजाऱ्यापाजाऱ्याकडे लहानसान गरजा भागविण्यासाठीं दीन-पणानें हात पसरण्याची पाळी आली; दिवसा भणंगपणानें फिरण्याची लाज म्हणून रात्रींच्या अंधारांत त्या नबाबशाहीच्या माणसांना फिरावें लागे, वगैरे माहिती इंग्रज इतिहासकारांनीं निर्भीडपणें लिहून ठेवली आहे. ही इंग्रज राज्यकर्त्यांची बेपर्वाई नबाबशाहीच्या मरणाहून लोकांना जास्त जांचत होती.

### वतनदारांची दुर्दशा

नबाबशाहीच्या नाशानंतर इंग्रजांचें राज्य तेथील तालुकदार, जमीन-दारांना भोंवलें. इंग्रजांनीं त्यांच्यामागें आपल्या जमीनदारीच्या हक्काची सनदापत्रें सादर करण्याबद्दल ससेमिरा लावला. 'बळी तो कान पिळी' या न्यायानें हे जमीनदार पूर्वींच्या राजवटींत उत्कर्षास चढले असल्यामुळें त्यांच्यापैकीं पुष्कळांपाशीं सनदापत्रें नव्हतीं. ज्यांच्याजवळ होतीं, त्यांनीं सनदी हक्कांच्या गांवापेक्षां कितीतरी जास्त गांवें बगलेंत मारलेलीं होतीं; यामुळें त्यांचीं बिनसनदी गांवें इंग्रजांनीं जप्त केलीं. परिणामीं त्यांच्या

ऐश्वर्याबरोबर त्यांचें अधिकारक्षेत्रहि रोडावलें. ज्यांकडे एकदां शंभर गांवावरील वर्चस्वाचें वैभव होतें, त्यांच्या हातीं अवघीं पंचवीसच गांवें राहिलीं. हा प्रकार एकट्या अयोध्येच्या नबाबशाही मुलखांतच घडला असें नाहीं तर त्यानें इतर प्रदेशांतसुद्धां ढवळाढवळ माजविली होती. त्याच्या प्रभावानें पेशवाईतल्या शेंकडों जहागीरदार इनामदारांना धुळीस मिळविलें. मुंबई इलाख्यांत इनामकमिशन या नांवाचें मंडळ नेमून त्याच्या चौकशीपायीं पुष्कळशा जहागीरदार इनामदारांची उत्तरेकडील नबाबशाहीच्या तालुकदार जमीनदारांसारखीच दुर्दशा उडाली. अशा चौकशीचा घाणा सर्वत्र चालू होता. पेशवाई बुडतांच तिच्या पाठोपाठ जहागीरदार इनामदार इंग्रजानें बुडविले असते तर त्याचा गवगवा झाला नसता. जुन्या राज्यांतले जहागीरदार नव्या राज्यांत नामशेष व्हावे, हा राज्यांच्या उलथापालथींचा नियमच आहे, पण पेशवाईच्या अस्तानंतर सुमारें तीस पस्तीस वर्षांनीं इंग्रजांनीं ही उलढाल सुरू केल्यामुळें लोकांना तो अन्याय वाटला. तथापि हल्लींच्या स्वराज्यांत वतनदार शिल्लक ठेवायचा नाहीं, असें धोरण असल्यानें शंभर वर्षांमागील या बाबतींतल्या इंग्रजी कारवाईचा काथ्याकूट न केल्यास चालेल. पण ज्या घटनेचा ऊहापोह करावयाचा आहे त्या शिपाईगर्दीच्या घटनेला तालुकदार जमीनदारांचा उद्वेग बऱ्याच अंशीं पोषक ठरल्यामुळें त्याकडे थोडेंसें लक्ष पुरविणें भाग आहे. तालुकदारांचा अपकर्ष त्यांच्या हस्तकांना बाधला. तालुकदारांची राहणी स्वतंत्र राजासारखी होती. हत्यारबंद लोकांचा मोठा जमाव त्यांच्या हाताखालीं असे. त्यांच्या आपसांतील झगड्यांत हत्यारबंद आश्रितांना मन चाहील तसें वागण्याला आडकाठी नव्हती. बंदुका, तरवारी, भाले, बर्च्या, लाठ्या असल्या हत्यारांप्रमाणें गांवठी तोफखानादेखील तालुकदारांपाशीं असे. तालुकदारांना इंग्रजी कायद्यानें आवळून टाकतांच त्यांच्या हस्तकांच्या दांडगाईला पायबंद लागला. नबाबशाही कोसळल्यानंतर त्या शाहीचें आश्रित जसे हवालदिल झाले तसेच तालुकदारांचे आश्रितहि हवालदिल होऊन गेले. सर्वांना एका सपाटीवर आणून सोडणारें इंग्रजी राज्य कसें उलथून पडेल या विवंचनेंत उत्तरेकडील गंगा-यमुनाकांठचा व त्यापलीकडचा सारा प्रदेश १८५७ पूर्वीं पडलेला होता, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. रोहिलखंडांत व अयोध्येच्यासकट दिल्लीपासून अलाहाबादपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशांत १८५७ सालीं जो धुमाकूळ माजला, त्यावरून पूर्वोक्त स्थितीची यथार्थता सहज पटणारी आहे.

स्वदेशाबाहेरच्या लढाया

१८५५-५६ मध्यें इंग्रजांचें रशिया, इराण व चीन या तीन देशांशीं युद्ध जुंपलें होतें. रशियांतला सामना इंग्रजांला जड गेला. इराणची लढाई थोड्या आयासानें इंग्रज जिंकूं शकले. चीनचें युद्ध हिंदुस्थानापासून अतिशय दूर चाललें होतें. तेथें इंग्रजांना फौजा पाठवाव्या लागत होत्या. या लढायांमध्यें इंग्रजी समरविद्या आणि शस्त्रास्त्रें लटपटलीं, त्याच्या नशिबाची कमान खालावली, कोणतेंच युद्धक्षेत्र त्याला अनुकूल नाहीं, अशा बातम्यांचें हिंदुस्थानभर पेव फुटलें होतें. वृत्तपत्रें, रेडिओ हीं कुठलेंहि स्थूल वर्तमान जलद पुरविणारीं साधनें हल्लीं असूनहि इंग्रजी राज्याविषयींच्या प्रतिकूलतेमुळें १९१४-१९१८ आणि १९३९-१९४५ या वर्षांतल्या युद्धाच्या काळीं येथें खाजगी रीतीनें ज्या बातम्या लोकांच्या संवादांत चघळल्या जात होत्या त्यांची आठवण असणारांना शंभर वर्षांमागें इंग्रजी अपजयाच्या वार्तांना कसा ऊत आला असेल याची अटकळ करतां येईल. १८५७ हें प्लासीनंतरचें शंभरावें वर्ष होतें. शंभरावें वर्ष ही अस्तित्वाची परम सीमा, त्या वर्षीं सामान्यतः प्रत्येक घटनेच्या अस्तित्वाचीं समाप्ति झालीच पाहिजे, या समजुतीची खूण 'शंभर वर्षें भरलीं' या मराठी म्हणींत देखील दिसते. उत्तरभारतीयांत शंभर वर्षांबद्दल अशीच श्रद्धा होती. तेथील जुन्या ग्रामगीतांच्या संग्रहांत असल्या अर्थाचें एक पद आढळतें. त्याचा सारांश हा कीं, इंग्रज हा रामसैनिकाचा (वानर-माकडांचा) अवतार, लंका सर करून रामानें बिभीषणाला लंकेचें राज्य दिलें. पण वानरांच्या पदरीं कांहीं पडलें नाहीं, ही उणीव भरून काढण्यासाठीं सीतामाईनें त्यांना वर दिला. कलियुगांत द्वीपांतरीं जन्मून तुम्ही भारतावर शंभर वर्षें राज्य कराल, असा तो वर होता. त्याप्रमाणें इंग्रजांच्या रूपानें त्या रामसैनिकांनीं या देशाचें राज्य भोगलें. याहून अधिक काळ हें राज्य टिकणार नाहीं. शिपायांमध्यें पसरलेला इंग्रजांचा द्रोह हें त्याच्या राज्यक्षयाचें लक्षण समजलें गेलें. देशांमध्यें या वर्षीच्या उन्हाळ्यांत वाटल्या जाणाऱ्या चपात्यांचा व कमळाच्या फुलांचा संदर्भ इंग्रजांच्या राज्यसमाप्तीकडे लावला जातो. एका गांवाहून दुसऱ्या गांवीं, असा या रोट्यांचा व कमळांचा दौरा चालू होता. हें खाद्य वाटणारांना जसें त्याचें गूढ होतें तसेंच चपात्यांच्या वाटेवरील ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांनाहि त्यांचें गूढ होतें. इंग्रजांविरुद्ध

चालढेल्या कटाचें चपात्या हें प्रतीक होतें का अंधळ्या श्रद्धेचा तो एक उपद्व्याप होता, याचा स्पष्ट उलगडा इतिहासाच्या कागदपत्रांतून सांपडत नाहीं.

### ब्राह्मणशूद्र-संवाद

रशिया, इराण येथील युद्धाकरितां हिंदुस्थानांतून इंग्रजी फौजा गेल्या व कलकत्त्यापासून दिल्लीपर्यंतच्या हजारों मैलांत इंग्रजी लष्कराचें बळ उरलेलें नाहीं, याचें ज्ञान हिंदी शिपायाला बिनचूक होतें. आपण इंग्रजाला विजय मिळवून दिले व आज आपण त्याच्या राज्याचे खरेखुरे आधार आहों; दारूगोळ्यांचे कारखाने, खजीने, टांकसाळीं, किल्लेकोट, तुरुंग, अशीं राज्याचीं मर्मस्थानें आपल्या ताब्यांत आहेत पण वाटेल तिकडे जाण्याच्या नव्या लष्करी नियमापायीं आपला शिपाईगिरीचा पिढीजात पेशा यापुढें चालू राहणार नाहीं, हळू हळू फौजेंत आपली संख्या कमी होईल व मग इंग्रज सर्वांना 'किरिस्ताव' करून सोडील; तेव्हां इंग्रजाविरुद्ध उठावणी करायला हीच वेळ सोयीची आहे, इत्यादि कल्पनांचें भीषण थैमान हिंदी लष्करांत चालू होतें. शिपायांचा उद्वेग हृदयांत मावेनासा होऊन तो क्रियारूपानें बाहेर पडण्याचें निमित्त पाहात असतां १८५७ च्या जानेवारी महिन्यांत त्याला हवें तसें निमित्त सांपडलें. कलकत्त्याशेजारीं डमडम येथें लष्करांतील कोणा अतिशूद्रानें एका ब्राह्मण शिपायाकडे पिण्याला पाणी मागितलें. ब्राह्मणानें आपल्या जातीची प्रौढि गाऊन पाणी देण्याचें नाकारलें. 'कशाला ब्राह्मण्याचा दिमाख मिरवितां? दांतानें तोडण्याचीं नवीं काडतुसें लौकरच तुमची बढाई नाहींशी करतील. त्या काडतुसाकरितां वापरली जाणारी चरबी गाईची व डुकराची आहे. मुसलमानांचा देखील ह्या काडतुसानें धर्मघात होईल' अशा अर्थाचा त्या अतिशूद्रानें उलट टोमणा मारला. ब्राह्मण-अतिशूद्राचा हा लहानसा संवाद १८५७ च्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. चरबीदार काडतुसाची ही शूद्रोक्त कथा विद्युद्गतीनें सर्व छावण्यांतून पसरली. या काडतुसांच्या इतिहासांत शिरलें तर काडतुसाकरितां चरबी वापरण्याचा प्रघात १८५७ पूर्वीं बरींच वर्षें चालू होता; हत्यारांच्या कारखान्यामध्यें चरबीशीं ब्राह्मण कामगारांचाहि संबंध बिनतक्रार चालू होता, वगैरे माहिती दृष्टीस पडते. पण धर्मभ्रंशाचा संशय बळावण्यापूर्वीं चरबीचें भय सैनिकांना

वाटलें नाहीं. आतां त्या भयानें उग्र रूप धारण करून यापुढें इंग्रजांविरुद्ध उठायला एका क्षणाचासुद्धां विलंब नको, या निश्चयावर शिपायांना आणून सोडलें. शिपाई 'काय करायचें, कसें करायचें व केव्हां करायचें' या प्रश्नानें वेचैन बनले. दिवसां ते रोजचीं लष्करीं कामें नेहमींप्रमाणें नियमाबर-हुकूम पार पाडीत. रात्रीं मात्र त्यांचीं खलबतें सुरू राहात. त्यांचा इतर छावण्यांतील शिपायांशीं राज्यद्रोही पत्रव्यवहार चाले. इकडे ब्रिटिश अधिकारी चरबीचा गवगवा ऐकून शिपायांचा संशय काढून टाकण्याच्या प्रयत्नास लागले. परंतु तो प्रयत्न निर्विघ्न नव्हता. जेथें चरबीदार काडतुसें पूर्वींपासून वापरलीं जात होतीं तेथें चरबीसंबंधानें नवा खुलासा नसता संशय उत्पन्न करील, या शंकेनें खुलाशाचा प्रयत्न सरसकट सर्वत्र अंमलांत आणणें कठिण झालें. इंग्रजांच्या प्रयत्नांतील विघ्नाचें स्वरूप या उदाहरणानें लक्षांत येईल.

**मंगल पांडे**

अखेरीस फेब्रुवारी महिन्यांत बराकपुरास भावी स्फोटाचीं पूर्वचिन्हें स्पष्टपणें प्रगटलीं. जानेवारींत (ता. २२) डमडमला काडतुसानिमित्त गडबड उद्भवली. फेब्रुवारींत (ता. ६) बराकपुरास शिपायांचा क्षोभ निदर्शनास आल्यावरून काडतुसांच्या संशयामुळें ज्या तुकडींत विशेष क्षोभ धुमसत होता, त्या तुकडीला सेनाधिकाऱ्यांनीं अतिशय कळकळीनें समजावलें (ता. ९) परंतु असले प्रयत्न वायां जातात, याचाहि अंमलदारांना अनुभव आला. "आपली समजूत काढण्याचा प्रयत्न केवळ 'अशुभस्य कालहरणम्' या न्यायाचा आहे. सरकारानें आपलें पारिपत्य करण्यासाठीं बोलाविलेली गोरी फौज येऊन पोंचली कीं, ते आपल्याला शासन करतील." याप्रमाणें शिपायांचा संशय वाढून त्यांची अस्वस्थता भडकली. शिपायांचा मानसिक क्षोभ सरकारी इमारतींना जाळीत होता. असली जाळपोळ जानेवारीपासून चालू होती. निर्जीव इमारती जाळण्याच्या क्षोभानें गोऱ्या अंमलदाराच्या वधाचा पहिला रक्तपात मार्च महिन्याच्या २९ तारखेला रविवारीं दुपारीं घडवून आणला. मंगल पांडे नांवाचा एक तरुण शिपाई अंगावर सगळा लष्करी पोषाख व हातांत बंदुक अशा थाटानें मुख्य पहाऱ्याच्या चौकीसमोर इकडे तिकडे फिरूं लागला. 'ज्यांना बाटायचें नसेल त्यांनीं माझा कित्ता गिरवावा' अशा अर्थाच्या तो आरोळ्या मारीत होता. आरोळ्या सर्वांच्या कानीं पडणें शक्य नाहीं हें लक्षांत आल्यावर त्यानें बिगूलवाल्याला आपलें वाद्य वाजविण्याचा हुकूम

केला. बिगूलवाल्यानें त्याची उपेक्षा केली, पण मंगल पांडे तेथेंच फिरत राहिला. इतक्यांत पांड्याला आवरण्यासाठीं आलेला एक गोरा सार्जंट त्याला दिसला तेव्हां मंगलनें त्यावर गोळी झाडली. हा पहिला वार वायां गेला. यानंतर मंगलच्या गडबडीची खबर कळल्यावरून गोरा लेफ्टनंट हत्यारांसह घोड्यावरून तेथें दौडत आला. पांडे या वेळीं एका तोफेच्या आड उभा होता, तेथून त्यानें सदर गोऱ्यावर बंदूक उडविली. या बारानें घोडा दगावला व स्वारासह त्यानें जमिनी-वर लोळण घेतली. लेफ्टनंटानें मग मंगलवर पिस्तूल झाडलें. पण नेम चुकला तेव्हां तो इंग्रज तलवार उपसून पांड्यावर धावून गेला. पांड्याची व लेफ्टनंटाची हातघाई सुरू असतां पूर्वीचा गोरा सार्जंट लेफ्टनंटाच्या मदतीस आला. एका विरुद्ध दोघे या सामन्यांत मंगल पांड्यानें आपली तरवार अशी चालविली कीं, एक मुसलमान सैनिक जर आडवा न येता तर या दोघा गोऱ्यांचे मुडदेच पडले असते. त्या मुसलमानानें मंगल पांड्याला पकडून आवरलें म्हणून त्याच्या गोऱ्या शत्रूंचे प्राण वांचले. हा मुसलमान शिपाई पांड्याची झटापट पाहण्यासाठीं जमलेल्या शिपायांच्या जमावापैकीं होता. बाकीचे सर्व शिपाई आपल्या जागीं स्वस्थ उभे होते. ज्या पहारेकऱ्यांसमोर हा प्रसंग उद्भवला ते पहारेकरी देखील यावेळीं तेथें उपस्थित झालेले इतर गोरे अधिकारी वारंवार हुकूम करीत असूनहि जागचे हालले नाहींत. उलट पांड्याच्या वारानें एकदां एक गोरा अधिकारी खालीं पडला असतां कित्येकांनीं आपल्या बंदुकीचे दस्ते त्यावर आदळले. ज्या मुसलमानानें पांड्याला धरलें; त्यावर इतरांनीं शिव्यागाळीची सरबत्ती आरंभिली. पांड्याला न सोडल्यास त्या मुसलमानाला ठार मारण्याचें अवसान बऱ्याच शिपायांनीं आणलें; तथापि लेफ्टनंट व सार्जंट सुरक्षित जागीं पोचेपर्यंत मुसलमानानें पांड्याला सोडलें नाहीं. थोड्याच वेळांत तेथील फौजेचा मुख्याधिकारी मारामारीच्या जागीं आला. आतां पहारेकऱ्याचा ताठपणा मावळला व ते या अधिकाऱ्याच्या मागून निघाले. मंगल पांड्याला या वेळीं साह्याची व जीविताची आशा न उरल्यामुळें त्यानें आत्महत्येसाठीं स्वतःवर बंदूक चालविली व तो घायाळ होऊन खालीं पडला. त्याची इजा जीवघेणी नसल्यानें तो जगला व ता. ८ एप्रिल रोजीं फांशीच्या शिक्षेनें मेला. मंगल पांड्याला आपल्या निष्क्रियतेनें अप्रत्यक्षपणें साह्य केल्याच्या आरोपावरून चौकी पहाऱ्याच्या जमादाराला-ईसरी सिंगाला त्याच्या मागून फाशीं दिलें. (ता. २२ एप्रिल)

## एका तुकडीची बतडर्फी

बराकपूरच्या उत्तरेस १०० मैलांवर बेहरामपुराच्या छावणींत शिपायांनीं आधींच्या महिन्यांत ता. २६ फेब्रुवारीला जो प्रकार केला, त्याचा बराकपुराच्या मंगल पांडे प्रकरणाशीं थोडा संबंध असल्यामुळें त्याची हकीकत संक्षेपानें सांगण अवश्य आहे. बेहरामपुरांतील शिपायांना चरबीदार काडतुसाची बातमी लागली होती व ते खवळले होते. सदर बातमींत अर्थ नाहीं असें अधिकाऱ्यांनीं मनधरणीनें सांगितल्यावर शिपाई शांत झाले, पण याच सुमारास बराकपुराहून कांहीं पथकें बेहरामपुरास पोंचलीं व त्यांनीं तेथील: शिपायांच्या मनांतला संशय जोरानें पेटविला. २७ फेब्रुवारीला कवाईत व्हावयाची असून त्या वेळीं वायबाराची काडतुसें वाटण्यांत येणार हें ऐकल्यावर बेहरामपुरी शिपायांची खात्रीच पटली कीं, काडतुसांनीं बाटविण्याचा हा पहिला प्रयोग आहे. दुसऱ्या दिवशींच्या कवाइतीकरितां गोळीबाराच्या कांहीं वस्तु वाटण्याच्या वेळीं त्या घेण्याचें शिपायांनीं साफ नाकारलें. ही वेळ रात्रीची होती. शिपाई बिथरल्याचें ऐकून त्यांचा कर्नल त्यांच्याकडे गेला. प्रथम तो शिपायांना भेटला तेव्हां तो एकटाच होता, पण नुसत्या समजावणीनें शिपाई वठणीस येणार नाहींत एवढ्यासाठीं त्यानें दुसऱ्या खेपेस तोफखाना बरोबर घेतला. यामुळें शिपाई जास्तच क्षोभले. शेवटीं तडजोड या नात्यानें जेव्हां तोफखाना माघारा नेण्यांत आला तेव्हां मग शिपाई आपल्या बचावाबद्दल खात्री पटून ताळ्यावर आले. दुसऱ्या दिवशीं कवाईत नेहमींसारखी निर्वेधपणें पार पडली; तथापि आधल्या रात्रींच्या बेशिस्त वर्तनाची चौकशी करणें हें लष्करी व्यवहारानुसार अटळ होतें. चौकशींत शिपायांचा बेशिस्तपणा सिद्ध झाला व त्यासाठीं त्या शिपायांचें पथक बडतर्फ करावें असा हुकूम फर्मावण्यांत आला. हा हुकूम बराकपुराला अंमलांत यावयाचा असल्यानें तें पथक घेऊन त्यांचा कर्नल बराकपुराकडे निघाला. ता. ३० मार्चला बराकपुराजवळ ७।८ मैलांच्या एका गांवीं तो येऊन पोंचला. तेथें त्याला मंगल पांड्याचा मजकूर समजल्यानें तो तेथेंच राहिला. नंतर ता. ३१ रोजीं बराकपुरास आला. तेथे बेहरामपुराच्या शिपायांची मुख्य सेनाधिकाऱ्यांनीं कायमची बोळवण केली. बेशिस्त वर्तन एवढाच त्या शिपायांचा गुन्हा होता. ता. २७ फेब्रुवारी-पासून ३१ मार्चपर्यंत त्यांनीं केव्हांहि आपल्या शिपाईगिरीला बट्टा लागूं दिला नाहीं. बराकपुरानजीकच्या गांवीं वस्ती असतां बराकपुराच्या लोकांनीं

त्यांना चिथावण्याचीं सडकून खटपट केली तरी त्या खटपटीची दाद त्यांनीं घेतली नाहीं. त्यांना आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप वाटत होता, यामुळें सरकारानें त्यांचा पगार तर दिलाच, पण त्यांच्या घरापर्यंतच्या भाड्याचीहि तरतूद केली. वराकपुराच्या राज्यद्रोही शिपायांना कायमच्या बडतर्फीचें प्रायश्चित्त ता. ६ मे रोजीं भोगावें लागलें.

## अंबाला-मीरतची गडबड

येथवर सांगितलेली शिपायांच्या राज्यद्रोहाची कथा बंगालपुरती आहे. पण इंग्रज आपल्याला बाटविणार या समजुतीच्या लाटेनें बंगालपासून दूरचे प्रदेश व्यापल्याचें मार्च-एप्रिलांत अंबाला मीरत येथील गडबडीमुळें स्पष्ट झालें होतें. वराकपुराप्रमाणें अंबाल्यास जाळपोळीच्या उजेडानें तेथील शिपायांचा असंतोष उघडकीस आणला. कसून चौकशी करूनसुद्धां आगलाव्यांचा सुगावा शिपायांतील कडव्या एकजुटीमुळें अधिकाऱ्यांना काढतां येईना. या वेळीं एक नवीन कल्पना शिपायांच्या बुद्धींत मूळ धरून बसली होती. पूर्वीं गाई-डुकरांच्या चरबीनें त्याचें माथें फिरलें तर आतां सरकार या जनावरांच्या किंवहुना माणसांच्या हाडांचें पीठ शिपायांना कणीक म्हणून विकीत असल्याच्या कल्पनेचा त्याच्या डोक्यांत ठणका भरला. हिमालयाच्या पायथ्याशीं राहणाऱ्या लोकांना मारून त्यांची चरबी इंग्रज काढतात असाहि त्या काळीं एकदां बोभाटा माजला होता. जे कोणी असल्या संशयाच्या भोंवऱ्यांत सांपडलेले नसतील त्यांना 'तुम्ही बाटगे' या शब्दांनीं हिणावून द्रोहाच्या गोटांत ओढण्याचे प्रसंग छावण्यांतून नित्य घडत होते. अंबाल्यास सर सेनापति ॲन्सन यानें शिपायांना जमवून भरपूर उपदेश केला. शिपायांचा क्षोभ थंडावल्याचा देखावा ॲन्सननें पाहिला. तूर्त विशेष दंग्याधोप्याचें भय नाहीं, असें वाटून तो आपल्या तन्दुरुस्तीकरितां सिमल्यास निघून गेला. तो सिमल्यास गेला खरा, पण शिपायांचा असंतोष आटोक्याबाहेर जाऊं पाहात आहे, याची जाणीव असल्यामुळें शिपायांना कह्यांत राखण्याच्या उपायाबद्दल त्याचा गव्हर्नर-जनरलाशीं तेथून सारखा पत्रव्यवहार चालू होता.

एप्रिल महिन्यामध्यें मीरत शहरांत व छावणींत चरबीदार काडतुसें व हाडांची कणीक या दोन गोष्टींची चर्चा धूमधडाक्यानें चाललेली होती. पूर्वीच्या गडबडी एकट्या हिंदूंच्या होत्या, यावरून मुसलमान शिपाई खाल्ल्या मिठाला जागणारे आहेत असा इंग्रजांनीं काढलेला निष्कर्ष मीरतला सपशेल

खोटा ठरला. मीरत येथील रिसाल्याच्या मुसलमान तुकडीनें ता. २४ एप्रिल रोजीं कवाइतीच्या वेळीं अधिकाऱ्याचे हुकूम उघडपणें बिनदिक्कत झिडकारले. ही तुकडी ९० शिपायांची होती. त्यांतल्या अवघ्या पांच जणांनीं हुकूम पाळले. बाकीच्या ८५ इसमांचा खटला लष्करी कोर्टाकडे रुजू होऊन त्याचें काम चालू झालें. शिपायांची सार्वत्रिक उठावणी संपल्यावर केलेल्या चौकशींत असें निदर्शनास आलें कीं, या दिवसांत एका गोसाव्याची (फकीर) स्वारी मीरतला येऊन राहिली होती. हत्तीवरून मिरवावें, असा त्याचा बडेजाव होता. हा फंदफितुरीच्या कारस्थानांत आहे, असा वहीम विचारांत घेऊन पोलिसांमार्फत त्याला अधिकाऱ्यांनीं हुसकलें. तथापि कांहीं काळ तो एका लष्करी पथकाच्या वस्तींत दडी मारून बसला होता, असें या चौकशींत आढळून आल्याचें नमूद आहे.

### मीरतबरोबर लखनौ

लखनौस शिपायांची अवस्था इतर ठिकाणांप्रमाणेंच होती; किंबहुना बहुतेक असंतुष्ट शिपाई अयोध्या भागांतले असल्यामुळें त्यांची अवस्था जास्त तीव्र होती, असें म्हटल्यास चालेल. तेथें हेन्री लॉरेन्स हा नामांकित अनुभवी पुरुष मुख्य अधिकारी होता. त्यानें नबाबाच्या आश्रित परिवाराचीं गाऱ्हाणीं दूर करून जनतेच्या असंतोषाचा बराचसा पाया खणून काढला; पण शिपायांच्या अस्वस्थतेवर त्याला गुणकारी औषध सांपडलें नाहीं. त्या अस्वस्थतेविषयीं त्याचा गव्हर्नर-जनरलशीं विचारविनिमय चालू होता. एप्रिलांत नानासाहेब पेशवे लखनौ शहरीं कोणा नबाबाच्या भेटीसाठीं गेले. त्यापूर्वी काल्पी, दिल्ली, या ठिकाणीं त्यांनीं फेरी मारल्याचा वृत्तान्त उपलब्ध आहे. ते दिल्लीहून अंबाल्यास जाऊन आल्याचाहि निर्देश सांपडतो. आतां लखनौ शहरीं त्यांचा मोर्चा वळला. ज्या दिवशीं नानासाहेब लखनौच्या रस्त्यास लागले त्याच दिवशीं (१८ एप्रिल) तेथें लॉरेन्सच्या देखत गोऱ्या अधिकाऱ्यांवर लोकांनीं दगडफेक केली. नानासाहेबांचा या दगडफेकीशीं संबंध नसला तरी हा योगायोग सूचक आहे. धोंडोपंत नानांनीं लखनौस काय केलें, याचा नीट शोध लागण्याला साधन नाहीं. ज्या इंग्रज अंमलदारांशीं त्यांची मुलाखत झाली त्यांनीं लिहून ठेवलें आहे कीं, नानाचें वर्तन उर्मट-पणाचें होतें. लॉरेन्सची त्यांनीं भेट घेतली. इतर गोऱ्या अंमलदाराप्रमाणें

लॅरेन्सनें नानांना सन्मानानें वागविलें. नानासाहेब लखनौ शहरांत आपल्या लव्याजम्यासह डौलानें फिरत होते. त्यांचा मुक्काम थोडया दिवसांचा होता. लवकरच त्यांनीं लखनौ सोडलें. नानासाहेब ही व्यक्ति प्रवासाच्या आवडीची नव्हे, अशी त्यांची ख्याति होती, तरी त्यांनीं १८५७ च्या प्रारंभीं लांबलांबच्या शहरीं दौड करावी याचें इंग्रजांना वाटणारें गूढ पुढील एकदोन महिन्यांत त्याच्या मतें उत्तम प्रकारें उलगडलें.

शिपायी काबूबाहेर जात आहेत व त्यांतले कांहीं अगदीं हातघाईस आले आहेत, याचा खात्रीलायक पुरावा स्पष्टपणें नजरेसमोर येतांच लॅरेन्सनें त्यांचा तडकाफडकी समाचार घेण्याचा निश्चय केला. ता. २ मे रोजीं ज्या पथकाच्या शिपायांनीं अधिकाऱ्यांशीं बेफाम उद्धट वर्तन केलें, त्या पथकाच्या वस्तीवर लॅरेन्स ता. ३ च्या मध्यरात्रीं जाऊन पोंचला. त्याच्या बरोबर तोफा होत्या. बेबंद शिपाई या आकस्मिक दृश्यानें किंकर्तव्यमूढ होऊन उभे असतां त्यांना एका तोफे मागें उजेड दिसला व त्यांनीं हत्यारें टाकून पळ काढला. परंतु ते घेरले जाऊन लॅरेन्सच्या कैदेंत सांपडलें. लरेन्स त्या शिपायांसह रात्रींच लखनौस सुरक्षित परतला.

## ता. ९ व १० मे

शिपायांच्या स्वधर्मनिष्ठामूलक शस्त्रप्रयोगाचें उगमस्थान मीरतची छावणी असल्यानें तेथील घडामोडींचा थोडा सविस्तर विचार केला पाहिजे. मीरत येथील घोडदळाच्या एका तुकडीनें आज्ञाभंग केल्याची माहिती मागें सांगितली आहे. या तुकडीच्या अवज्ञाकर्त्यांना कामावरून तावडतोब दूर करून आपल्या जागीं राहण्याबद्दल ताकीद दिली. मे महिन्याच्या पहिल्या आठवडयांत त्यांच्या अपराधाची चौकशी करण्यांत आली. चौकशी करणारे सारे पंच हिंदी होते.

साक्षीपुराव्यांत नवीं काडतुसें स्वधर्मघातक आहेत, या समजुतीखेरीज दुसरें कांहींच निष्पन्न झालें नाहीं. काडतुसापेक्षां त्यांना लोकमताचें भय जास्त वाटत असावें, असेंहि अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलें. " ज्या समाजांत वावरायचें त्या समाजांत काडतुसें वापरल्यानें आपली अप्रतिष्ठा होईल; आपण वाळींत पडूं, अशा सामाजिक बहिष्कारापायीं आपलें जीवन दुर्धर झाल्याखेरीज राहणार नाहीं. काडतुसें निर्दोष आहेत, याविषयीं आमची खात्री पटली तरी जोंवर समाजाचा विश्वास तसा नाहीं, तोंवर काडतुसांचा उपयोग

विटंबनाकारक वाटतो, यासाठीं आज्ञाभंगाच्या परिणामाची आपत्ति पत्करून आपण काडतुसें नाकारलीं. " याप्रमाणें अनेकांच्या जबान्यांचा भावार्थ होता. पण कायदा कर्तव्य ओळखतो. त्यांतली चूक पुनः ती लष्करानें केलेली—कायदा क्षम्य मानीत नाहीं. यामुळें कायद्याची निष्ठुरता आज्ञा मोडणाऱ्या ८५ स्वारांवर कोसळली. त्यांना प्रत्येकीं दहा वर्षें सक्तमजुरी ही शिक्षा सुनावण्यांत आली. शिक्षेची अंमलबजावणी ता. ९ मे रोजीं झाली. त्या दिवशीं कवाइतीच्या मैदानावर या गुन्हेगारांचा शिपाईपेशा बोळवून त्यांच्या पायांत तोफखान्याच्या लोहारांनीं बिड्या ठोकल्या. हें काम तासचे तास चाललें होतें. शेवटीं त्या शिपायांची कैदखान्याकडे रवानगी करण्यांत आली. शिक्षेचा अंमल पाहण्यासाठीं जमलेलें लष्कर ' आतां कांहीं तरी सोक्षमोक्ष केलाच पाहिजे ' अशा प्रखर क्षोभाच्या व्याकुळ मनःस्थितींत आपल्या निवासस्थळीं गेलें. रात्रीं त्यांनीं कोणत्या मसलती केल्या, कोणत्या आणाशपथा घेतल्या याचा अनुभव ता. १० मे १८५७ रविवारच्या संध्याकाळीं मीरतच्या इंग्रज अंमलदारांवरच नव्हे तर ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभारावर बंदुकीच्या कडकडाटानें व रक्ताच्या वर्षावानें विजेसारखा आदळला.

रविवारीं रजा म्हणून शिपाई लोक मोकळेपणानें शहरच्या बाजारांतून हिंडतात, फिरतात, थोडीफार चैन करतात; परन्तु १८५७ मध्यें मे १० च्या रविवारीं हिंदी शिपायांच्या ठिकाणीं आनंद, उल्हास, उत्साह असल्या भावना उरल्या नव्हत्या. ता. ९ रोजीं अपराधी घोडेस्वारांच्या पायांत शृंखळा अडकवल्या जात असतां त्यांनीं दीन स्वरांत हात पसरून वारंवार अधिकाऱ्याकडे दयेची याचना केली. अधिकाऱ्यांच्या पाषाणहृदयांत करुणेचा ओलावा नाहीं, असें दिसल्यावर त्या कैद्यांनीं आपल्या सोबत्यांच्या कानउघाडणीला सुरुवात केली. ' तुमचे सोबती शिक्षेला बळी पडत असतां तुम्ही नामर्दासारखे उभे कां ? ' हा त्यांचा सवाल हिंदी शिपायांच्या काळजाला झोंबत होता; परंतु समोर तोफखाना आ पसरून खडा आहे, गोऱ्या पायदळाच्या बार भरलेल्या बंदुका सज्ज आहेत व पळापळ केल्यास गोऱ्या घोडेस्वारांचीं शस्त्रें आपले प्राण घ्यायला क्षणाचाहि विलंब लावणार नाहींत, या व्यवस्थेच्या भयंकर देखाव्यानें बाकीचे शिपाई थिजून स्वस्थ राहिले. त्यांच्या चेहऱ्यांवर क्रोधाच्या छटा पसरल्या होत्या. उद्वेगानें त्यांचे गळे दाटले होते; लाजेमुळें कैद्यांच्या नजरेशीं बाकीच्या शिपायांना आपली नजर

भिडवितां येत नव्हती. पण ते शरमिंदे शिपाई प्रत्यक्ष मृत्यूच्या जवडयांत उभे होते. यासाठीं त्यांनीं ती वेळ कशीबशी निभावून नेली आणि रविवारीं रात्रीं शनवारच्या प्रसंगाचा सूड उगविला. आपल्या कैदी सोबत्यांच्या बेअब्रूचा वचपा काढण्याखेरीज मोकळ्या शिपायांना गत्यंतर नव्हतें. बाजारांत त्यांना उजळमाथ्यानें फिरतां येईना. पुरुषांनींच नव्हे तर बाजारच्या बायकांनीं देखील शनवार दुपारपासून त्यांची छी थू चालविली होती.

रविवारीं गोरे शिपाई हत्यारें घरीं ठेवून प्रार्थनेला जातात, यामुळें मीरतच्या शिपायांनीं आपल्या उठावणीकरितां रविवारची संध्याकाळ पसंत केली. ही वेळ निवडतांना त्यांच्यापुढें सूड व आत्मरक्षण असे दोन उद्देश होते. गोरे शिपाई आपली सर्वांची कैदी बनलेल्या घोडेस्वारांसारखीच वाट लावणार आहेत, अशी एक भुमका मीरतच्या शिपायांत पसरली होती. यासाठीं गोऱ्यांच्या हल्ल्याआधीं आपण चढाई करणें श्रेयस्कर, अशीहि त्यांच्या उद्देशामागें एक प्रेरणा होती. त्या दिवशीं नेहेमीच्या वेळीं प्रार्थनेकरितां सोजर लोक आपल्या छावणींतून बाहेर पडले नाहींत. उन्हाळ्याचे दिवस म्हणून त्या दिवशीं नेहमींपेक्षां अर्धा तास उशीरा प्रार्थना सुरू होईल असें लष्करी धर्माधिकाऱ्याकडून सोजरांना अगाऊ कळविण्यांत आलें होतें. अर्ध्या तासाच्या उशिरानें जेव्हां ते प्रार्थनेच्या तयारीस लागले तेव्हां ही आपल्यावर हल्ला करण्याची सिद्धता आहे, अशी शिपायांची खात्री पटली व ते हत्यारें सरसावून इकडे तिकडे धावत निघाले. घोडेस्वार आपल्या कैदी साथीदारांना तुरुंगांतून सोडविण्यासाठीं तिकडे गेले तर फिरंग्यांची कत्तल करण्याच्या इरादानें पायदळ आपलीं हत्यारें चालवूं लागले. कित्येक फिरंग्यांची बायकामुलें या भेदाची क्षिति न बाळगतां शिपायांनीं कत्तल उडविली. कैदखान्यांतील सारे कैदी सुटले. शेजारच्या खेडयापाडयांतून आपला हात उगवून घेण्यासाठीं मीरतच्या बाजारांत पुष्कळ माणसें आलीं. सर्वांनीं लूटमार आरंभिली; एकाचा पायपोस दुसऱ्याच्या पायांत, असा हलकल्लोळ माजला. पण शिपायांच्या प्रस्तुत उठावांत निश्चित योजना नव्हती, एकसूत्रीपणा नव्हता; कारण पुष्कळसे शिपाई या दंगलींत सामील झाले नाहींत, इतकेंच नव्हे तर त्यांनीं अधिकाऱ्यांना वांचविलें आणि त्यांच्या कह्यांत राहून शहराच्या व छावणीच्या बंदोबस्ताला मदत केली. मीरतला गोरी फौज मोठी होती. अधिकाऱ्यांनीं

चपळाई केली असती तर द्रोही शिपायांच्या हालचाली आवरणें त्यांना शक्य होतें. पण शिपायांच्या पाठलागाची त्वरा त्यांनीं टाळल्यामुळें उठावणीच्या शिपायांना दिल्ली गांठतां आली. ता. ११ च्या सकाळीं मीरतचे शिपाई दिल्लीस पोंचले. मीरतला या वेळीं जिकडे तिकडे सामसूम होती. जळणारीं घरें, त्या घरांतील स्थावर पदार्थांची नासधूस, मारलेल्या गोऱ्यांचीं छिन्नविच्छिन्न प्रेतें असें भयानक दृश्य ता. ११ रोजीं सकाळच्या सूर्यप्रकाशांत तेथील अधिकाऱ्यांनीं पाहिलें.

* * *

## ~ २ ~

# ‘ चलो दिल्ली ’

**न इरानने किया न शाहे रूसने**
**अंग्रेज को तबाह् किया काडतूसने**

ता. १० मे रोजीं रात्रीं मीरतच्या हिंदी सैनिकांनीं इंग्रजी राज्याच्या विरोधाचें निशाण उभारून आपल्या वागणुकीचा जो धडा निर्माण केला तोच प्रायः त्यांच्या सगळीकडच्या व्यवसायबंधूंनीं तंतोतंत गिरविण्याचा सपाटा लावला होता. फिरंगी अंमलदारांची जमल्यास त्यांच्या बायकांपोरांसकट कत्तल, त्यांच्या खाजगी व सरकारी मालमत्तेची लूट आणि जाळपोळ, तितकी सवड असेल तर मार्गांतल्या शहरखेडयांची नागवणूक, जेथें (बाटलेले) हिंदी खिस्ती असतील तेथें त्यांची देखील निर्दय हिंसा, इंग्रजांना मदत केल्याचा ज्यांच्याबद्दल संशय निघेल किंवा जे तटस्थ राहतील, त्यांचीं घरें धुऊन काढणें किंवा तेवढ्यानें समाधान होत नसेल तर त्यांनाहि ठार मारणें, अशा स्वरूपाचा तो धडा होता. हा धडा घालून मीरतचे शिपाई ता. ११ रोजीं सकाळीं ९।१० वाजण्याच्या सुमारास दिल्ली शहरांत शिरले. तेथले हिंदी लष्कर त्यांच्या स्वागताला प्रतिकूल नव्हतें. आधींच्या संध्याकाळीं मीरत-वाल्याची एक टोळी दिल्लीस गेली होती. शिपायांचा बहुतेक सर्व छावण्यांतून ब्रिटिश सेनेविरुद्ध उठाव करण्याविषयीं आपसांत पत्रव्यवहार चालू होता; अर्थात् दिल्लीचे शिपाई उठावासाठीं उत्सुक होतेच. फक्त काळस्थळासंबंधांत पुढाकार कोणी घ्यायचा याबद्दल निश्चित कांहीं ठरलें नव्हतें. उठावणीनंतर काय करायचें, याचादेखील कांहीं संकेत झालेला नसावा असें दिसतें व या संदिग्ध

स्थितीमुळेंच उद्वेगाचें वातावरण बरेच महिने तापत असूनहि प्रत्यक्ष स्फोट लांबणीवर पडत होता. उठावखोर शिपायांनीं कोणाच्या तोंडाकडे पाहायचें हा प्रश्न मीरतच्या शिपायांनीं दिल्लीस जाऊन सोडविला. दिल्लीच्या नामधारी बादशहाला त्यांनीं पुढाकार देऊन आपल्या उठावाला एकप्रकारें स्थिरता व प्रौढि आणली.

## दिल्लीची दंगल

मीरतहून निघालेल्या शिपायांची आघाडी प्रथम बादशहाच्या वाड्यावर गेली व बादशहानें आपलें नेतृत्व स्वीकारावें म्हणून तिनें तेथें धरणें धरलें. बादशहाशीं वाटाघाट करतांना मनधरणी व धमकावणी या दोन्हींचा प्रयोग शिपायांनीं केला. अघाडीमागून आलेल्या शिपायांनीं शहरांत धामधूम माजविली. सरकारी इमारतींची लूट, नजरेसमोर येणाऱ्या गोऱ्या काळ्या खिस्त्यांचे खून हीं कृत्यें शहरभर सुरू झालीं. त्यांतल्या त्यांत शिपायांचा गोऱ्यांवर विशेष दांत असल्यानें त्यांच्या वधाला शिपाई मुळींच उशीर लावीत नव्हते. तरी जीवंत राहिलेल्या गोऱ्यांचा व काळ्या खिस्त्यांचा त्यानें फारशा घाईनें घात केला नाहीं. दिल्लीस सुमारें पन्नास किरिस्तावांना त्यांनीं पहिल्यांदा पकडून बादशाही वाड्याच्या कैदेंत ठेवलें आणि इतर सगळ्या गोऱ्यांचा विनाश केल्याची खात्री पटल्यावर त्यांना कैदेंतून बाहेर ओढून बादशहाच्या संमतीनें कापून टाकले. या धामधुमीला हातभार लावण्याच्या बाबतींत दिल्लीच्या शिपायांनीं विशेष विलंब लावला नाहीं. मीरतच्या शिपायांमागोमाग गोरें लष्कर येतें कीं काय याची शहानिशा होईपर्यंत त्यांनीं वेळ काढला. दिल्लींत बचावलेले गोरे अधिकारी मीरतच्या लष्कराची वाट पाहात होते; परन्तु यासंबंधांत त्यांची जसजशी निराशा वाढत गेली, तसतशी शिपायांच्या आशेला भरती चढून त्यांनीं मीरतकर बांधवांशीं संगनमत आरंभिलें. शिवाय दिल्लीच्या हिंदी सैनिकांना मीरतचे शिपाई त्या दिवशीं येतील, अशी कल्पना नव्हती. त्यांच्या आगमनाच्या आकस्मिकतेमुळें दिल्लीवाले थोडासा वेळ बुचकळ्यांत राहिले. बादशहाला व दिल्लीच्या नागरिकांना देखील मीरतच्या घटनेचें स्वप्न नव्हतें. अकस्मात् मीरतवाले येऊन धडकले तरी त्यांच्या पाठलागावर गोऱ्या फौजा नाहींत हें कशावरून मानायचें? तडफ हा गोऱ्यांचा स्वभावगुण या प्रसंगीं बारगळला याची त्यांच्या अभावानें पक्की खूण पटली,

तेव्हां दिल्लीचे शिपाई मीरतवाल्यांच्या कर्तबगारीचे भागीदार होण्यासाठीं सरसावले. त्यांची छावणी दिल्लीशहराबाहेर अंतरावर होती. दिल्लींतल्या खबरा नीट समजल्यावरच त्यांना आपलें पाऊल तिकडे वळविणें शक्य व अवश्य होतें. शेवटीं मध्यान्ह उलटली तेव्हां त्यांनीं आपल्या पराक्रमाला यथेच्छ वाव दिला. त्यांचेहि बरेच अधिकारी असल्या जागीं जीवास मुकले. जे पळाले त्यांच्यापैकीं बहुतेकांवर मार्गांत मरण ओढवलें. त्यांतूनहि कित्येक वांचले. या धुमश्चक्रींत सरकारी इमारती जाळणें व लुटणें हें काम सोपें होतें. तें आटपून शिपाई दारूगोळ्याच्या कोठाराकडे वळले. दिल्लीस हत्यारांचा व दारूगोळ्याचा अतिशय मोठा संग्रह होता. त्याचें संरक्षण करावें म्हणून तेथील गोऱ्या रखवालदारांनीं कंबर कसली. हे अवघे नऊ जण होते. बादशहाला तक्तावर बसविण्याचा सोहळा शिपायांनीं मध्याह्नीच्या सुमारास पार पाडला असल्यानें दारूगोळ्याच्या कोठाराकडे जाऊन तेथील गोऱ्यांपुढें बादशहाच्या नांवें कोठार आपल्या स्वाधीन करण्याचा हेका शिपायांना दाखवितां आला. पण गोरे लोक बादशहाला ओळखीत नव्हते. त्यांनीं कोठाराचा बचाव तोफा डागून चालविला. कोठारांत शिरण्याला तोफा आडव्या आल्या तेव्हां शिपाई व तमासगीर कोठारावर चढले. त्यांच्या बंदुका कोठारांतील इंग्रजांवर गोळयांचा पाऊस पाडीत होत्या. त्या योगानें आपल्या तुटपुंज्या मनुष्यबळाला गळती लागत आहे, असें दिसतांच उरलेल्या गोऱ्यांनीं तें कोठार पेटवून उडविलें. त्याच्या भडक्यांत जमलेल्या लोकांपैकीं शेंकडोंच्या चिंधड्या उडाल्या, परंतु त्यांतून तीन चार गोरे बचावले व शहराबाहेर पळाले. तें कोठार कित्येक तास जळत होतें; तरी त्यांतील सर्व वस्तूंचा विध्वंस झाला नाहीं; कारण दिल्लीच्या लढाईत शिपायांना दारूगोळ्याची टंचाई शेवटपर्यंत नडत नसल्याचा अनुभव दिल्लीबाहेर तळ देऊन बसलेल्या इंग्रजांना येत होता. ता. ११ मे सोमवारीं रात्रीं दिल्लीस गोऱ्यांच्या अंमल मोडून घोर बादशाही शांतता पसरली. त्या महिन्याच्या अखेरपर्यंत दिल्लीच्या शिपायांची व इंग्रजांची गांठ पडली नाहीं. दिल्लीच्या दंगलीची वार्ता तारायंत्रानें सर्वत्र कळविण्याचें प्रसंगावधान तारखात्याच्या एका इंग्रजानें दाखविलें व त्यामुळें इंग्रज अंमलदार जिकडे तिकडे दंगलीच्या प्रतिकाराच्या उद्योगांत तावडतोब गर्क झाले.

— २ —

ज्याच्या गळ्यांत शिपायांच्या पुढारीपणाची माळ पडली तो बहादुरशहा कंपनी सरकारचा तैनातदार होता. १८३७ सालीं सप्टेंबरांत त्याच्याकडे तैनातीचा वारसा आला. त्याच्या आधीं बादशाही अधिकार सुमारें ५० वर्षें नामशेष झालेले होते. परंतु कंपनीनें एकदां याच्या पूर्वजाकडून बंगालमध्यें दिवाणी कारभाराची सनद मिळविली असल्यानें त्या वंशाचा अधिकार निमाला तरी त्याचा बोज राखण्याचा शिरस्ता पाळण्याचें व्रत मराठ्यांमागून इंग्रजांनीं बरींच वर्षें चालविलें. बहादुरशहाच्या खाजगी शेतबागांचें व दिल्लींतील इमारतींच्या भाड्याचें उत्पन्न सालीना दोन अडीच लाखांचें होतें; तथापि बहादुरशहाला दरमहा एक लाखाचा तनखा आणि आपल्या महालाच्या सीमेंत सर्वाधिकार, अशा तऱ्हेची त्याच्या संबंधांतील इंग्रजी व्यवस्था होती. देऊं केलेल्या सर्वाधिकारापायीं केव्हांतरी बादशाही हुकमतीनें खून करण्यापर्यंत मजल मारली तेव्हां त्याच्या सर्वाधिकारांतील जोरजुलमाची सवड इंग्रजांनीं काढून टाकली. एवढ्यावरच या नकली बादशाहीच्या दिखाऊ डामडौलाला बसणारें धक्के थांबले नाहींत. दरवर्षीं कंपनी सरकारतर्फे १२१ मोहरांचा नजराणा अतिनम्रपणाच्या आविर्भावानें इंग्रज अधिकारी पोंचवीत होते. तो बंद करण्यांत आला ( १८४४ ). कंपनीच्या नाण्यावर बादशाहीच्या नांवानें जो मजकूर असे, त्यालाहि काट मिळाला. देशांतील राजेरजवाड्यांना बादशाहीचा गौरव बाळगण्याची मनाई करण्यांत आली. या स्थितीनें बहादुरशहा व त्याला बादशहा समजून त्याच्या भोंवतीं अहोरात्र लुडबुडणाऱ्या तोंडपुज्या खुषमस्कऱ्या आश्रितांचा जळफळाट होत असल्यास तें स्वाभाविक म्हणावें लागेल. बहादुरशहानें कदाचित् असले उपमर्द जिरवून सारें आयुष्य कंठलें असतें. पण आपल्या पुढील वारसदारांची काळजी त्याला स्वस्थ राहूं देत नव्हती. बहादुरशहाला वारस मानतांना इंग्रजांनीं त्याच्या पश्चात् हें बादशाहीचें नाटक संपवावें, असें ठरवून आपला तसा निश्चय त्याच्या कानावर घातला तेव्हां त्यानें आपल्या कानावर हात ठेवून त्या इंग्रजी निश्चयाशीं झगडण्याचा बेत केला. विलायतेस गाऱ्हाणें पोंचवावयाचें असा तो बेत होता. बेत अमलांत आला पण विलायतेस त्याची दाद लागली नाहीं. कंपनी सरकारलाहि बादशहाच्या वारसाचें प्रकरण ताबडतोब निकालांत

काढण्याची घाई नव्हती. १८४९ मध्यें बहादुरशहाचा वारस गणला जाणारा मुलगा दाराबख्त हा मरण पावला, त्या वेळीं या प्रकरणानें डोकें वर काढलें. दाराबख्ताच्या मागून फक्रुद्दीन या तरुण मुलाचें नांव कंपनी सरकारपुढें होतें. पूर्वजांची बादशाही लोपल्यावर पेन्शनराच्या पोटीं जन्मास आलेल्या फक्रुद्दिनावर बापाचे हक्क गमावण्याच्या संक्रांतीचा प्रयोग करावा अशी *लॉर्ड डलहौसीची योजना होती. तिला विलायतेंतील वरिष्ठांच्या* मतभेदाचा अडथळा होऊन हें प्रकरण भिजत पडलें. फक्रुद्दीनची निवड बादशहाला पसंत नव्हती. त्याला आपल्या तरुण लाडक्या बेगमेचा – झिन्नत महालचा – मुलगा जवानबख्त वारस व्हावा, अशी इच्छा होती. झिन्नत महालचीं कारस्थानें एकीकडे चालू असतां फक्रुद्दीनशीं संधान बांधून त्याच्याशीं गुप्तपणें करारमदार करण्याचीं खलबतें इंग्रज करीत होते. फक्रुद्दीनला बाकीच्या सर्व अटी मंजूर होत्या. आपल्याला बादशहाची पदवी वापरतां यावी आणि बादशाही डौल बाळगायला परवानगी असावी अशा त्याच्या दोन अटी होत्या. फक्रुद्दीनच्या या गुप्त मसलतीच्या बोभाट्यानें झिन्नत महालच्या क्रोधाला सीमा उरली नाहीं. फक्रुद्दीनची सुंता झाली असल्यामुळें तो वारसाहक्काला नालायक, (कारण सुंता झालेल्यांना दिल्लीच्या तक्तावर बसण्याची मनाई होती) असा झिन्नत महालचा फक्रुद्दीनविरुद्ध आक्षेप होता, पण इंग्रजांची विचारसरणी वेगळी होती; यामुळें इंग्रजांचा द्वेष शाही परिवारांत व त्यांच्या द्वारें लोकांत वाढविण्याचा उद्योग तिनें जोरांत चालविला असतां १८५६ च्या जुलई १० तारखेला फक्रुद्दीन एकाएकीं कालवश होऊन वारसाच्या जनानी कारस्थानाची वाट कांहींशी मोकळी झाली. फक्रुद्दीन वारल्याच्या दुसऱ्याच दिवशीं बहादुरशहानें स्थानिक इंग्रज अधिकाऱ्याच्या हातीं एक खलिता दिला, त्यांत जवानबख्त वारस करावा अशी मागणी होती. त्या खलित्यावर आठ शहाजाद्यांचे शिक्केमोर्तब होते. पण त्यापैकीं शहाजादा मिर्झा महंमद खोराश यानें ताबडतोब त्याविरुद्ध आपलें म्हणणें इंग्रजांना कळविलें. आतां जवानबख्त व खोराश यांच्यांत निवड करण्याचा प्रश्न उद्भवला. लार्ड कॅनिंगनें जवानबख्तानला खो देऊन मिर्झा महंमदचा हक्क विचारांत घेतला. हा निर्णय साहजिकच बहादुरशहा मरणाधीन झाल्यावर अंमलांत यावयाचा होता. बहादुरशहाच्या दीर्घायुष्याबद्दल विश्वास बाळगून त्याच्या हयातींत जवानबख्ताचें नशीब उघडेल अशी झिन्नत महालला आशा होती, तरी तिचा

अनु. 23233 वि.
नोंद दि: ३३

इंग्रजविरोधी उद्योग थांवला नाहीं. वहादुरशहाचें प्यादें खेळवतां खेळवतां तिच्या उत्तेजनानें वहादुरशहा इराणशीं सूत लावण्याइतका पुढें सरकला, त्यासाठीं आपल्या सुन्नी पंथाचा त्याग करून तो शिया झाला, (कारण इराणी मुसलमान शिया आहेत) वगैरे आशयाच्या वातम्या इंग्रजी कारभारांत दाखल केल्या जात होत्या. इतक्यांत शिपायांचा उठाव होऊन वहादुरशहाला तक्तावर चढण्याची संधि मिळाली. बहादुरशहाचें मूळचें नांव अबू जफर. जफर हें नांव लावून तो कविता करीत असे. इराणच्या व रशियाच्या राजांना जें करतां आलें नाहीं तें इंग्रजांच्या विध्वंसाचें काम काडतुसानें पार पाडलें, अशा अर्थाच्या ज्या दोन ओळी प्रकरणारंभीं दिल्या आहेत, त्या वहादुरशहानें रचलेल्या होत्या.

शिपायांचें पुढारीपण पत्करतांना त्यानें आपल्या स्थितीची शिपायांना ओळख करून दिली असणें संभवतें व तशा अर्थाची माहिती इंग्रजांच्या दप्तरांत पाहायला सांपडतें. पण बादशाहीचा मोह अनावर होण्याला कारणेंहि तशींच वलवत्तर होतीं. शिपायांची सार्वत्रिक अस्वस्थता व उठावणी (दिल्लीस मीरतवाले व दिल्लीवाले शिपाई एक झाल्याचें उदाहरण त्याच्या डोळ्यांसमोर होतें.) रशिया, इराण, चीन येथें चाललेल्या लढाया; (इराणची फौज हिंदुस्थानवर चाल करून येत असल्याचा दाट समज लोकांत होता.) सामान्यतः हिंदी मुस्लिम प्रजेमध्यें वसणारी बादशाहीच्या आणि पर्यायानें इस्लामी वर्चस्वाच्या विलयाची हळहळ, देशांत फिरंगी फौज अगदीं कामापुरती थोडीशी असल्याची जाणीव, वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन वहादुरशहानें शिपायांचें नेतृत्व अंगीकारलें. त्याची द्रव्यहीनता लक्षांत घेऊन शिपायांनीं 'आपल्याला पगाराची अपेक्षा नाहीं, तें आमचें आम्ही पाहून घेऊं, फक्त पुढारीपण पाहिजे' अशा तऱ्हेनें त्याची समजूत काढली असेल, या कल्पनेला आधार आढळतो. सारांश, बहादुरशहा बादशहा झाला. या बादशाहीपुढें शिपायांनीं गोऱ्या काळ्या ख्रिस्त्यांचें बलिदान साजरें केलें. वहादुरशहानें शहरांत शांतता राखण्यासाठीं आपल्या एका मुलाला–मिर्झा मोगल याला शिपायांबरोबर नगरसंचाराला पाठविलें. त्याला दिल्लीस आलेल्या शिपायांचा सेनापति नेमण्यांत आलें. जवळ जवळ तीन आठवडे गोऱ्या फौजांची दिल्लीच्या आजूबाजूस हालचाल नसल्यानें फिरंगी राज्य मोडल्याबद्दल त्याला संशय उरला नाहीं, म्हणून त्यानें आसपासच्या जहागीरदारांना मदतीसाठीं हाक

दिली. या व्यवहाराचा नकली डौल ओळखून सामान्यपणें बादशाही हुकुमांना व जाहीरनाम्यांना कोणीच फारसें जुमानलें नाहीं. गोरी फौज दिल्ली शहराच्या तटबंदीबाहेर पश्चिमेकडील टेकाडाच्या आश्रयानें जूनच्या पहिल्या पंधरवड्यांत डेरा उभारून व ठाण मांडून बसल्यावर या उसन्या बादशाहीची खरी परीक्षा सुरू झाली आणि मे महिन्यांतलें बहादुरशहाचें अवसान खचत चाललें. तथापि त्याच्या देहांत बाबर अकबराचें रक्त असल्याची ग्वाही देणारें एक उदाहरण सांगण्याजोगें आहे. हें उदाहरण पराक्रमाचें अथवा शौर्याचें नाहीं, केवळ परधर्मसहिष्णुतेचें आहे. ता. १ ऑगस्ट १८५७ या दिवशीं बक्रेइदीचा सण गोवधानें साजरा करण्याची कित्येक माथेफिरू मुसलमानांची मनीषा त्यानें सफळ होऊं दिली नाहीं. त्याच्या मुस्लिम सेनापतीनें त्याला गोवधबंदीचा सल्ला दिला, असें एक मत इतिहासाच्या साधनांत दृष्टीस पडतें. पण बादशहानें आपल्या थोरवीचें दडपण उत्पन्न केलें म्हणून गोहत्याच नव्हे तर त्यानिमित्त इंग्रजांना हवी असलेली हिंदु-मुसलमानांची फाटाफूटहि टळली, असें त्या उदाहरणाचें स्वरूप व तात्पर्य आहे.

बहादुरशहाच्या बादशाहीचा पहिला महिना एकंदरीनें मोठ्या उमेदीमध्यें गेला. ठिकठिकाणीं उठाव करणाऱ्या शिपायांचे जमाव दिल्लीस येऊन बादशहाला थोडें थोडें द्रव्यार्पण करीत होते. नबाबशाही जिल्ह्यांतून व रोहिलखंडांत तालुक्यागणिक दंडेलीनें ख्यातीच्या क्षेत्रांत उगवलेले पुढारी शिपायांच्या हातीं नजराणे व अधिकाराच्या मागणीचे अर्ज पाठवून बहादुरशहाला बादशहा झाल्याची जाणीव करून देत होते. बरेलीच्या खान बहादुरखानानें बादशहाकडे हत्ती घोडे मोहरांचा नजराणा तर पाठविलाच, पण त्याच्या विजयाची खूण म्हणून सोन्याचें नाणें तयार केल्याचा पुरावा इतिहासाच्या इंग्रजी साहित्यामध्यें दाखल असल्याचें आढळतें. बहादुरशहानें या ऐश्वर्याच्या प्रभावाचे कांहीं खलिते निरनिराळे राजेरजवाडे व शिपाई-गर्दीच्या खळबळीनें अघाडीस आणलेल्या स्वयंमन्य पुढारी यांकडे पाठविल्याची माहिती उपलब्ध आहे. आपण कोणत्या धोरणानें राज्य चालविणार आहों, याची कल्पना विस्तारानें रेखाटणारे एक दोन जाहीरनामे ऐतिहासिक कागपत्रांत पाहायला सांपडतात. या जाहीरनाम्यांतून इंग्रजी राज्यकारभाराच्या छटा पुष्कळच दिसतात. बादशहापुढें इंग्रजी राज्यकारभाराचाच कित्ता होता. बादशहा दरबार भरवीत असे, तेव्हां जुने मानकरी, शिपायांचे पुढारी

विद्वान् समजले जाणारे मौलवी व कधींमधीं दिल्लीनजीकच्या नबाब-ठाकुरांचे प्रतिनिधि, अशा लोकांच्या गर्दीनें दरबार भरून जाई. पहिल्या दिवशीं बादशाहीचें पुनरुज्जीवन करणाऱ्या शिपायांच्या डोक्यावर हात ठेवून बहादुरशहानें आपली जबाबदारी पार पाडली. वस्त्रालंकार देण्याइतकी द्रव्याच्या किंवा काळाच्या दृष्टीनें त्याच्यापाशीं सवडच नव्हती. एखाद्या प्रसंगीं त्यानें पोषाख दिल्याचे उल्लेख क्वचित् दृष्टीस पडतात. बहादुरशहाचें वय सत्तरीच्या पलीकडे निश्चित गेलेलें होतें, त्यामुळें शारीरिक चलनवलनाची पात्रता त्याच्या ठिकाणीं साहजिकच नव्हती. शिवाय वाड्याबाहेर पडून शरीर शिणविण्याचा प्रसंग त्याच्या वांटणीस पूर्वीं केव्हांच आलेला नव्हता. वाड्याच्या ऐषआरामांत वाडवडिलांची कीर्ति खुषमस्कऱ्यांच्या तोंडून ऐकावी, ज्योतिष्याजवळ भविष्याचा काथ्या कुटावा, कवनें करावीं आणि आश्रितांच्या द्वारें त्यांची प्रशंसा वदवावी; जनानखान्याच्या खलबतांत रमावें किंवा घड-पडावें, अशा स्थितींत बहादुरशहाचें सारें आयुष्य गेलें असल्यामुळें शिपायांनीं उत्पन्न केलेल्या आणीबाणीच्या प्रसंगाला साजेशी मनाची व शरीराची धडाडी दाखविण्याला तो सर्वस्वीं असमर्थ होता. दरबार भरवून त्यांत एका ठिकाणीं अर्थात् उच्चासनावर बसून शिपायांचे मनसुबे, मौलवींचा उपदेश, भविष्यवाद्यांचीं वार्तिकें, शाहिरांचे पोवाडे वगैरे कार्यक्रमांत वेळ दवडणें एवढेंच बहादुरशहाला शक्य होतें. मे महिन्याच्या अखेरपर्यंत बाद-शाहीची स्थिति उत्साहकारक होती. त्या महिन्याच्या शेवटीं इंग्रजांची गांठ पडून जेव्हां शिपायांना पराभवाचे दोन रट्टे बसले तेव्हां इंग्रज केवळ जीवं-तच नव्हे तर अटीतटीनें लढण्याइतका प्रकृतीनें खंबीर असल्याबद्दल शिपाया-प्रमाणेंच बादशहालासुद्धां संशय राहिला नाहीं. तरी नव्या फौजा येत आहेत या वस्तुस्थितीनें निराशेपर्यंत उत्साहभंगाची मजल जाऊं दिली नाहीं. दिल्लीसमोरच्या टेकाडावर येऊन राहणें म्हणजे दिल्ली काबीज करणें नव्हे; आपल्या प्रचंड मनुष्यबळाच्या व शस्त्रबळाच्या भाराखालीं आपण चिमूटभर इंग्रजाला हां हां म्हणतां चिरडून टाकूं, अशा समजुतीनें शिपायांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं पराक्रमाची दरबारी फुशारकी बरेच दिवस टिकवून धरली होती.

ता. २० सप्टेंबर १८५७ रोजीं बहादुरशहा, झिन्नत महाल व जवान-बख्त या तिघांना इंग्रजांनीं पकडून कैदेंत ठेवलें. शरण आल्यास जीवदान

मिळेल, असें त्याला आश्वासन दिलें म्हणून तो इंग्रजांच्या ताब्यांत गेला. दुसऱ्या दिवशीं त्याचे दोघे मुलगे व एक नातू अशा तिघांना एका इंग्रजानें ठार मारलें. त्यानंतर या शाही कुटुंबाचे जे हाल झाले, तसेच त्याचे हाल दिल्ली इंग्रजांच्या कबजांत जाईपर्यंतच्या काळांत शिपाई लोक करीत होते. ता. १० जून पासून २० सप्टेंबरपर्यंत शिपायांनीं लढण्यांत कसूर केली नाहीं, पण त्यांना विजय कधींच मिळाला नाहीं. यामुळें शिपाई बहादुरशहाची उघड उघड अप्रतिष्ठा करूं लागले. शिपायांच्या पराक्रमाला यश नाहीं म्हणून कधीं कधीं तो शिपायांना इंग्रजाशीं मिटतें घेण्याला सांगे, तर कधीं स्वतः इंग्रजाकडे एखाद्याच्या मार्फत समेटाच्या उद्देशाचें लेण पोंचवी. बहादुरशहा दिल्लीसमोरील गोऱ्या अंमलदाराचें स्वतःसंबंधांत मन वळविण्याचा यत्न करीत असल्याची बोलवा कलकत्त्यास गव्हर्नर-जनरलापर्यंत वारंवार गेली, तेव्हां त्यांनीं दिल्लीच्या अधिकाऱ्यांना ‘बहादुरशहाचा मुळींच विचार नको’ अशी सक्त तंबी दिली. बहादुरशहाच्या महालांतील कोणा वजनदार स्त्रीकडून एकदां समेटाच्या दृष्टीनें कांहीं चांचपणी झाली, असा एक उल्लेख सांपडतो. ही स्त्री दुसरी कोणी नसून झिन्नत महालच होती. त्यानें एकदां निकरास चढलेल्या पायदळ शिपायाला प्रत्येकीं १ रुपया व स्वाराला प्रत्येकीं २ रुपये असा मुशाहिरा दिला. एकदां शहरांतील धनिकांकडून तीन लाखांची रक्कम हस्तगत केली, वगैरे बाजार बातम्यांची नोंद इंग्रजी दप्तरांत आहे. बहादुरशहाबद्दल उत्कट आदरभाव शिपायांमध्यें होता असें समजायला पुरावा नाहीं. पहिल्याच दिवशीं त्यांनीं बहादुरशहाच्या वाड्यांत व त्याच्या देखत जें वर्तन केलें, तें आदरदर्शक नव्हतें. वाड्याच्या ज्या दालनाकडे एकदां फिरकण्याची चोरी होती, तेथें शिपाई अस्ताव्यस्त उनाडक्या करीत होते. बहादुरशहाबद्दल आरंभीं जो थोडा आदर असेल तो फिरंगी लोकांच्या शौर्यापुढें मात्रा चालेनाशी झाल्यावर थंडावत गेला. ज्या दिवशीं त्याच्या वाड्यावर गोरे लष्कर जाऊन धडकलें त्या दिवशीं तेथें कोणीच नव्हतें. बहादुरशहा चाललेल्या धुमश्चक्रींत वीराप्रमाणें मरून जाण्याची भाषा बोलत असे. तितकाच प्रसंग आला तर विष खाऊन जीव दवडायचा, या निश्चयानें तो एक हिरकणी जवळ बाळगून असल्याची लोकवार्ता त्या काळीं पसरली होती. परंतु वीरोचित किंवा विषप्रेरित यांतलें कोणतेंच मरण त्यांच्या नशिबीं नव्हतें. हिंदुस्थानाबाहेर ब्रह्मदेशाच्या हद्द-

पारींत सामान्य गुन्हेगार कैद्याच्या दशेमध्यें त्यानें मरावें, असा फिरंगी निकाल त्याच्या वांटणीस आला. विजयाची निराशा वाढत चालल्यावर तो नवी कविता गुणगुणूं लागला:

फौजने आकर घेर लिया; चैन गया, आराम गया
जीका जान ठैर गया है; सुबा गया या शाम गया

या चरणांचा भावार्थ असा:—फौजेने येऊन घेरले, चैन गेली, आरामाची स्थिति संपली; दिवस जातो, रात्र सरते, पण प्राण मात्र अडकून राहिला आहे.

– ३ –

मीरतच्या उठावाची वार्ता देशांतील हिंदी सैनिकांच्या छावण्यांतून पसरायला एक दोन दिवसांहून अधिक दिवस लागले नाहींत. ज्या मुहूर्ताकडे आतुरतेनें आपण आपले डोळे लावून बसलों होतों तो मुहूर्त मीरतवाल्यांनीं साधला व आपल्याला कर्तव्याचा मार्ग दाखविला, अशा उत्साहानें भराभर पुष्कळशा छावण्यांतील हिंदी सैनिकांनीं फिरंग्यांची हुकमत ताडकन् झुगारली. शिपायांच्या उठावाचा हा धडाका १८५७ च्या अखेरपर्यंत चालू असला तरी मोठाल्या छावण्यांचे उठाव साधारणपणें जूनच्या १५ तारखेपर्यंत होऊन गेले. त्या सर्वांची नांवनिशी येथें दाखल करण्याची गरज नाहीं. शिपाई-गर्दीच्या इतिहासांत दिल्ली, झांशी, कानपूर, लखनौ या चार शहरांचीं नावें प्रामुख्यानें घेतलीं जातात. दिल्लीनंतर पूर्वेकडील जिल्ह्यांतून जूनमध्यापर्यंत इंग्रजी सत्तेच्या छावण्या बेचिराख झाल्या. सीतापूर अर्थात् लखनौ टापूंत ( ता. ३ जून ) कानपुरास ( ता. ४ जून ) व झांशीस ( ता. ५ ) याप्रमाणें अनेक स्थळीं शिपायांनीं फिरंगी वर्चस्वाचें जोखड फेकून दिलें. दिल्लीस आपल्या इतिकर्तव्याचें केंद्र समजून ‘ चलो दिल्लीच्या ’ घोषणा करीत जेथल्या हिंदी फौजा ह्या शहराच्या रोखानें निघाल्या तीं ठिकाणें पुष्कळच आहेत. परंतु त्यांतलीं ठळक म्हणजे फेरोजपूर, ( १३ मे ), नसीराबाद, नीमच, बरेली, रोहटक, रुरकी ( २४ मे ), अलीगड ( २० मे ), हिसार, मथुरा ( ३० मे ), अंबाला लुधियाना ( ९ जून ), जालंधर ( ७ जून ) वगैरे होत. यापैकीं बऱ्याच छावण्यांचे शिपाई ता. १० जूनच्या पूर्वींच दिल्लीस पोंचले होते. नसीराबादच्या सैनिकांनीं २८ मे व १० जून रोजीं छावणी सोडली व ता. १७ जूनला ते दिल्लीस गेले.

जालंधर ( ७ जून ) फिलोर ( ८ जून )चे सैनिक ता. २० जूनच्या सुमारास तर रोहिलखंडाचे शिपाई ता. ३० मे रोजीं उठाव करून ता. १-२ जुलैला दिल्लींत शिरले. नीमचवाले ता. ४ व १० जूनला उठले व जुलईत दिल्लीस उगवले. दिल्लीजवळच्या भागांतील शिपाई दिल्लीस, लखनौच्या आसपासचे लखनौस व कानपुरानजीकचे कानपुरास स्थिरावले असें साधारणपणें म्हणतां येतें. इंग्रजांच्या अंदाजाप्रमाणें लढाईच्या कामीं कसलेल्या शिपायांची संख्या दिल्लीस २५ ते ३० हजार होती. त्यांच्याकडे सर्व प्रकारचीं भरपूर हत्यारें व तसाच उदंड दारूगोळा होता. शिवाय तटबंदीचा भक्कम आश्रय होता. उणीव फक्त योग्य पुढाऱ्याची होती, असें अनेक इंग्रज सेनाधुरंधरांनीं आपलें मत स्पष्टपणें व्यक्त केलेलें आहे.

इंग्रजांचा सर सेनापति ॲन्सन यानें ता. १४ मे रोजीं सिमला सोडलें. ता. १५ ला तो अंबाल्यास आला. तेथें त्यांनीं दिल्लीच्या मोहिमेची तयारी चालवून ता. २५ रोजीं तो कर्नाल मुक्कामीं पोचला. ता. २७ रोजीं तो कॉलऱ्याला बळी पडला आणि सरसेनानींची धुरा बर्नार्ड नांवाच्या इंग्रजाकडे गेली. या अपघाताचा ठरलेल्या मोहिमेवर कसलाच अनिष्ट परिणाम घडला नाहीं. ता. २१ रोजीं इंग्रजांचा पहिला सेनाविभाग दिल्लीच्या वाटेस लागला होता. नंतर कर्नाल येथें मुक्काम करून ता. ३१ मे रोजीं या सेनाविभागानें आपला डेरा हालविला. मीरतहून ता. २७ मे रोजीं निघालेल्या गोऱ्या फौजेनें ता. ३०–३१ मे या दिवशीं हिंडन नदीच्या कांठीं शिपायांना हारवून पुढची मजल मारली. ता. ५ जून रोजीं मीरतच्या गोऱ्यांची व सर सेनापतीच्या सैन्याची जोडी जमली. ता. ८ जूनला दिल्लीजवळच्या बादली-की सराई या नांवाच्या जागीं पुनः दिल्लीवाल्यांनीं गोऱ्या फौजेला सामना दिला. पण त्यांचें शौर्य फुकट गेलें. त्यांनीं मार खाऊन दिल्लीची वाट धरली. ता. ९ रोजीं दिल्लीच्या तटाबाहेर पश्चिमेस असलेल्या टेकड्या इंग्रजांना काबीज करतां येऊं नयेत म्हणून तिकडे निघालेल्या गोऱ्या लष्करांवर दिल्लीवाल्यांनीं जोराचा हल्ला चढविला. त्याचा निर्णय पूर्वींसारखाच लागला. नंतर ता. १० जूनपासून इंग्रजांचा तळ पश्चिमेकडील उतारावर कायम होऊन ता. १४ सप्टेंबरपर्यंत उभय पक्षाच्या सारख्या लढाया झडत होत्या. ता. १० जून ते ता. १४ सप्टेंबर या ९६ दिवसांत बत्तीस लढाया झाल्या. हें इंग्रजांचे म्हणणें पाहिल्यास दरतीन दिवसाला त्यांना एक लढाई करावी लागत होती, असा निष्कर्ष

निघतो. इंग्रजांची उजवी बाजू इमारती, बागा, इत्यादिकांनीं व्यापलेली असल्यानें व तेथें इंग्रजाला नाकेबंदी न करतां आल्यानें शिपाई आपले हल्ले त्याच बाजूनें बहुधा करीत असत. इंग्रज ते हल्ले प्रत्येक वेळीं मारून काढीत होते शिपायांप्रमाणें इंग्रजी लष्करालाहि कुमक पोचत होती, पण ती चढाईच्या धोरणाला अगदींच तुटपुंजी होती. म्हणून इंग्रजांनीं दोन वेळां धडाक्याच्या हल्लयानें दिल्ली जिंकण्याचा संकल्प योजला (१३जून व जुलई) पण तो कृतींत वठविण्याचें धाडस त्यांना करवलें नाहीं. पहिला संकल्प हल्लयाची ठरलेली वेळ निघून गेली म्हणून अंमलांत आला नाहीं.

अटीतटीच्या म्हणण्याजोग्या ज्या लढाया दिल्लीसमोर गाजल्या त्यांच्या मागें कांहीं विशेष प्रेरणा असे. उदाहरणार्थ ता.२३जूनची लढाई प्लासीची शताब्दि गाजविण्यासाठीं करण्यांत आली. ता. १–२ ऑगस्ट या दिवशींच्या लढाया बक्रेईदचा सण साजरा व्हावा याकरितां खेळल्या गेल्या. त्या दिवशीं लढाईसाठीं शहराबाहेर पडण्यापूर्वीं हिंदु-मुसलमानांच्या गर्जनांनीं, तोफांच्या सलामी आवाजांनीं कित्येक तास शहर दणाणलें; तो कोलाहल बाहेर ऐकूं येण्याइतका मोठा होता. सदर सणांत इंग्रजांना दिल्ली समोरच्या तळावरून पिटाळायचे व तेथें बादशाहीच्या पुनरुज्जीवनाचेहि नगारे वाजवायचे अशी महत्त्वाकांक्षा शिपायांनीं धरली होती. कोठून नवी फौज दिल्लीस आली.कीं त्या ताज्या दमाच्या लढवय्यांनीं आपल्या शौर्याची चमक इंग्रजांना दाखवावी असा कांहीं लढायांचा उद्देश सांगतां येतो. इंग्रजांच्या पिछाडीस जाऊन त्यांचा कोंडमारा करण्याच्या किंवा त्याच्या दळणवळणाचा रस्ता रोखण्याच्या प्रयोजनानें शिपाई उघड्या मैदानांत सामन्याला केव्हां केव्हां सरसावून जात असत. त्यांच्याजवळ लांब पल्लयाच्या व जास्त परिणामकारक तोफा होत्या. कित्येकदां त्यांनीं केलेल्या अचूक गोलंदाजीची प्रशंसा इंग्रजांनीं प्रांजलपणें गाइली आहे. कधीं कधीं त्यांनीं इंग्रजांना गोंधळांत टाकणारें धाडसहि निदर्शनास आणलें. (९जुलै). इंग्रजांकडील कांहीं काळ्या सैनिकांची अनुकूलता संपादून एकदां बरेचसे स्वार बेधडक इंग्रजांची नाकेबंदी ओलांडून त्यांच्या तळावर दौडत सुटले. त्यांचा पोषाख इंग्रजांच्या काळ्या स्वारासारखा होता, म्हणून इंग्रजांची प्रथम फसगत झाली. फसवणूक लक्षांत येतांच गोऱ्या लष्करानें त्याचा फडशा उडविला खरा, पण मागून ते त्या शिपायांच्या निर्भय साहसाची तारीफ गात राहिले. ह्या स्वारांना गोऱ्या फौजेंतील आपले जातभाई

आपल्याला मदत करतील अशी आशा होती, त्यांनीं तशा अर्थाच्या आरोळ्याहि ठोकल्या, तथापि त्यांचा उपयोग झाला नाहीं. शिपायांच्या हिकमतीनें फसून चिडलेल्या गोऱ्या शिपायांनीं आपल्या काळ्या नोकरचाकरावर देखील नंतर गोळ्या झाडल्या. आपल्या पिछाडीकडील शत्रूच्या हालचालींना अडथळा करण्यासाठीं इंग्रजांनीं आजूबाजूच्या वाहत्या पाण्यावरले पूल पाडून टाकले. तेव्हां ता. २१ जुलईला शिपायांनीं एक पूल बांधून काढला, पण तो पावसाळी पाण्याच्या भरावानें वाहून गेला. उजव्या आघाडीवरील इमारती जमीनदोस्त करून बागा–जंगलें छाटून काढल्यामुळें व तेथें ठाणीं घातल्यामुळें इंग्रजांचें त्या बाजूकडीलहि भय पुष्कळच कमी झालें होतें. तरी शेवटपर्यंत त्याच अंगानें उभयतांचे लढे मोठ्या प्रमाणांत चालू राहिले. ऑगस्टच्या अखेरीस झालेली एक लढाई 'नाझफगड' या गांवाच्या नांवानें शिपाईगर्दीच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे.

महिन्यांमागून महिने गेले तरी इंग्रजी फौजांचें बळ किंवा शौर्य कमी होण्याऐवजीं वाढत आहे, आपल्याला मात्र विजयाचा आनंद एकदांहि भोगतां आला नाहीं; प्रत्येक झटापटींत माणसांच्या बळाबरोबर शिपायांकडील तोफांची संख्या घटत होती. आगस्टच्या सुरुवातीला दारू संपली व तिचा कारखाना पेटला. (ता. ७) अशा संकटांत इतर ठिकाणचें विजय दिल्लींतील शिपायांच्या धैर्याला सावरीत असत, पण या परस्थ विजयाचें उसनें सुख हिरावलें जाण्यालासुद्धां वेळ लागत नसे. उदाहरणार्थ कानपूरच्या विजयानें शिपायांमध्यें संचरलेला उत्साह इंग्रजांनीं कानपूर काबीज केल्याच्या माहितीनें पूर्णपणें खालावला. लखनौचा वेढा हें एक त्यांचें कांहींसें आशास्थान होतें. आपण इंग्रजांचे दोन सर सेनापति मारले, किंवा त्यांनीं आत्महत्या केली. एकास पळविलें अशाहि गप्पा पिकवून दिल्लीचे शिपाई स्वतःला समाधान पुरवीत असल्याची वदंता इतिहासाच्या दप्तरीं नमूद आहे. ॲन्सन व त्याच्या मागून सरसेनापतीच्या जागीं आलेला बर्नार्ड हे अनुक्रमें ता. २७ मे आणि ता. ५ जुलै या दिवशीं कॉलऱ्यानें वारले. बर्नार्डचा अधिकार रीडनें स्वीकारला, पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यानें विल्सनकडे आपली कामगिरी सोपवून ता. १७ जुलैला सिमल्यास प्रयाण केलें. शिपायांच्या उमेदीला हा खुराक मिळाला. तिकडे कलकत्त्यास लार्ड एल्जिन सिंगापुराहून आला. हा चीनला जावयाचा होता;

पण तिकडे न जातां इकडे आला. शिपायांच्या चर्चाविषयांत या प्रकारालाहि जागा देण्यांत आली. सरसेनापति मेले गेले, कलकत्त्यास एकाचे दोन लाट झाले तरी छातीवर बसलेला इंग्रज हालत नाहीं या प्रत्यक्ष अनुभवाची उपेक्षा करणें शिपायांना शक्य नव्हतें. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस इंग्रज आटपत नाहीं, उलट तो आपलें पारिपत्य करणार अशा तऱ्हेचीं स्वप्नें त्यांना पडूं लागलीं. मग पुष्कळांनीं दिल्लीबाहेर पाय काढण्याला प्रारंभ केला. त्यांची पहिली धडाडी ओसरून बायकांना पुढें पाठवून त्यांच्यामागून हल्लयास जाण्यासारख्या हीन युक्त्या त्यांनीं अंमलांत आणल्या. एकदां (ता. १८ जुलई) अशा हल्लयाच्या वेळीं एक धिप्पाड शरीराची व मर्दानी वेषाची बाई इंग्रजांनीं पकडली. ही ' जिहादीन ' होती. शिपायांच्या निराशेची आणखी एक खूण म्हणजे आपला पैसाअडका, जडजवाहीर आपल्या अंगावर अहोरात्र वाहण्याची तऱ्हा. शिपायांच्या कंबरबंदांत द्रव्य असतें हें समजल्यापासून शिपाई घायाळ होऊन पडला रे पडला कीं इंग्रजांकडील गोरे काळे सैनिक शिपायांच्या गोळीबारांत स्वतः जीवास मुकण्याचा संभव असतांहि एकमेकांना मागें टाकण्याच्या चुरशीनें त्यावर धांवून जात व त्याच्या कपड्यांतलें सारें धन लुटून घेत. या उद्योगानें पुष्कळ सैनिक खूप गबर झाल्याची साक्ष इंग्रजांच्या पुस्तकांतून आहे.

दिल्लीचा पाडाव शक्य तेवढ्या त्वरेनें झाला पाहिजे याची आंच इंग्रजाला होती, पण त्याच्याजवळ माणसांचें बळ तोकडें होतें. लांब पल्लयाच्या व तटबंदी खिळखिळ्या करणाऱ्या तोफांची कमतरता होती. ज्या तोफा होत्या त्यांना गोळ्यांची वाण पडे. तेव्हां दिल्लीच्या तटबंदीवरील तोफांतून आलेले पण न उडतां शाबूत राहिलेले गोळे वेंचून ते उलट दिल्लीवर फेकावे असा क्रम इंग्रजांना पत्करावा लागला. प्रत्येक गोळ्याला ४ आणे बक्षीस मिळते म्हणून काळे लोक जीव धोक्यांत टाकून गोळे वेचीत असत. याप्रमाणें ऑगस्टच्या मध्यापर्यंत सुमारें ४८५ गोळे जमा केल्याची मनोरंजक नोंद कांहीं गोऱ्या अधिकाऱ्यांच्या पत्रांतून दृष्टीस पडते. शिपायांच्या मानानें गोऱ्यांची मनुष्यहानि अगदीं किरकोळ दिसणारी असली तरी त्यांना ती भारी वाटावी अशी त्यांच्या मनुष्यबळाची अवस्था होती. त्या हानीला निरनिराळ्या रोगांची व गोऱ्या लोकांना प्रायः न सोसणाऱ्या हवामानाची जोड मिळाल्यानें गोऱ्यांमध्यें मनुष्यबळाची काळजी दिल्लीच्या पाडावापर्यंत

कायम होती. मे व जून या ऐन उन्हाळ्याच्या महिन्यांत पुष्कळ गोरे सूर्याच्या प्रखरतेनें अंथरुणास खिळले किं.वा प्राणास मुकले. जुलई ऑगस्टांत झोडपावसानें ताप कॉलऱ्यासारखे रोग वाढवून गोऱ्या फौजेला खूपच हैराण करून सोडलें. शत्रु पुरवला पण रोग नको अशी गोऱ्यांची भावना झाली होती. तथापि त्यांनीं आपली जागा सोडली नाहीं. हळूहळू या फौजेला पंजाबांतून धान्याची, सैनिकांची व हत्यारांची कुमक मिळत जाऊन सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत हल्ला करून दिल्ली जिंकतां येईल असा गोऱ्या अंमलदारामध्यें दृढ विश्वास उत्पन्न झाला. फिरंगी पक्षांत अनुभवी, कसलेल्या, धाडसी नेत्यांची मुळींच उणीव नव्हती. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत पंजाबांतून मदतीचा शेवटचा हप्ता इंग्रजी छावणींत येऊन पोंचला व तावडतोब इंग्रज सेनानी तटबंदी फोडून दिल्लींत शिरण्याच्या कामास लागले. पांच-सहा दिवस तटानजीक मोर्चे उभे करण्यांत खर्ची पडले. नंतर ता. १४ सप्टेंबर या दिवशीं तटबंदीचा काश्मीर दरवाजा पाडून इंग्रजी लष्कर दिल्लींत घुसलें. तेथील शिपायांनीं लढण्याची शिकस्त करतांना आपल्या शत्रूंना दारूच्या कैफांत लोटण्याची जी युक्ति केली, तिच्याकडे शिपाई-गर्दीच्या आंग्ल इतिहास-लेखकांना लक्ष द्यावें लागलें. इंग्रज, गुरखे, शीख, पठाण हे सगळेच दारूचे भक्त, त्यांना मागील तीन-चार महिन्यांत दारूची तहान यथेच्छ भागविण्याचें जमलें नव्हतें. ‘ दारू मिळते ती पुरत नाहीं ‘ जास्त दारू म्हणजे हवें तेवढें काम ’ अशा अर्थाचीं वाक्यें भिंतीवर खडूनें खरडून गोरे शिपाई आपली तहान व्यक्त करीत होते. काश्मीर दरवाजाच्या आंत शिरतांच त्यांना समोर दारू दिसली कीं ते लढणें टाकून दारूच्या आदराला प्रवृत्त होतील ही शिपायांची अटकळ अक्षरशः खरी ठरली. इंग्रजांची फौज दारूच्या मोहांत सांपडून लढाई विसरली. दारूच्या निशेंत शिस्त मोडली. सैनिकांचीं हत्यारें आपलें काम बजावीनात; या अंदाधुंदींत इंग्रजांचे पुष्कळ सैनिक ठार, जखमी व कांहीं बेपत्ता झाले. त्यांचा दुसरा दारुण दोष म्हणजे लुटीचा हव्यास. काश्मीर दरवाजाच्या आंतल्या रस्त्यावरील घरें शिपायांनीं भरलेलीं होतीं व तेथून ते सारखा गोळ्यांचा भडिमार करीत होते. यामुळें हल्लेखोर सैनिक त्या भडिमारानें पांगले. त्यांना दारूच्या व लुटीच्या कारभारांतून सोडवून एकत्र आणायला अधिकाऱ्यांना प्रयास पडले, पण थोड्या अवधींत त्यांनीं आपले सैनिक योग्य प्रकारें लगामीं लावले. दारू किती होती याची कल्पना

येण्यासाठीं तिच्या बाबतींत एक चुटका नमूद करायला हरकत नाहीं. दारूनें आरंभलेला अनर्थ दृष्टीस पडल्यावर सरसेनापतीनें दारूचे साठे गोळा करून जेव्हां फोडले तेव्हां रस्ते वाहूं लागले, असें इतिहास सांगतो.

इंग्रजांनीं आपल्या सैन्याचे चार विभाग करून त्याप्रमाणें हल्ल्याचा कार्यक्रम ठरविला होता. त्यांतल्या एका विभागाला आपली कामगिरी साधली नाहीं व हल्ल्याच्या प्रगतीला अडथळा झाला. हा हल्ला तटबंदीच्या लहानशा भागापुरता होता. त्यांत एका विभागाच्या नाकर्तेपणाचें विघ्न उद्भवलें व फौजेची झालेली नुकसानी छाती दडपून टाकणारी होती, याचा परिणाम सरसेनापतीवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याला फौज माघारी न्यावी, असें वाटलें; पण बाकीचे अधिकारी 'आगे बढो' या मताचे असल्यानें दुसऱ्या दिवसापासून नेटानें लढत इंग्रजी फौज बादशाही इमारतीपुढें ता. १९ रोजीं येऊन धडकली आणि दुसऱ्या दिवशीं तिनें वाडा ताब्यांत घेतला. बहादुरशहा आपल्या नातेवाइकांच्या लवाजम्यासह हुमायूनच्या कबरेकडे पळाला होता. त्याला इंग्रजांनीं ता. २० रोजीं पकडलें व दिल्लीस आणून कैदेंत ठेवलें.

ता. २१ ला इंग्रजी अधिकाऱ्यांनीं आपल्या सेनानीचा तळ बादशाही महालांत आणून त्या रात्रीं सरसेनापतीला थाटाची मेजवानी दिली. इंग्लंडची राणी, कंपनीचें राज्य, सेनापतीचें युद्धकौशल्य, यांच्या जयजयकारांत मेजवानी संपली. आतां सेनापतीपुढें आग्रा, कानपूर या रोखानें फौज रवाना करण्याचें काम होतें. दिल्लीच्या बंदोबस्तासाठीं अवश्य तेवढी फौज ठेवून बाकीचें लष्कर कानपूरकडे ता. २४ रोजीं पाठविण्यांत आलें.

इंग्रजांनीं दिल्ली पादाक्रान्त केल्यावर त्या शहराची जी हैराणगत झाली ती भयंकर होती. मागील इतिहासाच्या दृष्टीनें तिच्यांत अपूर्वता नसली तरी प्रत्यक्ष अनुभवाच्या दृष्टीनें ती हैराणगत दिल्लीकारांना नवी होती. दिल्लीला इस्लामच्या विद्यमानें राजधानीचा मान मिळाल्यापासून रक्तपाताचे व लुटालुटीचे प्रसंग तिच्या वांट्यास कितीतरी वेळां आले. नादिरशहा, अहमदशहा अबदाली यांनीं केलेल्या कत्तलींचें व लुटींचें स्मरण या अनुसंधानांत सहज होणारें आहे. परंतु १८५७ सालीं जे रहिवासी दिल्लीमध्यें नांदत होते, त्यांना मागील पन्नास वर्षांत असला अनुभव नव्हता. या वर्षीं त्यांच्यावर तो भयानक अनुभव अशा कहरानें कोसळला कीं त्यांना 'दे माय धरणी ठाय' होऊन गेले. प्रथम

शिपायांनीं त्यांना गांजलें व मागून इंग्रजांनीं त्यांना जीव नकोसा करून सोडलें. इंग्रजांच्या ताब्यांत शहर आलें तेव्हां तेथें सर्वत्र निर्जन ओसाडीशिवाय त्यांना दुसरें कांहींच दिसेना. लढणाऱ्या शिपायांनीं व त्यांच्या साह्यकर्त्यांनीं या ठिकाणीं शिल्लक राहूं नये हें स्वाभाविक म्हणतां येईल. सामान्य नागरिकांचा पत्ता नसावा, याचें इंग्रजांना आश्चर्य वाटलें. लुटालुटीपुरतें पाहिल्यास इंग्रजांना ही निर्जनता फायदेशीर होती. त्यांच्या लुटीला अगदीं मोकळें रान सांपडलें. लुटीकरितां शहराच्या बोळ-गल्ल्यांतून भटकतांना एखाद्या आडजागीं किंवा तळघरांतून म्हातारे, बाया, मुलें, अशीं माणसें भेटत; पण पाळीव पशुपक्षी हे मात्र इतस्ततः इंग्रजांच्या हटकून दृष्टीस पडत. मांजरें, माकडें, कुत्रीं आणि पिंजऱ्यांत मरून पडलेलीं पांखरें, यांनीं इंग्रजांच्या नजरेला कौतुक पुरविलें. घरें खणून ओरबाडून जी लूट जमविली जात असे, तिचें आकर्षण व कौतुक इंग्रजांना किती वाटत होतें याचा पाढा अन्यत्र वाचावयाचा आहे.

दिल्लीच्या पाडावानें शिपाई-गर्दीचें कंबरडें मोडावें इतकें त्याचें महत्त्व होतें; म्हणून कलकत्ता, लाहोर येथील वरिष्ठ इंग्रज अधिकारी दिल्लीसमोरील फौजेनें तें शहर लवकर पादाक्रान्त करावें अशी निकड लावून तेथील सेनाधिकाऱ्यांना पुनः पुनः लिहीत होते. ता. १५ जुलई या तारखेला कलकत्त्याहून दिल्लीस धाडलेल्या एका खलित्यामध्यें गव्हर्नर-जनरलानें दिल्ली लवकर न पडल्यास जे दुष्परिणाम होतील ते स्पष्ट केले आहेत. ‘ हिंदुस्थानाचा फार मोठा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालून गेला आहे. आपल्या राज्याचा द्वेष व प्रतिकार वाढत असून दिल्लीचा कबजा घेतल्याची व तेथें आपलें राज्य स्थापन झाल्याची खात्री लोकांस लवकर न पटवितां आली तर बंडाची साथ देशाच्या अंतिम सीमेपर्यंत जाऊन पोंचेल. दिल्ली हें बादशाहीचें स्थळ असून तेथें आपली फौज व प्रजा आपल्या विरुद्ध यशस्वी रीतीनें लढत आहे, या वस्तुस्थितीनें ब्रिटिशांच्या सामर्थ्याचा पाया हादरवून सोडला आहे. यासाठीं दिल्ली जिंकण्याची जेवढी त्वरा कराल तेवढी कमीच ठरेल, ’ असा त्या खलित्यांतील कांहीं वाक्यांचा मथितार्थ आहे. दिल्लीच्या पाडावाची गव्हर्नर जनरलानें वर्णिलेली महती कशी खरी होती, याचा प्रत्यय तें शहर इंग्रजांच्या हातीं गेल्यापासून येऊं लागला. मग दिल्ली ते कानपूर पर्यंतच्या मुलखांत शिपायांचा पाय कुठेंच ठरला नाहीं. ते इंग्रजाच्या प्रतिकाराला ठायीं ठायीं उभे राहात, लढाई करीत, पण माणसें हत्यारें गमावून पळ काढीत. त्यांना एक अयोध्येच्या नबाबशाहीचा प्रदेश व रोहिलखंड हीं दोन आश्रय स्थानें उरली होतीं.

* * *

~ 3 ~

# कानपूर व लखनौ

वस्तुतः लखनौच्या भागांत शिपाई-गर्दीला कानपूरच्या आधीं सुरुवात झाल्यामुळें तेथील घडामोडींची हकीकत प्रथम सांगून मग कानपुराकडे दृष्टिक्षेप करणें अधिक शास्त्रीय असलें तरी लखनौमध्यें कोंडलेल्या इंग्रज स्त्री-पुरुषांची सुटका करूं इच्छिणाऱ्या गोऱ्या फौजेचा कानपुरास मुख्य तळ असल्यानें कानपूरचें कथानक अगोदर संपविणें जास्त सोयीचें आहे. लखनौच्या मानानें कानपूरची शिपाई-गर्दी थोड्या दिवसांत आटपली. लखनौच्या धामधुमीचा काळ मोठा आहे. तेथें जूनपासून नोव्हेंबरअखेरपर्यंत ( १८५७ ) लढायांचा पहिला फेरा सुरू होता. नंतर मार्चमध्यें ( १८५८ ) तें शहर शिपायांच्या तावडींतून इंग्रजांनीं मोकळें केलें. कानपुरास जूनच्या प्रारंभापासून जुलईच्या मध्यापर्यंत तेथें इंग्रजी सत्तेच्या अभावीं जारी झालेल्या पेशवाईचा सगळा खेळ निकालांत निघाला. यासाठीं कानपूरची माहिती नजरेखालीं घालण्यांत एक प्रकारें औचित्य आहे.

कानपूर हें ठिकाण लष्करीदृष्ट्या महत्त्वाचें आहे असें ओळखून क्लाइवनें तें उदयास आणलें. दिल्ली, आग्रा, मथुरा, लखनौ, बनारस किंवा अलाहाबाद या शहरांना तीर्थ अथवा राजधानी या नात्यानें लोकांत बहुत काळापासून जो कीर्तिगौरव लाभला होता, त्या गौरवाची पात्रता कानपुराला कधींच लाभली नव्हती. पण लष्कर आणि व्यापार या दोन कारणांनीं १८५७ सालीं तें शहर प्रख्यातीस चढलें होतें. त्याच्याजवळचें बिठूर किंवा ब्रह्मावर्त याचा कदाचित् गंगेकांठचें तीर्थ म्हणून किरकोळ मान असेल, पण

कायम होती. मे व जून या ऐन उन्हाळ्याच्या महिन्यांत पुष्कळ गोरे सूर्याच्या प्रखरतेनें अंथरुणास खिळले किं.वा प्राणास मुकले. जुलई ऑगस्टांत झोडपावसानें ताप कॉलऱ्यासारखे रोग वाढवून गोऱ्या फौजेला खूपच हैराण करून सोडलें. शत्रु पुरवला पण रोग नको अशी गोऱ्यांची भावना झाली होती. तथापि त्यांनीं आपली जागा सोडली नाहीं. हळूहळू या फौजेला पंजाबांतून धान्याची, सैनिकांची व हत्यारांची कुमक मिळत जाऊन सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत हल्ला करून दिल्ली जिंकतां येईल असा गोऱ्या अंमलदारामध्यें दृढ विश्वास उत्पन्न झाला. फिरंगी पक्षांत अनुभवी, कसलेल्या, धाडसी नेत्यांची मुळींच उणीव नव्हती. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत पंजाबांतून मदतीचा शेवटचा हप्ता इंग्रजी छावणींत येऊन पोंचला व तावडतोब इंग्रज सेनानी तटबंदी फोडून दिल्लींत शिरण्याच्या कामास लागले. पांच-सहा दिवस तटानजीक मोर्चे उभे करण्यांत खर्ची पडले. नंतर ता. १४ सप्टेंबर या दिवशीं तटबंदीचा काश्मीर दरवाजा पाडून इंग्रजी लष्कर दिल्लींत घुसलें. तेथील शिपायांनीं लढण्याची शिकस्त करतांना आपल्या शत्रूंना दारूच्या कैफांत लोटण्याची जी युक्ति केली, तिच्याकडे शिपाई-गर्दीच्या आंग्ल इतिहास-लेखकांना लक्ष द्यावें लागलें. इंग्रज, गुरखे, शीख, पठाण हे सगळेच दारूचे भक्त, त्यांना मागील तीन-चार महिन्यांत दारूची तहान यथेच्छ भागविण्याचें जमलें नव्हतें. ‘ दारू मिळते ती पुरत नाहीं ‘ जास्त दारू म्हणजे हवें तेवढें काम ’ अशा अर्थाचीं वाक्यें भिंतीवर खडूनें खरडून गोरे शिपाई आपली तहान व्यक्त करीत होते. काश्मीर दरवाजाच्या आंत शिरतांच त्यांना समोर दारू दिसली कीं ते लढणें टाकून दारूच्या आदराला प्रवृत्त होतील ही शिपायांची अटकळ अक्षरशः खरी ठरली. इंग्रजांची फौज दारूच्या मोहांत सांपडून लढाई विसरली. दारूच्या निशेंत शिस्त मोडली. सैनिकांचीं हत्यारें आपलें काम बजावीनात; या अंदाधुंदींत इंग्रजांचे पुष्कळ सैनिक ठार, जखमी व कांहीं बेपत्ता झाले. त्यांचा दुसरा दारुण दोष म्हणजे लुटीचा हव्यास. काश्मीर दरवाजाच्या आंतल्या रस्त्यावरील घरें शिपायांनीं भरलेलीं होतीं व तेथून ते सारखा गोळ्यांचा भडिमार करीत होते. यामुळें हल्लेखोर सैनिक त्या भडिमारानें पांगले. त्यांना दारूच्या व लुटीच्या कारभारांतून सोडवून एकत्र आणायला अधिकाऱ्यांना प्रयास पडले, पण थोड्या अवधींत त्यांनीं आपले सैनिक योग्य प्रकारें लगामीं लावले. दारू किती होती याची कल्पना

येण्यासाठीं तिच्या बाबतींत एक चुटका नमूद करायला हरकत नाहीं. दारूनें आरंभलेला अनर्थ दृष्टीस पडल्यावर सरसेनापतीनें दारूचे साठे गोळा करून जेव्हां फोडले तेव्हां रस्ते वाहूं लागले, असें इतिहास सांगतो.

इंग्रजांनीं आपल्या सैन्याचे चार विभाग करून त्याप्रमाणें हल्ल्याचा कार्यक्रम ठरविला होता. त्यांतल्या एका विभागाला आपली कामगिरी साधली नाहीं व हल्ल्याच्या प्रगतीला अडथळा झाला. हा हल्ला तटबंदीच्या लहानशा भागापुरता होता. त्यांत एका विभागाच्या नाकर्तेपणाचें विघ्न उद्भवलें व फौजेची झालेली नुकसानी छाती दडपून टाकणारी होती, याचा परिणाम सरसेनापतीवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याला फौज माघारी न्यावी, असें वाटलें; पण बाकीचे अधिकारी ‘ आगे बढो ’ या मताचे असल्यानें दुसऱ्या दिवसापासून नेटानें लढत इंग्रजी फौज बादशाही इमारतीपुढें ता. १९ रोजीं येऊन धडकली आणि दुसऱ्या दिवशीं तिनें वाडा ताब्यांत घेतला. :बहादुरशहा आपल्या नातेवाइकांच्या लवाजम्यासह हुमायूनच्या कबरेकडे पळाला होता. त्याला इंग्रजांनीं ता. २० रोजीं पकडलें व दिल्लीस आणून कैदेंत ठेवलें.

ता. २१ ला इंग्रजी अधिकाऱ्यांनीं आपल्या सेनानीचा तळ बादशाही महालांत आणून त्या रात्रीं सरसेनापतीला थाटाची मेजवानी दिली. इंग्लंडची राणी, कंपनीचें राज्य, सेनापतीचें युद्धकौशल्य, यांच्या जयजयकारांत मेजवानी संपली. आतां सेनापतीपुढें आग्रा, कानपूर या रोखानें फौज रवाना करण्याचें काम होतें. दिल्लीच्या बंदोबस्तासाठीं अवश्य तेवढी फौज ठेवून बाकीचें लष्कर कानपूरकडे ता. २४ रोजीं पाठविण्यांत आलें.

इंग्रजांनीं दिल्ली पादाक्रान्त केल्यावर त्या शहराची जी हैराणगत झाली ती भयंकर होती. मागील इतिहासाच्या दृष्टीनें तिच्यांत अपूर्वता नसली तरी प्रत्यक्ष अनुभवाच्या दृष्टीनें ती हैराणगत दिल्लीकारांना नवी होती. दिल्लीला इस्लामच्या विद्यमानें राजधानीचा मान मिळाल्यापासून रक्तपाताचे व लुटालुटीचे प्रसंग तिच्या वांट्यास कितीतरी वेळां आले. नादिरशहा, अहमदशहा अबदाली यांनीं केलेल्या कत्तलींचें व लुटींचें स्मरण या अनुसंधानांत सहज होणारें आहे. परंतु १८५७ सालीं जे रहिवासी दिल्लीमध्यें नांदत होते, त्यांना मागील पन्नास वर्षांत असला अनुभव नव्हता. या वर्षीं त्यांच्यावर तो भयानक अनुभव अशा कहरानें कोसळला कीं त्यांना ‘ दे माय धरणी ठाय ’ होऊन गेले. प्रथम

शिपायांनीं त्यांना गांजलें व मागून इंग्रजांनीं त्यांना जीव नकोसा करून सोडलें. इंग्रजांच्या ताब्यांत शहर आलें तेव्हां तेथें सर्वत्र निर्जन ओसाडीशिवाय त्यांना दुसरें कांहींच दिसेना. लढणाऱ्या शिपायांनीं व त्यांच्या साह्यकर्त्यांनीं या ठिकाणीं शिल्लक राहूं नये हें स्वाभाविक म्हणतां येईल. सामान्य नागरिकांचा पत्ता नसावा, याचें इंग्रजांना आश्चर्य वाटलें. लुटालुटीपुरतें पाहिल्यास इंग्रजांना ही निर्जनता फायदेशीर होती. त्यांच्या लुटीला अगदीं मोकळें रान सांपडलें. लुटीकरितां शहराच्या बोळ-गल्ल्यांतून भटकतांना एखाद्या आडजागीं किंवा तळघरांतून म्हातारे, बाया, मुलें, अशीं माणसें भेटत; पण पाळीव पशुपक्षी हे मात्र इतस्ततः इंग्रजांच्या हटकून दृष्टीस पडत. मांजरें, माकडें, कुत्रीं आणि पिंजऱ्यांत मरून पडलेलीं पांखरें, यांनीं इंग्रजांच्या नजरेला कौतुक पुरविलें. घरें खणून ओरबाडून जी लूट जमविली जात असे, तिचें आकर्षण व कौतुक इंग्रजांना किती वाटत होतें याचा पाढा अन्यत्र वाचावयाचा आहे.

दिल्लीच्या पाडावानें शिपाई-गर्दीचें कंबरडें मोडावें इतकें त्याचें महत्त्व होतें; म्हणून कलकत्ता, लाहोर येथील वरिष्ठ इंग्रज अधिकारी दिल्लीसमोरील फौजेनें तें शहर लवकर पादाक्रान्त करावें अशी निकड लावून तेथील सेनाधिकाऱ्यांना पुनः पुनः लिहीत होते. ता. १५ जुलई या तारखेला कलकत्त्याहून दिल्लीस धाडलेल्या एका खलित्यामध्यें गव्हर्नर-जनरलानें दिल्ली लवकर न पडल्यास जे दुष्परिणाम होतील ते स्पष्ट केले आहेत. ‘ हिंदुस्थानाचा फार मोठा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालून गेला आहे. आपल्या राज्याचा द्वेष व प्रतिकार वाढत असून दिल्लीचा कबजा घेतल्याची व तेथें आपलें राज्य स्थापन झाल्याची खात्री लोकांस लवकर न पटवितां आली तर बंडाची साथ देशाच्या अंतिम सीमेपर्यंत जाऊन पोंचेल. दिल्ली हें बादशाहीचें स्थळ असून तेथें आपली फौज व प्रजा आपल्या विरुद्ध यशस्वी रीतीनें लढत आहे, या वस्तुस्थितीनें ब्रिटिशांच्या सामर्थ्याचा पाया हादरवून सोडला आहे. यासाठीं दिल्ली जिंकण्याची जेवढी त्वरा कराल तेवढी कमीच ठरेल, ’ असा त्या खलित्यांतील कांहीं वाक्यांचा मथितार्थ आहे. दिल्लीच्या पाडावाची गव्हर्नर जनरलानें वर्णिलेली महती कशी खरी होती, याचा प्रत्यय तें शहर इंग्रजांच्या हातीं गेल्यापासून येऊं लागला. मग दिल्ली ते कानपूर पर्यंतच्या मुलखांत शिपायांचा पाय कुठेंच ठरला नाहीं. ते इंग्रजाच्या प्रतिकाराला ठायीं ठायीं उभे राहात, लढाई करीत, पण माणसें हत्यारें गमावून पळ काढीत. त्यांना एक अयोध्येच्या नबाबशाहीचा प्रदेश व रोहिलखंड हीं दोन आश्रय स्थानें उरली होतीं.

* * *

~ 3 ~

# कानपूर व लखनौ

वस्तुतः लखनौच्या भागांत शिपाई-गर्दीला कानपूरच्या आधीं सुरुवात झाल्यामुळें तेथील घडामोडींची हकीकत प्रथम सांगून मग कानपुराकडे दृष्टिक्षेप करणें आधिक शास्त्रीय असलें तरी लखनौमध्यें कोंडलेल्या इंग्रज स्त्री-पुरुषांची सुटका करूं इच्छिणाऱ्या गोऱ्या फौजेचा कानपुरास मुख्य तळ असल्यानें कानपूरचें कथानक अगोदर संपविणें जास्त सोयीचें आहे. लखनौच्या मानानें कानपूरची शिपाई-गर्दी थोड्या दिवसांत आटपली. लखनौच्या धामधुमीचा काळ मोठा आहे. तेथें जूनपासून नोव्हेंबरअखेरपर्यंत (१८५७) लढायांचा पहिला फेरा सुरू होता. नंतर मार्चमध्यें (१८५८) तें शहर शिपायांच्या तावडींतून इंग्रजांनीं मोकळें केलें. कानपुरास जूनच्या प्रारंभापासून जुलईच्या मध्यापर्यंत तेथें इंग्रजी सत्तेच्या अभावीं जारी झालेल्या पेशवाईचा सगळा खेळ निकालांत निघाला. यासाठीं कानपूरची माहिती नजरेखालीं घालण्यांत एक प्रकारें औचित्य आहे.

कानपूर हें ठिकाण लष्करीदृष्ट्या महत्त्वाचें आहे असें ओळखून क्लाइवनें तें उद्यास आणलें. दिल्ली, आग्रा, मथुरा, लखनौ, बनारस किंवा अलाहाबाद या शहरांना तीर्थ अथवा राजधानी या नात्यानें लोकांत बहुत काळापासून जो कीर्तिगौरव लाभला होता, त्या गौरवाची पात्रता कानपुराला कधींच लाभली नव्हती. पण लष्कर आणि व्यापार या दोन कारणांनीं १८५७ सालीं तें शहर प्रख्यातीस चढलें होतें. त्याच्याजवळचें बिठूर किंवा ब्रह्मावर्त याचा कदाचित् गंगेकांठचें तीर्थ म्हणून किरकोळ मान असेल, पण

पेशव्यांचे दुसरे बाजीराव यांना इंग्रजांनीं तेथें वस्तीस नेल्यानंतर त्याचीहि प्रतिष्ठा थोडी वाढली. १८५७ मध्यें कानपूरच्या शिपाई-गर्दीला बाजीरावाचे दत्तक पुत्र धोंडोपंत–नानासाहेब यांनीं सनाथ केलें, अशा योगायोगानें कानपुराबरोबर विठूरहि त्या वर्षाच्या रणधुमाळींत गाजून उठलें.

बाजीराव पेशवे १८५१ सालीं निधन पावल्यावर त्यांच्या चिरंजीवांनीं बापाचा तनखा आपल्यास मिळावा अशी कंपनी सरकाराकडे मागणी केली. कंपनी सरकारानें त्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. नानासाहेबांनीं आपलें गाऱ्हाणें विलायतेस पोंचविण्यासाठीं अझीमुल्ला नांवाचा एक हस्तक पाठविला (१८५४). तो जसा गेला तसा हात हालवीत स्वदेशीं परत आला. १८५६ सालीं क्रिमियामध्यें रशियाशीं जुंपलेल्या युद्धांत इंग्लंडची स्थिति पाहण्यासाठीं अझीमुल्ला तेथें गेला होता आणि १८५७ तील शिपाई-गर्दीच्या प्रसंगीं तो आपल्या धन्यापाशीं कानपूर-विठूरला होता वगैरे वृत्तान्त सर्वांच्या परिचयाचा आहे. १८५७ च्या जुलईनंतर तो जो अदृश्य झाला तो पुनः कुठें दिसलाच नाहीं. पण नानासाहेबांचा तो विश्वासू सल्लागार असल्याची नोंद कानपूर येथील धामधुमीच्या चौकशींत बरेच वेळां सांपडते. नाना व अझीमुल्ला यांच्या कामगिरीचें निरीक्षण करण्यापूर्वीं कानपुराच्या छावणींतील गडबडीचा कानोसा घ्यावा हें बरें.

मीरत दिल्लींतील दंगलीच्या वार्ता ता. १४ मे रोजीं कानपुरास सर्वतोमुखीं पसरल्या आणि तेथील अधिकाऱ्यांना व रहिवाशांना पुढें काय या प्रश्नाच्या चिंतेनें घेरलें. शिपायाची अस्वस्थता उतास चढली. लखनौचे शिपाई बेकैद होत चालल्याच्या बातम्या कानपुरास समजण्याला उशीर लागत नव्हता. तेथें एका वेळीं दिसलेला आज्ञाभंग अधिकाऱ्यांनीं मोडून काढला, पण ३० मेच्या रात्रीं शिपायांनीं रक्तपात, जाळपोळ, लुटालूट या प्रकारांनीं मीरतचें अनुकरण आचरलें. त्याच वेळीं कडव्या मुसलमानांनीं पैगंबराचा झेंडा उभारून शहरांत दंगा माजविला. पण शहरच्या पोलिसांनीं मुसलमानांना ठोकून काढलें. तिकडे छावणींत अधिकाऱ्यांनीं बेशिस्त शिपायांना झोडपून पळतां भुई थोडी करून सोडली. कानपुरास जूनच्या प्रारंभापर्यंत शिपायांचीं खलबतें चालत होतीं. ते इंग्रज अधिकाऱ्यांच्या जीवावर व पर्यायानें सत्तेच्या मुळावर आज ना उद्यां उठणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसत

होतीं. हीं चिन्हें विचारांत घेऊन लष्करी अधिकाऱ्यांनीं आपल्या बचावाच्या योजना आंखल्या. त्यांनीं शिपाई उठतील तेव्हां त्यांच्याशीं लढण्याकरितां एक सोयींची जागा नेमून टाकली; परंतु खजिन्याच्या रखवालीचा विश्वास नानासाहेबांवर टाकल्यामुळें शिपाई-गर्दीच्या उठाठेवींत त्यांना उघड महत्त्वाचें स्थान मिळालें. नानासाहेबांचा तनखा बंद केला तरी ते सधन होते. हत्ती, घोडे, हत्यारबंद शिपाई वगैरे सरंजाम त्यांच्याजवळ होता. कानपूरच्या गोऱ्या अधिकाऱ्यांची कल्पना अशी कीं, नानासाहेबांची मराठा जातीची शिबंदी उत्तर भारतीयांशीं फटकून वागणारी असेल व यामुळें या दोघांचें मेथकूट जमण्याची शक्यता नाहीं, अर्थात् आपलें द्रव्य सुरक्षित राहील. नानासाहेबांनीं खजिन्याच्या रक्षणासाठीं आपले शिपाई पाठविण्याचें कबूल करतांना इंग्रजांबद्दल फार आस्था दाखविली, त्यायोगानें इंग्रज फसले, असा नानांवर इंग्रज लेखकांचा आरोप आहे.

परंतु नानासाहेब शिपायांच्या कारस्थानांत फार खोल शिरलेले होते, असाहि पुरावा शिपाई-गर्दी शमल्यावर अधिकृत चौकशींत पुढें आल्याचें आंग्ल इतिहासलेखक तडफडीनें सांगतात. नानासाहेबांकडे शिपायांचे पुढारी वारंवार जात येत होते, त्यांची उठावणीच्या धोरणाविषयीं चर्चा चालत असे, असा मजकूर चौकशीच्या जबान्यांतून बाहेर आलेला आहे. इतकें मात्र खरें कीं, शिपाई उठल्यावर त्यांच्याशीं नानासाहेब पूर्णपणें समरस होऊन वागले. ता. ४ जूनच्या रात्रीं एका इंग्रजानें दारूच्या धुंदींत शिपायावर गोळी झाडली हें निमित्त शिपायांना सांपडलें. ता. ५ जूनला शिपायांनीं आपली राज्यनिष्ठा पायाखालीं तुडविली आणि दिल्लीकडे मोर्चा वळविला. तात्या टोपे यांच्या जबानींत नमूद आहे कीं, तात्या व इतर कांहीं ठळक माणसें यांसह नानासाहेबांना शिपायांनीं आपल्याबरोबर कैद्याप्रमाणें नेलें. कानपूरजवळच्या पहिल्या मुक्कामांत कानपुरास परत जाऊन गोऱ्यांचें निस्संतान करावें, ही कल्पना शिपायांच्या मनांत भरवून नानांनीं त्यांना माघारी फिरविलें, हें जसें इतिहासांत दाखल आहे, तसेंच नानासाहेब शिपायांकडे गेले नव्हते, त्यांनीं शिपायांच्या मागोमाग परंतु नफानुकसानीच्या साधकबाधक विचारान्तीं स्वतः जाऊन त्यांच्यावर मनधरणीचा व लांचलुचपतीचा प्रयोग करून त्यांना कानपुरास बोलावून घेतलें असेंहि इतिहासाचें म्हणणें आहे. नानासाहेबांना दिल्लीस जावयाचें नव्हतें. दिल्लीस बादशहाच्या बडेजावीसमोर आपलें स्वतंत्र तेज

पडण्याची आशा नाहीं, कानपुरासच पेशवाईचा सवता सुभा उभारण्यांत जास्त फायदा आहे, त्यासाठीं शिपायांचें साह्य अवश्य, अशा तऱ्हेचे विचार नानासाहेबांच्या अंतरंगांत जोरावण्याचा संभव सयुक्तिक आहे. त्यांस अनुसरून नानांनीं शिपायांचें अग्रणीत्व स्वीकारलें. इतिहासांतील प्रस्तुत आशयाचा मजकूर पाहतांना नानासाहेबांविषयीं शिपायांच्या ठिकाणीं आपले-पणाची भावना अगदीं जुजवी होती याबद्दल शंका राहात नाहीं. त्यांना बादशाहीचें आकर्षण अधिक होतें. म्हणून त्यांनीं या विठूरच्या महाराजांना आधीं आपल्याबरोबर दिल्लीस नेण्याचा घाट घातला व नंतर पेशवाईसाठीं नव्हे तर गोऱ्यांना निर्वीज करून सोडण्याच्या ईर्ष्येनें दिल्लीकडे पाठ फिरवून कानपुरास येणें केलें. शिपाई कानपुरास आल्यानंतर नानासाहेबांच्या महत्त्वाकांक्षा मोहोरल्या.

नानासाहेबांनीं ता. ६ जून रोजीं पूर्वनियोजित संरक्षणाच्या जागीं लढाईच्या तयारीनें राहिलेल्या गोऱ्या लोकांना आपण हल्ला करणार असल्याचा संकल्प कळविला व गोळीबाराला प्रारंभ केला. लढाऊ गोरे सैनिक शिपायांच्या पासंगासहि न लागण्याइतके थोडे होते. त्यांच्यावर बायकांमुलांच्या संरक्षणाचा बोजा होता, दारूगोळा, दाणागोटा यांचा पुरवठा बेताचा होता. तथापि आल्या भोगाला गोरे लोक सादर होऊन जीवाच्या करारानें २१ दिवस लढले. शिपाई आपला जीव राखून लढत होते. दर दिवशीं माणसें मरत आहेत; घरें भस्मसात् किंवा जमीनदोस्त केलीं जात आहेत, खायला अन्नाचा तुटवडा, पाण्याच्या विहिरीवर सारखा भडिमार चालू असल्यानें जीव धोक्यांत घालून तें मिळवावें लागे; उन्हाळ्याच्या क्लेशांना मर्यादा नव्हती, अशा विपत्तींत सुद्धां गोरे लढवय्ये हार जात नाहींत आणि अधिक दिवस दवडावे तर अलाहाबादेहून कानपुराकडे गोरी फौज चालून येण्याचें भय वाढत होतें, तेव्हां कानपूरच्या गोऱ्यांशीं समेटाचें बोलणें करण्याचा डाव नानासाहेबांनीं स्वयंप्रेरणेनें किंवा शिपायांच्या आग्रहानें टाकला आणि ता. २५ रोजीं तसें एक पत्र गोऱ्यांकडे आलें. गोरेसुद्धां लढाईला कंटाळले होते. नानासाहेबांकडे समेटाची वाटाघाट करावी, असें या सुमारास गोऱ्यांनादेखील वाटूं लागलें होतें. नानासाहेबांकडून प्रथम या संबंधांत सूतउवाच व्हावें, ही गोऱ्यांना दैवाची कृपा भासली. नाना-साहेबांचें पत्र अज्ञीमुल्लाच्या हातचें होतें व पत्र नेणारी व्यक्ति शिपायांच्या कैदेंतली एक इंग्रज बाई होती. पत्राचा मजकूर मासलेवाईक होता. 'व्हिक्टोरिया

राणीच्या प्रजाजनास, डलहौसीच्या कारवायांशीं ज्यांचा संबंध नसेल त्यांना हत्यारें टाकल्यास अलाहाबादेस सुखरूप जातां येईल.' असा पत्राचा आशय होता. लढाऊ गोऱ्यांना आपल्या मृत्यूची क्षिति वाटत नव्हती. 'आपण पिंजऱ्यांतल्या उंदराप्रमाणें खास मरणार नाहीं,' 'प्रतिपक्षाच्या प्राणांची भरपूर किंमत वसूल केल्याशिवाय आपण आपला जीव गमावणार नाहीं' असा विश्वास गोऱ्यांना होता; परंतु बायकामुलांचे हाल थांबविण्याच्या हेतूनें त्यांनीं नानासाहेबांच्या पत्राचा मान केला. गोऱ्यातर्फे असें कळविण्यांत आलें कीं, 'हत्यारें सोडणार नाहीं; बायकामुलांना वाहनें पुरविण्यांत यावीं' वगैरे. याप्रमाणें ता. २६ जून रोजीं गोळीबार बंद होऊन कराराचें बोलणें चालू राहिलें. नानासाहेबांनीं गोऱ्यांच्या अटीला संमति देतांना त्या रात्रीं गोऱ्यांनीं आपली जागा रिकामी करावी, असें कळविलें. 'उद्यां सकाळपर्यंत निघण्याची तयारी होणार नाहीं,' असा गोऱ्यांचा जबाब गेल्यावर नानाचा पक्ष हट्टास पेटला व इंग्रजांनीं रात्रीं मुक्काम सोडायचा नाहीं, हा निश्चय कायम ठेवला. तेव्हां ता. २७ च्या सकाळपर्यंत हें प्रकरण लांबणीवर टाकण्याला नानासाहेबांनीं मंजुरी दिली. मग उभयपक्षीं एकमेकांकडे माणसें ओलीस ठेवण्यांत आलीं. सव्वा लाख खजीना व तोफा यांचा कबजा नानासाहेबांनीं घेतला. गंगेच्या घाटावर नावा जमविण्यांत आल्या. ता. २७ च्या सकाळीं गोरे लोक नावापर्यंत पोचले. घाटावर इंग्रजांचें महाप्रस्थान पाहण्यासाठीं दहा हजारांचा जमाव उभा होता. नावांत गोरीं माणसें चढतांच विश्वासघाताच्या पूर्वसंकेतानुसार नावाड्यांनीं बाहेर उड्या टाकल्या. एवढ्यांत कत्तलीच्या इशाऱ्याचें वाद्य वाजलें. पूर्व संकेतानुसार पेशव्यांच्या तोफांचे तीन बार निघाले आणि शिपायांच्या बंदुकांनीं त्याची साथ नदीकांठावर आरंभिली. कत्तलीची वातमी नानासाहेबांच्या कानीं गेल्यावर 'बायकांमुलांच्या संहाराची गरज नाहीं' असा हुकूम सुटला व १२० बायकामुलें वांचविण्यांत आलीं. या कत्तलींतून सुटलेल्या कांहीं नावा फत्तेपुरास पकडून त्यातलीं सुमारें ११५माणसें बैलगाड्यांनीं कानपुरास पाठविण्यांत आलीं. ता. १ जुलैला त्यापैकीं सुमारें ७५ पुरुषांना शिपायांनीं ताबडतोब ठार मारलें आणि बायकांमुलांना कैदखाना दाखविला. इतक्या अनर्थांतूनहि पुरुषांतले चार आसामी बचावले व त्यांतल्या एकानें लिहिलेली 'कानपूरची कथा' शिपाई-गर्दीच्या साहित्यांत प्रसिद्ध आहे. नानासाहेबांनीं ता. २७ जूनच्या संध्याकाळीं आपल्या तमाम फौजेची पाहणी केली. त्या वेळीं

शिपायांची प्रशंसा त्यांनीं मुक्तकंठानें गाइलीं व सर्वांनीं आपापल्या निवास-स्थानीं प्रयाण केलें.

वांचविलेल्या बायकांमुलांना प्रथम एका घरांत व नंतर कुप्रसिद्ध बीबी घरांत बंदोबस्तानें ठेवून नानासाहेबांनीं ता. १ जुलईच्या दिवशीं बिठूरास आपण पेशवे झाल्याचा समारंभ तोफांच्या गडगडाटांत मोठ्या थाटानें साजरा केला. नंतर दोन दिवसांनीं ते कानपुरास आले व एका हॉटेलांत त्यांनीं आपली पेशवाई सुरू केली. ता. ५ जुलै रोजीं कानपुरास बिठूरच्या समारंभाची आवृत्ति करण्यांत आली. त्यांच्या कारभाराचे जाहीरनामे व हुकुमाचे कागद इंग्रजी साहित्यामध्यें पाहायला सांपडतात. त्यावरून नानासाहेबांना जगांतील राज-कारणाचें व इंग्रजांच्या सामर्थ्याचें ज्ञान फारसें किंवहुना मुळींच नव्हतें, असें म्हणावें लागतें. 'तुर्की सुलतानाकडून तंवी मिळाल्यामुळें इजिप्तच्या बादशहानें अलेक्झांड्रिया बंदरांत इंग्लंडहून आलेलीं गोऱ्या लष्करांचीं जहाजें बुडविलीं. गोऱ्याचें हिंदुस्थानांत कुठेंहि नांवनिशाण उरलेलें नाहीं.' 'आतां स्वराज्य स्थापन झालें असून पूर्वींच्या राजवटींतील आपापला कारभार ठिकठिकाणच्या अंमलदारांनीं आमच्या सत्तेखालीं सुखानें निर्धास्तपणें करावा,' वगैरे मतलबाचे जाहीरनामे व हुकूम आहेत. 'तुमची मर्दुमकी आमच्या सरकाराकडे रुजू असून योग्य वेळीं तुमच्या कामगिरीची संभावना होईल.' 'आम्ही लखनौस फौजा पाठवीत असून त्यांची सरबराई लखनौचा कोतवाल करील. त्यानें हयगय केल्यास त्याला जबर शिक्षा देऊन पुनः तसा चुकारपणा करण्याला कोणी धजणार नाहीं, अशी दहशत बसवूं. तुम्ही सर्वांनीं पराक्रम गाजवून खिस्त्यांना नरकाची वाट दाखवावी. आम्ही अलाहाबादेस जाणार आहों.' असे संकल्प एक दोन पत्रांतून पाहायला सांपडतात. कित्येक पत्रें नानासाहेबांना माणसें ठार करण्याची किती आवड होती तें दाखवून देतात. एक दोन पत्रें लष्करी कारभार, अधिकार व अधिकाराचे पगार यांच्या स्पष्टीकरणाचीं आहेत. एक पत्र ता. २६ जूनच्या रात्रीं लिहिलेलें असून त्यांत दुसऱ्या दिवशीं करावयाच्या कत्तलीचा तपशील आहे. सदर पत्रांच्या आधारें नानासाहेबांच्या ज्ञानाबद्दल व कर्तृत्वाबद्दल थोडासा अंदाज करतां येतो.

या नव्या पेशवाईंत कानपूरचे सधन रहिवासी लुटले गेले, नानासाहेबांच्या इतराजींतील माणसें कैदेंत पडलीं, लुटीच्या वांटणीबद्दल यांचे आपसांत तंटे-बखेडे माजले, हिंदु-मुसलमानांच्या वैमनस्यानें डोकें वर काढलें, असें थोड-

९९८७



क्यांत कानपुरांतील बजबजपुरीचें इतिवृत्त आहे. या पेशवाईचा व्याप बिठूर-कानपूरच्या पंचक्रोशीपलीकडे फारसा पसरलेला नव्हता. पेशवाईच्या झेंड्याखालीं जमलेले आसपासचे जमीनदार एकमेकांतील जुन्या हेव्यादाव्यांच्या मारामारींत गुंतले होते. पेशवाईकडे त्यांचें लक्ष नव्हतें. कदाचित् त्यांतले कांहीं ता. १० ते १५ जुलईच्या दरम्यान इंग्रजांशीं नानासाहेबांना कराव्या लागलेल्या लढायांत आपल्या लोकांनिशीं सामील झाले असतील, पण त्यांचें शौर्य लखनौच्या धकाधकींत जास्त कामास आलें. नानासाहेबांच्या पेशवाईचें आयुर्मान पाहावें तर तें पंधरवड्याहून जास्त काळाचें नव्हतें. पेशवाईच्या नांवानें तात्या टोपे व झांशीच्या राणीसाहेब यांनीं अनुक्रमें वर्ष दोन वर्षें पराक्रम चालविला होता. पण त्यांत प्रत्यक्षपणें नानासाहेब कुठेंहि हजर नव्हते. अलाहाबादेकडून आलेल्या फिरंगी फौजांनीं पेशवाईच्या सैन्याला पिटून तिचा दरारा कानपूर भागांतून जो उखडून टाकला तो कायमचाच. नानासाहेबांना गोरें लष्कर कानपुरावर येत असल्याची बातमी ता. ५ जुलईला होती. नानांचें लष्कर त्यानंतर त्या गोऱ्या लष्कराच्या समाचाराला निघालें. त्या लष्कराचा नियंता वाटेंत खेडीं उध्वस्त करीत आहे, जो दिसेल त्याला रस्त्यालगतच्या झाडावर टांगून मारीत आहे, या बातम्यांनीं कानपूरच्या रहिवाशांचें धाबें दणाणलें. ते आसपासच्या खेड्यांतून पळून जाऊं लागले तर खेड्यांच्या वस्तीनें रान धरलें. पेशवाईच्या इभ्रतीखातर ही धावपळ आवरणें नव्या पेशव्यांना अवश्य होतें. शत्रूचा पराभव हाच एक लोकांच्या विश्वासाचा उपाय होता. शत्रूची संख्या मूठभर असल्याच्या वार्तेनें पेशव्यांना हिंमत चढून शत्रु नामोहरम करण्यासाठीं त्यांच्या वतीनें कानपुराहून मोठी फौज रवाना करण्यांत आली. शत्रूचें बळ कोतें असल्याची बातमी खोटी नव्हती, पण तें वाढल्याचा बनाव कानपुरास कळलेला नव्हता. याबाबतींत जेव्हां सामन्याची वेळ आली तेव्हां कानपूरवाल्यांचे डोळे उघडले. मुठभर शत्रु हां हां म्हणतां गारद करूं या समजुतीचा आवेश शत्रूची गांठ पडून त्याचा मोठा जमाव दिसल्यावर गारठला व शिपायांचें दळ सावधपणानें लढाईला सज्ज झालें. अलाहाबादेहून निघालेल्या पहिल्या सेनेला दुसरी जास्त मनुष्यबळाची सेना येऊन मिळाली होती. या दुणावलेल्या फौजेचा म्होरक्या हिंदुस्थानांतल्या व या देशाबाहेरच्या लढाया मारून आलेला एक कसलेला योद्धा होता. त्याचें नांव हेन्री हेवलॉक. पहिलें व दुसरें

हीं दोन्हीं दळें कानपुरांतील इंग्रजांना सोडविण्यासाठीं अतिशय तांतडीनें निघालीं होतीं. वाटेंत पहिल्या लहान दळाला कानपूरच्या कत्तलीचें वर्तमान कळलें, तेव्हां त्याचा त्वेष वाढला, पण त्यानें थांबावें असा अलाहाबादेहून आदेश आल्यामुळें त्वेष व त्वरा दाबून तो मागून येणाऱ्या दळाची वाट पाहात राहिला. तें दळ मागोमाग येतच होतें. दोन्ही दळें एकवटल्यावर त्यांची व कानपूरवाल्यांची गांठ प्रथम ता. १२ जुलई रोजीं पडली. गोरे योद्धे जिवाची पर्वा न ठेवतां पण कौशल्यानें लढत होते, तर काळे शिपाई प्राणाची आशा बाळगून लढले. आपलें शौर्य शत्रूवर मात करण्याला असमर्थ आहे, असें वाटूं लागतांच तोंड फिरवून शक्य तेवढ्या वेगानें पाय चालविण्याची शिताफी दाखविण्याला कानपूरवाल्यांनीं फारसा वेळ लावला नाहीं. पहिल्या १० मिनिटांतच लढाईचा निकाल निदर्शनास आला. हेवलॉकच्या तोफखान्यांत अचूक गोलंदाजीचा एक अंमलदार होता. त्याच्या तोफांनीं शिपायांची दाणादाण उडविली आणि नंतर पळ व पाठलाग हा प्रकार कित्येक तास चालू राहिला. कानपूरवाल्यांनीं तडक आपलें कानपुराकडील ठिकाण गांठलें. 'फत्तेपूरची लढाई' या नांवानें हा प्रसंग इतिहासांत ओळखला जातो. या शहरांत शिपायांनीं लूट, खून हीं कृत्यें केलीं असल्यामुळें शिक्षेदाखल तें शहर लुटण्याची गोऱ्या लष्कराला परवानगी देण्यांत आली. या लढाईंत शिपायांचा सेनापति चांदीच्या अंबारींत हत्तीवरून आला होता. तोफेच्या गोळ्यानें तो हत्ती पडला. शिपायांच्या पळाला या दुर्दैवामुळें आणखी एक निमित्त सांपडलें.

फत्तेपूरच्या लढाईनंतर दोन जागीं झुंज करून हेवलॉक कानपूरच्या हद्दीस पोचला. या लढायांत शिपाई गाफीलपणानें वागले नाहींत, परंतु विजयश्रीची माळ गोऱ्यांच्या गळ्यांत पडली. कानपूरच्या युद्धाचा व्यूह शिपायांनीं मोठ्या कौशल्यानें रचला होता. त्यांच्याजवळ तोफा पुष्कळ होत्या. तथापि हेवलॉकनें त्यांच्या संख्याबळाची, शस्त्रबळाची व निसर्गरक्षित स्थळाची आढ्यता मोडून काढली. या वेळीं नानासाहेब लढाईच्या मैदानावर जातीनें हजर होते, त्यांचा पोषाख चमकदार भरजरीचा होता अशी एका इंग्रजाची ग्वाही आहे. लढाईला तोंड लागतांच हेवलॉकच्या दळानें निकराचे एकामागून एक हल्ले चढवून शत्रूकडील जागजागच्या तोफा हस्तगत केल्या व कानपूरवाल्यांच्या आश्रयाचीं खेडीं मारलीं. शेवटीं झुंजांत निभावण्याची

अशक्यता जाणून पेशव्यांच्या फौजांनीं आपला परिचित उपाय म्हणजे पळ, तो अंगीकारला. पण नानासाहेबांनीं आणखी एकदां निर्वाणीचा प्रयत्न करून पाहण्याचें ठरविलें. शिपायांचा एक जमाव सैरावैरा उधळला तरी नवा जमाव उभा करण्याला त्यांच्यापाशीं भरपूर शिपाई होते. शिलकी तोफा हव्या तेवढ्या होत्या. दारूगोळा मुबलक होता. त्यांचा उपयोग या वेळीं नानासाहेबांनीं करून पाहिला. नानासाहेब आपला नवा संकल्प मूर्तावस्थेस आणून विश्रांतींत गुंगलेल्या गोऱ्या लष्कराजवळ बिनबोभाट पोंचले. पेशव्यांच्या सेनेची चाहूल लागतांच गोरे खडबडून उठले तों त्यांच्या रोखानें तोफांचे गोळे आदळून उडूं लागले होते. क्षणाचाहि विलंब न लावतां हेवलॉकनें आपली फौज पेशव्यांच्या सैनिकांवर लोटली. पुनः एकदां सामना जुंपला. पेशव्यांच्या तोफांची मारागिरी परिणामकारक होती. तथापि पूर्वीसारखाच लढाई अंगावर उलटल्याचा अनुभव नानासाहेबांना आला. लढाई फिसकटतांच नानासाहेब व त्यांचे सैनिक या सर्वांनीं कानपुराला राम राम ठोकला. पेशवे बिठूरास गेले. जातांना त्यांनीं कानपुरांतील दारूचें कोठार जाळलें. ता. १७ रोजीं हेवलॉकनें कानपूर शहर ताब्यांत घेतलें.

ता. १० पासून हेवलॉकचे सैनिक अविश्रान्तपणें कानपूरच्या दिशेनें ज्या उमेदीनें लढत होते ती उमेद कानपूर गांठल्यावर गोठून तिची जागा सूडाच्या क्रूर भावनेनें बळकावली. कानपुरास गोरीं बायकामुलें पेशव्यांच्या तुरुंगांत आहेत, त्यांची सुटका हें पूर्वीच्या उमेदीचें कारण होतें. ता. १५च्या पराभवानंतर हे सर्व कैदी ठार करण्याची मसलत नानासाहेबांच्या सल्लागारांनीं नानांच्या डोक्यांत भिनवून त्यांच्या हुकमानें तो दिवस संपतांना ती कृतींत उतरविली. पेशव्यांच्या कानपुरांतील राहत्या जागेशेजारीं बायकामुलांच्या कैदेचें 'बीबीघर' हेंच मुख्य ठाणें होतें. शिपायांनीं तेथील कैद्यांपैकीं पुरुषांना बंदुकीच्या गोळ्यांनीं आधीं लोळविलें. पण त्यांनीं बायकांमुलांवर गोळ्या झाडण्याचें नाकारलें. पेशव्यांच्या मराठ्या बारगिरांनीं तोच मार्ग पत्करला, तेव्हां गांवांतल्या पांच हिंदुमुसलमान खाटकांकडे ही कामगिरी नानासाहेबांच्या एका रखेलीमार्फत सोपविण्यांत आली. त्यांनीं ती पेशव्यांच्या मनाप्रमाणें पार पाडली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शेजारच्या एका कोरड्या विहिरींत हीं छिन्नभिन्न शरीरें शिपायांनीं भंग्याकरवीं फेकून दिलीं. तेव्हां जीं चार सहा बायकामुलें जीवंत राहिलीं होतीं त्यांना विहिरींत लोटून इंग्रज निर्बीज केल्याचें समाधान

शिपायांनीं मिळविलें. बीबीघरांतला रक्तामांसाचा चिखल आणि विहिरींतलीं प्रेतें पाहून गोऱ्या सैनिकांचा संताप अनावर झाला व त्यांनीं सोयीनें सांपडले त्या काळ्या आदमींचा मुडदा पाडण्याचें व्रत स्वीकारलें. लूट, हत्या, यांहून परस्परसहकारी गोऱ्या काळया लढवय्यांच्या शिस्तीला जास्त बाधणारी वस्तु म्हणजे दारू. हेवलॉकनें शहरांतील सगळी दारू खरेदीनें एकत्र जमवून सक्त पहाऱ्यामध्यें ठेवली, तेव्हां दारूबाजीची अंदाधुंदी आटोक्यांत आली. एकदां लढाईचे वाटेवर दारूची तलफ भागविण्याकरितां आपल्याच दाण्यागोट्याच्या विभागावर हात टाकण्याचा अतिप्रसंग सैनिकांनीं केल्याची नोंद हेवलॉकच्या एका पत्रकांत आहे. दारूचा कैफ व सूडाची भावना यांच्या मिलाफापायीं गोरे सोजीर कानपुरास कसे वागले असतील त्याचा अंदाज सोपा आहे.

नानासाहेब बिठूरला पांच हजार शिपाई तीसचाळीस तोफा जमवून कानपुरावर चाल करण्याच्या तयारींत आहेत अशी किंवदन्ती हेवलॉकला समजल्यावरून त्यानें बिठूरची विश्वसनीय रीत्या माहिती मिळविली तेव्हां त्याला बिठूरहून नानासाहेब गंगापार गेल्याची वस्तुस्थिति समजली. या वस्तुस्थितीचा तपशील असा आहे कीं, नाना कानपुराहून आपला घोडा बेफाम दौडवीत बिठूरास गेले. तेथें त्यांनीं आपले जवळचे नातेवाईक गोळा केले. जडजवाहिरांनीं गांठोडीं बांधलीं. नंतर रात्र पडूं लागल्यावर नातेवाईक आणि जडजवाहीर घेऊन ते एका प्रशस्त नावेंत जाऊन बसले. जातांना नदीप्रवाहाच्या मध्यभागीं खोल पाणी पाहून नावेसकट बुडून मरायचें अशी आपली आकांक्षा मागें राहणाऱ्या आश्रितांजवळ त्यांनीं उघड केली होती. त्याप्रमाणें नानासाहेब निघाले. नदीकांठ सोडतांना नावेंत जे मिणमिणते दिवे ठेवले होते, त्यांचा उजेड प्रवाहांत लांब अंतरावर दिसेनासा होतांच नानासाहेबांनीं देहविसर्जन केलें अशा खात्रीनें कांठावर निरोप देण्यासाठीं आलेल्या आश्रितांचा समुदाय परतला. या परतलेल्या जमावानें बिठूरच्या वाड्यांतील उपयोगाचे जिन्नस आपल्या घरीं लगबगीनें नेले, अशी एका इंग्रजाची माहिती आहे. बिठूरास नानासाहेब नाहींत असें निश्चित कळून देखील तेथें हेवलॉकनें एक लष्करी तुकडी पाठविली; तिला पेशव्यांचा वाडा लुटण्याबद्दल हुकूम होता. पण फ्रेंच व देशी बनावटीच्या तोफांशिवाय या तुकडीला दुसरी महत्त्वाची लूट मिळाली नाहीं. युरोपियनांच्या वापरांतले पुष्कळसे वेगवेगळे पदार्थ मात्र वाड्यांत जिकडे तिकडे पसरले असलेले

23233 क्रां ....१००.८...... नों: दि: ......

त्यांनीं पाहिले. वाडा द्रव्यदृष्ट्या निर्लेप असल्याचें पाहून गोऱ्या तुकडीनें वाड्याची मोडतोड केली आणि मिळालेल्या तोफांसह कानपूरचा रस्ता धरला. जुलईच्या फेरींत बिठूरला पेशव्यांची धनदौलत इंग्रजांना सांपडली नाहीं. पण तेथील एका खोल पाण्याच्या विस्तीर्ण विहिरींत नानासाहेबांनीं तीस लाखांची रोकड टाकल्याचा सुगावा इंग्रजांना लागून त्यांनीं ती रोकड बाहेर काढली. १८५७ च्या डिसेंबरांत कडक थंडीमध्यें ता. १५ ते २६ याप्रमाणें दहा दिवस अहोरात्र रुपये उपसण्याचें काम सोजरां-मार्फत चाललें होतें. रुपयांबरोबर आणखी चांदीसोन्याचे रत्नजडित जिन्नस पुष्कळच सांपडले. ज्यांनीं हें काम केलें त्या शिपायांना त्या रकमेंतून चांगलें घसघशीत बक्षीस मिळण्याची आशा होती, परंतु सरकारानें ती रक्कम आपल्या तिजोरींत दडपली. विहिरींत खपलेल्या सोजरांना एक छदामहि मिळाला नाहीं. सरकारच्या कृतघ्न कृपणतेवर रागावलेल्या एका इंग्रजानें हा वृत्तान्त लिहून ठेवला आहे.

नानासाहेबांचा येथें निरोप घेण्यापूर्वीं कानपूर येथील गोऱ्या बायका-मुलांच्या कत्तलीबद्दल थोडेंसें साधक-बाधक पाहिलें पाहिजे. कानपूरच्या वेढ्यांतील बायकांबरोबर फत्तेगड येथून पळून चाललेल्या गोऱ्या स्त्रीपुरुषां-पैकीं बऱ्याच स्त्रिया कानपूरच्या बायकांमध्यें होत्या. इंग्रजी इतिहासांतून या सर्वांची संख्या २०६ एवढी दिलेली आढळते. कैदेंत असतांना अन्न-पाण्यासंबंधांत त्यांचे पुष्कळ हाल झाले. परंतु नीतिसंबंधांत त्यांना कसलाहि अत्याचार सोसावा लागला नाहीं; त्याचप्रमाणें हातपाय तोडणें, कातडें सोलणें, डोळे काढणें यांसारख्या कृत्यापायीं त्यांच्या शरीराची विटंबना झाली नाहीं, असें इंग्रजांच्या बारीक चौकशींत सिद्ध झाल्यामुळें कत्तल करणारावर शारीरिक वा नैतिक दुराचाराचा आरोप आतां कोणी करीत नाहीं. या स्त्रियांना जिवंत ठेवण्याचा हेतु सदयतेचा नसून पापमूलक होता; इंग्रजांचें राज्य पूर्णपणें सर्वत्र अस्तास गेल्याची खात्री पटल्यावर या बायकांना शिपायांच्या व पुढाऱ्यांच्या जनानखान्यांत पाठवायचें, अशी त्यांना शिल्लक ठेवण्याच्या हेतूबद्दल एक समजूत क्वचित् इंग्रजी लिखाणांतून दृष्टीस पडते; परंतु या समजुतीच्या बाबतींत शिपायांच्या बाजारांतील बडबडीपेक्षां जास्त विश्वस-नीय आधार कुठें दाखविला गेलेला नाहीं. बायकांमुलांना ठार करण्याला नाना-साहेबांची संमति होती, कारण ते कत्तलीच्या जागेजवळ असतांना त्यांनीं

कत्तलीला प्रतिबंध केला नाहीं, असा एक तर्क बऱ्याच पुस्तकांतून लिहिलेला सांपडतो. पण शिपायांनीं कत्तलीचें काम नाकारल्यावर एक मुसलमान बाई खाटकांना घेऊन आली व त्यांनीं सर्व बायकांमुलांना ‘ एक घाव दोन तुकडे ’ या पद्धतीनें मारून टाकलें, अशी माहिती इंग्रजी चौकशीच्या पुराव्यांत बहुधा एकवाक्यतेनें आलेली आहे. नानासाहेबांच्या मुक्कामाशेजारीं ही कत्तल झाली तेव्हां फार तर त्यांनीं शत्रुत्वाचा एक परिणाम या नात्यानें किंवा पूर्वसंकेतास अनुसरून तिकडे दुर्लक्ष केलें, असें म्हणतां येईल. नानासाहेबांनीं कत्तल करविली हा आरोप तत्कालीन महाराष्ट्रियांतहि रूढ होता. शिपायांनीं गोऱ्या तरुणींना पळविल्याची वस्तुस्थिति त्यांच्या तावडींत सांपडलेल्या एका बाईनेंच सांगितलेली आहे. पण अशीं उदाहरणें एक दोनांहून जास्त नाहींत.

— २ —

“ ईश्वराच्या कृपेनें आणि बादशहाच्या शत्रुसंहारक भाग्यानें दिल्ली, मुंबई, पुणें, सातारा येथें व इतर शहरीं सर्व खिस्ती मारले गेले. या शहरांतून वेष पालटून शिरलेल्या पांच हजार युरोपियनांची तीच गत झाली. देशांतील पुण्यशील, बुद्धिमान् व स्वधर्मनिष्ठ सैनिकांनीं ही कामगिरी बजावली. आमच्या सरकारचा विजय झाला असून ज्या अर्थीं या ठिकाणीं शत्रूचा मागमूसहि उरलेला नाहीं, त्या अर्थीं ही खुषखबर ऐकून प्रजेनें व अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें सुखासमाधानानें करावीं. ”

ता. १ जुलई रोजीं पेशवाई स्थापल्याच्या समारंभांत नानासाहेबांनीं केलेल्या प्रगट घोषणेचा सारांश येथें दिला आहे. त्यामध्यें कलकत्त्याचें नांव नाहीं, यावरून कलकत्त्यास ब्रिटिश राज्याच्या केंद्रस्थानीं गोऱ्यांचा कारभार चालल्याची माहिती नानासाहेबांना नसावी, अशी कल्पना करतां येईल, तरी आपल्याला यापुढें भय उरलेलें नाहीं, ही भावना सदर घोषणेंत आहे. परंतु या घोषणेंतील युरोपियनांच्या विनाशविषयक समजुतीचा फुगा ता. १ जुलई-नंतर चार पांच दिवसांतच फुटला व फिरंग्यांच्या मुकाबल्यासाठीं अलाहाबादेकडे आपण फौजा पाठवीत असल्याचें वर्तमान अधिकाऱ्यांमार्फत लोकांना कळविण्याची पाळी त्यांच्यावर ओढवली. नानांची कदाचित् कलकत्त्यांतील इंग्रजी राज्यचालकांच्या हालचालीपर्यंत दृष्टि पोंचली नसली किंवा पोंचून त्यांची त्यांनीं उपेक्षा बाळगली असली तरी तेथें गव्हर्नर-जनरलनें चोहोंकडून गोरे सैनिक कलकत्त्यास बोलावण्याचें काम धडाक्यानें आरंभलें होतें. मदती-

करितां कॅनिंगनें जिकडे हाक दिली तिकडून शक्य तेवढ्या संख्येनें गोरे सैनिक कलकत्त्यास येऊं लागले. मद्रास, मुंबई हे दोन इलाखे मीरतच्या बातमीनें गडबडले नाहींत, ते शांत होते व तेथील अधिकारी कलकत्त्याकडे सैन्यें पाठविण्याच्या तयारीस लागले होते. त्या बाजूच्या तारायंत्रांना धोका पोंचला नव्हता. मद्रास ते कलकत्ता हा जलमार्ग सुरक्षित होता. यामुळें मद्रासकडून जें गोरें लष्कर आलें, त्याला अलाहाबादेपर्यंत थोडी थोडी कुमक मिळत जाऊन तेंच अलाहाबादेहून कानपूरच्या स्वारीवर निघालें होतें.

मद्रासचें गोरें लष्कर एप्रिलच्या अखेरीस इराणच्या लढाईवरून परत येऊन पोचलें होतें व त्यांचा प्रमुख नेता जेम्स नील हा क्रिमियांतून आधीं परतून आपल्या सैनिकांची तेथें वाट पाहात होता. २० रोजीं त्यानें आपल्या पथकाला भेट देऊन त्याची पाहणी केली. नंतर एका महिन्याच्या आंत त्याला कलकत्त्याचें बोलावणें आलें व तो तेथें जाऊन धडकला. ता. २३ मेला त्यानें लष्करासमवेत कलकत्त्याचा निरोप घेतला. हावरा स्टेशनाजवळ असलेल्या नदीवरून नीलचे शिपाई स्टेशनवर येतांना गाडी सुटण्याची वेळ भरली व स्टेशनमास्तरानें नीलसमोर गाडी ठरल्याक्षणीं सुटलीच पाहिजे, मग सैनिक मागें राहिले तरी चालेल अशा तऱ्हेची भाषा आपल्या कर्तव्यनिष्ठेच्या दिमाखानें उच्चारली. स्टेशनमास्तर गोराच होता. नीलनें ताबडतोब त्याला व इंग्रज ड्रायव्हराला आपल्या सैनिकांच्या ताब्यांत देऊन आपला मार्ग मोकळा केला. सगळे सैनिक गाडींत भरल्यावर त्यानें सदर रेल्वेकामगारांना बंधमुक्त करून गाडी चालविली. अवघ्या १० मिनिटांच्या उशिरानें गाडी सुटली. वेळप्रसंग न ओळखतां कर्तव्यनिष्ठेचा आडमुठेपणा दाखविणाऱ्या स्वभावाचा हा एक मासला आहे. नीलनें हें प्रकरण गव्हर्नर-जनरलच्या कानावर घातलें. मग स्टेशनमास्तराला अशी जरब मिळाली कीं पुनः त्यानें आपल्या कर्तव्यप्रेमाची मिजास दाखविण्याचें धाडस केलें नाहीं. ता. ४ जूनला नील बनारसला पोंचला. तेथली एकंदर राजकीय स्थिति अतिशय चिंताजनक होती. नील आल्यावर तेथील राजकीय असंतोषाची पिकलेली गांठ फुटली.

बनारसच्या छावणीमध्यें बिथरलेल्या शिपायांना त्यांच्या अंमलदारांनीं कसेंबसें ता. ४ जूनपर्यंत आवरून धरलें होतें. नील आल्यावर त्या शिपायांचीं हत्यारें काढून घेण्याचा मनोदय इंग्रजांनीं सिद्धीस नेला. कवाइतीच्या

मैदानावर शिपाई बोलावून त्यांना हत्यारें खालीं ठेवण्याचा हुकूम ऐकवला. कित्येकांनीं शस्त्रत्याग विनतक्रार केला व कित्येकांनीं आरडाओरडा माजविला. इतक्यांत त्याच्या डोळ्यांसमोर तोफखाना आला व त्याच क्षणीं ज्यांनीं हत्यारें ठेवलीं होतीं त्यांनीं तीं उचललीं आणि सर्वांनीं गोळीबार आरंभिला. तेव्हां तोफांच्या गोळ्यांचें शिपायांना प्राणघातक उत्तर मिळून ते वेगानें पळत सुटले. छावणींत बरेच शीख शिपाई होते. ते देखील गोऱ्या वरिष्ठांच्या चुकीमुळें गोंधळून बिघडले व गोळ्या उडवूं लागले.. त्यांच्यावर तोफांचा मारा झाला तेव्हां तीन वेळां त्यांनीं तोफांवर चाल केली, परंतु शिखांचें हें साहस वायां जाऊन त्यांनीं सुद्धां पळ काढला. याप्रमाणें बनारस येथील शिपायांच्या उत्पाताचें संकट लोपलें व नील अलाहाबादेकडे वळला. अलाहाबाद व बनारस यांमध्यें सुमारें ७० मैलांचें अंतर असून तेथें नील ता. ११ जूनला दाखल झाला.

बनारसची घडामोड दुसऱ्या दिवशीं अलाहाबादेस कळली व तेथल्या जीवनावर बनारसवाल्या शिपायांच्या उठावानें जोराचा आघात केला. शिपायांच्या उठावणीचे परिणाम निश्चित ठरलेले होते. गोऱ्या अंमलदारांची जमेल तशी व जमेल तेवढी कत्तल, त्यांच्या घराची आणि सरकारी तिजोरीची लूट, जाळपोळ व इतर स्थावराची नासधूस; सवड असेल तर जवळच्या संपन्न शहराची नागवणूक. शेवटीं गोरी फौज येण्यापूर्वीं जेथें शिपायांचा जोर दिसेल त्या स्थळीं प्रयाण, हे परिणाम पुनः पुनः सांगण्याची आवश्यकता नाहीं. ता. ६ जूनच्या रात्रीं शिपायांनीं मीरतच्या बातमीनंतर सगळ्या मे महिन्यांत व जूनच्या सुरवातीपर्यंत धारण केलेला राज्यनिष्ठेचा बुरखा फाडून फेकून दिला. शिपायांची बुद्धि ताळ्यावर नसल्याचें ज्ञान गोऱ्या अंमलदारांना होतें, पण जोंवर शिपाई उघडपणें राज्यद्रोह दाखवीत नाहींत तोंवर त्यांना चिथावणी मिळण्यासारखें वर्तन अंमलदार टाळीत होते. दोन्ही पक्ष एकमेकांना फसविण्याच्या धोरणानें ता. ६ जूनपर्यंत वागले. त्या तारखेच्या रात्रीला ही फसवणुकीचा खेळ संपला. शिपायांनीं गोळीबार, जाळपोळ, गोऱ्यांचा संहार हीं कृत्यें करून छावणी घेतली. छावणी हातची जातांच तेथील सेनापति प्राण वांचवून अलाहाबादच्या किल्ल्यांत घुसला. शिपायांची एक तुकडी किल्ल्यांत होती. तिचीं शस्त्रें त्याच्या हुकमानें शिखांनीं काढून घेतलीं आणि त्या बिनहत्यारी शिपायांना किल्ल्याबाहेर हुसकून लावलें.

शिपायांच्या उठावाला जवळच्या शहरांतील गुंड-गुन्हेगारांची साथ मिळा-यची असा एक नियम होता. छावणींतल्या शिपायांमागोमाग अलाहाबाद शहरांत दंगल सुरू झाली. तुरुंग फोडणें हें या दंगलीचें एक अपरिहार्य अंग होतें. तुरुंगांतले कैदी गुन्हेगार व राज्याच्या बंदोबस्ताखालीं दबून राहिलेले गुन्हेगार गुंड यांनीं शहरांत लुटालूट व कत्तल सुरू केली. गोऱ्या काळ्या ख्रिस्त्यांच्या कत्तलीला अलाहाबादेस एक पुस्ती जोडली गेली. बंगाली कारकून हा ब्रिटिश राज्याचा एक महत्त्वाचा अवयव गणला जात असे. अलाहाबादच्या दंगेखोरांनीं त्यांच्यावर सूड उगवला. त्यांना पकडावें, लुटावें आणि नव्या मोंगल बादशाहीच्या निष्ठेची शपथ घेतल्यास सोडावें, नाहींतर मारून टाकावे, हा नवा प्रकार अलाहाबादेस पहिल्यांदा अनुभवास आला. पुष्कळ बंगाल्यांची बनारसप्रमाणें अलाहाबादेस (प्रयागास) वस्ती होती. कोणी नोकरीखातर तर बरेचसे गंगा-यमुनेच्या संगमाचें पवित्र तीर्थ म्हणून तेथें राहात होते. ते या दंगलींत सांपडून त्यांना इंग्रजी राज्याचे हस्तक या नात्यानें विविध आपत्ति भोगाव्या लागल्या. बंगालमध्यें इंग्रजी राज्य प्रारंभीं विस्तार पावलें व इंग्रजी भाषा शिकून कारकुनी करण्याची संधि बंगाल्यांना मिळाली. राज्यविस्ताराच्या अनुरोधानें तेहि इंग्रजाबरोबर आपल्या जन्म-भूमीच्या हद्दीबाहेर पडले होते. ब्रिटिश राजवटीच्या कायदेकानूंचा कारभार बंगाल्यांच्या मदतीनें चालत असल्यामुळें सामान्य लोकांचा त्यांच्यावर दांत होता व त्याचा परिणाम बंगाल्यांच्या वांटणीस आला.

उठावाच्या रात्रीं सरकारी खजिना सुरक्षित राहिला. दुसऱ्या दिवशीं शिपायांनीं त्यांतली जेवढी रोकड अंगावर वाहणें शक्य होतें, तेवढी आपलीशी केली व पूर्ण तृप्ति झाल्यावर उरलेला भाग शहरच्या साथीदारांना लुटायला सांगितला. शिपायांनीं द्रव्य गांठीस बांधून घरचा रस्ता धरला खरा, परंतु इंग्रजांनीं गोळा केलेल्या माहितीप्रमाणें ही तिजोरीची तूट सगळ्यांना पचली नाहीं. त्यांना घरच्या रस्त्यावरील लोकांनीं लुटलें. फारच थोड्यांना हा द्रव्यलाभ पचवून आपल्या खेड्यांतून ऐषआरामानें राहतां आले. प्रत्येक शिपायानें हजार हजारांच्या तीन तीन थैल्या नेल्या व तिजोरींत उणेपुरे तीस लाख रुपये होते, असें इंग्रज इतिहासकारांचें म्हणणें आहे. जिल्ह्याच्या मुख्य शहरीं अराजक उद्भवलें म्हणजे आसपासच्या मुलखांत बेबंदशाही पसरावी, या नियमान्वयें जिकडे तिकडे जनतेमध्यें मनसोक्त व्यवहाराला मुभा मिळाली.

अलाहाबादेस मुसलमानांना चिथावणारा एक मौलवी शिपायांच्या उठावापूर्वी कित्येक दिवस येऊन राहिला होता व त्याचें प्रस्थहि खूप वाढलें होतें. फिरंग्यांचा तो पक्का द्वेष्टा होता, हें प्रस्तुत संदर्भात सांगायला नको. तो कुठून तेथें आला याची नक्की बातमी कधींच लागली नाहीं. तो फैजाबादचा राहणारा असेंहि मत आढळतें. त्यानें आपलें वजन वाढवून बादशहाच्या नांवें स्वतंत्र राज्याची तयारी चालविली. अलाहाबादेच्या खुस्रू बागेंत त्यानें आपलें ठाणें थाटलें होतें. कामचलाऊ गव्हर्नर हा हुद्दा घेऊन राज्यकारभाराचा देखावा त्यानें उभा केला. ब्रिटिशांची सद्दी संपली. पुनः बादशाही अस्तित्वांत येणार आहे, असें तो कुराणाच्या आधारें मुसलमानांना सांगे. बादशाहीच्या पुनरुत्थानाकरितां अलाहाबादच्या किल्ल्यावर हल्ला करावा, असा त्यानें आपल्या गुंड भक्तांना उपदेश केला; त्याप्रमाणें ते तीन चार वेळां किल्ल्याच्या रोखानें आले, पण किल्ल्यांतील तोफांच्या पल्ल्याबाहेर जमण्यापेक्षां त्यांचा जास्त उपद्रव किल्ल्याच्या लोकांना पोंचला नाहीं. थोड्याच दिवसांनीं मौलवीच्या राज्यकर्तृत्वाला कायमचें ग्रहण लागलें.

ता. ११ जून रोजीं नील किल्ल्यांत आला व दुसऱ्याच दिवशीं त्यानें चढाईचें धोरण अंमलांत आणलें. शिपायांनीं स्थानिक गोरे लोक मारले कीं, सगळे गोरे संपले, त्यांच्या वर्चस्वाचा मग विचार करायला नको, किंवा मूठभर गोरे कितीसा टिकाव धरूं शकणार असल्या लोकभ्रमांचा फडशा उडविण्याकरितां नीलनें किल्ल्यांतून दर्यागंज नांवाच्या जवळच्या ठिकाणांवर तोफांचा भडिमार केला. साहजिकच तेथील दंगेखोरांचा नूर उतरला. पण दंगाधोप्यांचा बंदोबस्त करण्यापेक्षां जास्त मोठी जोखीम त्याला किल्ल्यांतल्या लोकांच्या बेशिस्त वागणुकीची वाटत होती. तेथील शीख व गोरे स्वयंसैनिक दर दिवशीं किल्ल्याबाहेर लूटमारीसाठीं जात असत आणि इतर लुटीबरोबर ते तऱ्हेतऱ्हेची दारू आणीत. हा त्यांचा विशेष होता. दारूपुढें इंग्रज स्वत्व विसरतो, याची पूर्वीं दिल्लीच्या संदर्भात जशी सांगितली तशीच ही कहाणी आहे. किल्ल्यामध्यें शीख व त्यांचे सहकारी यांनीं पाण्याहून दारू स्वस्त करून सोडली होती. नीलनें सारी दारू विकत घेऊन सरकारी कोठारांत भरली. यानंतर शिखांना किल्ल्याबाहेर काढण्याचा निश्चय करून त्यानें या पंजाबी शूरांना राज्यद्रोही जमीनदारांची लूट साधण्याच्या मिषानें किल्ल्यांतून बाहेर घालविलें. त्या काळीं अलाहाबाद-कलकत्यामध्यें छोट्या आगबोटीची

वाहतूक सुरू असल्यानें किल्ल्यांतून बायकांमुलांना नीलनें कलकत्त्यास पाठविलें. चिंतेचीं कारणें याप्रमाणें दूर केल्यावर आसपासच्या गांवांतून संचरणारें राज्यद्रोहाचें वारें आवरण्याचें काम सोपें होऊन नीलनें तशीं गांवें निवडलीं व त्यावर धाडी घातल्या. ता. १७ पासून पुनश्च कंपनी-सरकारचा कारभार मार्गास लागला. गोऱ्या लष्करांच्या धाडींची दहशत खाल्लेल्या माणसांनीं अलाहाबाद शहर तोफांच्या मारानें धुळीस.मिळविण्याचा इंग्रजांचा निश्चय असल्याची बातमी पसरविली. ती खरी असो वा खोटी असो, खुस्रू बागेंतल्या मौलवीचें दैवी सामर्थ्य आतां लटपटलें. त्याच्या सहकाऱ्यांचीं धाबीं दणाणलीं. मौलवीनें कानपुराकडे पळ काढला आणि त्याचे साथीदार बेपत्ता झाले. इंग्रजांनीं या प्रसंगीं जो क्रूरपणा गाजविला त्याचें वर्णन योग्य स्थळीं करावयाचें असल्यानें येथें त्याचा विस्तार नको. बायका, मुलें, म्हातारे, आजारी अशा सर्वांना त्यांनीं तलवारीच्या धारेवर किंवा फांसावर लटकाविलें; यावरून त्या क्रूरपणाच्या अतिरेकाची अटकळ करतां येईल. आस-पासच्या द्रोहानें तापलेला प्रदेश शस्त्रांच्या वृष्टीनें थंडा करण्यांत सरासरी एक आठवडा खर्चून नील कानपूरकडे जाणार होता; पण वाहतुकीचीं पुरेशीं साधनें नाहींत म्हणून त्याचा बराच खोळंबा झाला. ही अडचण कांहींशी निरसल्यावर कॉलऱ्यानें गोरे सोजीर पटापट मरूं लागले. गोऱ्यांनीं ज्यांच्या मदतीची अपेक्षा करायची ते काळे लोक गांवखेड्यांतून चालू असलेल्या क्रूरपणामुळें गोऱ्यांच्या वाऱ्याला उभे राहीनात. डोल्या नाहींत, त्या घडवायला व उचलायला माणसें नाहींत. या स्थितींतहि नीलनें सातशें काळ्या गोऱ्या लढवय्यांचें एक पथक रेनो ( Renaud ) नांवाच्या अंमलदाराबरोबर ता. ३० जूनला कानपूरकडे पाठवून दिलें. आपल्या मार्गांतलीं खेडीं उध्वस्त करून दिसेल त्या माणसाला झाडांच्या फांसावर लटकावणारा अधिकारी म्हणून ज्याचा उल्लेख पूर्वीं आला आहे तो सेनानायक हाच. कानपूर पडल्याचें ऐकल्यावर रेनोला ज्यानें आपली वाट पाहण्यासाठीं मध्येंच थांबविलें तो सेनापति हेवलॉक मागून झपाट्यानें कुमक घेऊन येत होता. नीलच्या भाग्यांत कानपूर जिंकण्याच्या कामीं आपला पराक्रम वेंचण्याचा योग नव्हता. तो पिछाडी सांभाळण्यासाठीं अलाहाबादेसच राहिला.

हेवलॉक हा हिंदी फौजेच्या शिपाईगिरींत वाढलेला एक जुना सरदार होता. ब्रह्मी, अफगाण, शीख यांच्याशीं झालेल्या युद्धांत त्यानें अशी मर्दुमकी

दाखविली कीं, एका गव्हर्नर-जनरलानें ' हिंदुस्थानांत कसलेंहि भीषण संकट उद्भवल्यास त्याला पुरून उरणारा पुरुष ' अशी त्याची शिफारस गाइली होती. १८५६ च्या नोव्हेंबरांत त्याची इराणला पाठविलेल्या सैन्यावर नेमणूक झाली. तिकडे नांव कमावून तो १८५७ च्या एप्रिल प्रारंभीं लढाई संपली म्हणून हिंदुस्थानाकडे येण्यास निघाला. २६ मेला तो मुंबईस पोचला. तेथें त्यानें शिपाई-गर्दीची बातमी ऐकली. ता. १२ जूनला तो कलकत्त्याच्या जलमार्गानें निघाला. ता. १३ ला मद्रास व १७ जूनला कलकत्ता याप्रमाणें त्यानें मजल काटली. तेथून त्यानें गोऱ्या शिपायांच्या लहान तुकड्या बरोबर घेऊन ता. २५ जूनला अलाहाबादकडे मोर्चा वळविला. ता. ३० जूनला त्यानें अलाहाबाद गांठलें. त्याच दिवशीं रेनोची रवानगी कानपूरच्या रोखानें झाली होती. ७ जुलईला हेवलॉकनें स्वतः कानपूरची वाट धरली. ता.१० रोजीं रेनोची स्थिति कठिण असल्याचें कळल्यावरून तो वेगानें त्याच्या मदतीस धावला. ता. १२ जुलई रोजीं त्याची व रेनोची गांठ पडली. त्यानंतर फत्तेपुरास व इतरत्र त्यानें नानासाहेबांच्या नेतृत्वाखालील कानपूरवाल्यांशीं केलेल्या लढायांचें वृत्त मागें येऊन गेलेलें आहे. ता. ७ ते ता. १६ या नऊ दिवसांत हेवलॉकनें १२६ मैलांचा रस्ता मागें टाकून चार लढाया जिंकल्या, असा त्याच्या कामगिरीचा आढावा आहे. कानपूरचा बंदोबस्त करून हेवलॉकनें ता. २१ रोजीं लखनौस जाण्याची तयारी चालविली. पुरेसें लष्कर गंगापार झाल्याचें पाहून ता. २५ ला त्यानें गंगा ओलांडली. ता. २० ला नील कानपुरास आला. यामुळें कानपूरच्या रक्षणाची जबाबदारी हेवलॉकनें त्याच्यावर टाकली. नीलनें हेवलॉकचा हुकूम चोख पाळला. पण प्रत्यक्ष लढाईंत भाग घेण्याच्या दृष्टीनें पुनः त्याला निराशेचे धनी व्हावें लागलें.

हेवलॉकला लखनौच्या रेसिडेन्सीमध्यें कोंडून पडलेल्या आपल्या देशबांधवांना केव्हां सोडवीन असें झालें होतें. कानपुराच्या गोऱ्यांना सैन्याची मदत वेळेवर न पोचल्यानें ते सर्व मारले गेले, या अनुभवाची टोंचणी त्याला स्वस्थ राहूं देत नव्हती, म्हणून तो लखनौकडे वळला. परंतु अलाहाबाद कानपूरपेक्षां कानपूर-लखनौमधील प्रदेश जिंकायला कितीतरी पटीनें कठिण असल्याचें त्याला दिसून आलें. वस्तुतः कानपूर-लखनौचें अंतर ४०-४२ मैलांचें. ज्यानें अलाहाबादपासून कानपूरपर्यंतच्या सवाशें मैलांची दौड

अवघ्या नऊ दिवसांत केली, त्याला ही लहान मजल दोन तीन दिवसांत निदान पूर्वींच्या मुदतींत आटपून लखनौ गांठणें शक्य आहे, अशी उमेद वाटत असल्यास नवल नाहीं. पण ही उमेद आणि लखनौ त्वरेनें गांठण्याची तळमळ हीं दोन्ही व्यर्थ ठरून त्याला पंधरा दिवसांनीं पुनः कानपुराचा तळ गांठणें भाग पडलें. याचें कारण तो प्रदेश माजी नवाबशाहींतील जमीनदार-तालुकदारांचा होता. तेथें या नबाबशाहीचे शिपाई, वतनदारांची शिबंदी व त्यांच्या अभिमानाचे हत्यारबंद गांवकरी हे सर्व कंपनी सरकारच्या लष्कराबरोबर झुंज खेळायला सिद्ध होते. दिवस पावसाळ्याचे अर्थात् नदीनाले भरलेले आणि शेत-जमिनीला दलदलीचें रूप आलेलें. मानवी व निसर्गाचीं अशीं विघ्नें लखनौपर्यंत पसरलेलीं होतीं. हेवलॉकला शत्रु व रोग या दोघांशीं झगडा करीत पुढें जावयाचें होतें. शत्रूपेक्षां त्यांच्या सैन्याला कॉलरा जास्त बाधला. शेवटीं त्यानें लखनौकडे पाठ फिरविली व कानपूरहून कलकत्त्याच्या वरिष्ठांना आपल्या फौजेला ज्यादा मदतीची निकडीची गरज असल्याबद्दल कळविलें.

हेवलॉक माघारी फिरला म्हणून तो लढाया हरला, असें अनुमान केल्यास योग्य होणार नाहीं. तो गंगेपलीकडे गेला व तीन मैलांवरच शत्रु बळकट जागीं (उनाव गांवीं) लढाईच्या सज्जतेनें उभा असल्याचें त्याला दिसलें. परंतु हेवलॉकनें लढाई केलीच. या वेळीं शत्रूनें शौर्य दाखविण्यांत कसर केली नाहीं. गोऱ्यांच्या जबर धडाक्यापुढें शत्रु एकदां हटला तरी त्याची हिंमत कायम होती. त्यानें आपली फुटलेली फळी पुनः सांधून सांवरली. त्यानें तोफांचें बळ वाढविलें. हेवलॉकनें चपळाई करून त्यांच्या हल्ल्यांचा रस्ता रोखून धरला व आपल्या तोफा बंदुकांच्या टप्प्यांत येतांच शत्रूवर त्यानें गोळ्यांचा पाऊस पाडला. शत्रूंच्या तोफा गोऱ्यांच्या मारापुढें टिकल्या नाहींत. त्या तोफा ठिकठिकाणच्या चिखलांत रुतून जलदीच्या हालचाली करूं शकेनात. शत्रूची ही दुर्दशा पाहून गोरें पायदळ त्यावर धावून गेलें. थोड्या वेळांत शत्रुदलानें मैदान रिकामे केलें. त्यांच्या तोफखानेवाल्यांनीं मात्र तोफा न सोडतां आपल्या गोलंदाजीची अशी शिताफी दाखविली कीं गोऱ्यांनासुद्धां त्याबद्दल वाहवा म्हटल्याशिवाय राहवलें नाहीं. सगळे गोलंदाज मरेपर्यंत तोफा लढवीत राहिले. गोऱ्यांनीं शत्रूच्या एकूण १५ तोफा मिळविल्या. याप्रमाणें पहिली झुंज निकालांत निघाली. त्यानंतर गोऱ्या लष्करानें दोन तास जेवण्याखाण्यांत घालवून पुनः आगेकूच आरंभिलें. पुढें आठ मैलांवर (बसरतगंज) आणखी

एकदां शत्रु भेटला व लढाई जुंपली. शत्रूंचा तोफखाना सुरवातीस चांगली मारगिरी बजावीत होता. त्यावर इंग्रजी तोफांची सरशी होतांच गोरें पायदळ पुढें सरसावलें. अयोध्यावाल्यांनीं तत्काळ पळ काढला. लढाईचें यश इंग्रजांच्या पदरीं पडलें. ता. २९ जुलई या एका दिवशीं वरीलप्रमाणें दोन लढाया मारून हेवलॉकनें आपला प्रतिपक्ष नामोहरम केला.

लढाया जिंकल्या, पण रोग व युद्ध यांच्यामुळें झालेली मनुष्यहानि एवढी मोठी होती कीं हेवलॉकनें माघारी फिरण्यांत शहाणपणा आहे, असें ठरविलें. रोगी व जखमी शिपाई कानपुरास पाठविण्याला भरपूर वाहनें नव्हतीं. दारूगोळा संपुष्टांत आला होता. बनारसच्या दक्षिणेस दळणवळणाच्या मार्गावरील दीनापूर गांवीं (ता. २५ जुलई) शिपायांचा उठाव झाल्यानें आणखी दोन महिने कुमक पोंचण्याची आशा नव्हती. हेवलॉकनें या सर्व कारणांचा विचार करून फौज 'मंगळवार' नांवाच्या मुक्कामीं मागें आणली, तेव्हां सैनिकांची तर निराशा झालीच, पण नीलची निराशा इतकी भडकली कीं आपली पायरी सोडून त्यानें हेवलॉकला सपशेल बेअदबीचें पत्र लिहिलें. 'आजच्या आणीबाणीच्या कामगिरींत अडथळा उद्भवण्याचें भय नसतें तर तुझ्या उर्मट-पणाबद्दल तुला कैदखानाच दाखविला असता' वगैरे कडक मजकुराचें उत्तर हेवलॉकनें नीलला पाठविलें. ता. ३१ जुलै रोजीं हेवलॉकनें सरसेनापतीला आपली हकीकत कळविली आणि गंगेवर पूल बांधून तोफा व दाणागोटा जाण्याचा मार्ग सुगम करण्याविषयीं नीलला हुकूम केला. नीलचा व हेवलॉकचा खटका उडाला होता तरी नीलनें त्याचे हुकूम आस्थेनें पाळले. ऑगस्ट ३ रोजीं त्याच्या-कडून हेवलॉकच्या मदतीला तोफखान्याच्या तुकड्या रवाना झाल्या. हेव-लॉकला यावेळीं आपल्या सैन्यांतील हिंदी शिपायांच्या फितुरीकडेहि लक्ष द्यावें लागलें. अलाहाबादेहून कानपुरास जातांनादेखील त्याला हिंदी सैनिकांतील फितुरीचा मोड करावा लागला होता. आतां त्यानें फितुरी लोकांचीं हत्यारें काढून घेतलीं व कानपुरास मजूरकामावर त्यांना पाठवून दिलें. रोगी, जखमी, फितुरी यांच्या काळजींतून सुटतांच हेवलॉकनें बसरतगंजावर फिरून दुसऱ्यांदा हल्ला केला. हेवलॉक परतल्यावर त्या ठिकाणीं पुनः अयोध्येच्या शिपायांनीं लढाईची तयारी केल्याचें हेवलॉकला समजलें होतें. ऑगस्ट ५ ला बसरत-गंजास जाऊन हेवलॉकनें तेथील फौजेला पळविलें. पण पुनः त्याला 'येरे

माझ्या मागल्या ' करावें लागलें. तो मंगळवारगांवीं आला. लढाया जिंकून हेवलॉक कानपूरकडे स्वेच्छेनें परतला असला तरी त्याच्या शत्रुपक्षाची प्रतिष्ठा वाढली असें म्हणावें लागतें. जे तालुकदार तो माघारी फिरेपर्यंत तटस्थ होते, ते यानंतर शिपायांच्या प्रभावाखालीं गेले, अशा अर्थाची माहिती तत्कालीन इंग्रजांच्या आठवणींतून ग्रथित आहे.

— ३ —

## नव्या मोहिमेची तयारी

मंगळवारास येऊन हेवलॉक स्वस्थ राहिला नाहीं. त्यानें गंगेवर नावांचा पूल बांधण्याचें काम पार पाडलें. ता. ११ ऑगस्ट रोजीं पूल पुरा झाल्याबद्दल हेवलॉकला समाधानाचा निःश्वास टाकण्याला फुरसत मिळाली नाहीं. कारण त्याच दिवशीं बिठूरला चार हजार सैन्य व दोन तोफा घेऊन प्रतिपक्षीं कानपुराला धोक्यांत टाकण्याच्या विचारांत असल्याची बातमी नीलनें त्याला कळविली. हेवलॉकनें आजूबाजूंस घिरट्या घालणाऱ्या शिपायांच्या तुकड्यांना पळवून मग बिठूरचा रोख धरला. त्यापूर्वीं त्याला कानपूरच्या भागांत एक जोराची लढाई द्यावी लागली. ऑगस्टच्या १२-१३ तारखांस तीन ठिकाणीं शत्रूंचा मोड करून तो कानपुरास आला. ता. १६ ला त्यानें बिठूरच्या गर्दीवर चाल केली. या वेळीं हेवलॉकच्या प्रतिपक्षानें शौर्याची पराकाष्ठा दाखविली. बिठूरचीं घरें शिपायांनीं किल्ल्याप्रमाणें चिकाटीनें लढविलीं. हेवलॉकनें आपल्या सैनिकांची प्रशंसा लिहितांना प्रतिपक्षाच्या शौर्याचीहि स्तुति केली आहे. बिठूरकडील भय निवारून हेवलॉक कानपुरास परत आला तों आपली सरदारी संपली व आउटरॅम हा कानपूरच्या फौजेचा सरलष्कर नेमला गेला, असा सरकारी हुकूम त्याच्या पाहण्यांत आला. हुकुमानंतर एक महिन्यानें ( १५ सप्टेंबर ) आउटरॅम कानपुरास येऊन पोंचला. त्याच्या बरोबर बरेंच सैन्य होतें. लखनौकडे जाण्याच्या पूर्वतयारींत कानपुरास अवघे ४ दिवस घालवून हे दोघे समान योग्यतेचे सेनाधुरीण ता. २० सप्टेंबरला लखनौच्या रस्त्यास लागले.

हेवलॉकप्रमाणें आउटरॅमसुद्धां कंपनीच्या हिंदी लष्करांत उदयास चढत गेलेला योद्धा होता. १८५७ पूर्वीच्या काळांत ज्या लढाया झाल्या, त्यांत धाडस, शौर्य, धैर्य, प्रसंगोचित युद्धकौशल्य इत्यादि गुण वरिष्ठांच्या निदर्शनास आणून तो कर्तबगारीच्या पायऱ्या चढला. निर्भय स्पष्टोक्तीमुळें

त्याला वरिष्ठांनीं खालीं ढकलण्याचा किंवा त्याची बढती अडविण्याचा कधीं कधीं प्रयत्न करून पाहिला; परंतु तो लष्करी कारभारांतल्या मोठ्या हुद्द्या-पर्यंत पोंचलाच. तो जसा लढवय्या तसाच मुत्सद्दी होता. १८५६ मध्यें (७ फेब्रुवारी) लखनौची नबाबशाही देशी राज्यांच्या नकाशावरून खरडून काढण्याचें काम त्याला करावें लागलें. पुढें प्रकृति बिघडल्यामुळें तो (मे १८५६ विलायतेस गेला व तेथें आसतां त्याची इराणच्या स्वारीवर नेमणूक झाली. १८५७ च्या सुरुवातीस इराणची लढाई संपवून व आपसांतल्या करारमदाराचें खरकटें काढून तो जुलईंत (ता. ९) मुंबईस आला. त्याच्याकडे राजपुतान्या-वर देखरेख करण्याचें काम द्यावयाचें अशी सरकारी योजना होती; पण सदर योजनेचा हुकूम मुंबईस लवकर हातीं आला नाहीं म्हणून तो कलकत्त्यास गेला. ता. १ ऑगस्ट रोजीं त्याची पहिली नेमणूक रद्द करून गव्हर्नर-जनरलानें त्याला दीनापूर-कानपूरकडील लष्कराची सरदारी दिली. ६ ऑगस्टला तो कलकत्त्याहून निघून १६ भागलपूर, १९ दीनापूर, २८ बनारस व १ सप्टेंबर अलाहाबाद, अशी मजल त्यानें मारली. मार्गांत त्याला अडविण्याकरितां आलेल्या उठावखोर शिपायांना त्यानें आपला एक दुय्यम पाठवून झोडपलें. त्यांत व इतर बंदोबस्तांत त्याचा वेळ मोडला. एकदां परभारेंच लखनौस जाण्याचा त्याचा विचार होता; पण हेवलॉकच्या फौजेची हलाखी व त्यासाठीं कानपुरास जाण्याची निकड लक्षांत घेऊन तो ता. १५ सप्टेंबर रोजीं संध्याकाळीं त्या शहरीं दाखल झाला. दुसऱ्या दिवशीं त्यानें आपल्या जीवनाला अधिक उजळणाऱ्या एका गुणाची जगाला ओळख करून दिली.

### आउटरॅमचा दिलदारपणा

स्वतंत्र सेनानी हा हेवलॉकचा अधिकार वरिष्ठांनीं आउटरॅमला दिला पण कानपुरास आल्यावर त्यानें या अधिकाराचा स्वतःच्या जबाबदारीवर त्याग केला. 'लखनौच्या वेढ्यांतील गोऱ्या लोकांना राज्यद्रोही शिपायांच्या तडाख्यांतून सोडविण्याचें श्रेय हेवलॉकच्या पदरांत पडणें अवश्य आहे. आपण त्याच्या जोडीला स्वयंसैनिक या नात्यानें राहूं' अशा अर्थाच्या मजकुरानें त्यानें आपल्या स्वार्थत्यागाचें स्वरूप उघड केलें होतें. हेवलॉकचा अधिकार काढून घेतल्याच्या माहितीनें त्या सरदाराच्या हाताखालीं लढलेल्या

सर्व सैनिकांमध्यें उद्वेग पसरला होता; हेवलॉकवर हा अन्याय घडला अशी त्यांची भावना होती. परंतु आउटरॅमच्या उदार स्वार्थत्यागानें त्यांचा उद्वेग नाहींसा झाला. त्यांच्या हृदयांत उत्साह उचंबळला, इतका कीं आउटरॅमला त्या उत्साहाचे व हर्षाचे प्रत्यक्ष धक्के सोसावे लागले. सैनिकांच्या तत्कालीन उत्साहाच्या प्रदर्शनाचीं वर्णनें इंग्रजी इतिहासांतून आहेत.

हा एक उद्बोधक प्रसंग आहे. आउटरॅमनें जें केलें तें स्वयंप्रेरित होतें. सरकारनें केलेली नेमणूक बाजूला सारणें, हें एक प्रकारचें साहस होतें. पण जें योग्य व अवश्य दिसेल तें वरिष्ठांची मर्जी बिनसली तरी तें बोलून व करून दाखविण्याची त्यांमध्यें धमक होती. कदाचित् त्याच्यावर वरिष्ठांची इतराजी होऊं शकली असती. परंतु प्रसंग कठीण होता आणि वरिष्ठ अधिकारी गुणग्राही होते म्हणून हा प्रसंग गोडीनें पार पडला. सरसेनापति कॅम्बेल याला आउटरॅमचें कृत्य समजतांच त्यानें आउटरॅमची पाठ थोपटण्याला मुळींच उशीर लावला नाहीं. आउटरॅमच्या कृत्याला संमति देऊन कॅम्बेलनें त्याची तारीफ केली. शिपायांची उठावणी हें इंग्रजांना राष्ट्रीय संकट वाटत होतें. अशा संकटाच्या वेळीं बरोबरीच्या पुढाऱ्यांची वृत्ति एकमेकांविषयीं कशी निर्मत्सर असावी, दुसऱ्यांच्या गुणांचें चीज कसें करावें, आपलें ध्येय सफळ होण्यासाठीं कसा स्वार्थत्याग आचरावा, यासंबंधाचा पाठ शिकण्यासारखी ही आउटरॅमच्या औदार्याची गोष्ट आहे.

हेवलॉक व आउटरॅम या दोघांना कानपुरापलीकडे मंगळवार गांवाजवळ प्रतिपक्षी सामन्याकरितां टपून उभा असल्याचें दिसलें. अर्थात् सामना सुरू झाला व हेवलॉकचें सैन्य विजय संपादून पुढें सरकलें. उनाव आणि बसरतगंज येथून प्रतिपक्षाला मागें रेटीत ता. २२ रोजीं बन्नी मुक्कामी जाऊन हेवलॉकनें विश्रांति घेतली. ता. २३ रोजीं त्याच्या सैन्यानें लखनौच्या परिसरांतील आलमबाग नांवाचें किल्लेवजा ठिकाण गांठलें. येथें विरोधी शिपायांच्या तुकड्या लांबवर पसरलेल्या होत्या. त्यांच्यापाशीं रिसाला व तोफखाना मुबलक होता. त्यांची जागा उंचवट्याची म्हणून शत्रूवर मारा करायला सोयीची होती. ब्रिटिश फौजा खालीं पावसाच्या पाण्यानें भरून गेलेल्या सपाटीवर होत्या, तथापि खांचखळग्यांतून पडत उठत हेवलॉकचे सैनिक प्रतिपक्षावर धावले. आलमबागेंतून त्यांनीं आपल्या सामनेवाल्यांची हकालपट्टी करून ता. २४ ला

तेथेंच विसाव्यासाठीं तळ ठोकला. त्या वेळीं विजयामुळें कांहींशा असावध बनलेल्या ब्रिटिश सैनिकांवर शिपायांनीं अचानक छापा घालून गोऱ्यांची धांदल उडविली. त्यांच्या लपविलेल्या तोफांनीं ब्रिटिशांचें पुष्कळ नुकसान केलें. ब्रिटिशांनीं हा छापा मारून काढला खरा पण त्यासाठीं त्यांना मोठी किंमत द्यावी लागली.

हेवलॉकनें आउटरॅमशीं आदल्या रात्रीं खल करून जो लढाईचा कार्यक्रम आंखला होता तो ता. २५ रोजीं अंमलांत आणला व जेथें गोरे लोक कोंडले गेलें होतें, तेथें जाऊन त्यांना संकटमुक्त केलें. लखनौच्या बागा, वाडे, पूल व अरुंद रस्ते, यांचे अडथळे तुडवून वाट काढतेवेळीं या दोघां सेनापतींना त्या दिवशीं सारखें अविश्रान्त लढण्याशिवाय दुसरी तोडच नव्हती. गोऱ्यांच्या कोंडवाड्यापर्यंत त्या दिवशीं पोंचलेंच पाहिजे, असा हेवलॉकचा ध्यास होता. रात्र झाली तरी त्यानें लढाई थांबविली नाहीं. अखेरीस अर्धी रात्र उलटण्याच्या सुमारास त्याची अघाडी रेसिडेन्सीच्या कोंडवाड्यांतील आपल्या जातभाईंना भेटली व तेथल्यांची कानपूरप्रमाणें कत्तल होईल कीं काय ही भीति संपली.

### पराजय व कोंडी

रेसिडेन्सीचा कोंडवाडा जुलईच्या १ ल्या तारखेपासून अस्तित्वांत आला होता. लखनौस मार्च महिन्यांत हेन्री लॅरेन्स हा नवा कमिशनर येऊन तो मागील इंग्रज अधिकाऱ्यानें वाढविलेला जनक्षोभ शमविण्याच्या उद्योगांत असतां शिपायांच्या उठावाचीं लक्षणें त्याच्या अनुभवास येत होतीं व मे महिन्यांतला एक उठाव त्यानें ठेचला ही माहिती पूर्वीं दिलेली आहे. पण शिपायांची अस्वस्थता सारखी वाढत होती. दरदिवशीं कुठून तरी इंग्रजी राज्यकर्तृत्वावर नवा आघात झाल्याच्या बातम्या लॅरेन्सकडे येत होत्या, लॅरेन्स वेषान्तरानें ठिकठिकाणीं हिंडून लोकस्थितीची पाहणी करीत असे. मिरतच्या शिपाईगर्दीमागून मे महिन्यांत इतर स्थलाप्रमाणें अयोध्येच्या प्रदेशांत अशान्ति फैलावली. केव्हांतरी ही धुमसणारी आग भडकायला किंवा साफ विझायला तरी हवी होती. पण तिला सारखें अस्वस्थतेचें इंधन मिळत गेल्यानें ता. ३० मेला लखनौस, ता. ३ जूनला अझीमगडास व फैजाबादेस, ता. ४ रोजीं लखनौपासून ५० मैलांवर असलेल्या सीतापूर गांवीं, त्याच सुमारास

कानपूर बनारस येथें; याप्रमाणें अनेक शहरांतील शिपायांनीं आपल्या नोकरीचीं बंधनें भराभर तोडून टाकलीं. ता. ९ रोजीं लखनौच्या लष्करी पोलिसांनीं तोच कित्ता गिरविला. यापुढें आपल्या बचावाची तयारी केली पाहिजे, असें ठरवून लॉरेन्सनें रेसिडेन्सी—ब्रिटिश अधिकाऱ्याचें ठाणें—या जागेची बचावाच्या दृष्टीनें डागडुजी करायला व तेथें दाणागोटा दारूगोळा भरायला सुरुवात केली. खंदक खणला; आसपासची झाडी छाटली; नाक्यानाक्यावर तोफा मांडल्या. आजूबाजूच्या मोठाल्या इमारती धुळीस मिळविल्या. स्वयंसैनिकांचें दल सज्ज केलें. दिल्ली हें जसें एक इंग्रजी राजवटीचें मर्मस्थान होतें तसेंच लखनौ हें दुसरें मर्मस्थान असल्याची जाणीव लॉरेन्सला होती. येथें लवकरच आपल्या सामर्थ्याची कसोटी लागणार, या अपेक्षेनें तो वागत होता. ता. ३० जूनला त्या कसोटीची वेळ आली. शिपायांचे जमाव लखनौकडे येत असल्याबद्दल खात्री होतांच त्या जमावाच्या दिशेनें जेवढी फौज हाताशीं होती तेवढी घेऊन लॉरेन्स निघाला. त्या फौजेंत हिंदी शिपायांचा तोफखाना होता. चिनहट नांवाच्या गांवीं दोन्ही फौजांची गांठ पडून लढाईला तोंड लागलें. परंतु शिपायांचा तोफखाना आपल्या प्रतिपक्षी व्यवसायबंधूंना सामील झाल्यामुळें ही लढाई लॉरेन्सवर उलटली. तो आपली फौज संभाळून कसाबसा रेसिडेन्सींत पोंचला व दुसऱ्या दिवशीं शिपायांनीं ती जागा वेढली. रेसिडेन्सी म्हणजे कंपनीसरकारचा प्रतिनिधि राहण्याची इमारत हें खरें, परंतु अशा एकाच इमारतीमध्यें लखनौचे इंग्रज वेढ्याच्या वेळीं रहात नव्हते. संरक्षणाच्या दृष्टीनें उपयोगी पडण्यासारख्या आजूबाजूच्या बऱ्याच इमारती त्यांनीं व्यापलेल्या होत्या.

### वेढ्याची लढाई

ता. १ जुलई ते २५ सप्टेंबरपर्यंतच्या ८७ दिवसांत रेसिडेन्सींत अडकलेल्या लोकांना विश्रांति कशी ती मिळाली नाहीं. भोंवतीं शहर असल्यानें शिपायांना तेथील घरांचा उत्तम आश्रय मिळाला होता. रेसिडेन्सींत १७२० लढाऊ व बायकामुलें वगैरे बिनलढाऊ १२८० याप्रमाणें ३००० माणसें असल्याचा हिशोब इंग्रजी कागदपत्रांतून दिलेला आहे. त्यामध्यें ७१२ हिंदी लढवय्ये होते, हें विसरून चालणार नाहीं. याविरुद्ध बाहेरील शिपायांची संख्या किती पटीनें अधिक होती, हें सांगणें कठीण आहे. ता. २७ जूनला

कानपुरास झालेल्या कत्तलीची बातमी ऐकल्यावर रेसिडेन्सींतल्या लोकांना स्वतःच्या भवितव्याविषयीं भीषण चिंता वाटूं लागली असल्यास आश्चर्य नाहीं. परंतु लढतां लढतां मरावें असा त्यांचा निश्चय कानपूरच्या बातमीनें दृढावला. ही वेढ्याची लढाई चालू झाल्यावर दुसऱ्या दिवशीं लॉरेन्स जखमी होऊन ता. ४ रोजीं मरण पावला. शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या कर्तव्याशिवाय दुसरें कांहींच बोलत नव्हता, असें त्याच्या सहकाऱ्यांनीं आपल्या आठवणींत लिहून ठेवलें आहे. लॉरेन्सनंतर बँक्स नांवाच्या इंग्रजानें लॉरेन्सचा अधिकार घेतला आणि लढाई चालू राहिली. ता. २१ रोजीं तो ठार झाला.

२० जुलई रोजीं शिपायांनीं रेसिडेन्सीवर जोराचा हल्ला केला; तो वाया गेलासें पाहून त्यांनीं सुरुंगांचा प्रयोग करून पाहण्याचें ठरविलें. एका ठाण्याचे सुरुंग फुकट गेले म्हणून शिपाई दुसऱ्या ठाण्याकडे वळले; तेथेंहि सुरुंगांची युक्ति अयशस्वी झाली तेव्हां त्यांनीं तोफांच्या मारागिरीसाठीं दमदमे उभारले. ७ ऑगस्टला शिपायांनीं दुसरा मोठा हल्ला केला. रेसिडेन्सीं-तल्या लोकांना जुलईमध्यें हेवलॉक लखनौस येत आहे, अशा बातम्या समजून त्यांचें धैर्य बळावलें पण ऑगस्ट उगवला तरी हेवलॉकचा पत्ता नाहीं, यामुळें ते खंतावले. ऑगस्टमध्यें शिपायांनीं फिरून एकदां जी निकराची झुंज केली ती हेवलॉक कानपुराहून लखनौस निघाल्यामुळें केली हें समजण्याजोगें असलें तरी रेसिडेन्सीवाले हेवलॉकच्या मदतीसंबंधांत अंधारामध्यें होते. त्यांची दिशाभूल करण्यासाठीं हेवलाकचे धिंडवडे काढल्याच्या किंवा आपण नवा राजा गादीवर बसविल्याच्या वगैरे खोट्या कंड्या शिपायांचे पुढारी पिकवीत असत. ता. ६ च्या रात्रीं शिपायांनीं आपल्या विजयाच्या वंदनार्थ तोफांचे १०० आवाज केले. ता. १० ऑगस्ट रोजीं पुनः शिपाई मोठ्या तयारीनें रेसिडेन्सीवर चालून आले. त्या दिवशीं रेसिडेन्सीच्या तटबंदीवर चढून जाण्यासाठीं बरोबर शिड्या आणल्या होत्या. त्यांनीं शिड्यांच्या उपयोगासाठीं अतिशय चपळाई दाखविली. शिपायांच्या पुढाऱ्यांनीं जिवाची पर्वा त्या दिवशीं सोडली होती. परंतु हे पुढारी एका मागून एक धारातीर्थीं पडल्यावर शिपायांनीं हल्ल्याचा नाद सोडला. येथें हें सांगितलें पाहिजे कीं शिपायांच्या ठाण्यावरहि इंग्रज लोक सुरुंगाचा डाव चालवीत होते. त्यांत त्यांना कित्येकदां चांगलें यशहि मिळालें.

ता. १२ रोजीं शिपायांनीं तोफांचा प्रचंड मारा आरंभून रेसिडेन्सीचें थोडेंफार नुकसान साधलें, पण तोफांच्या माऱ्याकडे इंग्रजांचें लक्ष वेधून घेऊन जागजागीं पेरलेले सुरुंग उडवायचे असा त्यांचा हेतु होता. तो हेतु क्वचित् सफळ झाला तरी शिपायांना त्याचा फायदा घेतां आला नाहीं. इकडे रेसिडेन्सीवाले शिपायांच्या नव्या नव्या युक्त्यांचा प्रभाव ओळखून ती युक्ति पुढल्यावेळीं व्यर्थ व्हावी, असा बंदोबस्त करीत असत. इंग्रज कधीं कधीं वेढ्याबाहेर निघून शत्रूवर जोराच्या हल्ल्यानें चालून जात. ता. १३ पासून पुढें याप्रमाणें सारखे उभयपक्षीं डावपेंच चालू राहिले. ता. ५ सप्टेंबरला शिपायांनीं आणखी एकदां प्रचंड हल्ला केला. हाच त्यांचा शेवटचा हल्ला. त्यानंतर त्यांना कानपुराहून निघालेल्या हेवलॉकच्या फौजेकडे लक्ष देण्याची पाळी आली. ता. २५ सप्टेंबरला हेवलॉकनें आपल्या कामगिरीचा एक टप्पा शेवटास नेला.

### कोंडींतले हाल

ता. १ जुलई ते सप्टेंबरपर्यंतच्या सुमारें पावणे तीनं महिन्यांच्या काळांत रेसिडेन्सींतल्या लोकांचे हाल प्रत्यहीं वाढत होते. मेलेल्या माणसां-जनावरांची नीट व्यवस्था करतां येईना, त्यामुळें हवा बिघडून माश्यांचा उपद्रव उद्भवला. देवी आणि कॉलरा या रोगांचे बळी चालूच होते. घायाळांच्या जखमा ताबडतोब बांधतां येईनात म्हणून केव्हां केव्हां त्यांत किडे झाल्याचेंहि दिसून येई. इस्पितळाचें वातावरण रोगट दुर्गंधानें व्यापलें. पुरेशीं अंथरुणें पांघरुणें नाहींत, तेव्हां साध्या चटयांवर घायाळांना व रोग्यांना पडून राहावें लागे. टेबल-खुर्च्यांच्या अभावीं भुईवर बसूनच जेवावें लागे. ऑगस्ट महिन्यांत अन्नाची टंचाई भासूं लागली. चहासाखर नाहीं, तंबाखू नाहीं; डाळ-चपातीखेरीज खाद्य नाहीं, दारू इतकी महागलेली कीं ती विकत घेण्याची सोय नाहीं; अंगावरचे कपडे बदलावे तर त्यांचीहि वाण; कपडे बदलण्याचे राहो, ते स्वच्छ धुण्याची देखील पंचाईत; या बाहेरच्या दुर्दशेंत मदतीच्या निराशेची भर पडून आनंद, उत्साह या भावना रेसिडेन्सीमध्यें कुणांतच उरल्या नाहींत. जो दिवस गेला तो आपला, अशा वृत्तीनें तेथील माणसें वागत होतीं. बाहेरील शिपायांची मात्रा चालूं द्यावयाची नाहीं; त्याला रगडायचें हा निश्चय मात्र रेसिडेन्सीच्या सैनिकांत कधींच ढिलावला नाहीं. त्या जागचे सेनाधिकारी युद्धाचीं सर्व अंगोपांगें जाणणारे, साहसी व कोंडीमुळें तसेच फितुरीमुळें अत्यंत सावध बनलेले

होते म्हणून प्रतिपक्ष्याच्या युक्त्या त्यांच्या लक्षांत येण्याला व त्यावर तोड काढायला त्यांना विलंब लागत नसे. तीक्ष्ण जागृत बुद्धि, युद्धविषयाचें शिपायांहून अधिक ज्ञान, आणि जीवनावरील घोर प्रसंगाचें धैर्य, हेंच त्यांचें खरें बळ होतें. कोंडमाऱ्यामुळें या बळाचा ताजेपणा शेवटपर्यंत टिकला. लवकरच मदत येण्याचा विश्वास हा त्यांच्या धैर्याचा मुख्य आधार समजायला हरकत नाहीं. ता. २५ सप्टेंबरला दिवस कलंडल्यावर जेव्हां रेसिडेन्सींतल्या लोकांना गोरे सैनिक आपल्यापासून थोड्या अंतरावर शहराच्या वेगवेगळ्या भागांत दिसूं लागले तेव्हां त्यांच्या आनंदाला सीमा उरली नाहीं. त्यांनीं सारखा जयजयकाराचा घोष चालविला होता. रात्रीं ज्या वेळीं गोरे सैनिक रेसिडेन्सींत आले तेव्हां तेथील मंडळींचा टांगलेला जीव खालीं पडला.

वेढ्याच्या काळांत रेसिडेन्सींतले इंग्रज बाहेरच्या जगाला सर्वथैव अंतरले होते. जुलईपासून पुढच्या वीस दिवसांत त्यांना शेजारच्या कानपुरास काय चाललें आहे याचेंहि ज्ञान नव्हतें. ता. २१ जुलईच्या रात्रीं इंग्रजांचा अंगद नांवाचा एक वार्ताहर आला तेव्हां हेवलॉकनें कानपूर जिंकल्याचें इत्थंभूत वर्तमान त्यांना प्रथम कळलें. ता. २२ रोजीं तो हेवलॉकला भेटण्यासाठीं निघाला आणि १५ ऑगस्टला हेवलॉकचें दस्तूर खुद्द पत्र घेऊन लखनौच्या रेसिडेन्सींत त्यानें प्रवेश केला. त्या पत्रांत आणखी सुमारें महिनाभर मदतीकरितां थांबावें लागेल, असें हेवलॉकनें सुचाविलें होतें. त्या पत्राचें उत्तर घेऊन अंगद दुसऱ्या दिवशीं जो गेला तो २९ ऑगस्ट रोजीं रेसिडेन्सींत परतला. हेवलॉकसमोर आपल्याला सोडविण्याशिवाय दुसरें कर्तव्य नाहीं व तें कर्तव्य सिद्धीस नेण्याच्या उद्योगाखेरीज तो कानपुराला दुसरें काम करीत नाहीं, याबद्दल शंका नसूनहि रेसिडेन्सींतील अधिकाऱ्यांना स्वस्थ राहवेना म्हणून त्यांनीं अंगदाला १६ सप्टेंबर या दिवशीं पुनश्च एकवार बाहेर पाठविलें. आतां तो एका आठवड्याच्या आंत आउटरॅमच्या पत्रासह (ता. २२ सप्टेंबर) माघारीं आला. त्याच्या मागोमाग तीन दिवसांनीं हेवलॉक आउटरॅम लखनौस येऊन धडकले. अंगदानें तीनदां ज्या येरझारा केल्या त्याबद्दल प्रत्येक खेपेचा रु. ५००० असा मोबदला ठरला होता. त्याप्रमाणें एकूण १५ हजार रुपयांची रक्कम त्याच्या पदरांत आउटरॅमनें सन्मानपूर्वक टाकली. हा मोबदला वरवर पाहतां प्रचंड वाटला तरी त्या दिवसांत एकट्या दुकट्या बातमीदाराचें काम अतिशय धोक्याचें होतें हें

लक्षांत ठेवल्यास या मोबदल्याचें आश्चर्य वाटणार नाहीं. बातमीदार म्हणून एखाद्याबद्दल जरासा संशय आला तरी उठावाचे शिपाई त्याला ठार मारण्याला मागेंपुढें पाहात नसत झडती घेतल्यासहि पत्रें सांपडूं नयेत, अशा तरतुदीनें बातमीदारांचा प्रवास चाले. ग्रीक अक्षरांनीं पत्राचा मजकूर लिहिण्याचा प्रघात इंग्रजांनी ठेवला होता. अंगद आपलें हें काम कोणत्या हिकमती लढवून पार पाडी याचा तपशील सांपडत नाहीं. फक्त एकदां शत्रूच्या कैदेंत राहावें लागल्यानें फार विलंब घडला, एवढा खुलासा इतिहासामध्यें नमूद आहे. अंगद हा बातमीदार होण्यापूर्वीं इंग्रजाच्या नोकरीचा पेन्शनर होता. याच्या जोडीला अवधान (अयोधन ?) सिंग नांवाच्या बातमीदाराचें नांव लखनौच्या हकीकतींत दृष्टीस पडतें. परंतु तो अंगदासारखा आपल्या कामांत कुशल नव्हता. अंगदाच्या बातम्या खऱ्या नसाव्या, असा रेसिडेन्सींतील हिंदी कामगारांचा पक्का समज होता. या इसमाला पुढें करून इंग्रज आपल्याला फसवीत आहेत, अशी कल्पना ते बोलून दाखवीत; यामुळें ज्या दिवशीं कानपुराहून आलेल्या मदतीच्या तोफा लखनौच्या रस्त्यांतून दणाणूं लागल्या त्यादिवशीं त्यानें अक्षरशः उड्या मारून आपला आनंद व्यक्त करीत हिंदी संशयात्म्यांना हैराण करून सोडलें.

अंगद व त्यासारखे बातमीदार बाहेरून आले म्हणजे लखनौ शहरांतील स्थितीच्या माहितीचे कण इंग्रजांच्या हातीं लागत; रेसिडेन्सींत इंग्रजांच्या बाजूनें लढणारे शिपाई हें अशा माहितीच्या कणांचें दुसरें साधन होतें. रेसिडेन्सीच्या लढाऊ ठाण्यालगत ज्या इमारती होत्या, त्यांतून संधि सांपडली कीं कांहीं शिपाई रेसिडेन्सींतील आपल्या जातभाईशीं बोलायला येत असत. रेसिडेन्सीच्या इंग्रजधार्जिण्या शिपायांना नाना प्रकारचीं आमिषें दाखवून फोडण्याचा यत्न करणें हा बहुधा या संवादाचा मुख्य उद्देश असे. स्वतःची बढाई सांगितल्याशिवाय रेसिडेन्सीच्या शिपायांवर फितुरीचा प्रभाव पडणार नाहीं, अशा समजुतीनें बाहेरचे सल्लागार शिपाई खोट्याबरोबर खऱ्या बातम्या उच्चारीत असत व त्या बातम्या पारखून इंग्रज लोक शहरांतील स्थितीचें आकलन करीत. या खेरीज मधून मधून शहराच्या बाजारभागांतून दिवसा रात्रीं होणार । आरडाओरडा हें आणखी एक बातम्यांचें साधन होतें. हा आरडाओरडा पैशासाठीं शिपाई प्यादे लखनौचीं दुकानें लुटीत आहेत असें सुचवी. शहरांत कोणते नवे तालुकदार आपलीं माणसें घेऊन आले व

त्यांचे काय मनसुबे आहेत, याचा सुगावा आंतबाहेरच्या शिपायांमध्यें चालणाऱ्या संवादाच्या द्वारें लागे. हल्ल्यानिमित्त रेसिडेन्सीबाहेर निघून आसपासच्या घरांतून शिरल्यास तेथें दिसणाऱ्या खाणाखुणांवरून शिपायांच्या व्यवहाराविषयीं स्थूल कल्पना करतां येत असे. कांहीं घरांतून इंग्रजांना कबरींचे उंचवटे आढळले. मयतांना जवळच्या घरांतून गाडून टाकण्याच्या रीतीचें हें स्पष्ट लक्षण होतें. घरांतून खोल चर खणलेले व त्यांत रक्तामांसाचे अवशेष हे प्रकार पाहण्यांत आले कीं गोळीबार चुकविण्यासाठीं केलेल्या चरांत रक्तबंबाळ जखमी शिपाई जाऊन पडत असावे, या तर्काला अवकाश फावे. इंग्रजाचें लष्कर लखनौंत शिरल्याशिवाय राहात नाहीं, अशी खात्री होतांच शिपाई व नागरिक यांचीं शहराबाहेर पडण्यासाठीं चाललेली धावपळ तर उघड दिसणारी होती. एकदां सोन्याचा भाव शहरांत अतोनात वाढल्याचें इंग्रजांच्या कानीं आलें. शिपायांनी केलेल्या लुटींत चांदीचें प्रमाण अतिशय मोठें असल्यानें चांदीचें ओझें कमी करण्यासाठीं ते सोन्याच्या मागें लागले आहेत, असा सोन्याच्या वाढलेल्या दराचा खुलासा इंग्रजांना मिळाला. रेसिडेन्सींतल्या इंग्रजांच्या स्थितीची इत्थंभूत वार्ता बाहेरच्या शिपायांना समजत असे. वेळोवेळीं राजरोसपणें किंवा चोरून रेसिडेन्सी सोडणारी हिंदी माणसें बातम्यांचा पुरवठा बाहेर करीत असत हें मुद्दाम सांगायला नको. बातम्या काढण्यासाठीं करावा लागणारा खटाटोप व खर्च कानपूरची कुमक आल्यावर साहजिकच ओसरला.

नवें लष्कर आल्यानें रेसिडेन्सीच्या कोंडवाड्याचा विस्तार झाला. पण कोंडवाडा कायमच राहिला. रेसिडेन्सींतील माणसांना बाहेर काढून सुरक्षित जागीं नेण्याचें सामर्थ्य हेवलॉक-आउटरॅमच्या सैन्यांत नव्हतें. रेसिडेन्सीच्या लोकांना हेवलॉक-आउटरॅम यांनीं कुमक पुरविली, एवढाच या प्रयत्नाचा अर्थ आहे. ही कुमक रेसिडेन्सीच्या जागेंत सामावणें शक्य नसल्यानें त्या जागेजवळचे वाडे काबीज करून तेथें नव्या फौजेसाठीं राहण्याची सोय लावण्यांत आली. ता. २६ सप्टेंबरपासून आउटरॅमनें आपल्याकडे सैन्याचा पुढारीपणा घेऊन हे वाडे जिंकण्याचें काम सुरू केलें. सैन्याच्या वस्तीला पुरेशी जागा मिळाली म्हणून शिपायांशीं झगडा थांबला असें समजण्याचें कारण नाहीं. शिपायांनीं झुंज चालू ठेवली. फरक इतकाच पडला कीं, त्यांच्या बंदुकांची कार्यक्षमता पूर्वीप्रमाणें उरली नाहीं. ही उणीव भरून

काढण्यासाठीं त्यांनीं तोफांचा उपयोग करण्याचें ठरविलें. शिपायांनीं काढलेली ही तोड फार चातुर्याची होती, अशी त्यांच्या प्रतिपक्ष्याची साक्ष आहे. ही तोड टिकवून धरली असती तर आपलें फार नुकसान झालें असतें, असा अनेक इंग्रजांचा अभिप्राय आहे. पण शिपायांचाच आपल्या डावावर विश्वास नसल्या-प्रमाणें त्यांनीं तोफांची नाचवानाचवी सुरू केल्यामुळें इंग्रजांचें काम हलकें व सोपें झालें. आतां गोऱ्या सेनापतींनीं बचावाचें धोरण सोडून चढाईचें धोरण पत्करलें व शिपायांच्या विजयाचें भय पळवून लावलें. रेसिडेन्सीच्या वाटेवर असतांना गोऱ्यांना दिल्लीच्या पाडावाची वार्ता समजली होती. नंतर दिल्लीचा बादशहा कैद केल्याची वातमी कानावर आली. यामुळें शिपायांच्या उठावाची काळजी इंग्रजाला इतःपर तितकीशी वाटेनाशी झाली.

लॉरेन्सच्या वेळीं अडकलेल्या गोऱ्या लोकांबरोबर हेवलॉक-आउटरॅमचें दळ लखनौच्या कोंडींत गुरफटलें. त्यांना सोडविण्याची कामगिरी कम्बेल या सरसेनापतीनें नोव्हेंबराच्या उत्तरार्धांत शेवटास नेली. तो नोव्हेंबर ३ तारखेस कानपूर येथें आला. तेथें त्याला काल्पीच्या भागांत ग्वालेरचे शिपाई जमा झालेले असून कानपुरावर धावण्याचा त्यांचा निश्चय आहे असें कळलें. परंतु त्यानें या धोक्याला थोपविण्यापुरती कानपुरास तजवीज करून लखनौकडे जाण्याचा उद्देश अंमलांत आणला. ता. ९ नोव्हेंबरला कॅंबलनें तिकडे कूच सुरू केलें. लखनौस कोणत्या मार्गानें लढाई केल्यास नफा जास्त व तोटा कमी होईल, याची माहिती एका कॅवनाघ नांवाच्या इंग्रजाकडून समजली. हा इंग्रज हिंदी वेषानें एका हिंदु वाटाड्याबरोबर आउटरॅमनें पाठविल्यावरून कम्बेलच्या छावणींत आला होता. त्याची माहिती विचारांत घेऊन ता. १५ नोव्हेंबर रोजीं कम्बेल लखनौस भिडला. पहिली झुंज सिकंदरबाग येथें झाली. येथें शिपाई अतिशय आवेशानें लढले. मोजून दोन हजार शिपाई या ठिकाणीं ठार पडले. बागेच्या उघड्या आवारांत, आंतील इमारतीच्या खोल्यांतून, जिन्यावरून निकराची हाणमार चालली होती. सिकंदरबागेमागून शहानाजफ नांवाच्या इमारतीसाठीं असेंच लढावें लागलें. याप्रमाणें शिपायांचें एकेक ठाणें उखडतां उखडतां रात्र झाली व ता. १६ ला पुनः लढाई जुंपली. या वेळीं हेवलॉक-आउटरॅम यांनीं उचल करून आणखी कांहीं इमारती ताब्यांत घेतल्या. लखनौच्या कोंडींतल्या सैन्यामध्यें या प्रसंगीं विशेष उत्साह संचरला होता. इतके दिवस लहानशा जागेंत लढून लढून त्या सैन्याला कंटाळा आला होता. आतां हा

कोंडमारा निश्चित संपणार, हें ह्या उत्साहाचें कारण होतें. ता. १६ चा सारा दिवस लढाईंत गेला. अखेरीस या तिघां सेनापतींची भेट होण्याचा योग आला. कोणत्या मार्गानें तेथील बायका, मुलें, आजारी, जखमी वगैरे लोकांना सुरक्षित बाहेर काढावयाचें, याची पाहणी करून ता. १८ रोजीं रात्रीं या सर्व बिनलढाऊ मंडळींची यात्रा निघाली. एकीकडे झटापटींचा दणका व दुसरीकडे सदर यात्रेकरूंचा सुरक्षित प्रवास असा हा दुहेरी कार्यक्रम असल्यानें लखनौ शहराच्या सीमेबाहेर मोकळ्या मैदानांत ही यात्रा एका आठवड्यानें पोचली. आपली सुटका झाली या स्थितीचा निर्भेळ आनंद गोऱ्या लष्कराला आणि प्रस्तुत यात्रेकरूंना भोगतां आला नाहीं. कोंडींत ठार झालेल्यांचें स्मरण त्यांना सुटकेचा आनंद यथेच्छ भोगूं देत नव्हतें, त्यांत ता. २४ नोव्हेंबर या दिवशीं हेवलॉकला मृत्यूनें गांठून त्यांच्या आनंदाला आणखी खो दिला. लखनौस गेल्या दिवसांनंतर हेवलॉकची प्रकृति सारखी खालावत असून लढाईच्या श्रमांत मात्र खळ नव्हता. शेवटीं 'मरणं प्रकृतिः' हें सुभाषित खरें ठरलें.

लखनौच्या रेसिडेन्सीवाल्याची सुटका हें हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावरील ओढवलेल्या संकटनिवारणाचें दुसरें पर्व असून त्याला येथें सोडावें आणि या कालावधींत अन्यत्र कोणत्या घडामोडी झाल्या त्याकडे दृष्टिक्षेप करावा हें उचित ठरेल. दिल्ली, कानपूर व लखनौ या संकटाच्या तीन गांठी होत्या. त्यावरच इंग्रजी राज्याचें भवितव्य अवलंबून होतें, यासाठीं कालानुक्रम सोडून इतर घडामोडींचा पुढें विचार केला आहे.

* * *

23233 वि.
क्रमांक ....७०.७...... नों: दि:

~ ४ ~

# केंद्रीय सत्तेचें शक्तिचक्र

दिल्ली, कानपूर व लखनौ या तीन शहरांतील धामधुमीचा वृत्तान्त येथवर निवेदन केला. मेपासून नोव्हेंबर अखेरपर्यंतच्या महिन्यांच्या हकीकतीं-मध्यें ब्रिटिश कंपनीच्या राज्यकर्त्यांनीं सर्वत्र पसरलेल्या शिपाई-गर्दीच्या आगींतून वरील तीन शहरांसंबंधांत आपले प्रयत्न केंद्रित करून विजयाचा मार्ग कसा काढला, हें त्या त्या स्थळापुरतें कालक्रमानुसार स्पष्ट केलें असलें तरी शिपाई-गर्दीच्या प्रतिकाराचें आद्यस्थान बनारस, अलाहाबाद, कानपूर, दिल्ली किंवा लखनौ यांपैकीं एकहि नसून तें कलकत्ता होतें हें सहज कळण्यासारखें आहे. १८५७ च्या शिपाई-गर्दीचा विषय छेडला जातांच, मीरत, दिल्ली, कानपूर, लखनौ व झांशी या स्थळांचीं नांवें झटकन् डोळ्यापुढें येतात, त्या अनुभवास अनुसरून (मागें झांशी वगळून इतर) तीन शहरांची माहिती प्रथम दिली आहे. झांशी हें शहर जूनच्या प्रारंभीं शिपाई-गर्दींत सामील झालें होतें, परंतु कंपनीच्या राज्यांतल्या मर्मांपैकीं तें ठाणें नसल्यानें झांशी ( बुंदेलखंड ) आणि तत्कालीन मध्यभारत ( सेंट्रल इंडिया ) या प्रदेशांतील शिपाई-गर्दीची दखल कंपनीच्या राज्यकर्त्यांनीं १८५८ च्या मार्चपर्यंत गंभीरपणें घेतली नाहीं. त्याकडे त्यांचें दुर्लक्ष होतें, असा याचा अर्थ नव्हे. त्या भागांतील व मुंबईचे इंग्रज अधिकारी प्रतिकाराची धडपड करीत होते, परंतु त्या धडपडीला भरभक्कम लष्कराचें बळ १८५८ साल उगवेपर्यंत मिळालें नाहीं एवढाच त्याचा अर्थ आहे. त्या मुलखांत काय चाललें होतें, याची हकीकत पुढें

यावयाची आहे. त्यापूर्वी राजधानींतल्या सूत्रधारांच्या करामतीची पाहणी केल्यास अनाठायीं ठरावयाचें नाहीं व तसें करतांना गव्हर्नर-जनरल कॅनिंग याचें नांव प्रामुख्यानें उच्चारणें भाग आहे.

## दिरंगाई व चपळाई

लॉर्ड डलहौसी हा गव्हर्नर-जनरल आठ वर्षे आपली कारकीर्द गाजवून १८५६ च्या फेब्रुवारींत स्वदेशीं गेला व त्याच्या जागीं लॉर्ड कॅनिंग आला. हिंदुस्थानांतील ब्रिटिश कारभाराचें योग्य ज्ञान होतें न होतें तोंच १८५७ मध्यें शिपाई-गर्दीच्या संकटाशीं टक्कर मारण्याची जबाबदारी कॅनिंगवर पडली. आपल्या हाताखालच्या फौजेची राज्यनिष्ठा बिघडली असल्याची व केव्हांतरी ही स्थिति आपल्या राज्याला घातक ठरण्याची कल्पना कॅनिंगला १८५७ च्या जानेवारीपासून पुसट पुसट होती. १८५७ च्या मार्चमध्यें मंगल पांड्याच्या प्रकरणानें त्या कल्पनेला प्रत्यक्ष अनुभवाचा निःसंदिग्ध स्पष्टपणा आला. जी आपत्ति धुमसत होती ती पेटून उठल्यावरदेखील तिची खोली आणि व्याप बिनचूक पटवून देणारे सहकारी कॅनिंगपाशीं नसल्यानें तो मीरतच्या उठावापर्यंत कांहींसा असावध राहिला. मंगल पांड्याच्या पलटणीचें शासन ता. ५ मेपर्यंत लांबत राहिलें हें कॅनिंगच्या असावधान वृत्तीचें एक प्रमाण आहे. ता. १० मेचा मीरत येथील स्फोट, मीरतच्या शिपायांनीं घेतलेला दिल्लीचा कबजा, आणि या स्फोटामागोमाग उत्तर भारतामध्यें सर्वत्र— पंजाब, राजस्थान, सिंध हे प्रांत वगळून जेव्हां शिपाई-गर्दीची वाढती लाट दिसली तेव्हां कॅनिंगच्या बुद्धींतील शिपायासंबंधाची विश्वासाची हळूहळू विरत चाललेली गुंगी साफ उतरली, त्याचे डोळे उघडले व ही लाट जिरविणाऱ्या उपायांच्या चिंतनांत व कार्यांत तो अहर्निश गुंतला. समोर प्रगटणाऱ्या घटनेचें तत्काळ यथोचित आकलन झालें तरी तिचा निकाल झटपट करून टाकण्याचा त्याचा स्वभाव नव्हता, असें कॅनिंगच्या चरित्र-लेखकांचें मत आढळतें. न्याय आणि विवेक यांचें साहचर्य आपल्या निर्णयांत असलें पाहिजे, यासाठीं तो जपून धिमेपणानें मे महिन्यांत वागला. नंतर त्यानें शिपाई-गर्दीवर एकामागून एक इलाज सुरू केले. तथापि मे महिन्यांतसुद्धां कॅनिंग अगदींच स्वस्थ नव्हता. त्यानें ब्रह्मदेश, मद्रास, सीलोन, मुंबई या प्रांतांकडील गोऱ्या फौजा बोलावल्याचें वृत्त पूर्वी सांगितलें आहे. उत्तर भारताच्या विस्तीर्ण प्रदेशांत गोरी फौज काळ्या शिपायांशीं तुलना

करतां संख्येनें अतिशय रोडावलेली होती, याचा निर्देश पूर्वी केला आहे,पण जास्त खुलाशाची आवश्यकता आहे.

### लष्कराचें समालोचन

१८३८ मध्यें अफगाण युद्ध उद्भवलें तेव्हां हिंदी फौज दीड लाखावर होती. पुढें शीख लढायांच्या वेळीं ही संख्या अडीच लाखांच्या घरांत गेली. डलहौसीनें ही संख्या सव्वादोन लाखांच्या आंत बाहेर आणून ठेवली. उलट गोरी फौज आधींच कमी होती (४८७०९) ती कॅनिंगनें राज्यसूत्रें हातीं घेतलीं त्या काळीं आणखी घटली (४५३२२). जाणत्यांनीं एका गोऱ्या शिपायास सरासरी पांच हिंदी शिपाई, अशी गोऱ्या काळ्या सैनिकांच्या संख्येंतील तफावत दाखविली आहे. तोफखान्यांत असाच फरक होता. बारा हजार हिंदी गोलंदाज तर साडेसहा हजार गोरे तोफची अशी स्थिति होती. गोऱ्या सैन्याची वांटणी सगळीकडे सारखी नव्हती. पंजाब, सिंध व अयोध्या प्रांत या नव्यानें काबीज केलेल्या प्रदेशांत गोऱ्या सैनिकांचा जास्तींत जास्त भरणा होता. शिपाई-गर्दीच्या वेळीं बराकपूर ते आग्रा या ७५० मैलांच्या अंतरांत मध्यावर दीनापूर येथें गोऱ्यांची एक लहानशी तुकडी होती. क्रिमियांतील रशियन युद्धाकरितां गोऱ्या फौजेच्या दोन पलटणी हिंदुस्थानांतून पाठवाव्या लागल्या. या प्रकारानें इंग्लंड अति प्रबळ शत्रूशीं झगडत असावा किंबहुना मार खात असावा, अशा विपरीत कल्पनां हिंदुस्थानांत फैलावण्याचा संभव आहे; कदाचित् आणखी थोड्या दिवसांनीं इराणांत गोरें लष्कर रवाना करावें लागेल; मग येथील राजवटीच्या स्थिरतेबद्दल व मजबुतीबद्दल विश्वास बाळगणें शक्य नाहीं; अशा अर्थाची तक्रार डलहौसीनें विलायती वरिष्ठांना कळविली होती. परंतु या तक्रारीचा विलायतेस विचार झाला नाहीं. १८५४ सालीं क्रिमियांत गेलेली गोरी फौज तिकडेच राहिली व १८५७ मध्यें स्फोटाच्या वेळीं इराणांतील गोरी फौज येथें परत आलेली नव्हती. फक्त हिंदी शिपायांवर भिस्त ठेवून राहिल्यास केव्हांतरी आपल्या राज्यावर गंडांतर येईल, अशी जाणीव डलहौसीप्रमाणें त्याच्या अनेक लहानमोठ्या सहकाऱ्यांनाहि होती. येथील फौजेची नव्यानें व्यवस्था व सुधारणा झाली पाहिजे, हा हिंदुस्थानांतील अनुभवी इंग्रज अधिकाऱ्यांचा आग्रह चर्चेच्या भूमिकेंतून कृतीच्या क्षेत्रांत कधींच योग्य रीतीनें आला नाहीं. डलहौसीनें येथून जाण्या-

पूर्वीं या संबंधांत जीं टिपणें लिहून विलायतेस पाठविलीं, त्यांतलीं कित्येक हरवलीं. उरलेलीं दप्तरांत कोंबली गेलीं.

विलायतच्या श्रेष्ठींना आपल्या हिंदुस्थानांतील राज्याला धोका आहे, हें भाकीत भेकडांच्या दुःस्वप्नासारखें वाटत असे. इंग्रजांची समशेर मागल्या शंभर वर्षांत जिकडे जाईल तिकडे सर्वदा विजयानें तळपली; एक इंग्रज पांचशें काळ्यांना भारी असून काळा आदमी शेंकडों वर्षांच्या गुलामगिरीनें पिचून इतका दुबळा बनलेला आहे कीं, तो कितीहि अपमान झाला किंवा केला तरी चिडणार नाहीं, प्रतिकाराला उभा राहणार नाहीं, इत्यादि समजुतींच्या घमेंडीनें विलायतच्या कारभाऱ्यांचें डोकें बधिरलें होतें. इकडे हिंदुस्थानांतील हिंदी शिपायांचे गोरे अंमलदार शिपायांवरील विश्वासातिरेकाच्या कैफांत होते. या विश्वासांत भाबडेपणा व चढेलपणा या दोन्ही दोषांचें मिश्रण दिसून येतें. शिपाई म्हणजे हुकुमाचा गुलाम ही एक भावना व आपण ज्याच्यांत बसतों उठतों, ज्याच्याबरोबर भल्याबुऱ्या प्रसंगांत दिवस काढले, समान सुखदुःखें भोगलीं, ज्याच्या हिताची काळजी आपण वाहतों, ज्याला आपण मुलाप्रमाणें वागवितों, तो शिपाई कधीं कृतघ्नपणानें आपल्यावर उलटणार नाहीं, ही दुसरी भावना; याप्रमाणें दोन भावनांच्या प्रेरणेनें गोरे लष्करी अंमलदार वागत होते. पण गोऱ्यांची निष्ठापूर्वक चाकरी हें शिपायांचें जीवनसर्वस्व नव्हते. चाकरीपलीकडच्या जीवनांचे धर्माच्या प्रेमासारखे, स्वाभिमानासारखे कांहीं घटक असे आहेत कीं त्यासाठीं चाकरीच काय पण प्राणांकडेहि शिपाई पाहणार नाहीं, याचें गोऱ्या अधिकाऱ्यांना कधीं अनुमानच करतां आलें नाहीं. जेव्हां हिंदी सैनिकांच्या असंतोषाचे चटके बसूं लागले तेव्हां त्यांची गोड किंवा कठोर भाषेनें समजूत घातली कीं त्यांचा असंतोष थंडावेल, या भ्रमानें पुष्कळ गोरे अंमलदार पछाडलेले होते. याहिउपर शिपाई आवरत नाहींसें वाटलें तर त्याला गोऱ्यांच्या जमावाचा व संगिनींचा धाक दाखवून वठणीस आणायचे, असा इंग्रज राज्यकर्त्यांचा पूर्वीपासून यशस्वी ठरत आलेला एक उपाय होता. त्या उपायामागें गोऱ्या लष्कराचें ठाण्याठाण्यावर जें पुरेसें बळ पाहिजे, त्याची १८५७ सालीं उणीव होती व हिंदी सैनिकांना ही उणीव उत्तम प्रकारें माहीत होती. ही उणीव पंजाबांत नव्हती, यामुळें तेथील शिपायांचे उठाव दडपून टाकणें इंग्रज अधिकाऱ्यांना शक्य झालें. पंजाब यामुळें बहुतांशीं शांत राहिला.

## प्रतिकाराचे उपाय

बंगालमध्यें गोरें सैन्य थोडेंसें होतें, पण तें पांगलेलें होतें तरी तेथें शिपायांचा प्रत्यक्ष उठाव झाला नाहीं. त्यांनीं किरकोळ गडबड चालविली होती कलकत्त्याचे हिंदी सैनिक विश्वसनीय नाहींत, त्यांचा फिरंग्यांविरुद्ध कट चालू आहे, मार्चमध्यें इंग्रजांविरुद्ध उठण्यासाठीं त्यांनीं एक दिवस निश्चित केला होता, त्याचप्रमाणें ता. २५ मे या व्हिक्टोरिया राणीच्या वाढदिवशीं शिपाई दंगा करणार वगैरे बातम्या अधिकाऱ्यांच्या कानावर होत्या व त्यांच्या खरेपणाबद्दल खात्री होतांच बातम्यांच्या स्वरूपानुसार योग्य उपाय तावडतोब योजून शिपायांच्या खलबतांना डोकें वर काढायला कधींच संधि दिली नाहीं. तथापि विषाची परीक्षा टाळण्यासाठीं हळू हळू त्यांनीं शिपायांकडे असलेलीं महत्त्वाचीं कामें गोऱ्या सोजरांकडे सोंपविलीं. तरी १४ जून या दिवशीं कलकत्त्याच्या गोऱ्या-काळ्या ख्रिस्ती नागरिकांची जी धांदल उडाली तिचीं मनोरंजक वर्णनें इंग्रजी पुस्तकांतून आलेलीं आहेत. त्या तारखेला रविवार होता. शहरांत अशी अफवा उठली कीं रात्रीं शिपाई लोक साऱ्या गोऱ्या-काळ्या ख्रिस्त्यांची कत्तल व लूट करणार आहेत. त्या अफवेपायीं या समाजानें घरेंदारें सोडून किल्ल्यांकडे धांव मारली; पुष्कळांनीं बंदरावरील जहाजांचा आश्रय घेतला. या अफवेमध्यें कांहींच तथ्य नव्हतें असें दिसल्यावर हीं सारीं पळालेलीं माणसें घरोघर परतलीं. हा रविवार घाबरगुंडीचा रविवार (पॅनिक संडे) या नांवानें प्रसिद्ध आहे. कलकत्ता देखील सुरक्षित नाहीं व लोकांच्या ठिकाणीं धीर उत्पन्न करणारी गोरी फौज भरपूर हाताशीं नाहीं म्हणून गोऱ्यांचें स्वयंसैनिक दळ उभें करण्याला कॅनिंगनें परवानगी दिली. अशा दळाची गोऱ्या व्यापारी वर्गानें मे महिन्याच्या शेवटीं केलेली मागणी कॅनिंगच्या सरकारानें झिडकारली होती. ही चूक त्यानें मागून सुधारली, हिंदी सेनेंतील राज्यनिष्ठ शिखांची एक तुकडी अस्तित्वांत आणली. कलकत्त्यास अयोध्येचा नबाब होता व तिकडे उत्पातेच्छु शिपायांनीं सूत्र लावलें आहे, असा संशय बळावतांच त्याला त्याच्या निवासस्थानांतून काढून किल्ल्याच्या अटकेंत ढकललें. त्याला किल्ल्यांत कोंडल्याच्या बातमीनें कोणी गडबड करतील, ही कलकत्तेवाल्या गोऱ्यांची भीति खोटी ठरली. काळ्या-गोऱ्यांच्या वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य घातक आहे, असें निदर्शनास येतांच कॅनिंगनें

त्यांच्या स्वातंत्र्यावर कायद्याचें दडपण उत्पन्न केलें. हा कायदा 'मुस्कट-दाबीचा कायदा' या नांवानें प्रसिद्ध पावला. सदर कायदा करतांना काळा गोरा असा पंक्तिप्रपंच कॅनिंगनें पाळला नाहीं म्हणून गोऱ्यांच्या अंगाची आग झाली. त्यानंतर लोकांचीं हत्यारें काढून घेण्याची कारवाई कॅनिंगनें केली, तेव्हां तिच्या तावडींतून गोरे सुटले नाहींत, यामुळें गोऱ्या समाजानें आपल्या हृदयांतील तडफडाट उघडकीस आणला, पण कॅनिंगवर त्याचा परिणाम घडला नाहीं. शिपाई व त्यांचे गुंड साथीदार यांच्या गुन्हेगारीचा पकडल्या जागीं तडकाफडकी अधिकाऱ्यांना निकाल करतां यावा, या हेतूनें लष्करी कायदा पुकारण्याची व त्या अन्वयें नेहेमींचे कायदेकानू, कोर्टें बाजूला सारून वागण्याची लष्करी विनलष्करी अधिकाऱ्यांना सवलत देण्यांत आली. या सवलतीचा पुष्कळ गोऱ्या अंमलदारांनीं व साध्या गृहस्थांनीं दुरुपयोग चालविल्याचीं खात्रीलायक उदाहरणें पाहून ही सवलत पुढें कॅनिंगनें रद्द केली. गोऱ्या समाजांतील कॅनिंगची अप्रियता वाढण्याला यामुळें पुनः अवसर सांपडला. परंतु कॅनिंगला आपल्या कामगिरीच्या चोखपणाबद्दल अढळ विश्वास होता. या खडतर काळीं राज्यरक्षणासाठीं जे उपाय कॅनिंगनें स्वीकारले त्यांच्या योग्यायोग्यतेचा वाद इंग्रज इतिहासकारांनीं केला आहे. त्यांपैकीं कांहींचा रोष कॅनिंगवर तर कित्येकांचा कॅनिंगच्या सहकाऱ्यांवर आहे. कॅनिंगचा करडेपणा पुरेसा निर्दय किंवा क्रूर नव्हता किंवा त्यानें आपलें करडें धोरण लवकर पत्करलें नाहीं, असा आक्षेपकांच्या युक्तिवादाचा मथितार्थ निघतो.

**सैन्याची जुळवाजुळव**

देशांतील दंगल दाबण्याचे हे उपाय सैन्यबळ वाढल्याखेरीज निरुपयोगी असल्याबद्दल कॅनिंगला शंका नसल्यानें तो गोऱ्या सैन्याची मदत जिकडून मिळेल तिकडून जमविण्याच्या खटपटीस लागला. चीनमधील युद्धाचा निर्देश मागें आला आहे. त्या युद्धासाठीं निघालेल्या फौजेला हिंदुस्थानाकडे वळवून आणण्याचें त्यानें मनावर घेतलें. लॉर्ड एल्जिन व ॲशबर्नर हे दोघेजण त्या फौजेचे मुख्याधिकारी होते. हिंदुस्थानांतील भयानक स्थितीची पूर्ण कल्पना होऊन त्या दोघांनीं आपल्या साह्यास धांवून यावें अशा तळमळीच्या भाषेंत कॅनिंगनें त्या दोघांना मे महिन्यांत पत्रें लिहिलीं. त्यांच्या विद्यमानें कलकत्त्यास गोरी फौज आली, पण तिला ऑगस्ट महिन्याइतका उशीर लागला. त्यापूर्वीं मद्रासची गोरी फौज, इराणांतलीं दळें व त्यांचे सेनापति अशी मदत येऊन

पोचली आणि शिपाई-गर्दीच्या प्रतिकाराचा पाया घातला गेला हा वृत्तान्त पूर्वी वाचकांच्या नजरेस आणलेला आहे. मुंबईचा सुभेदार (गव्हर्नर) एल्फिन्स्टन याच्याकडे कॅनिंगची हाक जातांच त्यानें मॉरीशस व दक्षिण आफ्रिका येथील इंग्रज अधिकाऱ्यांना पत्रें पाठविलीं. त्यांनीं जेवढे गोरे सैनिक आपापल्या ठिकाणाहून रवाना करतां आले तेवढे धाडून दिले. मॉरीशसवाल्यानें द्रव्य-बळदेखील पुरविलें. या लांबून आलेल्या मदतीच्या जोडीला जवळची नेपाळांतील गुरख्यांची मदत कॅनिंगनें घेतली. नेपाळसरकारानें मदतीचें बोलणें काढलें तेव्हां प्रथम कॅनिंग या मदतीसंबंधांत उदासीन होता. गुरख्यांचा झुंजारपणा ओळखून इंग्रजांनीं त्यांची हिंदी सैन्यांत आधींच भरती केलेली होती. शिपाई-गर्दीच्या प्रारंभीं त्यांच्या एका तुकडीनें सिमल्याच्या भागांत आड-मुठेपणा दाखविल्यानें त्यांच्या इमानाबद्दल कॅनिंग साशंक असल्याप्रमाणें एकदां नेपाळसरकारशीं वागला. परंतु दिल्लीस गुरख्यांनीं चालविलेली कामगिरी पाहूनच कीं काय त्यानें गुरखा लष्कर आपल्या मदतीस निस्संकोचपणें येऊं दिलें. जुलईच्या अखेरीस (ता. २८) नेपाळी गुरखा सैनिकांनीं गोरखपुराच्या मार्गे या देशांत प्रवेश केला. त्यानंतर त्यांच्या सैन्याचा व पराक्रमाचा ओघ सारखा वाहात होता. गोरखपूर, आझमगड, जौनपूर वगैरे भागांत गुरख्यांच्या साह्याचा अतिशय उपयोग झाला.

— २ —

### पंजाबची कामगिरी

शिपाई-गर्दीची दिल्लींतील संघटना उधळून लावायला पंजाब इलाख्यां-तून झालेली मदत सहज डोळ्यांत भरणारी आहे. हा प्रदेश जिंकून ताब्यांत घेतल्याला १८५७ पूर्वी अवघी आठच वर्षे लोटलीं होतीं. शिखांनीं बंगाली दळाच्या उठावणीला दुजोरा द्यावयाला पाहिजे होता, असें सकृद्दर्शनीं कुणालाहि वाटणें स्वाभाविक आहे. परंतु शिखांना बंगाली सेनेच्या ब्राह्मण रजपूत शिपायां-विषयीं मुळींच प्रेम नव्हतें; उलट तिटकारा होता असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या तिटकाऱ्याचा फायदा इंग्रजांच्या पदरांत पडला. शिवाय पंजाबांत गोऱ्या व हिंदी फौजेच्या संख्येंत फरक असला तरी तो भयानक नव्हता. तेथें अकरा हजार गोरे तर छत्तीस हजार काळे सैनिक होते. त्यांत ब्राह्मण रजपूत शिपायांची संख्या जास्त होती व त्यांच्यांतहि उठावणीचें वारें

खेळत होतें. पंजाबांत लष्कराखेरीज तेरा हजार शिबंदी (इर्रेग्युलर) आणि बारा हजार लष्करी पोलीस होते. त्यांचा कल कुणाकडे झुकतो, याची पंजाबांतील इंग्रजांना शंका होती, परंतु त्यांनीं जेव्हां शिपायांच्या उठावणीला चिरडण्याचा उद्योग हातीं घेतला तेव्हां बंगाली फौजेला पंजाबांत पाठिंबा नाहीं, असा अनुभव आला.

पंजाबांत त्या वेळीं जे इंग्रज अंमलदार होते, ते तडफदार वृत्तीचे असल्यामुळें मीरतची बातमी पोचतांच निरनिराळ्या छावण्यांतील बंगाली शिपायांचीं हत्यारें काढून घेतांना त्यांनीं दिरंगाई केली नाहीं. ता. १० मे नंतरच्या एका महिन्यांत मियामीर (लाहोर), लाहोरचा किल्ला, अमृतसर, फेरोजपूर, पेशावर, मुलतान, वगैरे शहरांच्या छावण्यांतील राज्यद्रोही शिपायांचीं हत्यारें काढून घेण्याचा विधि झपाट्यानें उरकण्यांत आला. सरहद्दीवरील मर्दानच्या छावणींतल्या शिपायांनीं पेशावरचें राज्यनिष्ठ लष्कर आपल्या रोखानें येतांना पाहून हत्यारें टाकण्याऐवजीं पठाणांच्या मुलखांत पळ काढला; तेथें पठाण त्यांच्याविरुद्ध उठले. त्याच्या आधीं पाठलागांत त्या शिपायांपैकीं बरेच मारले गेले होते. पुष्कळ शिपाई याप्रमाणें मेले; सुमारें सव्वाशेंजणांनीं परत येऊन शरणागति स्वीकारली, परंतु त्यावर शिक्षेदाखल मरण ओढवलेंच. जालंधर, लुधियाना, येथील शिपायांना आपली राज्यनिष्ठा घातपात साधून झुगारतां आली. फिलोर व सिआलकोटच्या छावण्यांत जुलईमध्यें उठाव झाला, परंतु मार्गांत गोऱ्या सैनिकांनीं त्यांना गांठून त्यांचा फडशा उडविला. सिआलकोटास शिपायांनीं दोघां गोऱ्या अंमलदारांना आपला पुढारीपणा घेण्याविषयीं सांगून पाहिल्याची चमत्कारिक वार्ता शिपाई-गर्दीच्या इतिहासांत नमूद आहे. याप्रमाणें सर्व अराज्यनिष्ठांचा कांटा उपटून टाकल्यामुळें पंजाबांत इंग्रजांना भय उरलें नाहीं. मग तेथील अधिकारी दिल्लीकडे सारखी माणसांची, दारूगोळ्याची व अन्नधान्याची कुमक पाठविण्याला समर्थ झाले.

### संधिसाधु पठाण

त्या प्रदेशांतील शिपायांच्या उठावाचें अंतस्थ भय दूर झालें; पण अफगाणिस्तान हें एक भयस्थान शिल्लक होतें. इंग्रजांनीं साह्य करून तक्तावर बसविलेल्या दोस्त महंमद अमीराची व ब्रिटिश अधिकाऱ्यांची १८५७च्या जानेवारींत भेट होऊन ‘ इंग्रजांनीं त्याला खंडणी द्यावी आणि त्यानें इंग्रजाच्या

वाटेस जाऊं नये ' अशा धोरणाचा एक नवा मैत्रीचा करार कॅनिंगच्या संमतीनें झाला होता. अफगाण अमीर या शिपाई-गर्दीच्या प्रसंगीं त्या करारास जागल्यानें तिकडची धास्ती उरली नाहीं. ही व्यवस्था शिपायांच्या उठावा-आधीं सहज होऊन गेली होती. तथापि न जाणो अमीरानें करार मोडला तर पेशावर सोडायचें कीं तें ठिकाण बळकट धरून ठेवायचें, या प्रश्नाची शहानिशा पंजाबचा सुभेदार (चीफ कमिशनर) लॉरेन्स व कॅनिंग यांच्या दरम्यान चालली होती. कांहीं झालें तरी पेशावर हातचें जाऊं द्यावयाचें नाहीं, असा अखेरीस पक्का निश्चय करण्यांत आला. अफगाण राज्यांतील पठाण तटस्थ राहिले तरी सरहद्दीनजीकच्या पठाणांना दोस्त महंमदाच्या कराराचें बंधन नव्हतें. त्यांतला एक पटाईत दरवडेखोर शिपायांशीं खलबत करून ज्या दिवशीं ते उठतील त्या दिवशीं आपला हात धुऊन घेण्याच्या इराद्यानें सरहद्दीपलीकडे आल्याची खबर इंग्रजांना होती. पण शिपायांचा डाव फिसकटतांच त्यानें पोबारा केला आणि इतर पठाणांनीं इंग्रजांची लष्करी नोकरी पत्करली. इंग्रज हा शिपायांपुढें हार खात नाहीं, असें निश्चितपणें अनुभवास येण्यापूर्वी जे पठाण इंग्रज बोलावीत असूनहि त्यांच्या नोकरीकडे पाठ फिरवून बसले होते, तेच आतां नोकरीची याचना करूं लागले. पंजाबांतील शीख, हिंदु, तसेंच बंगाली फौजेचे ब्राह्मण रजपूत यांतल्या कोणाशींच पठाणांचें सूत नसल्यानें इंग्रजांनीं त्या समाजाचें लहानसें विश्वासू सैन्य उभारलें व पंजाबांतील कारभाराचा गाडा सुरळीत चालू केला.

### शिखांचा संकेत

पंजाबांतील पटियाला, झींद, नाभा हीं शीख संस्थानें कशीं वागतील हा प्रश्न त्यांच्या राजांनीं आपल्या साह्याच्या सक्रिय आश्वासनानें दूर केला. त्यांच्या फौजांचा प्रत्यक्ष लढाईत उपयोग झाला नाहीं; परंतु त्यांनीं पंजाब-दिल्लीच्या दळणवळणाचे रस्ते निर्विघ्न राखण्याचें काम बजावलें. आपले राजे इंग्रजांच्या पक्षाचे आहेत, या माहितीमुळें पंजाबांतील शीख समाज इंग्रजांना त्या काळीं सदैव अनुकूल राहिला, हा इंग्रजांचा फार मोठा फायदा होता. संस्थानिकांच्या अनुकूलतेपेक्षां शिखांना या वेळीं इंग्रजी चाकरीची जास्त ओढ वाटण्याचें एक विशेष कारण होतें. मोगल बादशाहीच्या काळीं शिखांचा कित्येकदां मुसल-मानांनीं जो भयंकर छळ केला, त्याचा सूड उगविण्याच्या कल्पनेंत दिल्लीवर

हल्ला करण्याचा व दिल्ली पादक्रान्त करून तें शहर यथेच्छ लुटण्याचा एक संकेत गुंतलेला होता. या संकेतापोटीं बादशहाच्या शिरच्छेदाचाहि हेतु असल्याचें पुढें सहजगत्या उघडकीस आलें. शिखांनीं आपलें राज्य गमावल्यावर त्यांच्या दिल्लीवरील स्वारीला कसलाच अर्थ उरला नाहीं. दिल्लीची लूट हा त्या संकेताचा दुसरा अंश या प्रसंगीं प्रभावशाली होऊन त्यानें शिखांना इंग्रजांच्या चाकरींत खेचलें. हिंदी समाजांतील प्रस्तुत भ्रमासारख्या दुबळेपणाचा फायदा उकळण्याइतका इंग्रज धूर्त व दक्ष होता. त्याच्या धूर्ततेचें आणखी एक उदाहरण म्हणजे त्यानें पंजाबांत मिळविलेलें कर्ज हें होय. पंजाबांतील धनाढ्यांकडून विशेषतः लहानमोठ्या राजेरजवाड्यांकडून त्यानें कर्ज मिळविलें. कर्ज काढलें कीं त्याची फेड व्हावी म्हणून कर्ज देणारा वर्ग ऋणकोचा पक्षपाती बनतो आणि तशी आवश्यकता उत्पन्न झाल्यास अधिक द्रव्यसाह्यालासुद्धां प्रवृत्त होतो, हें इंगित जाणण्याइतका इंग्रज चतुर होता. त्यानें कर्ज सक्तीनें मिळविलें कीं दात्यांच्या खुदपसंतीनें मिळविलें, हा प्रश्न गौण असून कर्जाचा दुहेरी फायदा इंग्रजांच्या वांट्यास आला ही वस्तुस्थिति महत्त्वाची आहे. पंजाबांत शेजारच्या सिंध प्रांतांतून लष्करी कुमक गेली, हा इंग्रजांच्या एकजुटीचा पुरावा डोळ्याआड करण्यासारखा नाहीं. पंजाबांत मनुष्याची गरज आहे, असें दिसतांच सिंधच्या सुभेदारानें वरिष्ठांच्या संमतीची वाट न पाहतां तशी मदत पाठवून दिली.

— ३ —

पंजाबकडून आतां पुनः एकदां कलकत्त्याकडे कॅनिंगची हालहवाल पाहण्यासाठीं वळलें पाहिजे. मागें त्याच्या संबंधाची जी हकीकत सादर केली ती जशी जुलै महिन्यापर्यंतची आहे, तशीच पंजाबची माहिती आहे. मे अखेरीस मद्रासची गोरी फौज नीलबरोबर आली व त्याच्यामागून हेवलॉक-आउटरॅम हे दोघे सरदार येऊन त्यांनीं कानपूर जिंकून लखनौस आपला मुक्काम नेला, हें वृत्त मागें सांगितलें आहे. लष्कराची कामगिरी एकसूत्री होण्याकरितां ॲन्सन, बर्नार्ड यांच्या मृत्यूनंतर सार्वभौम सरसेनापतीचा अधिकार ग्रँट नांवाच्या एका जुन्या लष्करी अंमलदाराला देण्यांत आला, परंतु हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याची बिकट स्थिति ध्यानांत आल्यावर इंग्लंडच्या मंत्रिमंडळानें कॉलिन कम्बेल याला मुख्य सेनापतीच्या सार्वभौम अधिकारावर नेमलें. हा

नुकताच क्रिमियाच्या लढाईत गाजलेला होता व पूर्वी हिंदुस्थानांतहि त्यानें अनेक वर्षे काढलेलीं होतीं. तो ऑगस्टच्या १३ तारखेस कलकत्त्यास पोंचला. त्याच्या सात दिवस आधीं (ता. ५ ऑगस्ट) चीनकडून लॉर्ड एल्जिन आला होता. त्याच दिवशीं विल्यम पील हा आरमारी सरदार आपल्या नाविक दलासह कलकत्त्यास डेरेदाखल झाला व ता. १८ ऑगस्टला त्यानें अलाहाबादची वाट धरली. त्याच्याबरोबर लांब पल्ल्याच्या व जबर माराच्या आरमारी तोफा होत्या. कानपूर-लखनौच्या भागांत शिपाई-गर्दीच्या प्रतिकाराची चांगली तरतूद चालू असली तरी कॅनिंगच्या ठिकाणीं दिल्लीचा घोर कायम होता. दिल्लीस इंग्रजांना पंजाबची मदत मिळत असून दिल्लींतून पुष्कळशा शिपायांनीं पाय काढण्याइतकी ऑगस्ट महिन्यांत इंग्रजी बाजूची प्रगति आहे, यामुळें दिल्ली लवकरच हातीं येईल, या समाधानावर आणि आशेवर दिवस कंठणें कॅनिंगला भाग होतें.

### कॅनिंगचें धोरण

जों जों संकटांचा उग्रपणा वाढत चालला तों तों कॅनिंगचा धीर-गंभीरपणाहि बळकट होत गेला. त्याच्या सहकाऱ्यांना मात्र निराशा बाधली. शिपायांचा सार्वत्रिक असंतोष व स्थानिक उठाव तुच्छ लेखून आरंभीं जे सहकारी कॅनिंगला कडक उपायापासून परावृत्त करीत होते तेच शिपाई-गर्दीचा झपाट्यानें होणारा विस्तार पाहून जवळ जवळ हतबुद्ध बनले. कॅनिंगनें आपल्या सहकाऱ्याप्रमाणें निराशेच्या झडपेंत स्वतःची बुद्धि मुळींच जाऊं दिली नाहीं. उतावळेपणा किंवा दीर्घसूत्रीपणा हे दोन्ही दोष त्यानें आपल्या उद्योगापासून दूर ठेवले. सगळे हिंदी येथून तेथून दगलबाज, विश्वासाला पूर्णपणें अपात्र, असा गोऱ्या प्रजेनें सारखा कोलाहल माजविला असूनहि कॅनिंग सरसकट सर्व हिंदी समाजाला दगेखोर मानायला तयार नव्हता. त्याच्या वाड्यावरील पहारेकरी व अंगरक्षक हे सर्व जुलईअखेरपर्यंत हिंदीच होते. 'विश्वासानें विश्वास वाढतो' या कल्पनेवर त्याची भिस्त होती. ही भिस्त खोटी नव्हती, असें सिद्ध करणारीं त्याच्यापुरतीं प्रमाणें आहेत. शिपायांनीं त्याचा घात किंवा घाताचा प्रयत्न केला नाहीं, हें पहिलें प्रमाण असून आपलीं हत्यारें काढून घेण्याचा अधिकाऱ्यांचा बेत असल्याचें कळतांच अंगरक्षक शिपायांनीं आपखुषीनें हत्यारें टाकलीं व हत्यारांवांचून ते कामावर

गेले. याच सुमारास एका शिपायानें किल्ल्यांतील दारूचें कोठार उडविण्या-संबंधाचा कट उघडकीस आणला. ता. १४ जूनच्या रविवारीं कलकत्त्याच्या ख्रिस्ती नागरिकांची जी धांदल झाली तिच्या मुळाशीं द्रोही शिपायांचा कट होता, असें म्हणतात. पण त्या कटाची आगाऊ सूचना देणारे शिपाईच होते. शिपायांना उठावणीचें उत्तेजन मिळण्याजोगा हा प्रसंग असूनहि ते स्वस्थ राहिले. नंतर गोरे सैनिक बोलावून कलकत्त्याच्या शिपायांचीं हत्यारें काढून घेण्याचा समारंभ झाला तरीहि कॅनिंगचे हत्यारबंद हिंदी शिपाई व अंगरक्षक आपलें कर्तव्य नेहमींप्रमाणें बिनबोभाट पार पाडीत होते. कॅनिंगचें शिपायांच्या बाबतींतलें विश्वासाचें धोरण अगदीं असमंजसपणाचें किंवा अपात्रीं होतें असें या हकीकतीवरून म्हणतां येणार नाहीं.

## गोरा समाज व कॅनिंग

कलकत्त्याच्या कारभाराचा ज्या कालावधींतील आढावा येथवर नमूद केला त्या कालावधींत कलकत्त्याचा गोरा समाज कॅनिंगच्या संबंधांत अतिशय खवळला होता. कॅनिंग कच्च्या काळजाचा आहे, तो हिंदुस्थानांत नवखा आहे, त्याला हिंदी जनतेशीं 'उठतां लाथ व बसतां बुक्की' अशा रीतीनें वागण्याचें कळत नाहीं, त्याच्या दुबळ्या वागणुकीनें सगळ्या गोऱ्यांचा व त्याबरोबरच मोठ्या शिताफीनें मिळविलेल्या राज्याचा नाश होईल; एकदां कॅनिंगनें हिंदी माणसांच्या जीवाचें बरेंवाईट करण्याचें लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांना निस्सीम स्वातंत्र्य दिलें काय व नंतर त्या स्वातंत्र्याला तोच आळा घालतो काय, असल्या धरसोडीनें अंमलदारांना आपलें काम नीट करतां येणार नाहीं व राज्यद्रोही लोकांचें यथेच्छ फावेल,असा गोऱ्या समाजांतील कॅनिंगविरोधी चडफडीचा भावार्थ सांगतां येतो. कित्येक गोऱ्यांनीं इंग्लंडच्या वृत्तपत्रांची कास धरून त्यांच्या आश्रयानें कॅनिंगची नालस्ती तेथें चाल-विली होती. कॅनिंग जर खरोखरीच टीकाकारांच्या सिद्धान्ताप्रमाणें दुबळा असता तर त्यानें राजीनामा देऊन ही आपल्या संबंधाची कटकट कायमची चुकविली असती; पण तो मनाचा खंबीर होता. त्याचे विलायती वरिष्ठ त्याच्या कार्यक्षमतेविषयीं साशंक नव्हते. हिंदी सैनिकांना किंवा दंगलीच्या टापूंतील गांवकऱ्यांना सरहा गुन्हेगार समजून ठार मारायचें, हा गोऱ्या अधिकाऱ्यांचा कारभार कॅनिंगला सर्वस्वीं अमान्य होता. केवळ मौजेखातर गोरे लोक

काळ्यांचे प्राण घेत आहेत व असल्या क्रूर अत्याचारानें शिपायांचा उठाव आणि त्याच्या अनुषंगानें चाललेला सामान्य जनतेचा धिंगाणा ही दुर्दशा लवकर आटो-पणार नाहीं, उलट ती जास्त चिघळेल, असा परिणाम ध्यानांत घेऊन त्यानें गोऱ्यांना दिलेल्या स्वातंत्र्याला मर्यादा घातली. गोरे अधिकारी व सामान्य इसम देखील पुष्कळदां लोकांचा अगदीं निष्कारण संहार करतात, याचा कॅनिंगजवळ भरपूर पुरावा होता.

फ्रेडरिक हॅलिडे नांवाचा बंगालचा नायब सुभेदार (लेफ्टनंट गव्हर्नर) कॅनिंगच्या सलगीचा अति विश्वासू मित्र होता. त्यानें एका भेटींत गोऱ्यांच्या टीकेची गोष्ट काढली. तेव्हां कॅनिंगनें आपल्या टेबलाचा खण उघडून हॅलिडेसमोर कागदपत्रांचें जाड पुडकें ठेवलें. गोऱ्यांनीं केलेल्या अत्याचारांची माहिती त्या कागदपत्रांत होती. ती माहिती पाहून हॅलिडे चकित झाला. गोऱ्यांच्या नीच कर्मांचा एवढा पुरावा हातीं असतां कॅनिंगनें अगदीं थंड कां राहावें, हा पुरावा टीकाकारांच्या तोंडावर फेकून त्यांना कां गप्प बसवूं नये, असें मनांत येऊन हॅलिडेनें कॅनिंगला तसा प्रश्न केला. उत्तर देण्यापूर्वीं कॅनिंगनें ते सारे कागद टेबलाच्या खणांत भरले व म्हटलें कीं, हे कागद कधींच उजेडांत येणार नाहींत. टीकेला घाबरून मी जर ते उघडकीस आणले तर इंग्लंडच्या कीर्तीवर काळिमा चढेल. इंग्लंडच्या अपकीर्तीला मी हातभार लावणार नाहीं. ही गोष्ट दिसायला साधी व अगदीं लहान आहे; पण तिचें तात्पर्य उद्बोधक आहे. त्या तात्पर्याच्या स्पष्टीकरणाची आवश्यकता नाहीं. गोऱ्यांना दिलेल्या शासनविषयक स्वातंत्र्याचा अतिरेक-प्राय दुरुपयोग झाल्याची खात्री पटल्यावर कॅनिगनें त्या सवलतींना मर्यादा घातल्या. दूरदृष्टीचा न्यायप्रिय राज्यकर्ता म्हणून या कृत्याबद्दल इतिहास कॅनिंगची थोरवीच गात आला आहे. एका विचारवन्तानें म्हटल्याप्रमाणें सूड हा एक प्रकारचा उन्माद किंवा कैफ असून तो रक्तपातानें पोसतो व रक्तपाताला सवकतो. गोरे अंमलदार अपराध निरपराध याचा निर्णय करण्याची खटपट सोडून दिसेल त्या काळ्या माणसाची पशुपक्ष्यासारखी शिकार खेळूं लागले तेव्हां कॅनिंगनें असल्या सूड घेणाऱ्या बेहोष अमानुषतेची स्वतंत्रता हिरावून घेतली. शिपायांचा उठाव आणि त्याच्या मागें असलेला समुदाय हा व्यवहार शेंकड्यांचा नव्हता तर लाखों माणसांचा होता. हजारों माणसांना गोळ्यांनीं किंवा फांसावर लटकावून ठार करणें हें जसें अन्यायाचें तसेंच अशक्य कोटींतलें होतें. कॅनिंगनें आपल्या

विरुद्ध गोऱ्यांनीं चालविलेल्या गलबल्याबद्दल व्हिक्टोरिया राणीला लिहिलेल्या पत्रांत याप्रमाणें आपले विचार प्रगट केले आहेत. कॅनिंगनें गोऱ्यांच्या स्वैर हिंसाचारावर कायद्याचें दडपण आणलें म्हणून गोऱ्यांचा अमर्याद हिंस्रपणा सगळीकडे थांबला असें समजूं नये. तो कुठें कुठें निर्भय निर्लज्जपणानें चालूच होता. कॅनिंगच्या कानापर्यंत त्याचें वर्तमान पोचलें नसेल, पण शिपाई-गर्दीच्या आठवणी लिहिणाऱ्या अनेक इंग्रजांच्या पुस्तकांतून गोऱ्यांच्या पाशवी नव्हे तर राक्षसी हिंस्रपणाचीं शब्दचित्रें रेखाटलेलीं दृष्टीस पडतात.

## दीनापुरांतील उठाव

कलकत्त्यास ब्रिटिश राज्ययंत्र सुरक्षित राहिलें. त्याचप्रमाणें त्याच्या सभोंवतींच्या चारी दिशांस या काळांत स्वस्थता होती. क्वचित् बारीक बारीक दंगेधोपे झाले; चोऱ्या-दरवड्यासारखी गुन्हेगारी वाढली, परंतु राज्ययंत्र मोडलें नाहीं. याचें श्रेय या दिशांतील जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांना द्यावें लागतें. धैर्य, साहस, प्रसंगावधान इत्यादि गुणांच्या बळावर त्यांनीं अस्वस्थतेला अंकुर फुटण्याची संधीच दिली नाहीं. या प्रदेशांत असलेल्या शिपायांच्या तुकड्या राज्यद्रोहाच्या भावनेनें इतक्या उशिरां उठल्या कीं, तेव्हां पश्चिमेकडील शिपायांच्या उठावाचीं हाडें खिळखिळीं झालीं होतीं; त्यामुळें हे विखुरलेले किरकोळ उठाव ताबडतोब धुळीस मिळाले. कलकत्त्यापासून दूरच्या पश्चिम बिहारमध्यें जी दंगल झाली ती तेवढी येथें नजरेखालीं घालण्यासारखी आहे.

पश्चिम बिहारचा पाटणा परगणा हा शिपायांनीं जेथें आपल्या राज्य-निष्ठेवर तिलांजलि सोडून इंग्रजांशीं लढण्यासाठीं कंबर बांधली त्या प्रदेशाला चिकटून होता. बनारस, अलाहाबाद, कानपूर, अयोध्येच्या नबाबशाहीचा प्रदेश यांच्याशीं पाटणा परगण्याचे लागेबांधे असल्यानें तेथें शिपायांनीं उठाव केला. पाटणा शहरांत मुसलमानांचें प्राबल्य अधिक, त्यांत पुनः वहाबी पंथाच्या मौलवींचीं इंग्रजी राज्याविरुद्ध कारस्थानें चालू, हें लक्षांत येतांच पाटण्याच्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं कटवाल्या मुसलमानांना जरब दाखवून तेथील गडबड आटोक्यांत आणली. पण त्या शहराच्या शेजारीं शहाबाद जिल्ह्याचें मुख्य शहर आरा असून तेथून जवळ दीनापूर नांवाचें ठाणें होतें. दीनापूरच्या ठाण्यावरील शिपाई बिघडलेले आहेत याची माहिती असूनहि त्यांचीं हत्यारें काढून घेण्याचें काम आराच्या सेनापतीला करवलें नाहीं. जेव्हां (ता. २५

जुलई ) त्यानें तें काम हातीं घेतलें तेव्हां तें अशा विचित्र अर्धवटपणानें केलें कीं, शिपाई यशस्वी ठरले. हाताशीं असलेली गोरी फौज या सेनापतीनें शिपायांच्या पाठलागास पाठविली नाहीं. शिपायांनीं आराला वेढा घातला. आरा येथील शिपायांनीं दीनापूरच्या व्यवसायबंधूंचा कित्ता गिरविला आणि आपली संख्या वाढविली. आरा लढविण्याची कामगिरी मूठभर इंग्रज व शीख यांच्यावर पडली. एका रेल्वे इंजिनियरानें एक लहानसें घर शिपायांना झुंज देण्यासाठीं किल्ल्याप्रमाणें सजविलें आणि लढाई चालविली. त्यांच्या मदतीसाठीं निघालेल्या गोऱ्या सैनिकांची आराजवळ शिपायांनीं छापा घालून अशी दुर्दशा करून सोडली कीं आराचा नाद सोडून ते परतले. आराचा वेढा ऑगस्ट ३ पर्यंत टिकला. वेढा उठण्याचा अकल्पित योग येथें सांगण्यासारखा आहे.

व्हिन्सेंट आयर नांवाचा तोफखान्याचा एक अधिकारी ता. १० जुलईला तोफांची तुकडी घेऊन अलाहाबादेस नदीच्या मार्गानें जात होता. त्याला दीनापूरची गडबड समजली. बक्सर, गाझीपूर या ठिकाणांची पाहणी करून मग आयर आराकडे वळला. अलाहाबादेस जाणाऱ्या १६० गोऱ्या सैनिकांना त्यानें आपल्या मदतीला घेतलें होतें. जुलई ३१ ला त्यानें आराचा रोख धरून वाटचाल आरंभिली. ता. २ ऑगस्ट रोजीं गजराजगंज नांवाच्या गांवीं शिपायांच्या दळानें आयरला अडविलें. पण थोड्याच वेळांत गोऱ्या सैनिकांच्या अचूक गोळीबारापुढें दम धरवेना म्हणून त्यांनीं आयरची वाट मोकळी केली. मागें हटलेल्या शिपायांनीं पुनः आयरला कांहीं अंतरावर गांठलें. या वेळीं त्यांची लढण्याची तयारी चांगल्या खबरदारीची होती. आयरनें त्यांच्या तयारीवर तोड काढून सामना दिला. लढतां लढतां आयरला जवळ एक दाट झाडीची जागा दिसली व तिचा आश्रय घेण्यासाठीं आयरनें केलेली हालचाल ओळखून शिपायांनीं त्याच्या आधीं धांवून ती जागा ताब्यांत घेतली. इतक्यांत त्याच्या मागल्या बाजूनें कुवरसिंगाची शिबंदी आयरला मार देऊं लागली. आतां शिपायांनीं काबीज केलेली झाडी जिंकली पाहिजे किंवा उभ्या जागीं लढत मेलें पाहिजे असा पेंच आयरपुढें आला; तेव्हां त्यानें शिपायांच्या तोफांवर पायदळाचा हल्ला चढविला. या हल्ल्यामुळें शिपायांनीं तोफा सोडून पळ काढला व त्याच तोफा शिपायांवर डागून आयरनें आपला विजय पूर्ण केला. कुवरसिंगाच्या शिबंदीनें आयरचा पिच्छा केला नाहीं;

शिपायांचा पळ पाहून त्यांनीं देखील मागें पाय काढला. ता. ३ रोजीं त्यानें आराच्या वेढ्यांतील वीरांची भेट घेतली व या साऱ्या घडामोडीचें उगमस्थान जें कुवरसिंगाचें जगदीशपूर तें खणून काढण्याच्या आकांक्षेनें आयर तिकडे निघाला.

## कुंवरसिंगाचा जोर

कुंवरसिंग हा आऱ्याजवळच्या जगदीशपूर गांवाचा जमीनदार होता. १८५७ सालीं तो ऐंशीच्या घरांतला वृद्ध असूनहि त्याच्या अंगीं तरुणाचा उत्साह संचरून तो शिपायांच्या उठावाचा कर्ता पुढारी बनला. दीनापूर, आरा येथील शिपाई बिथरण्यापूर्वीं थोडेच दिवस प्रकृति नीट नाहीं या सबबीवर त्यानें पाटण्याच्या प्रमुख इंग्रज अंमलदाराची भेट नाकारली होती. हा जातीचा रजपूत अर्थात् त्याच्या अंगीं रजपुतांचें परंपरागत क्षात्रतेज वसत असावें, हें समजायला कठिण नाहीं. त्यानें इंग्रजांविरुद्ध आपल्या उपजत क्षात्रगुणांचा उपयोग करावा, असें त्याचें एक दुःख होतें. तो १८५७ पूर्वीं कर्जाच्या खाईत खोल बुडाला होता. त्याच्या जमीनदारीचा कारभार इंग्रजांनीं पाहावा आणि त्याला कर्जातून सोडवावें, अशी इंग्रजांकडे त्यानें मागणी केली. पण ही मागणी मान्य करतांना इंग्रजांनीं त्याला अशी उलट शर्त घातली कीं ठरलेल्या मुदतींत त्याला ती पुरी करतां आली नाहीं. कुंवरसिंग त्या शर्तीबद्दल इंग्रजांचें मन वळवायचा यत्न करीत होता, त्याच्या यत्नाला पाटण्याच्या अधिकाऱ्याचा मनापासून पाठिंबा होता, पण कलकत्त्याचे देव त्याच्या मनधरणीचा विचार करायला तयार नव्हते. त्यांनीं चालविलेला हा प्रकार उपमर्दाप्रमाणें मानी कुंवरसिंहाच्या काळजास झोंबला व तो शिपायांच्या राज्यद्रोही असंतोषाची आग गुप्तपणें फुंकूं लागला. जुलईच्या अखेरीस ती आग पेटली तेव्हां तिचा उद्देश आणि व्याप सफळ होण्यासाठीं कुंवरसिंगानें आपली हत्यारबंद शिबंदी शिपायांच्या धामधुमींत सोडली. कुंवरसिंगापुढें आपल्या जमीनदारीचें गमावलेलें वैभव पुनः मिळविणें हेंच मुख्य ध्येय होतें.

दीनापूर, आरा येथील घटनांच्या मागें कुंवरसिंग आहे, म्हणून त्याचें पारिपत्य करण्यासाठीं आयर आऱ्याहून निघाला, पण १२ ऑगस्टपर्यंत त्याला जगदीशपुरास पोंचतां आलें नाहीं. त्यानें अगोदर कुमक बोलावली. ता. ८ व ९ या दोन दिवशीं तुकड्यातुकड्यांनीं शंभर शीख व दोनशें गोरे याप्रमाणें

त्याकडे मदत आली. हे नवे सैनिक आपल्या बरोबरचे व आऱ्याच्या वेढ्यांतले सैनिक यांची घडी बसवून आयर ता. ११ रोजीं जगदीशपुराच्या स्वारीवर निघाला. दरम्यानच्या आठवड्यांत तो इंग्रजी वर्चस्व स्थिर करण्याच्या खटपटींत होता. लष्करी कायदा पुकारून आयरनें लढाईंत पडलेले जखमी शिपाई व कुंवरसिंगाच्या चाकरींत शिरलेले हिंदी कामदार यांना कैद करून फांशीं दिले. आठवडाभर त्याचा हाच धंदा चालू होता. सैनिकांचें साह्य आल्यावर त्यानें जगदीशपुराची मोहीम काढली. जगदीशपूर हें गांव अतिशय अवघड जागेंत वसलेलें असून त्याच्या चोहों बाजूंस झाडीचें दाट रान, खांच-खळगे, नदीनाले या अडथळ्यांचा पसारा होता. आयरच्या सैनिकांना त्या भूभागाची माहिती नाहीं तर कुंवरसिंग आणि त्याचे लोक हे त्या परिसराचे पूर्ण माहीतगार असा हा सामना होता. आरा सोडल्यावर चोवीस तासांनीं ता. १२ ऑगस्टची सकाळ उलटून उन्हें तापणार तोंच कुंवरसिंगाशीं आयरची लढाई भिडली. कुंवरसिंगानें बळकट व्यूह रचला होता. पण एका नाल्यापलीकडच्या खेड्यांत त्यानें एक तुकडी पाठवून आपल्या व्यूहांत उत्पन्न केलेलें व्यंग नेमकें हेरून त्या तुकडीला इंग्रजांनीं आधीं मारून काढलें. कुंवरसिंगाचे इतर सैनिक रानाच्या झाडींत लपून होते व इंग्रजी लष्कर जवळ आलें तेव्हां त्यांनीं बंदुकांचे वार काढायला सुरुवात केली. त्यांच्यावर इंग्रजांनीं संगिनीचा हल्ला चढवून त्यांना पळविलें. कुंवरसिंगाचे सैनिक याच वेळीं दुसरीकडे मोठ्या वीरश्रीनें लढत होते. त्यांच्यासमोर इंग्रजांच्या तोफा धडाडत आल्या तेव्हां त्यांनींदेखील मैदान सोडलें. ही धुमश्चक्री चारसहा तासांहून अधिक वेळ टिकली नाहीं. तेवढ्या अवकाशांत आयरनें खुद्द जगदीशपुरास जाऊन तेथें आपला तळ ठोकला. तेथें कुंवरसिंग आणि त्याचे वीर यांपैकीं कोणीच नव्हतें. जगदीशपुरांत २० हजार फौजेला सहा महिने पुरण्याइतका धान्याचा व दारूगोळ्याचा सांठा आयरला मिळाला. आसपासच्या गांवकऱ्यांना आयरनें तें धान्य वांटलें. दारूगोळा जाळला, मोठाल्या महत्त्वाच्या इमारती पाडून उध्वस्त केल्या. एवढें काम पार पाडून ता. २० ला आयर अलाहाबादेस गेला. त्याच्या कामगिरीनें कलकत्ता-अलाहाबादचें दळणवळण निर्विघ्न झालें.

* * *

~ ५ ~

# बेबंदशाहीचा पसारा

दिल्ली, कानपूर, लखनौ या तीन शहरीं घडलेल्या उलथापालथींची माहिती सांगून झाल्यावर कलकत्ता, बंगाल, बिहारचा पूर्व भाग आणि पंजाब येथील स्थितीचें अवलोकन करण्यांत आलें. पूर्वी एकदां म्हटलें आहे कीं, दिल्ली ते कलकत्ता या जवळ जवळ हजार मैलांच्या टापूंत स्थानिक इंग्रज अधिकाऱ्याशिवाय गोरें लष्कर हें केवळ शपथ घेण्यापुरतेंच होतें. यामुळें मीरतपासून बनारसपर्यंतच्या अफाट प्रदेशांत जें अराजक माजलें त्याची पाहणी करायला पाहिजे. १८५७ मध्यें या विस्तीर्ण प्रदेशाला वायव्य प्रदेश असें नांव होतें. जेव्हां पंजाब स्वतंत्र होता, जेव्हां अयोध्येची नबाबशाही शिल्लक होती तेव्हां मीरतच्या पूर्वेकडील गंगा-यमुनेच्या पाण्याखालचा सारा मुलूख हा वायव्य दिशेचा समजला जावा, हें सरळ आहे. त्यानंतरच्या काळांत पंजाब जिंकून इंग्रजांचें हातपाय अफगाण सरहद्दीपर्यंत पसरले आणि वायव्य सरहद्दीचा प्रदेश पंजाबच्या पलीकडे जो सरकला तो चालू भारतीय स्वराज्याच्या पूर्वीपर्यंत सर्वांना माहीत होता. येथें मीरत ते बनारसपर्यंतच्या जुन्या वायव्य प्रदेशांतील सत्तावन सालाची स्थिति पाहावयाची आहे.

या प्रदेशाचीं मुख्य जागा आग्रा शहर होतें. तेथें ले. गव्हर्नराची (नायब सुभेदाराची) वस्ती असे. या अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं पांच-सहा जिल्ह्यांचा एक गट याप्रमाणें एकूण सहा गट व चौतीस जिल्हे ठेवलेले होते. गटाला डिव्हिजन परगणा हा इंग्रजी शब्द लावला जात होता. मीरत,

दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, बनारस, रोहिलखंड या परगण्यांतून विभागलेल्या जिल्ह्यांच्या नांवाचा विशेष उपयोग केला नसला तरी त्यांचीं नांवें माहितीसाठीं पुढें दिलीं आहेतः—१—आग्रा, मथुरा, मैनपुरी, इटावा. २—मीरत, मुजफरनगर, सहारणपूर, बलंदशहर, डेहराडून, अलीगड. ३—दिल्ली, गुरगांव, हिसार, पानिपत, रोहटक. ४. अलाहाबाद, फत्तेपूर, कानपूर, बांदा, हमीरपूर. ५. बनारस, मिर्झापूर, जौनपूर, गोरखपूर, गाझीपूर, आझम गड. ६ (रोहिलखंड) बरेली, शहाजहानपूर, मुरादाबाद, बिजनोर, बदाऊं, तराई (हिमालयाचा पायथा).

मीरत येथें शिपायांनीं ब्रिटिश वर्चस्वाला मूठमाती देऊन दिल्ली कबजांत घेतल्याची व तेथें बहादुरशहाला बादशहा केल्याची वातमी सर्व देशभर एका आठवड्यांत पसरली व जेथें शिपायांचीं ठाणीं होतीं तेथें शिपायांनीं कमीजास्त प्रमाणांत मीरतचें अनुकरण साधलें. कमीजास्त याचा अर्थ कित्येक ठाण्यांवर इंग्रजांना शिपायांनीं ठार केलें, तर कित्येक ठिकाणीं इंग्रजांच्या जीवाला अपाय न करतां शिपायांनीं नुसत्या लुटालुटीचें व जाळपोळीचें समाधान मानलें. सगळीकडे सर्व शिपाई इंग्रजांविरुद्ध फिरले नाहींत. कांहीं जागचे शिपाई इंग्रजांशीं स्वामिनिष्ठेनें वागले अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. शिपायांनीं लष्करी कारभारापुरती ब्रिटिश राज्ययंत्राला खीळ घालतांच त्या जागच्या मुलकी कारभारावर गण्डान्तर यावें किंबहुना अधिकारी मेल्यानंतर किंवा पळून गेल्यावर इंग्रजी सत्तेचें नांवनिशाणदेखील तेथें शिल्लक राहूं नये हें क्रमप्राप्तच होतें. मुख्य जिल्हाधिकारी व त्यांच्या हाताखालचे दोन चार इंग्रज मरून किंवा पळून गेल्यावर सामान्य प्रजेंतल्या बलाढ्यांनीं आपली शिरजोरी चालवावी, या प्रकाराला सर्वत्र ऊत आला. ज्याला जमेल त्यानें आपण बादशहाच्या नेमणुकीचे अंमलदार आहों, असा पुकारा करून सामान्य जनतेला दाबून पिळण्याचा उद्योग आरंभला. याप्रमाणें गांवोगांव दिल्लीच्या बादशाहीचे सुभेदार उगवले. इंग्रजांच्या अधिकारासमोर वचकून जे कोणी गुंड दबलेले होते, त्यांनीं उसळी मारून आतां एकमेकांतील जुने हेवेदावे ताजे केले व जिकडे तिकडे यादवी माजविली असा शिपायांच्या उठावाचा स्थूल परिणाम दृष्टीस पडतो. त्या परिणामाचें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं जेथें उठावाची प्रस्तावना घडली, तेथून बनारसपर्यंत नजर टाकणें आवश्यक आहे.

‘ खाकी रिसाला ’

मीरतला ता. १० मे च्या रात्रीं शिपायांनीं कांहीं तास कत्तल, लूट व जाळपोळ या कृत्यांत घालवून दिल्लीला रस्ता धरला, ही हकीकत मागें सांगितली आहे. तेथें शिपायांच्या गर्दींत तुरुंगांतले कैदी आणि शहरचे व आसपासच्या खेड्यांचे गुंड यांनींहि आपल्या बहादुरीला वाव दिला. ता. ११ नंतर मीरतच्या ब्रिटिश सैनिकांनीं गुन्हेगारीचा वहीम असलेल्या खेड्यांवर धाडी घालून लुटीची कांहीं मालमत्ता परत मिळविली व जे गुन्हेगार ठरतील, त्यांना ठार मारण्याचें सत्र सुरू केलें. यामुळें आसपास थोडीफार स्वस्थता दिसूं लागली. मीरतहून गोरें लष्कर दिल्लीस रवाना झाल्यावर गुंडांच्या गड-बडीनें पुनः डोकें वर काढलें. ही गडबड कह्यांत आणण्याचें काम डनलॉप नांवाचा अधिकारी चिकाटीनें करीत राहिला. डनलॉपला लष्कराची कुमक मिळाली नाहीं. तथापि त्यानें लहानसें स्वयंसैनिकांचें घोडदल उभें केलें. इकडून तिकडून जीव वांचविण्यासाठीं मीरतला बरेच गोरे आले होते व त्यांना काम नव्हतें. डनलॉपनें त्यांना एकत्र आणून कवाईत शिकविली. युद्धविद्या ते अल्पावधींत उत्तम प्रकारें शिकले. आपण भोगलेल्या कडू प्रसंगाचें उट्टें फेडण्याची त्यांना ईर्ष्या होती. अर्थात् त्यांनीं नवी कामगिरी हौसेनें अंगावर घेतली. या घोडदळांत कांहीं शीख होते. हें घोडदळ ‘ खाकी रिसाला ’ या नांवानें तत्कालीन इतिहासांत प्रसिद्ध आहे. सांप्रत ‘ खाकी ’ या नांवानें वापरण्यांत येणाऱ्या कापडाचा प्रचार सदर घोडदळाच्या उभारणींत पाहायला सांपडतो. खाक म्हणजे माती, मातीच्या रंगाचें म्हणून खाकी. उघड्या मैदानांत मातीवर बसलेली किंवा भुईवर पडून शत्रूची टेहळणी करणारीं माणसें शत्रूला उमगूं नयेत, तीं मातीच्या रंगाशीं मिसळलेलीं राहावीं म्हणून खाकी रंगाची युक्ति काढण्यांत आली, असा वृत्तान्त सदर ‘ खाकी रिसाल्या ’च्या हकीकतींत आहे.

हें घोडदळ खेड्यांतून फिरून सारावसुलीचें व शांतता स्थापण्याचें काम बजावीत होतें. त्यांच्या उद्योगाला मोठें भय शहामल्ल नांवाच्या एका इसमाचें होतें. हा इसम गांवें जाळणें, लुटणें वगैरे अत्याचार अतिशय क्रूर-पणानें करीत असल्याच्या कथा इंग्रजी इतिहासांतून आहेत. ब्रिटिश घोड-दळाला जसें त्याचें तसें त्याला या दळाचें भय होतें. म्हणून तो बहुधा या

घोडदळाला चुकवून आपले अत्याचार गाजवी. परंतु घोडदळानें एकदां त्याच्या मुख्य ठाण्यावर हल्ला केला. त्या वेळीं शहामल्ल दुसरीकडे गेला होता. एकदां त्यांच्या लोकांची व या घोडदळाची गांठ पडली, पण आपलें बळ थोडें म्हणून घोडदळानें तेव्हां सामना टाळला. शेवटीं जेव्हां सामना भिडला तेव्हां शहामल्ल मारला जाऊन आसपासचीं खेडीं निर्भय झालीं व सारावसुलीचें काम सुरळीत चालीस लागलें.

**नबाब व हिंदु**

मीरतच्या हद्दीपलीकडे बिजनोर हा जिल्हा असून तेथें शिपायाच्या उठावापोटीं नजीबाबादचा नबीब बादशहाचा सुभेदार या नात्यानें पुढें आला. पण बीजनोरच्या अधिकाऱ्यांनीं त्याला मनधरणीच्या साह्यानें कांहीं काळ कह्यांत ठेवलें, शेवटीं त्याचा वरचष्मा दिसूं लागला. त्याचे पाठीराखे इंग्रजी सत्ता नामशेष होतांच आपसांत भांडूं लागले. मग तडजोड निघून हा भांडणाचा उत्साह हिंदूंच्या राशीस बसला. हिंदु जमीनदार कांहीं काळ लढले व हरल्यावर मीरतला पळाले. नबाबानें सप्टेंबर महिन्यांत हिंदूंची कत्तल केली. परंतु हिंदुमुसलमानांचे झगडे ब्रिटिश लष्कराचें सामर्थ्य वाढेपर्यंत चालू होते. दिल्लीच्या पाडावानंतर मोकळ्या झालेल्या ब्रिटिश लष्करी तुकड्या जेव्हां या उपटसुंभ बादशाही सुभेदारांच्या पारिपत्याकरितां सर्वत्र हिंडूं लागल्या तेव्हां बिजनोरच्या या नबाबानें हिंदूंना आपल्याकडे ओढण्यासाठीं नाना प्रकारचें आमिष दाखविलें. पण आतां असल्या युक्त्या सफळ करूं शकणारी वेळ निघून गेली असल्यानें हा नबाब इंग्रजांच्या पकडींत सांपडला. त्याच्यावर इंग्रजांच्या कत्तलीचा आरोप नव्हता म्हणून त्याचा गळफांस चुकला व जन्मठेप हद्दपारीची शिक्षा त्याच्या वांट्यास आली. त्याची सारी मालमत्ता जप्त झाली. या नबाबाविरुद्ध ब्रिटिश राजसत्ता राखूं इच्छिणारे कांहीं मुसलमान होते, त्यांच्या वांट्यास कांहीं काळ इंग्रजांची अधोगति आली. सदर नबाबानें ब्रिटिशांच्या नांवें राज्य करावें असा जो करार एकदां झाला होता, तो करार त्यानें मोडल्यामुळें साहजिकच मागून रद्द करण्यांत आला.

**खानबहादुर खान**

रोहिलखंडांत ब्रिटिश राज्यापूर्वीं पठाणांचें वर्चस्व होतें, हें प्रसिद्ध आहे. १७७४ मध्यें ब्रिटिशांनीं त्या वर्चस्वाच्या नांग्या तोडून तो प्रदेश

आपल्या शासनाखालीं आणला. १८५७ मध्यें तेथील शिपाई हे तर ब्रिटिश सत्तेच्या मुळावर उठलेच, पण सामान्य मुसलमान जनताहि शिपायांच्या उठावांत सामील झाली. मे महिन्यांत शिपाई कसेबसे राज्यनिष्ठा संभाळून राहिले. जूनमध्यें बरेली, बदाऊँ, शहाजहानपुर, मुरादाबाद येथें गोऱ्या काळ्या ख्रिस्त्यांची कत्तल, लूट, जाळपोळ या ठरलेल्या सोहळ्यांत शिपायांचे उठाव घडले. बरेलीस खानबहादुर खान या नांवाच्या इसमानें पुढाकार घेतला आणि शिपायांच्या कत्तलींतून सुटून दंगेखोरांच्या तावडींत सांपडलेल्या गोऱ्या काळ्या ख्रिस्त्यांना ठार मारण्याचा हुकूम या खानानें अंमलांत आणला. नंतर खानबहादुरानें बादशहाच्या सुभेदारीचीं वस्त्रें आपल्या अंगावर चढविलीं. बरेलीस बख्तखान या नांवाचा शिपायांचा जो एक अंमलदार होता. त्यानें स्वतःकडे ब्रिग्रेडियर ही उपाधि घेतली. बख्तखान बरेलींतून जावा म्हणून खान बहादुर खानानें त्याचें मन वळवून त्याला दिल्लीस पाठवून दिलें. त्याच्याबरोबर आपल्या शिफारसीचें बादशहाला एक पत्र दिलें व आपण स्वतः त्याच्या बरोबर एक मजल गेला. अशा रीतीनें बख्तखानाची ब्याद बरेलीबाहेर काढून लावल्यावर खानबहादुराचा जीव खालीं पडला. बख्तखान हा बरेलीस राहाता तर शिपायांच्या विश्वासाचा नेता हें त्याचें प्रस्थ आपल्याला झेंपणार नाहीं, अशी खानबहादुराची खात्री होती. बख्तखान बरेलीबाहेर पडल्यावर खानबहादुराचें राज्य सुरू झालें. आपण बादशाहीचे सुभेदार आहों, अशी द्वाही फिरवून सधन हिंदूंना निष्कांचन करून सोडण्याकडे त्यानें लक्ष पुरविलें. आपल्या पूर्वजांना धूळीस मिळवून ब्रिटिशांनीं आपल्या कृपेची भाकरी खाण्याची लाचारी आपल्या गळ्यांत बांधली. या अधःपाताची टोंचणी खानबहादुराच्या क्रूर व्यवहारामागें होती. पकडलेले ख्रिस्ती त्यानें मारून कोल्ह्याकुत्र्यांना खाऊं घातले, पण नैनीतालच्या डोंगरांत पळालेल्या ख्रिस्त्यांवर तीनदां मोहीम काढूनहि यश आलें नाहीं. खानबहादुराचें राज्य जेमतेम वर्षभर टिकलें व १८६० सालीं त्याच्या आयुष्याची फांसावर समाप्ति घडली. हा नेपाळांत पळाला होता, पण तेथून कोणीतरी फसवून त्याला ब्रिटिश हद्दींत आणलें व तो ब्रिटिशांच्या तावडींत सांपडला अशी त्याची कहाणी आहे.

### दिखाऊ राज्याचा नकली कारभार

शहाजहानपूर, बदाऊन, मुरादाबाद या जिल्ह्यांची हकीकत बरेली-सारखीच आहे. या भागांत तफ़ज़ुल हुसेनखान हा फरुक्काबादचा नबाब

स्थळप्रत. 23233 दि. 1 .... 1.11.1937 99 ... ८०.८०

सरसावला. राजकीय वागणुकीच्या बाबतींत हा नवाब खानबहादुराचा पक्का अनुयायी होता. त्यानें बऱ्याच इंग्रजांची कत्तल उडविली. याचें नशीब एका वर्षाच्या आंत उलटलें. ब्रिटिशांच्या पंजांत अडकतांना याला कोणा ब्रिटिश अधिकाऱ्याकडून जीवदानाचा वर मिळाल्यामुळें तो फांसावर लोंबून तडकाफडकी मरण्याऐवजीं आपल्या आयुष्याची विटंबना सोशीत त्याला एडन अरबस्तान येथें मरण्याची पाळी आली. हा विलासी व आळशी गृहस्थ शिपाईगर्दीच्या लाटेनें धकाधकीच्या मामल्यांत लोटला गेला. यांच्या कारभाराची माहिती थोडी तपशीलवार पाहिली म्हणजे साधारणपणें रोहिलखंडांत व इतर जिल्ह्यांतून लोकांची काय अवस्था होती याची कल्पना करतां येईल. यानें आपल्या ताब्यांत आलेल्या मुलखाचे दोन विभाग पाडून एका दारुड्या मुसलमानाला नाझीमचा हुद्दा दिला. नबाबाचा मुख्य सल्लागार अशरतखान हा जसा इंग्रजांचा पेन्शनर होता तसाच अहमद यार हा देखील पेन्शनर होता. तो दुसऱ्या विभागाचा अंमलदार बनला. नबाबानें मुख्य न्यायासनावर दोन हिंदु व त्यांच्यावर एक मुसलमान याप्रमाणें तिघांना बसवून जें न्यायखातें उघडलें तें देखील विलक्षण होतें. स्त्रियांवर जो बलात्कार करील त्याची अवघ्या दोन रुपये दंडावर सुटका होत असे. खुनाच्या हिंदु आरोपीला इस्लामची दीक्षा घेतल्यास माफी मिळे. न्यायाच्या देखाव्यांत हिंदु-मुसलमानांचा सलोखा असला तरी त्यांच्या आपसांत मारामाऱ्या चालू होत्या. दिल्लीच्या बादशहानें नबाबाला सुभेदारी दिली व नबाबानें शिपायांकडे सर्वाधिकार सोंपविले. शिपायांतल्या हिंदूंनीं गोवधाला मनाई करून खाटकांवर दंड लादला. उलट मुसलमानांनीं हिंदूंना लुटलें. दिल्ली गमावल्यावर तेथील शिपायांचे जथे या प्रदेशांत आले असतां त्यांचे व स्थानिक शिपायांचे झगडे सुरू झाले. याचा फायदा एका हिंदूनें घेतला. तो स्वतःला कलेक्टर म्हणवूं लागला. असा गोंधळ १८५८ च्या प्रारंभापर्यंत चालला होता. नंतर इंग्रजी लष्करानें तो मोडून काढला आणि त्या वर्षाच्या मार्चमध्यें लखनौ इंग्रजांनीं जिंकल्यावर या गोंधळाला अवसर न उरल्यानें कांहीं दिवस अज्ञातवासांत काढून शेवटीं १८५९च्या जानेवारींत नवाब आपखुषीनें इंग्रजांना शरण गेला.

शिपायांची उठावणी व तिला मिळणारी जमीनदारांची, खेडवळांची आणि गुण्डांची साथ यांची माहिती इतिहासांतून पाहतांना या परस्पर साह्यकर्त्यांमध्यें जो गोंधळ दिसतो, तो अभ्यासण्याजोगा आहे. शहाजहानपूर

येथील शिपायांनीं ३१ मेच्या रविवारीं प्रार्थनामंदिरांत जमलेल्या इंग्रजांची कत्तल करण्याचें ठरवून त्याप्रमाणें सायंकाळीं तेथें त्यांवर हल्ला केला. हल्ल्याच्या वेळीं शिपायांजवळ लाठ्या तलवारीखेरीज दुसरीं हत्यारें नव्हतीं. बहुतेक सारे इंग्रज बिनहत्यारी असल्यानें त्यांतले जे पहिल्यांदा शिपायांसमोर आले, त्यांना शिपायांनीं सहज मारलें; पण त्यांपैकीं एकजण जेव्हां बंदुक सरसावून पुढें आला तेव्हां शिपाई आपल्या बंदुका आणण्यासाठीं छावणीकडे धांवले. शिपायांतले सुमारें शंभर शीख इंग्रजांच्या रक्षणाकरितां त्यांच्याभोंवतीं उभे राहिले. इतक्यांत इंग्रजांच्या हिंदी नोकरांनीं इंग्रजांना हत्यारें आणून दिलीं. मंदिराबाहेर इंग्रजांना असें दिसून आलें कीं, आपलीं वाहनें जशीच्या तशीं ठिकाणावर आहेत. शिपाई छावणींतून परत येण्यापूर्वीं इंग्रजांनीं गाड्यांतून बायकामुलें भरलीं व आपण घोड्यावर स्वार होऊन पोवैन नांवाच्या गांवीं तेथील जमीनदाराच्या आश्रयाला सगळे इंग्रज गेले. त्यानें आश्रय नाकारल्यावर ही मंडळी मोहमदी नांवाच्या शहरीं गेली. तथापि या इंग्रज टोळीचें मरण चुकलें नाहीं. बचावाखातर जागा बदलतांना खेड्यापाड्यांतून त्यांचा संहार झाला.

बदाऊनला शिपाई-गर्दीच्या वेळीं एडवर्ड्स हा एकच इंग्रज होता. त्याला आग्र्याहून आलेला दुसरा इंग्रज मिळाला. तेथील शिपायांनीं १ जूनला उठाव केला. दरम्यान आसपासच्या ठिकाणाहून आलेल्या इंग्रज लोकांसह बदाऊनचा इंग्रज आपल्या इकडून तिकडून जमलेल्या सोबत्यांसह फत्तेगडकडे जायला निघाला. वरेचजण फत्तेगडला पोंचले, तेथून पुढें एडवर्ड्स, आणखी एक जोडपें व त्याचीं मुलें यांसह धरमपूर नांवाच्या गांवीं एका जमीनदाराच्या आश्रयानें राहिला. तेथें त्यांनीं निरनिराळ्या प्रकारच्या हालांत जीव मुठीमध्यें धरून १ सप्टेंबरपर्यंत दिवस काढले. त्या दिवशीं हे लोक कानपुरास इंग्रजांच्या छावणींत आले. बाकीचे सर्वजण फत्तेगडच्या इंग्रजांसह नदींतून कानपुराकडे जाण्यास निघाले. तेव्हां त्यांच्यापैकीं पुष्कळांना शिपायांनीं व नदीकांठच्या गांवकऱ्यांनीं ठार केलें. इतक्या ऊपर जे उरले त्यांची जुलईमध्यें नानासाहेबांच्या लोकांनीं कत्तल केली. मुरादाबादच्या इंग्रजांनीं आपल्या बायकामुलांना नैनीतालास पाठविलें, पण तेथें राहिलेल्या गोऱ्या काळ्या ख्रिस्त्यांपैकीं एकालाहि शिपायांनीं व इतरांनीं जिवंत ठेवलें नाहीं. जीवासाठीं ज्यांनीं इस्लामची दीक्षा घेतली, अशा कांहींचे मात्र प्राण वांचले.

## हिंदुमुस्लिम बेबनाव

तडाख्यांत सांपडलेल्या गोऱ्या-काळ्या खिस्त्यांचे प्राण घेऊन इंग्रजी सत्तेचा मुरादाबादेस नायनाट केल्याच्या खात्रीनें मज्जूखान नांवाचा एक मुसलमान तेथें राज्य करण्यासाठीं अघाडीवर आला. प्रथम बरेलीचा बख्तखान जवळ होता तोंवर मज्जूखानाला कोणी प्रतिस्पर्धी नव्हता. हा दुसरा खान दिल्लीकडे जातांच आसद अलीखान या नांवाच्या एका इसमामानें मज्जूखानाच्या अधिकारावर आघात केला. आसदअलीजवळ बख्तखानाचें शिफारसपत्र होतें. तेव्हां हा तंटा विकोपास न जाऊं देतां या दोघांनीं राज्याधिकार आपसांत वांटून घेतला. मुरादाबादच्या झगड्यांत रामपूरचा इंग्रजनिष्ठ नबाब लुडबुडत होता. त्याच्या लोकांची मुरादाबादच्या नव्या राज्यकर्त्यांशीं भोपळे विकण्यावरून मारामारी होऊन सुमारें ४० रामपुरी लोक मारले गेले. ही मारामारी 'कद्दूगर्दी' या नांवानें तिकडील लोककथांतून बहुत काळ प्रसिद्ध होती. यानंतर रामपुरचा नबाब मुरादाबादच्या भानगडींत पडला नाहीं. १८५७ च्या ऑगस्टांत मुरादाबादहून दोन वेळां लढवय्यांचीं पथकें दिल्लींस गेलीं. खानवहादुरानें तिकडे याच सुमारास एक शिष्ट मंडळ पाठविलें. सप्टेंबरांत दिल्ली जिंकून इंग्रजांचें लष्कर आग्रा, अलीगड, बलंदशहर वगैरे जिल्ह्यांतील शिपाई-गर्दीला पायबंद घालीत कानपुरास गेले, पण रोहिलखंडाकडे १८५८ च्या एप्रिलपर्यंत इंग्रजांना लक्ष देतां आलें नाहीं. उलट दिल्लींतून पळालेल्या शिपायांचे व त्यांच्या साथीदारांचे लोंढे या भागांत शिरून तेथील अंदाधुंदीचें प्रमाण वाढलें. एप्रिलांत इकडे दिल्लीच्या शाही कुटुंबाचा फीरोज शहा नांवाचा एकजण आला. त्यानें एक दोन गांवें मारून मुरादाबादेंत मुक्काम ठोकला. या सुमारास तेथील हिंदु जनता मुसलमानांच्या दंडेलीनें इतकी पिसाळून गेली होती कीं, राय प्रद्युम्न कृष्ण नांवाच्या हिंदु पुढाऱ्यानें मुसलमानी लुटालुटीला जोराचा विरोध केला. हा बखेडा निकरावर जाण्यापूर्वी ता. २५ एप्रिल या दिवशीं इंग्रजांचें लष्कर तेथें येऊन धडकलें. मुरादाबादच्या एका घरांत बंडाळीचे पुढारी लपलेले आहेत अशी बातमी लागल्यावरून इंग्रजांनीं त्यावर हल्ला केला. त्या जागीं मज्जूखान आपल्या साथीदार पुढाऱ्यांसह पकडला गेला. आणखी कांहींजण लढतांना मेले. मज्जूखानाला पकडल्याबरोबर इंग्रजांनीं उभ्या जागीं गोळी मारून ठार केलें. इतर लोकांना कांहीं काळानें फांसावर बळी दिले. एप्रिल व मे महिन्यांत

या जिल्ह्यांतील गुन्हेगारांची शिकार सुरू राहिली. जेवढे सांपडले तेवढ्यांना देहान्त शासन भोगावें लागलें. यामध्यें दोघे शाही आसामी इंग्रजांना सांपडले. ते फकीर बनले होते. त्यांच्या वांट्यास आपल्या सोबत्यांची गति आली. १८५८ च्या मे महिन्यांत या जिल्ह्यांतील सारी धामधूम थंडावली.

**उसन्या अवसानाचा खेळ**

३१ मे ला शहाजहानपुरास शिपाई-गर्दीपुढें इंग्रजी सत्ता कोसळून पडल्यावर शिपायांनीं तें शहर लुटलें व दिल्लीचा रस्ता धरला. गर्दीपूर्वी गोरखपुराहून एक सर्फराज अली नांवाचा मौलवी येऊन त्यानें मुसलमानांना चिथावलें. हा मौलवी नंतर दिल्लीला गाझींचें दळ घेऊन गेला. शिपायांनीं या शहराचा निरोप घेतल्यावर दोघां मुसलमानांनीं राज्यसूत्रें हातीं घेण्याचें नाटक आरंभिलें. शहरांत मुस्लिम राज्य स्थापलें हें जाहीर होण्याकारितां जंगी मिरवणूक काढण्यांत आली. ८ जूनला अझमगडाचें इंग्रजविरोधी दळ येऊन त्याला हें शहर लुटण्याचा हेका सोडणें भाग पडलें. त्या दळानें द्रव्यलोभास न जुमानल्यानें आपसांतील यादवी टळली. या जिल्ह्यांत हिंदु-मुसलमानांची झुंज माजून एकदां रजपुतांची सरशी झाली. नंतर बरेलीच्या खानबहादुरानें आपला जमाव पाठवून या रजपुतांचा मोड केला. त्यांच्यापैकीं पुष्कळांचीं डोकीं कापून मिरविलीं आणि रजपुतांना सपाटून लुटलें. तथापि रजपूत लोक अपयश येत असूनहि पुनः पुनः मुसलमानांचा प्रतिकार करीत राहिले. १८५८च्या एप्रिलांत या जिल्ह्यांतलें मुसलमानी राज्य संपलें. रजपुतांना छळणारा प्रमुख मुसलमान अहमद यार खान जेव्हां इंग्रजांनीं फांसावर लटकावला तेव्हां रजपुतांच्या हर्षाला सीमाच उरली नाहीं. दिल्ली इंग्रजांनीं पादाक्रान्त केल्याच्या बातमीनें शहाजहानपुरांतील किंबहुना रोहिलखंडांतील मुसलमानांच्या शिरजोरीला हादरा बसला. मुसलमानांची हिंमत कायम राहण्यासाठीं तेथील उपटसुंभ राज्यकर्त्यांनीं निरनिराळे उपाय काढले. बरेलीचा बख्तखान, फरुक्काबादचा नबाब, दिल्लीचा फेरोज शहा हे तेथें एकत्र झाले; पण त्यायोगानें मुस्लिम जनतेची हिंमत वाढली नाहीं. बख्तखानाबरोबर १२०० बायकांचा लवाजमा होता, अशी त्याच्या मर्दपणाची ख्याति पसरली होती. या ख्यातीमध्यें गर्भगळित झालेल्या मुसलमानांना सांवरून लढायला उभे करण्याचें सामर्थ्य नव्हतें. अखेरीस या बहादरांनीं शहाजहानपुराचा मुक्काम हालविला. या वेळीं नानासाहेब पेशव्यांनीं सदर शहराला भेट दिल्याची वदंता

ऐतिहासिक लेखांतून आढळते. पाठीवर असलेल्या इंग्रजी फौजेला निवाऱ्याची जागा मिळूं नये, म्हणून इंग्रजांना उपयोगीं पडण्याजोग्या साऱ्या इमारती नानांनीं जाळून टाकल्या, अशी वरील वदंतेला एक पुरवणी जोडलेली असते. शहाजहानपुराहून नानासाहेब बरेलीस गेले आणि बाकीच्यांनीं फत्तेगडाकडे मोर्चा वळविला. निवाऱ्याच्या जागांची राखरांगोळी केल्यानें इंग्रजी लष्कर त्या शहरांत आल्यावेळीं त्यांच्या सुखसोयींत कमतरता पडली, पण त्यांच्या पराक्रमाला अडथळा झाला नाहीं. ता. २८ एप्रिलच्या लढाईत या शहराच्या हंगामी राज्यकर्त्यांचें लष्कर इंग्रजांनीं झोडपून काढलें. ता. ३० एप्रिल रोजीं त्यांनीं शहाजहानपूर गांठलें. त्या वेळीं फैजाबादचा प्रख्यात मौलवी अहमदुल्ला-शहा तेथें होता. मौलवीनें मे महिन्यांत इंग्रजी फौजेला आपल्या मागें धावायला लावलें. नंतर शहाजहानपुरास इंग्रजांना वेढण्याचें साहसी युद्धचातुर्य त्यानें दाखविलें. १५ मे रोजीं त्यानें इंग्रजी सेनेवर जोराचा हल्ला चढविला. तो हल्ला आणि वेढा इंग्रजांनीं शिकस्तीनें आवरून धरला होता. इतक्यांत नवें दळ घेऊन इंग्रजांचा सरसेनापति तेथें आला आणि मौलवीची कर्तबगारी आटोपली. ता. ५ जून रोजीं हा मौलवी पोवैनच्या राजाकडे मदत मागण्या-साठीं गेला असतां राजानें आपल्या वाड्याच्या तटाचा दरवाजा बंद केला. एका हत्तीकरवीं दरवाजा फोडण्याचा यत्न चालू असतां त्या हत्तीवर बसलेल्या मौलवीवर राजाच्या भावानें बंदूक झाडली. मौलवी तत्काळ प्राणास मुकला. यानंतर मौलवीचें शीर त्या राजानें जवळच्या इंग्रज मॅजिस्ट्रेटाला नजर केलें. १८५७ च्या जूनमध्यें आश्रयास आलेल्या इंग्रजांना आपल्या हद्दींतून हाकलणारा हा राजा आतां आपलें कातडें वांचविण्याच्या खटपटींत होता. त्या खटपटीला मौलवीचा बळी साहजिकच उपयोगीं पडला.

### मुसलमानांना शिक्षा

मीरत परगण्यांतल्या रोहटक जिल्ह्यांत कांहीं मुसलमान जहागीरदार होते. त्यांपैकीं झज्जर, बहादुरगड येथील नबाबांनीं दिल्लींतील बहादुरशहाच्या नशीबाशीं आपलें नशीब बांधून त्याची गति स्वीकारली. एक तालुका दोघां मुसलमानांनीं संभाळला. बाकीच्या सर्व भागांत मुसलमानांनीं आपल्या हुकमतीचे झेंडे फडकावले. तेथें माजलेल्या अराजकाचा दिल्लीच्या बादशहानें निषेध केला आणि आपण मदत पाठवूं असेंहि आश्वासन पुकारलें. हें अराजक

झींदच्या राजानें चेपलें तरी खून, कत्तल, लूट हे अत्याचार गांवोगांव जारी राहिले. ऑगस्ट महिन्यांत हाडसन नांवाच्या एका विलक्षण साहसी, शूर पण भयंकर क्रूर स्वभावाच्या इंग्रजानें रोहटकला जाऊन बऱ्याच दंगेखोरांना धारातीर्थी बुडविलें. त्याच्या पराक्रमानें तेथील दंगेखोर वचकले, पण दिल्ली पडेपर्यंत त्या जिल्ह्यांत शांतता नव्हती. सप्टेंबर अखेरीस दिल्लीस लढणाऱ्या इंग्रजी फौजेचें एक पथक तेथें गेलें तेव्हां तेथील दंगा संपला. इंग्रजांनीं बरेच दंगेखोर गोळीबारानें व फांसानें ठार केले. दंगेखोर गांवाकडून इंग्रजांनीं हजारों रुपयांचा दंड घेतला. या भागांत शेख व रंगर या दोन जमातींनीं विशेष उपद्रव केला असल्यामुळें त्यांना कडक शासन भोगावें लागलें. झज्जरचा नबाब इंग्रजांना शरण गेला, तथापि त्याच्या अपराधाची न्यायासनापुढें चौकशी चालून दिल्लीच्या किल्ल्यासमोर डिसेंबरच्या २३ तारखेला इंग्रजांनीं त्याला फांसावर टांगलें. बहादुरगडाचा नबाब वयानें फार म्हातारा म्हणून वांचला. त्याची मालमत्ता जप्त करून त्याला लाहोरास पाठविलें. इंग्रजांकडून मिळणाऱ्या हजार रुपयांच्या तनख्यावर त्यानें १८६६ पर्यंत दिवस काढले.

**उठावणीची एक मौज**

आग्रा परगण्यांतील अलीगड, बलंदशहर, मैनपुरी मथुरा, या जिल्ह्यांपैकीं अलीगडला ता. २० मे रोजीं शिपायांनीं इंग्रजविरोधाचा मार्ग स्वीकारला. येथील शिपाई या तारखेपर्यंत इंग्रजांची नोकरी इमानेंइतबारें बजावीत होते. त्या दिवशीं राज्यद्रोहाचें कारस्थान करणाऱ्या एका ब्राह्मणाला शिपायांदेखत इंग्रजांनीं फाशीं दिलें. चमत्कार असा कीं, या ब्राह्मणाचे कारस्थान शिपा-यांनींच उघडकीस आणलें होतें. त्याचा फांसावर देहान्त होतांच कोणा एकानें ' हा पाहा आमचा धर्मवीर ' अशा अर्थाचें वाक्य उच्चारलें व त्याचा शिपायांना धक्का बसून त्यांनीं यावेळेपर्यंत सांभाळलेली इंग्रजनिष्ठा ताडकन् झुगारली. मात्र अंमलदारांच्या जीवाला अपाय केला नाहीं. अंमलदारानीं आग्र्यास पळ काढला. त्यांना व हाथरसहून पळून आलेल्या इंग्रजांना एका हिंदु सावकारानें मदत केली नसती तर त्यापैकीं पुष्कळांना कदाचित् आग्र्यापर्यंतच्या वाटेवरील खेड्यापाड्यांतून कोल्ह्याकुत्र्यांचें भक्ष्य व्हावें लागलें असतें. इंग्रजांचा अंमल उठतांच खैर नांवाच्या गांवीं भूपतसिंग या चव्हाण-रजपुतांच्या पुढाऱ्यानें आपल्या राज्याची द्वाही फिरविली. पण १ जून रोजीं त्याच्यावर इंग्रज स्वयंसैनिकांनीं छापा घालून त्याला फांस दाखविला. पुढें

१५ दिवसांनीं चव्हाण व जाट एक होऊन खैरगांवीं त्यांनीं आपली धाड नेली. त्यांनीं हा गांव लुटला.

अलीगड हाथरस यांचा निर्देश मागें आला असल्यानें हाथरसच्या गडबडीची माहिती सांगायला हवी. अलीगडास शिपायांनीं उठाव केल्याचें ऐकल्यावर आग्र्याहून एक अंमलदार अलीगडास जाण्याला निघाला. तो हाथरसला पोंचला त्या वेळीं त्याच्या काळ्या पथकांतील सुमारें सव्वाशें लढवय्यांनीं पोबारा केल्याचें त्याला दिसून आलें. तरी सदर अंमलदारानें उरलेल्या लोकांचा भरंवसा बाळगून त्या फुटलेल्या शिपायांना व त्यांच्या गांवकरी साथीदारांना जरब दाखविण्याचा हिय्या केला. त्यानें एका झांकलेल्या बैलगाडींत आपल्या विश्वासाचे हत्यारबंद शिपाई बसवून ती गाडी चालू केली व आपण इतर सोबत्यांनिशीं लपून राहिला. गाडी झांकलेली म्हणजे आंत बाया असतील, असें समजून इंग्रजविरोधी मंडळीनें गाडी पकडण्याचा यत्न केला. आंतल्या लोकांनीं या लुटारूंना बंदुकी झाडून लोळविलें. बंदुकीच्या आवाजाचा इषारा मिळतांच त्या अंमलदारानें लुटारूंवर हल्ला केला. लुटारू लोकांना या छाप्यामुळें पळून जाणें एवढाच एक उपाय होता. हा प्रकार मे महिन्याच्या अखेरीस घडला. त्यामागून जून महिन्यांत अलीगड संभाळण्याकरितां आग्र्याहून जीं काळ्या शिपायांचीं पथकें वेळोवेळीं तिकडे गेलीं, त्यांनीं इंग्रजांचा हुकूम धाब्यावर बसविण्याचा क्रम आरंभल्यानें ता. १ व २ जुलईला या जिल्ह्यांत उरलेले इंग्रज आग्र्यास गेले. कित्येक युरोपियन स्वयंसैनिकांनीं अलीगडचा कांहीं भाग बरेच दिवस धाकांत ठेवला होता. पण एकंदर स्थिति काबूबाहेर गेल्याचें पाहून त्यांनाहि त्या स्थितीशीं निष्फळ झगडा करण्याचा नाद सोडावा लागला.

जून अखेरपर्यंत अलीगडनजीकचें कोयलगांव स्वस्थ होतें. ३० जूनला मुसलमानांनीं धर्मराज्याचीं हिरवीं निशाणें उभारलीं. इंग्रजांचीं डोकीं तेथें मारण्याच्या निश्चयानें ते बाहेर पडले. पण इंग्रजांचीं डोकीं दिसण्याचा संभव ध्यानीं येतांच त्यांनीं ताबडतोब माघार घेतली. जवळच्या एका गांवांत इंग्रज स्वयंसैनिकांचा तळ होता, याचा पत्ता लागतांच त्यांचीं डोकीं उडविण्याचा मुसलमानांचा निश्चय विरघळला. या स्वयंसैनिकांना जुलईच्या सुरवातीस आग्र्यास जावें लागलें व त्यांचा धाक गेल्यावर हा जिल्हा पुनः

अराजकानें व्यापला. बेबंदशाहीची हौस कुणालाच नसते त्याप्रमाणें ती अलीगडच्या उठावखोरांनाहि नव्हती. त्यांनीं न्यायदानासाठीं पंच नेमले व त्यावरून भांडणें होऊन पंचांच्या कारभाराला अवकाश मिळाला नाहीं. शेजारच्या बलंदशहर जिल्ह्याच्या एका मुसलमानानें आपले हस्तक अलीगडास पाठवून कोतवाल, तहसीलदार यांसारखे अंमलदार नेमले, पण शहराच्या सीमेंतच हें नवें राज्य राहिलें. अन्यत्र हिंदु–मुसलमान, हिंदु–जाट यांच्यातल्या वेबनावाचा कमीजास्त रक्तपात सुरू होता. इंग्रजांच्या नोकरींतील बहुतेक सारे हिंदी गृहस्थ या धामधुमीपासून अलिप्त होते.

आग्रा येथें किंवा आग्र्यानजीक भय नाहीं व तेथील लढाऊ माणसांना काम पाहिजे म्हणून अलीगडास ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस एक जमाव आग्र्याहून रवाना करण्यांत आला. ता. २० ला निघून ता. २४ रोजीं हा युरोपियन जथा जेव्हां अलीगडास पोंचला तेव्हां त्याला एका तटबंदीच्या बागेंत शत्रु असल्याचें आढळलें. शत्रूचे स्वार बागेबाहेर पाहून त्यावर इंग्रजांनीं हल्ला केला. त्या स्वारांनीं गोळीबाराची एक फैर झाडून आपले घोडे पिटाळले. नंतर पांढऱ्या स्वच्छ पोषाखाच्या मुसलमान गाझींनीं अतिशय धडाडीनें इंग्रजांवर धाव घेतली. त्यांचें स्वागत करायला इंग्रज तयार होतेच. परंतु केवळ बंदुकांच्या बारांनीं गाझी आवरत नाहींत, असें पाहून त्यांवर तोफांची मारगिरी केली तेव्हां ते मागें हटूं लागले, मग अवसान गळालेल्या गाझींचा इंग्रजांनीं धुव्वा उडविला.

### दंग्याचा रंगपालट

दंग्याधोप्यांनीं बलंदशहराला ता. २१ मेपासून पछाडलें. मीरतचें वर्तमान कळल्यानंतर लोकांत वाढणारी खळबळ या तारखेपर्यंत इंग्रज अंमलदारांनीं अतिरेकास जाऊं दिली नाहीं. शिपाई बंड व आसपासच्या जमीनदारांची मदत चालू ही स्थिति ता. २१ मेला एकदम पालटली. त्या दिवशीं लुटारू गुजरांच्या टोळीला पिटण्याकरितां इंग्रज अधिकारी निघाले असतां शिपायांनींच सरकारी खजिन्यावर हात मारला. शिपाई दिल्लीस गेले, इंग्रज पळाले आणि गुजरांना रान मोकळें सांपडलें. गुजरांच्या लुटालुटींत सामान्य लोकांनीं देखील भाग घेतला होता. पुढें तीन दिवसांनीं गुरख्यांच्या व पठाणांच्या तुकड्यासह एक अधिकारी तेथें आला, पण पठाण फुटले तेव्हां

गुरख्यांनिशीं त्यानें तेथून पाय काढला. गुजरांना आतां कुणाचाच धाक न उरल्यानें त्यांनीं लुटालुटीचा कहर करून सोडला. जवळ चार मैलांवर मालागड नांवाच्या जागीं वलीदादखान हा नबाब होता. २६ मे रोजीं तो दिल्लीहून बादशाही सुभेदारीची सनद व शिपायांची मदत घेऊन आला. बलंदशहर सगळ्याच इंग्रजांनीं सोडलें नव्हतें. कांहीं इंग्रज व त्यांच्या निष्ठेचे सैनिक तेथें होते. त्यांनीं थोडा बंदोबस्त केला. १० जूनपर्यंत त्यांचा दम-दारपणा टिकला व त्या दिवशीं त्यांनीं शहर सोडलें. यानंतर एका अधिकाऱ्यानें तेथें इंग्रजी राज्य राखण्याची धडपड चालविली. अखेरीस तोहि निराश होऊन सुरक्षित स्थळीं परतला. पुढें दोन अडीच महिने त्या शहरांत मुसलमानांचा जुलमी वरचष्मा होता. दिल्ली काबीज करून इंग्रजांची फौज ता. २५ सप्टेंबरला बलंदशहरास पोंचतांच ताबडतोब रंग बदलला. मालागडचा वलीदाद आपली सारी मालमत्ता असल्या जागीं टाकून पळाला. एका मुसलमानानें आपली शेतसाऱ्याची रक्कम मोठ्या तत्परतेनें इंग्रजांना सादर केली. पण मधल्या काळांतील पापांचें फळ हद्दपारीच्या शिक्षेनें त्याला भोगावें लागलेंच. त्याचा चुलता इंग्रजांनीं ठार केला. सर्वांहून कठिण प्रसंग वलीदादखानावर कोसळावा हें स्वाभाविक आहे. त्याचे काजी, कोतवाल आणि सारे सल्लागार शिक्षा भोगण्यासाठीं देशोधडीस लागले. त्याचे सामान्य अनुयायी देहान्त पावले. या शासनसत्रांत वलीदादची देखील आहुति पडली.

ईटा नांवाच्या भागांत २९ जूनला डामरसिंग नांवाच्या जमीनदारानें आपल्या नांवानें राज्य सुरू झाल्याचे नगारे वाजविले. ताबडतोब त्याला दुसरा एक प्रतिस्पर्धी आडवा आला. या दुसऱ्या इसमानें करवसुलीची मोहीम काढून तिला जे विरोध करतील त्यांना झाडावर उलटें टांगण्याचा प्रयोग चालविला होता. त्याच्या मदतीला शेजारच्या मैनपुरी जिल्ह्यांतील तेजासिंग नांवाच्या जमीनदार राजाचा भाऊ दुर्जनसिंग आला. पण जुलईंत या हिंदूंच्या चढाओढींत मुसलमान शिरले. हसन मिर्झा, अझीमुल्ला, असदअली अशीं त्यांचीं नांवें आढळतात. त्यांतल्या कित्येकांना फरुक्काबादेच्या व मालागडच्या नबाबांचा आधार होता. १८५७ च्या शेवटीं इंग्रजी फौजांनीं या सर्वांना सडकलें.

**पावसाळी छत्रपति**

चर्चर नांवाच्या ईटा भागांतल्या एका मळेवाल्या इंग्रजानें लिहिलेल्या आठवणींत डामरसिंगांच्या पारिपत्याची मजेदार माहिती पाहायला सांपडते.

चर्चरला जुलैमध्यें ईटा भागांत बंदोबस्तासाठीं आग्र्याहून पाठविलें. ईट्यापासून ५५ मैलांवर असलेल्या अमरगड गांवीं चर्चर कुटुंबाची वस्ती होती. शिपायांच्या उठावानें ईट्यांतील इंग्रज सत्ता नामशेष होतांच तेथील राजानें चर्चर कुटुंबापासून पांच हजार रुपये उकळून त्यांना आग्र्यास जाऊं दिलें. तरुण चर्चर जेव्हां आग्र्याहून बंदोबस्ताकरितां निघाला तेव्हां त्यानें अमरगडच्या राजापाशीं आपल्या रकमेची मागणी केली. राजा ही मागणी ऐकून तिरस्कारानें हसला, परंतु चर्चरच्या शिपायांनीं जेव्हां झाडाला बांधून त्या राजाच्या अंगावर कोरडे ओढले तेव्हां तें द्रव्य मिळालें. या राजानें ज्यांना लुटलें होतें त्यांच्या तक्रारी चर्चरकडे आल्यामुळें त्यांची मालमत्ता चर्चरनें राजाकडून काढली. यापुढें सदर राजानें आपला पवित्रा बदलून इंग्रजांची थुंकी झेलायला सुरुवात केली व तो यामुळें साहजिकच राज्यनिष्ठ गणला जाऊन त्याला इंग्रज सरकाराकडून बक्षीस देण्यांत आलें.

या राजामागून चर्चर डामरसिंगाकडे वळला. त्यानें ईट्यास लुटालुटीचा धुमाकूळ माजविला होता. तो किल्ल्यांत राहात असे. ईट्यास चर्चरनें बरेच शीख नोकरीस ठेवले व त्यांच्या पराक्रमानें किल्ल्यांत प्रवेश केला. डामरसिंगाला चर्चरनें पकडलें; पण त्याचे दोघे भाऊ पळाले. पूर्वींच्या राजाप्रमाणेंच डामरसिंगाला देखील लोकांची लूट ओकण्यास चर्चरनें भाग पाडलें. डामरसिंगानें फांस चुकविण्यासाठीं विष खाऊन जीव दिला. त्याच्या भावानें निहालसिंगानें एकदां चर्चरच्या गोटांत शिरून तो झोपला असतां त्याला ठार मारण्याचा यत्न केला. पण निहालसिंगाच्या हत्याराचा वार चुकला व तेवढ्यांत चर्चर जागा झाला तेव्हां निहालसिंग पळाला. त्यानें कांहीं वेळ पाठलागाला दाद दिली नाहीं. पण चर्चरनें झाडलेली गोळी लागून तो जखमी स्थितींत पकडला गेला. त्याला फासांवर मरण आलें. चर्चर यानंतर या भागांत इंग्रजांचा अंमल कसाबसा चालवीत होता. दिल्लीच्या पाडावानंतर इंग्रजांचीं दळें सर्वत्र फिरूं लागल्यावर चर्चरनें १८५८ च्या प्रारंभीं फत्तेगडा-नजीकच्या फरुक्काबादेस तेथील नबाबाच्या भावाला पकडण्याची कामगिरी बजावली. फत्तेगडाच्या वेढ्यांतून पळालेला व एका जमीनदाराकडे लपून राहिलेला आपला भाऊ सोडविल्यावर चर्चरनें शिपाई-गर्दींतला कारभार संपविला. पुढें ५० वर्षांनीं चर्चरला त्याच्या कामगिरीचें बक्षीस हिंदुस्थान-सरकारानें दिलें.

मैनपुरींत जून महिन्यानंतर इंग्रज गेल्यामुळें तेथील जमीनदार राजा तेजासिंह याचें फावलें. हा राजा तरुण होता व कर्तबगारी विशेष नसूनहि चव्हाण रजपुतांचा प्रमुख या नात्यानें त्याची प्रतिष्ठा मोठी होती. इंग्रजी कारभारांत त्याच्या जमीनदारीचा एकचतुर्थांशाइतका संक्षेप झाल्यामुळें तो इंग्रजांचा द्वेष्टा बनला होता. यानें आपलें राज्य पुकारतांच फरुक्काबादेच्या नबाबानें त्यावर चाल केली. परंतु या दोघांनीं लढाई टाळून एकमेकांची समजूत काढली व इंग्रजी सत्ता उलथून पाडण्याच्या कामांत लक्ष पुरविलें. ही जूट बहुतांशीं दिखाऊ होती. दोघेहि परस्परांच्या फौजा फोडण्याचीं कारस्थानें करीत होते. यामुळें यांचा एकोपा लवकरच विस्कटून जो तो स्वतंत्रपणें वागूं लागला. तेजासिंहाची बहादुरी सुरवातीपासूनच कांहींशी मलूल होती. त्याचा चुलता भवानीसिंग हा प्रतिष्ठेंत त्याच्या तोलाचा आणि इंग्रजांचा भक्त असल्यानें तेजसिंहाला तें घरांतलेंच विघ्न नडत होतें. भवानीसिंगानें इंग्रजांच्या खजिन्याचा ताबा घेऊन तो संभाळला आणि योग्य वेळीं त्याची पै न् पै इंग्रजांना देऊन टाकली. तेजसिंहाच्या चव्हाणांचें व जवळच्या अहीर जमातीचें आपसांत वांकडें होतें. अहीरांनीं संधि साधून चव्हाणांना चोपलें. तेव्हां निराश होऊन तेजसिंह इंग्रजांना शरण गेला. यापुढें भवानीसिंग भरभराटीस चढला हें क्रमप्राप्तच होतें.

### मथुरेचा मामला

मथुरेस थार्नहिल नांवाच्या कलेक्टरानें पुष्कळ दिवसपर्यंत धीर धरून इंग्रजी राज्याचा आब राखला. पण चोहोंकडे आभाळ फाटूं लागल्यावर एखाद्या व्यक्तीचें बळ कितीसें उपयोगी पडणार? मथुरेस भरतपूर, जयपूर व कोटा या तीन संस्थानांचीं लष्करी पथकें मदतीला आलीं. पण जेव्हां खुद्द इंग्रजांचें काळें लष्कर बिघडलें तेव्हां त्याच्या संस्थानी व्यवसायबंधूंनीं त्यांचा कित्ता गिरविला. आपल्या शिपायांचें इमान शाबूत नसल्याचा सुगावा लागतांच थार्नहिलनें मथुरेंतील खजीन्याच्या रखवालीसाठीं जें नवें पथक बोलावलें त्यानें तेथें असलेल्या पहिल्या तुकडीचें मनुष्यबळ वाढलें व तावडतोब या तुकड्यांनीं गोऱ्या अंमलदारावर गोळ्या झाडून खजीना लुटला. नंतर हे शिपाई निघाले. वाटेंत जाटांनीं इंग्रजांचें नियंत्रण लाथाडलें. जयपुर कोट्याचीं पथकें मथुरेस आलीं व तत्काळ आग्ऱ्यास गेलीं. थार्नहिलनें आपल्या मथुरेस गोळा झालेल्या देशबांधवांची आग्ऱ्यास रवानगी करून तो स्वतः मथुरेच्या

बंदोबस्तासाठीं धडपडत राहिला. एकदां आग्र्याच्या वाटेवरून तो मथुरेस गेला. एकदां तो आग्र्यापर्यंत जाऊन मथुरेस परतला. त्याला मदत पुरविणारे दोन हिंदु व्यापारी होते. दुसऱ्या वेळीं या वाण्यांनींच त्याला आपल्या घरांत थारा दिला होता. मथुरेस इंग्रज उरला नाहीं असें कळतांच शेजारच्या खेड्यांतल्या देवीसिंह नांवाच्या इसमानें आपल्या राज्याचा डांगोरा पिटून कारभार सुरू केला. या वेळीं थार्नहिल मथुरेला आल्याची पुरेशी खबर देवीसिंहाला नव्हती. मथुरा सोडून शिपायांच्या उठावाची गडबड मोडेपर्यंत आग्र्यास राहण्याला जाण्यापूर्वीं थार्नहिलनें मिळाले तेवढे लोक घेऊन देवीसिंहाच्या खेड्यावर हल्ला केला. देवीसिंह थार्नहिलच्या कैदेंत पडतांच जीं माणसें त्याच्यापुढें धरपकडीच्या क्षणापर्यंत लाळ घोटीत होतीं, हांजी हांजी करीत होतीं, त्यांनींच देवीसिंहावर थुंकायला व त्याच्या बायकामंडळींची थट्टा करायला मागेंपुढें पाहिलें नाहीं. देवीसिंहाच्या वांट्यास फांशीची शिक्षा आली. थार्नहिलनें याप्रमाणें मथुरा सोडतां सोडतां इंग्रजी राज्याचा एक शत्रु नाहींसा केला. जुलईच्या पहिल्या आठवड्यापासून ऑक्टोबर मध्यापर्यंत तो आग्र्यास होता. त्यानंतर तो लष्करी अंमलदाराबरोबर सैनिकांच्या मोठ्या जमावासह मथुरेस आपल्या कामावर रुजू झाला. ऑक्टोबरनंतर या जिल्ह्याची शांतता स्थिरावत गेली. थार्नहिलनें आपल्या १८५७ सालांतील अनुभवांचें एक पुस्तक लिहिलेलें असून त्यांतल्या हकीकती कादंबरीसारख्या चटकदार वाटतात.

### कॉंग्रेसचा संस्थापक ह्यूम

१८८५ सालीं स्थापन झालेल्या कॉंग्रेसचा एक संस्थापक ॲलन आक्टेवियन ह्यूम हा आग्र्याच्या अंमलाखालील इटावा जिल्ह्यांत १८५७ मध्यें कलेक्टर होता. मीरत दिल्लीच्या बातम्या ऐकल्यानंतर त्यानें गस्त घालणाऱ्या टोळ्या इटाव्याच्या आसपास फिरत्या ठेवल्या. ता. १६ मे रोजीं गस्तवाल्या शिपायांनीं ७ जण पकडून आणले. परंतु त्यांचीं हत्यारें काढून घेतलीं नसल्यानें ठाण्यावर येतांच त्यांनीं मारामारी आरंभिली. या झटापटींत पांच कैदी ठार होऊन जे दोन पळाले, त्यांतला एक मागाहून पकडण्यांत आला. ता. १९ रोजीं पकडलेल्या लोकांनीं जास्त निकरानें आपलीं हत्यारें चालवून पळ काढला व एका देवळाचा आश्रय घेतला. ह्यूमला हें देऊळ

कावीज करतां आलें नाहीं. उलट बरोबरीचा एक युरोपियन जखमी झाल्यामुळें त्याच्यासह ह्यूमला स्वस्थानीं परतणें भाग पडलें, तिकडे शिपायांनीं देवळांतला मुक्काम हालवला. ता. २३ मे रोजीं त्या तारखेपर्यंत इमानानें इंग्रजांचा हुकूम ऐकणाऱ्या शिपायांनीं उघडपणें इंग्रजी हुकमत झिडकारली. त्यांनीं खजीना लुटला, गोऱ्यांचीं घरें जाळलीं. नंतर दोनच दिवसांनीं ग्वालेरची लष्करी तुकडी मदतीस येऊन पुनः शांतता दिसूं लागली. इतःपर इटावा सुरक्षित राहण्याचा विश्वास नसल्यानें युरोपियन बायकामुलें आग्र्यास पाठवून पुरुष तेवढे मागें राहिले; पण १७ जूनला आपली धडगत नाहीं अशी खात्री पाहून त्यांनींहि आग्र्याचा रस्ता धरला.

आग्र्यास ता. ५ जुलई रोजीं जी लढाई झाली तिच्यांत ह्यूम उपस्थित होता. त्या लढाईंत इंग्रजांना मार खात किल्ला गांठावा लागला. मग किल्ल्यांत राहून गुप्त पत्रांच्या द्वारें इटाव्यांतील विश्वासू माणसांशीं माहितीच्या देवघेवीसाठीं दळणवळण ठेवणें एवढेंच काम ह्यूम बजावीत होता इटाव्यास डिसेंबरांत इंग्रजांची फौज येऊन तिनें लोकांत दरारा उत्पन्न केल्यावर ह्यूम तिकडे गेला व आपलें काम बजावूं लागला. पण १८५८ च्या अखेरपर्यंत शिपाईगर्दीचे परिणाम या जिल्ह्याला भोंवत होते. १८५८ च्या ७ फेब्रुवारीला एक जोराची चकमक उडाली. यानंतर रूपसिंग नांवाच्या एका झोटिंगाशीं एप्रिलांत सामना झाला. मे महिन्यांत दिल्लीच्या बादशाही कुटुंबापैकीं फेराजशहा नांवाच्या इसमाबरोबर पुष्कळशा झटापटी कराव्या लागल्या. रूपसिंगाचा उपद्रव मधून मधून चालू असे. १८५८ च्या जून मध्यें ग्वालेरला हार खाऊन जेव्हां शिपाई व त्यांचे साथीदार आसपासच्या भागांत उधळले तेव्हां रूपसिंगासारखे आणखी कित्येक जण उगवले. ऑक्टोबरांत जेव्हां रूपसिंगाचा ब्रिटिश लष्करानें धुव्वा उडवला तेव्हां इटाव्यास इंग्रजी अंमल सुरक्षित चालू झाला.

— २ —

### आग्र्याची हालहवाल

वायव्य प्रदेशाचें मुख्य शहर जें आग्रा येथील हालहवाल नजरेखालीं घातल्यास तें शहर इंग्रजांच्या हातीं १८५७ च्या जूनपासून ऑक्टोबरापर्यंत

राहिलेलें नव्हतें, असा ठळक निष्कर्ष दृष्टीसमोर येतो. या शहरांत राहून ३४ जिल्ह्यांचा कारभार चालविणारा ले. गव्हर्नर कालव्हिन हा शांततेच्या काळीं कर्तबगार म्हणून नांवाजलेला पुरुष धामधुमीवर तोड काढण्याच्या कामीं असमर्थ ठरला. बंगालमधील शिपायांचा असंतोष आणि उठाव हें त्याला स्थानिक स्वरूपाचें वाटत होतें. मीरत दिल्लीच्या हकीकती कानावर आल्या तेव्हां त्याचे डोळे उघडले. त्यानें शहर सोडावें आणि किल्ल्याचा आश्रय करावा, असें योजून तशा उद्योगास तो लागला असतां इतर अधिकारी आडवे आले. तेव्हां त्यांच्या समाधानाकरितां त्यानें काळ्यागोऱ्या सैनिकांना सगळी स्थिति समजावून उपदेश करण्याचा बेत अमलांत आणला. ता. १४ मे रोजीं काल्व्हिन यानें आपल्या उपदेशाच्या मात्रेचे घोट सैनिकांना पाजले. त्याचा गोऱ्यांना उपदेश होता कीं, “ काळ्या सैनिकांबद्दल विश्वास बाळगावा, पण मीरत दिल्लीस ज्यांनीं अत्याचार केला, त्यांची गांठ पडेल तेव्हां त्यांना ठोकून काढावे. ” “ सरकारविषयीं कोणत्याहि बाबतींत अविश्वास बाळगूं नये. सरकारचा काळ्या सैनिकांबाबत अविश्वास नाहीं. जीं गाऱ्हाणीं असतील तीं उघडपणें सांगा. ज्यांना नोकरी सोडावयाची असेल त्यांना आतांच्या क्षणींदेखील नोकरींतून जाण्याला आडकाठी होणार नाहीं. ” वगैरे गोष्टी कालव्हिन यानें काळ्या सैनिकांना ऐकविल्या. अंमलदारांच्या प्रेरणेनें शिपायांनीं जो खुषीदाखल आरडओरडा केला, तो केवळ वरकरणी होता; एकाहि शिपायाचें अंतःकरण त्या घोषांत नव्हते; उलट ते या प्रसंगीं सगळ्या इंग्रजांकडे अत्यंत तिरस्काराच्या दृष्टीनें पाहात असल्याबद्दल एका इंग्रजाची साक्ष आहे.

शिपायांच्या उठावणीमागें दिल्लीचा बादशहा असला पाहिजे अशी कल्पना करून घेऊन कालव्हिननें ग्वालेरच्या शिंद्यांची व भरतपूरच्या जाटांची मदत मागितली. त्यांची मदत मिळाली, पण शिपाई-गर्दीचें संकट कोसळायचें तें कोसळलेंच. ता. २१ मे नंतर अलीगड, बलंद शहर, इटावा, मैनपुरी येथील शिपायांच्या उठावाचें वर्तमान आग्र्यास येऊं लागलें. कालव्हिनला वाटलें कीं, शिपायांचें सरकाराविषयींचे भ्रम नाहींसें करणारा जाहीरनामा काढल्यानें शिपाई ताळ्यावर येतील. त्याप्रमाणें ता. २५ मे रोजीं त्याचा जाहीरनामा जगासमोर आला. त्या जाहीरनाम्यानें शिपाई तर ताळ्यावर आले नाहींतच पण युरोपियन समाज मात्र त्याचा भाव आणि भाषा फार मऊ

राहिलेलें नव्हतें, असा ठळक निष्कर्ष दृष्टीसमोर येतो. या शहरांत राहून ३४ जिल्ह्यांचा कारभार चालविणारा ले. गव्हर्नर कालव्हिन हा शांततेच्या काळीं कर्तबगार म्हणून नांवाजलेला पुरुष धामधुमीवर तोड काढण्याच्या कामीं असमर्थ ठरला. बंगालमधील शिपायांचा असंतोष आणि उठाव हें त्याला स्थानिक स्वरूपाचें वाटत होतें. मीरत दिल्लीच्या हकीकती कानावर आल्या तेव्हां त्याचे डोळे उघडले. त्यानें शहर सोडावें आणि किल्ल्याचा आश्रय करावा, असें योजून तशा उद्योगास तो लागला असतां इतर अधिकारी आडवे आले. तेव्हां त्यांच्या समाधानाकरितां त्यानें काळ्यागोऱ्या सैनिकांना सगळी स्थिति समजावून उपदेश करण्याचा बेत अमलांत आणला. ता. १४ मे रोजीं काल्व्हिन यानें आपल्या उपदेशाच्या मात्रेचे घोट सैनिकांना पाजले. त्याचा गोऱ्यांना उपदेश होता कीं, "काळ्या सैनिकांबद्दल विश्वास बाळगावा, पण मीरत दिल्लीस ज्यांनीं अत्याचार केला, त्यांची गांठ पडेल तेव्हां त्यांना ठोकून काढावे." "सरकारविषयीं कोणत्याहि बाबतींत अविश्वास बाळगूं नये. सरकारचा काळ्या सैनिकांबाबत अविश्वास नाहीं. जीं गाऱ्हाणीं असतील तीं उघडपणें सांगा. ज्यांना नोकरी सोडावयाची असेल त्यांना आतांच्या क्षणींदेखील नोकरींतून जाण्याला आडकाठी होणार नाहीं." वगैरे गोष्टी कालव्हिन यानें काळ्या सैनिकांना ऐकविल्या. अंमलदारांच्या प्रेरणेनें शिपायांनीं जो खुषीदाखल आरडओरडा केला, तो केवळ वरकरणी होता; एकाहि शिपायाचें अंतःकरण त्या घोषांत नव्हते; उलट ते या प्रसंगीं सगळ्या इंग्रजांकडे अत्यंत तिरस्काराच्या दृष्टीनें पाहात असल्याबद्दल एका इंग्रजाची साक्ष आहे.

शिपायांच्या उठावणीमागें दिल्लीचा बादशहा असला पाहिजे अशी कल्पना करून घेऊन कालव्हिननें ग्वालेरच्या शिंद्यांची व भरतपूरच्या जाटांची मदत मागितली. त्यांची मदत मिळाली, पण शिपाई-गर्दीचें संकट कोसळायचें तें कोसळलेंच. ता. २१ मे नंतर अलीगड, बलंद शहर, इटावा, मैनपुरी येथील शिपायांच्या उठावाचें वर्तमान आग्र्यास येऊं लागलें. कालव्हिनला वाटलें कीं, शिपायांचें सरकाराविषयींचे भ्रम नाहींसें करणारा जाहीरनामा काढल्यानें शिपाई ताळ्यावर येतील. त्याप्रमाणें ता. २५ मे रोजीं त्याचा जाहीरनामा जगासमोर आला. त्या जाहीरनाम्यानें शिपाई तर ताळ्यावर आले नाहींतच पण युरोपियन समाज मात्र त्याचा भाव आणि भाषा फार मऊ

म्हणून काल्व्हिनवर रागावला. तथापि राजकीय वातावरणांतील बिघाड जास्त वाढल्याचा विपरीत अनुभव जाट व मथुरेंतील शिपाई यांच्या उठावानें काल्व्हिनला चाखावा लागला. आतां मात्र शिपायांचा भरंवसा बाळगणें धोक्याचें अशी खात्री पटून काल्व्हिन यानें ता. ३१ मे रोजीं आग्रा येथील शिपायांचीं हत्यारें काढून घेतलीं. मागून असें निदर्शनास आलें कीं त्या दिवशीं संध्याकाळीं गोऱ्यांची कत्तल उडविण्याचा कट शिपायांनीं केला होता. शिपायांचा कट सफळ झाला नाहीं, उलट शिपाईच लष्करांतून विनहत्यारी उठविले गेले. त्यांच्या अभावीं स्वयंसैनिकांचें दळ हेंच एक साधन उरलें व त्याचा काल्व्हिननें अवलंब केला. दुसरें साधन म्हणजे ग्वालेरची मदत. इंग्रजांच्या तालमींतलें व इंग्रजी नियंत्रणाखालचें ग्वालेरी लष्कर हें खात्रीचें नव्हे, असें ओळखून शिंद्यांनीं आपल्या विश्वासू अंगरक्षकाची तुकडी आग्र्यास रवाना केली. ग्वालेरच्या शिपायांनीं ता. १४ जून रोजीं रविवारीं शिंद्यांचा आपल्या संबंधाचा अविश्वास खोटा नव्हता, असें आपल्या उठावानें दाखवून दिलें. ग्वालेरच्या आधींच झांशी (५ जून) नौगांव (९ जून) येथील शिपायांचें उठाव झाले असल्यामुळें काल्व्हिनची सत्ता वादळानें मोडलेल्या जहाजाची एखादी फळी आधाराला असावी त्याप्रमाणें आग्र्याच्या किल्ल्यापुरती चिकटून राहिली. ग्वालेरहून त्याचप्रमाणें इतर अनेक ठिकाणांहून पळालेलीं इंग्रज बायकामुलें आग्र्यास आल्यावर काल्व्हिननें किल्ल्यांत जाण्याच्या कल्पनेला कृतींत उतरविलें. पण तसें करतांना सामानसुमान नेण्याला जी मर्यादा घातली तिच्यापायीं किल्ल्याबाहेर सक्तीनें ठेवाव्या लागलेल्या घरगुती बहुमोल उपयोगी जिनसांचें नुकसान सर्वांना सोसावें लागलें.

### लढाई व माघार

या सुमारास शिपायांचे जमाव आग्र्यावर हल्ला करण्याच्या इराद्यानें फत्तेपूर शिक्रीस आले होते. त्यांना सामना देण्यासाठीं संस्थानी व खाजगी लष्करी तुकड्या अधिकाऱ्यांनीं पवित्र्यांत उभ्या केल्या. ता. ३ जुलई रोजीं काल्व्हिन आजारी पडल्यामुळें त्याचें काम चालविण्याकरितां तिघां अधिकाऱ्यांचें मंडळ अस्तित्वांत आलें. पण दुसऱ्या दिवशीं प्रकृति सुधारून तो कारभार पाहूं लागला. ता. ४ जुलैला कोटा संस्थानचे शिपाई इंग्रजांच्या विरोधी गोटांत गेले. ता. ५ जुलई रोजीं आग्र्यानजीक शिपायांची व इंग्रजांची जी

लढाई झाली तिच्यांत इंग्रजांचा पराजय होऊन त्यांना माघार घ्यावी लागली. इंग्रजांनीं स्वतःला किल्ल्यांत कोंडल्यावर त्या ठिकाणाबाहेरील इमारतींच्या जाळपोळीनें ती सारी रात्र उजळून सोडली. शिपायांचें सारें दळ दिल्लीस चालतें झालें व इंग्रजी वस्तीच्या विध्वंसाचें सगळें काम शहरांतल्या व खेड्यापाड्यांतल्या दंगेखोरांनीं शेवटास नेलें. ता. ७ जुलैला राजाराम नांवाच्या एका नागरिकानें शहरांत शिपायांचें चिटपांखरूंसुद्धां उरलें नसल्याचें किल्ल्यांतल्या अधिकाऱ्यांना कळविल्यामुळें पोलीसखात्याच्या प्रमुख इंग्रज सोजरांची लहानशी तुकडी घेऊन शहराच्या सर्व वस्तींत फिरून आला. शहरांत पुनः इंग्रजी अंमल सुरू झाला. यापूर्वीं दोन दिवस दिल्लीच्या बादशहाचें राज्य सुरू झाल्याची व खिस्ती धर्माविरुद्ध 'जिहाद' करण्याची घोषणा आग्र्याच्या मौलवीमुल्लांच्या पुढाकाराखालीं एका मशिदींत जमून मुसलमानांनीं आग्र्यास दुमदुमून सोडली होती. या दोन तीन दिवसांतच शहरांतील काळ्या गोऱ्या खिस्त्यांना बायकामुलें हा भेद न बाळगतां मुसलमानांनीं ठार मारलें होतें. मुसलमानांनीं पुकारलेला जिहाद फक्त खिस्त्यांविरुद्ध असल्यानें ते आग्र्यांतील हिंदूंच्या वाटेस गेले नाहींत. यामुळें आग्र्याच्या नित्यनैमित्तिक जीवनव्यवहार पूर्वींप्रमाणें कायम राहून किल्ल्यांतल्या खिस्त्यांचे पुष्कळसे हाल टळले. किल्ल्यांतल्या इंग्रजांना दाण्यागोटयाचीच नव्हे तर इतर जी लागेल ती मदत करणारा एक जोतिप्रसाद नांवाचा इसम आग्र्यास होता. याच्या साह्याचें स्तवन इंग्रजी इतिहासांतून आलेलें आहे.

**संकटांतील जीवनयात्रा**

शत्रु दाराशीं येऊन पोंचल्यावर किल्ल्याच्या आश्रयास जाणाऱ्या गोऱ्याकाळ्या खिस्त्यांनीं किल्ल्यांत आरंभीं गोंधळ माजवावा, यांत नवल नाहीं. जो तो आपल्याला चांगली हवाशीर प्रशस्त जागा मिळण्यासाठीं धडपडत होता. गोऱ्यांची सोय लागली व हिंदी खिस्त्यांनीं आपली सोय कशी तरी लावून घेतली. किल्ल्यांत जातांना रोजच्या संसाराचें सगळें सामान बरोबर नेणें शक्य नसल्यामुळें वस्त्रापात्रांची अडचण सुरुवातीस अतिशय तीव्र भासली; पण बाहेर शत्रूचें भय नाहीं आणि शहरांत स्वस्थता आहे, अशी खात्री झाल्यावर भाजीपाला, फळफळावळें दूधदुभतें, अंडीं, कोंबडीं, मांस मासे वगैरे खाद्यें भरपूर मिळूं लागलीं. नोकर-चाकरांची कमतरता पुष्कळसे जुने नोकर कामावर आल्यामुळें नाहींशी झाली. मात्र त्यांच्या पगाराचा दर

भारी होता. शिवाय ते बेपर्वाईनें वागत, असें गान्हाणें इंग्रजांच्या आठवणींत दिसतें. किल्ल्यांतलीं माणसें हळू हळू वाहेर जाण्याला कचरेनाशीं झालीं. तथापि फार दूर जाणें निर्भय नव्हतें. केव्हां तरी कुठून तरी बंदूक झाडली जात असे. क्लेशाची स्थिति लवकर पालटण्याची आशा नसली म्हणजे मनुष्य आपलीं दुःखें विसरून त्यांतल्यात्यांत कांहीं सुखें भोगूं शकतो, या स्वभाव-क्रमास अनुसरून कोणाचा जन्म, कोणाचा वाढदिवस, कोणाचा विवाह असे प्रसंग साधून किल्ल्यांतले इंग्रज आनंदाचा आस्वाद घेत असत. कानपूरची कत्तल, दिल्लीचा रेंगाळलेला वेढा, लखनौच्या हेन्री लॉरेन्सचा मृत्यु या बातम्यांनीं उत्पन्न होणारा विषाद हेवलॉकचे विजय, इंग्लंडांतून येणारी फौजेची कुमक, वगैरे वार्तांच्या योगानें मावळत असे. रोग, उष्णता हीं विपत्ति पाऊस पडल्यावर गेलीं तर माशा, पिसवा, डांस, ढेकूण यांच्या उपद्रवानें इंग्रजांना पछाडलें. आस्ते आस्ते किल्ल्याच्या आंतबाहेरील गर्दीला उतार पडत चालला. किल्ल्यांत जुन्या बादशाही बागा होत्या. त्यांचा गोऱ्यांनीं क्लबाप्रमाणें उपयोग करून घेतला. रात्र पडली कीं तेथें खुर्च्या टाकून संवादांत, बैठ्या खेळांत रमावें, खावें, प्यावें; संवादाला एकमेकांच्या दुःखाचे अनुभव, बाहेरून समजणाऱ्या बऱ्यावाईट बातम्या, किल्ल्यासंबंधाच्या गतकालीन अद्भुत पिशाचकथा, असे कितीतरी विषय असत. एक छोटेंसें जुन्या फाटक्या पुस्तकांचें संग्रहालय अस्तित्वांत आलें, तेव्हां त्यांतील पुस्तकें वाचण्याची करमणूक लाभली. या बागांतून संध्याकाळीं मुलांचा खेळ चाले. हीं मुलें नोकरांच्या उत्तेजनानें नकली हत्यारें घेऊन गोऱ्या काळ्यांच्या लढाईचा खेळ कधीं कधीं रंगवीत असत. किल्ल्यांत एका जागीं रुग्णालय होतें. तेथील जखमी सोजरांची व रोग्यांची सेवा-शुश्रूषा हा एक स्त्रियांना उद्योग होता. या उपकाराची फेड म्हणून संकटकाळ संपल्यावर सोजरांनीं स्त्रियांना कृतज्ञतेची एक मेजवानी ताज-महालामध्यें दिली. बऱ्याच पुरुषांनीं बादशाही वाड्यांचीं तळघरें व भुयारें शोधण्याचा रिकामा कारभार करून पाहिला. किल्ल्यांत सुमारें पांच हजार आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचा जमाव होता. त्यापैकीं जवळ जवळ हजार पुरुष लढण्याच्या योग्यतेचे होते. त्यांतल्या निरोगी धडधाकटांच्या टोळ्यांना हत्यारें व पुढारी देऊन किल्ल्यांतील वरिष्ठ राज्यसूत्रधारांनीं आग्र्याच्या अधिकाराखालीं असलेल्या प्रदेशांत इंग्रजांचा अंमल बसविण्याकरितां पाठवि-

ण्याचा क्रम आरंभिला. किल्ल्यांतील लोकांच्या डोळ्यांना वेधणाऱ्या व रिझविणाऱ्या देखाव्यामध्यें या लढाऊ तुकड्यांच्या पराक्रमानें भर टाकली.

पावसाळ्यांत दुथडी भरून वाहणारा यमुनेचा प्रचंड प्रवाह; स्वच्छ चांदण्यांत शोभणारा दूरचा संगमरवरी पांढरा ताजमहाल आणि किल्ल्यांतले तशाच घडणीचे भव्य वाडे; शरदृतूंत प्रगटलेलें किल्ल्यांतील बागांचें व किल्ल्याबाहेरील यमुनाकांठचें सृष्टिसौंदर्य,यमुनेच्या पाण्यांत स्वैरपणें चालणारी लोकांची जलक्रीडा; शहरांत साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणासोहाळ्याचे दीपोत्सव; वगैरे नेत्राकर्षक व हृदय आनंदोत्साहानें फुलविणाऱ्या प्रकारासोबत किल्ल्यांतील मयतांचीं मर्तिकें मधून मधून तेथें एकवटलेल्या निर्वासितांना उदासीनतेच्या खाईत लोटून देत असत. गोऱ्यांचीं मर्तिकें जेवढीं खेदजनक वाटत तेवढीं नसलीं तरी किल्ल्याबाहेरच्या मसणवटींत गुन्हेगार म्हणून फांसावर लटकावल्या जाणाऱ्या हिंदी माणसांचे वध हे प्रेक्षकांच्या चित्तावर गंभीरपणाच्या छाया निर्माण करीत नसत असें नाहीं. सूडाच्या भावनेचे गोरे हे मनुष्यहिंसेचे देखावे करमणुकीचे विषय समजत व अशी करमणूक त्यांना प्रत्येक दिवशीं भोगायला सांपडे. एखाद्या दिवशीं एखाद्याचा वध करण्यांत आला तर दुसऱ्या दिवशीं शेपन्नासांची या शिक्षासत्रांत आहुति पडत असे. आरंभीं फांशीचा बळी त्याच्या आप्तमित्रांच्या स्वाधीन करण्याची रीत होती, पण हुतात्मे या नात्यानें किल्ल्याच्या तटाभोंवतीं त्यांच्या मिरवणुकी निघूं लागल्यानें ही रीत इंग्रज अधिकाऱ्यांनीं बंद केली. साधारणपणें प्रत्यहीं आग्र्याच्या आसपासच्या खेड्यांतून धुराचे लोट आकाशांत पसरलेले दिसत. ज्या खेड्यांतल्या लोकांनीं आग्र्याच्या जाळपोळींत व लुटालुटींत भाग घेतल्याचा संशय येईल किंवा तसा आरोप पुराव्यानिशीं सिद्ध होईल तीं गांवें जाळून टाकण्याचा सपाटा आग्र्यांतील गोऱ्यांनीं चालविला होता. खेड्यांचा धूर याप्रमाणें किल्ल्यांतील लोकांच्या परिचयाचा झाला होता. खेड्यांतील माणसें प्रतिकाराला ठाकलीं तर तेथें पुष्कळांना कृतान्ताच्या जबड्यांत जाण्याची पाळी येई. अशा प्रसंगीं पुरुषांना बंदुका भरून देण्याच्या किंवा इतर असल्याच मदतीनिमित्त पुरुषांबरोबर स्त्रियांनाहि प्राण सोडावे लागत. अशा कित्येक वीर स्त्रियांच्या गोष्टी इंग्रजी पुस्तकांतून दृष्टीस पडतात.

अंमलदारीचा फेरफटका

ऑगस्ट महिन्यांच्या २० व्या तारखेला आग्रा–दिल्लीच्या मार्गांतील महत्त्वाचें शहर म्हणून अलीगडच्या समाचाराकरितां आग्र्याहून एक लहानसें दळ निघालें व २४ रोजीं तेथें पोचलें. तेथें एका तटबंदीच्या बागेंत कांहीं गाझी व बरेच शिपाई ठाण मांडून राहिले होते. एकमेकांची दृष्टादृष्ट झाल्यावर थोड्याच वेळांत उभयपक्षीं गोळीबार सुरू झाला. गाझींनीं तेवढ्यांत आपल्या धर्माचा जयघोष करीत जोराचा हल्ला इंग्रज टोळीवर केला. तलवारींनीं लढण्याची गाझींची रीत असल्यानें तोफा बंदुकांनीं व घातघाईला आल्यास संगिनींनीं त्यास मारणें सोपें असे. परंतु ते आपल्या विलक्षण वेगाच्या धडाडीनें केव्हां केव्हां प्रतिपक्षाची कांहीं काळ दाणादाण उडवून सोडीत. या प्रसंगीं ते अंगाशीं भिडण्यापूर्वींच तोफा-बंदुकांनीं त्यांना ब्रिटिशांनीं पळवून लावलें तरी बऱ्याच गाझींनीं छातीशीं छाती भिडविलीच. त्यांना व नंतर बागेंत राहिलेल्या गाझींना इंग्रजांनीं ठार केलें. अलीगडास या दिवसांत घौस महम्मद या नांवाचा एक मुसलमान बादशाही सुभेदार या नात्यानें स्वतःला मिरवून अधिकार गाजवीत होता. तो इंग्रजांच्या हातीं लागला नाहीं. गाझींचा पुढारी मौलवी अबदुल जलील यानें मात्र इंग्रजांच्या एका कप्तानाशीं द्वंद्वयुद्ध खेळून आपले प्राण गमावले.

इंग्रजांचा हा विजय विशेष परिणामकारक ठरला नाहीं. त्यांनीं गोविंदसिंग नांवाच्या एका जमीनदाराकडे अंमल सोपविला. पण मुसलमानांनीं त्याला पळवून पुनः अलीगडास आपलें वर्चस्व चालू केलें. दिल्ली घेऊन मोकळ्या झालेल्या इंग्रज लष्कराच्या एका पथकाचा मोर्चा ऑक्टोबरच्या आरंभीं तेथें गेला (ता. ६). तेव्हां मंगलसिंग व मेहताबसिंग या दोघां रजपुतांचें प्राबल्य त्याला आढळलें. सामान्यतः अलीगडास मुसलमानांची सरशी होत असली तरी कधीं कधीं रजपुतांचा वरचष्मा होऊन ते आपली प्रतिष्ठा स्थापीत असत. ऑक्टोबरच्या सुरवातीस त्यांचा जोर होता. परंतु त्यांचे पूर्वोक्त दोघे पुढारी या सामन्यांत बळी पडले. आज इंग्रजांचे हस्तक, उद्यां मुसलमान, परवां रजपूत, पुनः इंग्रज असें स्थित्यंतर १८५८ च्या मध्यापर्यंत तेथें चालू होतें. दिल्ली पडली तेव्हां इंग्रज जसे मोकळे झाले, तसेच तेथील शिपाई देखील मोकळे होऊन रोहिलखंड, लखनौ, या प्रदेशांकडे जात होते. त्यांना वाटेंत कुठें प्रबळ समानशीलांचा आधार मिळाल्यास ते इंग्रजांचीं ठाणीं धुडकावून लावीत.

यामुळें अलीगड, ईटा, इटावा, मैनपुरी, बलंदशहर या जिल्ह्यांच्या प्रदेशांत १८५८ सालीं बऱ्याच विलंबानें इंग्रजांचा अंमल स्थिरावूं लागला.

इटावा, मथुरा या दोन जिल्ह्यांच्या शहरीं तेथील कलेक्टरांनीं इंग्रजी राज्य टिकविण्याची जून महिन्यांत आपल्याकडून शिकस्त केली, याचा निर्देश पूर्वीं केला आहे. भारतीय राष्ट्रसभेचा अर्थात् कॉंग्रेसचा एक प्रकारें संस्थापक व पहिला सरचिटणीस ॲलन आक्टेव्हिअन ह्यूम हा इटाव्याचा व थार्नहिल या नांवाचा इंग्रज मथुरेचा अधिकारी होता. ह्यूमनें जेव्हां आपला इलाज चालत नाहीं, असें पाहिलें तेव्हां विश्वासाच्या हिंदुमुसलमानांकडे इटाव्याचा अधिकार सोपविला. मथुरेस थार्नहिल याला शिपायांनीं व दंगेखोरांनीं वेढलें तेव्हां त्याचा जीव वांचविण्याचें श्रेय तेथील धनाढ्य सेठजींनीं घेतलें. यानें एकदां मथुरा शहर सोडलें व तो पुनः तो ज्यावेळीं तेथें पोंचला तेव्हां यमुनेपलीकडील देवीसिंग नांवाच्या एका इसमानें 'राज्य आपलें' अशा समजुतीचा प्रताप आरंभल्याचें कळ-तांच थार्नहिल त्यावर चालून गेला. देवीसिंग त्याच्या प्रतिकाराला असमर्थ होता. देवीसिंगाला फांसाचें प्रायश्चित्त भोगावें लागलें. यानंतर मथुरेस राहणें सुरक्षित नाहीं, अशी खात्री झाली तेव्हां थार्नहिलनें आणखी एकदां आग्ऱ्यास प्रयाण केलें. तोंवर तेथें त्याच्या विश्वासाचे मुसलमान अंमलदार इंग्रजाच्या नांवानें इमान राखून राज्यकारभार करीत होते. ह्यूम आग्ऱ्यास न जातां जवळच्या शिंदेशाहीमध्यें प्रथम गेला. शिंद्याच्या फौजेची मदत आल्यामुळें त्याला कांहीं दिवस अधिकार गाजवितां आला, पण तो फार दिवस टिकला नाहीं, हें मागें सचविलें आहे.

आग्ऱ्याहून पाठविलेल्या लष्करी टोळ्यांना व ठिकाठिकाणीं चिकाटीनें राहिलेल्या अधिकाऱ्यांना योग्य प्रकारें इंग्रजी सत्तेचा पाया भक्कम करतां आला नाहीं व आग्ऱ्याची कोंडी खऱ्या अर्थानें फोडतां आली नाहीं. जोंवर दिल्ली शिपायांच्या हातीं होती तोंवर ही कोंडी फुटणें शक्य नव्हतें. लखनौच्या वेढ्याप्रमाणें आग्ऱ्याच्या किल्ल्याला शिपायांचा वेढा पडला नाहीं, हेंच काय तें तेथील इंग्रजांचें भाग्य होतें. दिल्ली इंग्रजांनीं काबीज केल्यावर आग्ऱ्याला शिपायांच्या वेढ्यांत सांपडण्याचें भय उरलें नाहीं. परंतु लढाईचें भय शिल्लक होतें. ता. १० ऑक्टोबर या दिवशीं सकाळीं त्या भयाचा खरेपणा इंग्रजांच्या प्रत्ययास आला. वस्तुतः ग्वालेरच्या शिपायांनीं आग्ऱ्याकडे यापूर्वींच धाव मारायला


हवी होती. जूनपासून तेथील हिंदी फौज पराक्रमासाठीं तळमळत होती. पण ग्वालेरच्या महाराजांनीं त्या फौजेला असल्या जागीं झुलवीत ठेवलें. शेवटीं त्या सैन्यानें आग्रा सोडून कानपूरच्या रोखानें काल्पीस तळ ठोकला. आग्र्यावर १० ऑक्टोबर या दिवशीं जी फौज आली ती इंदूरची होती. तिला तोंड देण्याइतकें बळ आग्र्याच्या इंग्रजांपाशीं नसल्यानें दिल्लीहून ता. २४ सप्टेंबर रोजीं अलीगडावरून कानपुराकडे जाण्यास निघालेल्या इंग्रजी सैन्याच्या पुढाऱ्याची आग्रावाल्यांनीं काकुळतीनें मनधरणी चालविली. आग्र्याची मागणी मनावर घेऊन तें सैन्य १० ऑक्टोबरच्या सकाळीं आग्र्यास पोंचलें. ज्या जागीं या सैन्याचे डेरे उभारले जाणार होते तेथून जवळच उंच वाढलेल्या पिकाच्या आड इंदूरचें सैन्य येऊन बसल्याची इंग्रजी सैन्याला मुळींच खबर नव्हती. इंग्रजांचे सैनिक विश्रांति घेण्याची पूर्व तयारी करण्यांत गुंतले होते, तर त्यांचे कांहीं अधिकारी किल्ल्यांत न्याहारी झोडायला गेले होते. इतक्यांत गारुडी डोंबाऱ्याप्रमाणें खेळ करीत चार मुसलमान इंग्रजांच्या छावणींत शिरले व त्यांनीं इंग्रज सैनिक सावध होण्यापूर्वीं विजेच्या त्वरेनें आपलीं हत्यारें चालविलीं. त्या योगानें आरडाओरडा झाला. शिपायांचा संकेत अशा रीतीनें उघड होतांच तोफांचे आवाज गडगडून गोळे इंग्रजांच्या अंगावर पडूं लागले. शिपाईदळाचे स्वारहि ब्रिटिश तळावर धावले तेव्हां प्रथम कांहीं मिनिटें गोंधळांत जाऊन मग इंग्रज सांवरले. त्यांनीं आपलीं शस्त्रास्त्रें उलट चालविलीं तोंच किल्ल्यांतली न्याहारी टाकून अधिकारी पळत आले. लढाई तीन चार तासांहून जास्त वेळ चालली नाहीं. इंदूरची फौज हत्यारें तोफा टाकून पळाली. दिल्लीहून नवें दळ आल्याची वार्ता इंदूरकरांना नव्हती. दोन्ही पक्षांना एकमेकांच्या सामन्याचा चमत्कार वाटला. या विजयानंतर आग्र्याच्या बाजूस शिपाई-गर्दीचे वीर बिलकूल फिरकले नाहींत.

आग्र्याची कोंडी ता. १० ऑक्टोबर नंतर फुटली. तेथें जीव वांचलेले जे अधिकारी जमले होते, ते या विजयी सैनिकांबरोबर आपापल्या ठाण्याकडे गेले. बरेच महिने इंग्रजांनीं दिल्ली घेतल्याची बातमी गांवोगांवच्या लोकांना व त्यावर सत्ता गाजविणाऱ्या झोटिंग पुढाऱ्यांना खरीच वाटत नव्हती. त्यांचा उलट असा समज होता कीं, दिल्लीहून पळणाऱ्या इंग्रजांचे जमाव इकडे तिकडे फिरत आहेत. पुढें जेव्हां शिपायांच्या झुंडी लोकांना दिसूं लागल्या तेव्हां दिल्लीचा बंदोबस्त करून इंग्रजांच्या पाठीस लागलेल्या त्या झुंडी आहेत, अशी

लोकांची कल्पना झाली. हे गैरसमज दोन महिन्यांनीं दूर झाले. कानपूरकडून इंग्रजी लष्कर फत्तेगडाकडे चालून आलें आणि उत्तरेकडूनहि गोऱ्या फौजेच्या नव्या नव्या तुकड्या दृष्टीस पडूं लागल्या तेव्हां इंग्रजांच्या वाढत्या सामर्थ्या-संबंधाचे संदेह फिटले. मग लोकांनीं इंग्रजी सत्तेसमोर माना झुकवून त्यांच्या मागण्यांचा आदर सुरू केला. या संधिकाळांतील चंचल राज्यकारभाराचे कांहीं मासले येथे निदर्शनास आणले आहेत.

– ३ –

कानपूरच्या अलीकडील फत्तेगड ठाण्याची व कानपूरची स्थिति शिपायांचा उठाव आणि पराक्रम या दोन्ही बाजूंनीं सारखीच होती, असें पाहायला सांपडते. फत्तेगडाचा खजीना दुसरीकडे जाऊं द्यावयाचा नाहीं, असा हेका यशस्वी करून तेथील शिपायांनीं ता. ४ जून रोजीं आपले इंग्रजी हुकुमत तुडविण्याचें आपलें मनोगत उघडकीस आणलें,पण १८ जूनपर्यंत त्यांनीं प्रत्यक्ष उठाव केला नाहीं. त्यांचा उठाव होणार याविषयीं तेथील सेनाधिकाऱ्याला जव्हां शंका उरली नाहीं, तेव्हां त्यानें किल्ला लढविण्याची तयारी चालविली. शिपायांनीं आतां निष्ठेचें सोंग टाकून आपलें वैर स्पष्ट उघडकीस आणलें. फत्तेगडचे शिपाई व दुसरीकडून आलेले शिपाई त्यांच्यामध्यें खजिन्याच्या वांटणीचा तंटा लागल्यामुळें इंग्रजांना किल्ल्याची बळकटी करायला साहजिकच अवकाश फावला. फरुक्काबादच्या नबाबानें हा तंटा मिटविल्यावर ता. २५ पासून शिपायांची व इंग्रजांची झुंज ता. ३ जुलई-पर्यंत चालू राहिली. परंतु शिपायांना किल्ला घेतां आला नाहीं. शिपायांनीं नव्या नव्या युक्त्या चालवून किल्ल्यांतल्या इंग्रजांना हैराण करून सोडल्यामुळें किल्ल्याखालीं गंगानदीमध्यें लपवून ठेवलेल्या नावांत बसून सर्व गोरे ता. ३ जुलईला कानपुरास जाण्याला निघाले. त्यांचा पळ ध्यानांत येतांच शिपायांनीं नावांच्या साह्यानें गोळीबार करीत पाठलाग चालविला. शिपायांच्या गोळी-बारानें बरेच इंग्रज स्त्रीपुरुष दगावले. या प्रसंगीं इंग्रजांचे शत्रु फक्त शिपाईच नव्हते तर किनाऱ्यावरील खेड्यांचे लोक देखील कांठावरून धावत पळत इंग्रजांच्या नावांवर गोळ्या झाडीत होते.यांतून वांचलेल्या इंग्रजांवर वाळवंटांत नावा रुतल्यामुळें मरण ओढवलें. नावांची गति बंद पडतांच इंग्रजांनीं नावा सोडल्या व नदीकांठाची जमीन धरली. आतां त्यांना शिपायांच्या कैदेंत पडण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. सुमारें चाळीस जणांना शिपायांनीं फरुक्का-



वायव्य आणि मध्य हिंदुस्थान
काबूल
पेशावर
अटक
रावळपिंडी
श्रीनगर
जेहलम
जम्मू
सियालकोट
लाहोर
अमृतसर
फिरोजपूर
लुधियाना
जालंदर
अंबाला
पतियाळा
मुलतान
मुजफरघर
भावलपूर
करनाळ
दिल्ली
सहारनपूर
मीरत
मोरादाबाद
बरेली
अलिगड
मथुरा
आग्रा
भरतपूर
जयपूर
अजमीर
जोधपूर
बिकानेर
टोंक
करौली
ग्वाल्हेर
झांशी
कानपूर
लखनौ
फैजाबाद
गोरखपूर
अलाहाबाद
मिर्जापूर
बनारस
गया
जौनपूर
आझमगड
गाझीपूर
बांदा
उदेपूर
चितोड
नीमच
उज्जैन
इंदोर
भोपाळ
सागर
जबलपूर
होशंगाबाद
मंडला
अहमदाबाद
बडोदे
भडोच
राजकोट
जुनागड
पोरबंदर
द्वारका
भुज
कच्छ
कराची
हैदराबाद
उमरकोट
शिकारपूर
सक्कर
लाडक
गुजरात
काठेवाड
माळवा
राजपुताना
पंजाब
काश्मीर

बादेच्या नबाबाकडे नेले व त्याच्या हुकमानें त्यांचा वध करण्यांत आला. या पकडींतून जे बचावून पुढें गेले त्यांचा संहार कानपूरजवळ नानासाहेबाच्या मुलखांत झाला. एवढ्या तडाख्यांत सुद्धां अखेरीस दोन तीन इंग्रज घडलेला प्रकार सांगायला शिल्लक उरले. हा प्रदेश १८५७ च्या डिसेंबरपर्यंत फरुक्काबादेच्या हंगामी नबाबशाहीखालीं होता. या नबाबाची शिपायांचा उठाव मोडल्यावर काय वाट लागली त्याचा पाढा मागें वाचला आहे.

कानपुरापलीकडील फत्तेपुराची हकीकत फत्तेगडासारखीच आहे, पण तेथें शिपायांनीं इंग्रजांच्या हत्येचें पाप आपल्या हातून होऊं दिलें नाहीं. फक्त एकच इंग्रज हट्टानें तेथें राहिला व मारला गेला. बाकीच्या इंग्रजांनीं बुंदेलखंडांतील बांदा, रेवा या जागीं पळ काढला. प्रवासांतल्या हालापायीं कोणी मेले, पण शिपायांनीं त्यांचा घात केला नाहीं. बांद्याचा नबाब हा कालान्तरानें शिपायांच्या दंगलींत शिरला, परंतु जोंवर साधलें तोंवर तो इंग्रजांना साह्य करीत होता. रेवा, पन्ना, हीं बुंदेलखंडांतील संस्थानें इंग्रजांच्या पक्षाचीं होतीं त्यामुळें तेथें इंग्रज सुरक्षित राहिले. फत्तेपुराच्या इंग्रज टोळीपैकीं कलेक्टर शेअरर हा भटकत वाट काढीत अलाहाबादेस पोचला व तेथून हेवलॉकच्या फौजेबरोबर कानपुरास गेला. कानपुरास त्याच्याकडे कलेक्टराची कामगिरी आली व ती तो शिपायांच्या उठावाची आग विझेपर्यंत बजावीत होता. कानपुरास इंग्रज फौजांच्या तळावर करमणुकीसाठीं यानें घोड्यांच्या शर्यती सुरू केल्या; इतर ठिकाणांहून पळून आलेल्या इंग्रजांचें स्वागत व आतिथ्य करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती; वगैरे माहितीबरोबरच कानपुरास पकडल्या जाणाऱ्या गुन्हेगारांचे मनोरंजक प्रकार त्यानें लिहिलेल्या पुस्तकांत पाहायला सांपडतात. नानासाहेबांच्या मृत्यूची व त्यांच्या साथीदारांची—यांतच नानांचा एक सेनापति ज्वालाप्रसाद होता—हकीकत सांगतांना शेअररनें नानांच्या न्हाव्याचा एक लहानसा गमतीचा संवाद नमूद केला आहे. हा न्हावी शिवीखेरीज नानांचें नांवच उच्चारीत नव्हता. नानासाहेब १८५९-६०च्या दरम्यान मरण पावल्याच्या बातमीला ज्वालाप्रसादानें ठासून दुजोरा दिला, असें शेअररचें म्हणणें आहे.

आग्रा प्रदेशाच्या कानपूर फत्तेपूर पलीकडील अलाहाबादपर्यंतच्या जिल्ह्यांत इंग्रजांचा अंमल केव्हां दिसावा केव्हां मुळींच नसावा, इंग्रजाची जागा स्थानिक दंडुकेशहांनीं बळकावून बसावें, अशी अंदाधुंदी १८५७च्या

जूननंतर थोड्याफार प्रमाणांत सुमारें ८–९ महिने चालू असल्याचें येथवर वाचकांच्या नजरेस घातलें. अलाहाबाद व बनारस या आग्र्याच्या दोन परगण्यांत इंग्रज, इंग्रजांचे शत्रु व मित्र यांचा सामना अधिक तीव्र आणि जास्त व्यापाचा होता. ज्या क्रमानें पूर्वीं शिपायांची उठावाची पाहणी केली, त्या क्रमानुसार आधीं अलाहाबाद परगण्याचा परामर्श करून मग बनारसकडे वळणें सयुक्तिक ठरतें. अलाहाबादेच्या अधिकाराखालील फत्तेपूर-कानपूरचा वृत्तान्त मागें येऊन गेला आहे. बांद्याच्या नबाबाचा ओझरता उल्लेख पूर्वीं केला आहे, यावरून तेथील इंग्रजी अंमल शिपाई-गर्दीनें उलथून पाडल्याचें वाचकांना समजलेंच आहे. बांद्यासारखाच दुसरा जिल्हा हमीरपूर. तेथें शिपायांची गर्दी साफ मोडेपर्यंत अंदाधुंदीशिवाय दुसरें कांहींच अस्तित्वांत नव्हतें, असें म्हटल्यास त्याविषयीं निराळें जास्त सांगायला नको. खुद्द अलाहाबाद जिल्ह्यांत गंगाप्रवाहाच्या एका (उजव्या) बाजूकडील प्रदेश इंग्रजनिष्ठ जमीनदारांनीं इंग्रजांकरितां संभाळला व डावीकडील प्रदेशांत बेबंदशाहीचें थैमान चाललें होतें इतकें कीं तेथील हकीकतीचा संगतवार तपशील इंग्रज इतिहासकारांनाहि जमवितां आलेला नाहीं. अलाहाबाद शहर व त्याच्या आसपासचा दहावीस मैलांचा मुलूख हाच काय तो इंग्रजी सत्तेला मानणारा होता व याचें कारण उघड आहे. कलकत्त्याहून येणाऱ्या लष्कराच्या वाटेवर तो भाग असल्यानें त्या लष्कराचा संपर्क टाळण्यांत शिपायांचा फायदा होता. ज्या ज्या वेळीं गर्दीवाले शिपाई व त्यांचे हत्यारबंद सोबती इंग्रजी लष्कराच्या वाटेस गेले त्या त्या वेळीं खरपूस माराशिवाय दुसरा कोणताच अनुभव त्यांच्या वांट्यास आला नाहीं. यामुळें जेथें इंग्रजाला सहज धावून जातां येणार नाहीं, तेथें आपलें राज्य चालवायचें असें शिपाई-गर्दीचा फायदा घेणारांचें धोरण होतें. सूड उगवूं इच्छिणाऱ्या इंग्रजांच्या क्रूरपणाचीं कृत्यें अलाहाबाद–बनारसच्या टापूंत अधिक घडल्यामुळें लोकांना त्यांची दहशत वाटावी यांत नवल नाहीं. जनावरांप्रमाणें माणसांच्या नाहक शिकारीचा खेळ या भागांत जास्त दिसून आल्यामुळें गोऱ्यांना शिक्षेसंबंधांत देऊं केलेले अनियंत्रित अधिकार सगळीकडेच कॅनिंगला रद्द करावे लागले.

बनारस येथील शिपायांचा उठाव नीलनें कसा मोडला याचें इतिवृत्त पूर्वीं सादर केलेलें आहे. शिपायांच्या वर्तनाला त्या शहराच्या लोकांची साथ न मिळण्याचें एक कारण अधिकाऱ्यांची दक्षता हें होतें, तर दुसरें कारण तेथील

वजनदार हिंदी व्यक्तींचें साह्य हें होतें. शीख सरदार सूरतसिंग, पं. गोकुळ-चंद, राव देवनारायणसिंग आणि बनारसचा राजा अशा चौघांचीं नांवें इंग्रज इतिहासकारांनीं बनारसच्या हकीकतींत अतिशय कृतज्ञतेच्या आदरानें स्तुतीच्या शब्दांत दाखल केलेलीं आहेत. शिखांचें राज्य घेतल्यावर सूरतसिंगाला इंग्रजांनीं बनारस येथें स्थानबद्ध करून ठेवलें होतें. तो स्थानबद्ध असला तरी त्याचा यथोचित मान राखला गेल्यामुळें त्याला इंग्रजां-विषयीं प्रेम वाटत होतें. ता. ४ जून रोजीं समजुतीच्या घोटाळ्यापायीं शीख शिपायांची कत्तल झाली तेव्हां चिडलेल्या शिखांना शांत करण्याचें काम सूरतसिंगानें पार पाडलें. पं. गोकुळचंद हा प्रतिष्ठित ब्राह्मण तेथील इंग्रज न्यायाधीशाचा नाझर होता. हिंदु नागरिकांत त्याचें फार वजन असल्यानें त्याच्या मदतीची किंमत करतां येणार नाहीं, अशी त्याची तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांनीं प्रशंसा गाइली आहे. देवनारायणसिंगाच्या सक्रिय अनुकूलते-बद्दल इंग्रजांचा असाच अभिप्राय आहे. बनारसच्या राजानें अस्वस्थतेचा स्फोट होतांच जीव वांचविण्यासाठीं रानोमाळ पळणाऱ्या ख्रिस्ती धर्मप्रसार-कांना प्राणदानाचें जें औदार्य दाखविलें त्या औदार्याच्या प्रेरणेनें पुढेंहि तो इंग्रजांना शक्य ती सर्व मदत करीत होता.

बनारसचें शहर बारीकसारीक कटकटी उद्भवल्या असतांहि शांत राहिलें; एकदां मुसलमानांनीं चव्हाट्यावर हिरवें निशाण उभें करून लोकांना भडकविण्याचा निष्फळ यत्न केला हें तेथील कटकटीचें एक उदाहरण आहे. बनारस हें हिंदूंचें पवित्र तीर्थ आणि हिंदु धर्मनिष्ठांचें माहेरघर, तेथल्या वस्तीला दांडगाईची संवय, शिवाय तीर्थ म्हणून दुसरीकडून येणाऱ्या जाणाऱ्या हजारों यात्रेकरूंची वर्दळ, यामुळें या शहराचा त्रास होईल, अशी धास्ती इंग्रजांना सारखी वाटत होती. परंतु ही धास्ती खरी ठरली नाहीं, याचें इंग्रजांना आश्चर्य वाटत राहिलें. धर्माचा अभिमान आणि धर्मवेड किंवा धर्मविषयक माथेफिरूपणा यांतला भेद इंग्रजांना आकलन व्हावा अशी तेव्हां त्यांच्या बुद्धीची स्थिति नव्हती. गोऱ्या स्त्रीपुरुषांच्या इतस्ततः कत्तली करणारे हिंदु प्रामुख्यानें मुसलमान शिपाई व तसेच गांवोगांवचे सामान्य लोक आणि तीर्थावर आपलें जीवन पारमार्थिक दृष्ट्या सफळ करूं इच्छिणारीं माणसें यांतला फरक इंग्रजांना कळता तर बनारसबद्दलचा त्यांचा भ्रम चटकन् गेला असता. बनारसचा नागरिक समाज बहुजिनसी होता, हें सुद्धां त्या

शहरांत इंग्रजविरोधी कारस्थानें न शिजण्याचें एक कारण संभवतें. कारणें कोणतींहि असलीं तरी खिस्त्यांच्या रक्तानें तें शहर विटाळलें नाहीं, अशी कबूली देणारे गोरे खिस्ती मात्र भयानक निर्दयतेनें हिंदी जनतेशीं वागलें, असें नमूद करणें अवश्य आहे. जो हातीं लागेल त्याला गुन्हेगार मानून त्याचा गळा फासांत अडकविण्याची गोऱ्यांना तेव्हां जी चटक लागली होती, तिचीं इतिहासांतील उदाहरणें पाहिल्यास तीं जशीं पराकाष्ठेच्या निर्दयपणाचीं तशींच कमालीच्या बेशरमपणाचीं असल्याबद्दल शंका राहात नाहीं. फासावर टांगून माणसें मारणें ही कला आहे अशी कित्येक इंग्रजांची धारणा होती. आज कितीं माणसें कोणत्या नव्या युक्तीनें मारलीं, याची धन्यतेनें आपसांत वाच्यता करणारे कांहीं इंग्रज बनारसला होते इंग्रजांचीं मुलें शिपायांनीं मारलीं याबद्दल आक्रोश करणारांनीं बनारसला उठावखोर शिपायांच्या निशाणाशीं खेळणाऱ्या कित्येक हिंदी मुलांना इंग्रजांच्या लष्करी कायद्यानें काळाच्या पोटांत ढकललें, हें उदाहरण लक्षांत घेतलें तर वैराचा आंधळेपणा उभयपक्षीं सारखाच प्रभावशाली असतो याबद्दल शंका राहणार नाहीं. वयाचीं वर्षे थोडीं असलीं तरी उष्णकटिबंधांत माणसें लवकर समजूतदार बनतात म्हणून मारलेल्या मुलांची वर्षांवरून कींव करणें योग्य नव्हे हें समर्थन इंग्रजांच्या बेशरमपणाची साक्ष पटवील.

बनारस परगण्यांतील मिर्झापूर, जैनपूर, गोरखपूर, आझमगड या जिल्ह्यांमध्यें अराजक पेटलेलें होतें. या जिल्ह्यांतील लष्करी ठाण्याच्या शिपायांनीं इंग्रजांच्या सत्तेला ठोकरलें. पण सर्व ठाण्यावरील इंग्रजांना मरण्याची पाळी आली नाहीं. या प्रदेशांतील गोरे अधिकारी, मळेवाले आणि दुसरीकडून पळून आलेली गोरी मंडळी, यांच्यापैकीं बहुसंख्य लोक बचावले, असें गोळाबेरजेनें म्हणतां येतें. जगदीशपुराच्या बाबू कुंवरसिंगाच्या उठावमोडाचा आधार नसतां व नेपाळच्या गुरखा फौजेची मदत नसती तर या प्रदेशांत मधून मधून ज्या योगानें इंग्रजी सत्तेला डोकें वर काढतां येत होतें व इंग्रजांच्या शत्रूची जूट वारंवार फुटत होती, ते प्रसंगच घडण्याचा संभव नव्हता. इंग्रजांना गुरख्यांचें साह्य मिळालें तसेंच अनेक लहान मोठ्या जमीनदार तालुकदारांचें बळ लाभलें. जौनपूर जिल्ह्यांत हिंगणलाल, माधोसिंग, राजा महेश नारायण, पं. कृष्णसिंह या वजनदार इंग्रजनिष्ठांनीं इंग्रजांना वांचविलें. माधोसिंगानें गोऱ्या मळेवाल्यांची सुटका केली. राजा महेश

नारायणानें आपले हत्यारबंद शिपाई इंग्रजांकडे पाठविले. शिवगुलाम दुबे हा दुबे समाजाचा पुढारी इंग्रजांच्या हितसंबंधाचे जौनपुरांत शेवटपर्यंत रक्षण करीत होता. पं. कृष्णसिंह इंग्रजाखातर पुनः पुनः हार खावी लागत असूनहि लढत राहिला.

गोरखपुर जिल्हा स्थानिक अनुकूलतेच्या दृष्टीनें इंग्रजांच्या बाजूचा बहुतांशीं नव्हता. परंतु गुरख्यांच्या लष्करानें त्यांची बाजी थोडा वेळ संभाळली. गुरखा दळ तेथें जुलईत आलें. पण त्यांना तेथें राहण्याची आज्ञा नव्हती. गुरखे शूर खरे, पण समंजसपणाचा गुण त्यांच्या ठिकाणीं बेताचा होता. यामुळें गोरखपुरास निकडीचीं तेवढीं कामें उरकून ते आझमगडाकडे निघाले. त्यांच्या उपस्थितीनें दंगेखोरांना थोडासा वचक बसला. ऑगस्टपर्यंत गोरखपुराचे अधिकारी आपल्या जागेवर राहून कोलमडणाऱ्या इंग्रजी सत्तेला यथाशक्ति आवरीत होते. परंतु आझमगड, गाझीपूर, मिर्झापूर येथें शिपायांनीं इंग्रजी हुकमत लाथाडल्यावर सुटलेल्या दंग्याच्या वादळांत गोरखपुराचे अधिकारी नाकर्ते ठरले. तरी तेथील अराजकाच्या आगींत इंग्रजी सत्ता साफ जळून गेली नाहीं याला कारण कित्येक मुसलमान कामगारांचे व इंग्रजनिष्ठ शिपायांचें साह्य, असें आढळतें. येथील जमीनदार इंग्रजांवर उलटले होतें. जुलईत पलवार (परमार?) रजपुतांनीं आझमगडावर तळ देऊन तीनदां हल्ला केला. त्यांच्या विरोधास उभ्या राहिलेल्या इंग्रजांनीं रजपुतांना तिन्ही वेळां थोपविलें. तिसऱ्या हल्ल्यांत रजपुतांचें अतोनात नुकसान झाल्यामुळें त्यांनीं लढण्याचा नाद सोडला. त्या वेळीं रजपुतांनीं मैदान सोडलें त्याच सुमारास इंग्रजसुद्धां या सामन्यांतून बाहेर पळाले होते. पण हाय खाल्लेल्या रजपुतांनीं त्यांची पाठ धरली नाहीं. आझमगडास अलीबक्ष नांवाच्या एका मुसलमानानें इंग्रजांकडून मोठी वाहवा मिळविली. याखेरीज अजगरअली व महमद तकी या दोघां मुसलमानांनीं दोन ठाण्यावर इंग्रजांची हुकुमत जीवंत ठेवल्यामुळें त्यांची इंग्रजी कारभाराच्या इतिहासांत प्रशंसा दिसावी हें स्वाभाविक आहे. प्रस्तुत प्रदेशापैकीं गाझीपुरास गोऱ्या लष्कराची एक तुकडी येऊन कायम राहिली होती. तिच्या समाचाराला कलकत्त्याहून कानपूरकडे जाणारें लष्कर कधीं कधीं वांकडी वाट करून तेथें जात असे. खेरीज गुरखा शिपायांचा संचार होतांच. यामुळें अराजकाची धामधूम विखरून विस्कळित रीतीनें पण नेटानें १८५८ च्या पहिल्या सहामाहीपर्यंत चालू राहिली.

* * *

# ६

# राजमंडळाचा सहकार

ब्रिटिशांच्या कंपनी-सरकारानें देशांतील अनेक चिरपरिचित राज्यें गट्ट केल्यामुळें त्या सरकाराची हिंदी फौज संतापली आणि १८५७ चा उठाव अवतरला, ही समजूत निराधार असल्याचें सत्तावन सालींच येथील राजेरजवाड्यांनीं ब्रिटिश राज्यकारभाराला मदत पुरवून सिद्ध केलेलें आहे. येथवर मांडलेल्या माहितीमध्यें पंजाबच्या पतियाळा, झींद, नाभा येथील राजांनीं ब्रिटिशांना दिलेल्या साह्याचा उल्लेख येऊन गेला आहे. यांच्या मदतीमुळें पंजाब व दिल्ली यांमधील दळणवळण अखेरपर्यंत सुरक्षित राहिलें व दिल्ली जिंकण्याचें काम सुकर झालें, हें जिज्ञासूंच्या ध्यानांत आलेंच असेल. भरतपूर, ग्वालेर, कोटा येथील राजांच्या मदतीसाठीं पाठविलेल्या सैनिकांनीं पुढें उठावाच्या शिपायांशीं हातमिळवणी केली असली तरी त्यांचे राजे ब्रिटिशांचे कट्टे पक्षपाती होते, या वस्तुस्थितीला धक्का लागत नाहीं. हिंदी राजमंडळाचें हें सहकारी धोरण अधिक स्पष्ट होण्याकरितां जो भूविभाग रजपूत संस्थानिकांनीं व्यापलेला होता, त्या राजस्थानांची पाहणी करून मग दुसरीकडे वळणें बरें.

## दोन छावण्यांतील उठाव

राजस्थानांत १८ मोठीं व २ छोटीं संस्थानें होतीं. त्यांच्या देखरेखी-साठीं आणि मदतीसाठीं अजमीरजवळ नसीराबाद येथें व त्यापलीकडे माळव्याच्या ( इंग्रजी सेंट्रल इंडिया व आजच्या स्वराज्यांतील १९५६ पूर्वीचें मध्य-भारत ) हद्दीशीं नीमच येथें ब्रिटिश नियंत्रणाच्या मोठ्या लष्करी छावण्या

होत्या. त्यांपैकीं नसीराबादच्या छावणींत ता. २८ मे रोजीं शिपायांनीं इंग्रजांचें वर्चस्व झिडकारलें. मीरतच्या उठावाची बातमी तेथें पोंचली त्या दिवसापासूनच शिपाई बिघडत चालल्याचीं लक्षणें अधिकाधिक स्पष्टत्व पावत होतीं. ता. २८ मे या दिवशीं शिपायांच्या चित्तविक्षेपाचें अपेक्षित पर्यवसान इंग्रजांच्या अनुभवास आलें. शिपाई उघडपणें इंग्रजांच्या विरोधासाठीं त्या दिवशीं स्वयंप्रेरणेनें छावणीबाहेर पडल्याचें ऐकतांच इंग्रजांनीं बायकामुलें दूर पाठविलीं आणि शिपाई लोक ताब्यावर नाहींत याची खात्री पटल्यावर इंग्रज अधिकारी बायकामुलें बरोबर घेऊन बियावर गांवाकडे चालते झाले. शिपायांची निमकहलाली जगविण्याच्या खटपटींत दोन इंग्रज मेले व दोघे घायाळ पडले. यापेक्षां अधिक रक्तपात घडला नाहीं. बियावरला जातांना एक गोरा उन्हाळा सोसला नाहीं म्हणून प्राणास मुकला. इंग्रजांचा शिपायांनीं पाठलाग केला नाहीं; कारण लुटालूट, जाळपोळ वगैरे उठावानंतरचा कार्यक्रम त्यांना पार पाडावयाचा होता. तो उरकून शिपायांचा जमाव स्वस्थपणें मजला मारीत ता. १७ जून रोजीं दिल्लीस पोंचला.

राजस्थानी नरेशांना लगामीं ठेवण्यासाठीं नेमलेल्या मुख्याधिकाऱ्यानें— लॉरेन्स यानें शिपायांचा बेभरंवसा ओळखून डीसा गांवाच्या छावणींतून गोऱ्या लष्कराची कुमक बोलावली होती. त्या कुमकेंत जे हिंदी सैनिक आले, त्यांमध्यें उठाववाल्या शिपायांच्या जातभाईंची एक तुकडी होती. १० ऑगस्टपर्यंत या तुकडीला उठावाचें वारें बाधलें नव्हतें. त्या दिवशीं एका शिपायाला उठावाची लहर चढून त्यानें छावणींत धामधूम सुरू केली. या प्रकाराला आळा घालण्याच्या तयारींत असलेल्या हिंदी अंमलदारावर त्यानें बंदूक चालविली. इतक्यांत छावणीचा प्रमुख गोरा अधिकारी आला. त्यानें त्या बागी बनलेल्या शिपायांच्या सगळ्या तुकडीला कवाइतीच्या मैदानावर बोलावलें, तेव्हां अवघ्या ४० जणांनीं तो हुकूम मानला व इतर सगळे आपल्या वस्तींत राहिले. त्यांना वठणीवर आणण्याचा आतां एकच उपाय होता. त्या तुकडीला प्राणनाशाचें भय दाखविणें हाच तो उपाय असल्यानें गोरे सैनिक व खात्रीचा तोफखाना हीं साधनें जव्हां त्या बेबंद शिपायांसमोर उभीं केलीं तेव्हां ती तुकडी आपल्या वस्तीबाहेर आली. त्यांना हत्यारें टाकण्याचा हुकूम होतांच त्यांनीं तो हुकूम बिनतक्रार ऐकला. ज्या शिपायानें हा प्रसंग उत्पन्न केला त्यानें गोऱ्या अधिकाऱ्यावर गोळी

सोडली. ती चुकली व उलट त्यावर बंदुकीचा मार बसून जमिनीवर गतप्राण होऊन पडण्याची पाळी आली. हत्यारें गमावूनहि उठावाच्या शिपायांमागील दंडचक्र सुटलें नाहीं. उठावाच्या पुढाऱ्यांपैकीं पांच जणांना देहान्त व तिघांना जन्मठेप याप्रमाणें शिक्षा देण्यांत आल्या. ज्यांनीं हुकूमभंग केला नव्हता, त्यांना त्यांचीं हत्यारें परत मिळालीं आणि त्यांनीं यानंतर अतिशय प्रशंसनीय कामगिरी बजावली, असा इंग्रजांचा अभिप्राय आढळतो.

नीमच्च हें ठिकाण नसीराबादच्या दक्षिणेस दीडशें मैलांवर असून ता. ३ जून रोजीं तोफांचे आवाज करून तेथील शिपायांनीं आपण इंग्रजांचे अंकित नाहीं, असें निदर्शनास आणलें. शिपाई क्षुब्ध असल्याची जाणीव अधिकाऱ्यांना होती, पण शिपाई आपल्या स्वामिनिष्ठेचें वारंवार प्रदर्शन दाखवून अंमलदारांच्या संशयाला विरजण लावीत होते. तरी अधिकाऱ्यांनीं वेळ पडल्यास आपलें संरक्षण व्हावें म्हणून छावणींतील एक तटबंदीचा चौक निर्वाणीचा आधार म्हणून ठरवून टाकला होता. तोफांचा आवाज कानीं पडतांच इंग्रज लोक त्या चौकाकडे जातात तोंच त्यांच्या आधीं शिपायांच्या टोळ्या त्या जागीं शिरत आहेत, असें त्यांना दिसलें. त्यानंतर इंग्रज व शिपाई यांच्यामध्यें खेळीमेळीचा संवाद सुरू झाला. अजून त्यांनीं इंग्रजनिष्ठेची भाषा चालू ठेवली होती. शेवटीं पहाटेस ४ वाजतां त्यांनीं आपल्या इमानदारीचें नाटक संपवून छावणी लुटण्याकरितां ते चौक सोडून निघाले. इंग्रजांनीं उदेपूर संस्थानाकडे पळ काढला. एक युरोपियन बाई व तिचीं मुलें मागें राहिल्यानें तीं ठार झालीं, पण इतर कुणाच्याहि जिवाला शिपायांनीं अपाय केला नाहीं. पळालेले इंग्रज वाटेंतले हाल सोशीत उदेपुराला सुखरूप पोंचले. शिपायांनीं दिल्लीचा मार्ग चोखाळला.

लॉरेन्सनें ही रिकामी छावणी बूंदी, कोटा, मेवाड (उदेपूर) यांच्या तैनाती फौजेचीं माणसें आणून भरून काढली. थोड्याच दिवसांत हीं संस्थानी कुळें विश्वासाचीं नाहींत, याबद्दल संशय नाहींसा झाला आणि लॉरेन्सनें कांहीं गोरे व कांहीं मुंबईकडील काळे सैनिक नीमचला पाठविले. पण हे नवे सैनिक संस्थानी सैनिकांहून जास्त बिघडले असल्याची खात्री पटविणारा प्रसंग ता. १२ ऑगस्ट रोजीं उद्भवला. त्या दिवशीं इंग्रजांचा कांटा काढावा, हा शिपायांचा उद्देश कृतींत उतरण्याच्या आधींच अधिकाऱ्यांनीं गोऱ्या

सैनिकांमार्फत शिपायांच्या पुढाऱ्यांची धरपकड साधली. धरपकडीच्या सत्रांतून आठ जण निसटले. शिपायांचा उठाव याप्रमाणें दडपला गेला, पण क्षोभाचें वातावरण शिल्लक राहिलें एवढेंच नव्हे तर तेथील जनतेला त्यानें व्यापलें.

### राजे व त्यांचें लष्कर

राजस्थानाच्या दोन मुख्य छावण्यांतून शिपायांनीं कंपनीच्या हुकुमतीवर हत्यार उपसलें तरी राजस्थानाच्या एकंदर शांततेमध्यें फरक पडला नाहीं. एकाहि राजानें शिपायांना अनुकूलता दाखविली नाहीं. तथापि मुख्य अधिकारी लॉरेन्स हा असावध नव्हता. पुष्कळशीं युद्धें व राजकारणें त्यानें अनुभवलेलीं होतीं. १८५७ च्या मार्च महिन्यांत तो राजस्थानांत आला आणि आपल्या कारभाराचे धागेदोरे आकलन करून तो आबूच्या पहाडावर एप्रिलांत राहायला गेला. शिपाई विश्वासाचे नाहींत व राजस्थानांत ३०-३५ अधिकाऱ्यांशिवाय जास्त गोरे नाहींत, अशा स्थितींत लॉरेन्सपुढें अजमीर येथील दारूगोळ्याचें कोठार संभाळण्याचा जो पेंच उत्पन्न झाला होता तो मेर जातीच्या सैनिकांनीं सोडविला. मेर ही लहानशी जमात राजस्थानाच्या इतर जाती-जमातीहून अगदीं भिन्न असून तिच्या उद्धाराचें काम इंग्रजांनीं केल्यामुळें तिच्या कृतज्ञतेचा इंग्रजाला विश्वास होता. या जातीच्या लोकांचें छोटेंसें लष्कर ब्रिटिशांनीं उभें केलें होतें. त्याच्या तुकड्यांची दारूगोळ्याच्या कोठारावर नेमणूक करून एक काळजी लॉरेन्सनें कमी केली. १९ मे रोजीं त्याला मीरतचें वर्तमान कळलें व ताबडतोब तो राजस्थान काबूंत राखण्याच्या तजविजीस लागला. ता. २३ मे रोजीं त्यानें सर्व राजेरजवाड्यांना अनुलक्षून एक जाहीरनामा काढला. आपापल्या राज्याच्या हद्दींत राजांनीं शिपाई-गर्दीचा उपद्रव लागूं देऊं नये, आपली खासगी शिबंदी सरहद्दीवर ठेवावी, इंग्रजांच्या नेकीबद्दल विश्वास बाळगावा, असा त्या जाहीरनाम्याचा आशय होता. याच वेळीं लॉरेन्सनें मुंबईच्या अधिकाऱ्याकडे गोऱ्या लष्कराची मागणी करून ठिकठिकाणच्या लष्करी अंमलदारांना सावधपणानें व तडफेनें वागण्याची सूचना दिली. इंग्रजाविरुद्ध खलबतें करणाऱ्या शिपायांना गोऱ्या सोजरांचें खरें भय वाटत होतें. सोजर येण्याच्या आधीं त्यांना आपला डाव टाकायचा होता. त्याप्रमाणें त्यांनीं तो अंमलांत आणला. त्यासरशीं आबूच्या थंड हवेचा मोह सोडून लॉरेन्स ता. १ जून रोजीं बियावरला आला. त्यानें

येतांक्षणीं अजमीरच्या कोठाराचें भय दूर केलें, हें मागें सांगितलेंच आहे. ता. १२ जूनला डीस्याहून आलेल्या ४०० सोजरांपैकीं १०० सोजीर त्यानें अजमीरास मेरांच्या मदतीस पाठविले.

## अबूच्या धुक्यांतील धामधूम

ऑगस्टच्या १०-१२ तारखांस नसीराबाद नीमच येथें शिपायांनीं दुसऱ्या वेळीं केलेल्या धामधुमीची हकीकत पूर्वीं सांगून झाली. त्या धामधूमीनंतर एक आठवडा लोटला नाहीं तोंच आबूच्या इंग्रजांवर शिपाई-गर्दीचें संकट डोकावून गेलें. आबूच्या डोंगराखालीं एरिनपुरा नांवाच्या गांवीं जोधपूरच्या शिबंदीचें मुख्य केंद्र असून त्या शिबंदीचे सुमारें ७० शिपाई आबूस ठेवलेले होते. ता. १९ ऑगस्टला आबूच्या पायथ्याशीं असलेल्या अनाद्रा गांवीं एरिनपुऱ्याहून एक कंपू रवाना करण्यांत आला. त्या भागांतील बंडाळीवर इलाज म्हणून पाठविलेला हा कंपू इंग्रजांच्या द्वेष्ट्यांपैकीं होता, पण ता. २० रोजीं अनाद्रास त्यांना त्यांचा इंग्रज अंमलदार भेटला तेव्हां कम्पूच्या ठिकाणीं बिघाडाचें कसलेंच चिन्ह त्याला दिसलें नाहीं. तो अधिकारी अनाद्राच्या बाजूनें डोंगर चढून आबूस पोंचला. ता. २० ची रात्र आबूच्या गोऱ्यांनीं अगदीं निश्चितपणें घालविली. सकाळ झाली तरी येथें प्रकृति सुधारण्यासाठीं आलेले सोजर व दुसरे इंग्रज अंथरुणावरच लोळत होते. आधल्या दिवशीं मुसळधार पाऊस पडून गेल्यामुळें ता. २१ च्या सकाळीं दाट धुक्याची चादर हवेंत पसरली होती. सोजर आरामांत बिछान्यावर असले तरी त्यांच्या जीवावर उठलेले अनाद्राचे शिपाई रात्रभर जागेच होते. ते पहाटेस डोंगर चढून आले. जिकडे तिकडे सामसूम पाहून ते आजाऱ्यांच्या वस्तीकडे गेले. त्या वस्तीच्या खिडक्यांतून आंतला भाग न्याहाळून त्यांनीं बंदुका उडविल्या. शिपायांचा नेम चुकला. आजाऱ्यांतला एकहि सोजर दगावला नाहीं. मात्र बारांच्या आवाजानें सगळे सोजीर जागे होऊन दग्याच्या कल्पनेनें त्यांनीं आपल्या बंदुका ठासायला प्रारंभ केला. शिपायांनीं दुसरी सरबत्ती झाडली. ती देखील पहिल्याप्रमाणें वायां गेली. सोजर आतां भरल्या बंदुकासह बाहेर पडले. त्यांच्या हल्ल्याला एक शिपाई बळी पडला व बाकीचे पळाले.

शिपायांची दुसरी टोळी आपल्या अंमलदारांचा मुडदा पाडण्याकरितां त्याच्या दाराकडे गेली होती. अंमलदार गाढ झोंपलेला होता. आतां फक्त

गोळ्या झाडण्याचा अवकाश कीं आपलें काम फत्तें होणार या भावनेनें शिपायांनीं बंदुकांचा मारा केला. अंमलदाराला या गोळीबाराचें स्वरूप समजायला वेळ लागला नाहीं; त्यानें झटकन् घराच्या मागल्या बाजूनें बायकोला सुरक्षित जागीं पोंचवून चार सोजरांच्या मदतीनें या मारेकऱ्यांवर हल्ला केला. इतक्यांत आणखी कांहीं सोजर तेथें आल्यामुळें शिपायांच्या काळजाचें पाणी होऊन त्यांनीं पळ काढला. धुक्यामुळें त्यांचा पाठलाग अशक्य होता. शिपायांचा धुक्यानें बचाव केला. ते तडक एरिनपुऱ्यास गेले.

**एरिनपुऱ्यांतील खेळ**

आबूचा डाव हुकला तरी त्याची खुमखुम शिपायांतून गेली नव्हती. एरिनपुऱ्यास अवघे तीन इंग्रज होते. त्यांतल्या प्रमुखाला आबूची खबर समजतांच ता. २२ रोजीं तो मैदानावर गेला. पाहतो तो जिकडे तिकडे धांवपळ चाललेली आहे. घोडदळ, पायदळ, तोफखाना हे सगळे बिथरले आहेत; आपल्या हुकुमांना तर नाहींच, पण आर्जवांच्या शब्दांनाहि त्यांच्यापाशीं किंमत उरलेली नाहीं, असें त्या प्रमुखाला आढळलें. तोफखान्याच्या लोकांनीं तर त्यावर तोफा रोखल्या. तोफांसमोरून तो इंग्रज हटला आणि बाजूनें तोफांकडे जाऊं लागला तेव्हां त्याची वाट स्वारांनीं अडविली. 'येथून तोंड काळें न केल्यास आपण बंदुका झाडून प्राण घेऊं' असें त्याला स्वारांनीं खडसावलें. शेवटीं 'जे कोणी माझे पक्षपाती असतील त्यांनीं माझी पाठ राखावी' अशी त्यानें हांक दिली तेव्हां थोडेसे स्वार त्याच्याजवळ येऊन उभे राहिले. स्वार मदतीला आले म्हणून संकट संपलें, अशी ती वेळ नव्हती. इकडे कवाइतीच्या मैदानावर पूर्वोक्त प्रकार चालू असतां तिकडे गांव आणि छावणीची वस्ती लुटण्याचा शिपायांनीं धुमाकूळ मांडला होता. बाकीचे दोन गोरे व त्यांचीं बायकामुलें रक्षण-स्थान शोधण्यासाठीं सैरावैरा धावत असतां या प्रमुखाच्या दृष्टीस पडलीं. त्यानें हीं मंडळीं आपल्यापाशीं बोलावून घेतलीं. शिपायांनीं या सर्वांना एका तंबूमध्यें ठेवून कैद केलें. पण पुढें काय हा प्रश्न सुटायचा होता. प्रमुख इंग्रजांमागें निष्ठेचे ४५ स्वार होते ते त्याच्या केसालाहि धक्का लावूं देण्याला तयार नव्हते. त्याला वाट फुटेल तिकडे जाऊं देण्यालाहि तयार नव्हते. इतर इंग्रजांना शिपायांच्या कैदेंत ठेवून एकट्या प्रमुखानें जावें, हा त्यांनीं पहिलें मत पालटून सुचविलेला मनसुबा प्रमुखाला मान्य नव्हता. मग शिपायांनीं प्रमुखाऐवजीं इतरांनीं जावें, अशी सवलत दिली आणि ती मुख्य इंग्रजानें

मान्य केली. बाकीचे गोरे गेल्यावर या इंग्रजाला शिपायांनीं आपल्या पहाऱ्यांत ठेवलें. तीन दिवस असा घोळ चालला होता. सदर इंग्रजानें जीवाची आशा सोडली असली तरी वरकरणीं त्यानें राजीखुषीचा देखावा कायम राखला होता. तिसऱ्या दिवशीं त्याची सुटका झाली. आतां त्याच्याजवळ अवघे तीनच स्वार उरले होते. त्यांच्यासह तो एरिनपुऱ्यास परतला.

## जोधपुरी सैन्याची वाताहत

एरिनपुऱ्याहून उठलेले शिपाई अजमीर काबीज करण्याच्या इराद्यानें निघाले. जोधपूरच्या हद्दींतून त्यांचा मार्ग असल्यामुळें जोधपूरच्या राजानें आपली फौज अनारसिंग नांवाच्या शूर वीरांच्या नेतृत्वाखालीं पाठविली. लॉरेन्सनें सल्लागार या नात्यानें अनारसिंगाकडे एक इंग्रज लष्करी अंमलदार पाठवून दिला. त्यांच्यासह अनारसिंग 'पाली' नांवाच्या गांवीं येऊन त्यानें तेथें फौजेचा तळ ठोकला. याच सुमारास जोधपूर राज्यांतील एक जहागीरदार ठाकूर राजाशीं बिनसून राजाविरुद्ध लढण्याला सिद्ध झाला होता. त्याच्याशीं एरिनपुऱ्याच्या शिपायांनीं संधान लावून त्याला आपल्याकडे वळविलें. हा ठाकूर व एरिनपुऱ्याचे शिपाई जोधपुरी फौजेच्या तळावर चालून आले. त्यांनीं जोधपुरी फौजेचा व्यूह बळकट असल्याचें पाहून हल्ल्याचा नाद सोडला; पण अनारसिंहाला लढाईवांचून स्वस्थ राहवेना म्हणून त्यानें व्यूह सोडून आपली फौज शिपायांच्या गोटानजीक नेली. ता. ८ सप्टेंबरच्या सकाळीं शिपाई व ठाकुराची शिबंदी अचानकपणें अनारसिंगाच्या फौजेवर चालून गेल्यामुळें त्या फौजेची दाणादाण उडाली. मात्र अनारसिंग व त्याच्यासारख्या निधड्या छातीचे थोडे लोक शौर्यानें लढून ठार झाले. पळणाऱ्या फौजेला आवरण्याची खटपट इंग्रज अंमलदार पुष्कळ वेळ करीत होता, पण तिचा उपयोग नाहींसें पाहून त्यानेंहि मैदान सोडलें.

एरिनपुऱ्याची व तेथील शिपायांना थोपविण्याकरितां गेलेल्या जोधपुरी सैनिकांची माहिती कळल्यावर लॉरेन्स लहानशी फौज घेऊन जोधपुरी लष्कराच्या साह्यास निघाला. तो ता. १८ रोजीं त्या भागांत पोंचला. आतां त्या ठाकुराच्या पारिपत्याचें काम त्यांच्याकडे आलें. या ठाकुराच्या गांवाचें नांव आवा (अहुवा) असून तो गांव गर्द झाडीच्या आंत होता. त्याभोंवतीं भक्कम तटबंदी होती. एरिनपुऱ्याचे शिपाई आव्यासच मुक्कामाला गेले होते. लॉरेन्सनें प्रथम

या जागेची टेहळणी केली. तेव्हां आव्याच्या तटावरील तोफा आग ओकूं लागल्या. तुटपुंज्या सैन्यानें हल्ला करून जिंकण्याला हें ठाणें सोयींचें नाहीं, असें ठरवून लॅरेन्स आव्यापासून साडेतीन मैलांवर असलेल्या एका खेड्याकडे जाऊन राहिला. आपल्यावर ठाकूर तुटून पडेल या आशेनें तो तीन दिवस तेथें वाट पाहात होता, पण ठाकूर या डावानें फसला नाहीं, उलट जोधपूरचा इंग्रज वकील मात्र फसगतीनें प्राणास आंचवला. हा वकील लॅरेन्सकडे हजेरी देण्यासाठीं येत होता. लॅरेन्सपासून तीनशें यार्डांपर्यंत तो आला व त्याला आव्याच्या दिशेनें इंग्रजी सुराचें बिगूल ऐकूं आलें. त्या सुराच्या अनुरोधानें तो तिकडे चालला व मारला गेला. तीन दिवस शत्रूची प्रतीक्षा करून लॅरेन्स संथपणें माघारीं निघाला. वाटेंत त्यानें इंग्रजांची दहशत वाटेल अशीं कांहीं कामें केलीं. लढाईखेरीज आव्याला पाठ दाखविली ही नामुष्की झांकण्याचा हा प्रयत्न समजतां येईल.

### शिपाई-ठाकुराचा बेबनाव

इंग्रजी लष्कराचें दडपण छातीवरून उतरल्यावर ठाकूर व शिपाई यांचें आपसांत बिनसलें. हा बेबनाव हातघाईवर न जाऊं देतां शिपायांनीं आव्याहून पाय काढला. शिपायांचा दिल्लीस जाण्याचा मानस होता. पण आतां दिल्ली गांठणें सोपें नव्हतें. तारखांकडे लक्ष दिल्यास समजण्यासारखें आहे कीं, ज्या वेळीं शिपायांनीं आवा सोडलें त्या वेळीं दिल्ली इंग्रजांनीं पादाक्रांत केल्यामुळें आतां दिल्लीच्या आजूबाजूकडे दौड करण्याला इंग्रजी लष्कर मोकळें झालें होतें. त्या लष्करांच्या एका विभागानें एरिनपुऱ्याच्या शिपायांना गांठलें आणि कसून झोडपलें (ता. १६ आक्टोबर). इंग्रज व शिपाई यांच्यांतला झगडा एरिनपुऱ्यासच संपला होता. पण पुढें जोधपुरी फौजेचा मोड व आवा ठाकुराचें बंड—हें वस्तुतः जोधपूरच्याच राजाविरुद्ध असलें तरी त्याचा संदर्भ इंग्रजाच्या सत्तेपर्यंत पोंचत होता—या प्रसंगामुळें सदर प्रकरणाचा विस्तार करणें अवश्य होतें.

### कोट्यास शिपायांचें वर्चस्व

एरिनपुऱ्याचा शिपाई-गर्दीचा नायनाट होण्याच्या सुमारास कोटा संस्थानाच्या राजधानीमध्यें एक नवें विघ्न उपजून राजस्थानाची शान्तता किंचित् हेलावून गेली. कोट्यास बर्टन नांवाचा इंग्रजांचा वकील

होता. ऑगस्टमध्यें कोट्याची शिबंदी नीमचहून स्वस्थानीं गेली, तेव्हां बर्टन तिच्याबरोबर गेला नाहीं. तो इकडेच राहिला व ता. १२ ऑक्टोबर या दिवशीं कोट्यास गेला. ता. १४ पर्यंत बर्टन व कोट्याचे महाराज यांनीं एकमेकांच्या भेटी परतभेटीचे दरबारी उपचार पार पाडले. अशा एका भेटींत बर्टननें कोटा शिबंदीच्या कित्येक अधिकाऱ्यां-विषयीं राजाचे कान फुंकले, असा राजाच्या पुढील वागणुकीमुळें त्या अधिकाऱ्यांना संशय येऊन त्यांनीं ताबडतोब बर्टनचा सूड उगविण्याचें ठरविलें. ता. १५ रोजीं शिबंदीच्या जमावानें इंग्रज वकिलाच्या घरावर चढाई करून प्रथम दोन युरोपियन मारले आणि मग बर्टनच्या घराला वेढा दिला. बर्टनजवळ त्याचे दोन तरुण मुलगे व एक हिंदी नोकर होता. या चौघांनीं घराच्या गच्चीवर एका खोलीच्या आश्रयानें चार तासपर्यंत शिबंदीच्या लोकांचा प्रतिकार चालविला. शेवटीं बाहेरच्या जमावानें त्या घराला आग लावली आणि शिड्या आणून गच्ची गांठली. मग तेथील इंग्रज व्यक्तींना ठार करणें कठिण नव्हतें. त्यांचा हिंदी नोकर मात्र पळाला. बाकीच्या तिघांना मारून त्यांतल्या मुख्य बर्टनचें डोकें शिपायांनीं गांवांत मिरवलें आणि अखेरीस तोफेच्या तोंडीं बांधून त्याच्या ठिकऱ्या उडविल्या. यानंतर कोटा महाराजाच्या शिबंदीचेंच कोट्यांत राज्य होतें असें म्हटल्यास चालेल. महाराज कैदेंत पडल्यासारखे राहत होते. शेजारच्या एका राजानें आपलें सैन्य पाठविलें म्हणून खऱ्या कैदखान्याचे हाल या महाराजांच्या वांटणीस आले नाहींत. १८५८ च्या प्रारंभापर्यंत कोट्याची अवस्था नीट सुधारली नाहीं. मुंबईकडून ताज्या फौजा राजस्थानाकडे आल्यावर कोट्याच्या बंडखोर शिबंदीची वासलात लागली. आव्याच्या ठाकुराचें प्रकरण त्याच हंगामामध्यें पण झटपट निकालांत निघालें. १८५८ च्या जानेवारींत आव्यावर इंग्रज फौजा गेल्या. पांच दिवस आवा लढलें. या अवकाशांत बाहेरील तोफांच्या भडिमारानें तटाला भगदाड पाडलें. दुसऱ्या दिवशीं इंग्रज हल्ला केल्याशिवाय राहत नाहीं व त्याच्याशीं झुंजणें शक्य नाहीं, हें ओळखून आव्याच्या रखवालदारांनीं रात्रींच आव्याला रामराम ठोकला. त्यांच्या भाग्यानें त्या रात्रीला भयंकर वादळ सुटलें होतें. त्याचा फायदा आवाकरांना अनायासें घेतां आला.

### दिल्लीचा फेरोजशहा

राजस्थानाच्या हद्दींत तिकडे कोट्याची दंगल चालू झाली व इकडे नीमच शेजारीं जीरन नांवाच्या गांवीं माळव्याकडून शिपायांचा व त्यांच्या

सहकाऱ्यांचा एक जंगी जमाव येऊन बसला. दिल्लीच्या शाही कुटुंबाचें नातें सांगणारा फेरोजशहा हा त्यांचा नेता होता. नीमच छावणीलगत आलेलें हें संकट नीमचवाल्या गोऱ्यांनीं दुर्लक्ष करावें असें किरकोळ नव्हतें. म्हणून त्यांनीं २३ ऑक्टोबरला जीरनवर एक लहानशी फौज पाठविली. तिच्यांत मुंबईच्या लष्करांतील हिंदी सैनिकांची संख्या मोठी होती. तोफांची सरबत्ती ही लढाईची सलामी संपवून इंग्रजांच्या पायदळानें जीरनवर हल्ला चढविला. फेरोजशहाच्या लोकांनीं सदर हल्ला मारून काढला व इंग्रजांची एक तोफ हस्तगत केली. या दुर्दशेंतून घोडदळानें इंग्रजाला वांचविलें. फेराजशहाच्या सैनिकांची घोडदळानें पीछेहाट करून त्यांच्या हातीं गेलेली तोफ परत आणली. शिपायांचा जमाव माघारीं फिरला; त्याच्या तोफा बंदुकांचे आवाज निधेनासे झाले, पण इंग्रजांपाशीं तें गांव काबीज करण्यासारखें पुरेसें मनुष्यबळ नव्हतें; शिवाय त्यांचे दोन सेनाग्रणी ठार पडले होते; यामुळें त्यांनीं गांव जिंकण्याचा नाद सोडून आपला मुक्काम छावणींत नेला. दुसऱ्या दिवशीं पाहतात तों शत्रु जीरन येथें नसल्याचें दृष्टीस पडलें.

त्यानंतर पंधरा दिवसांनींच इंग्रजाचा प्रतिपक्षी जास्त मोठ्या संख्येनें आला व या वेळीं त्यानें नीमचच्या छावणीवर स्वारी केली. इंग्रजांचे सैनिक मागें निर्देशिलेल्या तटबंदीच्या चौकांत शिरून शत्रूंशीं झुंजूं लागले. शत्रूनें तटावर चढण्याची खटपट चालविली. हा सामना ता. ८ नोव्हेंबरपासून पुढें पंधरा दिवस चालू राहिला, पण आतां इंग्रजांचें सैन्यबळ वाढण्याच्या पंथांत होतें. मुंबईकडून लहान लहान तुकड्यांनीं त्यांचे सैनिक राजस्थानामध्यें जमत होतें. बचावाचें धोरण सोडून चढाईचें धोरण स्वीकारायला लावणारा विश्वास लॉरेन्समध्यें उत्पन्न झाला होता. नीमचच्या चौकांत इंग्रजाला कोंडून वेढणाऱ्या शत्रूनें इंग्रजाकडे झपाट्यानें कुमक येत असल्याचें समजतांच वेढा उठविला व आपला मोर्चा दुसरीकडे वळविला. लॉरेन्सनें भरपूर सैन्य हाताखालीं आल्यावर आव्याच्या ठाकुराचा समाचार घेतल्याची माहिती पूर्वीं सांगितली आहे. लॉरेन्सच्या चढाईचा वृत्तान्त थोडा वेळ बाजूस ठेवून मध्यभारताचे राजे कसे वागले, इकडे दृष्टिक्षेप करणें सोयीचें वाटतें. राजस्थानांतल्या राजामहाराजांनीं शिपाईगर्दीविषयीं सर्वथैव सक्रिय प्रतिकूलता दाखविली हा निर्णय स्पष्ट आहे.

— २ —

राजस्थानाशीं जास्त खेटून असलेल्या इंदूर संस्थानानें शिपाईगर्दीच्या बाबतींत कोणती दिशा पतकरली याचा आढावा प्रथम सादर करून मग ग्वालेरकडे दृष्टि टाकणें दोन कारणांसाठीं योग्य दिसतें. इंदूरची शिपाईगर्दी ग्वालेरच्या मानानें कमी विस्ताराची होती, हें पहिलें कारण असून दुसरें कारण तेथील महाराजांची परीक्षा ग्वालेरसारख्या खडतर कसोटीनें होण्याचा योग आला नाहीं, अर्थात् इंदूरचा सगळा मामला नरम होता हें होय. इंदूरच्या अगोदर ग्वालेरला शिपायांच्या उठावानें भयंकर स्वरूप धारण केलें होतें. इंदूरमध्यें जें घडलें तें ग्वालेरच्या परिणामासारखें होतें. इंदूरजवळ असलेल्या महूच्या छावणींतील शिपायांनीं इंदूरच्या मागोमाग उठाव केला. तथापि त्या छावणींत इंग्रज कायम राहिल्यानें तेथील शिपाईगर्दी राजस्थान, बुंदेलखंड या भागाकडे सरकली. महूच्या छावणींतच १८५८ च्या प्रारंभीं इंग्रजांनीं मोठी फौज गोळा करून माळवा, बुंदेलखंडांतील शिपाईगर्दीच्या ठिकठिकाणीं बळावलेल्या गांठी फोडून काढल्या. या छावणींतल्या गोऱ्यांचा धाक इंदूरला होता.

### इंदुराहून इंग्रजांचा पळ

इंदुरास आज ना उद्यां शिपाई बिथरणार याची अटकळ मीरतच्या बातम्या पसरल्या त्या मे महिन्यापासून सर्वांनाच होती. नसीराबाद, नीमच येथील उठावांनीं त्या अटकळीला पक्केपणा आला. पण इंदुरास जुलईच्या १ तारखेपर्यंत शिपायांची अस्वस्थता धुमसत राहिली. मुंबईकडून इंदूरच्या रोखानें इंग्रजांची फौज मजल मारीत आहे, या बातमीनें इंदूरच्या शिपायांचा क्षोभ दबलेला होता. दिल्ली इंग्रजांनीं जिंकली, या खोट्या बातमीवर विसंबून यापुढें आपल्याला यश मिळण्याची आशा नाहीं, या कल्पनेनें शिपायांचा हुरूप थंडावला अशी जुलईपर्यंतच्या दीर्घसूत्रीपणाची उपपत्ति इंग्रज इतिहासकारांनीं लावलेली आहे.

शिपायांच्या उठावाला प्रतिबंध करण्यासाठीं इंदूरचा इंग्रज वकील ड्यूरंड हा इंदूरच्या राजाविषयीं विश्वास दाखवून स्वतःच्या अनुभवानुसार तजविजी अंमलांत आणीत होता. वकिलाच्या राहत्या ठिकाणाचा बचाव हें त्याचें मुख्य उद्दिष्ट होतें. एकदां त्यानें सदर कामासाठीं इंदूरचे संस्थानी लष्कर

आणविलें. त्याबद्दल खात्री नाहीं म्हणून तें ताबडतोब दूर लोटलें. नंतर त्यानें भोपाळहून लष्करी पथकें बोलावलीं व त्यांना भिल्लांच्या तुकड्यांची जोड दिली. डयूरंडला भोपाळच्या शिबंदीचा व भिल्लांचा फार भरंवसा वाटत होता. भोपाळच्या लोकांशीं महूच्या शिपायांचीं खलबतें चालतात या बातम्यापायीं तो भरंवसा रोडावला. तरी ऐन वेळीं त्यांचा उपयोग होईल अशी त्याची समजूत होती. ता. १ जुलईला ही समजूत खोटी, असा निर्णय लागला.

त्या दिवशीं सकाळीं ८॥ पर्यंत वातावरण नेहमींसारखें स्वच्छ होतें. डयूरंड आपल्या कामाच्या खोलींत निश्चितपणें लिहीत बसला होता व सेनाधिकारी कित्येक शिपायांशीं गप्पा मारीत होता. इतक्यांत तोफा गडगडल्या. इंदूर दरबाराचा लष्करी अंमलदार सादतखान घोडा फेकीत रेसिडेन्सीकडे आला व गोऱ्यांना ठार करण्याचा महाराजांनीं हुकूम दिल्या-बद्दल त्यानें आरोळ्या ठोकल्या. तत्काळ तोफांचीं तोंडें रेसिडेन्सीकडे वळून तेथील घोडेस्वारांच्या नाक्यावर गोळे उडाले. इंग्रजांच्या लष्करी अंमलदारानें बाकीच्या शिपायांना लढाईसाठीं तयार होण्याची आज्ञा केली. पण लढण्याची सज्जता व प्रत्यक्ष लढणें यांतलें अंतर त्या शिपायांच्या ठिकाणीं शिल्लक राहिलें. इतरांची वाट न पाहतां गोरा अंमलदार तोफांवर चालून गेला, पण त्याच्या मागें चार-पांचांहून जास्त स्वारच नव्हते. त्याच्या धाडसानें तोफा चाल-विणाऱ्या शिपायांची हिंमत क्षणभर खचली. अंमलदाराला पाठिंबा नाहीं, असें दिसल्यावर सादतखानाचे बंदे रेसिडेन्सीकडे सरकले. तेव्हां हिंदी शिपायांचा अंतःस्थ एकोपा उघडकीस येण्याला उशीर लागला नाहीं. भोपाळी लोक व भिल्ल यांनीं इंग्रजांकडून मिळालेला चढाईचा हुकूम अंमलांत आणला नाहीं. कित्येकजण भीतीनें निष्क्रिय राहिले, तर कित्येकांनीं आधींच्या गुप्त मसलतीप्रमाणें सामना टाळला. शीख हिंदु कसें वागतील याचा मुसलमानांना अंदाज करतां येईना, शीख हिंदु-मुसलमानांविषयीं साशंक होता, असें इंग्रजांचें म्हणणें आहे. या सगळ्या हकीकतीचा सारांश एवढाच कीं लढाईला तोंडच लागेना. दोन तासपर्यंत इंग्रज अंमलदारांनीं आपल्या लोकांना परोपरीनें उत्तेजन दिलें. तें व्यर्थ आहे, असें पटतांच डयूरंडनें बायकामुलें तोफगाड्यावर बसवून सीहोरकडे कूच केलें. महू, मंडलेश्वर या जागा त्याच्या समोर असून त्यानें सीहोर पसंत केलें याचें कारण भोपाळच्या घोडदळाचा आग्रह. त्यांनीं सीहोरखेरीज इतर ठिकाणीं जाण्याचें स्वच्छ नाकारलें. ता. ४ जुलई रोजीं तो सीहोरास पोंचला.

इंदूरच्या धामधुमीमध्यें वेळांत वेळ काढून डयूरंडनें एका स्वाराहातीं महूच्या सेनापतीला गोऱ्यांचा तोफखाना पाठविण्याबद्दल पत्र पाठविलें होतें. त्याप्रमाणें तेथून तोफखाना निघाला, पण अर्ध्या वाटेवर डयूरंडनें इंदूर सोडल्याचें कळल्यामुळें तोफखाना माघारीं फिरला. दुपारीं २ वाजतां त्यानें महू गांठलें आणि त्याच रात्रीं महूच्या शिपायांनीं आपण इंग्रजांचें नियंत्रण झुगारून दिल्याचें जाहीर केलें. सेनापति व दुसरे दोन अधिकारी अशा दोघांचा त्यांनीं जीव घेतला, इतक्यांत तोफखान्याचे गोळे त्यांच्या गर्दीकडे धडाडले; तेव्हां त्यांनीं इंदूरचा रस्ता धरला. तोफखान्याचा अंमलदार हंगरफर्ड हा त्या रिकाम्या छावणीचा मालक बनला. त्यानें महूच्या किल्ल्यांत वस्ती केली. त्याच्यापाशीं लढाऊ सामर्थ्य विशेष नसतांहि त्याच्या वाटेस कोणी न गेल्यामुळें त्याचा कारभार निर्विघ्न होता. तोच आतां डयूरंडच्या जागीं इंदूरचा वकील या नात्यानें वागूं लागला. महूला तूर्त भय नसलें तरी तेथें फौज पाहिजे म्हणून डयूरंडनें मुंबईहून निघालेलें लष्कर अशीरगडास गांठलें. या लष्कराला वाटेंत औरंगाबादेच्या शिपाईगर्दीचा मोड करावा लागल्यामुळें महूस जाण्याचें काम लांबलें होतें. डयूरंडनें त्या लष्कराच्या नियंत्यांना मध्य-भारताची गरज पटवून ता. २ ऑगस्ट रोजीं तें लष्कर महूस आणलें.

### इंदूरच्या महाराजांचें धोरण

इंदूरचे शिपाई सावकाशपणें ग्वालेरला गेले. इंदूरच्या रेसिडेन्सीवर हल्ला करून सादतखान महाराजांना भेटला; त्यानें आपला पराक्रम महाराजांना सांगितला; महाराजांनीं त्याला केल्या कर्माबद्दल शिक्षा दिली नाहीं; उलट दोन दिवसांनंतर महाराज त्याच्या भेटीसाठीं रेसिडेन्सींत गेले, या गोष्टींचा बाऊ करून इंग्रजांनीं महाराजांविषयीं सरकारांत किल्मिष माजविलें होतें. हें किल्मिष खोटें नव्हतें, तर तें खरें असल्याचा पुरावा होळकरशाहीच्या दप्तरांत सांपडतो, असा दावा अलीकडे जगापुढें आला आहे. त्या पुराव्याचें जें स्वरूप उजेडांत आलें आहे, तें महाराज इंग्रजद्रोही असल्याचें सिद्ध करण्याला पुरेसें नाहीं. महाराजांनीं शिपायांना दारूगोळा पुरविला; इंदुरास नानासाहेब पेशव्यांचे हस्तक येऊन राहिले होते व महाराजांचा एक विश्वासू दूत नानासाहेबांच्या दळणवळणांतला होता; असल्या मोघम माहितीनें महाराज शिपाईगर्दीशीं एकरूप झाल्याचें समजणें कठिण आहे. शिपायांचा उच्छृंखलपणा कडेलोटास गेला होता. त्या उच्छृंखलपणाचा प्रतिकार त्या वेळीं जर इंग्रजाला करतां

आला नाहीं, तर महाराजांनीं केला नाहीं यांत आश्चर्य कसलें? महाराजांच्या भेटीला व त्यांना चिथावण्याला नानासाहेब, झांशीच्या लक्ष्मीबाई यांचीं माणसें आलीं असण्याचा संभव नाकारण्याचें कारण नाहीं. पण महाराजांची वागणूक ही त्यांच्या एकंदर धोरणाची मोठी साक्ष आहे. त्यांनीं गोऱ्या काळ्या ख्रिस्त्यांना आपल्या वाड्यांत आश्रय दिला; शिपायांनीं त्याविषयीं मागणी करूनहि त्या ख्रिस्त्यांचें रक्षण केलें, अशी एक गोष्ट महाराजांवरील किटाळ उडविण्यासाठीं इंग्रज इतिहासकार सांगतात. त्यांनीं शिपाईगर्दीचा पुढाकार घेतला नाहीं, तिच्याशीं सहकार केला नाहीं, हें स्पष्ट असून त्या गर्दीच्या प्रतिकाराला ते असमर्थ होते हें प्रसिद्ध आहे.

— ३ —

१८५७ तील मध्य-भारताचें सर्वांत मोठें व बलाढ्य राज्य ग्वालेरचें होतें. १८४३ सालीं तेथें शिंदे कुटुंबांत इंग्रजांनीं केलेल्या कारस्थानापोटीं ग्वालेरच्या फौजेशीं इंग्रजांनीं लढण्याचा प्रसंग उपस्थित झाला. ग्वालेरच्या लष्कराचें अवसान खच्ची करण्याची अनायासें वाढून आलेली संधि तेव्हांचा गव्हर्नर-जनरल एलनबरो यानें वायां दवडली नाहीं. महाराजपुर व पनियार या दोन ठिकाणीं इंग्रजांनीं ग्वालेरी फौजेला खडे चारून तिचा मोड केला. ग्वालेरचे बालराजे आणि ग्वालेरचें राज्य या दोघांची वाटेल तशी व्यवस्था लावण्याला समर्थ असूनदेखील इंग्रजांच्या मतानुसार एलनबरोनें बालराजांना ममतेनें वागवून त्यांचें राज्य कायम ठेवलें. मात्र तेथील जुन्या फौजेचें नांवनिशाण नाहींसें करून तिच्या जागीं नवी फौज उभी केली. या फौजेच्या खर्चाचा भार ग्वालेरच्या तिजोरीवर ठेवलेला होता. एलनबरोनें ग्वालेरला महाराजांना सल्लामसलत देण्याकरितां एक इंग्रज अधिकारी राजधानींत सदैव राहावा अशी नवी योजना अंमलांत आणली. ग्वालेरचा राज्यकारभार यानंतर सुरळीत चालू झाला. १८५७ मध्यें फिरून लष्करी अरिष्ट कोसळेपर्यंत ग्वालेरचें राज्य उत्कर्षाच्या मार्गावर होतें.

बालराजे जयाजीराव शिंदे यांच्या वयाच्या वाढीबरोबर त्यांची रणविद्येची आवड वाढत होती. कवाइतीचें मैदान हेंच त्यांचें क्रीडास्थान होतें, असें त्यांच्या संबंधांत उपलब्ध असलेल्या माहितीवरून अनुमान केल्यास चुकीचें ठरणार नाहीं. इंग्रजी नियंत्रणाच्या सैन्याखेरीज महाराजांनीं

दहा हजाराएवढें वेगळें असें स्वतःचें सैन्य बाळगलें होतें. तारुण्य, प्रभुत्व या उन्मादक भूमिकेंत अविवेकाचें बीज पेरलें जाण्याचें भय नेहमींच असतें. महाराजांच्या परिवारांत या बीजाची पेरणी करूं पाहणारे इसम पुष्कळ होते. त्यांच्या सल्लामसलतीला महाराजांच्या वर्तनक्रमांत मानहि मिळत असे, पण इंग्रजांचा वकील मॅक्फर्सन आणि विश्वासाचे कारभारी दिनकरराव राजवाडे यांच्या दुथडींतून जातांना जयाजीरावांच्या जीवन-प्रवाहाला बदसल्ल्याच्या खोल जागीं आदळून पडण्याची पाळी आली नाहीं. केव्हां केव्हां इंग्रज वकील, दिवाण आणि महाराज यांचे संबंध ताणले जात असले तरी हा ताण फार वेळ टिकत नसे. अशी महाराजांच्या वर्तनाबद्दल इंग्रजांची मीमांसा आहे.

### शिंद्यांची कलकत्त्यास भेट

१८५७ च्या फेब्रुवारी महिन्यांत जयाजीरावांची स्वारी कलकत्त्यास गेली होती. गव्हर्नर-जनरल कॅनिंग यानें त्यांचा अतिशय थाटानें सत्कार केला. महाराजांच्या मनांत कंपनी सरकारविषयीं कांहीं किंतु असतील तर ते निर्मूळ व्हावे असा कलकत्त्यांतील सन्मानाचा व एकमेकांच्या गांठीभेटीचा डौल होता. शिंद्यांनीं कंपनीसरकाराचें बळ वैभव पाहून तें मनांत सांठवलेंच, परंतु वाफेनें चालणारीं वाहनें, तारायंत्र, कारखाने, गिरणी इत्यादि नव्या यंत्रयुगीन प्रतीकांच्या दर्शनाचा त्यांच्यावर अतिशय परिणाम झाला, असा इंग्रजी कागदपत्रांतून खुलासा आढळतो. कदाचित् निपुत्रिक मरण आलें तर दत्तक घेण्याच्या आड सरकार येणार नाहीं असें आश्वासन कॅनिंगनें महाराजांना दिलें. या सुमारास इंग्रजी सैन्यांतील शिपायांचा असंतोष पाडास आला होता. इतका कीं ज्या दिवशीं महाराजांना कलकत्त्याच्या एक विस्तीर्ण बागेंत टोलेजंग मेजवानी दिली जाणार होती, त्या दिवशीं बहुतेक सारे महत्त्वाचे अधिकारी त्या समारंभांत गुंतलेले राहतील या स्थितीचा फायदा घेऊन कलकत्त्यास शिपाई लोक भीषण उत्पात करणार असल्याची खबर इंग्रजी हेरखात्यानें काढली होती. त्या खबरेनें इंग्रज अधिकाऱ्यांत उद्भवलेली काळजी निसर्गानें दूर केल्याचें आश्चर्य तत्कालीन इंग्रजांच्या लिखाणांतून दृष्टीस पडतें. त्या दिवशीं वादळ व पाऊस यांच्या तडाक्यांत मेजवानीचा बेत सिद्धीस नेण्याला अवकाशच नव्हता. यामुळें तो बेत व ती शिपाया-संबंधाची खबर या दोन्ही गोष्टी राहून गेल्या. यानंतर कलकत्त्याचा मुक्काम आटपून महाराज आपल्या राजधानीस परतले.

शिपायांत क्षोभ असल्याची जाणीव जशी इंग्रजांना तशीच महाराजांना सुद्धां होती. मीरतच्या उठावानंतर आपल्या तैनातीचे शिपाई बिघडले असून बेभरंवशाचे आहेत, हें महाराजांनीं इंग्रजांना कळविलें होतें. मीरतमागून दिल्ली, अलीगड, नसीराबाद, नीमच वगैरे छावण्यांतून चाललेल्या घडामोडींच्या हकीकती ऐकतां ऐकतां झांशी, कानपूर, लखनौ येथील शिपायांचे उठाव झाल्याचें समजल्यावर ग्वालेरच्या लष्कराला स्वस्थ राहणें शक्य नव्हतें. तेथें उठाव होणार, असें निश्चित दिसूं लागल्यावर ग्वालेरच्या छावणींतील इंग्रजांनीं शिंद्यांकडे आश्रय मागितला. महाराजांनीं सर्वांना आपल्या वाड्यांत राहायला जागा दिली. पण असें राहणें आपल्या इभ्रतीला शोभत नाहीं, या सबबीवर एका दिवसानंतर हे सर्व शरणागत छावणींत गेले. रेसिडेन्सी धोक्यांत असल्याचें कळतांच मॅक्फर्सन व त्याचे लोक यांनाहि राजवाड्यांत आणले. शेवटीं आग्र्यास गेल्याखेरीज तरणोपाय नाहीं, असें पटल्यावर मॅक्फर्सनसह बरेच गोरे त्या ठिकाणीं गेले. महाराजांनीं त्यांना वाहनें व आपल्या विश्वासाच्या घोडेस्वारांची सोबत पुरवून आग्र्यास रवाना केलें. शिंदेशाहीच्या सीमेपर्यंत इंग्रजांना घोडेस्वारांनीं साथ दिली. तेथून पुढें धोलपूरच्या राजानें त्यांचा इतमाम संभाळला. आग्र्यापर्यंत इंग्रजांची ही पहिली टोळी सुखानें गेली. जयाजीरावांनीं आग्र्याला यापूर्वीं आपल्या अंगरक्षकांचें निर्भेळ मराठा दळ पाठविल्याची माहिती मागें आलेली आहे.

### ग्वालेरचा उठाव

ता. १४ जूनच्या रविवारीं रात्रीं ग्वालेरच्या छावणींत शिपायांचें राज्य सुरू झालें. लूट, जाळपोळ आणि पुरुषांची कत्तल हा कार्यक्रम शिपायांनीं आरंभिला. त्यांत कांहीं बायकामुलेंहि मारलीं गेलीं. बायकांच्या अंगावरील दागिने हिसकावून घेतांना कित्येक बायकांना इजा झाली; पण सामान्यपणें बायकांवर शस्त्र न चालविण्याची नीति ग्वालेरच्या शिपायांनीं संभाळली. असहाय अनाथ इंग्रज स्त्रियांनीं प्रथम राजवाडा गांठला, पण शिंद्यांनीं त्यांची पूर्णपणें उपेक्षा केली, असें एका इंग्रज स्त्रीनें आपल्या अनुभवपुराणांत लिहिलें आहे. शेवटीं उघड्या बैलगाडींतून हीं बायकामुलें आग्र्याच्या रस्त्यास लागलीं. धोलपुरापर्यंतच्या प्रवासांत त्यांचे निरनिराळ्या जागीं जे

हाल झाले, त्यांचा पाढा येथें वाचण्याचें कारण नाहीं. कडक उन्हाळ्याचे दिवस, डोक्यावर छाया नाहीं, बैलगाडीचा प्रवास, जवळ द्रव्याचा आणि खाण्यापिण्याच्या वस्तूंचा अभाव, अंगावरील वस्त्राखेरीज दुसरें आच्छादान नाहीं; मार्गांत भेटणारे गांवकरी सहानुभूतिशून्य किंबहुना थोड्याफार प्रमाणांत प्रतिकूल म्हटल्यास चालेल; मारेकरी कुठेंहि भेटतील ही धास्ती; वगैरे तपशीलाकडे लक्ष दिल्यास या बायकामुलांच्या क्लेशाची कल्पना करतां येईल. एका ठिकाणीं त्यांना आग्र्याहून ग्वालेरकडे जाणारा शिंदेशाही स्वारांचा जमाव भेटला. त्यांनीं या बायकामुलांच्या आर्जवाची अतिशय बेफिकिरीनें वासलात लावून घोड्यांची दौड चालू ठेवली. धोलपुरास या मंडळीचे क्लेश संपले व तेथून पुढें आग्र्यापर्यंत त्याचा प्रवास निर्भयपणें शेवटास गेला.

**शिपायांची कुचंबणा**

मॅक्फर्सन यानें आग्र्यास जातांना ग्वालेरचे शिपाई असल्या जागेवरच डांबून ठेवावे असा महाराजांना सल्ला दिला होता व त्याप्रमाणें शिपायांशीं वागण्याची अवघड कामगिरी महाराजांना पार पाडावयाची होती. इंग्रज आग्र्यास गेल्यावर शिपाई ग्वालेरच्या छावणींतच राहिले. पुढें काय करायचें हा प्रश्न त्यांना सप्टेंबर अखेरीपर्यंत सोडवितां आला नाहीं. शिपायांना महाराजांनीं झुलवीत ठेवलें. शिपायांनीं नोकरीचें दावें तोडलें, तेव्हां दाव्याबरोबर त्यांचें दरमहाचें वेतन तुटलें. शिपायांना काम नसलें तरी त्यांची कवाईत रोज चालू असे. लुटीचें द्रव्य फस्त झालें, पगार हातीं पडत नाहीं, मग निर्वाह कसा चालायचा, ही अडचण निवारायला महाराज हेंच एक साधन होतें. शिपाई फार निकरावर आले कीं, त्यांच्या अंगावर ती वेळ भागविण्यापुरतें थोडेंसें द्रव्य टाकावें आणि त्यांना घालवून द्यावें असा महाराजांचा क्रम होता. पुढें ग्वालेरच्या सैन्याला इंदूरचें सैन्य मिळालें. बांद्याच्या सैनिकांची त्यांत भर पडली. या सैन्यानें महाराजांकडे नोकरीस राहण्याची इच्छा दर्शविली आणि नंतर द्रव्याची याचना केली. महाराजांनीं यांतलें कांहींच कबूल न करतां त्यांना रिकाम्या हातीं दवडलें. जून, जुलई व ऑगस्ट हे तीन महिने फुकट घालवून सप्टेंबरांत शिपायांनीं हातपाय हालविण्याचें ठरविलें. तेव्हां कुठें जायचें याबद्दल त्यांच्यामध्यें मतभेद होताच. दारूगोळ्याच्या वांटणीवरूनहि आपसांत तंटेबखेडे चालू झाले. इकडे सप्टेंबरांत दिल्लीचें रण संपलें; तिकडे जुलईपासून

कानपुरास इंग्रजांचा तळ पडला होता. परंतु कानपूरच्या पश्चिमेस पेशव्यांच्या नांवाला महत्त्व होतें. ग्वालेरचे महाराज आपल्या शिपायांना आग्र्यास जाऊं देत नव्हते व नानासाहेबांना फौजेची गरज होती, यामुळें कानपुरास जावें, हा महाराजांचा सल्ला मानण्याचा शिपायांनीं निश्चय केला.

### शिंदे व शिपाई

ग्वालेरच्या महाराजांनीं आग्र्याच्या मार्गावरील नद्यांचे उतार दाबून ठेवले होते. पावसाळ्यांत नद्या भरलेल्या म्हणून सैन्य छावणींतच राहिलें; नंतर नद्यांवर नावा नाहींत यासाठीं त्याला राहावें लागलें. सैन्यानें अशा बैठ्या कारभाराला कंटाळून एकदां इतक्या शिरजोरीनें महाराजांकडे द्रव्य मागितलें कीं, ते न दिल्यास शहर, वाडा वगैरेवर लुटालुटीचें संकट कोसळण्याचा संभव होता, तरी महाराजांनीं त्या शिरजोरीला भीक घातली नाहीं; मग शिपायांनीं छावणीबाहेर येऊन राजवाड्यावर मुसलमान-हिंदूंच्या हिरव्या पांढऱ्या निशाणाखालीं तोफा रोखल्या तर महाराजांनीं आपल्या तोफा त्यांच्यासमोर आणून उभ्या केल्या. महाराजांचें खासें सैन्य व राज्यांतील मांडलिक ठाकुरांचे हजारों हत्यारबंद लोक महाराजांच्या मदतीला होते. महाराज दबत नाहींत, आपला पुढाकार घेत नाहींत व शिपाईगर्दीच्या लाटेचें उधाण तर थांबलेलें, इकडे लक्ष देऊन शिपायांनीं आतां आपली मग्रूरी सोडली. या ओढाताणींत शिपायांच्या कांहीं तुकड्या महाराजांकडे गेल्या. महाराजांनीं त्यांना थारा दिल्यामुळें उरलेल्या शिपायांना पराक्रमासाठीं कानपुरास जाणें योग्य वाटलें. त्यांची मनधरणी करायला नानासाहेबांचे हस्तक आले होते, हस्तकांनीं शिपायांचा द्रव्यलोभ चेतविला. अशा बातमीचा एक चुटका ग्वालेरहून आग्र्याला जाणाऱ्या वार्तापत्रांतून पाहायला सांपडतो. तात्या टोपे सप्टेंबरांत ग्वालेरला गेल्याच्या समजुतीला ऐतिहासिक साधनांत आधार आहे. झांशीच्या राणीसाहेबांचेंहि ग्वालेरच्या सैन्याला निमंत्रण होतें. सप्टेंबराच्या २८ व्या तारखेला दसऱ्याचा सण ग्वालेरला साजरा करून कानपुराकडे तात्या टोप्यांच्या नेतृत्वाखालीं या लष्करानें ऑक्टोबरांत कूच आरंभिलें. सहा हजार शिपाई, तिसांवर तोफा, दारूगोळ्याच्या गाड्या, सामानाचे उंट, हत्ती एवढा समुदाय खांचखळगे नदीनाले पार करीत कानपुरास पोचला, तेव्हां आणखी दीड महिना उलटून गेला होता. कानपुराला नोव्हेंबर अखेरीस या शिपायांनीं तेथील इंग्रज

सैन्याची गाळण उडविली. शहर ताब्यांत घेतलें. ही त्यांच्या विजयश्रीची कळी ८-१० दिवसच फुलून राहिली होती. डिसेंबरचा पहिला आठवडा संपण्याच्या आंत इंग्रजांनीं चढाई करून ही कळी चुरगळून टाकली. इंदूरचे शिपाई आस्तेकदम आग्ऱ्यास गेले. तेथें १० आक्टोबरला दिल्लीहून निघालेल्या इंग्रजांच्या सेनाविभागाशीं गांठ पडून त्यांनीं मार खाल्ल्याची हकीकत मागें सांगितली आहे.

जयाजीराव शिंदे इंग्रजाच्या संकटाचें अतिशय हिमतीनें व हिकमतीनें निवारण करीत असतां त्यांनीं ग्वालेरच्या शिपायांना पगार व इतर रीतीनें थोडा पैसा दिला, याखेरीज त्यांना छावणीबाहेर घालविण्यासाठीं कांहीं वाहतुकीचें साहित्य पुरविलें; हें वर्तमान इंदूरच्या इंग्रज वकिलास कळल्याबरोबर त्यानें कलकत्त्यांतील वरिष्ठांच्या मनांत महाराजांबद्दल विष कालविण्याचा उद्योग केला, तेव्हां ज्या मॅक्फर्सनच्या सल्ल्याप्रमाणें महाराज वागत होते, त्याला महाराजांची तरफदारी करावी लागली. ‘महाराजांच्या बाबतींत गैरसमज करून घेणें योग्य नव्हे, शिपायांना ग्वालेरला अडवून धरण्याकरितां पगारहि द्यावा लागल्यास कचरूं नये, पगार द्यावा, असें आपणच महाराजांस सुचविलें होतें,’ वगैरे खुलाशाचें मॅक्फर्सननें कलकत्त्याच्या वरिष्ठांना लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे. महाराजांबद्दल कांहीं इंग्रजांनीं संशय धरावा आणि शिपायांनीं महाराज इंग्रजांना अनुकूल म्हणून परभारें बाजारांतच नव्हे तर गांठ पडेल तेव्हां समक्ष त्यांना उपमर्दपूर्वक हिणवावें, अशा दुहेरी कांचांत महाराजांनीं जून ते ऑक्टोबर असे चार महिने काढले. कानपुरास जातांना शिपायांनीं शिंदेशाहींतील गांवें लुटून महाराजाविषयींचा राग उगवून घेतला. ऑक्टोबरपासून १८५८ च्या जूनपर्यंत शिंदेशाहीवर संकटाचीं अभ्रें आलीं नाहींत. जूनमध्यें वळवासारखीं वादळी अभ्रें आलीं. जितक्या वेगानें आलीं तितक्याच वेगानें तीं उडून गेलीं. तो कथाभाग योग्य स्थळीं यावयाचा आहे.

— ४ —

उत्तरेकडील राजेमहाराजांच्या सहकाराची कहाणी निवेदन केली. दक्षिणेंतील — किंबहुना साऱ्या देशांतील सर्वांत मोठें संस्थान हैद्राबादच्या निजामशाहीचें. या शाहींत इंग्रजी अंकुशाखालची फौज औरंगाबाद येथें

बिघडल्याचा ओझरता उल्लेख पूर्वीं येऊन गेला आहे. मुंबईहून महूस जाण्याकरितां निघालेल्या पथकाला या बिघाडाचा मोड करण्यासाठीं महूचा रस्ता सोडून औरंगाबादेस जावें लागलें. २३ जून रोजीं हें पथक औरंगाबादेस पोंचलें. औरंगाबादेस जेव्हां तेथील शिपायांच्या आज्ञाधारकपणाची परीक्षा घेण्यांत आली तेव्हां घोडदळाच्या एका तुकडीशिवाय बाकीच्या तुकडया इंग्रज-विरोधी नसल्याचें दृष्टीस पडलें. द्रोही तुकडीनें कवाइतीच्या मैदानावरून पळ काढला. दुसऱ्या दिवशीं चौकशींत जे गुन्हेगार ठरले त्या तिघांचौघांनीं फांसावर जाऊन इहलोक सोडला. यानंतर तेथील शिपायांच्या क्षोभानें पुनः डोकें वर काढलें नाहीं. उलट निजामशाहींत जें नवें घोडदळ उभें करण्यांत आलें, त्यानें इंग्रजांचीं कामें अतिशय मर्दुमकीनें बजावून त्यांच्याकडून वाहवा मिळविली.

**मोगलाईंतील अस्वस्थता**

ता. १७ जुलई रोजीं निजामशाहीच्या हैद्राबाद राजधानीमध्यें मे महिन्यापासून चालू असलेल्या क्षोभाचा सोक्षमोक्ष होण्याची वेळ आली. हैद्राबादच्या मशिदींतून सार्वजनिक प्रार्थनेच्या वेळीं मौलवी मंडळी आपल्या जहाल इंग्रजद्रोही वक्तृत्वानें मुसलमानांना जिहादची चिथावणी देत असत. मशिदीच्या भिंतीबाहेर उघड्या बाजारांत एखादा फकीर निर्भयपणें इंग्रजांचें निस्संतान करण्याची भाषा वापरूं शकण्याइतकें तेथील वातावरण इंग्रज-द्रोहाला अनुकूल झालेलें होतें. आपल्या जीहादला फौजेचें पाठबळ मिळेल, हें मौलवी फकिरांच्या तोंडून पुकारलें जाणारें आश्वासन पोकळ नव्हतें, परंतु या साऱ्या धडपडीला आवरणारें मोठें विघ्न निजाम व त्याचा मुख्य प्रधान सालरजंग यांच्या प्रतिकूलतेचें होतें. फकीर, मौलवी किंवा लष्करी नोकरीच्या अनुभवाचे खान यांची धामधूम सुरू होतांच तिचें स्वरूप आणि पर्यवसान ओळखून सालरजंगानें इंग्रजद्रोही माणसांची धरपकड झपाट्यानें आरंभिली. कित्येकदां इंग्रज अधिकारी अशा माणसांच्या हातापायांत बंदीवानांचे अलंकार चढवून त्यांची सालरजंगाकडे रवानगी करीत असत व सालरजंगानें स्वतंत्रपणें पकडलेल्या इसमांची चौकशी करण्याची इच्छा हैद्राबादच्या इंग्रज वकिलानें दाखविल्यास सालरजंग त्या इच्छेच्या आड येत नसे. याप्रमाणें इंग्रज व निजाम हे दोघेहि अतिशय एकोप्यानें क्षोभाच्या चळवळींना दडपीत असतां क्षोभाच्या प्रतिनिधींना इंग्रज वकिलाच्या राहत्या इमारतीवर

हल्ला करून मोकळे व्हावेसें वाटलें. त्यांनीं ५०० लष्करी रोहिले व हजारों बाजारबुणगे यांसह ता. १७ जुलई या दिवशीं रेसिडेन्सीवर हल्ला केला.

**रेसिडेन्सीवर हल्ला**

मे-जून महिन्यापासून बिघडत जाणाऱ्या एकंदर स्थितीचें तक्षकदृष्टीनें निरीक्षण करणारा इंग्रज रेसिडेन्सीवर विघ्नमूर्तींची धाड आल्यास तिला तोंड देतां यावें अशी तयारी दर दिवशीं वाढवून रेसिडेन्सीमध्यें राहात होता. रोहिल्यांच्या उठावाला गिरफदारांची सोडवणूक, या उद्देशाची प्रेरणा होती. रोहिल्यांचा जमाव रेसिडेन्सीच्या हद्दीशीं लगटून भिडतांच त्या इमारतीच्या संरक्षणासाठीं नवे बुरूज बांधून सज्ज ठेवलेल्यां तोफांचे गोळे रोहिल्यांच्या जमावामध्यें जाऊन पडले. तत्काळ त्यांचा जीहादचा आवेश ओसरला आणि तो जमाव त्वरेनें मागें हटला. 'जो पळेल तो जगेल' या समंजसपणाचें स्वागत करण्याइतकी या हल्लेवाल्यांपैकीं पुष्कळाची बुद्धि ताळ्यावर आली. पण तोफांच्या एका सरबत्तीनेंच आपली दाणादाण उडाली, ही बेअब्रू टाळण्यासाठीं त्यांनीं दुसऱ्यांदा रेसिडेन्सीवर चढाई केली. इंग्रजाकडील तोफांनीं या वेळीं देखील पहिल्यासारखीच कामगिरी पार पाडतांच 'इजा बिजा तिजा' यांतल्या तिजा अनुभवाला संधि न देतां रेसिडेन्सीजवळ असलेल्या दोघा सावकारांच्या-त्यांतला एक मुसलमान होता व दुसरा हिंदु होता- घरांत दडी मारणें रोहिल्यांना श्रेयस्कर वाटलें. त्यानंतर रात्रीं त्या घरांतून रेसिडेन्सीवर बंदुकांच्या फैरी सारख्या झडत होत्या. इंग्रजांनीं सकाळ झाली कीं त्या घरांतल्या रोहिल्याची विचारपूस करण्याचें ठरविलें होतें, पण रात्र संपण्यापूर्वीं त्या जिहादी वीरांनीं सदर घरांचा आश्रय सोडला. रेसिडेन्सीवर चालून जाणाऱ्या जमावाचे जे दोघे प्रमुख पुढारी तुर्राबाजखान व मौलवी अलाउद्दीन ते अज्ञातवासांत पळाले. सावकारी वाड्यांतल्या लढवय्यांच्या पळपुटेपणाला सवड राहूं नये म्हणून सालरजंगानें पाठविलेल्या अरबांनीं रोहिल्यांना जाऊं दिलें. तथापि निजामाचे सारे नोकर या अरबांसारखे रोहिल्यांच्या सहानुभूतीचे नसल्यामुळें खान व मौलवी हे दोघे लवकरच पकडले जाऊन तुर्राबाजाला सुटकेच्या खटपटींत बंदुकीच्या गोळीनें मरावें लागलें व मौलवीला हद्दपारीची शिक्षा भोगीत दिवस काढणें भाग पडलें.

**सुरापुराची हकीकत**

निजामशाही राज्यांत सुरापुर नांवाची एक लहानशी जहागीर होती. १८५३ सालीं वेंकटप्पा नाईक या नांवाचा पुरुष त्या जहागिरीचा मालक

झाला. त्याचा कारभार अतिशय अव्यवस्थित असल्यामुळें १८५७ सालीं शिपाईगर्दीच्या दिवसांत त्यानें रोहिले, अरब वगैरे लढाऊ लोक जमवून एकदम प्रचंड विस्ताराच्या प्रदेशाचा स्वतंत्र राजा होण्याची दुराशा धरली. हैद्राबादची गडबड थांबल्यावर इंग्रज अधिकाऱ्यांचें वेंकटप्पाच्या कारवायांकडे लक्ष गेलें. एका इंग्रजानें सुरापुरास जाऊन राजाची भेट घेतली. राजानें साऱ्या आरोपांचा इनकार करून ब्रिटिशांबद्दल आपल्या मनांत द्रोह नाहीं, असें भेटीस आलेल्या इंग्रजाला पुनः पुनः निक्षून सांगितलें. हा इंग्रज ता. ११ जानेवारी १८५८ या दिवशीं सुरापुरास गेला होता. ता. १४ रोजीं सुमारें १५० रोहिले सुरापुराजवळच्या मशिदींत वस्तीस आल्याचें त्या इंग्रजाला समजलें. राजानें या प्रकाराचा उद्वेग व्यक्त करून त्याच रात्रीं रोहिल्यांची ही टोळी आपल्या हद्दीबाहेर पिटाळली. तथापि रोहिल्यांची आवक थांबली नाहीं, तेव्हां ता. २८ रोजीं वेंकटप्पाच्या दिवाणानें सदर इंग्रजाला भेटून अरब, रोहिले वगैरे जमातींचे प्रत्येकीं ५०० याप्रमाणें २५०० आसामी जमविण्याचा राजाचा बेत होता, ही गोष्ट कबूल केली. एवढे लढवय्ये कशासाठीं तर इंग्रज आपल्या मुलखावर स्वारी करणार अशी बातमी होती; तेव्हां त्यांच्या स्वारींतून राज्य राखण्यासाठीं राजाला सैन्याची जरूरी भासली, अशा अर्थाचा दिवाणानें खुलासा केला. नंतर दिवाणानें जें सांगितलें तें खरें, असें दरबार भरवून राजानें जाहीर केलें.

लढाऊ माणसें जमविलीं,पण त्यांचा तनखा चुकता करण्यासाठीं लागणारा पैसा जवळ नसल्यानें पैशाखातर दरवड्यांची साथ राजानें उत्पन्न केली (या सुमारास सुरापुराच्या भागांत बरेच दरवडे पडले होते) असा इंग्रजांचा तर्क होता. हें धोक्याचें प्रकरण लोंबत न ठेवतां तडकाफडकी त्याचा निकाल लावण्यासाठीं स्थानिक इंग्रजांनीं मद्रास-मुंबईकडून लष्करी मदत बोलावली. ती मदत येऊन पोचण्यापूर्वीं विंढॅम नांवाचा एक लष्करी अंमलदार ता.८ फेब्रुवारीला सुरापुरास आला. त्यावर वेंकटप्पाच्या लोकांनीं त्याच रात्रीं हल्ला चढविला. इंग्रजानें या हल्ल्याला रात्रभर जुमानलें नाहीं. सकाळीं त्याला नवी कुमक मिळाल्याचें पाहून राजानें लढाई थांबविली. आणखी दोन दिवसांनीं भरपूर सैन्य जमल्यावर इंग्रजांनीं राजावर चढाई करून त्याच्या लढवय्यांचा जमाव बडवून काढला. हा जमाव सुरापुरांत घुसलेला होता. तेथून त्याची हकालपट्टी करण्याला अधिक लष्कराची आवश्यकता होती. विंढॅम त्या लष्कराची वाट

पाहात असतां वेंकटप्पा हैद्राबादेस गेला. तेथें त्याला कोणीच जवळ येऊं देईना, यामुळें तो सर्वथैव उघडा पडून इंग्रजांच्या तावडींत अनायासेंच सांपडला. म्होरक्या गेल्यावर त्याच्या अरब रोहिल्यानें कुणाच्या तोंडाकडे पाहायचें? वाट फुटेल तिकडे ते निघाले. जशी राजाची तशीच त्याच्या या भाडोत्री साथीदारांपैकीं पुष्कळांची गति झाली. राजाला कोर्टानें फांशीची शिक्षा सुनावली. रेसिडेंटानें ती जन्मठेपेंत बदलली व हिंदुस्थान सरकारानें अवघ्या चार वर्षांइतका त्या शिक्षेचा संकोच केला, पण राजानें आत्महत्या साधून साऱ्या कटकटीचा एकदम शेवट लावला. राजाला पकडल्यावर त्याच्या साथीदारांची शिकार सुरू झाली होती. तसदीक हुसेन नांवाच्या एका मुसलमानाला २ जुलै १८५८ रोजीं सुरापुराच्या बाजार चौकामध्यें फांशीं देण्यांत आलें. १८६१ सालीं हा सुरापुराचा प्रदेश इंग्रजाच्या कृपेनें निज़ामशाहीच्या घशाखालीं उतरला. नानासाहेब पेशव्यांशीं वेंकटप्पाचा संबंध असावा, असा त्या काळीं इंग्रजांना संशय होता.

— ५ —

### कोल्हापुराची झटापट

दक्षिणेंत आणखी एक महत्त्वाचें संस्थान म्हणजे कोल्हापूर. उत्तरेकडील शिपायांचे उठाव आणि दिल्ली, कानपूर, लखनौचे विजय ऐकतां ऐकतां आपल्या स्वस्थतेचा कोल्हापूर, बेळगांव, धारवाड येथील शिपायांना कंटाळा आला. त्यांचीं आपसांत खलबतें सुरू होऊन ता. ३१ जुलई रोजीं त्या खलबतांनीं प्रत्यक्ष कृतींचें रूप धरलें. जितक्या ठिकाणीं शिपाई इंग्रजांविरुद्ध उठले, तितक्या ठिकाणीं प्रायः अवधी व बिहारी ब्राह्मण-रजपुतांचींच पथकें होतीं, हें ध्यानांत ठेवलें कीं, त्यांच्या उठावाबद्दल स्वतंत्र खुलासा करायला नको. आपल्या जातभाईंनीं उत्तरेस रणकुंड पेटविलें असतां आपण दुसरीकडे त्या रणकल्लोळापासून अगदीं नामानिराळे राहणें लांच्छनास्पद आहे, अशी दक्षिणेंतील शिपायांच्या स्थितीविषयीं कल्पना केल्यास चुकणार नाहीं. कोल्हापूरच्या शिपायांचा बेत त्यांतल्याच दोघांनीं इंग्रज अमलदारांकडे अगाऊ फोडल्यामुळें इंग्रज बायकामुलांची हत्या टळली. शिपाई जेव्हां आपल्या अंमलदारांचा जीव घेण्यास निघाले, तेव्हां त्यांच्या अधिकाऱ्यांनीं त्यांची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न करून पाहिला. त्याला यश आलें

नाहीं; उलट ते इंग्रज जीव बचावाण्याकरितां आसपास लपण्याच्या खटपटींत असतां त्यांना शिपायांनीं ठार केलें आणि त्यांचीं प्रेतें नदींत फेकून दिलीं. तिघा इंग्रजांची अशा रीतीनें जीवनयात्रा संपली. शिपायांनीं बाजार व खजिना लुटण्याचा विधि उरकला. उरलेले इंग्रज रेसिडेन्सींत जाऊन राहिले. कोल्हापूरचे स्थानिक शिपाई बिघडले नसल्यामुळें रेसिडेन्सीला धोका पोचला नाहीं.

कोल्हापूरच्या उठावाची बातमी मुंबईस पोंचतांक्षणीं गव्हर्नरानें तावडतोब एका इंग्रज सरदाराला सर्वाधिकार देऊन तिकडे रवाना केलें. पुण्यास सेनापतीला भेटून हा सरदार साताऱ्यास गेला. तेथून स्वार व तोफा बरोबर घेऊन मार्गांतील साऱ्या अडचणी तुडवीत तो ता. १४ ऑगस्ट रोजीं मध्यरात्रींच्या सुमारास कोल्हापुरांत दाखल झाला. ३१ जुलई ते १५ ऑगस्ट या काळांत उठावाच्या शिपायांना कांहींच प्रगति करतां आली नाहीं. छावणीचा खजीना व बाजार लुटण्याच्या नादांत इंग्रजांच्या हालचाली त्यांच्या लक्षांतच आल्या नाहींत. एका इंग्रज लष्करी अंमलदारानें हे शिपाई लुटीसाठीं शहराकडे वळण्याच्या आंत शहराच्या कोटाचे दरवाजे बंद केले. शिपायांना आतां बचावाची तजवीज करावी लागली. त्यांनीं दरवाजाबाहेरील कोल्हापूर महाराजांच्या तबेल्यांत व शिकारखान्यांत शिरून इंग्रजांच्या हल्ल्याशीं झगडा चालविला. तो झगडा १ ऑगस्टचा दिवस उगवेपर्यंत रात्रभर चालला होता.

इतक्यांत इंग्रजद्रोही शिपायांना समुद्रावरून कोकण भागांत गोऱ्या सोजरांची एक तुकडी उतरली असून तिनें कोंकणपट्टीचे घाट अडविल्याची बातमी समजली. कोल्हापुराहून शिपायांना कोंकणांत जावयाचें होतें. या बातमीमुळें त्यांची तिकडे जाण्याची आशा खुंटली. कोल्हापुरांतदेखील अधिक यश मिळण्याचा उपाय उरला नव्हता. पहिल्या दिवशीं जें घडलें त्याच्यापुढें त्यांचें पाऊल पडेना. आतां लढण्यांत लभ्यांश नाहीं, या खात्रीनें बऱ्याच शिपायांनीं द्रोहाची भूमिका सोडली. कट्टरांपैकीं पुष्कळांनीं रानांतून प्रयाण केलें. शेवटीं जे चाळीसजण दृढनिश्चयाचे होते ते शहरालगतच्या इमारती धरून राहिले. ता. १४ रोजीं ऑगस्टला जो सरदार कोल्हापुरास पोंचला, त्यापूर्वीं दुसरा एक इंग्रज ता. १० लाच कोल्हापुरास साताऱ्याहून घोडेस्वारांची एक तुकडी घेऊन गेला होता. त्यानें द्रोही शिपायांवर हल्ला केला तेव्हां त्याच्या मदतीला आपलेच पूर्वीचे लोक असल्याचें

लढणाऱ्या शिपायांना आढळलें. त्या चाळीस जणांनीं आपला बचाव अशा निकरानें केला कीं, ज्यांना जखम झाली नाहीं किंवा मरण आलें नाहीं, असे अवघे तिघेजण राहिले. ता. १४ तारखेस पोचलेल्या सरदाराला खरोखरी आतां कामच शिल्लक नव्हतें. उठाव आधींच साफ मोडून गेला होता. पण ज्यांनीं उठाव केला, त्यांचीं हत्यारें जप्त करावीं असें त्या सरदारानें ठरविलें. हत्यारें काढण्याचा कारभार धोक्याचा असूनहि त्यानें ता. १८ रोजीं हत्यारें खालीं ठेवण्याबद्दल फर्मावलेला हुकूम उठावाच्या साऱ्या शिपायांनीं निमूटपणें ऐकला. मग शिपायांचें भय नामशेष होऊन चौकशी सुरू करण्यांत आली. कटाची बातमी अकल्पित वेळीं फुटल्यामुळें शिपायांनीं उठावाची घाई केली. यामुळें बेळगांव धारवाडच्या संगनमताचें अवसान गळालें. साहजिकच त्या उठावाला योजनाबद्ध स्वरूप राहिलें नाहीं. ता. १० ऑगस्ट ही शिपायांनीं ठरविलेली उठावाची तारीख होती वगैरे गुपितें या चौकशींतून बाहेर आलीं. असल्या बिनबुडाच्या उठावाला मोडून काढणें सोपें होतें. साहसी प्रसंगावधानाच्या बळावर मदतीला थोडे लोक असूनहि इंग्रज तो उठाव ठेचूं शकला.

कोल्हापुराचा राजा व त्याचें सैन्य हे इंग्रजाविरुद्ध नव्हते. शिवाय सातारचे मराठा शिपाई उठाववाल्यांना अनुकूल नव्हते, या दोन गोष्टी वरील हकीकतीवरून स्पष्टपणें नजरेस येणाऱ्या आहेत. उठावांत कांहीं मराठे होते, पण त्यांचा व स्थानिक किंवा साताऱ्याहून आलेल्या मराठ्यांचा आपसांत कसलाच लागाबांधा नव्हता. पडेल तें साह्य तत्परतेनें पुरविल्याबद्दल कोल्हापूरच्या राजांची निस्संकोच प्रशंसा मुंबईच्या तत्कालीन सरकारी कागदपत्रांतून पाहायला सांपडतें. यावेळीं दक्षिण महाराष्ट्रांतील इतर संस्थानिक आणि जहागीरदार इंग्रजांविरुद्ध नसल्याच्या अभिप्रायाची नोंदहि याच कागदांतून दृष्टीस पडते. महाराष्ट्रांतील उठावाच्या इतर बारीक मोठ्या लहरींचा परामर्श पुढें यथावकाश करावयाचा आहे.

* * *

~ ८ ~

# झांशी-बुंदेलखंडांतील घडामोडी

१८५७ सालीं सागर, जबलपूर, हुशंगाबाद वगैरे झांशीसकट एकूण १२-१३ जिल्ह्यांवर आग्रा परगण्याचा अधिकार होता. सामान्यतः बुंदेलखंड या नांवानें हा प्रदेश ओळखला जात असे. पेशवाईच्या कागदांत त्याचें प्राचीन 'दशार्ण' हें नांव पाहायला सांपडतें. यांतला कांहीं भाग १८५७ नंतर नागपूर-वऱ्हाडच्या मध्यप्रदेशाला व कांहीं मागील अलाहाबाद-लखनौच्या संयुक्त किंवा हल्लींच्या उत्तर-प्रदेशाला जोडण्यांत आला. १९४७ मध्यें भारताला स्वराज्य लाभून त्यामध्यें देशांतील संस्थानें विलीन केल्यावर येथील संस्थानी मुलुखाचें 'विंध्यप्रदेश' असें नामकरण घडलें. सांप्रत इंदूर, ग्वालेर, भोपाळ वगैरे संस्थानें, नागपूर वऱ्हाडचा हिंदी-भाषिक विभाग, मध्यंतरींचा विंध्यप्रदेश, या सर्वांचा मिळून एक मोठा मध्यप्रदेश निर्माण केलेला आहे. या स्थित्यंतरामुळें १८५७ चीं प्रांतिक नांवें व सीमा बदलल्या असून त्यांचें थोडें यथार्थ ज्ञान होण्यासाठीं येथें हा खुलासा करावा लागला. झांशी, जबलपूर वगैरे जिल्ह्यांचीं नांवें आजहि कायम आहेत.

या प्रदेशांत संस्थानांखेरीज इतर भागांमध्यें शेतकीसंबंधाचे नवे कायदे अमलांत आल्यानें जो असंतोष गंगा-यमुनेच्या दुआबांत व त्यालगतच्या मुलखांत पसरला होता, तो येथेंहि धुमसूं लागला. येथील एका इंग्रज अंमलदारानें त्या कायद्यांच्या प्रयोगाचा निषेध व त्याचे दुष्ट परिणाम आपल्या वरिष्ठांच्या गळीं उतरविले व प्रयोगाची तीव्रता थोडीशी कमी केली. हा समंजस अधिकारी नरसिंगपुरास होता. आपल्या देखरेखीखालचे जमीनदार

अतिशय असंतुष्ट आहेत व केव्हांतरी त्या असंतोषाचा भडका होईल, हें त्याच्याप्रमाणें दुसऱ्या अधिकाऱ्यांनासुद्धां वाटत होतें. १८५७ च्या जानेवारींत नरसिंगपुरास चपात्यांचा प्रवेश झाला. अधिकाऱ्याला चपात्यांची बातमी समजली तेव्हां त्यानें मात्र आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली कीं, सदर चपात्यांमागें लोकांतील असंतोषाच्या परिणामाचें गूढ असावें. आपला चपात्यांविषयींचा ग्रह सदर अधिकाऱ्यानें आपल्या वरिष्ठाला कळविला, तेव्हां त्यानें चपात्यांची गोष्ट थट्टेवारी निकालांत काढली. परंतु नरसिंगपूरच्या अधिकाऱ्यानें स्वतःचा ग्रह न सोडतां लोकांशीं जें वर्तन ठेवलें होतें, त्याचें एक उदाहरण इंग्रजांच्या इतिहासांत नमूद आहे. त्याची येथें वाच्यता केल्यास इंग्रज व हिंदी जनता यांच्या परस्परसंबंधावर प्रकाश पडण्याला हरकत नाहीं.

### गोंड राजाचा दिलदारपणा

ज्याचा उल्लेख मागें केला त्या अधिकाऱ्याचें नांव टर्नान असें होतें. त्याच्या अंमलदारींत दिल्हेरी नांवाची एक ल्हानशी गोंड जमातीची जहागीर होती. १८४२-४३ सालांमध्यें या प्रदेशांत असंतोषाचा वणवा पेटला असतां या गोंड जहागिरीचा मालक इंग्रजांविरुद्ध गेला नाहीं म्हणून त्याचा कंपनीसरकारनें गौरव केला. गौरवादाखल त्याला एक सोन्याचें पदक दिलें. पुढच्या काळांत हें सरकारच्या मेहेरबानीचें पारडें फिरलें. तो गोंड जहागिरदार आपली जहागीर आणि पदवी संभाळण्याला नालायक आहे असें ठरवून वरिष्ठांनीं टर्नानकडे त्याची पदवीसकट सर्व मालमत्ता सरकारजमा करण्याचा हुकूम दिला. टर्नानला हा हुकूम पसंत नसल्यानें त्यानें त्या विरुद्ध जेवढी खटपट करणें शक्य होती तेवढी केली, पण ती वायां गेली. त्याला हुकूम अमलांत आणावा लागला, परंतु त्याच वेळीं या राजकुटुंबाचें दैन्य जेवढें कमी होईल तेवढें करण्याची त्यानें खबरदारी घेतली. या वागणुकीमुळें दिल्हेरीच्या राजानें १८५७-५८ च्या संकटकाळांत टर्नानच्या संरक्षणासाठीं आपल्या जमातीचे लढाऊ लोक सज्ज ठेवले. दिल्हेरीच्या लोकांनीं इंग्रजाला तर मदत केलीच, पण त्यांनीं जवळपासच्या इतरांनाहि शिपायांच्या उठावापासून अलिप्त राखण्याचा प्रयत्न केला. टर्नानच्या समंजसपणानें जर सगळीकडचे अधिकारी वागले असते तर ज्या घोर प्रसंगांतून १८५७-५८ सालीं इंग्रजांना जावें लागलें तो प्रसंग कदाचित् सपशेल टळला असता, कदाचित् त्याच्या

क्लेशाचें प्रमाण कमी झालें असतें, असा ही गोष्ट मुद्दाम सांगण्यामध्यें इंग्रजांचा हेतु दिसतो.

वस्तुतः या प्रदेशांत बाकीच्या सर्व ठिकाणांच्या पूर्वीं झांशीच्या छावणींत शिपायांचा उठाव झाला. दुसरीकडील उठाव त्यामागून झाले असूनहि त्यांना झांशी इतकें महत्त्वाचें स्थान इतिहासांत लाभलें नाहीं. झांशीचें महत्त्व शिपायांच्या उठावापेक्षां तेथील स्वाभिमानी व पराक्रमी राजस्त्री राणी लक्ष्मीबाई यांच्या कर्तृत्वानें उत्पन्न केलें. यासाठीं कालानुक्रम सोडून अन्यत्र झालेल्या उठावांची हकीकत आधीं सांगून मग झांशीचा वृत्तान्त स्वतंत्रपणें द्यावयाचा आहे.

## बाणपुराच्या राजाचें धाडस

शिपायांच्या उठावांतील वैचित्र्य जसें इतर ठिकाणीं दिसतें, तसेंच तें सागरच्या छावणींतहि प्रगटलें. तेथें बंगाली फौजेच्या ३१ वीं आणि ४२ वी अशा दोन पलटणी होत्या. मीरत-दिल्लीकडील बातम्या पोंचल्यावर तेथील शिपायांत खळबळ उडाली. पण तिचें प्रत्यक्ष उठावांत रूपान्तर बऱ्याच विलंबानें घडलें. झांशीच्या उठावाचें वर्तमान ऐकूनदेखील सागरचे शिपाई बहुतांशीं स्थिर होते. यामुळें मुख्य इंग्रज सेनाधिकारी शिपायांवर विश्वास ठेवून वागत राहिला. तथापि आज ना उद्यां आपल्यावर शिपायांच्या उठावाचें संकट कोसळणार, हें जाणून त्याप्रमाणें त्याच्या संरक्षणाच्या तजविजी चालू होत्याच. शिपायांच्या निष्ठेबद्दल शंका उद्भवूं नये अशी शिपायांची वागणूक होती. एकदां त्यानें इंग्रजी सत्तेविरुद्ध उठलेल्या राजावर शिपायांच्या तुकड्या पाठविल्या. त्या राजाला जीवंत किंवा मृतावस्थेंत पकडून आणलें तर ६ हजार रुपयांचें बक्षीस दिलें जाईल, असें शिपायांसमोर आमिष ठेवलें होतें. या वेळीं शिपाई त्या स्वारीवर बिनतक्रार गेले. त्यांच्या चढाईला इष्ट फळ आल्याची नोंद इंग्रजी पुस्तकांतून सांपडत नाहीं तरी त्यांनीं कामगिरी बजावतांना खळखळ केली नाहीं, हें नमूद आहे. झांशीच्या उठावानें सागरच्या आटोक्यांतील ललितपुरास शिपाई बिघडल्यामुळें तिकडे सागरहून ता. १२ जून रोजीं कुमक रवाना झाली. तेथें ग्वालेरच्या फौजेच्या तुकड्या होत्या. त्यांनीं ता. १२ लाच उठाव करून आपल्या इंग्रज अंमलदारांना पळवून लावलें. सागरची कुमक ४० मैल गेल्यावर तिला ललितपुराची हकीकत

समजली तेव्हां सागरहून ता. १९ रोजीं नव्या तुकड्या निघाल्या. त्या ता. २३ रोजीं पहिल्या तुकड्यांना मिळाल्या. पुढें त्यांनीं एका ठिकाणावर हल्ला करून तेथील इंग्रजविरोधी जमाव जिंकला. तेथें ज्या सोळा जणांना पकडलें, त्यांना सोडून देण्याची हमी विजेत्या शिपायांनीं घेतली होती. दोन दिवस या शिपायांत व त्यांच्या अधिकाऱ्यांत कैद्यांच्या सुटकेबद्दल घोळ पडला होता. शेवटीं शिपायांच्या हट्टापुढें अधिकाऱ्यांनीं मान वांकविली. हे कैदी सोडवून बाणपूर नांवाच्या जहागिरी राजाच्या ताब्यामध्यें देण्यांत आल्यावर त्या राजानें बेधडक इंग्रजांच्या गोटांत प्रवेश केला.

राजानें इंग्रज अंमलदाराचें लवमात्र भय न बाळगतां शिपायांना आपलें मनोगत सांगितलें. 'तुम्ही आपल्या हत्यारांसह जर माझ्याकडे आलां तर मी दरमहा १२ रुपये पगार देईन.' ( ही त्या वेळीं तेथें हजर असलेल्या व जिवानिशीं सागरास परतलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं पुरविलेली माहिती आहे. ) राजाचें म्हणणें ऐकून शिपायांनीं ताबडतोब आपल्या अंमलदारांना तेथून चालते होण्याबद्दल ताकीद दिली. अधिकाऱ्यांना सागरकडे परत जाण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. वास्तविक बाणपूरच्या राजानें हे अधिकारी पकडून आपल्या कैदेंत ठेवावे अशी ती वेळ होती. पण अधिकाऱ्यांची जोखीम घेण्याची त्याला हौस नसावी, असें त्याचें धोरण ललितपुराच्या अधिकाऱ्यांना आश्रय देऊन त्यांना शहागडच्या राजाकडे पाठविल्यानें उघड झालें होतें. ते अधिकारी शहागडच्या राजानें आपल्या जवळ कांहीं दिवस ठेवून मग सोडून दिलें. तो राजा दयाळू होता, असा इंग्रजांचा अभिप्राय पाहायला सांपडतो. सागरचे शिपाई आपल्या बाजूस वळविण्यापूर्वीं बाणपूरकरानें ललितपुराचा खजीना घेऊन जाणाऱ्या ग्वालेरच्या शिपायांशीं झटापट करून पाहिली, पण तिचा उपयोग झाला नाहीं. (ही झटापट खजिन्याच्या लोभाची का इंग्रजाच्या प्रेमाची याविषयीं इंग्रज लेखकांत मतभेद आहे.) कदाचित् आपले हत्यारबंद आश्रित कवाइती शिस्तीच्या शिपायांपुढें कुचकामाचे ठरतात; ही स्थिति सुधारण्यासाठीं त्यानें ब्रिटिशांचें देशी लष्कर हातीं धरण्याचें ठरविलें असेल. त्याचा हा प्रयत्न यशस्वी झाला यापेक्षां इंग्रजांच्या गोटांत घुसून इंग्रजादेखत त्यांच्या शिपायांशीं बोलणें करावयास लावणारें त्या राजाचें साहस जास्त चित्तवेधक आहे. यानंतर या राजानें सागरपासून ९ मैलांवरील एका मजबूत जागीं आपलें ठाणें मांडलें.

## सागरच्या दोन पलटणी

ललितपुराच्या वाटेवर झालेला हा प्रकार कळतांच सागरच्या सेनाधिकाऱ्यानें आपल्या रक्षणाची योजना अंमलांत आणली. त्यानें सागरच्या किल्ल्यांत सगळा खजीना नेऊन ठेवला. तीनशें माणसांना सहा महिने पुरेल इतका दारूगोळा, दाणागोटा व औषधी सामग्री यांचा सांठा भरला. त्याच्यापाशीं शंभराच्या आंतबाहेर युरोपियन गोलंदाज होते. हिंदी स्वारांपैकीं ६० स्वार विश्वासाचे होते. त्यामध्यें इकडून तिकडून आलेल्या ६० स्वारांची आणखी भर पडली. गोऱ्यांच्या मदतीकरितां या सेनाधिकाऱ्यानें सुमारें ६० हिंदी ख्रिस्त्यांना लष्करी शिक्षण देऊन तयार केलें. सागरला बंगाली सैन्याच्या ३१ वी आणि ४२ वी अशा दोन पलटणी होत्या, हें मागें सांगितलें आहे. त्यांपैकीं ३१ व्या पलटणीचे शिपाई आरंभापासूनच इंग्रजांची बाजू धरून राहिले होते. ४२ व्या पलटणीचे शिपाई इंग्रजी वर्चस्व झुगारण्याला उत्सुक होते. तिच्या साथीला घोडदळ होतें. या दोन पलटणींतील कटकट विकोपास जाऊन ता. ७ जुलै रोजीं दोघांची लढाई जुंपली. ३१ व्या पलटणीची मात्रा प्रतिस्पर्ध्यापुढें चालेनाशी झाली तेव्हां तिनें गोऱ्या सेनाधिकाऱ्याची मदत मागितली. त्यानें स्वार पाठविले. पुनः ही आपसांतली झुंज जोरावली. संध्याकाळीं पुनः ३१ व्या पलटणीनें मदतीची मागणी केली तेव्हां 'उद्यां मदत करून तुम्हांला विजय मिळवून देतों' अशा अर्थाचें आश्वासन सेनाधिकाऱ्यानें कळविल्यावर या लढाईचा रंग पालटला. ४२ व्या पलटणीनें त्या रात्रीं रणांगण सोडलें. ३१ वीनें त्या शिपायांचा पाठलाग चालविला. या गडबडींत ३१ वीचे चाळीस शिपाई ४२ व्या पलटणींत मिसळले व ४२ वीच्या पन्नास शिपायांनीं ३१ वीची हानि भरून काढली. मागें शिपायांच्या उठावांतलें वैचित्र्य म्हटलें तें हेंच होय. ३१ वी पलटण शेवटपर्यंत इंग्रजांच्या नोकरींतच होती. जोडीची पलटण इंग्रजांचें वर्चस्व झुगारून गेली तरी या पलटणीचा इंग्रजनिष्ठ निश्चय कायम राहिला, याबद्दल इंग्रज लेखकांनीं तिचा धन्यवादपूर्वक उल्लेख करावा हें सरळच आहे. सागरचा सेनाधिकारी शिपायांच्या काळजींतून सुटण्यासाठीं वारंवार आसपासच्या भागांत टोळ्या पाठवीत होता. पण सागरच्या लहानशा सीमेबाहेर इंग्रजी सत्तेचें पुढें सहासात महिने नांवनिशाण उरलें नव्हतें.

इंग्रजांची दुर्दशा

नौगांव हें झांशीच्या टप्प्यांत मोडणारें एक ठिकाण व लष्करी ठाणें इंग्रजी वर्चस्वाखालून ता. १० जून रोजीं बाहेर पडलें. झांशीच्या उठावाची अर्धवट बातमी ता. ९ रोजीं नौगांवला पसरून तिची इत्थंभूत पूर्तता दुसऱ्या दिवशीं घडली. झांशीवाल्या पलटणीच्या तुकड्या तेथें होत्या. यामुळें नौगांवच्या उठावाची संगति लावतां येते. नौगांवास तिघा शिखांनीं पुढाकार घेऊन पहिला गोळीबार केला. शिपाई कह्यांत राहण्याची आशा इंग्रजांना नसल्यामुळें त्यांनीं पळ काढला. ते छत्रपूर नांवाच्या लहानशा राज्यांत गेले व तेथल्या राणीनें आश्रय देऊन त्यांना संभाळलें. ११-१२ तारखांचे दिवस छत्रपुरास घालवून अलाहाबादेस जाण्याचा बेत इंग्रजांनीं ठरविला. या दोन दिवसांच्या लहानशा अवधींत दोघां गोऱ्यांनीं नौगांवास जाऊन औट घटकांचें राज्य व पुन्हा छत्रपुरास पलायन केल्याचा एक चुटका इतिहासांत आढळतो. अलाहाबादेस त्यांना जायचें होतें खरें, पण मार्गांत लुटारू भेटले. त्यांनीं गोऱ्यांचा खिसा हलका केला. ज्या अर्थीं आपला पैसा लाटला त्या अर्थीं हे लुटारू आपली पुढची वाट मोकळी सोडतील हें पळपुट्या गोऱ्यांचें वांच्छित लुटारूंनीं आपल्या गोळीबारानें फोल ठरविलें. नौगांव इंग्रजांनीं सोडलें तेव्हां त्यांच्या भक्तीचे ८०-८५ शिपाई त्यांच्या सोबतीला होते. या शिपायांनींच लुटारूंना पैसा देऊन टाकण्याचा सल्ला गोऱ्यांकडे आग्रहानें चालविला होता. त्याप्रमाणें द्रव्य गमावणाऱ्या इंग्रजांना गोळीबाराशीं सामना करतेवेळीं हे शिपाई उपयोगीं पडले नाहींत. त्यांनीं अस्ताव्यस्तपणें गोळ्या वाजविल्या व थोड्याच वेळांत आपल्या संख्येचें मान उतरविलें. त्यांतल्या पुष्कळांनीं गोऱ्यांची संगत सोडली. हा अनुभव ता. १८ च्या रात्रीं आला. अखेरीस अलाहाबादेस जाण्याचा नाद सोडून गोरी मंडळी छत्रपूरच्या हद्दींतील एका खेड्यांत आली. ही धावपळ चालू असतां गोऱ्यांतलीं बरींच माणसें उन्हाळा व खाण्यापिण्याचे हाल यांच्या पायीं मरण पावलीं. उरल्यांपैकीं १५ जणांनीं महोब्याचा रस्ता ता. २० रोजीं धरला. या रस्त्यावर लुटारूंनीं हल्ला करून त्यांचा जमाव फोडला. संस्थानी व जहागिरी खेड्यांपेक्षां ब्रिटिश हद्दींतल्या खेड्यांतून गोऱ्यांबद्दल जास्त द्वेष असल्याच्या अनुभवाला हे गोरे बळी पडण्याचा संभव होता. त्यांतून बांद्याच्या नबाबानें व अजयगडच्या राणीनें गोऱ्यांना वांचविलें. मागें राहिलेले गोरे व काळे

ख्रिस्ती बांद्यास पोचले. नवाबानें त्या सर्वांना सोबत पुरवून ब्रिटिश हद्दींत पाठविले.

### नबाब व शिपाई

बांद्यास १४ जून रोजीं शिपायांनीं उठाव केला त्यांत गोऱ्यांची प्राणहानि नबाबाच्या कृपेनें टळली. त्या दिवसांत बऱ्याच ठिकाणची गोरी मंडळी बांद्यास जमली होती. नबावानें सर्वांची सरबराई योग्य प्रकारें केली. पण शिपायांशीं आपल्या खाजगी शिबंदीचें संगनमत झाल्याचें पाहून गोऱ्यांना संभाळणें फार दिवस निभावणार नाहीं, ही स्थिति लक्षांत घेऊन गोरीं बायकामुलें नबाबानें मिर्झापुरास रवाना केलीं. ता. १९ रोजीं शिपाई कानपुरास गेले. नबाब आपल्याकडून आश्रयास येणाऱ्या गोऱ्यांच्या रक्षणासाठीं धडपडत होता. अंदाधुंदी आवरण्याचाहि त्यानें प्रयत्न केला. १८५८ च्या एप्रिलपर्यंत त्यानें बांदा सोडलें नव्हतें. त्या महिन्यांत व्हिटलॉक नांवाचा सेनापति सैन्यासह तेथें आला तेव्हां नबावानें काल्पीस प्रयाण केलें.

### शिपायांचें औदार्य

सागरपासून सुमारें ४२ मैलांवरील नागोदचें लष्करी ठाणें २७ऑगस्टपर्यंत अगदीं शांत होतें. नंतर क्षोभाचें वातावरण उत्पन्न झालें. जबलपूरच्या पलटणीनें ज्या रात्रीं जबलपुराहून पाय काढला, त्या रात्रीं कुंवरसिंग नागोदकडे येत असल्याची बातमी पसरली व त्याच्याशीं दोन हात करण्याच्या इच्छेनें नागोदच्या पलटणीला गोऱ्या अंमलदारांनीं तसा हुकूम दिला. तेथील पलटणीनें हुकूम ऐकून विलक्षण उत्साह दाखविला. ती पलटण नागोदहून निघाली, पण एका मैलाची मजल संपण्याच्या आंत ती एकदम उभी राहिली. 'इतःपर आपला नोकरमालकाचा संबंध उरला नाहीं. तुम्ही सुखरूप हवें तिकडे जावें' हें शिपायांचें हृद्गत उघड झाल्यावर गोऱ्या अंमलदारांनीं मिर्झापुरास जाण्याचा हेतु दर्शविला. शिपायांनीं उदारपणें त्यांना रखवालदार पुरवून इष्ट स्थानीं पोचविलें. सोबतीच्या शिपायांची संख्या २५० होती.

### जबलपूरचे शिपाई

या भूविभागांतलें सागरच्या खालोखाल महत्त्वाचें जबलपूर हें शहर होतें. तेथील हिंदी पलटणीच्या एका शिपायानें १६ जून रोजीं एका गोऱ्या

अंमलदारावर हत्यार चालविलें. तो वेडा आहे या समजुतीनें त्या शिपायावर शिक्षा भोगण्याचा प्रसंग ओढवला नाहीं. या पलटणीच्या वागणुकींत फरक पडल्याचीं लक्षणें गोऱ्या अंमलदाराच्या ध्यानांत आलीं होतीं. ते अधिकाऱ्यांना अदब दाखवीत, पण ती त्यांच्या मर्जीची आहे, नेहमींच्या शिस्तीची नाहीं, हें गोऱ्यांना कळत होतें, तरी गोऱ्यांनीं त्याचा विषाद किंवा उद्वेग शिपायांना दिसूं दिला नाहीं. शिपाई बोलत कीं, येथें जोंवर गोरें लष्कर येत नाहीं, तोंवर आपण उठावाची पायरी चढणार नाहीं. शिपायांच्या या सद्भावनेचा फायदा घेऊन गोरे अंमलदार आजूबाजूची गडबड दाबण्यासाठीं त्यांना पाठवीत व तेहि नाखुषीवांचून जात. ता. २ ऑगस्टला नागपूरनजीकच्या कामटीहून मद्रासचें एक मोठें दळ आलें. जबलपूरच्या शिपायांनीं त्याबद्दल कसलाच संशय बाळगला नाहीं. गोरे सैनिक आल्यास त्यांच्या साह्यानें अधिकारी आपलीं हत्यारें छिनावून आपल्याला नोकरींतून काढून लावतील, असें शिपायांचें भय होतें. गोऱ्यांबद्दलचा संशय घालविण्यासाठीं एकदां तर या शिपायांना आसपासचा मुलूख पाहण्याची अधिकाऱ्यांनीं सवड दिली होती. त्याप्रमाणें कित्येक शिपाई हिंडून आले व गोरें सैन्य येत नाहीं अशी त्यांची खात्री होऊन त्यांचा क्षोभ थंडावला.

शिपाई स्वस्थ आहेत व सांगितलेलीं कामें बजावतात, यानें फसून जाऊन त्यांच्या अंमलदारांनीं आपल्या बचावाचे उपाय थांबविले नव्हते. त्यांनीं स्थानिक मुख्याधिकाऱ्याच्या राहण्याची जागा प्रसंगीं लढतां यावें अशा दृष्टीनें बळकट केली. पुष्कळ बायकामुलांना कामटीस पाठवून दिलें. तरी कांहीं बायका जबलपुरास राहिल्या. पांगून आपापल्या बंगल्यांत राहणें धोक्याचें म्हणून सर्वांनीं एकत्र राहण्याची व्यवस्था अंमलांत आणली. सहा महिने पुरेल एवढ्या धान्याचा सांठा त्या जागीं भरला. ‘ येथें खजीना नाहीं, यामुळें शिपाई व आसपासचे बुंदेले थंड आहेत. आम्ही जमणारा सगळा वसूल खर्चून टाकतों. हे शिपाई लुटालूट करूं पाहतील तर बुंदेले त्यांना लूट पचूं देणार नाहींत,’ असें जबलपूरच्या शांततेचें एक कारण तेथील त्या वेळच्या एका इंग्रजाच्या खाजगी पत्रांतून घेतलेलें इतिहासांत पाहायला सांपडतें. आपलें रक्षणाचें ठिकाण सोडून एका वेळीं सहा-सातांपेक्षां जास्त इंग्रजांना बाहेर पडतां येत नसे. विशेष धास्ती नाहीं, असा विश्वास या इंग्रजांना मद्रासी दळ येऊन पोंचल्यावर वाटूं लागला. पण आलेलें मद्रासी लष्कर हें फिरतें लष्कर

होतें. त्याप्रमाणें ते जबलपुराहून बंदोबस्ताच्या निमित्तानें दुसरीकडे गेलें. जून ते ऑगस्ट हे तीन महिने अशा रीतीनें कंठल्यावर सप्टेंबरांत निकराचा दिवस उगवला.

### शंकरशहाचें देवीस्तोत्र

त्या महिन्यांत एका अंमलदाराला शिपाई व शेजारचे लहान मोठे जहागीरदार यांनीं इंग्रजी सत्ता उलथून पाडण्याचें कारस्थान चालविल्याचा सुगावा लागला. जहागीरदारांत जबलपूरजवळ चार मैलांवर राहणारा शंकर शहा व त्याचा मुलगा हे दोघे या कारस्थानाचे पुढारी होते. शंकर शहा त्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या घराण्याच्या साठाव्या पिढींतला पुरुष असल्यानें त्याच्या हातीं या वेळीं राज्य नसलें तरी त्याची लोकांत प्रतिष्ठा मोठी होती. कारस्थानाची सर्व माहिती जमल्यावर त्या अंमलदारानें कारस्थानी लोकांच्या ठिकाणावर अचानक छापा घालून वरील पितापुत्र व तीस आसामी पकडले. शंकरशहाच्या जागेंत सांपडलेल्या कागदपत्रामध्यें एक रेशमी पिशवी होती, तिच्यांत देवीचें स्तोत्र असलेला कागद व मीरतच्या उठावानंतर इंग्रजांनीं काढलेल्या एका जाहीरनाम्याचा तुकडा असें साहित्य दृष्टीस पडलें. त्या हिंदी स्तोत्राचें जें इंग्रजी भाषान्तर आहे, त्याचा भावार्थ असा:—

"हे शत्रुसंहारिके, निंदकांच्या तोंडाला खीळ घाल, चुगलखोरांना चावून खाऊन टाक. पाप्यांना पायाखालीं तुडवून टाक. हे चंडीमाते, इंग्रजांना ठार मारून त्यांना नाहींसे कर. हे संहारिके, शत्रु व त्यांची संतति हीं (तुझ्या तडाख्यांतून) सुटणार नाहींत अशी खबरदारी घे. शंकरावर कृपा कर; हा तुझा दास आहे. हे महाकालिके, माझ्या धर्माची हाक ऐक. हे घोर महाकालिके, अपवित्रांचें भक्षण कर, विलंब करूं नकोस; त्यांचा (याच क्षणीं) वेळ न दवडतां नाश होऊं दे."

सप्टेंबराच्या १८ तारखेला या पितापुत्रांना तोफेच्या तोंडीं दिलें. या प्रसंगीं शंकरशहाची जी वीरोदात्त वृत्ति इंग्रजांनीं पाहिली, तिचें वर्णन त्यांच्या अहवालांत आहे. शंकरशहाचे पांढरे केस, अर्थात् वृद्धावस्था व पुढें तोफेच्या रूपानें मृत्यु उभा असतां त्यांच्या ठिकाणीं विलसणारी अत्यंत निर्भयता ही स्थिति पाहून त्यांच्या प्राणघातक्यांचें चित्त क्षणभर द्रवल्या- वांचून राहिलें नाहीं. अहवालांत म्हटलें आहे कीं, शंकरशहाच्या कारस्थानाचें

स्मरण वाळगून हा चित्तविकार आवरणें इंग्रजांना अवश्य होतें. इंग्रजांनीं त्या दोघांच्या देहाच्या चिंधड्या उडविल्या. पकडलेल्या इतर आसामींची दुसऱ्या दिवशीं वाट लागायची होती. ता. १८ च्या या घटनेचा जवळपूरच्या शिपायांवर परिणाम होऊन त्यांनीं त्या रात्रीं आपल्या छावणीला रामराम ठोकला. त्यांच्या उठावांत सामील नसलेल्या हिंदी अधिकाऱ्याला घोड्यावर बांधून त्यांनीं आपल्याबरोबर नेलें. मागें आपल्यांपैकीं कुणाला राहूं द्यावयाचें नाहीं, असा शिपायांचा निर्धार असूनहि कित्येक शिपाई छावणींत राहिल्याचें पुढें निदर्शनास आलें. जवलपूरचे शिपाई रातोरात वीस मैलांवरील पाटण नांवाच्या गांवीं पोचले. तेथें सदर शिपायांची एक तुकडी होती. तिनें जबलपुराहून आलेल्या समुदायांत मिसळून आपला गोरा अंमलदार कैद केला. 'हा अधिकारी सोडवायचा असेल तर जबलपुरास जे दहा शिपाई राहिले आहेत, त्यांना आमच्याकडे पाठवावे' अशा अर्थाचें पत्र—इंग्रजांच्या माहितीप्रमाणें अतिशय नम्रतेच्या भाषेंत लिहून—कर्नलकडे धाडलें. जबल-पुरास या पत्राचा योग्य विचार झाला नाहीं, म्हणून तो अधिकारी कैदेंतच राहिला व ज्या दिवशीं या शिपायांवर इंग्रजाकडील फौज चालून आली, त्या दिवशीं शिपायांनीं त्या अधिकाऱ्याला मारून टाकलें. मग जें मद्रासी लष्कर जिल्ह्यांत फिरत होतें, तें जबलपूरवाल्या गोऱ्यांनीं परत बोलावलें. २१ तारखेला तें लष्कर माघारी फिरलें आणि २६ रोजीं शिपायांची व त्या परतणाऱ्या मद्रासी लष्कराची गांठ पडून जोराची लढाई झाली. शिपाई सागरच्या दिशेनें गेले. जबलपुरापुरतें हें भिजत घोंगडें निकालांत निघालें.

### नरसिंगपुरांतले दोन वीर

सुरवातीस निर्देशिलेल्या नरसिंगपूर जिल्ह्यांत अशीच धामधूम चालली होती. तेथें सागरच्या ३१व्या पलटणीचा एक विभाग आणि मद्रासी पलटण असल्यानें तेथील अधिकाऱ्यांना शिपायांची उठावाची धास्ती नव्हती. फक्त जिल्ह्यांतील दंगेधोपे मोडून काढण्याचें काम अधिकाऱ्यांना करावें लागलें. हें काम नदीनाले, डोंगरकपारी, दाट रानें अशा भूरचनेमुळें थोडेंसें कठिण होतें. तें काम साहजिकच जेवढ्या तडफेनें व कडवेपणानें व्हावयास पाहिजे तेवढें पुरेशा साधनांच्या अभावीं अधिकाऱ्यांना साधत नव्हतें. नोव्हेंबरांत दबून दबून चाललेली गडबड विकोपास गेली. गंजनसिंग नांवाचा एक जमीनदार

... ... ... ... स्वल्पत.

 क्र. 23233 .. दि. १६१ ... नोंद दि. ...

इंग्रजी वर्चस्व उलथून पाडण्याच्या तयारीनें उघडपणें सरसावला, तेव्हां इंग्रजी सैन्याशीं त्यानें हातघाईची लढाई केली. गंजनसिंग व त्याचे पुष्कळ साथीदार रणांत पडले. त्यामागून सिंघपुरास दलगंजनसिंग नांवाच्या पुरुषाला पकडून इंग्रजांनीं फांशीं दिलें. डिसेंबरांत चिरापुर नांवाच्या गांवीं आपल्या-विरुद्ध कारस्थानें शिजत आहेत, असें कळल्यावरून इंग्रजांनीं तेथें दौड केली. पाहतात तों गांव रिकामें. इंग्रज अधिकाऱ्यानें गांव रिकामें म्हणून आपली दौड थांबविली नाहीं. तो तसाच शोध काढीत पुढें निघाला असतां थोड्या अंतरावर उठावाचे लोक हत्यारानिशीं सांपडले. याप्रमाणें जिल्ह्यांतली अस्वस्थता दबली. तेथें पूर्ण शांतता नांदायला अजून बराच अवधि होता.

## नागपुरांतील गडबड

मागें ज्या स्थळांची माहिती निवेदन केली, ती एकदां सागर व नर्मदेचा प्रदेशांत मोडणारी असली तरी १८५७ नंतर त्याचा समावेश मध्यप्रदेशांत केल्यामुळें त्या प्रदेशाचें मुख्य ठाणें जें नागपूर त्याकडे दृष्टिक्षेप करणें प्राप्त आहे. नागपूर ही मराठा राजवटींत भोसल्यांची राजधानी होती, हें सर्वांच्या परिचयाचें आहे. लॉर्ड डलहौसीनें भोसल्यांचें राज्य १८५४मध्यें खालसा करून तेथें इंग्रजांचा कारभार थाटला. त्या कारभाराचा प्रमुख अधिकारी नागपुरास राहूं लागला. त्यानें ब्रिटिश वर्चस्वाची घडी बसविली. तोंच १८५७ साल उगवून शिपायांच्या उठावाचें वारें तेथें वाहूं लागलें. नागपुरास जें लष्कर होतें, तें बहुतेक स्थानिक जनतेच्या भरतीचें असल्यानें बंगाली फौजेइतकें त्याचें भय नसलें तरी नागपूरच्या अधिकाऱ्यांना शिपाई-गर्दी उसळल्यास तिच्यासाठीं उपाय सज्ज ठेवण्याची आवश्यकता होतीच. मीरत-दिल्लीच्या बातम्या पसरल्यावर नागपूरच्या भागांत क्षोभाचीं लक्षणें प्रगटलीं. लष्करांतलें घोडदळ त्यांतल्या त्यांत उठावाला जास्त उत्सुक असल्याचें अधिकाऱ्यांना दिसून आलें. ता. १३ जून हा दिवस घोडदळाच्या एका विभागानें उठावासाठीं निश्चित केल्याचें जेव्हां समजलें तेव्हां नागपूरच्या इंग्रज मुख्या-धिकाऱ्यानें तडकाफडकी त्या विभागाचीं हत्यारें काढून घेण्याचा निष्कर्ष सिद्धीस नेण्याचें ठरविलें. ता. १७ जूनला त्याचा संकल्प बिनबोभाट शेवटास गेला. त्यानंतर त्यानें सीताबाल्डीची टेकडी लढाईची वेळ आल्यास उपयोगी पडावी, अशा तऱ्हेनें सज्ज केली. आपल्या राहत्या जागेमध्यें

रात्रीं गोऱ्या लोकांनीं वस्ती करावी अशी योजना अंमलांत आणली. त्याच्या निर्भय व्यवहाराची मुख्य भिस्त मद्रासकडील सैनिकांवर होती. जबलपुरास नागपुराहून पाठविलेल्या मद्रासी तुकड्यांची हकीकत पूर्वीं निवेदन केली आहे. या तुकड्यांची उणीव नव्या मद्रासी लष्करानें भरून काढली. हें मद्रासी लष्कर शेवटपर्यंत इंग्रजनिष्ठ राहिलें. एका विभागाचीं हत्यारें काढण्याच्या प्रयोगामुळें मध्य प्रदेशांतील कुठल्याहि छावणींत अस्वस्थतेनें डोकें वर काढलें नाहीं. भंडारा, चांदा, रायपूर, बिलासपूर इतक्या ठिकाणीं १८५६ मध्यें मध्यप्रदेशाचें सैन्य होतें. त्या प्रदेशांत चमत्कारिक बातम्यांच्या योगानें भयाचे धक्के बसत असत; पण शिपायांच्या किंवा लोकांच्या उठावाशीं झगडण्याची पाळी त्या प्रदेशांतील इंग्रज अधिकाऱ्यांवर कधींच आली नाहीं.

— २ —

**झांशी-प्रास्ताविक**

झांशींतील उठावाबरोबर किंवा मागून बुंदेलखंड, मध्यभारत, मध्यप्रदेश येथें इंग्रजी प्रभुत्वाची जी कमीजास्त प्रमाणांमध्यें वाताहत उडाली तिचा वृत्तान्त पाहिल्यावर झांशीच्या प्रकरणाकडे वळणें अवश्य आहे. झांशीचें संस्थान आपल्या राज्यविस्तारांत १८५४ सालीं ब्रिटिश कंपनीच्या राजवटीनें पचविलें. झांशीच्या राणी लक्ष्मीबाईंना दरमहा पांच हजारांचा तनखा सुरू केला, व त्या लहानशा रकमेवर नवऱ्याच्या कर्जाची फेड लादली. कुलदेवतांच्या व्यवस्थेसाठीं नेमलेलीं गांवें जप्त केलीं, गोवध सुरू केला, वगैरे माहिती पूर्वीं वाचकांच्या नजरेस आणली आहे. लक्ष्मीबाईंच्या राज्य-हानीचें दुःख इंग्रज अधिकाऱ्यांच्या असल्या वाढत्या नीच कारवाईनें भडकलें नसतें तरच आश्चर्य. बाईनीं आपल्या दत्तकासंबंधाची तक्रार विलायतेपर्यंत पोंचविली; पण तेथें तिची दाद लागूं नये हें ठरलेलेंच होतें. राज्य गेल्यावर बाईंची काय अवस्था असेल याचा अंदाज करणें कठिण आहे. मुलूख महाराष्ट्राबाहेरचा; वैभव संपलेलें; जवळ एक पित्याखेरीज दुसरें जिव्हा-ळ्याचें मनुष्य नाहीं; राज्यकाळांतील विश्वासाचे नोकर-चाकर साहजिक राज्यहानीपायीं दुरावलेले; शिपाई-प्यादे भरपूर ठेवूं म्हटलें तर यथेच्छ द्रव्य हातीं नाहीं; अशा नानाविध विपत्तीमध्यें लक्ष्मीबाईंना पुढचा काळ कंठावयाचा होता.

तथापि लक्ष्मीबाई विपत्तीनें धैर्य खचूं देणाऱ्या व हताश होऊन बसणाऱ्या स्त्रीजनांपैकीं नव्हत्या. त्यांचें हृदय वज्रकठोर असल्याचा प्रत्यय १८५८ च्या लढायांत त्यांच्या शत्रूंना आल्याचें प्रसिद्धच आहे. तें हृदय वैधव्य, राज्यहानि, इंग्रजांनीं चालविलेला अपमानकारक व्यवहार, इत्यादि घटनांनीं कांहीं काळ हादरलें असलें तरी फुटलें नाहीं. दुःखाचा पहिला तडाखा बसला तेव्हां इंग्रजांनीं देऊं केलेला तनखा त्यांनीं नाकारला होता; नंतर तो स्वीकारून लक्ष्मीबाईनीं नव्या आयुष्याला सुरुवात केली.

**बाईचें चरित्र**

लक्ष्मीबाईचा जन्म काशीक्षेत्रांतला, हें अनुमान त्यांचें मूळचें नांव मणिकर्णिका या समजुतीवर आधारलेलें आहे. जन्मवर्षाबद्दल निश्चित प्रमाण नाहीं. लहानपणीं त्यांनीं कोणत्या प्रकारचें किती शिक्षण घेतलें, याची माहिती काढायला निर्विवाद साधन उपलब्ध नाहीं. तेव्हांच्या काळाकडे नजर दिल्यास त्यांचें लग्न बरेंच लहानपणीं झालें असलें पाहिजे असा तर्क करतां येतो. तथापि विवाहकाळीं त्यांचें वय ११-१२ वर्षांचें होतें असेंहि एक प्रमाण आहे. लग्नानंतर बाईंना मुलगा झाला होता व तो लवकरच मृत्युवश झाला, ही गोष्ट दंतकथेसारखीच समजावी लागते. लक्ष्मीबाईचें वैवाहिक जीवन कसें होतें, या प्रश्नाचें उत्तर वादग्रस्त आहे. त्यांचा १८५७ पूर्वींच्या चरित्राचा बारीक-सारीक तपशील समजता तर उत्तम झालें असतें; परंतु १८५८ तला त्यांचा पराक्रम इतका उज्ज्वल आहे कीं, त्यानें दिपलेल्या डोळ्यांना त्यापूर्वींचा तपशील समजून घ्यावा असें भानच राहात नाहीं. १८५७-५८ मध्यें महाराष्ट्राच्या सुदैवानें मुंबईनजीकच्या वरसई गांवचे एक वैदिक ब्राह्मण गृहस्थ विष्णुभट गोडसे झांशीस होते. त्यांनीं आपल्या प्रवासवृत्तांत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्यावरून लक्ष्मीबाईच्या पूर्वायुष्याचा थोडासा छडा लावतां येतो:—

"बाईसाहेबांचा नित्यक्रम येणेंप्रमाणें होता. त्यांस शरीराचा षोक लहानपणापासून होता, तो त्यांनीं स्वतंत्रता मिळाल्यावर पुरा केला. पहाटेस उठून कसरतशाळेंत जाऊन जोर, जोडी, मलखांब करावा; नंतर घोड्यावर बसून फिरावयास जावें, व घोडा मंडळावर धरावा, कुंपणावरून उडवावा, खंदकाचे पार घालवावा, एकदम खालीं बसवावा, इत्यादि नाना प्रकारच्या

घोड्याच्या कसरती कराव्या. कधीं कधीं हत्तीवरहि बसत असत. याप्रमाणें सात आठ वाजेपर्यंत मेहनत झाल्यावर नेहमीं खुराक खात असत. " (पान ५५)

**बाईचे वस्त्रालंकार**

यानंतर स्नान, देवतार्चन. देवतार्चनाचें आनुषंगिक गायन, पुराण, आश्रितांचे मुजरे, भोजन, विश्रांति, वामकुक्षी, मग आलेल्या नजराण्यांचा स्वीकार, इत्यादि गोष्टी सांगून झाल्यावर कचेरी कामाचें वर्णन कै. गोडशांनीं केलें आहेः—

" त्या वेळीं त्या कधीं पुरुषवेष धारण करीत; पायांत पायजमा, अंगांत जांभळ्या आंवळ्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली बत्ती, कमरेस काच्या किंवा जरीचा दुपेटा व त्यास लटकवलेली तरवार, या प्रकारच्या पोषाखानें ती गौरवर्ण उंच मूर्ति गौरीप्रमाणें दिसत असे. कधीं बायकांचा पेहेराव असे, परंतु पतिमरणानंतर नथ वगैरे अलंकार त्यांनीं कधीं घातले नाहींत; फक्त हातांत सोन्याच्या बांगड्या व गोठ, गळ्यांत मोत्यांचें पेंढें व अनामिकेंत एक हिऱ्याची आंगठी याशिवाय दुसरे अलंकार आम्हीं बाईसाहेबांच्या अंगावर कधींच पाहिले नाहींत. केसांचा नेहमीं बुचडा बांधलेला असे व नेसावयास पांढरा शालू व अंगांत स्वच्छ पांढरी चोळी असे. याप्रमाणें कधीं पुरुष-वेषानें तर कधीं स्त्री-वेषानें दरबारांत येऊन बसावें. कचेरींत सर्व दिवाणी, फौजदारी, मुलकी कामें होत असत. बाईसाहेब बुद्धीच्या फार चपळ असल्यामुळें हकीकत तावडतोब समजून भराभर हुकूम सांगत असत. कधीं स्वतः लिहितां वाचतां येत असल्यामुळें मजकूर जुळवून आपण हुकूम लिहीत असत. " ( पान ५६ )

वरील माहितीला पुष्टि म्हणून जॉन लँग नांवाच्या इंग्रज बॅरिस्टरानें आपल्या आठवणींत लिहिलेलें वर्णन पाहण्यासारखें आहे. राज्य गेल्यावर या कायदे-पंडिताशीं लक्ष्मीबाईनीं विचारविनिमय केला तेव्हां बाईना जवळून पाहण्याची त्याला संधि मिळाली. त्याचें निवेदन पुढीलप्रमाणें आहेः—" बाई मध्य उंचीच्या व भरदार शरीराच्या—लठ्ठ नव्हे—आहेत. पूर्ववयांत त्यांचा चेहरा चांगलाच सुंदर असावा. आतां देखील त्यांच्यांत पुष्कळ आकर्षक गुण आहेत. माझ्या सौंदर्यविषयक कल्पनेप्रमाणें चेहरा जरा जास्त वाटोळा भासला. चेहऱ्याचे हावभाव उत्तम व त्यांत हुशारीची चमक आढळते.

विशेषतः डोळे अत्यंत देखणे (पाणीदार) असून नाकाचा आकार फार नाजूक आहे. वर्णानें काळ्या नसल्या तरी अतिशय गोऱ्या आहेत असेंहि त्यांच्याबद्दल म्हणतां येणार नाहीं. आश्चर्य हें कीं, त्यांच्या अंगावर कानांतल्या सोन्याच्या भूषणाखेरीज दुसरा एकहि अलंकार दिसला नाहीं. त्या कुशल विण-कामाचें व पांढरें स्वच्छ मलमलीचें वस्त्र नेसल्या होत्या. तें अगदीं अंगासरसें घट्ट नेसलेलें असल्यामुळें त्यांच्या शरीराची ठेवण स्पष्ट दिसे.—खरोखरीच त्यांची शरीरयष्टि उत्कृष्ट आहे. दोषच काढावयाचा तर तो आवाजाचा काढतां येईल."

**बाईचें चारित्र्य**

हिंदु राजघराण्यांतील एक जबाबदार व त्यांतून महाराष्ट्रीय स्त्री एवढें लक्षांत ठेवलें कीं लक्ष्मीबाई लोकदृष्ट्या आपल्या प्रतिष्ठेची किती प्रकारें काळजी घेत असतील, याचें वेगळें विवेचन करण्याची गरज नाहीं. सौभाग्यकाळांत हिंदु राजस्त्रीचा दुय्यम दर्जा दिसला तरी ती बुद्धिमान् नसल्यासदेखील आपल्या थोर पूर्वपरंपरेला जागण्याचें व्रत तिच्या पांचवीलाच पुजलेलें असतें व बुद्धिमान् असल्यास रोजच्या राज्यकारभाराचें व प्रसंगपरत्वें उद्भवणाऱ्या राजकीय प्रश्नांचें ज्ञान चोख रीतीनें मिळवायला ती चुकत नाहीं, याचे पुरावे कित्येक इंग्रजांनीं राजस्त्रियांच्या अनुभवासंबंधीं लिहिलेल्या ग्रंथांतून मुबलक सांपडतात. हिंदी राजेरजवाड्यांची महती खालावलेल्या काळांतील ते ग्रंथ आहेत. १८५७ मध्यें हिंदी राजांचा लोकांत विशेष आदर होता. 'राजा हा विष्णूचा अवतार' ही प्रथा त्या काळांत चांगली जागृत होती. एखादें राज्य लोपल्यास त्याबद्दल त्या राज्यांतल्याच नव्हे तर सर्व देशांतल्या जनतेला हळहळ वाटावी, अशा काळांत झांशीच्या राज्याला लक्ष्मीबाई मुकल्यामुळें राज्य गेलें तरी व्यक्तिशः राणी या नात्याचें त्यांचें महत्त्व कायम राहिलें असल्याची साक्ष मालकमच्या अभिप्रायांत आहे. हा लष्करी अंमलदार म्हणतो:—'लक्ष्मीबाईचें चारित्र्य श्रेष्ठ प्रतीचें आहे. झांशींत प्रत्येक जणाच्या ठिकाणीं राणीविषयीं आदर आहे.' व इंग्रजांशीं आपलें घराणें नेकीनें वागलें, जेव्हां इंग्रजाकडे सार्वभौम प्रभुत्व आलें नव्हतें, त्या काळांत नेकी सोडण्याचा मोह उत्पन्न करणारे प्रसंग उद्भवत असतांहि आपण आपली नेकी धड राखली, याबद्दल लक्ष्मीबाई बोलतात तेव्हां त्यांत अतिशयोक्तीचा लवलेश नसतो. या अभिप्रायांत मालकमनें लक्ष्मीबाईचें इतिहासाचें व राजकारणाचे ज्ञान उघडकीस आणलें आहे. मालकम हा झांशीचे राज्य खालसा झाल्यावेळचा एक अधिकारी होता.

१८५४ नंतर १८५७ पर्यंत बाई आपलें आयुष्य कसें घालवीत असतील, याचा अंदाज गोडशांनीं केलेलें कचेरीकामाचें वर्णन वगळल्यास करतां येणें शक्य आहे. गोडसे १८५७ च्या नोव्हेंबरांत झांशीस पोचले होते. तेव्हां तेथें इंग्रजी राज्य नसल्यानें बाईंना लोकांच्या रक्षणासाठीं कचेरी-काम करावें लागत होतें. गोडशांच्या माहितीप्रमाणें लक्ष्मीबाई राज्य गेल्यावर 'शहरांत व वाड्यांत राज्य करीत होत्या' (पान ४८). राज्य करण्याचा संदर्भ सोडल्यास कसरत, देवतार्चन, नजरनजराणे, दानधर्म वगैरे गोष्टींना राज्य नाहीं म्हणून खळ पडण्याचें कारण नव्हतें. चालू भारतीय स्वराज्यां-मध्यें संस्थानें विलीन झालीं, पण राजांसंबंधाचा आदरभाव त्यांच्या प्रजेनें पूर्वसंस्कारवशात् बाळगला होता, याबद्दल खुलासा नको. ही जर बुद्धि-प्रामाण्यवादी विसाव्या शतकाच्या मध्यांतली स्थिति तर १८५७ मध्यें झांशीची प्रजा इंग्रजांच्या अधिकारामुळें आपल्या गतवैभव विधवा राणीला विसरली असेल ही कल्पना चुकीची ठरल्याशिवाय राहणार नाहीं. १८५७ मध्यें इंग्रज व त्यांचें वर्चस्व या दोन्हींचें झांशींतून उच्चाटन होतांच लक्ष्मीबाईंचा कारभार प्रजेनें आपलासा मानला. त्यांच्यावर शेजारचीं परचक्रें आलीं असतां लोक त्यांच्या साह्याला धावून गेले. यांसारख्या प्रकारांत बाईंची आधींपासूनची लोकप्रियता दिसून येणारी आहे.

### झांशीचा उठाव

१८५७ च्या जून सहाव्या तारखेपर्यंत झांशीच्या वातावरणांत शिपायांच्या उठावांचीं चिन्हें नव्हतीं. त्या दिवशीं शिपाई बिथरून अधि-काऱ्यांच्या जीवावर उठले. त्यांना मीरत दिल्लीकडून चिथावणीचें पत्र आलें, असें एक कारण सांगण्यांत येतें. बरेच इंग्रज इतिहासकार किंवा शिपाईगर्दीचे कथालेखक शिपायांच्या उठावामागें लक्ष्मीबाईंचें कारस्थान होतें, असा आरोप उच्चारतात. परंतु या प्रकरणांतला सगळा पुरावा दुय्यम दर्जाचा व इतका संदिग्ध आहे कीं, त्यायोगानें कोणताहि प्रश्न निरपवाद सुटत नाहीं, किंवा लक्ष्मीबाईसंबंधांतला कोणताच आरोप सिद्ध होत नाहीं. शिपायांच्या उठावाला जेल दरोग्यानें आपल्या लोकांची मदत आणली. शिपायांनीं अधिकाऱ्यांना मारायला सुरुवात केली; ते बायकांमुलांसह किल्ल्यांत पळाले; तेथून बाहेर पडलेले तीन इंग्रज शिपायांच्या तावडींत सांपडून प्राणास मुकले. किल्ल्यांतून गोरे लोक शिकस्तीनें लढत असतां

त्यांना प्राणदानाचें आश्वासन देऊन बाहेर काढलें व नंतर झांशीच्या जोखन बागेंत गोळा करून त्या सर्वांची शिपायांनीं ८ जून रोजीं कत्तल उडविली. अवघ्या दोन दिवसांच्या कालावधींत अशा रीतीनें इंग्रज लेखकांनीं कितीतरी घटना कोंवल्या आहेत. त्यांतील कांहींच्या बाबतींत विश्वसनीयतेचा बहुतांशीं अभाव असल्यामुळें त्यांचा येथें काथ्याकूट करण्याचें कारण नाहीं. बाईकडे इंग्रज लोक मदतीची याचना करायला गेले तेव्हां बाईनीं स्पष्टोक्तिपूर्वक मदत नाकारली ही गोष्ट मात्र जनतेंतील या संबंधाच्या चर्चेंत घोळत असावी, याचें प्रमाण गोडशांच्या प्रवास-वृत्तांत एका ठिकाणीं आहे (पान ६२). इंग्रजाला साह्य केल्यास 'काळ्या पलटणी आम्हांस काढून जाळून फस्त करतील' हें त्या मजकुरांतलें वाक्य ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. शिपायांनीं बाईना धाक दाखवून लुबाडलें असें बाईचें म्हणणें; तर ती लूट नसून लांच होती अशी इंग्रजांची त्यावर शक्कल आहे. बाईना शिपायांनीं मृत्यूचें भय दाखविलें कीं प्रतिस्पर्धी उभा करण्याचें भय दाखविलें, हा प्रश्न मुळाशीं वादग्रस्त असला तरी दुसरा सदाशिवराव नांवाचा एक झांशीच्या राजवंशाचा संबंधी बाईविरुद्ध पुढें आला व परास्त झाला ही गोष्ट खरी आहे. त्याला लक्ष्मीबाईनीं पकडून कैदेंत ठेवलें. पुढें इंग्रजांच्या तडाक्यांत सांपडून त्याला फांसावर मरण आलें. इतिहासलेखकांपेक्षा झांशीच्या घटनेशीं कालानें व अधिकाराच्या जबाबदारीनें अतिशय जवळ असलेल्या इंग्रजांनीं लक्ष्मीबाई व शिपाई यांच्या दरम्यान उठावापूर्वींच्या दिवसांत कारस्थान चालल्याचा मुद्दा जमेस धरलेला नाहीं.

सत्तावन सालामागून बत्तीस वर्षे लोटलीं व एका इंग्रजानें 'राणी लक्ष्मीबाईवर केले जाणारे आरोप साफ चुकीचे; लक्ष्मीबाई अन्यायाला बळी पडल्या; झांशीच्या घटनेची आपल्याइतकी माहिती कुणालाच नाहीं' अशी प्रस्तावना करून जें पत्र लिहिलें, त्याचें अस्तित्व १८९४ मध्यें सातारचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. द. ब पारसनीस यांनीं लिहिलेल्या लक्ष्मीबाईच्या चरित्रानें लोकांच्या नजरेस आणलें. इंग्रज किल्ल्यांत गेल्यावर त्यांना दोन दिवस अन्नपाणी पुरविलें, एवढेंच नव्हे तर १०० बंदूकवाले लढवय्ये लोक त्यांच्या मदतीस बाईनीं पाठविले. एक दिवसच संध्याकाळपर्यंत ते इंग्रजांपाशीं राहिले. बाईनीं इंग्रजांना दतिया संस्थानांत जाण्याचा सल्ला दिला, त्याचा उपयोग झाला नाहीं. बाईचा गोऱ्यांच्या कत्तलीशीं बिलकूल संबंध नाहीं. त्या संहाराचें कर्तृत्व सर्वस्वीं शिपायांचें, अशी आणखी माहिती

त्या पत्रांत होती. गोऱ्यांच्या मदतीला स्थानिक लढवय्ये आल्याचा व ते परत गेल्याचा वृत्तान्त इंग्रजांनीं जमविलेल्या साक्षीपुराव्यांत दृष्टीस पडतो.

**बाईचीं पत्रें**

ता. ८ रोजीं गोऱ्यांना मारून टाकल्यावर शिपाई बाईकडे गेले व त्यांनीं बाईपासून द्रव्य काढलें, याचा निर्देश बाईच्या पत्रव्यवहारांत आहे. लक्ष्मीबाईनीं झांशीचें राज्य करावें, अशी योजना शिपायांनीं ठरविली होती, पण सगळे शिपाई दिल्लीस चालते झाले. बाईच्या राज्यकर्तृत्वाचा पाठपुरावा करायला त्यांच्यापैकीं ठिकाणावर कोणीच राहिला नाहीं. झांशीस शिपाई नाहीं व इंग्रज नाहीं, अशा स्थितींत बाईनीं आसपासच्या इंग्रज अधिकाऱ्यांकडे जीं पत्रें पाठविलीं तीं आतां उजेडांत आलीं आहेत. "आपल्यापाशीं तोफा नव्हत्या, शेंपन्नासाहून जास्त लढाऊ माणसें नव्हतीं. तीं माणसें आपल्या आणि वाड्याच्या संरक्षणापुरतीं असल्यानें इंग्रजांना मदत करतां आली नाहीं. गोऱ्यांच्या कत्तलीनंतर शिपाई आपल्याशीं व आपल्या माणसांशीं फार दंडेलीनें वागले. त्यांनीं आपल्यापासून पुष्कळ द्रव्य उकळलें' वगैरे मजकूर पहिल्या पत्रांत असून 'आपल्या टापूंतील कित्येक ठाकुरांनीं गढ्या ताब्यांत घेतल्या आहेत; कित्येक जण मुलूख लुटींत आहेत; या धुमाकुळाचा बंदोबस्त करायचा तर पैसा पाहिजे, तो आपल्यापाशीं नाहीं व कर्ज काढावें तर सावकार या दिवसांत कर्ज देणार नाहींत. जवळचें जडजवाहीर विकून आतांपर्यंत लुटालुटीच्या तडाख्यांतून शहर कसेंवसें वांचविलें आहे व राज्यकारभार संभाळला आहे. स्वतःची गैरसोय सोसून शहर व बाहेरचीं ठाणीं सुरक्षित राहण्यासाठीं आपण पुष्कळ नवीं माणसें हाताशीं धरलीं आहेत. पण पैशाच्या व योग्य सरकारी फौजेच्या अभावीं सध्यांची तजवीज फार दिवस टिकणार नाहीं." इत्यादि अर्थाचा आशय दुसऱ्या १४ जूनच्या पत्रांत आढळतो. तिसऱ्या पत्रांत शिपायांच्या उठावाची तपशीलवार हकीकत असून ११ जूनच्या रात्रीं ते दिल्लीस गेले; 'शिपाई मन चाहील तसें वागले, त्यांनीं शहरांतील कित्येकांना लुटलें. आपण कसावसा शिकस्तीनें जीव वांचविला. पण त्यांनीं आपलीं मालमत्ता नेली. वस्तुतः हें वर्तमान पूर्वींच कळवायला पाहिजे होतें, पण हल्लीं डाक सुरळीत चालत नाहीं म्हणून उशीर झाला' अशा अर्थाच्या मजकुरांत 'कत्तलीच्या क्रूर करणीबद्दल परमेश्वर शिपायांना खात्रीनें शिक्षा करील,' आणि 'केल्या कर्मामुळें शिपाई नरकांत पडतील' या अर्थाचीं वाक्यें आहेत.

### इंग्रजांसाठीं राज्यकारभार

सागर परगण्याचा कमिशनर अर्स्किन यानें या पत्रांची खबर कलकत्त्याच्या वरिष्ठांकडे ता. ३१ जुलै रोजीं पाठवितांना त्यासोबत जो आपल्या अभिप्रायाचा मसुदा जोडला आहे, त्यांत आरंभींच 'राणीच्या म्हणण्याप्रमाणें त्यांचा कत्तलीशीं संबंध नसल्याबद्दल आपली खात्री आहे, आपण स्वतंत्रपणें मिळविलेला पुरावा राणीच्या म्हणण्याला दुजारा देणारा आहे' अशी अर्स्किनची कबूली असून 'बाईनीं इंग्रजांकरितां झांशीच्या मुलखाचा बंदोबस्त ठेवावा' म्हणून जें अधिकारपत्र पाठविलें त्याचाहि उल्लेख आहे. तें अधिकारपत्र जाहीरनाम्याच्या स्वरूपाचें असून त्यांत 'राणीकडे राज्यकारभार सोंपविला आहे, सर्व लहानथोरांनीं त्यांची आज्ञा पाळावी, सरकारदेणें त्यांच्याकडे रुजू करावें,' वगैरे निस्संदिग्ध सूचना आहेत. सदर जाहीरनाम्याला जोडून जें निराळें पत्र पाठविलें त्यांत लक्ष्मीबाईस अनुलक्षून 'तुम्ही राज्य संभाळून कर वसूल करा, जेवढे पोलीस अवश्य असतील तेवढ्यांची भरती करा, इंग्रज सरकाराला पसंत पडतील अशा सर्व तजविजी अंमलांत आणा; जेव्हां इंग्रज अंमलदार तेथें येईल तेव्हां तो तुमचें झालेलें नुकसान व तुम्ही केलेला खर्च यांची भरपाई करून देईल, तो तुमच्याशीं उदारपणें वागेल' या अर्थाचें आश्वासन लिहिलें. हुकमाच्या वरचढपणाचा संशय टाळण्याकरितां 'तुम्ही राज्यभार उचलावा ही आमची विनंती आहे' असें अर्स्किननें म्हटलें आहे. लक्ष्मीबाईनीं राज्य करावें, या धोरणाचा इंग्रजांकडील जाहिरनामा जुलई अखेरपर्यंत बाईंना पोचला नव्हता, असें त्यांनीं लिहिलेल्या १ जानेवारी १८५८ च्या पत्रांत इंग्रज अधिकाऱ्याला कळविलें आहे. तो पोंचल्यावर लक्ष्मीबाईचें राज्य सुरू झालें; तेव्हां सरहद्दीवरील दतिया व ओर्छा या दोन संस्थानांच्या ४० हजार सैनिकांनीं झांशीवर मोहीम काढली. दोन महिने झांशी शहर संकटांत होतें. हजारों माणसें मेलीं. लक्ष्मीबाईनीं जवळचें सोनेंनाणें विकून व कर्ज काढून आपलें सैन्य उभें केलें व दतिया-ओर्छेकरांचा जोरानें प्रतिकार चालविला. ता. २० सप्टेंबर व १९ ऑक्टोबर याप्रमाणें दोनदां इंग्रजांकडे मदतीची हांक पोंचविली. नोव्हेंबरच्या आरंभीं (ता. ९ नोव्हेंबर) इंग्रजानें कळविलें कीं तूर्त आपलें लष्कर अन्यत्र गुंतलें असल्यामुळें साह्य करणें शक्य नाहीं. जबलपुरास आपली फौज गोळा होत असून लवकरच आपण झांशीला येऊं आणि सर्व लहानमोठ्यांची योग्य चौकशी करूं

असें मनोगत इंग्रजांनीं लक्ष्मीबाईंच्या कानीं घातलें होतें. शेवटीं इंग्रजांच्या कुमकेवांचून लढाई थांबली. झांशीवर चालून आलेलें दतिया ओर्छाचें लष्कर माघारीं गेलें. ही माहिती बाईंच्या जानेवारी १८५८ च्या पत्रांतून येथें दिलेली आहे.

इंग्रजांची दगलबाजी

वैभव आणि स्वातंत्र्य यांचा एकदां उपभोग घेतलेल्या मनस्विनी लक्ष्मीबाई १८५४ मध्यें राज्य गेल्यामुळें १८५७ पर्यंतच्या तीन वर्षांत परावलंबी बनल्या होत्या. राणी स्वतः राज्यहीन व ज्याचा आधार तें इंग्रजांचें राज्यदेखील उलथून पडलेलें, राणीच्या द्रव्यवळावर शिपायांनीं आघात केलेला, या विचित्र स्थितींत आपण काय करावें हा प्रश्न त्यांनीं इंग्रजाला विचारावा हें स्वाभाविक समजणें भाग आहे. शिपायांच्या उठावाशीं, त्यांनीं केलेल्या कत्तलीशीं बाईंचा संबंध नसल्याची खात्री वाळगून बाईंवर राज्य संभाळण्याची जबाबदारी इंग्रजानें टाकली. बाईंनीं ती जबाबदारी उचलली. पण पुढें इंग्रजानें बाईंबद्दलचा विश्वास सोडला. अर्स्किननें बाईंच्या वतीनें केलेल्या शिफारसीवर दुसऱ्या संशयखोर इंग्रजांनीं हरताळ फासला. कलकत्त्याच्या वरिष्ठांनीं झांशीचा उठाव हा बाईंच्या कारस्थानचा परिणाम असा ग्रह उराशीं बाळगून त्याप्रमाणें अधिकाऱ्यांना सुचवितांच स्थानिक अधिकारी बदलले. त्यांनीं मग बाईंच्या पत्रांना उत्तर द्यावयाचें नाहीं, असें धोरण पतकरलें व त्याबद्दल वरिष्ठांनीं त्यांची पाठ थोपटल्याचीं उदाहरणें आहेत. लक्ष्मीबाईंनीं आपला स्नेहभावाचा पवित्रा १८५८च्या फेब्रुवारीपर्यंत बदलला नव्हता. इंग्रजांची फौज झांशीस येण्याच्या सुमारास तेथें लक्ष्मीबाई आपल्या सल्लागाराशीं करीत असलेल्या मसलतीबद्दल गोडशांनीं प्रवासवृत्तांत जें लिहिलें आहे तें त्या प्रवासवृत्ताच्या मूळ हस्तलिखितामध्यें पुढीलप्रमाणें आहे. ‘ हें संस्थान कांहीं दुसरा मुलूख मेहेरबान गार्दनसाहेब यांनीं त्यासंबंधीं दसराहि स्वाधीन केलें. सबब मुलखाचे बंदोबस्ताकरितां थोडीबहुत फौज ठेवावी लागली व नवीन दारूगोळाहि करावा लागला व कांहीं पांच चार तोफाहि नव्या केल्या. सरकारबरोबर आम्ही लढाई करणार हें आमचे संस्थानी लोकांचे मनांतसुद्धां नाहीं व आपल्यास कोणीं काय समजाविलें असेल तें असो. इत्यादि ’ (प्रवासवृत्त प्रस्तावना पान १८) इंग्रजांकडील गुप्त खलबताचे जे कागद सांप्रत नव्यानें लोकांसमोर आले आहेत, त्यांतहि गोडशांच्या माहितीसारखाच थोडा भाग आहे. बाईंनीं प्रत्यक्ष रणकुंड पेटण्यापूर्वीं ह्यू रोजला आपलें म्हणणें

समजावें, म्हणून प्रयत्न केला तेव्हां राणीपदाची मुर्वत न ठेवतां झाडावर टांगून जीव घेतला जाईल, अशा अर्थाचा त्यानें उलट निरोप पाठविल्याची माहिती एका इंग्रजाच्या पुस्तकांत आहे.

लक्ष्मीबाई व इंग्रज यांच्यांतील परस्परहिताचा संबंध याप्रमाणें ऱ्हास पावतां पावतां मार्चमध्यें साफ नाहींसा झाला. इंग्रजांच्या धोरणांतील फरकाचीं कारणें बाईंना समजत असलीं पाहिजेत, असें मानायला हरकत नाहीं. इंग्रजांनीं आपल्याविषयीं नाहक संशय घेऊन आपली पराकाष्ठेची मानखंडना करण्याचा विडा उचलला आहे, यांचें आकलन होण्याइतक्या बाई बुद्धिमान् व चौकस होत्या. "बाई जिवंत सांपडल्यास त्यांना पकडल्या जागीं कैदेंत ठेवावें, तें धोक्याचें वाटल्यास कलकत्त्याला पाठवावें. त्यांच्या वर्तनाची चौकशी स्वतंत्र कमिशनरामार्फत केली जाईल. तथापि पहिली चौकशी तिकडेच पुरी झाली पाहिजे. आपली चौकशी होणार असल्याबद्दल राणीला माहिती असावी." हा कॅनिंगचा आदेश (ता. ११ फेब्रुवारी १८५८) लक्ष्मीबाईंना मुळींच समजला नसेल, अशी कल्पना त्यांच्या बारीक चौकसपणाकडे पाहतां चुकीची ठरेल. शत्रूच्या भूमिकेंत इंग्रज शिरल्याची खात्री झाल्यावर त्या मानधन राजस्त्रीला युद्धाचा मार्ग श्रेयस्कर वाटला. बाईंनीं यापुढें युद्धाची तयारी अविश्रांतपणें चालू ठेवली व येथून पुढें लक्ष्मीबाईंच्या झुंझार कर्तृत्वाला जो उजळा चढला, तो एकंदर भारतीय इतिहासांत बिनजोड आहे.

ह्यू रोजच्या झांशीवरील स्वारीचें वृत्त क्षणभर बाजूस ठेवून त्याच्या मोहिमेची पिछाडी डिसेंबरपर्यंतच्या काळांत डयूरंडनें कशी निर्विघ्न करून सोडली होती हें सांगणें आवश्यक आहे. डयूरंडची ही कामगिरी जर यशस्वी रीतीनें शेवटास गेली नसती तर ह्यू रोजला बुंदेलखंडाची मोहीम सुरू करणें अवघड होतें. याचें स्पष्टीकरण व्हावें म्हणून डयूरंडच्या कामाचा वृत्तान्त आधीं नजरेखालीं घालणें योग्य आहे.

### माळव्यांतील उठावाच्या गांठी

इंदूर येथें ता. १ जुलई रोजीं शिपायांचा उठाव झाल्यानंतर तेथें असलेला डयूरंड हा गव्हर्नर-जनरलचा वकील सीहोर, हुशंगाबादला गेला व मुंबईच्या फौजेला बरोबर घेऊन ता. २ ऑगस्ट रोजीं महूस पोंचला. ही माहिती मागें सांगून झाली आहे. तेथें त्याजवळ थोडी थोडी कुमक येऊन

पोंचत होती व सैनिक बळ वाढत होतें. त्याप्रमाणें आसपासच्या प्रदेशांत इंग्रजांचा प्रतिपक्षी आपली तयारी करीत होता. महूजवळच्या धार संस्थानांचे कित्येक दरबारी राज्यकर्ते इंग्रजी सत्तेला पाण्यांत पाहणारे असल्यामुळें त्यांचे मनोरथ अरब, रोहिले, पठाण इत्यादिकांचें साह्य मिळवून महूंतील इंग्रजांच्या डोळ्यांवर येण्याइतक्या उघडपणानें दौडूं लागले. पण फौज थोडी व पावसाळा या अडचणीपायीं इंग्रजाला आक्टोबर अखेरपर्यंत महूस डांबून राहणें भाग होतें. या निष्क्रिय कालावधींत इंग्रजांची फौज खूप वाढली असा प्रकार नसला तरी पावसाळा संपला होता व धारवर चाल करण्याला पुरेसें लष्कर जमलें होतें. आणखी दिरंगाई करावी तर माळव्यांत धुमसणारा असंतोष केव्हां कसा भडकून उठेल या प्रश्नाची डयूरंडच्या चित्ताला सारखी टोंचणी होती. मंदेसर या तटबंदीच्या गांवीं दिल्लीचा शहाजादा म्हणविणारा फेरोजशहा अरब रोहिल्यांना हातीं धरून लढाईच्या दमदार तयारीनें बसला होता. मंदेसर जवळच्या नीमच गांवची छावणी दुसऱ्या जमावाच्या कोंडींत दिवस काढीत होती. सप्टेंबर अखेरीस दिल्ली पडली नसती तर शिपाईगर्दीचे दुर्धर परिणाम सर्वत्र उसळतील, अशीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. दसरा (२८ सप्टेंबर) उरकला कीं इंग्रजांच्या खिळखिळलेल्या सामर्थ्याला नव्या उत्साहानें धक्के मारायचे अशा वार्तांनीं माळव्याचें वातावरण भरलें होतें. शिंदे, होळकर, पवार (देवास, धार) खेर (झांशी), अलीबहादर (बांदा), हे सारे पेशवाईचे सरदार; अप्रत्यक्षपणें त्यांचा नानासाहेब पेशव्यांबद्दल ओढा असणार व स्वतः नानासाहेब माळव्यांत येणार (अशी वदंता होती), या स्थितींत चढाईच्या धोरणानें महूच्या छावणींतून बाहेर पडण्याचा डाव डयूरंडनें टाकला. वस्तुतः इंदूरच्या होळकरी शिबंदीचा बंदोबस्त करणें अवश्य, हें त्याच्या मनांत वारंवार येत असूनहि त्यानें इंदूरच्या वाटेस जाण्याचें टाळलें. इंदूरला ज्यांची मदत मिळण्याचा संभव, ते आजूबाजूचे उठाव दडपणें, हें त्यांच्या मतें जास्त हिताचें होतें.

**धारेवर चढाई**

ता. १२ ऑक्टोबर या दिवशीं मंडलेश्वराच्या रक्षणाकरितां त्यानें थोडीशी फौज पाठविली. मंडलेश्वर भागांतल्या इंग्रजद्वेष्ट्यांचा पळ अडविण्याच्या हेतूनें कांहीं लोक गुजरी नांवाच्या गांवास रवाना केले. या लोकांची पाठ राखणाऱ्या आणखी एक दोन तुकड्या डयूरंडनें नंतर सवड करून धाडल्या.

तिकडचें भय निवारून तो ता. १९ला धारला जाण्यास निघाला. धारचा पहिला राजा १८५७च्या २३ मेला निधन पावल्यावर त्याचा भाऊ आनंदराव गादीवर आला होता. त्याच्या राजत्वाला इंग्रजांनीं तावडतोब मान्यता देऊन दत्तकाचा विषय निकालांत काढला. आनंदरावाच्या कारकीर्दींत दिवाणानें अरब, अफगाण, वगैरे लोकांची लष्करभरती चालविली होती. शेजारच्या आमझरा येथील राजापाशीं या जमातीचा भरणा होता. इंदूर महूच्या उठावामागून धार आमझऱ्याच्या सैनिकांनीं दोन ब्रिटिश ठाणीं मारलीं. ही कामगिरी बजावल्यावर आनंदरावाच्या एका वडील नातलगानें त्या पठाण अरबांचा सन्मान केला. त्यांनीं ३१ ऑगस्टला धारच्या किल्ल्यामध्यें तळ ठोकला. १६ ऑक्टोबरला राजाची आई, मामा आणि इतर बरेच दरबारी इंग्रजविरोधी कारस्थानें करीत आहेत व त्यांचें मंदेसरच्या लोकांशीं सूत्र आहे, अशा स्वरूपाची माहिती तेथील इंग्रज वकिलानें ड्यूरंडला कळविली. ड्यूरंड धारकडे कां वळला, याचा उलगडा वरील माहितीनें होईल.

ता. २२ ऑक्टोबरला ड्यूरंड धारेस पोचला. तेथें अरब मकराणी सामन्याला आले. इंग्रजांनीं त्यांचा जमाव फोडायला उशीर लावला नाहीं. त्यांच्या तोफांचा पाडाव झाला. अरब पठाणांनीं थोडेफार डावपेंच लढविले, पण शेवटीं त्यांनीं किल्ला गांठला. तेव्हां किल्ल्यावर चढाई आरंभून ३१ ऑक्टोबरला रिकाम्या किल्ल्यांत इंग्रज शिरले. गडावरचे लोक आधींच पळाले होते. माणसें नव्हतीं म्हणून किल्ला रिकामा खरा, पण द्रव्यदृष्ट्या तो भरलेला होता. इंग्रज सैनिक राजवाड्यांत शिरले त्या वेळीं दारूगोळा, हत्यारें, वस्त्रें, पात्रें असा माल तर तेथें विपुल होताच, पण एका लहानशा खोलींत रुपये-मोहरांच्या रोकडीप्रमाणें बहुमोल जिनसा इंग्रजांच्या हातीं लागल्या. एका इंग्रजानें ही लूट नऊ लाखांची होती, असा हिशोब सांगितला आहे. या लुटींतला थोडा-फार हिस्सा प्रत्येकाच्या वांट्यास येऊन आपल्या पराक्रमाचें सरकारमार्फत चीज होईल ही सैनिकांची आशा कधींच सफळ झाली नाहीं. या लुटींत राजघराण्याचे खासे दागदागिने किंवा जडजवाहीर नव्हते. १७ हत्तींवर ही लुटीची कमाई लादून इंग्रजांनीं महूस पाठविली. धारच्या लढाईंत कित्येक स्वारांचें नशीब शिकंदर असल्याचा अनुभव आला. या स्वारांना सहा हत्ती दिसले. हत्तींचे रखवालदार मारून जेव्हां हत्ती गोटांत आणले तेव्हां त्यांची

विक्री करण्यांत आली. सैन्याला खाणेंपिणें पुरविणाऱ्या खात्यानें चार हजारांला ते खरेदी केले. उदार सेनापतीनें ती रक्कम हत्ती पकडणाऱ्या स्वारांना बक्षीस म्हणून देऊन टाकली. ही वातमी समजतांच पायदळानें जाहीर केलें कीं, किल्ल्यावरील मालपैकीं चिंधीसुद्धां स्वारांच्या हातीं लागूं द्यावयाची नाहीं. त्या मालाची जी वाट झाली तिची वाच्यता या स्वारांच्या हेव्यानें पूर्वोक्त इंग्रजानें केली आहे. धारचें संकट निवारून व तेथील कारस्थानी लोकांना कैद करून ड्यूरंडनें महूस पाठवून दिलें, मग तो मंदेसरच्या दिशेनें निघाला.

**महीदपुराची वासलात**

धारहून पळालेल्या अरब पठाणांनीं मंदेसर गांठण्यापूर्वीं मार्गांतील महीदपूरची इंग्रजी नियंत्रणाची लष्करी छावणी (ता. ८ नोव्हेंबर) पादाक्रांत केली. धारेस इंग्रजांनीं मार खाल्ला, अशी वातमी हे अरब पठाण लोक पसरवीत असल्यामुळें तिच्या प्रभावानें महीदपूरचे शिपाई धारच्या लोकांना जाऊन मिळाले. तेथून पळालेले इंग्रज जेव्हां ड्यूरंडला भेटले तेव्हां त्यानें निजामशाहीचा रिसाला महीदपूरवाल्याच्या मागावर पाठविला. हा रिसाला महीदपुरास पोंचल्यावर त्याला समजलें कीं तेथील छावणीची लूट घेऊन शिपाई सकाळींच निघून गेलेले आहेत. रिसाल्यानें थोडी विश्रांति घेऊन शिपायांचा पाठलाग सुरू केला. दुपारीं त्यांचीं व शिपायांची गांठ पडतांच उभयतांनीं जोराचा सामना चालविला. ही झटापट हातघाईची झाली. पण दोन तीन तासानंतर शिपायांचें अवसान खचलें. महीदपुरास त्यांनीं जमविलेली बहुतेक सारी लूट इंग्रजांच्या पदरांत पडली. त्यांच्या आठ तोफा इंग्रजांनीं हिरावल्या. या झटापटींत इंग्रजांना मोठें नुकसान सोसण्याची पाळी आली.

**निधड्या छातीचे दाखले**

यापुढें नेटानें मजल मारून ता. १९ नोव्हेंबरला ड्यूरंड चंबळ नदी उतरला. अरब पठाणांनीं त्याला नदीवर अडविलें नाहीं. ता. २० ला नदीपलीकडे झाल्या प्रवासाचा शीण घालवून दुसऱ्या दिवशीं मंदेसरपासून चार मैलांवर ईंग्रजांनीं आपला तळ उभारला. थोड्याच अवकाशांत मंदेसरवाल्यांच्या हालचाली कानावर आल्यानें इंग्रज सज्ज होऊन लढाईला उभा राहिला. तोफांच्या सरवत्तीनें सामन्याचा आरंभ सुचविला. इंग्रजी तोफांचा मारा अचूक असून सुद्धां त्यांना चकित करून सोडणारा एक प्रतिपक्षाचा धैर्यशाली वीर इंग्रजांच्या पाहण्यांत आला. हा वीर सहज दृष्टि वेधून

घेणाऱ्या बांध्याचा होता. पांढरा स्वच्छ पोषाख व हातांत हिरवें निशाण, अशा डौलानें तो इंग्रजांच्या तोफांसमोरून अगदीं शांतपणें पावलें टाकीत चालला होता. त्याच्या जवळून तोफांचे गोळे सणाणून जात असतां तो एखाद्या वेळीं किंचित् वांकला असेल, पण पळण्याचा यत्न त्यानें एकदांसुद्धां केला नाहीं. सगळ्या तोफांसमोरून तो गेला. तो जेव्हां मागल्या खेड्याकडे वळला तेव्हां त्याच्यावर एक गोळा पडला. इंग्रज लेखकानें आपल्या तोफखान्याच्या अचूक गोलंदाजीच्या स्तुतीसाठीं हें वर्णन लिहिलें असलें तरी त्या वीराच्या अढळ धैर्याची ओळख पटायला त्याचा उपयोग खचित आहे.

तोफांच्या गोळ्यांसारख्या मृत्यूच्या दांतदाढांची फिकीर न बाळगतां शत्रूसमोरून चालण्याच्या क्रियेमागें मंत्रतंत्राची भावना असावी, असें एका उदाहरणावरून समजावें लागतें. नीमचला वेढणाऱ्या लोकांत एक मागल्यासारख्याच धैर्याचा फकीर होता. आपल्या छातीवर आरसा बांधून त्यानें वेढ्याच्या जागेभोंवतीं प्रदक्षिणा करण्याचा निश्चय पुकारला होता. इंग्रजांच्या गोळीबारांतून आपण ही प्रदक्षिणा पुरी करूं शकलों कीं, ती जागा हमखास शिपायांना जिंकतां येईल, असें त्याच्या धाडसाचें रहस्य होतें. जवळ जवळ प्रदक्षिणा पुरी होईतोंवर त्याला इंग्रजांच्या गोळ्यांनीं स्पर्श केला नाहीं. पण ती पुरी होण्याच्या आंत त्याचें मंत्रबळ संपल्याप्रमाणें एका गोळीनें त्याला जमिनीवर लोळविलें. इंग्रजांचें साहाय्यक शिपाई या फकीराच्या करणीनें भेदरले होते. त्याचें भय नाहींसें करण्यासाठीं एका बँडवाल्यानें फकीराचें डोकें कापून आणलें. त्याचा आरसाहि डोक्याच्या सोबतीला ठेवला होता. फकीराची याप्रमाणें इतिश्री झालेली पाहून भाविक शिपायांच्या हृदयांतला मंत्रतंत्राचा भ्रम गेला. निदान त्यांचा घाबरटपणा मावळला असा ही गोष्ट सांगणाऱ्या इंग्रजाचा ग्रह त्याच्या लेखनांत आढळतो.

### वेढा उकलला

ता. २४ रोजीं ड्यूरंडनें आपला गोट हालवून नीमच व मंदेसर या दोन्ही ठिकाणांना शहांत ठेवतां येईल अशा जागीं नेला. ता. ८ नोव्हेंबरला नीमचच्या छावणीला शिपाई-गर्दीनें गराडा घातला होता. मंदेसरच्या लोकांना या गराडेवाल्यांची मदत पोचूं नये म्हणून ड्यूरंडनें आपली जागा पालटली. नीमचचे शिपाई सुमारें एका मैलावरील एका खेड्याच्या व टेकडीच्या

आश्रयानें जमले होते. इंग्रजांच्या चढाईशीं हे शिपाई अतिशय चिकाटीनें झुंजले. इकडे ही झटापट चालू असतां मंदेसरचे लढवय्ये इंग्रजांवर निकरानें धावले. पण त्यांना थोड्या वेळांतच इंग्रजी लष्करानें माघारी पिटाळलें. इंग्रजांनीं आतां आपलें सारें बळ त्या खेड्यावर केंद्रित करण्याचें ठरवून कांहीं तुकड्यांना संगिनीचा हल्ला करायला हुकूम दिला. पण खेड्यांतून होणारा गोळ्यांचा वर्षाव असा प्रखर होता कीं, त्या हुकमाची अंमलबजावणी तहकूब झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं इंग्रजांनीं तोफांच्या धडाक्यानें खेडें जवळ जवळ जमीनदोस्त करून सोडलें. तेथें जें जळण्यासारखें होतें त्यांचें भस्म झालें. पण शिपायांनीं लढाई सोडली नाहीं. दुपारीं सुमारें सवादोनशें जण शरण आले. या खेड्यांतून लढणारे बहुतेक सारे रोहिले होते. तोफांचें काम नाहीं असें पाहून इंग्रजांनीं खेड्यावर संगिनीचा हल्ला चढविला व आंत उरल्यासुरल्यांना ठार मारून खेडें काबीज केलें. या लढाईचा फायदा घेऊन मंदेसरच्या शहाजाद्यानें आपल्या लोकांसह तेथून पाय काढला व त्यांच्याशीं लढाई टळली, हा फायदा इंग्रजाला मिळाला.

**माळव्यांतील संकटसमाप्ति**

इंग्रजी राज्याला तिलांजलि देण्याच्या ईर्ष्येचीं अभ्रें यापुढें माळव्याच्या भूमींत उठणार नाहींत, अशा विश्वासानें ड्यूरंड उज्जैन मार्गानें इंदूरकडे वळला. मंदेसरजवळच्या लढाईच्या परिणामीं उठावाच्या प्रतिनिधींनीं गांवखेडीं सोडून रानाच्या झाडीआड बचावासाठीं लपत छपत वाट काढण्याचें काम चालविलें होतें. एकदां त्यांच्यापैकीं कित्येक साहसी वीरांची बावटळ प्रतापगड नांवाच्या लहानशा जहागिरीवर गेली. ज्या अरब पठाणांचें लोकांना दीड दोन महिन्यांपूर्वीं अपरिमित भय वाटत होतें ते इंग्रजांशीं झगडतांना हरल्यामुळें प्रतापगडच्या राजानें आपले ठाकूर गोळा करून या अरब, पठाणांना खडे चारले व आपल्या हद्दीबाहेर हाकललें. इकडे मंदेसर ताब्यांत येतांच उठावाचे जे पुढारी मारले गेले, त्यांपैकीं दोघां प्रमुखांचीं डोकीं ड्यूरंडनें मंदेसरच्या वेशीवर उभीं केलीं. लढाईत पडलेल्या इंग्रज सेनाधिकाऱ्यांच्या डोक्याची शिपायांनीं अशीच संभावना केली होती. तिचा वचपा अशा रीतीनें इंग्रजांनीं काढला. ड्यूरंड हा कठोर प्रकृतीचा इसम असल्यानें त्यानें ठिकठिकाणीं पकडलेल्या माणसांना ठार मारण्याचा क्रम स्वीकारला होता. ड्यूरंडची इंदूरच्या संस्थानी सैनिकांवर

करडी नजर असल्यामुळें बाकीच्या भागांतलें संकट निवळतांच त्यानें संस्थानी सैनिकांचीं हत्यारें काढून घेण्याबद्दल होळकर महाराजांना कळविलें. महाराजांनीं स्वतःच आपल्या सैनिकांचीं हत्यारें काढण्याचा विधि उरकून अति प्रसंग टाळला. धारचे कैदी ड्यूरंडच्या मागून आलेल्या अधिकाऱ्याच्या कृपेनें १८५८ च्या नोव्हेंबरांत, त्या कैद्याची चौकशी व्हावी असा वरिष्ठांचा हुकूम असतांहि, किटाळावांचून सुटले. फक्त धारच्या राज्याचा एक तुकडा शिंदेशाहीला देण्याच्या शिक्षेवर धारकरांचें भागलें. आमझेरकराला मात्र आपलें सगळें राज्य गमावून वर फांसाचा प्राणदंड भोगावा लागला. त्याचें राज्य भोपाळच्या राज्यांत सामील करण्यांत आलें. ड्यूरंडच्या कामगिरीनें इंग्रजांच्या बुंदेलखंडांतील मोहिमेचा रस्ता मोकळा केला. यानंतर ड्यूरंडचा मनु संपून ह्यू रोजचें लष्करी युग उदय पावलें.

— ३ —

### ह्यू रोजची मोहीम

झांशीस चढाई करून आलेला सेनापति सर ह्यू रोज हा सप्टेंबरांत मुंबईस आला. डिसेंबरांत मध्यभारतासाठीं (तेव्हांचा सेंट्रल इंडिया) जुळविलेल्या सेनेचें आधिपत्य त्याला मिळालें. ह्यू रोजनें महूच्या छावणींत युद्धसाहित्य सिद्ध करून १८५८ च्या जानेवारींत (ता. ६) सागरचा रोख धरला. त्यानें आपल्या सैन्याचे दोन विभाग केले होते. पहिला विभाग चंदेरीच्या दिशेनें पाठविण्यांत आला. ह्यू रोज प्रथम सीहोरला मुक्काम करून ता. २४ जानेवारीला सकाळीं सागरपासून २५ मैलांवर असलेल्या राहतगड नांवाच्या गडाखालीं पोंचला. गड उंच टेकडीवर होता. त्यावर चढाई करण्यापूर्वी खालचें गांव इंग्रजी लष्करानें कबजांत घेतलें. ता. २८ पर्यंत गड लढत होता. त्या दिवशीं पिछाडीवर बाणपूरचा राजा मोठी फौज घेऊन आला, परंतु ह्यू रोजच्या फौजेशीं न लढतां बाणपूरची सेना माघारी फिरली. त्या वेळीं बाणपूरच्या सैनिकांनीं हत्यारेंपात्यारें टाकून रण सोडल्यामुळें त्यांचा पाठलाग यशस्वी झाला नाहीं, असें इंग्रजांचें निवेदन दृष्टीस पडतें. बाणपूरची कुमक निरुपयोगी ठरल्याचें अनुभवल्यावर गडावरील सैनिकांनीं रात्रींच्या काळोखाचा फायदा घेऊन गड रिकामा केला. जेथून ते गड उतरले ती जागा अतिशय अवघड असल्यामुळें हे सैनिक सहीसलामत गेले कसे याचें इंग्रजांना आश्चर्य वाटलें. ३० तारखेला

बाणपूरचा राजा बरोडिया नांवाच्या ठिकाणीं युद्धाच्या तयारीनें येऊन राहिल्याची बातमी ह्यू रोजला समजतांच त्यानें आपला मोर्चा तिकडे वळविला. येथें झुंज उत्तम जुंपून इंग्रजाला पुढील परिणामाबद्दल काळजी उत्पन्न झाली होती. बरोडियाच्या आसपास दाट झाडी होती व तिचा जेवढा फायदा घेतां येईल तेवढा बाणपूरच्या सैनिकांनीं घेण्याचें काम चालविलें होतें. शेवटीं ह्यू रोजला यश मिळालें. तथापि बाणपुराचा राजा इंग्रजाच्या तावडींतून निसटलाच. ता. ३ फेब्रुवारीला ह्यू रोजनें सागर गांठलें. ता.९ पर्यंत सागरला राहून २५ मैलांवरील गऱ्हाकोटा नांवाचा किल्ला जिंकण्यासाठीं ह्यू रोजनें कूच केलें. ता. ८ रोजीं लहानशी फौज पाठवून मार्गांतील सनोद नांवाचा किल्ला त्यानें हस्तगत करून ठेवला होता. ता. ११ ला तो गऱ्हाकोट्याशीं भिडला. गऱ्हाकोट्याला उभयपक्षीं तोफांची लढाई चांगली चालू होती. इतक्यांत गऱ्हाकोट्याची एक तोफ मोर्च्यांतून ढासळली व तेथील लढवय्यांचा धीर खचला. त्यांना एक दरवाजा मोकळा सांपडला व ता. १२ च्या रात्रीं शिपायांनीं हें ठाणें सोडलें. ता. १७ ला ह्यू रोज पुनः सागरास परतला. या मोहिमेंत शिपायांचे कित्येक मुसलमान पुढारी ठिकठिकाणीं पकडले जाऊन फांसावर मरण पावले. उठावाचे शिपाई व विलायती (पठाण अरब वगैरे) लोक उत्तम प्रकारें लढले.

आतां झांशीवर चालून जायचें तर मार्गांतील दोन किल्ले, दोन खिंडी व दोन शहरें अशीं ठिकाणें जिंकणें भाग होतें. यासाठीं ह्यू रोजनें ता. २६ पर्यंत सागरला राहून सर्व प्रकारची तयारी झाली व त्या दिवशीं त्याची पहिली तुकडी अघाडीस रवाना केली. त्याच रात्रीं तो स्वतः मोहिमेवर निघाला. पुनः एकदां बरोडियाचा समाचार घेऊन तो ३ मार्चला मलथोनच्या खिंडीखालीं पोचला. येथें शिपायांनीं केलेली जबर तयारी पाहून त्यांच्या तोंडावर थोडी फौज लढत ठेवायची व स्वतः मदनपुराच्या खिंडीकडे जावयाचें असा डाव ह्यू रोजनें टाकला. या खिंडीच्या रक्षणाकरितां शिपाई अतिशय निग्रहानें लढले. त्यांच्या तोफांचा व बंदुकांचा मारा कांहीं वेळ असा भयंकर होता कीं ह्यू रोजच्या लष्करांची त्या वेळेपुरती गाळण उडाल्याशिवाय राहिली नाहीं. गोऱ्या पायदळानें संगिनी सरसावून जेव्हां जोराचा हल्ला चढविला तेव्हां शिपायांची फळी फुटली व ते मदनपुराच्या आश्रयास गेले. तेथें इंग्रजांनीं तोफा चालविल्यावर थोडा वेळ शिपायांनीं प्रतिकार केला. तो मोडला आणि तेथून आसपासच्या दाट झाडींत

घुसणें हा उपाय त्यांना पत्करावा लागला. ह्यू रोजच्या प्रस्तुत विजयामुळें पुढच्या टापूंतील अनेक अडचणींच्या जागा शिपायांनीं मोकळ्या सोडल्या व इंग्रजांच्या तेवढ्या लढाया टळल्या. तिकडे चंदेरीवर जो सेनाविभाग पाठविला होता, त्यानें ता. १८ मार्च रोजीं चंदेरी जिंकल्याचें ह्यू रोजला समजतांच त्यानें झांशीकडे थोडीशी फौज पाठविली. परंतु चरखारी का झांशी असा या वेळीं ह्यू रोजपुढें प्रश्न येऊन पडला. चरखारीचा राजा इंग्रजाचा पक्षपाती होता; त्याला तात्या टोपे यांनीं वेढलें असल्यानें त्याची सुटका आधीं करावी, असा कॅनिंगचा संकेत होता. परंतु चरखारी व झांशी यांतील भौगोलिक अंतर व झांशीचें महत्त्व ध्यानांत घेऊन ह्यू रोजनें झांशीवर चढाई करण्याचा आपला संकल्प अंमलांत आणला. असलेल्या मुक्कामापासून झांशी १४ मैलांवर आणि चरखारी ८० मैलांवर, यामुळें झांशी मागें टाकून चरखारीकडे जाणें योग्य नव्हतें. शिवाय झांशीस लढाई जुंपल्यावर चरखारीचा नाद टोप्यांना सोडावा लागेल ही शक्यता विचारांत घेण्यासारखी होती. याप्रमाणें साधक-बाधक पाहून ह्यू रोजनें ता. २२ मार्च या दिवशीस झांशीस डेरा ठोकला.

**झांशीचा संग्राम**

ता. २२ पासून २५ पर्यंतचे तीन दिवस टेहळणी करून अचूक माऱ्याच्या जागा ठरविण्यांत व तेथें तोफा उभ्या करण्यांत गेले. दोन्ही पक्ष एकमेकांवर गोळीबार करीत होते, पण खरी दणक्याची लढाई ता. २५ ते ४ एप्रिल याप्रमाणें ११ दिवस चालली होती. ह्यू रोजनें आपल्या लष्कराचे सात धावते विभाग करून त्यांच्या सांखळीनें शहर व किल्ला वेढून टाकला होता. या अकरा दिवसांचें विश्वसनीय वृत्त गोडशांनीं आपल्या तत्कालीन आठवणींच्या द्वारें पुरविलें आहे. गोडशांनीं जर त्या आठवणी लिहून काढल्या नसत्या तर झांशीच्या लढाईसंबंधीं फक्त एकतर्फी (इंग्रजाकडील) हकीकती-वरच विसंबून राहणें भाग होतें. लक्ष्मीबाईच्या शौर्याचें, धैर्याचें, औदार्याचें, युद्धकुशलतेचें व साहसाचें चित्र गोडशांच्या लेखनांत चांगल्या रीतीनें रेखाटलें गेलें आहे. ते सर्व मुळांतून जिज्ञासूंनीं पाहावें. येथें त्यांतील महत्त्वाच्या भागाचा सारांश दिल्यानें भागेल.

"पहिले तीन दिवस मोर्चे बांधण्यासाठीं इंग्रज योग्य जागा पाहात होता. त्याला जागा सांपडली व तो मोर्चे बांधूं लागला कीं किल्ल्यावरील तोफांचे गोळे त्यावर नेमके पडून मोर्चे उध्वस्त होऊन जात व माणसें मरत.

तिसऱ्या दिवशीं शहरांतील फितूर माहितगारांकडून म्हणा किंवा स्वतंत्रपणें म्हणा, इंग्रजाला योग्य जागा कोणत्या तें समजलें व त्यांनीं मोर्चे बांधून तोफांचा भडिमार सुरू केला. तो पाहून बाईसाहेब अति दुःखी झाल्या; परंतु न डगमगतां त्यांनीं जास्ती माणसें कामावर लावलीं. स्वतःच्या अन्नपाण्याची काळजी सोडून किल्ल्याच्या व शहराच्या तटावर त्या अहर्निश खपूं लागल्या. इंग्रजांच्या तोफांनीं किल्ल्याची व शहराची फार नासाडी केली. लोकांचे अन्नपाण्याच्या बाबतींत हाल होऊं नयेत म्हणून अन्नछत्रें व सदावर्तें सुरू करून फुटाणे चुरमुरे वाटण्याची व्यवस्था बाईंनीं आरंभिली.

इंग्रजांच्या माऱ्यापुढें किल्ल्याच्या तोफा बंद पडल्यास मोठालीं बक्षिसें देऊन बाईसाहेब हुशार कसबी गोलंदाजांना उत्तेजित करीत. सातव्या दिवशीं एक तोफ बंद पडली व तिचा मोर्चा मोडला तेव्हां बाईसाहेबांनीं हुशार गवंडी आणून युक्तीनें घोंगडी पसरून हळू हळू त्यांना बुरजावर चढविलें व विटा वगैरे सामान खालपासून माणसांची माळ लावून त्यांस जमिनीवर निजवून त्याजकडे पोंचविलें. नंतर त्या गवंड्यांनीं निजून निजून मोर्चा बांधला व त्यावर तोफ ठेवून चालू केली. आठव्या दिवशीं इंग्रजांच्या तोफांनीं पाण्याची जागा रोखली व दारूचें कोठार उडविलें. त्या दिवशीं लढाईचा कहर झाला. फार तुंबळ युद्ध झालें. वीर मोठमोठ्यानें आरोळ्या देत होते. बंदुका, कडामिनीचे व तोफांचे आवाज अगणित चालू होते. त्या आवाजांत शिंगें, कर्णे, बिगुलं यांच्या आवाजाची भर पडत होती. धूळ, धूर व नाना प्रकारचे ध्वनि यांच्या योगानें सर्व दिशा भरून राहिल्या होत्या. बाईसाहेबांस फार मेहनत पडत होती. चोहोंकडे नजर ठेवून जी जी उणीव पडेल ती स्वतः पुरविण्याचा हुकूम करीत होत्या. झांशी लढवीत असतां बाई पेशव्यांच्या सैन्याची मोठ्या आतुरतेनें वाट पाहात होत्या. तें सैन्य तात्या टोपे यांच्या नेतृत्वाखालीं ता. ३०–३१ मार्चला बेटवा नदीकांठीं सहा सात मैलांवर येऊन पोंचलें.

### बेटव्याची लढाई

झांशीचा लढा निकरास चढत असतां इंग्रज सेनापतीनें ता. ३० मार्च हा निर्वाणीच्या हल्ल्याचा दिवस, असा मनाशीं निश्चय केला होता. पण तो दिवस उगवण्यापूर्वींच त्याला तात्या टोप्यांनीं उभारलेली 'पेशव्यांची फौज' पाठीवर चालून येत असल्याची खबर कळली. या फौजेमुळें झांशी जिंकण्याचा

दिवस लांबणीवर टाकून ह्यू रोजला त्या फौजेकडे लक्ष द्यावें लागलें. ही फौज पंधरा हजारांवर होती. झांशीला इंग्रजी लष्कर फार मोठें नाहीं, शिवाय तें लष्कर किल्ला व शहर याभोंवतीं पसरून लढण्यांत गुंतल्यामुळें त्याचा तळ तुडविणें सोपें आहे, हा तात्यांचा अंदाज चुकीचा नव्हता. झांशीचा वेढा सोडून इंग्रजी लष्कर आपल्याकडे ओढलें गेलें तर झांशीवाले त्यावर तुटून पडतील व झांशीच्या वेढ्याला इंग्रज चिकटून राहिल्यास आपण त्याला झोडपून काढूं; याप्रमाणें दोन लढायांच्या चिमट्यांत इंग्रजाला दाबून चिरडून टाकूं, अशी तात्यांची हिकमत होती. पण तात्याचा हा डाव साधूं देण्यासारखा इंग्रज सेनापति कच्चा नव्हता. त्यानें ताबडतोब आपल्या सैन्याच्या तुकड्या तात्यांच्या सामन्याला पाठविल्या. अघाडीवर गेलेल्या तुकड्यांना तात्यांची फौज दिसली नाहीं म्हणून त्या मागें सरकल्या व तात्यांचे लोक पुढें सरसावून ते इंग्रजांना नीट पाहायला सांपडले. ता. ३१ मार्चच्या मध्यरात्रीं तात्या बेटवा (वेत्रवती) नदी उतरून अलीकडे आले. आपलें आगमन झांशीकरांना कळण्यासाठीं त्यांनीं मोठी आग पेटविली होती. उजाडलें कीं लढायचें असा ह्यू रोजचा संकल्प तात्यांनीं अगोदर चढाई केल्यामुळें अनायासें कृतींत उतरला. इंग्रजी व्यूहाची डावी बाजू फोडून झांशीस पोंचावें, हें तात्यांच्या व्यूहाचें इंगित ओळखून ह्यू रोजनें त्याप्रमाणें आपल्या हालचाली सुरू केल्या. तत्काळ तात्यांच्या बाजूनें बंदुका-तोफांचा भडिमार होऊं लागला. त्याचा कांहीं वेळ इंग्रजाला प्रतिकार करतां आला नाहीं. पण जेव्हां इंग्रजी प्रतिकाराचें बळ वाढलें तेव्हां तात्यांनीं तें बळ आटोक्यांत ठेवण्याचा अतोनात प्रयत्न केला, तरी त्यांची फळी भंगली. मग तात्यांच्या सैनिकांनीं इंग्रजांच्या चढाईची वाट न पाहतां पीछेहाट आरंभली. इंग्रज त्यावर धावतांच या पीछेहाटीचें पळ हें अवस्थांतर होण्याला उशीर लागला नाहीं.

तात्यांचे रणछोड शिपाई टोळ्या-टोळ्यांनीं पांगले होते. जेथें लढण्याच्या सोयीची जागा सांपडेल तेथें त्या जागेच्या आधारानें जीवाची आशा न ठेवतां ते कसून लढत. अशा झटापटी बेटवा नदीच्या कांठीं ठिकठिकाणीं घडल्या. जे शिपाई पहिल्या धडकींत हटले व पांगले, त्यांचा पाठलाग करतां करतां तात्यांची दुसरी अवाडी इंग्रजांच्या डोळ्यांसमोर आली. पण ही अघाडी आपल्या जागेवर नव्हती. पहिल्या अघाडीप्रमाणें तिनेंसुद्धां मैदान सोडल्याबद्दल ह्यू रोजला शंका उरली नाहीं. इंग्रजांच्या लष्करानें लगट करूं नये

म्हणून या अघाडीचा तोफखाना इंग्रजावर वर्षत होता. आपला पाठलाग थोपविण्याकरितां शिपायांनीं आसपासचें रान पेटविण्याची युक्ति अंमलांत आणली. तथापि इंग्रजांच्या सेनेनें त्यांचा पिच्छा सोडला नाहीं. शेवटीं आपल्या तोफा इंग्रजांच्या हातीं पडूं नयेत म्हणून शिपाई उलटले व आणखी एकदां युद्धास ठाकले. हा त्यांचा तिसरा सामना होता. त्यांनीं शर्थीची मर्दुमकी गाजविली. पण आतां लढाईचा हुकमी डाव त्यांच्यापाशीं उरला नव्हता. त्यांनीं तोफा संभाळण्याचा नाद सोडला. ह्यू रोज आपल्या अहवालांत म्हणतो कीं, जेथें लढाईला तोंड लागलें, तेथपासून ९ मैलपर्यंत शिपायांचा पाठलाग चालू होता. त्यांच्यापैकीं १५०० जण मारले. त्यांचा सगळा तोफखाना ( १८ तोफा ), दारूगोळा, दाणागोटा काबीज केला. बेटव्याची लढाई मारून ह्यू रोज झांशीस आल्यावर दुसऱ्याच दिवशीं तो झांशीची तटबंदी पाडून व ओलांडून त्या शहरांत शिरला.

बेटव्याची लढाई झांशीपासून सहासात मैलांवरच खणखणत असल्यानें झांशीचे सर्व लोक तो सामना तटावरून पाहूं लागले. दूरच्या लढाईचा खेळ पाहण्याऐवजीं झांशीच्या लढवय्यांनीं आपलें संख्याबळ झांशीस वेढणाऱ्या इंग्रजांवर लोटलें असतें तर इंग्रजांच्या गोटाचें रक्षण करणें कठिण होतें असें इंग्रजांचें म्हणणें आहे. सेनापति बेटव्यास गेल्यावर झांशीच्या एका दूरच्या भागावर इंग्रजानें हल्ला चढविल्यामुळें कदाचित् किल्ला सोडून इंग्रजांवर तुटून पडण्याचें धैर्य झांशीवाल्यांना झालें नसावें असा एक तर्क इंग्रजांच्या लेखनांत क्वचित् आढळतो. मैदानी हल्ला चढवून इंग्रजांवर मात करण्याची ही संधि झांशीकरांनीं गमावली याचें इंग्रजांना सहर्ष आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. बेटव्याच्या लढाईबद्दल गोडशांनीं लिहिलेला मजकूर इंग्रजांच्या वृत्तांताशीं जुळतो. 'तात्याटोपी काल्पीहून पंधरा हजार फौज घेऊन निघाला तो मजल-दरमजल डवल कूच करून झांशीजवळ येऊन पोंचला. तों रातोरात मोर्चे बांधून तोफेस वत्ती दिली. इकडून कप्तानसाहेबहि इंग्रजी फौज घेऊन त्याजपाशीं लढावयास वेढ्याचा बंदोबस्त करून आला. झांशींतील सर्व लोक त्या लढाईवर झांशीचा परिणाम अवलंबून असल्यामुळें मोठ्या भीतीनें लढाईचा परिणाम काय होतो हें पाहण्यास तटावर जमले होते. दोन्ही पक्षांचे शिपाई जीवापाड मेहनत करीत होते. कोणास भान राहिलें नव्हतें. समोरासमोर लढाईचे प्रसंगांत पायदळाबरोबर पायदळ, स्वाराबरोबर

स्वार लढत होते व सर्व रणांत बिगूल, शिंगें, बंदुका, तोफा इत्यादिकांचा आवाज धुंद भरून राहिला होता. झांशीवाली बाई व तिचे सरदार तटावरून दुर्बिणी लावून पहात होते. परंतु झांशीच्या दुर्दैवानें म्हणा अगर तात्या टोपीच्या कमी कसबानें म्हणा किंवा हिंदु शिपाई लोक नादान व नाशूर असल्यामुळें म्हणा, तात्या टोपीची फौज फुटूं लागून शिपाई पळ काढूं लागले. इंग्रजी फौजेनें तोफा मोर्च्यांतून काढून पाठलाग करण्यास आरंभ केला. रिसाल्याच्या स्वारांनीं एकदम हल्ला केला. तात्या टोपी स्वतः चोवीसपन्ही छत्तीसपन्ही तोफा टाकून पळून गेला. इंग्रजी फौजेचा जयजयकार होऊन त्यांची हिम्मत दुणावली. पेशव्यांचे फौजेचा मोड होऊन तिनें पळ, अपयश व दुःख यांचा स्वीकार केला, व झांशीवाल्यांच्या फौजेंत हाहाकार होऊन सर्वांचीं मनें होरपळून जाऊन दुःख, भीति, निराशा यांचा एकामागून एक अंमल बसला.' ( गोडसे पान ७१-७२ ).

### शहरांत इंग्रज घुसले

तात्या टोपे यांचा ता. १ एप्रिल रोजीं पराभव झाल्यावर झांशीच्या शिपायांमध्यें अधिक वीरश्री चढली. सरदार लोक व बाईसाहेब स्वतः तटाच्या बंदोबस्ताकरितां पुनः तटावर मेहनत करूं लागल्या. युद्धाचा अकरावा दिवस उगवला, तरी बाईसाहेबांच्या मेहनतींत यत्किंचितहि फरक पडला नाहीं. त्या रात्रीं बाईसाहेब स्वतः शहरचे तटावर आणि किल्ल्यावर फिरून बंदोबस्त ठेवीत होत्या. इतक्यांत एका बातमीदारानें कळविलें कीं, दारूगोळा संपल्यामुळें इंग्रज उद्यां आपला तळ उठविणार आहेत. ही बातमी ऐकून बाईसाहेबांस अतिशय आनंद झाला. नंतर बाईसाहेब विश्रांतीसाठीं झोपल्या असतां पहाटेस त्यांना उठवून बातमी सांगण्यांत आली कीं इंग्रजानें शहर सर केले. बाईसाहेब व इतर मंडळी पाहतात तों खरोखरींच गोऱ्या सैनिकांची शहरच्या तटावर गर्दी दिसली. तेव्हां शूरत्वाचा आवेश चढून हत्यारबंद विलायती–मुसलमान अरबांसारखे–बरोबर घेऊन त्या किल्ल्याखालीं उतरल्या. बाईसाहेब प्रथम मागें होत्या त्या आपल्या सैनिकांच्या मध्यभागीं आल्या. गोरे आणि विलायती यांनीं जी हातघाईची भयंकर लढाई केली तिच्यांत गोऱ्यांना लगट सोडून दूर पळावें लागलें. गोऱ्यांनीं झाडांच्या व घरांच्या आडून गोळीबार सुरू केला. मग बाईसाहेब विलायती लोकांसह किल्ल्यांत गेल्या. गोडशांच्या माहितीप्रमाणें इंग्रजांच्या लेखनांतहि अरब पठाणांच्या पराक्रमाची स्पष्ट कबूली पाहायला सांपडते.

### झांशीची व लक्ष्मीबाईची ताटातूट

गोऱ्यांनीं चालविलेली शहराची कत्तल, लुटालूट व जाळपोळ बाई-साहेबांना असह्य होऊन त्यांच्या मनांत आत्महत्येचा विचार आला व तो कळल्यावर किल्ल्याबाहेर पडून पुनः इंग्रजांशीं युद्ध करावें आणि धारातीर्थी पावन व्हावें, असा सल्ला त्यांना मिळाल्यामुळें त्यास अनुसरून बाईसाहेब किल्ला सोडण्याच्या तयारीस लागल्या. सर्व आश्रितांना निरोप देऊन अवशीस बारा घटकांचे सुमारास त्या किल्ल्याबाहेर निघाल्या. बाईसाहेब अडीच हजार रुपये किंमतीच्या पांढऱ्या खंद्या घोड्यावर बसल्या. पायजमा, स्टाकीन, बूट वगैरे सर्व पुरुषवेष त्यांनीं धारण केला होता. अंगांत तारेचें चिलखत, कंबरेस जंबिया, काखेंत तरवार असा त्यांचा थाट होता. जवळ कांहीं द्रव्य ठेवलें नव्हतें; फक्त रुप्याचा जांब म्हणजे पेला काय तो पदरांत गुंडाळून घेतला होता. पाठीशीं बारा वर्षे वयाचा दत्तक मुलगा रेशीमकांठी धोतरानें बांधलेला; अशी बाईची स्वतःपुरती व्यवस्था होती. बरोबर शेंकडों विलायती लढवय्ये, मोरोपंत तांब्यासारखी आप्त मंडळी, जुने जीवास जीव देणारे सरदार वगैरे लोक नेले, त्यांना खर्चासाठीं मोहरा पुतळ्या दिल्या होत्या. खजीना खलित्यांत भरून हत्तीवर ठेवला होता. ही सर्व मंडळी भर शहरांतून उत्तर दरवाजांतून बाहेर पडली. बाहेर त्या मंडळींची पांगापांग झाली. बाईसाहेबांनीं इंग्रजांचा वेढा फोडून तडक काल्पीची वाट धरली. उजाडतां उजाडतां त्या झांशी मुलखाच्या हद्दीवरील एका गांवांत पोंचल्या. तेथें महालकऱ्याकडे उतरून मुलाला फराळ घातला व आपण कांहीं एक आहार न घेतां मुलांसह पुढें निघाल्या. दिवसभर भरधांव घोडा टाकीत रात्रीं बारा घटकांचे सुमारास त्या काल्पीस पोंचल्या. तेथें तात्या टोपे, रावसाहेब यांनीं तंबू, कमानी, बिछाईत, स्वयंपाकाचीं व चांदीचीं भांडीं, आचारी, पाणक्या, शिबंदीचे शिपाई वगैरे व्यवस्था लावून दिली.

### वेढ्यांतून जाण्याचा खुलासा

लक्ष्मीबाई शत्रूच्या वेढ्यांतून कशा बाहेर पडल्या याबद्दलची गोडशांची माहिती मागें सादर केली. दुसऱ्या दिवशीं किल्ल्याचा जो दरवाजा इंग्रजाला मोकळा दिसला त्याच दरवाजानें बाईसाहेब गेल्या, हेंच खरें समजावें लागतें. हजार बाराशें लोकांच्या समुदायासह इंग्रजाच्या

वेढ्यांतून निघून जाणें सकृद्दर्शनींच अशक्य कोटींतलें ठरतें. शेपन्नासांच्या लहान लहान टोळ्यांनीं इंग्रजांच्या नाकेबंदींत ढिलाई उत्पन्न करून निसटण्याचा यत्न करणें व जे बचावून जातील त्यांनीं अगाऊ योजिलेल्या दूरच्या संकेतस्थानीं एकवटणें, ही युक्ति बाईसाहेबांनीं अंमलांत आणल्याची कल्पना विश्वसनीय पुराव्याच्या आटोक्यांतली आहे. इंग्रजांच्या नाकेदार सैनिकांनीं त्या रात्रीं पुष्कळ झांशीवाले मारले व त्यांतल्याच एका पकडलेल्या जखमी मराठ्याच्या बोलण्यावरून बाईसाहेबांनीं किल्ला सोडल्याचें वृत्त इंग्रज सेनाधिकाऱ्यांना कळलें; अशी माहिती तेव्हांच्या अधिकृत इंग्रजी बातमीपत्रांतून सांपडते. बाईच्या पाठलागांत इंग्रजांना त्या दिसल्या तेव्हां बाईच्या बरोबर लढवय्यांचा समुदाय नव्हता; थोडे लोक होते व त्यांच्या प्रतिकारामुळें पाठलागाचा पुढारी इंग्रज घायाळ झाला व पाठलाग थांबला; पाठलागांत एका जागीं जेवणाचें नुकतेंच शिजविलेलें साहित्य इंग्रजांना आढळलें, त्यावरून बाई अन्न सेवन केल्याशिवाय पुढें निघाल्या ही गोडशांची माहिती खरी असल्याबद्दल शंका राहात नाहीं. ह्यू रोजच्या चरित्रलेखकानें बाई किल्ल्याबाहेर कशा पडल्या याबद्दल थोडा वेगळा मजकूर दिला आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेल्या बुरुजाच्या खिंडारांतून खंदकाशीं उभा केलेल्या घोड्यावर त्या मुलासह बसल्या, असें तो चरित्रलेखक म्हणतो. बाईसाहेब जात असल्याचें कळलें असतांहि कांहीं नाक्याच्या हिंदी सैनिकांनीं त्याची रसद अडविली नाहीं, असा फितुरीचा म्हणजे बाईसंबंधींच्या सहानुभूतीचा आरोप एका इंग्रज लेखकानें हिंदी सैनिकांवर लादला आहे.

**मोरोपंत तांबे**

याप्रमाणें बाईसाहेब मृत्युमुखांतून सुटल्या, परंतु ज्या लोकांचें राज्यकारस्थानांत विशेष अंग होतें, त्या लोकांवरचें अरिष्ट संपलें नाहीं. जे जे सरदार या बंडांत होते ते सांपडले असतां शहरांत वाड्यापुढें फांशी देत असत. बाईचा बाप मोरोपंत तांबे ह्यास त्या रात्रीच्या प्रसंगांत पळतां पळतां तरवारीचा वार मांडीस लागला, तरी तसाच घोडा पळवीत पळवीत उजाडतां दतिया शहरानजीक गेला. तों शहर शत्रूचें आहे असें दिसलें. परंतु निरुपायास्तव तो शहराच्या दरवाजाजवळ गेला. तेथें एका तांबोळ्यास शरण जाऊन त्यास कांहीं मोहोरा देऊन वश केला. तांबोळ्यानें मोरोपंतास घरीं नेलें व नंतर तेथील राजाच्या स्वाधीन केल्यावर इंग्रजांनीं

राजाकडून त्यास आपल्या ताब्यांत घेतलें आणि झांशींत आणून वाड्यापुढें फांशीं दिलें. किल्ल्याखालीं काळा जनरेली झेंडा लावला. शहरांतहि शोध करून गुन्हेगार पकडून लगलींच फांशीं देत होते. कै. गोडसे झांशींतून काल्पीस जात असतांना त्यांना एका जागीं शेंकडों स्वार उधळत जातांना दिसले. चरखारीच्या लढाईंत पेशव्यांचा मोड झाल्याचा तो परिणाम होता. त्या स्वारांत गोडशांना एका विहिरीकांठीं उभ्या असलेल्या लक्ष्मीबाई ओळखतां आल्या. त्यांचा पठाणी पोषाख होता; सर्व अंग धुळीनें भरलें होतें. तोंड किंचित् आरक्त व म्लान दिसत होतें. बाईसाहेबांना फार तहान लागली होती. बाईनीं स्वतःच विहिरींतून पाणी काढून मातीच्या भांड्यानें त्याचें सेवन केलें. गोडशांना काल्पीस पाचारण करून त्या चालत्या झाल्या. गोडसे व लक्ष्मीबाई यांचा संबंध काल्पी येथें कायमचा तुटला. पाणी प्याल्यावर बाईनीं गोडशांना जें सांगितलें तें येथें उतरून ठेवण्याजोगें आहे—'मी अर्धा शेर तांदुळाची धनीन, मजला रांडमुडेस विधवा धर्म सोडून हा उद्योग करण्याची कांहीं जरूर नव्हती. परंतु हिंदु धर्माचा अभिमान धरून या कर्मास प्रवृत्त झालें, व याजकरितां वित्ताची, जीविताची सर्व आशा सोडली. आमच्या पदरीं पातकच फार म्हणून आम्हांस ईश्वर यश देत नाहीं. (पान ९४-९५).

### झांशीचा विध्वंस

कोणतेंहि मोठें शहर जिंकलें कीं तें लुटायचें, त्यांतील बळकट जागा पाडून धुळीस मिळवायच्या ही इंग्रजी युद्धनीति झांशीच्या वांट्यास येणें क्रमप्राप्तच होतें. प्रत्यक्ष लढाई चालू असतांना झांशींतील रहिवाशांच्या प्राणांची आणि मालमत्तेची भयंकर हानि चालू होतीच; पण ती लढाईनंतर कत्तलीच्या व लुटीच्या रूपानें आणखी कांहीं दिवस झांशीकरांना भोगावी लागली. इंग्रज सेनापतीनें लुटीच्या कारभाराला सक्त मनाई केली होती; या मनाईचा अर्थ व्यक्तिशः सैनिकानें लुटीचा माल आपल्यापाशीं ठेवूं नये, तो बक्षीसखात्याच्या (Prize Agents) हवालीं करावा, एवढाच समजावयाचा. या अर्थानुसार सैनिकांना लुटीचा परवाना होता, याबद्दल शंका राहात नाहीं. गोरे सोजीर घराघरांतून शिरून माणसांची कत्तल कशी करीत याची हकीकत गोडसे यांच्या पुस्तकांत सविस्तर पाहायला सांपडते. अन्नपाण्यावांचून लोकांचे कसे हाल झाले, घरांच्या अंगणांतच प्रेतें कशी जाळावीं लागलीं, गोऱ्यांच्या

भयानें कित्येकांनीं गवताच्या गंजी पेटवून किंवा विहिरींत उड्या मारून कशी आत्महत्या केली, कित्येकांनीं स्वतः सोजरांच्या गोळीबारानें मरण्यापूर्वीं आपल्या बायकांना कसें मारलें वगैरे कथाभाग गोडशांच्या प्रवासवृत्तांत आलेला आहे. इंग्रजांनीं चालविलेल्या नरमेधाला त्यांच्या अधिकृत व अनधिकृत ( लेखकांच्या खाजगी आठवणी ) पत्रें पुस्तकांतून हवा तेवढा आधार आहे. घरें, देवळें, बागा, विहिरी यांपैकीं असें एकहि ठिकाण नव्हतें कीं, जेथें प्रेतें पडलेलीं नव्हतीं.

इंग्रजांच्या शिपायांनीं लोकांचीं राहतीं घरें जर लुटलीं तर झांशीवाल्या राजकुळाच्या स्थावर-जंगमावर त्यांनीं कसा हात टाकला असेल याची कल्पना येईल. सोनें, रुपें, पितळ, तांबें वगैरे जिन्नस वाड्यांतून, फरासखान्यांतून जाजमे, लोड, तक्के, तंबू, पाले वगैरे वस्तु, त्याचप्रमाणें नगारे फोडून त्यांची तांब्यांचीं भांडीं असे नाना पदार्थ इंग्रजांनीं आपल्या गोटांत नेले. देवळें लुटून देवांचे वस्त्रालंकार लांबविले. ग्रंथसंग्रहाचीं वेष्टनें, फळ्या घेऊन पोथ्या-पुस्तकें रस्त्यावर फेकून दिलीं. एका इंग्रजानें लुटीच्या एका प्रकाराला लूट समजणें चुकीचें असें समर्थन करून गणपतीच्या आणि विष्णूच्या मूर्तींची चोरी नीतीच्या सदरांत टाकली आहे. ‘ लुटलेल्या मूर्ति असंख्य व सर्व धातूंच्या होत्या. त्यावर सोन्या-चांदीचे दागिने होते. त्यांची कारागिरी प्रशंसनीय होती.’ मूर्तिपूजा खिस्ती धर्माला अमान्य म्हणून मूर्तींची चोरी हें पातक नसून पुण्यकर्म आहे, असा या इंग्रजांचा समज असावा. हा इंग्रज राजवाड्यांतील रेशमी, मखमली, भरजरी बिछाइतींच्या व निरनिराळ्या पोषाखांच्या यादीबरोबर शुद्ध चांदीचा पलंग तेथें असल्याचें नमूद करतो. वाड्यांत जिकडे तिकडे तांब्यापितळेचीं भांडीं पसरलेलीं होतीं, त्यांतलीं कित्येक आकारानें एवढी प्रचंड होतीं कीं, सदर इंग्रजाला तीं कसल्या कामासाठीं हेंच कळेना. चांदी-सोन्याच्या भांड्याकुंड्याप्रमाणें, सोन्याचे रत्नजडित अलंकार, रुपयामोहरांच्या थैल्या अशा तऱ्हेचें अगणित द्रव्य इंग्रजांच्या हातीं लागलें. इंग्रजांनीं लुटीच्या रोखठोक व्यवहाराला जी एक पुरवणी जोडली होती ती त्यांच्या शास्त्रीय प्रगतीला शोभणारी होती. ज्यांची लूट त्यांनाच लुटींत गेलेल्या जिनसा विकत घ्यायला लावायचें, या पद्धतीलाच येथें पुरवणी म्हटलें आहे. लुटीच्या सपाट्यांतून बचावलेलें द्रव्य वेंचून गरजवंतांनीं अवश्य त्या जिनसा धान्य-भांडीं वगैरे लिलावांत खरेदी केल्या असें

गोडशांनीं लिहिलें आहे.' याप्रमाणें नवव्या दिवसापासून सर्व लोक निर्द्रव्य होऊन गतकर्माबद्दल प्रायश्चित्त घेऊन नवीन संसार पुनः मांडण्याच्या उद्योगास लागले (पान ९१). लुटलेल्या मौल्यवान् वस्तूंचा लिलाव शहराबाहेर सुरू होता. हत्ती, घोडे, उंट वगैरे लढाईच्या उपयोगाचा सरंजाम व गुणी कारागिरानें केलेला झांशीवाल्यांचा एक वडिलोपार्जित अतिउत्तम पितळी पाळणा शिंदेसरकारनें विकत घेतला. दुसऱ्या राजेरजवाड्यांनीं इतर मोठें बहुमोल सामान खरेदी केलें.

–४–

## काल्पीची मोहीम

झांशी बुडवून त्या शहराचा बंदोबस्त केल्यावर ता. २२ एप्रिल रोजीं इंग्रज सेनापतीनें काल्पीकडे थोडीशी फौज पाठविली. काल्पीचें ठिकाण शिपायांच्या हातीं असेपर्यंत देशाचे पूर्वपश्चिम भाग एकमेकांपासून तुटलेले वाटावे, असें त्याचें माहात्म्य होतें. ता. २५ रोजीं त्यानें झांशी सोडली. ता. ५ मेला कूंच नांवाच्या एका शहरापासून दीड मैलावर तो पोंचला. वाटेंत शिपायांनीं विशेष अडथळा आणला नाहीं; परंतु उन्हाळ्यानें त्याचे शेंकडों गोरे काळे सैनिक निरुपयोगी करून सोडले. जनावरांवरदेखील तसाच परिणाम घडला. मेलेलीं जनावरें कुजण्याऐवजीं वाळत होतीं, अशी माहिती तत्कालीन अनुभविकांनीं लिहिलेली आहे. थंड हवेंतले गोरे सैनिक सूर्यतापानें पटापट मरत. वाटेंत झाड नाहीं, नदीनाले कोरडे झालेले, विहिरींचें पाणी अतिशय खोल गेलेलें, शिवाय तें पाणी मचूळ व मातट, यांत पुनः केव्हां केव्हां गरम वाऱ्याची भर, अशा स्थितींत इंग्रजी सैन्याची विशेषतः गोऱ्यांची दुर्दशा उडावी, यांत आश्चर्य नाहीं. तरी त्यांच्या मजलेला खंड पडला नाहीं. मजल संपली कीं लढाई जुंपावी; लढाई जिंकल्यावर जो थोडा विसावा मिळेल तेवढा भोगून पुनः पुढची मजल आटपावी; याप्रमाणें ग्वाल्हेर पडेपर्यंत ह्यू रोजच्या सैनिकांची कामगिरी चालली होती. त्यांचें उन्हाळ्यासंबंधांतलें वर्म ओळखून शिपायांच्या नेत्यांनीं आपल्या लढवय्यांना दिलेला एक हुकूम असा होता कीं, सकाळचे १० वाजेपर्यंत इंग्रजांशीं लढायचें नाहीं. हा हुकूम कूंच जिंकल्यावर इंग्रजांच्या हातीं लागला होता.

शिपायांची बहादरी

कूंचची लढाई एका दिवसांत निकालांत निघाली. ह्यू रोजनें त्या ठाण्याच्या आसपासचीं खेडीं दाबून प्रथम बागा, देवळें वगैरे जागांतून शिपाई बाहेर काढले. कूंच येथील तळावर शिपाई मारूं किंवा मरूं असल्या निर्वाणीच्या ईर्ष्येनें लढले नाहींत. तळ सोडून माघार घेतांना मात्र इंग्रजांच्या पाठलागाला त्यांनीं ठिकठिकाणीं जी टक्कर दिली, तिची वाहवा अनेक जणांनीं गाइली आहे. बुरुजाप्रमाणें पन्नास शंभर शिपायांनीं गोल बांधून उभें राहायचें व अंगावर धावणाऱ्या सैनिकांशीं झुंजायचें, अशी त्यांची तऱ्हा होती. शत्रु फारच अंगचटीस आला तर बंदुका टाकून तलवारी चालवायच्या ही त्यांची आणखी एक रीत होती. शिपायांनीं तरवार काढली कीं, प्रसंग कठिण; त्यांच्या तलवारीची धार अतिशय तिखट, तिचा वार फार घातकी, सफाईचा, अशी शिपायांच्या तलवारबहाद्दुरीची तारीफ बऱ्याच इंग्रजांनीं आपल्या लेखनांत उच्चारली आहे. कूंचला पाठलागाच्या वेळीं आपल्या शौर्याचे व शस्त्रनैपुण्याचे गुण शिपायांनीं प्रगट केले. त्यांचा पाठलाग आठ मैलांपर्यंत चालला होता. लढाईच्या जागेची जूट मोडून मैदानांत विखुरलेल्या शिपायांचा पराक्रम बचावाला विशेष उपयोगीं पडला नाहीं. त्यांना काल्पीस किंवा फुटल्या वाटेनें धावण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. कूंचला तात्या टोप्यांबरोबर राणी लक्ष्मीबाई होत्या अशी एका इंग्रजी अंमलदाराची बातमी होती. कूंचला शिपायांनीं जें शौर्य गाजविलें, त्याविषयीं तात्यांनीं त्यांना शाबासकी देऊन बजावलें कीं, असेंच चार दोन वेळा लढल्यास इंग्रजांचा फडशा उडेल. तात्यांच्या कारभाराचें नोंदणीपत्रक कूंच येथें सांपडलें, त्यांत हें शिपायांच्या शाबासकीचें कलम होतें, अशी एका इंग्रजाची ग्वाही आहे.

कूंच ते काल्पी ही मजल संपवायला पुढें १२–१३ दिवस लागले. तेवढ्यांत उन्हाळा अधिक भडकून इंग्रजांचे हाल वाढले. वाटेंत झटापटी चकमकींना उसंत नव्हती. एका ठिकाणीं धुळीच्या वादळानें इंग्रजांच्या सैन्याला जीव नकोसा करून सोडला. वादळामागून पाऊस पडला. उष्णतामान खालावलें. पावसाचा आनंद सैनिकांनीं भोगला, पण पुढें पाऊल टाकण्याच्या वेळीं दिसून आलें कीं वादळानें बरेच तंबू फाटले तर पावसानें भिजून उरलेल्या डेरे, राहुट्या जड बनल्या आहेत, या सर्व अडचणींवर मात साधून हा दळभार ता. १९ रोजीं काल्पीजवळ पोंचला.

काल्पी यमुनेच्या कांठावर असून नदीपलीकडे थोडीशी इंग्रजी फौज तळ देऊन बसली होती. तिचें साह्य संपादावें ही इच्छा ह्यू रोजनें ता. २० ला शेवटास नेली. ह्यू रोजनें आपल्याबरोबर शेंकडों मैल पुलासाठीं नावा वाहून आणल्या होत्या. त्या आतां कारणीं लागल्या. नावांच्या साह्यानें तो पलीकडे गेला व तिकडून काल्पीची पाहणी करून काल्पीवर त्या बाजूनें कसा व कोठून तोफांचा मारा करायचा, याविषयीं तिकडील सेनाधिकाऱ्यांशीं निश्चित बोलणें केलें. त्याच्यापासून दारूगोळ्याची व सैनिकांची मदत घेतली. याप्रमाणें तयारी करतांना त्यानें काल्पीच्या आसपासचीं लढाईच्या सोयीचीं गांवखेडीं आक्रमून टाकलीं होतीं. काल्पीचे लढवय्ये सावधपणानें ह्यू रोजच्या सैनिकांना हैराण करीत होते. अखेरीस काल्पीस ता. २३ मे या दिवशीं सकाळीं अटीतटीच्या लढाईला तोंड लागलें.

**काल्पीचे शिपाई व पुढारी**

काल्पीस तात्या टोपे, रावसाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई व बांद्याचा नवाब यांच्या हाताखालीं रणविद्येंत अतिशय निपुण या कीर्तीचे सैनिक होते. लक्ष्मीबाईचे निवडक विलायती, कोट्याची शिबंदी, ग्वाल्हेरचें नामांकित लष्कर आणि नवाबाचे लोक, शिवाय बंगाली फौजेच्या उठावाचे शिपाई यांनीं काल्पी गजबजलें होतें. बांद्याचा नवाब एप्रिलच्या मध्यास बांद्यासच होता. त्याला इंग्रजांनीं बांद्याहून हुसकावल्यावर तो काल्पीस आला. बांद्यास लढाई चांगली झडली. शेवटीं शहर, वाडा, दारूगोळा, जडजवाहीर या सर्वांचा लोभ सोडून नवाबानें बांद्याचा निरोप घेतला. बांदा काबीज होतांच तेथें गेलेल्या इंग्रज सेनापतीनें ह्यू रोजच्या मदतीस जावें, असा हुकूम असून देखील या सुस्त इसमानें बांद्यासच मुक्काम ठेवला. तो नव्या कुमकेची वाट पाहात होता. ती मिळाल्यावर तो ता. २७ मेला काल्पीस जावयाचा; पण काल्पी त्या तारखेपूर्वींच जिंकून ह्यू रोज मोकळा झाला. ह्यू रोजला बांद्याचें साह्य न लाभलें तरी तें 'पेशवा फौजे'ला मिळालें. चोहोंकडून फौज आल्यानें काल्पीच्या पुढाऱ्यांमध्यें युद्धाचा उत्साह सडकून उचंबळत होता. त्यांनीं काल्पीच्या अंतिम युद्धापूर्वीं इंग्रजांना चिंता वाटावी अशी एका खेड्यालगत मातबर लढाई केली, त्याशिवाय १६—१७ मे या दोन दिवसांत ह्यांनीं केलेल्या लढायांची नोंद इंग्रजी युद्धकथांतून दृष्टीस पडते. एकदां रसदेच्या वाहतुकीवर जोराचा छापा घालून थोडा वेळ

शिपायांनीं पिछाडीच्या इंग्रजांची दाणादाण उडविली. इंग्रजांच्या चढाईशीं झुंजण्याऐवजीं इंग्रजांवर चढाई करून जायचें, असें या वेळीं शिपायांचें धोरण उघडकीस आलें. याचें कारण काल्पी या ठिकाणाच्या लष्करी महत्त्वाशिवाय दुसरें नाहीं. काल्पीची लढाई गमावणें म्हणजे पश्चिमेकडील प्रदेशांत आपल्याला विश्वासाचें आश्रयस्थान उरणार नाहीं, याची पूर्ण जाणीव शिपाई-गर्दीच्या नेत्यांना होती. काल्पीस युद्धसामग्रीची सर्वांगीण विपुलता होती. शिवाय आसपासची भूमि खळगे, उंचवटे, ओहोळ-वहाळांच्या दरडी, यांच्यामुळें सहजतेनें सरळ तुडवितां येण्यासारखी नव्हती. फौजेच्या भरण्याची कदाचित् तेथील नेत्यांना काळजी असेल तर तिचेंहि बांद्याच्या नबाबानें निवारण केलें. शूर वीरांनीं झटून लढावें अशी इच्छा असेल तर नेत्यांचें उदार दातृत्व उपयोगीं पडतें. ह्यू रोजनें आपल्या युद्धपत्रकांत म्हटलें आहे कीं राणी जशी दुर्धर शौर्याची व दुर्दम्य धैर्याची तशीच निस्सीम औदार्याची मूर्ति असल्यानें काल्पीच्या प्रतिपक्ष्यांत तिचेंच भय अधिक होतें. राणी या नात्यानें सैनिकांत तिची प्रतिष्ठा सर्वांहून जास्त होती.

**शिपायांचा कुशल पराक्रम**

ता. २३ ला इंग्रजांची चढाई होणार, याची वार्ता काल्पीकरांना असल्यामुळें लढाईच्या आखाड्यांत ते आधीं उतरले. ह्यू रोजनें आपल्या फौजेची मांडणी केली. उभयपक्षीं डावपेंच सुरू झाले. इंग्रजांची उजवी बाजू कमकुवत होती ती जास्त दुबळी व्हावी अशा हेतूनें काल्पीकरांनीं त्यांच्या डाव्या आणि मधल्या भागावर जोराचा हल्ला चालविला. या हल्ल्याच्या प्रतिकारासाठीं उजवीकडील तुकड्या हालतील व नंतर ती बाजू झोडपतां येईल, हा काल्पीवाल्यांचा होरा चुकला तरी त्यांचें संख्याबळ अधिक होतें म्हणून त्यांनीं स्वतंत्र हल्ला चढवून ती बाजू मोडून टाकण्याचा डाव जवळ जवळ यशस्वी केला. त्या बाजूकडील इंग्रजांच्या तोफा बंद पडल्या. शिपाई तोफांपासून अवघ्या २० यार्डांवर आले होते. तेव्हां इंग्रज सेनापति घोड्याखालीं उतरून गोलंदाजांना तोफाखातर लढून मरण्याचा उपदेश करूं लागला. आणखी पंधरावीस मिनिटें मदतीखेरीज लोटतीं तर त्यांची कत्तल उडाली असती. उजव्या बाजूची ही केविलवाणी अवस्था लक्षांत येतांच तिच्या मदतीला ह्यू रोजनें सांडणीस्वार पाठविले आणि ती बाजू सावरली. हे उंटावरचे सैनिक तेथें येऊन पाहतात तों युद्धाच्या आवेशानें धुंद झालेले (इंग्रजांच्या

मतें गांजा, भांग, अफूची निशा चढलेले ) शिपाई जयघोष करीत उजव्या बाजूला उधळून लावण्याच्या तयारींत असल्याचें त्यांना दिसलें. तेव्हां ही नवी तुकडी त्या शिपायांवर अशा धडाधडीनें संगिनी रोखून धावली कीं, शिपायांना शत्रूवरील लक्ष सोडून आपल्या धडगतीचा विचार करण्याची पाळी आली. डाव्या बाजूला याप्रमाणें सवड मिळतांच तिच्या तोफा वाजूं लागल्या. शिपायांनीं मग रणांगण सोडण्याला उशीर लावला नाहीं. लढाईच्या आरंभीं आणखी एक गोष्ट ह्यू रोजच्या नजरेनें ताडून ठेवली होती. आपल्या समोरील नदीनाल्याच्या दरडी व खांचखळगे अगदीं शून्यवत् व स्तब्ध कां, याची मनाशीं छाननी करून या शांततेंत कांहीं डाव दडलेला असला पाहिजे असें त्यानें हेरलें व त्या जागांची टेहळणी करण्याला एक तुकडी रवाना केली. त्या तुकडीला तेथें शिपाई दबा धरून बसलेले आहेत असें आढळलें. टेहळणी-वाल्यांच्या गोळीबारानें तो खांचखळग्यांचा प्रदेश क्षणार्धांत सजीव झाला. ही अनपेक्षित धाड अकस्मात् अंगावर येऊन पडल्यामुळें दरडी खांचांतल्या शिपायांच्या शौर्याचें सार्थक होण्याचा योगच उद्भवला नाहीं. डाव्या बाजूकडे वाढून गेलेल्या शिपायांसारखीच यांचीहि गत झाली. एकमेकांचे डावपेंच समजावे या दृष्टीनें हीं दोन उदाहरणें सविस्तर सांगितलीं यावरून बाकीचें रणक्षेत्र निष्क्रिय होतें अशी कल्पना करून घेण्याचें कारण नाहीं. सगळें रणक्षेत्र धडाडलेलें होतें व दोन्हींकडील सैनिक जीवाची आशा सोडून एकमेकांशीं चढाओढीनें लढत होते. शेवटीं शिपायांचें शौर्य इंग्रजांच्या युद्धकौशल्यापुढें फिकें पडून इंग्रजांची सर्वत्र सरशी होत चालली. कित्येक इंग्रजी तुकड्यांनीं शिपायांच्या जमावाला रेटीत यमुनेमध्यें लोटलें. यमुनेच्या पलीकडून इंग्रजी तोफांचे गोळे काल्पीवर कोसळत होतेच. एकदां काल्पीचे शिपाई व इंग्रजांकडील मुंबईची हिंदी पलटण यांचा सामना झाला. काल्पीवाल्यांनीं गोळीबाराबरोबर समोरच्या जातभाईंवर शिव्याशापांची सरबत्ती चालविली. त्या पलटणीनें शिव्या-शापांचा चटका बसून इंग्रजांना सोडावें, याकरितां ती सरबत्ती होती. या सरबत्तीला मुंबईच्या पलटणीनें कडोविकडीच्या गोळीबाराचें उत्तर दिलें. ही पलटण पराक्रमाकरितां वारंवार इंग्रजी युद्धपत्रकांतून वाखाणलेली दृष्टीस पडते. या प्रसंगीं तिनें आपल्या शौर्याच्या इंग्रजी पसंतीला धक्का लागूं दिला नाहीं. याप्रमाणें लढतां लढतां दिवसमान सरलें, सूर्य मावळला, रणांगणावर दोन्ही पक्षांच्या हालचाली मंदावल्या. इंग्रजांवर विजयश्रीनें कृपा दाखविली, पण

काल्पी अद्यापि कबजांत यावयाची होती. पुढचा दिवस उजाडतांच काल्पीला धडक मारायची असा इंग्रज सेनापतीचा बेत होता. पण इंग्रजाशीं लढायला काल्पींत शिपाईच राहिला नव्हता. शिपायांनीं रात्रींच काल्पीला रामराम ठोकला. काल्पींत शिपाई भेटणार नाहींत, भेटलेच तर फार थोडे भेटतील यांची अटकळ इंग्रजाला होती. बाहेरच्या लढाईतले शिपाई काल्पी सोडून अन्यत्र चालल्याचें इंग्रज प्रत्यक्ष पहात होते. आंत जे कोणी असतील त्यांनीं आपल्या बाहेर पडलेल्या व्यवसायबंधूंचा कित्ता गिरवला. काल्पीस इंग्रजाला सर्व प्रकारच्या युद्धसाहित्याची लूट अमाप मिळाली. जाणत्यांच्या मतें हें साहित्य तीन लाख रुपये किमतीचे होते. दुसऱ्या दिवसाच्या पाठलागांतहि तोफा, जनावरें यांची कमाई इंग्रजांनीं केली. शिपाई हरले, पळाले, पण लढतेवेळीं ते कसे लढले, हें ह्यू रोजच्या पुढील अभिप्रायावरून ध्यानांत येईल. तो म्हणतो– The enemy displayed tactics and energy of attack which I had not witnessed previously in them. पळणाऱ्या शिपायांबरोबर बायका होत्या. त्यापैकीं पुष्कळांनीं पाठलागाच्या सैनिकांवर गोळ्या झाडल्याची माहिती इंग्रजांच्या अनुभवकथांतून पाहायला सांपडते.

## बांदा-किरवीचा निःपात

काल्पीमागून ग्वालेरचें अद्भुत प्रकरण उद्भवून रजेवर जाऊं इच्छिणाऱ्या ह्यू रोजला ग्वालेर जिंकण्याची नवी कामगिरी शिरावर घ्यावी लागली. त्या प्रकरणाकडे नजर टाकण्यापूर्वीं बांदा काबीज करणाऱ्या व्हिटलॉक या सेनाग्रणीच्या उद्योगाची पाहणी करणें उचित वाटतें. व्हिटलॉक हा मद्रासी फौजेचा अधिकारी १८५७ च्या नोव्हेंबरांत नागपूर, सागर, नर्मदाप्रदेश येथील व्यवस्था लावण्याच्या कामावर नेमला गेला. याच्या जोडीला आणखी एक अधिकारी दिला होता. व्हिटलॉकची स्वारी मद्रासहून कामटीला (नागपूर जवळ) १० जानेवारी १८५८ रोजीं पोचली. २२ जानेवारीला तो नागपुराहून निघाला व ६ फेब्रुवारीला जबलपुरास पोचला. तेथून सागरकडे जातांना मार्गांत रेवा राज्यांतल्या इंग्रजविरोधी जमीनदारांना दडपण्याकरितां निघाला, पण त्याचें बरेंच काम रेव्यांतील इंग्रज वकिलानें आधीं उरकलेलें होतें. ता. २४ फेब्रुवारीला त्याची व ओर्च्छाच्या इंग्रजानिष्ठ राजाची भेट झाली.

व्हिटलॉक जेथें जाईल तेथें तेवढ्यापुरती शांतता नांदावी. तो हलला कीं मागें पुनः दंग्याच्या परिस्थितीनें उचल खावी, असा त्याच्या मोहिमेचा परिणाम असतांहि त्यानें तिकडे कधींहि लक्ष दिलें नाहीं. ५ मार्चला सागर, तेथून बुंदेली राजांच्या संरक्षणासाठीं पन्ना संस्थानांत मुक्काम, मग मंडला व छत्रपूर, महोबा, याप्रमाणें ९ एप्रिलपर्यंत प्रवास करीत शेवटीं तो बांद्यास गेला. या कालावधींत ह्यू रोजला मदत करण्याची संधि त्यानें बिनदिक्कत वायां दवडली. बांदा ताब्यांत घेतल्यावर तो काल्पीस जायचा होता. पण काल्पीच्या विजयाचा वांटा त्याच्या नशीबीं नसला तरी तो एकंदरींत भाग्यवान् होता, यांत संशय नाहीं. विशेष कर्तृत्वांवाचून द्रव्यलाभ हें त्याचें भाग्य बांदा व किरवी (चित्रकूट पेशवे) येथें त्यानें केलेल्या आक्रमणाच्या वेळीं उघड झालें. सरकारी कृपेनें बांद्याच्या लुटीचा तो जसा धनी झाला, तसाच धनीपणाचा हक्क किरवीच्या लुटीसंबंधांत त्याला सरकारनें बहाल केला.

चित्रकूटचे पेशवे हे रघुनाथराव ऊर्फ राघोबा यांचा दत्तक पुत्र अमृतरावाचे वंशज असून १८५७ मध्यें तेथील जहागिरीचा मालक माधवराव हा इंग्रजी माहितीप्रमाणें अवघ्या नऊ वर्षांचा होता. त्याचा नातेवाईक नारायणराव हा माधवरावाजवळ राहात होता, पण त्याला कोणताच अधिकार नव्हता, गोडशांनीं आपल्या प्रवासवृत्तांत या दोघांचा एकत्र उल्लेख केलेला आहे. इंग्रजी इतिहासांत यांना किरवीचे 'राव' असें म्हटलें असून वस्तुतः १८५७ च्या शिपाईगर्दीशीं यापैकीं कुणाचाहि संबंध नसतां केवळ बिठूरच्या पेशव्यांचे आप्त म्हणून इंग्रजांची त्यावर वक्रदृष्टि वळली. नारायणराव आणि माधवराव यांच्या मनांत इंग्रजांविषयीं द्रोहबुद्धि नव्हती, यामुळें इंग्रजांनीं 'चित्रकूटाखालचा २५ लक्षांचा मुलूख श्रीमंत नारायणराव पेशवे यांचे स्वाधीन' दप्तरासह केला आणि 'आपण जीवभयास्तव निघून गेले.' एवढा ज्यावर विश्वास त्यांना लुटून नागविण्याचा अत्याचार इंग्रजानें कां करावा, याचें उत्तर इंग्रजी इतिहासांत नसलें तरी गोडशांनीं तें दिलें आहे. किरवीच्या रावांचा कारभारी कोणी राधाकिसन नांवाचा परदेशी होता. त्यानें इंग्रजी सत्ता गेली आणि मोठा मुलूख अनायासें मिळाला, याचा फायदा घेऊन 'बिघडलेल्या पलटणीस आश्रय दिला व दारूगोळा, तोफा वगैरे सामानाचा कारखाना सुरू केला' अशी हकीकत गोडशांना तेथें गेल्यावर समजली होती. त्या प्रदेशांतील इतर जहागिरदार इंग्रजांवर उलटले होते. इंग्रजी

इतिहासकारांना राधाकिसनचें नांव ठाऊक नाहीं. इंग्रजी माहितीप्रमाणें रामचंद्रराव नांवाचा इंग्रजांच्या विश्वासाचा कारभारी शिपाईगर्दीच्या लाटेंत तेथील जनता सांपडली असतां आपलें काम योग्य प्रकारें बजावीत होता. तथापि या पेशवे घराण्याला चिरडायचें असें इंग्रजांनीं ठरविलें व बांदा जिंकल्यावर जूनच्या सुरुवातीस व्हिटलॉकची धाड किरवीकडे वळली. इंग्रजांचा द्रोह रावांच्या स्वप्नींहि नसल्यानें दोन्ही राव व्हिटलॉकच्या छावणींत त्याला भेटायला व स्वागत करायला गेले. या निष्कपट भलेपणाला जें फळ आलें, त्याचें समर्थन इंग्रज इतिहासकारांना करतां येत नाहीं.

'व्हिटलॉकशीं दोन हात करून मरण आल्यास पतकरावें, पण त्याच्या भेटीस जाऊं नये' असा परदेशी दिवाणजींनीं रावांना सल्ला दिला. तथापि राव ऐकत नाहींत असें दिसलें, तेव्हां राधाकिसन यानें रावांची संगत सोडण्याचा निश्चय अमलांत आणला व तसें करतांना रावांकडून दोन लाख रुपये सक्तीनें उकळले, असें गोडशांनीं लिहिलें आहे. व्हिटलॉकच्या छावणींत राव गेले तेव्हां त्यांना कित्येक तास उन्हांत उभे ठेवून शेवटीं इंग्रज सेनापतीनें 'तुम्ही कैदी आहां' असें सांगण्याचा शिष्टपणा निदर्शनास आणला. नंतर व्हिटलॉकनें शहराची जी लूट केली तिचें चित्र गोडशांच्या वर्णनांतून पाहण्याजोगें आहे—'चित्रकूट शहरांत पांच सहाशें गोरे व कांहीं काळे लोक येऊन श्रीमंतांचे वाड्यांत शिरले. समोर दिल्ली दरवाजावर नगारखाना होता त्यावर चढून नौबदी, नगारे, शिंगे वगैरे सर्व बाहेर रस्त्यांत धडाधड लोटून दिले. वाड्यांतील कामगार मनुष्यें कैद केलीं. गोरे लोकांनीं सर्व जिंदगी गाड्यांत भरून गोटांत नेण्याचें काम सुरू केलें. वाड्यापासून एक कोसपर्यंत सारख्या गाड्या वाहात होत्या. सोनें, रुपें, जडाव, हिरे, मोती, माणीक, मोहरा, पुतळ्या वगैरे सर्व घेऊन गेले. खजिन्यांत कांहीं ठेविलें नाहीं. कापडाचीं दिंडें, सुटें कापड, बिछाने, सतरंज्या, जाजमे, लोड, तक्के वगैरे सर्व फरासखाना लुटून नेला. त्यांत कांहीं ठेविलें नाहीं. दही, दूध, तूप, साखर, गूळ, तांदूळ, गहूं वगैरे सर्व कोठी लुटून घेऊन गेले. फार काय लिहूं! सुपें, टोपल्या, रोळ्या, चांगल्या लाकडी फळ्या, घोंगडी, कांबळें, चिंध्यासुद्धां वस्तु मात्र नेली. द्रोण, पत्रावळी देखील ठेवल्या नाहींत. नंतर नारायणरावांचे बायकोजवळ जाऊन अंगावरील दागिने मागितले. तिनें नथीखेरीज सर्व दागिने काढून दिले....नंतर शिपायांनीं

देवघरांत जाऊन देवांसहित सर्व उपकरणीं नेलीं. शिवाय पाट, चौक्या, चौरंग वगैरे जिंदगी गाड्यांत भरून तमाम गाड्या नेल्या. चित्रकूटवाल्यापाशीं अर्थ बहुत असून व्यवस्थित सर्व जिनसा होत्या. एकंदर सोनें, रुपें, जवाहीर मिळून चार कोटींची मुख्य दौलत होती. याखेरीज भांडीं वगैरे; यापैकीं कांहीं एक ठेवलें नाहीं.'

किरवीशीं विश्वासघात

इंग्रजी इतिहासांत व्हिटलॉकच्या या कृत्याचा निषेध सुचवितांना जो मजकूर आढळतो त्याची येथें इंग्रजांच्या विश्वासघाताचा मासला म्हणून वाच्यता करणें प्राप्त आहे. काशी क्षेत्रांत किरवीच्या पेशव्यांचीं देवस्थानें व अन्नछत्रें होतीं, त्यांच्या खर्चासाठीं शेंकडा ६ रुपये व्याजाच्या दरानें प्रथम दोन लाखांची रक्कम इंग्रजाकडे १८२७ सालीं अमृतरावानें ठेवली. १८३७ मध्यें व्याजाचा दर शेंकडा चार रुपये याप्रमाणें उतरविला, तेव्हां आणखी तीन लाखांची रक्कम इंग्रजाकडे जमा करण्यांत आली. काशींतील देवस्थानांचा खर्च बिनतक्रार सदैव चालावा असाहि नवी रक्कम इंग्रजांच्या हवालीं करण्याचा हेतू होता. कित्येक वर्षे व्याज देण्याचा क्रम चालून पुढें व्याज बंद झालें. या प्रकाराचीं कारणें कंपनी सरकारनें कधीं सांगितलीं नाहींत. व्याज नाहीं त्या अर्थीं मूळची पांच लाखांची रक्कमसुद्धां इंग्रजानें गडप केली, असा तर्क योग्य म्हणतां येईल. १८५७ मध्यें माधवरावाचें वय लहान म्हणून त्याच्या जिंदगीची व्यवस्था इंग्रजांच्या हातीं होती. १८५७ सालीं माणसांच्या नेमणुका व खर्चाची मंजुरी वगैरे गोष्टी इंग्रजांच्या नियंत्रणानें घडत होत्या. इंग्रजांच्या विश्वासाचा कारभारी रामचंद्रराव हा आपलें काम अतिशय आस्थेनें पार पाडीत होता. इतकें असूनहि किरवीच्या पेशव्यांवर इंग्रजांनीं दरोडा कां घालावा? आपल्या सैनिकांची धन करण्यासाठीं व्हिटलॉकनें किरवीचा वाडा लुटला, असा खुलासा इंग्रजी इतिहासांत सांपडतो. या लुटीवर हक्क कोणाचा, असा वाद उपस्थित होऊन इंग्लंडच्या आरमारी कोर्टानें त्याचा निकाल व्हिटलॉकच्या बाजूनें दिला. इकडे उदार इंग्रजानें माधवरावाला सालिना तीस हजार रुपयाच्या नेमणुकीचा मोबदला जणूं काय लुटीची फेड म्हणून चालू केला. बांदा, बिठूर, झांशी, किरवी या शहरांशीं पेशवाई परंपरेचा संबंध पोंचतो, या दृष्टीनें शिपाईगर्दीचें आयतें निमित्त साधून त्यांना नामशेष करून सोडण्याचा इंग्रजी संकेत संभाव्यतेच्या कक्षेंतला आहे.

— ५ —

## शिपायांनीं ग्वालेर घेतलें

कालपीचा पाडाव झाल्यावर आपल्या हाताखालचें लष्कर विभागून वेगवेगळ्या ठिकाणीं पाठवायचें व आपण रजा भोगावयाची अशा तजविजी ह्यू रोज करूं लागला. कालपी सोडून सैरावैरा पळणाऱ्या शिपायांच्या हालचालीवर नजर ठेवणारे अधिकारी त्याला ८-१० दिवस असें कळवीत होते कीं, शिपायांच्या पळण्याची दिशा निश्चित नाहीं. त्यांवर विश्वसून ह्यू रोजनें निरोपादाखल गोऱ्या सैनिकांच्या शिस्तीची व मर्दुमकीची ज्यांत यथेच्छ प्रशंसा आहे असें एक पत्रक ता. १ जूनला प्रसिद्ध केलें. त्याच्या फौजेंतील जखमी व आजारी माणसें कानपुरास गेलीं. परंतु यानंतर दोन दिवस लोटले नाहींत तोंच शिपायासंबंधाच्या बातम्यांचा रंग पालटून ते ग्वालेरच्या रोखानें जात आहेत असें वर्तमान अधिकाधिक निश्चितपणाच्या सुरांत ह्यू रोजच्या कानावर येऊं लागलें. ता. ४ ला त्याबद्दल संदेह उरला नाहीं. ता. ५ ला शिपायांनीं ग्वालेर काबीज केल्याची खबर येऊन पोंचली. तेव्हां पहिले सारे हुकूम तावडतोब रद्द करून ह्यू रोजनें आपल्या जवळची फौज ग्वालेरला नेण्यासाठीं सज्ज केली. या वेळीं त्याला फक्त आपल्या फौजेवर विसंबून राहण्याची गरज नव्हती. राजस्थानाकरितां उभारलेलें इंग्रजी लष्कर ग्वालेरपासून थोड्या अंतरावर हजर होतें, आग्र्याला निराळी फौज होती; त्या सर्वांना ह्यू रोजनें ग्वालेरला जाण्याचे हुकूम सोडले. ह्यू रोज ता. ६ जूनला कालपीहून निघाला. ग्वालेरच्या वाटेवर त्यानें अगोदर पाठविलेल्या लष्करी तुकड्या त्याला येऊन मिळाल्या. ता. १६ रोजीं ही सारी फौज ग्वालेर शहराच्या हद्दीशीं जाऊन भिडली.

ग्वालेर जिंकण्याची धाडसी कल्पना कोणाची, याबद्दल इंग्रज लेखकांमध्यें एकवाक्यता नाहीं. कूंच येथें पराभव होतांच तात्या ग्वालेरला गेले व तेथें शिंदे महाराजांची फौज आपल्याकडे वळविण्याचें अतिशय नाजूक कारस्थान त्यांनीं पार पाडलें, असें एक मत आहे. कालपी पडल्याचें समजतांच तात्या अगदीं एकटेच ता. २६ मे रोजीं तिकडे गेले व त्यांनीं लक्ष्मीबाई, रावसाहेब व नबाब यांना गांठून ग्वालेरला जाण्याचा बेत नक्की केला. यावरून कालपीस तात्या नव्हते असें समजावें लागतें, व त्याला खुद्द

तात्यांचाच आधार आहे. पण काल्पीस लढणाऱ्या इंग्रजी गोटांत तात्या तेथें असल्याबद्दल खात्रीची भावना होती. तात्या ग्वालेरला जावोत किंवा काल्पीस असोत, काल्पीचे शिपाई ग्वालेरला जातांच शिंदेशाहीच्या हुजुरातींनें त्यांच्याशीं हातमिळवणी करावयाची, हें खलबत काल्पी सोडण्याच्या आधीं शिपायांचे पुढारी व ग्वालेरचे शिपाई यांच्या दरम्यान एकमेकांच्या दृढ विश्वासानें घाटत असलें पाहिजे असा निष्कर्ष स्वीकारावा लागतो. एरवीं काल्पीवाल्यांचें एकदम ग्वालेरवाल्यांनीं स्वागत कां करावें या घटनेचा उलगडा होत नाहीं. ह्यू रोजनें ग्वालेर जिंकण्याच्या कल्पनेचें श्रेय तात्यांच्या पदरांत टाकलें आहे.

## कांहीं नाट्यपूर्ण प्रसंग

ग्वालेरचा इंग्रज वकील मॅक्फर्सन यानें या प्रसंगाची जास्तींत जास्त माहिती जमवून जो सविस्तर वृत्तान्त आपल्या वरिष्ठांना सादर केला, त्यांतले कांहीं अंश अत्यंत नाटयपूर्ण आहेत. तात्या, रावसाहेब, लक्ष्मीबाई यांचीं खास माणसें मॅक्फर्सनला माहिती सांगायला मिळालीं होतीं. त्यांच्या ग्रथित वार्तालापावरून असें म्हणावें लागतें कीं, काल्पी सोडल्यावर गोपाळपुरास शिपायांचे पुढारी भावी कर्तव्याच्या विचारास बसले. लक्ष्मीबाईनीं झांशी टापूंतील कुरारा गांवीं जाण्याची कल्पना सुचविली, तर 'बुंदेलखंडांत राहायला हरकत काय?' असा प्रश्न तात्यांनीं विचारला. 'कांहीं झालें तरी बुंदेले हे परकेच, मराठे नव्हत. ते आपल्याशीं झगडतील व दाणागोटा आपल्याला मिळूं देणार नाहींत; त्यापेक्षां ग्वालेरला जावें. तेथील फौज आपलीशी करावी व सिप्रीवरून दक्षिणेंत जावें. तो मुलूख आपला असल्यानें तिकडचे सारे लोक आपल्या मदतीला धावून येतील. फौजफाटा नाहीं, म्हणून महाराज शिंदे व बायजाबाई (महाराजांच्या आजी) हीं आपल्याकडे येतील. मग हिंदुस्थानचे बाकीचे सारे राजेरजवाडे इंग्रजांविरुद्ध उठायला उशीर लागणार नाहीं' असें हृद्गत रावसाहेबांनीं व्यक्त केलें. शिपायांची प्रवृत्ति वरील योजनेला अनुकूल नव्हती. ते आपल्याकडे जाण्यासाठीं उत्सुक होते. शेवटीं ग्वालेरला जाण्याची कल्पना रावसाहेबांची असा या संवादाचा इत्यर्थ असला तरी रावसाहेबांचें जें चरित्र उपलब्ध आहे, त्यावरून योद्ध्याचे बरेच गुण त्यांच्या ठिकाणीं होते असें मानून देखील अचाट कल्पनेचा गुण त्यांच्या प्रकृतींत असल्याचें उदाहरण आढळत नाहीं. तात्यांच्या प्रकृतिगुणांत कल्पकतेला स्थान होतें, परंतु फांसावर जाण्यापूर्वींच्या त्यांच्या जबानींत ग्वालेरला

जाण्याच्या कल्पनेचा मोठेपणा ह्यांनीं आपल्याकडे घेतलेला नाहीं. तेव्हां प्रथम झांशीच्या परिचित प्रदेशांत राहण्याची मसलत लक्ष्मीबाईनीं काढली असली तरी ग्वालेरवर झडप टाकण्याच्या डावाची प्रेरणा त्यांची असें जें इंग्रजाचें म्हणणें आढळतें तें ग्राह्य समजणें उचित आहे. मॅलेसन हा इतिहासकार लक्ष्मीबाईचा निंदक असून सुद्धां त्यानें ग्वालेरवर चालून जाण्याचें श्रेय बाईच्या पदरांत टाकलें आहे. ग्वालेरसंबंधांत पराक्रम लक्ष्मीबाईचा व पेशवे या नात्यानें अधिकार रावसाहेबांचा अशी व्यवस्था कागदोपत्रांतून अनुभवास येते.

ता. २८ मे रोजीं काल्पीच्या शिपायांच्या टोळ्या ग्वालेरच्या हद्दींत शिरल्या. त्या वेळीं शिंदेशाहीच्या एका अंमलदारानें दिवाण व महाराज यांचें नांव घेऊन शिपायांना आपली हद्द सोडण्याबद्दल हुकुमी भाषेंत सांगितलें. 'तूं कोण आहेस रे? भांगेनें तारवटलेला दहा रुपयांच्या टिकल्यावर पोट भरणारा तूं यःकश्चित् अंमलदार! ज्यांच्या नांवाचा धाक तूं आम्हांला दाखवतोस त्यांची योग्यता तरी काय आहे? ते बाटगे (खिस्ती) आहेत. आम्ही रावसाहेब पेशवे आहों समजलास? शिंदे आमचे जोडे संभाळणारा हुजऱ्या (त्याची बढाई आमच्या समोर कशाला?) आम्ही त्याला राज्य दिलें. त्याची फौज आतां आमची झालेली आहे. बायजाबाईचीं आमच्याजवळ पत्रें आहेत. शिंदेसुद्धां आमच्या पाठीशीं आहेत. तात्यांनीं या साऱ्या गोष्टी ग्वालेरला जाऊन केव्हांच पक्क्या करून ठेवल्या आहेत. म्हणूनच तर आम्ही लष्करास आलों. तुझ्या मनांतून आमच्याशीं लढायचें असेल तर त्यांत अर्थ नाहीं. आजपासून हें सारें (राज्य) माझें आहे.' याप्रमाणें रावसाहेबांनीं त्या अंमलदाराची सक्त कानउघाडणी करून ग्वालेरची वाट धरली. सदर अंमलदाराजवळ थोडीशी फौज होती. पण ती निष्क्रिय राहिली. ३१ मे रोजीं ग्वालेरपासून अवघ्या ८ मैलांवर रावसाहेबांचा तळ पडला. त्या दिवशीं शिंदे महाराजांचा अतिशय प्रेमांतला एक इसम रावसाहेबांच्या तळावर गेला. रावसाहेबांसकट सर्व पुढाऱ्यांना भेटला. त्यांच्याशीं त्यानें चर्चा केली. त्या इसमाशीं बोलतांना रावसाहेबांनीं आपला पूर्वीचा डौल कायम ठेवला होता. "महाराज आमच्याशीं लढण्याचा विचार करतात म्हणजे काय समजायचें? आमचा लढण्याचा इरादा नाहीं. चार दिवस विश्रांति घ्यावी, द्रव्य आणि अवश्य तें सामानसुमान जमवून दक्षिणेंत जावें असा आमचा उद्देश आहे. तुमचे महाराज लढणार असतील तर त्यांच्यापाशीं कोणतें बळ

आहे ? त्यांचें सैन्य आमच्या बाजूचें आहे. लढण्याची वेळ येतांच काय चमत्कार होतो तो पाहाल. ग्वालेरचीं आमच्या विषयींच्या निष्ठेनें लिहिलेलीं २०० निमंत्रणें आहेत. महाराज व दिवाण करणार काय ?"

इकडे अशी भाषा सुरू असतां तिकडे पुढील कर्तव्याबद्दल दिवाण दिनकरराव राजवाडे आणि महाराज यांच्यांत वाद पडला होता. शिपायांना थोडेंसें द्रव्य चारून गोंजारीत इंग्रजी फौजा येईपर्यंत संभाळावें व याउपर लढाईची पाळी आल्यास मुरारच्या छावणींत अंगरक्षकांच्या व खास तैनातींतील ग्वालेरी सैनिकांच्या भरंवशानें लढाईच्या तयारीनें राहावें असा दिवाणाचा आग्रह होता. या आग्रहाची मात्रा चालू देऊं नये, असा शिंद्यांच्या लष्करी अधिकाऱ्यांचा सल्ला होता. तोफेचा एक गोळा सुटण्याचा अवकाश कीं पेशव्यांची फौज दाही दिशा उधळेल, असें लष्करी सरदार महाराजांना सांगत होते. आपल्या फौजेला तात्यांनीं फितविल्याचें ज्ञान महाराज व दिवाण यांना मुळींच नव्हतें. पेशव्यांना झटपट पिटाळण्याचा आविर्भाव नाटकी आहे, हें महाराजांना समजलेंच नाहीं. आपण ज्याला पेशव्यांच्या गोटांत पाठविलें तो आपला लाडका इसम या नाटकांतलेंच एक पात्र आहे, याचीहि महाराजांना कल्पना नव्हती. तो परत आल्यावर 'पेशव्यांना निरुत्साहानें पछाडलें असून त्यांच्या फौजेंत कसलेंच अवसान उरलेलें नाहीं. त्यांना झोडपायला ५०० नव्या भरतीचे कच्चे शिपाईदेखील पुरतील.' इत्यादि आशावादाची माहिती त्यानें महाराजांच्या मनांत ठसवून महाराजांची दिशाभूल केली. महाराजांनीं तत्काळ ८००० माणसांना २४ तोफांसह लढाईला सज्ज होण्याचा हुकूम (दिवाणास न कळूं देतां) फर्मावला. महाराजांची फौज खडी ठाकली, परंतु लढाई कोणी कोणाशीं करावयाची ? पेशव्याकडील एक शिपाई 'दीन दीन' अशी आरोळी ठोकीत शिंद्यांच्या बाजूकडे आला. त्या बाजूच्या शिंद्याकडील लोकांनीं त्या आरोळीचा आदर केला व ते निघून गेले. एका शिपायाचा जर असा प्रभाव तर पेशव्यांचें सारें दळ समोर दिसूं लागल्यावर शिंद्याच्या साऱ्या लोकांनीं त्यांच्याकडे धाव घ्यावी, त्यांना मिठ्या माराव्या हा परिणाम ठरलेलाच होता. परस्परांच्या अभिनंदनांत बहुतेक सर्व शिपाई गुंग असतां कित्येक जण मुरार नदीकांठच्या कलिंगडांचा आस्वाद घेण्यासाठीं निघून गेले. जी थोडीशी झटापट झाली ती महाराजांच्या अंगरक्षकांनीं केली. आतां महाराजांना पळून जाण्याखेरीज दुसरी

गतीच नव्हती. त्यांनीं फूलबागवाडा गांठला. तेथें त्यांनीं वेषांतर केलें व घोड्यावर बसून भरधांव आग्र्याचा रस्ता धरला. राणी वगैरे स्त्रियांनीं कुठें जावें याविषयीं जें सांगायचें तें सांगून कांहीं स्वारानिशीं दिवाण महाराजांच्या रस्त्यानें निघाला. त्याला महाराज ८ मैलांवर भेटले. तेथून आड वाटेनें हे दोघे मध्यरात्रीं धोलपुरास पोंचले. दुसऱ्या दिवशीं (ता. ३ जून रोजीं) सकाळीं महाराजांचें स्वागत आग्र्याच्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्यांच्या इभ्रतीला साजेसें केलें. राणीवशाची मंडळी तीस मैलांवरील नरवर गांवीं गेली. महाराज फूलबागेंत शिपायांनीं कोंडून धरले आहेत, अशी समजूत होऊन राजपत्नीची माता गुजाराजे ही एक बाई मात्र महाराजांची सुटका करण्यासाठीं हातीं तलवार घेऊन घोड्यावर बसून मदतीस माणसें बोलावून फूलबागेकडे मोठ्या आवेशानें निघाली. महाराज आग्र्याकडे गेले अशी खात्री झाल्यावर बाकीच्या स्त्रियांमागून तीन दिवसांनीं ही बाई नरवरास गेली. बायांच्या बरोबर जुन्या निष्ठेच्या शिपायांपैकीं पांचसहाशें लोक होते.

**रावसाहेबांचें संयमशील धोरण**

ग्वालेर ताब्यांत आल्यावर रावसाहेबांनीं जें धोरण अंमलांत आणलें तें वस्तुतः प्रशंसनीय असतां रावसाहेब ग्वालेरला अतिशय नादानपणानें वागले, या समजुतीचा अतोनात प्रचार झालेला आहे. रावसाहेबांच्या धोरणांतील व्यवहारचातुर्याचें कौतुक त्यांच्या शत्रूनें गाइलेलें असल्यामुळें त्याचें महत्त्व निराळें सांगायला नको. ग्वालेरांत प्रवेश करतांच नानासाहेबांच्या नांवानें रावसाहेबांनीं द्वाही पुकारली. रावसाहेबांनीं पेशवेपदाचा सर्व डामडौल झिडकारला. 'पुण्यास पेशव्यांची गादी स्थापन झाल्यावर ऐश्वर्य भोगतां येईल' असें ते सांगत असत. त्यांनीं शहराची नागवणूक होऊं दिली नाहीं. दिवाण व दोन लष्करी अधिकारी अशा तिघांचीं घरें जप्त करून तीं लुटायला परवानगी दिली. शिंद्याच्या लष्कराचा थकलेला तीन महिन्यांचा पगार देऊन बक्षिसादाखल वर दोन महिन्यांच्या पगाराची जादा रक्कम बहाल केली. त्यासाठीं नऊ लाख रुपये व आपल्या शिपायांच्या पगारासाठीं साडेसात लाख रुपये याप्रमाणें खर्च केला. लक्ष्मीबाई व नवाब यांना अनुक्रमें वीस व साठ हजार रुपये वांटले. स्वतः रावसाहेबांनीं पंधरा हजार सोन्याच्या मोहरा घेतल्या. कैदखान्यांतले राजबंदी सोडले. शिंद्यांचा राज्याधिकार कायम राहावा या दृष्टीनें पूर्वीच्या बहुतेक सर्व नोकरांना आपापल्या जागीं

कायम ठेवले. आपण शिंद्यांचे शत्रु नाहीं, असा लोकांचा विश्वास वाढण्याला उपयोगी पडण्यासारखा रावसाहेबांचा सारा कारभार होता. शिंद्यांनीं ग्वालेर सोडलें याचा त्यांना खेद वाटला; त्यास अनुसरून त्यांनीं बायजाबाईंना लिहून कळविलें कीं, तुम्ही येऊन आपलें राज्य संभाळावें. तुम्ही गेला हें चांगलें केलें नाहीं. ग्वालेर मीं घेतलें तें आपली भेट व्हावी म्हणून. भेटीनंतर ग्वालेरहून जावें हा आमचा खरा उद्देश होता. सारांश, तुम्हीं यावें हें उत्तम. पत्राचा अव्हेर करूं नये. बायजाबाईंनीं हें पत्र इंग्रज वकिलाच्या हवालीं केलें. रावसाहेबांच्या संयमशील वागणुकीमुळें ग्वालेर शहराच्या नागरिकांना लढाईच्या दुष्परिणामाची झळ मुळींच लागली नाहीं. ग्वालेरला रावसाहेबांना १४-१५ दिवसच स्वास्थ्य लाभलें. धावपळ, नाहीं तर लढाई हे प्रकार त्यांच्या वांटणीस ता. २ ते १६ जूनच्या पंध्रवड्यांत आले नाहींत, एवढाच या स्वास्थ्याचा अर्थ समजावा.

**ह्यू रोजची धडाडी**

ता. १६ जूनला ह्य रोज मुरारच्या छावणीपासून चार मैलांवर आला. फौज फार दमलेली म्हणून एक दिवस तिला विश्रांति घेऊं द्यावी, असें त्याच्या मनांत आरंभीं होतें, पण मुरारच्या इमारती व बागा शाबूत आहेत असें पाहिल्यावर त्याला तें ठिकाण मारण्याचा मोह आवरेना. विश्रांतीचा हुकूम रद्द करून ह्यू रोजनें लढाईचे नगारे वाजविले. त्याप्रमाणें लढाई सुरू झाली. पेशव्यांच्या बंदुका-तोफांचा भडिमार कांहीं वेळ शत्रूचें धाबें दणाणून सोडणारा होता. जागजागीं उभयपक्षीं भयंकर प्राणहानीच्या चकमकी उडत होत्या. तथापि रणदेवतेनें विजयाचा प्रसाद इंग्रजांच्या पदरांत टाकला. मुरारची छावणी पेशव्यांच्या सैनिकांनीं गमावली. रात्रीं तेथील इमारतींतून इंग्रजांचें कांहीं सैन्य विश्रांति घेण्यांत रमलें. मागल्या कित्येक महिन्यांत झाडें किंवा डेरे-राहुट्यांच्या सांवली खेरीज दुसरी छाया इंग्रजांना कुठेंच मिळाली नव्हती. मुरारच्या शिपायांनीं छावणी सोडतांना इमारती जाळल्या नाहींत व आतां त्या जाळण्याची सवड देऊं नये, म्हणून फौजेच्या थकव्याची फिकीर न बाळगतां ह्यू रोजनें मुरारवर जो तडकाफडकीचा हल्ला चढविला तो या इमारतींच्या लोभानें, हें पूर्वीं सुचविलें आहे. ह्यू रोजचा हा उद्देश तर सफळ झालाच पण त्याबरोबर आग्र्याच्या दळणवळणाला विघ्न उरलें नाहीं, हा मुरारच्या कबजानें ह्यू रोजला दुसरा महत्त्वाचा फायदा मिळाला.

ता. १७ जूनच्या लढाईनें ग्वालेरांतील पेशव्यांचें वर्चस्व उलथून पाडलें. लढाई आधींच्या दिवसासारखीच उभय पक्षांची कसोटी पाहणारी होती. त्या दिवशीं लढाईचा भार राजस्थानासाठीं उभारलेल्या इंग्रजी फौजेवर पडला होता. ही फौज ज्या बाजूनें ग्वालेरकडे आली ती बाजू उंच टेकाडे, त्यांच्या उतारावरील खांचखळगे, चिंचोळ्या दऱ्या, टेकड्यांच्या तळाशीं असलेले कालवेनाले, त्यांच्या कांठावरील कांटेरी झाडेंझुडपें यामुळें तोफखान्याला व घोडेस्वारांना ती बिलकूल सोयीची नव्हती. पायदळ सुद्धां दोघांचौघांनीं जुळून चालूं शकत नव्हतें. सगळीकडे पेशव्यांची फौज पसरलेली, ठिकठिकाणीं तोफा लपविलेल्या, त्या केव्हां नेम धरून अचानक अंगावर गोळे फेकतील याचा भरंवसा नाहीं; बंदुकांच्या गोळ्यांची धार चालू, यांतून मोठ्या सावधपणानें व चिकाटीनें वाट काढीत इंग्रजी लष्करानें पेशव्यांची फौज आपल्या चढाईच्या योजनेंत खेचली. पेशव्यांचे शिपाई तरीसुद्धां प्रसंगावधान राखून सुचतील ते डाव खेळत होते. या डावाच्या चढाओढींत एकदां अशी वेळ आली कीं, स्वारांच्या हल्ल्याशिवाय निभाव नाहीं, असें ध्यानांत येऊन इंग्रजानें तसा हल्ला चढविला. त्या हल्ल्यानें पेशव्यांचे शिपाई जो लढाईचा नवा डाव टाकणार होते, तो फिसकटून त्यांच्यावर इंग्रज स्वारांपुढें पळण्याची पाळी आली. या धावपळींत पेशवेपक्षाचा भयंकर घात झाला. राणी लक्ष्मीबाईना युद्धाच्या धारातीर्थी वीरोचित सद्गति मिळाली.

**लक्ष्मीबाईचें देहावसान**

लक्ष्मीबाईचे रणांगणावर देहावसान कसें झालें, याविषयीं दोन मतें आहेत. जेथून इंग्रज स्वारांनीं अनावर मुसंडी हल्ला सुरू केला तेथून सुमारें दोन मैलांवर फूलबाग महालामध्यें तोफांच्या मोर्च्यानजीक अंगांत तांबडें जॅकिट, खालीं तुमान, डोक्यावर पांढरा पटका अशा मर्दानी पोषाखांत बाई सरबत पीत बसल्या होत्या. शेजारीं सुमारें चारशें शिपाई होते. इतक्यांत गोऱ्या स्वारांच्या दौडीची बातमी समजली. गोरे स्वार चाळीस पन्नासच होते, पण या बातमीनें बाईजवळच्या दहा पंधरा खेरीज बाकीच्या शिपायांनीं धूम ठोकली. बाईनीं घोड्यावर बसून (कदाचित् सरबत पितांना त्या घोड्यावर असतील) घोडा पिटाळला. त्या एका काळव्याशीं आल्या व घोडा अडला तोंच एका बगलेवर बंदुकीची गोळी लागली. गोळीमागून डोक्यावर तलवारीचा घाव

पडला, तरी सुद्धां बाई घोडा चालविण्याचा यत्न करीत होत्या. परंतु त्यांच्या इच्छाशक्तीला साथ देण्यासारखें त्राण शरीरांत राहिलें नव्हतें. त्या घोड्या-खालीं पडल्या तेव्हांच त्यांचा प्राण निघून गेला होता. नंतर त्यांचें जवळच्या लोकांनीं दहन केलें. ही हकीकत मॅक्फर्सनच्या अहवालांतील असून बाईंच्या जिवलग दासींची जबानी हा त्याचा आधार आहे. ही दासी ब्राह्मण जातीची विधवा होती असें कोणी म्हणतात, तर ती मुसलमान होती असेंहि वृत्त आढळतें. या दासीला तलवारीची मोठी जखम झाली होती. ती शहरांत गेली. मुसलमान कोतवाल व एक फकीर यांनीं तिला आश्रय दिला. तेथेंच तिचें प्राणोत्क्रमण झाल्यानें मुसलमान म्हणून तिचें त्या दोघांनीं दफन केलें.

दुसऱ्या इंग्रज अधिकाऱ्यानें लिहिलेली हकीकत अलीकडे उजेडांत आली आहे. आपण ऐनजागीं चौकशी करून माहिती मिळविली असा या इंग्रजाचा दावा असून राणी व दासी या दोघी स्वारांच्या हल्ल्यापूर्वीं बंदुकीच्या गोळ्या लागून एकदमच कालोदरांत शिरल्या, हा त्यांच्या चौकशीचा मथितार्थ काय तो महत्त्वाचा आहे. रावसाहेब व तात्या यांच्या समवेत बाई समोरून होणाऱ्या टेकड्यावरील चढाईचें निरीक्षण करीत होत्या. बाई घोड्यावर होत्या. शेजारीं मुसलमान दासी होती. त्या दोघींना बंदुकीच्या गोळ्या लागल्या व त्या पडल्या. बाई सुमारें वीस मिनिटें जीवंत होत्या. रावसाहेबांनीं तिला फूलबागेकडे नेलें. बाईंचें निधन होतांच त्यांचें शव पालखींत ठेवलें. फूलबाग व किल्ला यांच्या मध्यें असलेल्या नदीवर पालखी चालविली. पालखी जाऊं शकणार नाहीं, अशी जागा आली तेव्हां शव पालखींतून काढून खांद्यावरून नेण्यांत आलें. एका सुंदर विशाल वृक्षाखालीं अग्निसंस्कार पार पडतो न पडतो इतक्यांत स्वारांची धाव तेथें आली. तेथें स्वारांच्या तडाक्यांत सातआठ जण मारले गेले. स्वारांच्या सेनाधिकाऱ्याला बाई पडल्याची वार्ता नव्हती. ती त्याला आपण कळविली. आपल्याला चौकशींत जें समजलें तेंच खरें असा या लेखकाच्या माहितीचा मुख्य सूर आहे.

### शिपाईगर्दीची अतुल वीरश्री

१८५८ सालीं बुंदेलखंडांत जें रण पेटलें होतें, त्यांत शिपायांकडील मूर्तिमंत वीरश्री कोण असा प्रश्न विचारल्यास महाराष्ट्रियांसह भारतीयांनीं

अभिमानपूर्वक लक्ष्मीबाईचें नांव उच्चारावें यांत नवल नाहीं. या बाईच्या पराक्रमाचे पोवाडे झांशीकडील खेडवळांनीं रचावे आणि पिढ्यानुपिढ्या गात राहावें हें स्वाभाविक आहे. पण त्यांच्या शत्रूंना त्यांच्याविषयीं वाटणारा आदर ह्यू रोजच्या युद्धपत्रकामध्यें एका वाक्यानें व्यक्त झालेला आहे. त्या सेनापतीसमोर बाणपूर, शहागडचे राजे, त्याखेरीज वेळोवेळीं पकडून मृत्यु-मुखांत लोटलेले शिपायांचे पुढारी, तात्या टोपे, रावसाहेब, बांद्याचा नबाब अशा अनेक व्यक्ति असूनहि त्यानें लक्ष्मीबाईना The best and the bravest of the military leaders. सर्वोत्कृष्ट आणि वीरश्रेष्ठ हीं दोन विशेषणें जोडून त्यांमध्यें बाईचे सगळे गुण एकत्र आणले आहेत. पहिल्या विशेषणांत माणुसकीच्या उच्च गुणांचा अंतर्भाव असून दुसरें धैर्यशाली रण-पटुत्वाचें दर्शक आहे. बाईसंबंधाच्या लोकगीतांमधून बाई शिपायांमध्यें कसा युद्धोत्साह उत्पन्न करीत असत, त्यांची कशी काळजी घेत असत, इंग्रजांच्या मोहिमेचा प्रदेश त्यांनीं कसा वैराण करून सोडला, वैराण मुलखांत उन्हाळ्यामुळें इंग्रजांचें लष्कर पाण्याच्या अभावीं कसें जिकिरीस आलें होतें, या स्थितीचीं वर्णनें आलेलीं आहेत. बाईच्या शौर्यसाहसादि गुणांचें आकर्षण केवळ महाराष्ट्रियांनाच नाहीं तर त्यांच्या प्रभावानें हिंदींत एक महाकाव्य रचलें गेलें असून बंगाली भाषेंतहि एक विस्तृत चरित्र प्रसिद्ध झालें आहे. हिंदींत बाईसंबंधाची एक लोकप्रिय कादंबरी असून पाकिस्तानांत प्रसिद्ध झालेल्या '१८५७' या उर्दू पुस्तकाच्या लेखकानें बाईचें गुणवर्णन अशा भव्य रीतीनें लिहिलेलें आहे कीं, तो एक गद्य पोवाडाच म्हणतां येईल. १९५७ च्या शताब्दिमहोत्सवामध्यें देशाच्या फार मोठ्या विभागांत लक्ष्मीबाईचा जेवढा जयजयकार दुमदुमला तेवढा सत्तावन सालांतील दुसऱ्या एकाहि व्यक्तीच्या वांट्यास आलेला नाहीं. एखादा प्रचंड तेजोगोल स्थानभ्रष्ट होऊन अंतरिक्षांतून जळत चकाकत जातो. त्याच्या गतीमागें पुष्कळ वेळपर्यंत एक तेजोरेषा चमकत राहते. त्याप्रमाणें लक्ष्मीबाईचें खरें तेजस्वी चरित्र इतिहास-दृष्ट्या अल्पकालीन असलें तरी त्याची महती चिरकालीन आहे.

### ग्वालेरांतून शिपाई गेले

लक्ष्मीबाईच्या मृत्यूनें शिपाई व त्याचे पुढारी यांचा थोडा वेळ गोंधळ उडाला; त्यांची हिंमत कदाचित् खचली असेल, पण युद्धाच्या व्यवहारांत शोकावेगाला अवकाश नसतो. एखादा मोहरा पडल्यास खेद होणें हें

स्वाभाविक आहे. तो खेद आवरून युद्धाकडे लक्ष देण्याची वीरांची नीति प्रसिद्ध आहे. तिला अनुसरून शिपाई इंग्रजाशीं झगडण्याला सिद्ध झाले. ता. १७ रोजीं ग्वालेरचा मैदानी भाग इंग्रजानें पादाक्रांत केला. ग्वालेरचा किल्ला व त्या लगतच्या टेकड्या हीं ठिकाणें शिपायांनीं व्यापलेलीं होतीं. तीं मोकळीं करण्याचें काम ह्यू रोजनें दुसऱ्या दिवशीं शेवटास नेलें. त्यासाठीं त्याला ग्वालेरपासून २० मैलांवर 'कोटाकी सराई' नांवाच्या जागीं दौड करावी लागली. शिपाई अतिशय ईर्ष्येनें कांहीं वेळ लढले. शत्रूनें वाहवा म्हणावें असा शिपायांच्या तोफांनीं मारा चालविला होता. शिपाई संगिनीच्या हल्ल्यानें कच खातात, हा त्यांच्या शौर्यांतला उणेपणा ध्यानांत ठेवून इंग्रज सेनापतींनीं तसा हल्ला चढविला. त्याचा अपेक्षित परिणाम होऊन शिपायांनीं रणांगण सोडलें. ग्वालेरला आतां कोणत्याहि बाजूनें भय उरलें नाहीं. पण शिंद्यांचे दोन वाडे अद्यापि शिपायांच्या तावडींत राहिलेले होते. त्यांतल्या एका वाड्याचा रस्ता शहराच्या दाट वस्तींतून असल्यानें आजूबाजूच्या घरांतून गोळीबार होईल, अशा समजुतीखातर मीड नांवाचा लष्करी अधिकारी लढाईच्या तयारीनें वाड्याकडे निघाला. शहर लढवायचें असा शिपायांचा उद्देश नव्हता यामुळें मीड वाड्यापर्यंत बिनधोक पोंचला. मीड हा ग्वालेरचा माहीतगार होता. त्यानें वाड्यापासून थोड्या अंतरावर आपले सैनिक उभे केले व तो एकटाच वाड्याच्या दाराशीं गेला. तेथें पुष्कळ हत्यारबंद लोक होते. वाड्याच्या गच्चीवरून कित्येकांनीं आपल्यावर बंदुका रोखल्या आहेत, असेंहि मीडच्या दृष्टीस पडलें. मीड व दरवाजांतलीं माणसें यांच्यांत रागालोभाचीं बोलणीं चालू झालीं. वाडा महाराजांखेरीज इतर कुणाच्याहि हुकमानें खालीं केला जाणार नाहीं असें वाड्यांतलीं माणसें ठासून बजावीत होतीं; 'तुम्ही माझें म्हणणें न ऐकल्यास इंग्रजी सैनिक हल्ला करून वाडा घेतील' असें उलट मीड त्यांना खडसावीत होता. हा संवाद मीडला ओळखणाऱ्या एका मुसलमान वृद्धानें थांबविला. त्या वृद्धाच्या मध्यस्थीनें मीडसाहेब महाराजांचा दोस्त म्हणून त्याला वाड्यांत प्रवेश मिळाला. त्यानें तेथील सर्वांची समजूत घालून वाडा ताब्यांत घेतला. वाड्याभोंवतीं गोऱ्या सैनिकांचा पहारा बसविण्यांत आल्यावर एका वाड्याची कटकट व काळजी संपली. फूलबाग हा दुसरा वाडा काबीज करतांना शिपायांशीं किरकोळ चकमकी उडाल्या. ता. १८ व १९ हे दोन दिवस ग्वालेरमधून शिपायांना हाकलून काढण्याचा

सपाटा सुरू होता. ग्वालेरचा किल्ला लढविण्याची उमेद शिपायांनीं बाळगली असती तर ह्यू रोजला आणखी किती काळ तेथें वेंचण्याची पाळी आली असती हें सांगणें कठिण आहे. पण शिपायांनीं ता. १९ च्या रात्रीं किल्ला रिकामा केल्याची खबर ह्यू रोजला समजून महाराजांच्या स्वागताला कसलेंच विघ्न उरलें नाहीं, असें त्याच्या निर्दशनास आलें. वाडे हातीं आल्यानंतर इंग्रजाच्या सूचनेवरून ह्यू रोजच्या भेटीला शहरांतले पुष्कळसे वजनदार नागरिक जमले होते.

### महाराजांच्या स्वागताला रक्तपाताचें गालबोट

दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २० रोजीं सकाळीं शिंदे महाराजांची स्वारी शहरांतून मिरवीत आपल्या राजवाड्यांत गेली. महाराज ता. १८ लाच मुरारच्या छावणींत येऊन राहिले होते. ज्या दिवशीं ते बरोबर इंग्रज सैनिकांचा लवाजमा घेऊन वाड्याकडे जाण्याला निघाले, त्या दिवशीं शहरचे नागरिक त्यांच्या सन्मानार्थ दुतर्फा जमले होते. या समारंभाला गालबोट लागेल असें कुणाच्याहि स्वप्नीं नसतां महाराजांच्या स्वागतासाठीं एकवटलेल्या सैनिकांच्या दिशेनें गडाच्या तटबंदीवरून तोफांचे चार पांच गोळे आले. महाराज व त्यांचा लवाजमा चालूं लागतांच त्यांच्यापुढें एक गोळा येऊन आदळला. किल्ला शिपायांनीं मोकळा केल्याच्या खात्रीलायक बातमीला हरताळ फासणारे तेथें कोण अकस्मात् उगवले याचा तपास करण्यासाठीं कांहीं सैनिक तिकडे रवाना झाले. शिपायांनीं किल्ला सोडला तरी ह्यू रोजनें त्यावर कडक देखरेख ठेवली होती. तोफांच्या गोळ्याची बारीक चौकशी केली तेव्हां कळून आलें कीं, कित्येक गाझींनीं तेथें जाऊन किल्ला लढविण्याची कामगिरी पतकरली आहे. ४ शिपाई, ९ विलायती, २ बायका व १ मूल एवढीं माणसें गडावर होतीं. बाकीच्या शिपायांबरोबर या मंडळीनें आग्र्याची वाट धरली होती, पण किल्ल्यावर जाऊन तेथेंच मरायचें, असा निश्चय मनांत बळावून ही मंडळी परतली. आपण किल्ल्यावर आहों, याची त्या गाझींनीं तोफा वाजवून खूण पटवितांच तेथील देखरेखीचे अधिकारी किल्ल्याच्या दरवाजावर गेले. त्यांच्या बरोबर जो लोहार होता त्यानें दरवाजा फोडला. मुख्य दरवाजामागील दरवाजे उघडे असल्यानें हे गोरे अधिकारी आपल्या पठाण पोलिसांच्या सोबतीनें झटकन् आंत शिरले. गाझींनीं दरवाजा रोखणारी एक तोफ ठेवली होती. तिचा उपयोग नाहीं, असें

दिसतांच गोऱ्या-काळ्यांनीं तटावर चढून गाझींना गांठलें. गाझींनीं आपल्या जवळचें द्रव्य तटाखालीं फेकून दिलें, बायकापोरें मारलीं व निकराची झटापट आरंभली. सगळे गाझी ठार पडले व गोऱ्यांपैकीं एक अंमलदार आपल्या प्राणास मुकला. इकडे महाराजांची मिरवणूक वाड्यांत पोंचली. त्यांनीं कृतज्ञतेच्या समारंभानें इंग्रजांचें आदरातिथ्य केलें. महाराज ग्वालेरला आल्याचा आनंद सरकारी रीत्या देशभर व्यक्त केला जावा म्हणून कॅनिंगनें सर्व लष्करी ठाण्यावर तोफांची सलामी देण्याचा हुकूम सोडला होता.

**शिंद्यांची महती व तात्या टोपे**

शिंदे आपल्या बाजूस राहिल्यानें दुसरे सगळे संस्थानिक त्यांचा कित्ता गिरवतील या भरंवशामुळें शिंदे महाराजांचें करवेल तेवढें कौतुक इंग्रज करीत होते. ह्यू रोज हा सेनापति हिंदुस्थानाची लवमात्र माहिती नसलेला असूनसुद्धां ग्वालेरला शिपाई गेल्याचें ऐकतांक्षणीं झालेले श्रम विसरून तिकडे जाण्यासाठीं त्यानें पुनः कंबर कसली. ‘शिंदे अतिशय इंग्रजनिष्ठ, त्यांचा प्रदेश मुंबई-आग्र्यामधील दळणवळणाचा आणि शिंद्यांची फौज उत्तम प्रकारें संघटित व शिस्तीची’ या कारणांबरोबरच ‘तात्यांचें वजन राजकीय व लष्करी दृष्ट्या वाढलें; त्यांच्यापाशीं द्रव्यबळ व मनुष्यबळ आतां यथेच्छ जमलें; तो दक्षिणेंत गेला तर तेथील जनता पेशवाईचें प्रेम उघडपणें बाळगणारी असल्यानें ती कोणता मार्ग स्वीकारील हें समजणें सोपें आहे. मोठ्या फौजेनिशीं त्या जनतेमध्यें टोपे पोंचतांच ती इंग्रजांविरुद्ध उठेल व दक्षिणेंत इंग्रजापाशीं सैन्य नाहीं. ग्वालेरच्या मागून इंदूर जाईल.’ अशीं महत्त्वाचीं कारणें ह्यू रोजनें आपल्या युद्धपत्रकांत नमूदलीं आहेत. ‘ग्वालेरचें प्रकरण निकालांत न काढल्यास इंग्रजांच्या लष्करी इभ्रतीला धोका पोंचेल व तसें होऊं देणें इष्ट नाहीं’ हें ह्यू रोजच्या मतें सर्वांत जास्त महत्त्वाचें कारण होतें. तात्यांचे ग्वालेर जिंकण्यापूर्वीं मागें वर्णिल्याप्रमाणें भय बाळगणाऱ्या ह्यू रोजनें ग्वालेरच्या पाडावानंतर जें मत लिहिलें आहे तेंहि पाहण्यासारखें आहे— ‘तात्याचें चरित्र म्हणजे एक परस्परविरोधाचा चमत्कार म्हणावा लागतो. महत्त्वाच्या धाडसी योजना स्वीकारतांना अवश्य तें नैतिक धैर्य त्याच्या ठिकाणीं दिसतें. पण अशा योजना सिद्धीस नेण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या लढाईच्या वेळीं त्याची नाडी लटपटते. तथापि त्यानें शिंद्यांची सत्ता उखडून टाकण्याची मोहीम यशस्वी केली. कूंच व बेटवा येथील अनुभवास अनुसरून तो अक्षम्य उतावळेपणानें ग्वालेरहून पळाला. या त्वरेमध्यें कसलीहि शोभा नव्हती.’

तात्यांनीं ग्वाल्हेरहून पाय काढल्यानंतर त्यांची पुढील कामगिरी वाऱ्याच्या स्वच्छंद सोसाटयासारखी आहे. ही आपली भावी दशा ओळखूनच कीं काय- त्यांनीं आपल्या कुटुंबाचे लोक ग्वालेरच्या राज्यांत भींड येथें ठेवले होते असें म्हणावें लागतें, त्या विषयींची हकीकत ग्वालेर येथील इंग्रजी सत्तेचा प्रतिनिधि मॅक्फर्सन याच्या चरित्रांत आहे.

### तात्यांचे नातेवाईक

ता. १ ऑगस्टच्या सुमारास एका लोहाराच्या घरांत महाराष्ट्रीय ब्राह्मण मंडळी लपून राहात असल्याचा सुगावा भींडच्या सुभेदारानें काढला. त्या मंडळीस कैद करून ग्वालेरास पाठविलें तेव्हां ही मंडळी तात्यांची नातलग असावी, या तर्काला बळकटी आली. फूलबागेंत आणून मॅक्फर्सननें त्यांची पाहणी केली तेव्हां एका ८० वर्षे वयाचा सडपातळ जख्ख म्हातारा, दोन ४० वर्षांच्या आंतबाहेरील पुरुष, एक १७ वर्षांचा मुलगा व चार लहान मुलें, तीन बायका त्यांतली एक तर वयानें फार लहान होती, याप्रमाणें अकराजण दिसले. म्हातारा तो बाप, बाकीचे भाऊ व त्यांचीं बायकामुलें असा मॅक्फर्सननें ठोकताळा बसविला. ‘मी मुलांना मिठाई वाटीत असतों. हे सर्व लोक शांत आहेत. आपल्या आयुष्यांत कांहीं विलक्षण घडलें आहे याची जणूं काय त्यांना जाणीवच नाहीं. त्यांना बंडखोर समजतां येणार नाहीं. या मंडळीजवळ अवघा एकच कागद सांपडला. त्यावर फक्त एक इंग्रजांच्या निंदेचा श्लोक लिहिलेला आहे. इंग्रज गाढवासारखे ओरडतात व पळून जातात. दोर तुटलेल्या पतंगासारखे सैरावैरा पळतात, हा त्या श्लोकाचा आशय आहे.’ अशी आणखी माहिती मॅक्फर्सनच्या चरित्रांत दाखल असलेल्या एका पत्रांत आहे. या टोपे कुटुंबाचें पुढें काय झालें, त्याचा खुलासा सदर चरित्रांत नाहीं.

### ह्यू रोजचे कांहीं अनुभव

काल्पीच्या भागांत ह्यू रोजला कांहीं विशेष अनुभव आले. त्यांचा त्यानें आपल्या युद्धपकांत मुद्दाम उल्लेख केला आहे. तो म्हणतो:—‘यमुनेच्या खोऱ्यांतील जनता इंग्रजाविषयीं अतिशय तीव्र रोष बाळगणारी असल्याचें आढळलें. बंडाळी उद्भवल्यापासून तिला ब्रिटिशांच्या सत्तेची ओळख नाहीं. ती सारखी बंडखोरांच्या अंमलाखालीं आहे. प्रत्येक खेड्यांत एक दोन महा-

ाष्ट्रीय ब्राह्मण असून त्यांनीं नानासाहेबाच्या पेशवाईचा अत्यंत यशस्वी प्रचार केलेला आहे. आमचा पत्रव्यवहार व आमच्या हालचालींची माहिती पुरवून खेड्यांतले लोक बंडखोरांना मदत करीत होते. बैल थकल्यामुळें आमच्याकडील मालाच्या गाड्या जर सैन्याच्या मागें राहिल्या व त्यांचे गाडीवान जर तहान भागविण्याकरितां सैन्यापासून दूर गेले तर त्यांना पळवून बंडखोरांच्या हवाली करण्याचे प्रकार घडत होते.' ह्या रोजचा दुसरा अनुभव शिपायांच्या युद्धविद्येसंबंधांतला आहे. इंग्रजांच्या नोकरींतले धडे त्याच्या किती अंगवळणीं पडले होते, यांचा बोध पुढील वर्णनानें होईल—'उठावाच्या शिपायांनीं आपला इंग्रजांच्या नोकरींतला पोषाख जसाच्या तसा अंगावर ठेवला होता. पोषाखावरोबरचे इतर इंग्रजी जिन्नस त्यांनीं टाकले नव्हते. सैन्याची संघटना तशीच कायम दिसली. कवाइती हुकमाच्या इंग्रजी शब्दांचा उपयोग ते करीत होते. रात्रींच्या हालचाली सुरू असतांना ते शब्द आम्ही स्पष्टपणें ऐकत असूं. इंग्रजानें शिकविलेल्या गोष्टीप्रमाणें त्यांचा सगळा व्यवहार होता.'

• • •

# ८

# लखनौ शहराची व मुलुखाची अखेर

तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटीं लखनौच्या कोंडींतली इंग्रज मंडळी कंपनी राज्याचा सरसेनापति कॉलिन कॅम्बेल यानें बाहेर काढून कानपुरास आणली हा वृत्तान्त सादर केल्यानंतर त्या प्रदेशांतील शिपाई-गर्दीची हाल-हवाल दृष्टीआड करावी लागली. दिल्लीचा पाडाव सप्टेंबर अखेरीस घडला. त्याच सुमारास लखनौची कोंडी फुटली. माळव्यांतील गडबडीला पायबंद घालण्याचें काम ड्यूरंडनें डिसेंबरांत पुरें केलें. राजस्थानांत उठावाची काळजी तेथील अधिकाऱ्यांना वाहावी लागत असली तरी त्या घटनेचे चटके अप्रत्यक्ष, किरकोळ व तुरळक असल्यामुळें १८५८ साल उजाडेपर्यंत त्या चटक्यावर इलाज करण्याची इंग्रजांना आवश्यकता वाटली नाहीं. आव्याचा ठाकूर व कोट्याचे शिपाई हीं दोन प्रकरणें १८५८ च्या मार्चपर्यंत इंग्रजांनीं निकालांत काढलीं होती. १८५७ ऑगस्टपासून विलायतेहून सारखी सैन्याची कुमक येत असल्यानें इंग्रजांची उमेद वाढली होती. कुमक येण्या-पूर्वीं येथें असलेल्या तुटपुंज्या इंग्रजी बळाचा रणदेवतांकडून विजयाच्या रूपानें गौरव चालला होता. आतां इंग्रजापुढें प्रश्न काय तो कालावधीचा होता. दिल्ली जिंकतांच त्यांना अंतिम विजय स्पष्ट दिसूं लागला. लखनौची कोंडी मोडल्यानें इंग्रजाच्या आशावादांत खात्रीची भर पडली. इंग्रजांच्या विजया-प्रमाणेंच त्यांच्या नव्या चढाईची मोहीम साधारणपणें एकाच कालमानांत सुरू व्हावी, असा एक योग आढळतो. तिकडे माळवा बुंदेलखंडामध्यें ज्या दिवसांत ह्यू रोजचें आक्रमण सुरू झालें, त्यानंतर थोड्याच दिवसांनीं कॉलिन कॅम्बेलनें लखनौकडे मोर्चा वळविला. मार्च अखेरीस झांशीला ह्यू रोजनें वेढलें तर मार्चमध्येंच पण सुमारें एक आठवडा आधीं कॅम्बेलनें लखनौ शहर पादाक्रांत करून तेथें शिपाई-गर्दीचें नांवनिशाण राहूं दिलें नाहीं. ह्यू रोजपाशीं फौज थोडी होती तर कॅम्बेलजवळ फौजेची व दारू-गोळ्याची बिलकूल कमतरता नव्हती. हा दोघांच्या स्थितींतला काय तो महत्त्वाचा फरक आहे.

## कानपुरास तात्यांचा पराक्रम

कानपुराहून लखनौस जातांना कॅम्बेलनें नोव्हेंबरांत कानपूरच्या रक्षणासाठीं विंढॅम नांवाचा सेनाधिकारी थोड्या फौजेसह ठेवला होता. त्यानें कानपूरच्या तळाचा बंदोबस्त करावा, अलाहाबादकडून येतील त्या तुकड्या लखनौस पाठवाव्या, काल्पीहून टोपे आंगावर चालून आल्यास बचावाच्या धोरणानें वागावें, योग्य व अवश्य वाटल्याशिवाय चढाई करूं नये; अशा स्वरूपाच्या विंढॅमला कडक सूचना होत्या. विंढॅमनें यांतली प्रत्येक सूचना अंमलांत आणली. काल्पीस तात्या फार मोठें सैन्य घेऊन बसले आहेत व त्यांचा कानपूरवर डोळा आहे, याची जाणीव कॅम्बेलला लखनौस जातांना होती; पण तात्या कानपूरवर केव्हां घसरतील याचा अंदाज करणें शक्य नसल्यानें आपल्या गैरहजेरींत तात्या कानपुराला आले तर कसें वागायचें, याची मोघम जाणीव किंवा मोघम शहानिशा कॅम्बेलच्या वरील सूचनांत होती. तात्यांनीं यमुना उतरून १५ नोव्हेंबरनंतर कानपूरचा रोख धरला. प्रथम कांहीं दिवस इंग्रजांचे हेर बातम्या काढण्याचें काम सुरक्षितपणें करीत होते. त्यामुळें तात्यांशीं सामना करण्याचा डाव विंढॅमला नीट मांडतां आला. पण १९ नोव्हेंबरला कानपूर-लखनौचें दळणवळण एकदम बंद पडलें. शिपायांनीं दळणवळणाच्या रस्त्यावरील एक पोलीस ठाणें मारल्याचा हा परिणाम होता, हें समजतांच विंढॅमनें एक तुकडी तिकडे पाठविली. चार दिवस गेल्यावर विंढॅमच्या हातीं कॅम्बेलकडचें एक पत्र मिळालें. दहा दिवस पुरेल एवढी रसद पाहिजे, असा त्या पत्राचा आशय होता. कॅम्बेल शिपायांच्या गराड्यांत सांपडला अशी कल्पना त्या पत्राच्या योगानें मनांत येऊन विंढॅम जास्त गोंधळांत पडला. लखनौच्या फिकिरींत राहावें, तर इकडे तात्या अगदीं अंगाशीं भिडले. विंढॅमचे हेर आतां नाक कान गमावण्याचा प्रसंग म्हणून काम करीनासे झाले. तेव्हां विंढॅमनें लढाईचा निश्चय केला. विंढॅमजवळ फौज थोडी असल्यामुळें कितीहि सोयीच्या जागा धरल्या तरी ती फौज आपल्याला आवरण्याला समर्थ नाहीं, हें तात्यांनीं ओळखलें होतें. तात्यांनीं या वेळीं उलट जे डाव टाकले, त्यापुढें विंढॅमला हार खाण्याची पाळी आली. विंढॅमचा एकहि डाव पूर्णपणें यशस्वी झाला नाहीं. विंढॅमचें एक ठाणें तात्यांच्या लोकांनीं असें झोडपलें कीं, इंग्रजाला पळतां भुई थोडी वाटली. हें ठाणें लष्करी सामानाच्या रक्षणासाठीं नेमलेलें होतें. तें सर्व प्रकारचें सामान तात्यांच्या हातीं जाऊन

त्यांनीं शक्य तेवढें सामान आपलेंसें करून उरलें तेवढ्याची प्रचंड होळी पेटाविली. ही झुंज चार दिवस चालली होती. दर दिवशीं विंढमच्या योजना फिसकटून सारें शहर तात्यांच्या कबजांत गेलें. चांगल्या माऱ्याच्या जागा तात्यांच्या सैनिकांनीं व्यापल्या. मध्यंतरीं आपल्या दुर्दशेबद्दल विंढमनें लिहिलेलीं पत्रें कॅम्बेलला पोंचलींच नाहींत.

ता. २६ नोव्हेंबरला कॅम्बेल कानपूरकडे वळला. त्याच्या बरोबर जें लखनौच्या कोंडींतल्या लोकांचें लटांबर होतें तें दहा मैल पसरलें होतें. त्यांचें रक्षण ही एक मोठी जबाबदारी होती. ती पार पडण्याच्या तजविजी ठरवून त्यानें तोफखाना व रिसाला पुढें दवडला व ता. २८ रोजीं स्वतः कूच आरंभलें तों कानपुरास चाललेल्या तोफांच्या भडिमाराचा आवाज अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागला. कॅम्बेलनें साहजिकच आपल्या गतीचा वेग वाढविला. दुपार उलटून गेली तरी कानपुराची बातमी कळेना, अशा चिंताक्रान्त स्थितींत असतां रस्त्याकडेच्या शेतांतून एक इसम अचानक उडी मारून समोर आला व त्यानें ग्रीक अक्षरांत लिहिलेलें २६ तारखेचें एक पत्र अघाडीच्या प्रमुखाला दिलें. ‘शत्रूंशीं झुंज जुंपली असून यशाचें चिन्ह नाहीं. शत्रूजवळ तोफखान्याचें बळ फार मोठें आहे’ वगैरे माहिती त्या पत्रांत होती. त्यानंतर मागोमाग आणखी दोन चिठ्या आल्या, त्यांत पीछेहाटीचा मजकूर होता. कॅम्बेलनें ताबडतोब घोड्यांचा तोफखाना व रिसाला बरोबर घेऊन दौड सुरू केली. दिवस मावळण्याच्या सुमारास तो कानपुरास पोंचला. गंगेवरील पूल शाबूतच नव्हे तर आपल्या ताब्यांत असल्याचें पाहून त्यानें समाधानाचा सुस्कारा टाकला. नंतर विंढमची गांठ घेऊन दुसऱ्या दिवशींचा कार्यक्रम ठरविला व मग कॅम्बेल आपल्या नदीपलीकडील तळावर गेला.

### इंग्रजानें कानपूर सोडविलें

दुसऱ्या दिवशीं लखनौच्या कोंडींतल्या लोकांचे थवे पुलावरून कानपुरास येतांना पाहून तात्यांनीं पूल तोडण्यासाठीं तोफांचा मारा सुरू केला. त्या माऱ्यावर कॅम्बेलनें आरमारी तोफांचा उपाय अंमलांत आणला होता. शिपायांच्या चढाईची मात्रा चालूं द्यावयाची नाहीं, एवढेंच काम कॅम्बेल ता. ३ डिसेंबरपर्यंत बजावीत होता. लखनौचे लोक अलाहाबादेस निर्विघ्न पोंचल्याचें समजल्यावर त्यानें काल्पीच्या शिपायांचा समाचार

घेण्याची तयारी केली. मधल्या चार सहा दिवसांत कॅम्बेल हालचालीपुरता बाहेरून स्वस्थ दिसला तरी शिपायांचें बळ कुठें कसें सांठविलेलें आहे याची बित्तंबातमी मिळवून एका धडाक्यांत त्यांना ठोकण्याच्या इराद्यानें तो आपली तयारी करीत होता. शिपायांनीं दाबलेल्या बाकीच्या सर्व जागा बळकट आहेत. फक्त उजवी बाजू कच्ची आहे, हें ध्यानांत ठेवून ती बाजू खिळखिळी करायची, पण हें शिपायांना कळूं नये म्हणून अन्यत्र जोरांच्या हल्ल्याचा आव आणायचा, वगैरे योजना निश्चित झाल्यावर त्यानें ता. ६ डिसेंबरला चढाईचा डाव टाकला. थोड्या अवधीनंतर तात्यांचे शिपाई हळूहळू आपलें एकेक ठाणें सोडूं लागले. कॅम्बेलच्या तुकड्यांनीं त्यांचा पाठलाग चालविला. कानपूरपासून तेरा मैलपर्यंत इंग्रजांनीं शिपायांचा पिच्छा पुरविला व रात्र झाली म्हणून लढाई थांबली. उजव्या बाजूचा पुढाकार कॅम्बेलकडे होता. ता. ७ रोजीं शहरांत दोन तुकड्या पाठवून तेथें शिपायांपैकीं चिटपांखरूं देखील कोणी उरलें नाहीं, याबद्दल खात्री करून घेतली व ता. ८ रोजीं बिठूरकडे पळालेल्या शिपायांची लांडगेतोड करण्यासाठीं घोडदळाची मोठी तुकडी रवाना केली. शिपाई बिठूरपासून पलीकडे १३ मैल निघून गेल्यामुळें त्यांचा पाठलाग लांबला. पण इंग्रज घोडदळानें त्यांना शेवटीं गांठलेंच. उभयपक्षीं थोडा वेळ तोफातोफी झाली. शिपायाकडील घोडदळानें लहानशी झटापट केली. अवघ्या तीन दिवसांत तात्या टोप्यांच्या सैन्याचा पराभव साधून त्यांच्या ४० तोफांपैकीं ३४ तोफा कॅम्बेलनें मिळविल्या.

**संचारी दलांची योजना**

आसपासचा प्रदेश शिपाई-गर्दीच्या पकडींतून सोडविल्यावर कॅम्बेल रोहिलखंड व नबाबशाहीचा मुलूख यांत भरलेल्या शिपायांचा मोड करण्याच्या विचारांत गुंतला. या वेळीं त्याच्या हाताशीं बरीच फौज होती. ती विभागवारीनें ठिकठिकाणीं पाठवावी असें ठरवून त्यानें आग्रा-दिल्लीचें दळणवळण सुरू व्हावें म्हणून एक विभाग वालपोल नांवाच्या अधिकाऱ्याबरोबर गंगा-यमुनेच्या दुआबांतील मैनपुरी जिल्ह्याकडे धाडला. दिल्ली जिंकून तिकडचें जें फिरतें लष्कर निघालें होतें, त्यानें अलीगड, आग्रा, बलंद शहर, मैनपुरी या जिल्ह्यांतील शिपाई-गर्दीच्या नांग्या ढिल्या केल्या असल्या तरी तेथें इंग्रजी वर्चस्वाला मूळ धरतां आलें नाहीं. फौज पुढें गेली कीं मागें बजबजपुरीनें डोकें वर काढावें, असा प्रकार अनुभवास येत होता. दिल्लीच्या लष्करी

तुकडीबरोबर जिल्ह्या-जिल्ह्याचे बरेच मुलकी ( सिव्हिल ) अधिकारी आपापल्या जिल्ह्यांत जाऊन राहिले. त्यांच्या साह्याला थोडेसे सैनिक देण्यांत आले. हे अंमलदार राज्यव्यवस्था अस्तित्वांत येऊन शांतता नांदूं लागावी म्हणून खटपट करीत होते, परंतु शिपायांची किंवा त्यांच्या जमीनदारी बरकंदाज मदतगारांची धाड केव्हां कुठून कशी येईल याचा नियम नसल्यानें मुलकी अंमलदारांना आपलें काम नीट रीतीनें पार पाडतां येत नव्हतें. दिल्ली-कानपूरचें दळणवळण तुटण्याचें हें कारण नाहींसें करणें अवश्य होतें. वालपोल त्या उद्देशानें मैनपुरीकडे निघाला ( १८ डिसेंबर ). वालपोल इटाव्यास पोंचेपर्यंत त्याला कुठेंच लढावें लागलें नाहीं. इटावा शहर तेथल्या लढवय्यांनीं सोडलें, पण त्यांतल्या कित्येकांनीं एका लहानशा तटबंदींत शिरून मरेपर्यंत लढण्याचा निश्चय केला होता. बंदुकांखेरीज त्याच्याजवळ दुसरें हत्यार नव्हतें. त्यांच्यावर हल्ला करण्याऐवजीं वालपोलनें हातसुरुंग फेकले. गवत पेटवून त्याच्या धुरानें ते बाहेर येतील अशी अपेक्षा धरली. तीन तास ही धडपड चालली होती. त्या लढवय्यांनीं सारखा गोळीबार चालू ठेवला होता. अखेरीस जेव्हां रीतसर सुरुंग पेरून ते उडविले तेव्हां शिपायांच्या आश्रयाचें सारें बांधकाम कोसळलें व त्याखालीं सदर लढवय्यांचा शेवट घडला ( ता. २९ डिसेंबर ). वालपोलच्या वांटणीस लढाईच्या स्वरूपाची एवढीच कामगिरी आली होती. ती आटपून तो मैनपुरीकडे गेला.

### युद्धसाहित्याचा काफिला

दिल्लीहून वालपोलप्रमाणेंच दुसरा सीटन नांवाचा सेनाधिकारी युद्ध-साहित्याचा प्रचंड काफिला घेऊन ( ता. ९ डिसेंबरपासून ) कानपूरची मजल मारीत होता. हा काफिल्याचा प्रचंडपणा सीटननें आपल्या चरित्रांत वर्णिला आहे. ८० हत्ती, १६००० बैल, ८००० उंट, १५०० बाजार बुणगे, ४५०० बैलगाड्या असा हा काफिला १८ मैलांचा रस्ता व्यापून चालला होता व त्याच्या बरोबर अवघे १९०० सैनिक होते. अलीगडच्या भागांत शिपायांचा जोर आहे, असें कळल्यावरून सीटन प्रथम तिकडे निघाला. अलीगडला पोचल्यावर त्यानें युद्धसाहित्य तेथें किल्ल्याच्या आश्रयाला चांगल्या बंदोबस्तानिशीं ठेवून पुढची वाट धरली. पुढच्या टापूंत एक इंग्रज अंमलदार अडचणींत होता त्याला वांचविण्याकरितां सीटनची घाई होती. तो अंमलदार गंगेरी नांवाच्या गांवीं होता. त्या अंमलदारानें

शिपाई तेथून आणखी तेरा मैल अंतरावर असल्याची बातमी दिली. सीटनची धाव पुनः सुरू झाली आणि शिपायांचा अपेक्षित जमाव भेटला. शिपाई लढण्याच्या उत्साहानें इंग्रजासमोर आले. झुंज लागली पण शिपायांची हिंमत फार वेळ टिकली नाहीं. त्यांनीं तोफा गमावून पळ काढतांच इंग्रजांच्या सैनिकांनीं त्यांची ससेहोलपट आरंभून शेंकडों जणांना धारातीर्थीं बुडविलें. या तीर्थांत समाधि मिळण्यापूर्वीं पुष्कळांनीं आपलें प्रखर शौर्यधैर्य निदर्शनास आणलें, अशी माहिती सीटनच्या आत्मचरित्रांत आहे. शिपायांना या भागांत सैन्य आल्याची वार्ता नव्हती. खेडकऱ्यांना शिपायांच्या धुमाकुळाचा कंटाळा आला असल्यामुळें त्यांनीं शिपायांना इंग्रजी सैन्यासंबंधानें अंधारांत ठेवलें. गंगेरीचा अंमलदारच इकडे आला आहे, अशा समजुतीनें शिपाई लढूं लागले पण त्या अंमलदाराच्या मूठभर पोलीसवजा लोकांशीं लढायचें नसून प्रत्यक्ष सैन्याशीं लढायचें आहे, असें दिसतांच शिपायांनीं पळ काढला, असा सीटनचा कयास त्याच्या चरित्रांत नमूद आहे.

**पटियालीची लढाई**

खासगंज नांवाच्या शहरानजीक ही लढाई झाल्यामुळें तिला खासगंजची लढाई असें म्हणतात (ता. १६ डिसेंबर). यानंतरचा सामना पटियाली नांवाच्या गांवीं खेळला गेला (ता. १७ डिसेंबर). पटियालीस फरुक्कावादच्या नबाबाचा सेनापति मोठी फौज गोळा करून लढाईच्या तयारीनें राहिला होता. खासगंजची लढाई निपटून सीटन पटियालीवर चालून गेला. फरुक्काबादी फौजेकडे तेरा तोफा होत्या. त्या तोफांनीं इंग्रजी सैनिकावर आधीं गोळे फेकले. इतक्यांत इंग्रजांच्या तोफांचीं तोंडें उघडलीं. सुमारें अर्धा तास उभयपक्षीं तोफांचा सवालजबाव सुरू होता. या अवधींत फरुक्कावादी तोफा मंदावल्या तेव्हां सीटननें पायदळाला हल्ल्याचा हुकूम देऊन तो स्वतः घोडदळासह प्रतिपक्षावर तुटून पडला. सुमारें तासाच्या आंत सामना संपून पळ व पाठलाग सुरू झाला. पाठलाग सात मैलपर्यंत चालू राहिला. त्यांत शेंकडों शिपायांची प्राणहानि तर घडलीच, पण त्यांचा सेनापतिसुद्धां मरण पावला. त्याचा गोट लुटला; त्यांत तोफा, दारूगोळा, दाणागोटा वगैरे सामग्री होती. इतर सामानांत दिल्लीच्या बादशहास लिहिलेलें एक पत्र सांपडलें. त्याचा एकंदर देखावा चमकदार व सुंदर होता. आपल्या पूर्वजांच्या वहिवाटीचे ५२ परगणे आपल्यास मिळावे अशा अर्थाची प्रार्थना त्यांत फरुक्का-

बादच्या नवाबानें बादशहाला केली होती. पटियालीच्या लढाईनें फरुक्काबादी सेनेचा शेवट झाल्यावर त्या लढाईंत भाग घेणाऱ्या दोघां पितापुत्रांना देहान्त भोगावा लागला. बाप पेन्शन घेणारा रिसालदार होता. तो व त्याचा मुलगा यांना पटियालीस इंग्रजाविरुद्ध लढण्याच्या गुन्ह्यावरून पकडलें; मुलाला पकडल्या जागीं ठार करून बापाला तोफेनें उडविलें. नंतर तीन दिवस पटियालीस राहून सीटन मैनपुरीस गेला. मैनपुरीच्या राजानें किल्ला सोडून सीटनच्या मार्गावर एका ठिकाणीं आपलें दळ आणून ठेवलें होतें. सीटनची व त्याची दृष्टादृष्ट होऊन इंग्रजांकडील तोफांचे दोन बार होतांच मैनपुरी दळानें पळ काढला. मैनपुरीच्या किल्ल्यांत तोफांचा कारखाना होता. लढाईंत व किल्ल्यांत मिळून ८ तोफा इंग्रजांना मिळाल्या (२७ डिसेंबर). पटियालीची लढाई आटपल्यावर सीटननें आपला युद्धसामग्रीचा काफिला तेथें आणविला.

### हॉडसन व भिकारी

अजून एक महत्त्वाचें काम शिल्लक राहिलें होतें. कॅम्बेलचा पत्ता काढून त्याला झालें वर्तमान कळविण्याचें कर्तव्य पुरें झालें नव्हतें. दिल्लीस शहाजाद्यांना ठार करणारा हॉडसन सीटनच्या सोबतीला असल्यानें कॅम्बेलला गांठण्याची जबाबदारी कशी पार पडेल ही सीटनची काळजी विशेष त्रासाची ठरली नाहीं. एक विश्वासाचा गोरा अंमलदार व कांहीं स्वार बरोबर घेऊन हॉडसन निघाला. वाटेंत दोन जागीं त्यानें स्वार सोडले. गोरा अंमलदारच काय तो एक जोडीदार सोबतीला ठेवला आणि या दोघांची दौड जेथें कॅम्बेल असल्याचें कळलें होतें तेथें पोचली. तेथें समजलें कीं आणखी पंधरा मैलांवर कॅम्बेलचा मुक्काम आहे. हॉडसननें ही मजल मारली व कॅम्बेलची भेट घेतली. घोडे न बदलतां दहा तासांत ५५ मैलांचा प्रवास हॉडसननें पार पाडला. सारा दिवस कॅम्बेलच्या गोटांत घालवून हॉडसन परतला. वेळ रात्रींची व वाटेंत शिपायांचा जमाव, या अडचणींतून त्याचें रक्षण एका उपकारानें केलें. आदल्या दिवशीं त्यानें एका भिकाऱ्याला द्रव्यदान केलें होतें. तो भिकारी हॉडसनची वाट पाहात बसला होता. त्यानें शिपायांची खबर दिली. या शिपायांनीं हॉडसनच्या एक दोन घोडेस्वारांना कंठस्नान घातलें होतें. ज्या खेड्यांत शिपाई होते, त्या खेड्यावरून हॉडसनला जाणें भाग होतें. कृतज्ञ भिकाऱ्यानें त्यांना संकटाची सूचना देऊन सुरक्षित मार्ग दाखविला, यामुळें

ते वांचले. हॉडसनच्या धाडसी चरित्रांत या प्रसंगाची नोंद इतिहासकार मुद्दाम करतात. दिल्लीचें दळणवळण हॉडसनच्या सदर कामगिरीनें अस्तित्वांत आलें. सीटनच्या लढायांमुळें मैनपुरीपर्यंतच्या जिल्ह्यांतून कसलीच गडबड उरली नाहीं. इंग्रजी राज्य स्थिरावत चाललें. सीटन आणि वालपोल यांच्या तुकड्या एकवटाव्या ही कॅम्बेलची इच्छा ता. ३ जानेवारी १८५८ रोजीं सफळ झाली.

**कॅम्बेलचें फत्तेगडास प्रयाण**

कॅम्बेल ता. २४ डिसेंबरपर्यंत कानपुरासच अडकून राहिला होता. त्याचीं बहुतेक सगळीं वाहनें लखनौच्या कोंडीवाल्याबरोबर अलाहाबादेस गेलीं होतीं. तें येईपर्यंत त्यानें कानपूर सोडलें नाहीं. त्याला फत्तेगडास आपल्या सगळ्या लवाजम्यानिशीं जावयाचें असल्यानें भरपूर वाहनांची आवश्यकता होती. तीं वाहनें येतांच ता. २४ डिसेंबरला त्यानें कानपूरचा मुक्काम हलविला. लहान लहान मजलांनीं फत्तेपुरास जावयाचें, असा त्याचा संकल्प होता. प्रवासाचे छोटे टप्पे हे सैनिकांचे श्रम कमी करणारे असले तरी त्याला स्वस्थपणें आसपासच्या टापूंतील शिपाई-गर्दीच्या गांठी आढळल्यास त्या फोडण्याला सवड मिळावी, असाहि त्याचा लहान मजलांमागें दुसरा हेतु होता. त्याप्रमाणें आजूबाजूच्या भागांतून शिपायांना झाडीत साफ करीत कॅम्बेल ता. ३० डिसेंबरला मीयाकी सराई या ठिकाणीं गेला. तेथें त्याला हॉडसन भेटल्याचें वृत्त पूर्वीं सांगितलें आहे. त्या दिवशीं त्यानें फत्तेगडाजवळच्या काली नदीवरील लोंबता ( सस्पेन्शन ) पूल शिपायांनीं मोडूं नये म्हणून तिकडे सैन्य पाठविलें. वालपोल व सीटन यांच्या कैचींतून सुटणारे शिपाई फत्तेगडास जमतील; कारण रोहिलखंडांत गंगापार जाण्याला तीच एक जागा मोकळी होती, ही कम्बेलची अटकळ आतां खरी ठरण्याची वेळ आली. गंगा-यमुनेचा दुआब व रोहिलखंड यांचा फत्तेगड हा सांधा होता व तो आपल्या ताब्यांत ठेवून रोहिलखंड—अयोध्येच्या शिपायांची दुआबांतील आवजाव कॅम्बेलला बंद पाडायची होती. निदान ती निर्विघ्न राहूं द्यावयाची नव्हती. फत्तेगडच्या महत्त्वाची जाणीव शिपायांना देखील होती, यामुळें त्यांनीं कॅम्बेलच्या प्रगतीला खीळ घालण्याकरितां पुलाची मोडतोड थोडीशी केली तोंच इंग्रजांचें सैन्य तेथें आलें. त्या सैन्यानें एक अहोरात्र अविश्रान्त राबून पुलाची दुरुस्ती तडीस नेली. मागोमाग कॅम्बेलचा मुख्य सेनाभार येतच होता. पूलदुरुस्तीला शिपायांनीं मुळींच अडथळा आणला नसल्यानें ते

वि २१९ ....... नों: दिः ...............

जवळपास नसावे हा समज कॅम्बेल आल्यानंतर दूर झाला. समोरच्या उंचवट्यावर शेंकडों शिपाई दिसूं लागले. त्यांच्या तोफा गरजल्या, बंदुका कडाडल्या. एक तोफ पुलाच्या रोखानें अचूक गोळे टाकीत होती. ती तोफ इंग्रजांकडील आरमारी तोफेनें मोर्च्यांत उलथून पाडली व गोरें पायदळ शिपायांवर धावलें. इंग्रजांचे सैनिक अंगावर येतात असें वाटलें कीं, पळ काढायचा हा जणूं काय शिपायांचा नियमच झाला होता. एवीं तेवीं मरायचें तर लढून कां मरूं नये, अशा निर्धाराचे कांहीं शिपाई व स्वार शत्रूवर उलटून हाणामारी करीत, पण अशीं उदाहरणें थोडीं असत. काली नदीची लढाई हरल्यावर शिपाई फत्तेगडाच्या आश्रयास गेलेच नाहींत. कॅम्बेलचें या एका लढाईनें काम भागलें. किल्ला त्यानें घेतला. युद्धोपयोगी साहित्याचें भांडारच असा तो किल्ला होता.

**शिक्षासत्राचें स्वरूप**

कॅम्बेल फत्तेगडास जात असतां मार्गांत गुन्हेगार माणसें शोधून त्यांना ठार करण्याचें काम कसें चाललें होतें याचें कांहीं मासले सांगण्याजोगे आहेत. लष्कराच्या सोबतीस दिलेला मुलकी अंमलदार हें काम अतिशय उत्साहानें करीत होता. तो प्रत्यहीं किती जणांना देहान्ताचा न्याय देत होता, याचें गणित सांगणें कठिण आहे. त्याच्या मुळांतल्या पावर या नांवामागें गोऱ्या सैनिकांनीं लावलेलें फास किंवा टांगता-टांगणारा (Hanging) हें विशेषण सार्थ होतें. सर सेनापतीचा मुक्काम फत्तेगडास असतांना आजूबाजूच्या गांवांतून झडती व धरपकड चालत असे. ता. ११ जानेवारी १८५८ रोजीं सुमारें शंभर आसामी-कांहीं उठावाचे शिपाई व त्यांचे कित्येक साथीदार पकडण्यांत आले. पावरनें ताबडतोब निकाल सांगितला व गांवच्या मध्यभागीं असलेल्या पिंपळाच्या फांद्यावर त्यांचे देह लटकूं लागले. दुपारीं तीन वाजल्यापासून दुसऱ्या दिवसाच्या पहाटेपर्यंत हें सत्र चालून शेवटीं झाडांवर जागा नाहीं म्हणून थांबलें. फरुक्काबाद शहरांत नबाबाचा एक बडा अधिकारी असल्याचें कळल्यावर 'तो आमच्या हवालीं न केल्यास शहराची राखरांगोळी होईल,' अशी इंग्रज सर सेनापतीनें धमकी दिल्यामुळें लोकांनीं त्याला पकडून इंग्रजी लष्करांत आणलें, त्याची वरच्याप्रमाणें व्यवस्था झाली. त्याखेरीज नबाबाचे दोघे नातलग कैदेंत होते. हे मातबर इसम म्हणून त्यांच्या शिक्षेला कॅनिंगच्या संमतीची गरज होती. ती संमति ता. २५ जानेवारीस इकडे लष्करांत पोचली.

शहराच्या मध्यभागीं फासाचें यंत्र उभें होतेंच. या इसमांना पालख्यांतून वधस्थानीं आणलें व फांसावर चढविलें. त्यांना पाहण्याकरितां रस्त्याच्या दुतर्फा व घरांच्या गच्च्यांवरून माणसांची खेंचाखेंच झालेली होती.

अपराधी मानलेल्या इसमांच्या देहान्ताचा प्रसंग वस्तुतः प्रेक्षकांवर इष्ट परिणाम करील असा गंभीर पाहिजे, पण इंग्रज सैनिकांना तो एक प्रकारें मौजेचा खेळ वाटत असल्याची माहिती एका इंग्रजानें त्याबद्दल निषेध व्यक्त करून लिहिली आहे. सदर इंग्रजाला प्रथम लोकांची गर्दी पसरलेली दिसली. अजून फांशीं जाणाऱ्या इसमाचा पत्ता नव्हता, इतक्यांत जवळच्या खेड्यांतून विक्रीसाठीं अंडीं, कोंबडी घेऊन गांवकरी आले तेव्हां त्यांच्या खरेदीचा व्यवहार सुरू झाला. आतां फांशीचा बळी तेथें लष्करी पहाऱ्यांत आला. त्याला खाटेवर बांधून ठेवले होते. फांशीच्या आधीं त्याचा पोषाख काढून घेतला मग फटक्यांचा मार दिला; हे विधि आटपून फांसावर टांगलें. त्याच्या गळ्यावर फांस जुळवीत असतां सोजरानें त्याच्या तोंडावर चपराक मारली. हा उपमर्द त्याला असह्य होऊन संतापानें 'माझ्या हातीं तलवार असती तर—ती नाहीं म्हणूनच तुला अशा मस्तीनें वागतां आलें,' वगैरे वाक्यें त्यानें उच्चारलीं. आणखी एका इंग्रजानें या प्रसंगाच्या माहितीला लहानशी पुस्ती जोडली आहे. हिंदु-मुसलमान मरणाला भीत नाहींत; मरण अटळ आहे असें दिसतांच हिंदु-मुसलमान मरणाविषयीं उत्सुक बनतो, त्यांतून परधर्मी इंग्रजाच्या हातून येणारें मरण हें स्वर्गाचें द्वारच अशा भावनेनें तो त्याच्या स्वागताला सिद्ध राहतो, या अनुभवानें चिडून इंग्रजांनीं हिंदु असेल तर त्याच्या तोंडांत गोमांस व मुसलमान असल्यास त्याच्या तोंडांत डुकराचें मांस बलात्कारानें कोंबण्याची नवी रीत अंमलांत आणली होती. गोमांसाच्या व डुकरमांसाच्या प्रयोगानें दोन्ही समाज आपापल्या इष्ट परलोकाला मुकतात, अशी शिक्षा देणाऱ्या इंग्रजांची समजूत सदर लेखकानें नमूद केली आहे. हिंदु मनुष्य अग्निसात् केल्याखेरीज आपल्या इष्ट परलोकीं पोचत नाहीं, म्हणून त्याचा सूड उगविण्यासाठीं त्याला खाड्यांत लोटून देण्याचा प्रघात बऱ्याच ठिकाणीं इंग्रजांनीं स्वीकारला होता, त्यामागें हीच समजूत दृष्टीस पडते. फांशीं द्यायचें म्हणजे गुन्हेगार ठरविण्यांत आलेला माणूस कोणत्याहि रीतीनें मारायचा अशा तऱ्हेचीं उदाहरणें इंग्रजांच्या आठवणींतून पाहायला सांपडतात. कित्येकदां फांशीं देण्याचें काम शिपाई-गिरीच्या पेशाला कमीपणा आणणारें आहे, असें बोलून कांहीं स्वाभिमानी

गोरे सैनिक त्या कामासंबंधाची मुलकी अंमलदारांची विनवणी झिडकारीत, अशीं देखील उदाहरणें क्वचित् घडलीं. सैनिकांनीं नकार दिल्यास गांवांतील हलक्या जातीच्या माणसांना द्रव्याची लालूच दाखवून इंग्रज हें मनुष्यवधाचें काम उरकून टाकीत असत.

शम्साबादची लढाई

फत्तेगडापासून थोड्या अंतरावर गंगा नदीच्या कांठीं शिपायांचा फार मोठा जमाव लढाईच्या तयारीनें गोळा होत असल्याचें समजल्यावरून कॅम्बेलनें एक सेनाविभाग त्या जमावाला नजरेखालीं ठेवण्याकरितां पाठविला आणि एकदां स्वतः कॅम्बेल तिकडे टेहळणी करायला गेला. कॅम्बेल रोहिलखंडाकडे प्रथम जाणार, या कल्पनेनें रोहिलखंडांतील शिपाई व त्यांचे साथीदार लढाईची सिद्धता करीत होते, पण इंग्रजी फौजेची शिपायांच्या कल्पनेला दुजोरा देणारी हालचाल दिसेना, तेव्हां शिपायांनीं शम्साबाद नांवाच्या जागीं नवें ठाणें उभें केलें. त्याची उपेक्षा करणें योग्य नव्हे, हें लक्षांत घेऊन त्यावर इंग्रजी सैन्य चालून गेलें. शिपायांनीं तोफांचा उपयोग फारसा केला नाहीं. सुरवातीस थोडा वेळ तोफा उडविल्या व इंग्रजांच्या तोफा सुटूं लागतांच शिपायांनीं तोंड फिरवून उलट दिशेची दौड आरंभली. त्यांचे पुष्कळ लोक पाठलागांत मेले, पण या प्रसंगीं शिपायांच्या घोडदळाची कामगिरी वाखाणण्याजोगी झाल्याची साक्ष इंग्रजी पुस्तकांतून आहे. शिपायांचा विश्वास आपल्या तरवारीवर अधिक असल्याचें वृत्त पूर्वीं सांगितलें आहे. मरतां मरतांसुद्धां शिपाई शत्रूला आपल्या तरवारीच्या तीक्ष्ण धारेचा व कौशल्याचा केव्हां केव्हां असा परिचय करून देत असत कीं पुढें कबरेंत कायमचें किंवा इस्पितळांत दीर्घकाळ राहण्याची त्यावर पाळी यावी. इंग्रजांच्या पुष्कळ सैनिकांना या झटापटींत शरीराचे अवयव तुटल्यानें रणांगण सोडणें भाग पडत असे, पण पळतां पळतां जीव वांचविण्यासाठीं इतस्ततः एकेकट्या वीरानें दाखविलेलें शौर्य कौतुकाचें असलें तरी रण फुटून शत्रु जोरावल्यावर त्याचा उपयोग नसतो. तोच अनुभव शम्साबादला आला. शिपायांचा गोट लुटला गेला. त्यांनीं तोफा गमावल्या. यापुढें गंगेच्या अलीकडे येण्याचें साहस शिपायांना करवणार नाहीं, असा लढाईचा परिणाम झाला. ही लढाई जानेवारी अखेरीची ( ता. २७ ) असून त्यानंतर कॅम्बेलनें आपलें सारें लक्ष लखनौच्या स्वारीकडे लावलें.

### लखनौ कीं रोहिलखंड ?

सगळा जानेवारी महिना कॅम्बेलनें फत्तेगडास व्यर्थ घालविला, अशा ग्रहानें त्याविरुद्ध वृत्तपत्रांतून टीका चालू झाली. सर सेनापति स्वस्थ कां याचें थोडेंसें स्पष्टीकरण 'आधीं रोहिलखंड कीं आधीं लखनौ ?' या प्रश्नाच्या ओढाताणींत आढळतें. आधीं रोहिल खंड चेपावें असें सरसेनापतीचें ह्रदत, तर आधीं लखनौ जिंकावें, असा गव्हर्नर-जनरलचा मनोदय होता. कॅम्बेलची दृष्टि केवळ लष्करी होती, तर लखनौच्या पाडावाचें राजकीय महत्त्व कॅनिंगच्या मनांत ठसलें होतें. 'जें महत्त्व दिल्लीचें होतें तेंच आतां लखनौचें आहे. सगळ्यांचे डोळे लखनौ जिंकण्याकडे गुंतलें आहे. लखनौ जिंकण्यावर इंग्रजांच्या सामर्थ्याचा कस ठरणार आहे. तेथें एक हक्कदार उभा असून तेथील जनतेचा त्याकडे ओढा आहे. त्या शहरानें नव्या राज्यनिर्माणाचें माहात्म्य-संपादन केलें आहे; यासाठीं लखनौ प्रथम पादाक्रान्त करावें; मग रोहिलखंडाचा समाचार घेतां येईल' अशी कॅनिंगची विचारसरणी होती. 'आधीं रोहिलखंडांत शिरून तेथील उठाव लखनौस ढकलून तेथें तो ठेचावा' असें कॅम्बेल कॅनिंगला समजावीत होता. हिंवाळ्यांत रोहिलखंडाची वाट लावावी, या हेतूमागें गोऱ्या सैनिकांना उन्हाळ्यामध्यें धावपळ करायला नको, अशी कॅम्बेलची कल्पना होती. नेपाळांतून जंगबहादुर मोठी फौज घेऊन येत आहे त्याला लखनौ जिंकण्याच्या मानाचा वाटा हवा असल्यानें 'आधीं लखनौ' हा निश्चय सफल करणें अगत्याचें, ही गोष्ट कॅनिंगनें सर सेनापतीच्या निदर्शनास आणली होती. हा दोघांचा विचार-विनिमय पत्रद्वारें सुरू होता. शेवटीं कॅनिंगच्या विचाराला संमति देऊन फेब्रुवारींत कॅम्बेलनें कानपुरास फौज वाढविण्याला सुरुवात केली. त्यानें दिल्लीकडून कांहीं सेनाविभाग बोलावले. पंजाबामध्यें रोहिलखंडाला दाबांत ठेवण्यासाठीं एक विभाग नव्यानें सिद्ध केला. या अवधींत कॅम्बेल फत्तेगडनंतर काय करणार, या प्रश्नाचें सर्वांना कोडें पडलें होतें. तें कोडें लखनौकडे दर दिवशीं सैन्य जाऊं लागलें तेव्हां सुटलें. फेब्रुवारीच्या ता. ४ ला कॅम्बेल कानपुरास पोचला व ७ तारखेला अलाहाबादेस कॅनिंगशीं भावी कर्तव्याच्या हितगुजासाठीं गेला. अवघ्या दोन दिवसांत आपलें खलबत उरकून तो ता. ९ ला कानपुरास परतला. ता. २७ रोजीं लखनौ जवळच्या आलमबागेस जाऊन आउटरॅमला भेटला. तो १८५७ च्या

नोव्हेंबरांत कॅम्बेलनें आउटरॅमला ३००० लोकांनिशीं तेथें मुद्दाम ठवलें होतें. आउटरॅम हा लखनौच्या उठावाला कांट्याप्रमाणें सलत होता. त्या उठावाच्या स्वैरतेला आउटरॅमचा पायबंद साहजिकच नकोसा असल्यानें तेथील शिपाई-गर्दी त्याला उखडून काढण्यासाठीं काय करीत होती ती माहिती आतां सांगायला पाहिजे.

**आलमबागच्या झटापटी**

नोव्हेंबर अखेरपासून आउटरॅम आलमबागेस तळ ठोकून बसला असतां यांनीं ता. २२ डिसेंबरपर्यंत मौलवी, बेगम किंवा शिपायांचे दुसरे पुढारी त्याला विशेष छेडलें नाहीं. तो आपलें ठाणें निरनिराळ्या प्रकारें मजबूत करीत होता, तर शिपायांचे नेते इंग्रजांची धाड येईल तेव्हां तिला अडविण्याकरितां तटासारखे बंधारे, बुरूज, तोफांचे मोर्चे, घरांघरांतून बंदुकीच्या उपयोगासाठीं तजवीज, याप्रमाणें तयारी करण्यांत गुंतले होते. आउटरॅमला लखनौच्या आसपास कोणताहि जिन्नस मिळूं शकणार नाहीं, असा शिपायांनीं कडक बंदोबस्त अंमलांत आणला होता. रसदेसाठीं त्याला कानपुराकडे पाहावें लागत होतें व ती रसद सुरक्षित पोचावी म्हणून आउटरॅमला आपल्या फौजेच्या तुकड्या कानपूरकडे पाठवाव्या लागत आणि त्या मानानें त्याच्या ठाण्याचें मनुष्यबळ उणें पडे. आउटरॅमला आलमबागेंत राहणें मंजूर नव्हतें. कॅम्बेलनें तें त्याच्यावर लादलें. नंतर आलमबागेंतील इंग्रजी फौज कमी करण्याचा कॅम्बेलचा इरादा होता, त्याला कडाडून विरोध केल्यामुळें ती आपत्ति टळली व जेव्हां शिपायांनीं पहिला हल्ला केला तेव्हां त्याचा प्रतिकार पुरेशा सैन्यानें आउटरॅम करूं शकला. ता. २२ डिसेंबरपासून हल्ल्यांना सुरुवात झाली. नंतर १२ जानेवारीला दुसरा हल्ला करण्यांत आला. या वेळीं रसदेच्या बचावाकरितां गेलेल्या सैनिकांच्या अभावीं आउटरॅमची स्थिति थोडी कठिण होती. त्यावर लखनौचे ३० हजार लढवय्ये चालून आले. पहिल्या वेळीं लखनौकरांच्या चार तोफा हिरावून इंग्रजांनीं त्यांना मैदान सोडायला लावलें. दुसऱ्या ३० हजारांच्या हल्ल्याचा पहिल्यासारखाच शेवट घडला. १६ जानेवारीची चढाई धिटाईची होती. परंतु लढणारे हलके पडले. १५ फेब्रुवारीला किरकोळ झटापट होऊन तिच्यांत फैजाबादचा मौलवी जखमी झाल्यामुळें शिपाई निकरानें लढले. यानंतर लखनौकरांना इंग्रजी ठाण्याच्या खांचाखोंचा समजून त्यांनीं जवळच चर खणून झाडाझुडपांच्या आश्रयानें लढण्याची

तयारी केली. फेब्रुवारींत लखनौवाल्यांना इंग्रजांच्या वाढत्या हालचालीवरून पुढचें संकट स्पष्ट दिसूं लागलें; म्हणून त्यांनीं फेब्रुवारीच्या २१ व २५ तारखांना दोनदां आलमबाग उधळून टाकण्याचे प्रयत्न केले. या प्रयत्नांत डावपेंचाची कमतरता नव्हती, पण लढण्याचा उत्साह भरपूर दिसेना, असें इंग्रजांचें मत दृष्टीस पडतें. आउटरॅमनें उत्तम हेरांचा संग्रह केला असल्यानें त्याला लखनौकरांकडील बातम्या अचूक मिळत असत. ता. २१ फेब्रुवारीच्या हल्ल्यापूर्वीं फिरंगी नष्ट करायचा किंवा आपण मरून जायचें अशी हिंदूंनीं गंगेची व मुसलमानांनीं कुराणाची शपथ घेतली होती, असें आउटरॅमला हेरामार्फत अगाऊच कळलें होतें. भविष्यवाद्यांनीं विजयाला हे दिवस अनुकूल असल्याची प्रेरणा लखनौच्या शिपायांना दिली, ही हेरांनीं दुसरी बातमी आणली होती. केव्हां केव्हां भाबड्या श्रद्धेचा चमत्कार इंग्रजांच्या दृष्टीस पडे. एका हल्ल्याच्या अघाडीवर मारुतीच्या रूपांतला पुढारी होता. लखनौ हा रामचंद्राच्या अयोध्येचा प्रदेश. रामाचा सेनापति वानर, त्याचें रूप धारण केल्यानें तसें अचाट बळ अंगांत संचरून इंग्रजांचा फडशा उडवितां येईल, या श्रद्धेच्या परिणामीं त्या पुढाऱ्याला घायाळ होऊन इंग्रजांच्या कैदेंत पडावें लागलें. प्रथम तें रूप दिसतांच इंग्रजांमध्यें उद्भवलेल्या आश्चर्याचाहि मग निकाल लागला.

## पूर्वेकडील कुमक

लखनौस लढाई सुरू करण्यापूर्वीं कॅम्बेलनें ठिकठिकाणांहून जी कुमक बोलावली होती तिच्यांत बनारस जिल्ह्याकडून एक विभाग बोलावला होता. नवाबशाहीचा पूर्वभाग सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावर होती व तिच्या अनुरोधानें एक दोन किरकोळ झटापटी झाल्या. नंतर तो १९ फेब्रुवारीला लखनौजवळ जमविल्या जाणाऱ्या लष्करांत दाखल होण्यासाठीं निघाला. या फौजेशीं सामना द्यावा म्हणून नवाबशाहीच्या हद्दीवर मेहेंदी हसन नांवाचा एक पुढारी हजारों लोकांनिशीं सज्ज उभा होता. चंदा नांवाच्या गांवीं त्याचा दुय्यम बंदा हसन अशाच मोठ्या जमावासह या बनारसवाल्या कुमकेला पिटण्याची वाट पाहात होता. या दोघांच्या पाठीशीं हजारों माणसें दिसलीं तरी खरे कसलेले शिपाई २५०० हून जास्त नव्हते. बाकीचे सारे तालुकदारी बरकंदाज बारगीर असल्यामुळें लढाई म्हणतां येईल असें कांहीं घडलेंच नाहीं. तालुकादारांचे हिंदु लढवय्ये नवाबशाही मुसलमान मान-


ईशान्य हिंदुस्थान
ताडुम
काठमांडू
गोरखा
दार्जिलिंग
जालपैगुरी
कुचबिहार
गोहत्ती
शिलाँग
चेरापुंजी
दिब्रुगड
गोरखपूर
बेस्ती
सेवान
मुजफरपूर
दिनापूर
पाटणा
भागलपूर
राजमहल
मालधा
दिनाजपूर
रंगपूर
गया
सासेराम
हजारीबाग
रांची
मुर्शिदाबाद
बेहरामपूर
पुरुलिया
राणीगंज
बर्द्वान
कृष्णगड
फरीदपूर
डाका
कोमीला
जेसोर
हुगळी
चंद्रनगर
बराकपूर
कलकत्ता
डायमंड बंदर
बाकरगंज
नोआखली
चितगांव
मिदनापूर
बालासोर
कटक
जगन्नाथपुरी
संबलपूर
अक्याब
अराकान
मंडाले
आवा
पागान
ढाका
सिलहट
कछार
इंफाळ
आसाम
ओरिसा
बिहार
बंगाल

कऱ्यांच्या नेतृत्वाखालीं मनापासून लढूं इच्छित नव्हते, असें इंग्रज माहीतगारांचें मत आढळतें. बंदा हसन व मेहेंदी हसन यांना इंग्रजी फौजेनें आपल्या वाटेवरून सहज झाडून टाकलें. आणखी दोन मजलांवर बुधायन नांवाचा किल्ला होता, पण शिपायांच्या जमावाला चकवून तो किल्ला इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतला. नंतर सुलतानपूर शहरीं खणाखणीची लढाई जुंपेल ही अपेक्षा इंग्रजांच्या सेनाधिकाऱ्यानें एक युक्ति चालवून सफळ होऊं दिली नाहीं. यासंबंधांत इंग्रजाचें असें वर्णन आहे कीं, समोरून हल्ला करण्याच्या आविर्भावानें धुळीचे लोट प्रथम उठविले व त्याच्या आडून हा सेनाधिकारी शिपायांवर तुटून पडला. दोन्ही फौजा एका खोल नाल्याच्या दोन बाजूंला उभ्या होत्या. समोरचा भाग उतरायला अवघड होता, म्हणून तेथें शिपायांची कडेकोट तयारी होती. परंतु थोड्याच अंतरावर नाल्याची जी उथळ व सोपी जागा होती तेथून इंग्रज सेनाधिकारी पलीकडे गेला. नबाबशाहीच्या तोफखान्याचा गफूर बेग नांवाचा प्रसिद्ध सेनानी तेथें मोठ्या उमेदीनें आला होता. पण त्याची इंग्रजानें अतिशय निराशा केली. थोडा वेळ तोफांची गोळागोळी झाली व आपली सैन्यरचना विस्कटल्याचें पाहतांच गफूरबेगचे योद्धे पळत सुटले. त्यांच्या ३४ तोफा इंग्रजांच्या हातीं पडल्या. लखनौस ४ मार्च रोजीं पोचण्यापूर्वीं या इंग्रजी फौजेनें वाटेंत एक गढी व तोफा जिंकल्या. त्याच्या मागून सुमारें १० हजार गुरख्यांचें सैन्य घेऊन जंगबहादुर ता. ११ रोजीं लखनौस दाखल झाला.

### लखनौचा पाडाव

ता. २ मार्च रोजीं लखनौची शेवटची लढाई सुरू होऊन ती जवळ जवळ वीस दिवसांनीं संपली. कॅम्बेलच्या हाताखालीं या वेळीं ३१ हजार सैन्य व १८० तोफा याप्रमाणें सरंजाम होता. लखनौमध्यें लाखाच्या आंतबाहेर लढवय्यांचा समुदाय असल्याची गणना इंग्रजांनीं केली होती. तालुकदारी बरकंदाजांना अन्यत्र पाठवून इंग्रजाच्या तालमींत व लढायांत कसलेले शिपाई लखनौच्या पुढाऱ्यांनीं शहर लढविण्यासाठीं निवडले होते. त्यांची संख्या हजारों इतकी मोठी होती. दिल्ली गमावल्यावर, कानपूर व फत्तेगड वगैरे ठिकाणीं सामन्यांत हरल्यावर तिकडचे बहुतेक शिपाई लखनौस एकवटले होते. नबाबशाहीच्या मुलखांतल्या शिपायांना लखनौ माहेरासारखें वाटत असल्यास

तें स्वाभाविक होतें. तेथें हजरत महाल बेगम व नबाबशाहींतले दुसरे नामांकित कर्ते पुरुष आणि फैजाबादचा मौलवी यासारखी मंडळी शिपायांच्या उत्तेजनाला होती. लखनौ हेंच आपल्या कर्तबगारीचें शेवटचें स्थळ आहे, याचीसुद्धां शिपायांना तीव्र जाणीव असल्यानें त्यांनीं १८५७ च्या नोव्हेंबर-पासून शहर झुंजविण्याची कडेकोट तयारी केली होती. ज्या बाजूनें हेवलॉक आउटरॅम आले त्याच बाजूचा कॅम्बेलनें नोव्हेंबरांत आदर केल्यामुळें आतां-सुद्धां ती बाजू इंग्रज स्वीकारील ही कल्पना शिपायांच्या फसवणुकीस कारण झाली. त्यांनीं ती बाजू भक्कम करून शहराचा उत्तर भाग मोकळा ठेवला. कॅम्बेलच्या दृष्टींतून हा दोष निसटला नाहीं. उत्तरेकडील कांहींशा उघड्या जागेचा फायदा घेण्याचें त्यानें ठरविलें. शहरांत शिरल्यानें होणारी मनुष्यहानि टळावी म्हणून तोफांचा जास्तींत जास्त उपयोग करण्याविषयीं कॅम्बेलचा निश्चय होता. गोमती नदीकांठीं लांबवर पसरलेले राजवाडे, बागा वगैरे ठिकाणें शिपायांनीं भरलेलीं होतीं. कॅम्बेलनें त्यांचें आक्रमण पार पाडण्याकरितां नदी तरण्याचीं साधनें बरोबर ठेवलीं होतीं.

ता. २ ला कॅम्बेलनें स्वतःच लढाईला आरंभ केला. उत्तरेकडून लांबच्या वळणानें तो दिलखुष वाड्याच्या सपाटीवर आला. शिपायांच्या तोफा उत्कृष्ट मारा करीत होत्या. यासाठीं त्यानें आपले सैनिक माऱ्यापलीकडे हटविले. पण जीं स्थळें हातीं आलीं तेथें आपल्या तोफा उभ्या करून ता. ३ रोजीं त्यांच्या मारानें शिपायांच्या तोफा बंद पाडल्या. त्याच रात्रीं गोमतीवर दोन पूल बांधण्याचें काम सुरू होऊन ता. ५ च्या सकाळीं एक पूल तयार होतांच आउटरॅम नदीपलीकडून शहराशीं भिडला. ता. ९ पर्यंत आउटरॅमनें शिपायांचीं ठाणीं मारलीं. चक्करकोठी नांवाची इमारत हातीं येतांच त्यावर इंग्रजांचें निशाण फडकावें, हा संकेत ता. ९ रोजीं यशस्वी होऊन कॅम्बेलनें आपली चढाई आरंभली. ता. ११ पर्यंत बऱ्याच इमारती व बागा शिपायांच्या हातून गेल्या होत्या. ता. ११ रोजीं बेगम कोठीवर शिपायांनीं जिवाची आशा सोडून इंग्रजांच्या चढाईला तोंड दिलें. बेगम कोठींत शिपायांचीं सहाशें प्रेतें पडलीं होतीं, यावरून लढाईचें घोर स्वरूप लक्षांत येईल. या ठाण्याची लढाई जोरावली व तिकडच्या वेधांत कॅम्बेल असतांना जंगबहादुर त्यांच्या भेटीस आला. या भेटीचा सोहळा यथासांग आटपला खरा, पण त्यांत कॅम्बेलचें चित्त नव्हतें. कॅम्बेलचा

स्वभाव औपचारिक समारंभांना अनुकूल नव्हता, त्यांत या वेळीं जवळ लढाई धडाडलेली होती. ठरल्याप्रमाणें भेटीचा कार्यक्रम आटपतां आटपतां बेगमकोठी घेतल्याची बातमी समजतांच कॅम्बेलनें जंगबहादुराला तत्काळ निरोप दिला. बेगमकोठीच्या झगड्यांतील इंग्रजांची मोठी हानि म्हणजे हॉडसनचा मृत्यु ही होय. इकडे बेगमकोठी लढत असतां आउटरॅमच्या हालचाली बंद नव्हत्या. त्यानें शिपायांना मागें रेटीत रेटीत गोमतीचा लोखंडी पूल गांठला. पुढें जो दगडीपूल होता तेथें शिपायांच्या कडेकोट लढाऊ बंदोबस्तापुढें आउटरॅमला माघार घ्यावी लागली. ता. १२ व १३ या दिवशीं विशेष प्रगति करतां आली नाहीं. ता. १३ ला जंगबहादुरची कामगिरी सुरू झाली. ता. १४ रोजीं शहराशीं गुरखे झुंजत होते, तेव्हां इंग्रजानें इमामवाडा काबीज केला. येथें शिपायांनीं थोडा वेळ चांगली मर्दुमकी दाखविली. त्या दिवशीं इंग्रजी फौज कैसर बाग नांवाच्या मुख्य वाड्यानजीक पोचली. शिपायांचीं पुष्कळशीं ठाणीं इंग्रजानें घेतल्यामुळें शिपायांनीं कैसरबाग लढविण्याचा नाद सोडला. कैसरबागेंत शिपायांनीं फार मोठी तयारी केली आहे, अशा वार्ता असल्यानें कॅम्बेलच्या योजनांमध्यें स्वतंत्र चढाईसाठीं कैसरबाग हें ठिकाण राखून ठेवलें होतें. ता. १४ रोजीं तो वाडा पडल्याचें ऐकून कॅम्बेलला वाटलें कीं, वाडा सोडण्यांत शिपायांचा कांहीं डाव असावा. स्फोटक दारू पेरून ठेवायची व तिच्या भडक्यांत इंग्रजांचे सैनिक होरपळायचे मरायचे, हा पूर्वीचा अनुभव कॅम्बेलच्या आठवणींत असल्यानें तो बेचैन झाला व त्यानें कैसरबागेबाहेर सैनिकांनीं राहावें, असा हुकूम पाठविला. कैसरबागेसंबंधांत कॅम्बेलची दारूबद्दलची शंका निरर्थक ठरली. पण ता. १७ रोजीं जुम्मामशीद घेतल्यावेळीं आउटरॅमच्या ४२ सैनिकांना दारूच्या स्फोटानें मरण्याची पाळी आली. त्या मशिदीजवळ दारू असल्याचें कळतांच ती गोळा करून खोल विहिरींत टाकण्याचें काम सुरू झालें. ही दारू टिनच्या डब्यांतून व कातडी थैल्यांतून भरलेली होती. ते डबे विहिरींत सोडीत असतां एक डबा विहिरीच्या कडेवर आदळून पेटला. अशीं उदाहरणें पुष्कळच आहेत. ता. १९ या दिवशीं इंग्रजांची प्रगति व शिपायांचा पळ या दोन गोष्टी चालू होत्या. हजारों शिपाई इंग्रजादेखत शहराबाहेर सुखरूप चालते झाले. परंतु जातां जात त्यांनीं आलम बागेवर जो एक चांगला हल्ला केला, तो शिपायांच्या अंगावर उलटला. जंगबहादुर त्या दिवशीं शहर साफ

करीत होता. पुढच्या दोन दिवसांत शिपायांचीं किरकोळ ठाणीं जिंकलीं. आतां मूसाबाग हें एक मजबूत ठिकाण उरलें होतें. तेथें बेगम, तिचा मुलगा, मौलवी आणि बाकीचे पुढारी ही मंडळी जमली होती. ता. १८ रोजीं मूसाबागेवर चढाई करून तें ठिकाण इंग्रजानें मोकळें केलें.

ता. १८ ला लखनौची लढाई वास्तविकपणें संपली होती. परंतु सैनिकांची प्राणहानि शक्यतोंवर टाळायची हें कॅम्बेलचें धोरण असें होतें कीं, ज्या योगानें शिपाई देखील मोठ्या प्रमाणांत वांचले. ठाण्यांतून बाहेर पडणाऱ्या शिपायांना घोडदळामार्फत झोडपायचें ही युद्धनीति कॅम्बेलनें अंमलांत आणली नाहीं. एकदां पळणाऱ्या शिपायांचा पाठलाग करण्याची परवानगी आउटरॅमनें मागितली असतां 'एकहि सैनिक दगावणार नाहीं, ही अट मान्य असेल तर पाठलाग करावा' असें उत्तर देऊन कॅम्बेलनें परवानगी नाकारण्याचा पर्याय काढला. आउटरॅमला समोरून निर्धास्तपणें जाणारे हत्यारबंद शिपाई पाहावे लागले. मुसाबागच्या लढाईनंतर पळणाऱ्या शिपायांची लांडगेतोड करण्यासाठीं कॅम्बेलनें घोडदळाची नेमणूक केली होती. पण शिपाई डोळ्याआड झाल्यावर त्या घोडदळाचा सरदार युद्धभूमीवर उगवला. अर्थात् पाठलागाच्या तारांबळींतून शिपाई सुटले. शिपायांना अशा रीतीनें जाऊं दिलें, म्हणून त्यांचें धैर्य वाढलें. कित्येकांच्या ठिकाणीं युद्धाचा उत्साह संचरला. त्यांना जमवून मौलवी शहरांत शिरला व एक तटबंदीची भक्कम जागा धरून बसला. त्याच्याजवळ दोन तोफा व अढळ निश्चयाचे शिपाई होते. ता. २१ रोजीं मौलवीच्या समाचारास गेलेल्या इंग्रजांना कडव्या शिपाईगिरीचा मासला पाहायला सांपडला. शिपायांचा प्रतिकार अतिशय प्रखर होता. इंग्रजांना या प्रतिकारानें मोठ्या प्राणहानीची ठोकर बसली. प्रत्येक शिपाई आपल्या प्राणाचे मोल इंग्रजांच्या हानीनें वसूल करण्यासाठीं झटत होता. शेवटीं मौलवी निसटल्यावर ही लढाई निकालांत निघाली. कॅम्बेलनें अवघ्या वीस दिवसांत लखनौसारखें अवाढव्य विस्ताराचें व लक्षावधि लढवय्यांनीं भरलेलें शहर, आपल्या सैनिकांचा हळहळ वाटण्याजोगा प्राणघात होऊं न देतां पादाक्रांत केलें, यासाठीं त्याचे येथील व इंग्लंडांतील वरिष्ठांनीं धन्यवाद गाइले. कॅम्बेलच्या पराक्रमानें लखनौतील शिपायांची गर्दी जशी मोडली तशीच शहराची वस्तीहि मोडली. तरी तेथें गर्दी माजली होती, पण ती इंग्रजांच्या सैनिकांनीं चाललेल्या लुटालुटीची होती.

### बायकांची शिपाईगिरी

लखनौ गमावणें म्हणजे आपल्या उठावाचें अंतिम साध्य कायमचें हरपण्यासारखें असल्याच्या तीव्र जाणिवेनें शिपायांनीं लखनौतील पुष्कळशीं ठाणीं मोठ्या जिद्दीनें लढविलीं. येथें मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट लढाऊ नीग्रो बायकांची आहे. एका जागीं या बायका इंग्रज सैन्याशीं पुरुषांइतक्याच खंबीरपणानें झगडल्याची वस्तुस्थिति त्यांच्या मृतावस्थेनें उघडकीस आणली. मरून पडेपर्यंत त्या स्त्रिया कीं पुरुष याचें ज्ञान इंग्रजांना झालें नव्हतें. त्यांतली एक बाई झाडावर पालवींत दडून बसली होती. तेथून तिच्या अचूक गोळीबारानें कित्येक इंग्रजांचा बळी घेतल्यानंतर इंग्रजांकडील बंदुकांनीं तिला खालीं पाडलें. मग कळलें कीं ती बाई होती. या निग्रो स्त्रिया बेगमे-करितां लढत होत्या हें सहज समजण्यासारखें आहे. बेगम हजरत महाल ही लखनौस ज्या वाड्यांत होती, तो वाडा इंग्रजांच्या रणधुमाळींत सांपडला तेव्हां या बेगमेनें इंग्रजांच्या हातावर तुरी दिल्या; तथापि दुसऱ्या बऱ्याच स्त्रिया इंग्रजांनीं कैद केल्या. पडदानशीन स्त्रिया आपले चेहेरे उघडे ठेवून बसलेल्या असतां इंग्रज सैन्य एकदम त्यांच्यापुढें उभे राहतांच त्यांनीं किंकाळ्या मारीत भिंतीकडे तोंडें फिरविलीं. 'तुम्ही बड्या जंगी (लष्करी) लाटाच्या कैदी आहां' असें कळल्यावर त्यांचें भय जाऊन त्या आनंदी वृत्तीनें वागूं लागल्या. त्यांतल्या एका अल्प वयाच्या तरुणीनें इंग्रजाच्या कैदेबाहेर जाण्याची इच्छा दर्शविली, कारण ती गुलाम होती. इंग्रजांनीं तिची सुटका केली असती, पण तिच्या मालकिणीनें हरकत काढल्यामुळें तिला बाकीच्या स्त्रियांबरोबर सक्तीनें राहणें भाग पडलें. 'कालान्तरानें शिपाई इंग्रज चा फडशा पाडतील' असा विश्वास या स्त्रिया दाखवीत होत्या. या स्त्रियांप्रमाणें शिपायांच्या कैदेंतील दोन स्त्रिया इंग्रजांच्या गोटांत आल्या. लखनौस कांहीं इंग्रज स्त्री-पुरुष जिवंत असल्याच्या बातम्या वारंवार इंग्रज ऐकत होते. हे लोक जिवंत भेटण्याची आशा लखनौवर हल्ला करतांना इंग्रजांनीं सोडली होती. हा हल्ला लखनौवर कोसळण्याच्या आगेमागें पुरुषांची कत्तल उडाली. फक्त या दोन बायका वांचल्या. त्यांना पाहून इंग्रजांना समाधान वाटलें. या स्त्रियांचा निर्देश शिपायांच्या उठावांत सांपडलेले सारे इंग्रज शिपायांनीं माणुसकी सोडून—स्त्री-पुरुष-बाळें हा भेद आड न येऊं देतां—ठार केले या आरोपाचें खरें स्वरूप गळीं उतरण्यासाठीं केलेला आहे.

ता. २२ मार्च रोजीं अशी बातमी लागली कीं, लखनौपासून २५ मैलां-वरील 'कुर्सी' नांवाच्या गांवीं शिपायांचा जमाव थांबलेला आहे. त्यांच्या समाचाराकरितां लखनौहून निघालेल्या लष्कराची खबर शिपायांनीं समजून त्यांनीं आपला वेग वाढविला. अपेक्षित ठिकाणीं शिपायांचा पत्ता नाहीं, असें पाहून त्यांच्या मागावर घोडदळ पाठविण्यांत आलें. सुमारें दोन मैल धावल्या-वर उघड्या मैदानांत शिपाई लढण्याच्या पवित्र्यांमध्यें उभे असल्याचें घोडदळाच्या नेत्यांनीं पाहिलें. घोडदळानें तीन वेळा जोराचे हल्ले केले. प्रत्येक वेळा शिपायांची संख्या घटत असूनहि त्यांचा पवित्रा बिलकूल ढिलावला नाहीं. शेवटच्या हल्ल्यांत दोघा इंग्रज युद्धनेत्यांना ठार लोळवून जणूं काय त्यांनीं आपल्या नुकसानीची भरपाई करून घेतली. यानंतर इंग्रजापुढें दम धरणें शक्य नसल्यानें पुष्कळ शिपाई पळत सुटले, त्यांचा पाठलाग करण्यांत आला. परतु या सामन्यांत जे उभ्या जागीं रेसभर इकडे तिकडे न सरकतां घोडदळाशीं झगडून मरण पावले त्यांच्या शौर्याची तो प्रसंग डोळ्यांनीं पाहणाऱ्या व प्रत्यक्ष अनुभवणाऱ्या इंग्रजांनीं तारीफ लिहिली आहे.

### लखनौची लूट

केसरबाग वाडा जिंकला जातांच इंग्रजांच्या काळ्या सैनिकांनीं व बाजारबुणग्यांनीं जी लूट आरंभली तिचे अनुभव इंग्रजांच्या वाङ्मयांत पुष्क-ळच आहेत. ज्याच्या हातीं जें लागेल तें त्यानें आपल्या खिशांत भरावें असा नियम होता. जी वस्तु हालवण्यासारखी नसेल ती जिथल्या तिथें फोडून फेकावी; विध्वंसाच्या अशा आसुरी लालसेनें सगळ्या वाड्यातील हंड्या, झुबर, आरसे वगैरे कांच-सामानाच्या व चिनी मातीच्या पदार्थांच्या ठिकऱ्या उडून त्यांनीं खोल्या, मोठालीं दालनें, अंगणें भरून गेलीं. जरीचीं वस्त्रें आगींत टाकून त्यांतील सोनें चांदी काढून घेण्याचा धडाका सुरू होता. सुंदर घोडा घेऊन एक गोरा सैनिक चालला होता. तो घोडा उत्तम गुणांचा असल्याचें ओळखून एका अधिकाऱ्यानें त्याची मागणी केली; किंमत शंभर रुपये ठरली, पण त्या अधिकाऱ्याजवळ रोकड नव्हती. पुढच्या क्षणीं आपण जिवंत असू कीं नाहीं याचा भरंवसा नसल्यानें किंमत आतांच हातीं पडावी असा घोडेवाल्या सैनिकाचा आग्रह होता. अर्थात् त्या अधिकाऱ्याला घोड्याची प्राप्ति झाली नाहीं. थोड्या अंतरावर दुसरा अधिकारी होता, त्यानें तत्काळ किंमतीची रकम सैनिकाच्या हातावर ठेवून .डा ताब्यांत घेतला.

पहिल्यानें आपण चांगले अश्वपरीक्षक आहों, या समाधानावर वेळ भागवून नेली, पण त्याला सहजगत्या लुटीचा अंश पुढें मिळाला. एका ठिकाणच्या लुटीच्या वाटणीमध्यें तंटा उद्भवून निर्भेळ सोन्याचा हुक्का तंटेखोरांनीं याला देऊन टाकला. हा हुक्का एक फूट उंचीचा होता. एका इंग्रजानें लिहिलें आहे कीं, त्याच्या खोगराच्या थैल्या (पिस्तूल व खाद्यें ठेवण्याच्या) त्याला जड वाटल्या—पाहतो तों त्यांत चांदीचे तुकडे भरलेले होते. शीख सैनिक हिऱ्यामोत्यांचे दागिने रस्तोरस्तीं मातीमोलानें विकीत होते. लखनौचें नबाब घराणें शियापंथी यामुळें तेथें ताबुताचें माहात्म्य विशेष गाजत असे. नबाबाच्या खास ताबुताचें शिखर निर्भेळ सोन्याचें व हिऱ्यामोत्यांनीं मढविलेलें होतें. तें लखनौच्या लुटींत गडप झालें. इमारतीची शोभा किंवा वैभवाचें प्रदर्शन या नात्यानें पाळलेलीं पांखरें, जनावरें सुद्धां भोजनासाठीं लुटून नेलीं. कातड्याच्या लोभानें पिंजरांतल्या वाघाचा बळी घेतला. लखनौ शहरावर दिल्लीप्रमाणें लुटालुटीचीं संकटें सुमारें शंभर वर्षांत ओढवलीं नव्हतीं. शिवाय लखनौचे नबाब विलासांचे रसिक भक्त, यामुळें लखनौच्या महालांतून किती प्रकारची संपत्ति सांठविली असेल याची कल्पना करतां येईल. चांदी, सोनें, हिरे, पाच, माणकें यांचा स्पर्श नाहीं, अशी एकहि वस्तु नव्हती; मग तीं खाण्यापिण्याचीं भांडीं असोत, पानसुपारीचीं पात्रें असोत, हुक्क्याच्या नळ्या असोत, हत्यारें असोत, नगारे ढोलासारखीं किंवा सतार तंबोऱ्यासारखीं वाद्यें असोत; बेगमांचे किंवा नर्तकींचे पोषाख असोत. त्यांच्या प्रत्यक्ष अलंकाराबद्दल बोलायलाच नको. खुर्च्या, मेजे, चौरंग, पलंग किंवा भुईवरच्या लहानमोठ्या बिछाइती असोत—त्यांत चांदी, सोनें, हिरे (पांच, माणके वगैरे) मोती यांचा भाग असायचाच; अशा तऱ्हेचीं वर्णनें, ज्यांनीं लूट पाहिली त्यांनीं लिहून ठेवलीं आहेत. जेथें कोणी सहसा वरीलसारख्या अतिमोलाच्या वस्तु ठेवणार नाहीं, तेथें त्यांना लपवून ठेवलें होतें. पण लष्करी लुटारूंच्या तडाक्यांतून या गुप्त जागा सुटल्या नाहींत. त्यांनीं विहिरी, तळघरें, कोनाडे, कपाटें फार काय पण भिंतीसुद्धां तपासल्या. एक इंग्रज लिहितो कीं, चार दोन दिवसांपूर्वीं ज्या भिंतीच्या आश्रयानें आपण लढाईचा शीण घालवीत होतों, त्या भिंतींतून लक्षावधि रुपयांचा माल लुटारूंनीं बाहेर काढला. लुटारूंची दृष्टि छपविलेल्या संपत्तीचीं स्थळें नेमकीं हुडकून काढण्याच्या कामीं निपुण होतीच, पण त्यांना घर-

भैय्यांनीं सुद्धां मदत केली, असें निदर्शनास आणणारी एका म्हातारीची गोष्ट एका इंग्रजी पुस्तकांत नमूद आहे. लुटीला आळा पडण्यासाठीं बक्षीस-खातें अस्तित्वांत आलें. ज्या खात्यानें गरीब बाजारबुणग्यांची लूट लुबाडली त्या खात्यानें कितीहि कडकपणा अमलांत ठेवला तरी लुटारू सैनिकांची हातचलाखी व शिताफी त्या कडकपणावर कडी करणारी होती. खाजगी खिशांतून जी संपत्ति जिरली तिची गणना करतां येणार नाहीं. बक्षीस-खात्याकडे जी लूट गेली, तिच्या हिशोबाचा आंकडा वेगवेगळा सांपडतो. तथापि तो किमान एक कोटीच्या वर जाऊं शकतो. या आंकड्यांत ता. १ जुलई १८५७ रोजीं सुरू झालेल्या कोंडींत इंग्रजांनीं सुरक्षिततेसाठीं नेऊन ठेवलेल्या खास नबाबी संपत्तीचा समावेश केलेला नाहीं.

जंगम संपत्तीची जशी वासलात लागली तशीच स्थावराचीहि लागली. वाड्यांच्या इमारती तोफा-बंदुकांच्या भडिमारांखालीं अगोदरच फुटून तुटून गेल्या होत्या. त्या पादाक्रान्त झाल्यावर जें जें कांहीं धड दिसेल त्याचा इंग्रजांच्या सैनिकांनीं चक्काचूर आरंभला, याची थोडीशी माहिती मागें दिली आहे. वाड्यांतील खिडक्या, दारें, पुतळे, चित्रें, यांच्यावरदेखील विजयानें मस्तावलेल्या इंग्रज सैनिकांनीं आपला राग उगवून घेतला. वाड्यामध्यें धड असें कांहीं राहूच द्यावयाचें नाहीं, अशी जणूं काय त्यांनीं रणदेवतेच्या पायाची शपथ घेतली होती. इमारतींची ही दशा तर माणसांची अवस्था कशी असेल म्हणून त्या प्रसंगाच्या वाङ्मयाच्या आधारें चौकशी करूं लागतांच शहर ओसाड पडलें होतें, असें दृश्य प्रथम डोळ्यांपुढें येतें. जिकडे तिकडे माणसांचीं व जनावरांचीं प्रेतें पडलेलीं, तीं कुजत असल्यानें सारें वातावरण दुर्गंधीनें भरलेलें, जिकडे पाहावें तिकडे घारी, गिधाडें व कुत्रीं यांचा सुळसुळाट; या प्राण्याबद्दल एक उल्लेख असा सांपडतो कीं, इंग्रजी फौजेच्या मागून हे प्राणी थव्या-थव्यानें मजल दरमजल जात असत— नद्यांतून अगणित प्रेतें वाहात आहेत, असे देखावे तत्कालीन शब्दकारा-गिरांनीं चितारले आहेत. इंग्रजांच्या सैनिकाखेरीज शहरांत जे कोणी सजीव होते ते उपाशीपोटीं इकडे तिकडे खाद्याच्या आशेनें भटकणारे पाळीव पशु होते. माणसें नव्हतीं असें नाहीं. तीं कोण होतीं—तर पळून जाण्याची शक्ति नसलेले किंवा मरण आलें तर सुटका झाली अशा ठाम समजुतीचे भिकारी व इंग्रजांच्या नजरेआड चोरीमारीनें निर्वाह करूं इच्छिणारे चोर. लखनौची

वस्ती बारा लाखांची होती, असें मानलें जात होतें. आतां लढाईनंतर तेथें सैनिकाशिवाय दुसरा कोणी नागरिक दिसेना. युद्धारंभीं पळालेल्या लोकांनीं शहरांत जाण्याचें मनांत आणल्यास मरावें लागेल, अशी धोक्याची सूचना ता. १५ मार्च या दिवशीं इंग्रजांशीं वैर नसलेल्या चौघा व्यापाऱ्यांना ठार मारून गोऱ्या सैनिकांनीं दिल्याची नोंद रसेल या लंडन टाइम्सच्या खास बातमीदाराच्या रोजनिशींत आहे.

### लखनौचे पुढारी

लखनौस १८५७ च्या मे-जूनमध्यें शिपायांच्या उठावानें नबाबशाही मुलखांतील इंग्रजी राज्याच्या शाखा तोडल्यावर त्याचा बुंधा लखनौच्या रेसिडेन्सींत काय तो शिल्लक राहिला. सप्टेंबरअखेरपर्यंत शिपायांच्या माऱ्यास न जुमानतां तो तगला व सप्टेंबरांत त्याला नव्या सैन्याचें खतपाणी मिळाल्यानें थोडा जोम चढला, वगैरे वृत्तान्त पूर्वीं वाचकांच्या डोळ्यांसमोरून गेला आहे. जुलैपासून १८५८ च्या मार्चपर्यंत लखनौंतील शिपायांचा पुढाकार ज्यांनीं घेतला, त्यांचा उल्लेख पूर्वीं केला असल्यानें अयोध्येच्या माजी नबावाची एक बेगम हजरतमहाल हिचें नांव परिचित झालेलें आहे. नबाबाचा जो परिवार मागें राहिला, त्यांमध्यें नव्या इंग्रजी राजवटींत सोसाव्या लागणाऱ्या हालापायीं इंग्रजाविषयीं त्याच्या ठिकाणीं दिवसानुदिवस द्वेषभाव बळावत असल्यास नवल नाहीं. त्या परिवारांतील या कर्तबगार बेगमेला कदाचित् एरवीसुद्धां शिपायांचा पुढाकार लाभला असता, पण तिला बिरजिस कुद्र या नांवाचा एक नऊ-दहा वर्षांचा मुलगा असल्यानें नबाब म्हणून त्याला आघाडीवर ठेवण्याचा एक खास हक्क हजरतमहालजवळ होता. रेसिडेन्सींत इंग्रजाला कोंडण्यापूर्वीं ७ जून रोजीं बिरजिस कुद्राला नबाब या नात्यानें लखनौच्या तक्तावर बसविण्याचा समारंभ एका मुसलमान रिसालदारानें पार पाडला. नबाबानें दिल्लीहून येतील त्या आज्ञा पाळाव्या; सैनिकांनीं मुख्य प्रधान व आपले अंमलदार निवडावे; इंग्रज व त्यांचे सहकारी यांच्या बाबतींत सैन्याची कुलमुखत्यारी राहील, त्याच्या या कारभारांत कुणीहि ढवळाढवळ करूं नये; शिपायांना दुप्पट पगार देण्यांत यावा; अशा मर्यादा शिपायांनीं नव्या नबाबशाहीला घातल्या होत्या.

मंत्रिमंडळाची योजना मागील नबाबशाहीच्या मानकऱ्यांना वेगवेगळे हुद्दे देऊन सिद्धीस नेली. शरफुद्दौला नांवाच्या गृहस्थाला महामंत्र्याची जागा

मिळाली; जमाखर्चाचें अर्थात् फडणिशी खातें महाराजा बालकिशन याच्या हातीं सोपविलें. माजी नवाबशाहींत हे दोघे हाच अधिकार गाजवीत होते. बेगमेच्या मेहेरनजरेंतल्या मम्मूखानाला न्यायखातें मिळालें. मागील नवाबाचा दरबारी राजा जयलालसिंग हा युद्धखात्याचा नियंता बनला. मुख्य मंत्र्याचा नातलग मुजफर अली, मीर मेहेंदी, रिसालदार कासीम खान हे सेनाधिकारी निवडले गेले. लखनौस या वेळीं मॅक्लिआड इनेस या नांवाचा एक लष्करी इंजिनियर होता, त्यानें ही माहिती आपल्या पुस्तकांत नमूद करतांना म्हटलें आहे कीं, हेन्री लॉरेन्सचा ज्यानें चिनहटला ता. ३० जून रोजीं पराभव केला व ज्याच्या अंगीं सेनेच्या नेतृत्वाचे गुण होते तो बरकत अहमद या व्यवस्थेंत गळावा, हें एक आश्चर्य समजावें लागतें. राज्यव्यवस्थेची याप्रमाणें शिपायांच्या शिरजोरीनें मांडणी झाली खरी, पण तिचा कारभार योग्य प्रकारें चालविण्याचें जातिवंत ज्ञान त्यांच्यामध्यें—शिपायांत व पुढाऱ्यांत—नसल्यानें इंग्रजांच्या संकटाची तीव्रता कांहीं अंशी कमी झाली, असा इनेसच्या माहितीचा आशय आहे. ता. ३० जून व १ जुलई या दोन दिवसांत शिपायांनीं इंग्रजाला ठेचण्याचा सडकून प्रयत्न केला. त्यांत त्यांचें कल्पनेबाहेर नुकसान झाल्यामुळें त्यांनीं रेसिडेन्सीला मारलेली मिठी सैल सोडली. अर्थात् मच्छीभवनांतले इंग्रज सैनिक रेसिडेन्सींत निर्विघ्न जावे, अशी एक प्रकारें शिपायांनीं संधीच निर्माण केली. शिपाई लखनौ शहरीं चैन व पुढचें कारस्थान यांत गुंतले. रेसिडेन्सीच्या पश्चिम बाजूला त्यांनीं तालुकदारी लढवय्यांना ठेवलें होतें. या संधींत इंग्रजांनीं आपलें ठाणें जास्त मजबूत केलें. इंग्रजांशीं कसें लढायचें, बाकीचा कारभार कोणी कसा चालवायचा, या गोष्टी वेळ्याइतक्याच महत्त्वाच्या होत्या. त्या निश्चित करण्यावरच पुढील हालचाली अवलंबून होत्या, असा शिपायांच्या ढिलाईबद्दल इनेसचा खुलासा आहे.

बिरजीस कुद्र हा नबाब झाला खरा, पण शिपायांच्या पुढाकाराचे आणखी दोघे हक्कदार होते; एक फैजाबादचा मौलवी सिकंदरशहा ऊर्फ अहमदुल्ला शहा व दुसरा सुलेमान कुद्र. हा नबाब घराण्यांतला पुरुष होता. इनेसच्या माहितीप्रमाणें लखनौ शहरांत मौलवीला पुरेसा पाठिंबा नव्हता. घोडदळाचा ओढा सुलेमान कुद्रकडे होता. चिनहटच्या लढाईचा वीर बरकत अहमद यानेंहि सुलेमानला मान्यता दिली. पायदळ, जुने अधिकारी व मानकरी या सर्वांची बिरजीस कुद्राविषयीं पूर्ण अनुकूलता होती. सैन्याच्या

पुढाऱ्यामध्यें बरकत अहमदचें नांव कां दिसत नाहीं, याचें असें कारण या माहितींतून निघतें. ता. ७ जुलैपासून नव्या व्यवस्थेची अंमलबजावणी सुरू झाली. कोणत्या तुकडीनें कुठें लढायचें, यासंबंधाच्या योजना ठरल्याप्रमाणें शिपायांनीं स्वीकारल्या नाहींत. ज्यांना जसें वाटेल तसें त्यानें लढावें, तोफांची हालचाल मन चाहील तशी करावी, वगैरे अनुभव इनेसनें लिहिले आहेत. स्वैर शिपाईशाही या दोन शब्दांत त्यांच्या वर्तनाचें तात्पर्य सांगतां येतें. जूट, शिस्त, लढण्याचा उत्साह, चिकाटी, धैर्य इत्यादि गुणांचा अभाव आणि युद्धशास्त्राचें व युद्धकलेचें अज्ञान या शिपायांच्या उठावांतील उणीवांचा फायदा इंग्रजांना मिळाला. त्यांच्या तोफांनीं इंग्रजांची खरी हानि झाली नाहीं. त्यांच्या बंदुकांचा मार मात्र प्रखर, अचूक व अखंड चालू असे. पुढच्या तीन महिन्यांत शिपाई लढत होते, पण बेगम, नवाब, मौलवी किंवा सुलेमान कुद्र, आणि निरनिराळे मंत्री कोणती कामगिरी बजावीत होते, याची कल्पना देणारीं साधनें उपलब्ध नाहींत. आउटरॅम आलम बागेंत असतांना मात्र बेगम व मौलवी यांचीं नांवें इंग्रजांच्या कागदपत्रांतून झळकतात. शिपायांना प्रोत्साहन एवढेंच कार्य बेगमेकडे होतें. तिच्या पुढाकाराला पडद्याचें बंधन आडवें येत होतें.

## कॅनिंगचा जाहीरनामा

लखनौ शहराची लूट हा शिपाईगर्दीच्या वाङ्मयांतला प्रमुख विषय असून त्याची हकीकत थोडक्यांत निवेदन केली. कॅनिंगनें नबाबशाही प्रदेशांतील जमीनदार व जनता यांस अनुलक्षून तयार केलेल्या जाहीरनाम्याचा परामर्श करणें आतां उचित आहे. या प्रदेशांतील उठावाला विरजण पडावें, असा या जाहीरनाम्याचा मुख्य उद्देश होता. परंतु त्या जाहीरनाम्याचा इष्टानिष्ट परिणाम जमीनदार व जनता यांच्या ठिकाणीं दिसण्यापूर्वीं अनेक इंग्रज अधिकाऱ्यांमध्यें त्यासंबंधाच्या नापसंतीची खळबळ उडाली. लखनौ सर केल्यावर हा जाहीरनामा लोकांपुढें जावयाचा होता. लखनौच्या नागरिकांनीं व त्या प्रदेशांतील सामान्य जनतेनें शिपायांना मदत पुरविली असल्यामुळें नबाबशाही मुलखाची सारी जमीन सरकारजमा केली जाईल, असें त्या जाहीरनाम्याचें प्रमुख धोरण होतें. जमीनजप्तींतून फक्त सहा तालुकदार वगळले होते. जे इंग्रजांच्या बाजूस अढळ राहिले व जे इंग्रजनिष्ठ राहिल्याचें सिद्ध करतील, त्यांना जमिनीचें इनाम मिळेल, असें त्या जाहीरनाम्यांत

आश्वासन होतें. शिपायांपैकीं जे तावडतोब शरण येतील त्यांच्या जीवाला व प्रतिष्ठेला धोका पोंचणार नाहीं, याकलमाला शर्त जोडली होती कीं, युरोपियन लोकांच्या कत्तलीशीं संबंध नव्हता, असें सिद्ध झाल्याशिवाय प्राण व प्रतिष्ठा यांच्या बाबतींतलें आश्वासन उपयोगी पडणार नाहीं. याहून ज्या कांहीं अधिक बक्षीस हवें असेल त्यांनीं ब्रिटिश सरकारच्या औदार्यावर भिस्त ठेवावी, असा त्या जाहीरनाम्याचा इत्यर्थ होता. आउटरॅमला हा जाहीरनामा फार कडक वाटला. ‘जमीनदार अगोदरच शेतकी कायद्यानें दुखावले आहेत. जमीनजप्तीच्या धमकीनें त्यांच्या दुःखावर डागणी दिल्यासारखें होईल. त्यांना बंडखोर ठरविण्याऐवजीं सन्मान्य शत्रु मानून तसें वागवावें; नाहींतर ते बिथरून गनिमी काव्याच्या लढाईनें सरकारला सतावून सोडतील. मग हजारों गोरे सैनिक लढाई, रोगराई व हवापाणी या त्रिविध तापांना बळी पडण्याचा संभव आहे. म्हणून जमीनदारांमध्यें जमिनी कायम राहण्याची आशा वाढवावी म्हणजे ते शांतता स्थापन करण्याच्या सरकारी उद्योगाला हातभार लावतील.’ असें आउटरॅमनें आपलें मनोगत कॅनिंगला कळविलें. आउटरॅम-सारख्या मुरब्बी अंमलदारानें आपल्या जाहीरनाम्याचा विरोध करावा, याचें कॅनिंगला सखेद आश्चर्य वाटलें. आउटरॅमच्या आक्षेपांना कॅनिंगनें सविस्तर उत्तर दिलें, पण त्यापूर्वी त्यानें पुढील आशयाचा जादा मजकूर जोडला—‘शांतता व सुव्यवस्था अस्तित्वांत यावी अशा उद्देशानें जे कोणी चीफ कमिशनराला मदत करतील त्यांना सुचविलेल्या सवलतींचा जास्त फायदा मिळेल. अशा वागणुकीनें त्याच्या जुन्या हक्कांचा गव्हर्नर जनरल उदारपणानें संतोषपूर्वक विचार करील.’ ‘जमिनीचा मालकी हक्क रद्द करणें हा शिक्षेचा सर्वमान्य प्रकार आहे. त्यांतून कसें सुटायचें याचा उपाय जाहीरनाम्यांत दाखविलेला आहे. याहून जास्त सवलत दिल्यास जमीनदार हा सन्मान्य शत्रु नसून विजयी शत्रु असल्याचें कबूल करण्यासारखें आहे; शेतकी कायदा हें जमीनदाराचें खरें दुःख नसून त्याच्या अनियंत्रित कारभाराला त्या कायद्यापायीं झालेला प्रतिबंध हें त्याला झोंबणारें शल्य आहे.’ वगैरे खुलासा कॅनिंगनें आक्षेपांच्या उत्तरांत केला होता. याप्रमाणें ऊहापोह येथें चालून त्या जाहीरनाम्याचा अंमल सुरू होण्याच्या सुमारास त्याच्या योगानें जें वादळ उठलें त्याचा पुढाकार एका काळचा हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरल लॉर्ड एलनबरो यानें घेतला होता. या वेळीं तो बोर्ड

ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष होता म्हणून त्यानें जपून वागण्याची आवश्यकता असतां त्यानें आपल्या उतावळ्या अरेराव स्वभावानुसार सदर जाहीरनाम्याच्या नालस्तीचा खर्डा लिहिला व तो विचारविनिमयाकरितां आपल्या सहकाऱ्यांना किंवा पसंतीसाठीं इंग्लंडच्या राणीस न दाखवितां परभारें हिंदुस्थानांत पाठवून दिला. हा खर्डा गुप्त स्वरूपाचा असून एलनबरोनें खुशाल कामन्स सभेपुढें उघडा केला. इंग्लंडच्या मुख्य प्रधानकी गाजविलेल्या डिझरायलीनें एलनबरोप्रमाणेंच जाहीरनाम्याविरुद्ध आपलें मत व्यक्त करून एक प्रकारें तेथील क्षोभाला खाद्य पुरविलें. या क्षोभाला कॅनिंग आपल्या राजीनाम्यानें मान देतो कीं काय अशी शंका त्या वेळीं सर्वत्र पसरली होती. परंतु ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनीं कॅनिंगबद्दल पूर्णपणें विश्वास असल्याचा ठराव पाठवून दिला व एलनबरोला आपल्या उच्छृंखळ वर्तनाबद्दल राजीनाम्यांच्या रूपानें प्रायश्चित्त घ्यावें लागलें.

### रोहिलखंडावर स्वारी

शांतिस्थापना केव्हां व कुठें करायची यावरून पुनः कॅनिंग व कॅम्बेलमध्यें वाद पडला. उन्हाळ्याचे दिवस जवळ आले, ते धांवपळीच्या मोहिमेला योग्य नाहींत, म्हणून लखनौच्या प्रदेशांत शांततेचा यत्न करावा, असें कॅम्बेलचें मत होतें, तर रोहिलखंडांतील उठाव गाडून टाकला पाहिजे, तेथील हिंदुजनता इस्लामच्या जुलमाखालीं हैराण झालेली असून ती इंग्रजी राज्यासाठीं उत्सुक आहे; त्या जनतेची इस्लामी मगरमिठींतून लवकर सुटका न झाली तर इंग्रजांत अवसान नाहीं, अशी समजूत होऊन ती जनता इंग्रजांचा विश्वास सोडील व उठावाला जोर चढेल असा कॅनिंगचा युक्तिवाद होता. कॅम्बेलनें आणखी थोडी घासाघीस करून पाहिली, पण शेवटीं त्यानें कॅनिंगच्या आग्रहाला मान दिला व त्याप्रमाणें रोहिलखंडाची मोहीम सुरू केली. कॅम्बेलनें तीन सेनाविभाग तीन दिशांनीं त्या प्रदेशावर पाठविले. फत्तेगड हा दुआब व रोहिलखंड यामधला दरवाजा एका सेनाविभागानें जानेवारीपासून दाबून ठेवला होता. त्याची फत्तेगडाबाहेर कसलीच हालचाल नव्हती, असें पाहून मैनपुरीच्या तेजसिंहानें पुनः दुआबांत घुसण्याचें मनांत आणलें. तेजसिंहाच्या संकल्पाबद्दल पक्की खात्री होतांच फत्तेगडच्या सैन्यानें त्याच्या ठाण्यावर जाऊन त्याला रोहिलखंडांत उधळून लावलें.

याच वेळीं वलंद शहरचें इंग्रजी सैन्य रोहिलखंडाकडे मजल मारीत होतें. त्यानें त्या प्रदेशांत प्रवेश केला. परंतु मार्गांत शिपायांचीं ठाणीं ओसाड पाहून पुढें भय नाहीं अशा समजुतीनें तें सैन्य एका ठिकाणीं रात्रींच्या वेळीं शिपायांच्या छाप्यांत सांपडलें व त्याचा सेनापति (जनरल पेनी) मारला गेला. परंतु सेनापति पडल्यानें सैन्याची दाणादाण उडावी, असा इंग्रजांचा युद्धप्रकार नव्हता. अंधारांत सेनानी बेपत्ता होतांच त्याच्या सैनिकांनीं हल्ला करून शिपायांकडील तोफ बळकावली, त्याच आवेशानें पुढें जातांच त्यांना गाझींनीं भरलेला चर दिसला व अतिशय जोराच्या हातघाईचा सामना जुंपला. गाझींना मारून इंग्रजांचे सैनिक बाहेर पडले. यानंतर ज्या खेड्यांत शिपायांची वस्ती होती, त्यावर तोफांचा भडिमार केला. मागून पायदळानें त्या खेड्यांतून शिपायांना हुसकलें. येथें शिपायांची प्राणहानि विशेष झाली नाहीं. गाझींशीं लढतांना इंग्रजांकडील बरेच अधिकारी दगावले. पेनी पडल्यावर जोन्सकडे या सैन्याचा पुढारीपणा जाऊन त्यानें कॅम्बेलच्या हुकुमाप्रमाणें ता. ३ मे रोजीं फौजेचा मुख्य तळ गांठला.

**रूइयाचा नरपतसिंग**

७ एप्रिल रोजीं वालपोल नांवाचा इंग्रज सरदार रोहिलखंडाच्या स्वारीवर निघाला. गंगेचा डावा किनारा धरून त्यानें इष्ट स्थळीं जावें, असा त्याचा कार्यक्रम होता. या सरदाराबद्दल सैनिकांत आदर व विश्वास या दोन्हींचा अभाव असला तरी शिस्तीचे बंदे सैनिक त्याच्याबरोबर मुकाट्यानें वाट चालूं लागले व 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' म्हणतात त्याप्रमाणें पहिल्याच झटापटींत वालपोलनें सैनिकांचा रोष आपल्यावर ओढवून घेतला. नरपतसिंग नांवाच्या उठाववाल्या पुढाऱ्याच्या गढीवर अत्यंत अविचारानें हल्ला करण्याचा वालपोलनें हेका धरला. त्या हल्ल्यांत एक शिपायांच्या अतिप्रेमाचा ॲड्रियन-होप हा सेनाधिकारी ठार झाला, बरेच सैनिक देखील बळी पडले व वाल-पोलला माघार घेण्याची पाळी आली. शिपायांसमोर पीछेहाट हा इंग्रजांच्या दृष्टीनें इभ्रत दवडण्याचा प्रसंग समजला जात असे. नरपतसिंगाची रूइया गांवची ही गढी तशीच बळकट व नरपतसिंग तितक्या निग्रहाचा वीर असता तर एक वेळ वालपोलचा प्रमाद क्षम्य गणला जाता. पण इकडे वालपोल आपल्या सैनिकांना मागें खेचतो तर तिकडे नरपतसिंग गढींतून पळतो, या अनुभवानें इंग्रजांचे सैनिक अतोनात चिडले. आपल्या लाडक्या

सेनाधिकाऱ्याच्या मृत्यूचा सूड घेण्याची संधि नरपतसिंगानें दिली नाहीं. रूइयाच्या अनुभवानंतर मात्र वालपोलनें तशी चूक केली नाहा. सिरसा नांवाच्या एका खेड्यांत फिरून शिपायांची गांठ पडली तेव्हां तो सावधपणानें लढला. तेथें त्यानें शिपायांच्या चार तोफा हिसकावून त्यांना असें पिटाळलें कीं रामगंगा नदीवरील पूल मोडायला त्यांना फुरसत मिळाली नाहीं. ता. २७ एप्रिल रोजीं कॅम्बेल आणि वालपोल एकत्र आले.

**जमादाराचें विलक्षण धाडस**

रुरकीहून कोक नांवाचा सरदार एप्रिलपर्यंत मोहिमेची पूर्वतयारी करीत होता. बैलावरून देशभर धान्याची वाहतूक करणाऱ्या वणजाऱ्याच्या (लमाणाच्या) साह्यानें कोकला आपल्या वाहनांची उणीव दूर करतां आली. तयारी झाल्यावर रुरकीच्या फौजेवर जोन्स नांवाचा प्रमुख अधिकारी नेमला गेल्यानें कोकच्या कर्तबगारीला खरोखरी वाव राहिला नव्हता; पण जोन्सनें स्वतःकडे नांवापुरता अधिकार ठेवून बाकीचा सर्व कारभार कोकच्या हातीं ठेवल्यामुळें या मोहिमेंत कोकच्या मसलतीप्रमाणें व पुढाकारानें सर्व गोष्टी घडल्या. जोन्सची फौज हरिद्वारास गंगापार झाली. पलीकडे दाट जंगल असून त्यांत उठावखोरांची गर्दी आहे, असें कळतांच कोक झपाट्यानें तिकडे निघाला. अवघ्या चार मैलांवर भोगिनीवाला येथें त्याला शिपाई भेटले. त्याच्याजवळ सहा तोफा होत्या. त्यांतून भराभर इंग्रजांवर गोळे सुटूं लागले. इकडून इंग्रजांच्या तोफा गरजल्या व पायदळ पुढें सरकलें. समोर खोल नाल्याचा अडथळा होता, तो मुलतानी स्वारांनीं ओलांडला व शिपायांची फळी तडकली. त्यांनीं पळ काढला. तोफा, तळावरचें सामान, हातांतलीं हत्यारें हें सर्व टाकून त्यांनीं फक्त आपल्या पायाच्या शक्तीचा भरंवसा बाळगला. इंग्रजांच्या सांगण्याप्रमाणें असें दिसलें कीं, पळतांना ओझें नको म्हणून शिपायांनीं अंगावरचा पोषाखसुद्धां फेकून दिला होता. पळणारांपैकीं पुष्कळांना मरावें लागलें. दुसऱ्या दिवशीं इंग्रजाला जो विजय मिळाला तो खरोखरीच आश्चर्यकारक होता. भोगिनीवाला येथें ज्यांनीं मैदान मोकळें केलें ते लोक नजीबाबादच्या उत्तरेकडील रानांत दबा धरून बसले असतील हा अंदाज पडताळून पाहण्याकरितां इंग्रजाकडील इमानबक्ष खान नांवाच्या जमादाराला चाळीस स्वारानिशीं तिकडे पाठविण्यांत आलें. जमादार आपल्या कामगिरीवर गेला असतां त्याला वाटेंतल्या गांवकऱ्यांनीं बातमी दिली कीं, खोत गांवाच्या

किल्ल्यांत नजीबाबादचा नबाब पांचशें साथीदारांसह राहिलेला आहे. जमादार विलक्षण धाडसी स्वभावाचा होता. त्याला आयती शिकार सांपडल्याचा आनंद झाला. खोतचा किल्ला विशेष दूर नव्हता, म्हणून जमादारानें खोतपर्यंत दौड केली. किल्ल्याशीं पोचतांच तेथील लोकांचें काळीज विरघळेल, अशा रुबाबानें त्यांनीं शरण यावें म्हणून दरडावणीच्या स्वरांत आज्ञा पुकारली. किल्ल्यांतलीं माणसें हूं कीं चूं न करतां मेंढरांसारखीं बिनशर्त किल्ल्याबाहेर पडलीं. जमादारानें नबाबाला कैद केलें व बाकीच्या लोकांचीं हत्यारें घेऊन त्यांस हाकलून लावलें. नंतर नजीबाबाद, फत्तेगड या ठिकाणचा दारूगोळा, घासदाणा, तोफा यासारखा माल गोळा करून जोन्सनें जेव्हां पुढची मजल मारली तेव्हां ता. २१ एप्रिल रोजीं नगीना मुक्कामीं फार मोठ्या संख्येच्या लढाऊ जमावाशीं झटापट करण्याचा प्रसंग आला. १० हजार पायदळ, २ हजार घोडदळ, १५ तोफा एवढा मोठ्या समुदायाशीं जोन्सला झुंजायचें होतें. हे आंकडे खरे मानले तर दिसायला भयंकर आहेत. पण ते आंकडे ज्यांचे आहेत ते लढवय्ये गांवठी असल्यास त्यांच्यावर मिळणाऱ्या विजयांचें कौतुक करायला नको. हीं माणसें इंग्रजांच्या द्वेषामुळें एखादी अवघड जागा पाहून तेथें युद्धासाठीं जमत. यथाज्ञान शत्रूवर शस्त्रांचा प्रयोग करीत आणि शत्रूची चढाई आवरत नाहींसें वाटल्यास पळ काढीत. दिल्ली, कानपूर, लखनौ येथील लढायांत खरे शिपाई मोठ्या प्रमाणांत खपून गेले होते. गांवठी लढवय्यांमध्यें स्थानपरत्वें त्यांतले कोणी असतीलहि. परंतु बाकीच्या लोकांना शत्रूशीं लढवणें त्यांना शक्य नव्हतें. नगीना येथील लढवय्यांच्या संख्येचें हें विवेचन इंग्रजांच्या विजयाचा फोलपणा दाखविण्यासाठीं केलें आहे. नगीन्यास इंग्रजांना विजय मिळाला. गांवठी लढवय्ये पळाले. कुठें कुठें पळतां पळतां उलटून ते इंग्रजांच्या स्वाराशीं निकरानें लढले; पण इंग्रजांनीं त्यांच्या तोफा, हत्ती ताब्यांत घेतले व पुढारी मारले. इंग्रजांना विजयापेक्षां ज्या गोष्टीचा विशेष आनंद झाला ती गोष्ट म्हणजे तारखात्याकडील एका कैदी इंग्रजाची सुटका ही होय.

या विजयाला आणखी थोडीशी पुष्टि मिळायची होती. नगीन्यास उठावाच्या लढवय्यांचा पाठलाग करणारे स्वार मुलतानी होते. नबाबाच्या हत्तीसह ते आपल्या तळाकडे जात असतां उठाववाल्यांना आपले दोस्त असावे असें वाटलें व स्वारांच्या रोखानें ते येऊं लागले. मुलतान्यांच्या अंमल-

दारानें त्यांची दिशाभूल बिनचूक हेरली होती, म्हणून त्यानें आपल्या स्वारांना झाडांच्या दाट राईत उभे केलें. उठाववाल्यांना आपली फसगत होत असल्याचें भानच नव्हतें. ते स्वारांच्या राईजवळ आले तरी जिकडे तिकडे स्तब्धता होती. या प्रकारांत कांहीं कपट भरलेलें आहे, या बोधानें ते सावध होण्याच्या क्षणीं त्यांच्या कानीं हल्ल्याच्या हुकमाचा पहाडी आवाज पडला. तो आवाज व स्वारांची दौड यांत क्षणाचेंहि अंतर नव्हतें. उठाववाले घाबरून पळाले. पण त्यांचें हिरवें निशाण, शिवाय बऱ्याच तोफा यांना ते मुकले. यानंतर बिजनोर जिल्ह्यांत इंग्रजांच्या राज्यशकटाला विघ्न उरलें नाहीं. जोन्स आतां मुरादाबादेकडे वळला.

**फेरोजशहाला नकार**

शिपायांच्या उठावानें मुरादाबादेवर बरेलीच्या खानबहादुरखानाची सत्ता लादली. ती सत्ता लोकांना सुखावह होण्याऐवजीं तिनें इंग्रजी राज्याबद्दलची ओढ लोकांत वाढविली, असा इंग्रजांचा दावा आहे. मुरादाबाद शेजारच्या रामपुरा संस्थानाचा नबाब इंग्रजांचा पक्षपाती असल्याची माहिती प्रसिद्ध आहे. मुरादाबादचे लोक नव्या राजवटीनें किती वैतागले होते, याचा पुरावा म्हणजे दिल्लीचा राजकुटुंबी फेरोजशहा ता. २१ एप्रिल रोजीं मुरादाबादच्या लोकांकडून द्रव्य मिळविण्यासाठीं गेला असतां लोकांनीं त्याचें स्वागत करण्याऐवजीं त्याची द्रव्याची मागणी झिडकारली. सामोपचारानें लोक जुमानीत नाहींत म्हणून फेरोजशहानें दंडेली आरंभली व तिचा लोकांतर्फे प्रतिकार चालू असतां जोन्सच्या फौजेची बातमी लागून फेरोजशहाला रिकाम्या हातीं मुरादाबादेसच दडून बसण्याची पाळी आली. मुरादाबादेस जोन्स ता. २६ एप्रिल रोजीं पोचला. तेव्हां त्या भागांतील मुल्की अंमलदारानें उठावाच्या पुढाऱ्यांच्या वस्तीची गुप्त जागा जोन्सला दाखविली. तेथेंच फेरोजशहा होता असा इंग्रजांचा समज आढळतो. कोकनें या पुढाऱ्यांना पकडण्याची व्यवस्था केली. त्या जागीं घातलेल्या छाप्यांत २१ प्रख्यांत पुढारी पकडले गेले. फेरोजशहा मात्र त्या छाप्यांतून निसटला.

**बरेलीचे गाझी व घोडदळ**

मुरादबादेमागून बरेली असा कार्यक्रम ठरला होता. जोन्स बरेलीस पोचण्याच्या आधीं कॅम्बेल स्वतः तेथें जाऊन थडकला होता. पण त्यापूर्वी

शहाजहानपुरास मौलवी असल्याची खबर आल्यावरून कॅम्बेल तिकडे गेला. मौलवीबरोबर नानासाहेब होते, असें बोललें जात होतें; एवढेंच नव्हे तर शहाजहानपुरास इंग्रजांला निवारा मिळूं नये म्हणून चांगल्या इमारती नानांच्या मसलतीनें भस्मसात् झाल्या असेंहि तेथें गेल्यावर कॅम्बेलला कळलें, वगैरे माहिती मागें एकदां सांगितली आहे. कॅम्बेलचे पाय शहाजहानपुराकडे वळले व मौलवीनें आपला पाय तेथून बाहेर ठेवला. इंग्रज लेखकांनीं मौलवी पळून जाऊं शकतो, याचा दोष वालपोल व कॅम्बेल या दोघांना लावला आहे. त्यावरून मौलवी या दोघांहून अधिक चतुर ठरतो, असेंहि इंग्रजांचें म्हणणें आहे. कॅम्बेल वालपोलचा गाफीलपणा असो किंवा मौलवीचें चातुर्य असो, मौलवी बिनधोक पळाला यांत संशय नाहीं. मग शहाजहानपुराच्या बंदोबस्ताला थोडेंसें लष्कर ठेवून कॅम्बेलनें बरेलीचा रोख धरला. बरेली हें रोहिलखंडाचें मुख्य ठिकाण व शिपाई-गर्दीचें एक महत्त्वाचें आश्रयस्थान, तेथील सामन्याच्या निकालावर खानबहादुरखानाचें भवितव्य अवलंबून होतें. या सर्व गोष्टींकडे पहातां खानबहादुरानें प्रचंड मनुष्यबळ जमविलें असल्यास नवल नाहीं. ४० तोफा, ३० हजार पायदळ, ६ हजार घोडदळ असें त्याच्या लष्करी सामर्थ्याचे आंकडे इंग्रजी इतिहासांत दिसतात. या आंकड्याविषयीं पूर्वीं जें लिहिलें आहे तें ध्यानांत बाळगूनच या संख्याबळाविषयीं निष्कर्ष काढणें चांगलें. बरेलीस लढाई झाली. खानबहादुरानें बचावाची योजना उत्तम केली होती. ता. ५ मे या दिवशीं सकाळीं ७ वाजतां कॅम्बेलनें चढाईचा डाव टाकला. त्या डावासरशी खानबहादुराची आघाडी मागें हटली. नंतर तसाच क्रम सुरू होता. गाझी व स्वारांची एक तुकडी अशा दोघांनीं त्या दिवशीं शौर्य दाखविलें नसते तर बरेलीला लढाई झाली, असें सांगण्याला अवकाश नव्हता.

### गाझींची झुकर-मुसंडी

इंग्रजाचें सैन्य खानबहादुराची रणभूमि पादाक्रांत करीत करीत एका जागीं स्थिरावलें व ध्यानीं मनीं नसतां वीज पडावी त्याप्रमाणें गाझींची एक झुंड इतक्या आवेशानें आणि वेगानें इंग्रजांच्या आंगावर येऊन पडली कीं, कॅम्बेलच्या भरंवशाचे स्कॉट योद्धेसुद्धां क्षणभर हादरून गोंधळांत पडले. तरवार हें गाझींचें हत्यार कितीहि तीक्ष्ण धारेचें व तें हत्यार खेळविणारें मनगट कितीहि बळकट असलें तरी बंदुका, संगिनी यांच्या समोर त्याचा विशेष

उपयोग होण्याची आशा धरणें चुकीचें, या बुद्धिवादाच्या पलीकडे गेलेल्या गाझींनीं इंग्रजांवर आपली झडप टाकली. हे गाझी पोक्त वयाचे, डोक्याला हिरवे फेटे बांधलेले, कमरेला तसाच शेला वेढलेले, प्रत्येकाच्या बोटांत कुराणाचीं वचनें कोरलेली आंगठी, असें त्यांचें वर्णन रसेलनें (लंडन टाइम्सचा बातमीदार) केलें आहे. डोकीं खालीं वाकवून त्यापुढें ढाली धरलेल्या, तलवारी गरगर हवेंत फिरत आहेत, तोंडांतून 'दीन, दीन' च्या आरोळ्या सुरू आहेत, अशा रीतीनें ते गाझी अंगाशीं भिडले तेव्हां पहिल्यांदा शीख व मागून स्कॉट हे दोन्ही काळे गोरे वीर साफ भांबावले, तोंच 'जागा सोडूं नका' असा कॅम्बेलनें त्यांना आदेश दिला. गाझी थोडे व त्यांच्या समोर हत्यारबंद शिपायांच्या भिंती उभ्या–अर्थात् गाझींचा पाड काय लागणार? ते सारे ठार पडले. पण त्यांच्या झटापटींत चार पांच नामी इंग्रज अंमलदारांचे जीव धोक्यांत सांपडले होते. हा गाझींचा सामना संपला व कॅम्बेलच्या पिछाडीवर खानबहादुराच्या घोडदळाचा घाला पडला. कॅम्बेलची रसद पिछाडीस होती. तिच्या बरोबर बिनलढाऊ बाजारबुणग्यांचे थवेच्या थवे असल्यानें घोडदळाच्या या झपाट्यांत त्यांची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना करावी. या धडाक्यांत रसेलची गठडी बांधली जाण्याची वेळ आली होती, पण तो शिकस्तीनें बचावला. थोड्या वेळांत कुमक येऊन हें घोडदळाचें संकट संपलें तर पुनः गाझी उठले. आतां त्यांची संख्या अगदीं थोडी होती. वस्तुतः त्यांचा लढण्याचा उद्देश नसावा. ते एका घरांत घुसत असतांना इंग्रजांना दिसलें. तोफ डागून त्या घराला आग लागली तेव्हां ते बाहेर पडले. बरेलीच्या प्रकरणांतलीं शेवटची झटापट जोन्सच्या वाटणीस आली. कॅम्बेलच्या उलट दिशेनें तो येत असतां त्याला लढत लढत आपला मार्ग आक्रमावा लागला. बरेलीच्या हद्दीशीं तो तोफा वाजवीतच पोंचला. बरेलीस कांहीं तोफा टाकून शिपाई गेल्याची खोटी बातमी सांगून एका इसमानें त्याला चांगलेच गोत्यांत आणलें होतें. तोफा हस्तगत करण्यासाठीं कोक स्वतःच पुढें सरकला. इतक्यांत तोफेंतून गोळा सुटला व कोकला आपला धोका समजून आला. यानंतरच्या उपायांना उशीर लागला नाहीं. इंग्रजांच्या तोफापुढें बरेलीच्या तोफा बंद पडल्या. शहराबाहेर इंग्रजाचें घोडदळ पसरत आहे, असें कळतांच शहरांतील उरल्या सुरल्या लढवय्यांनीं शहर सोडलें. ता. ७ मे रोजीं जोन्स व कॅम्बेल एक झाले.

**मौलवीची कामगिरी**

बरेलीस इंग्रजांची फौज गुंतल्याची संधी साधून मौलवी शहाजहानपुरास गेला. तेथें जें थोडे इंग्रजी लष्कर होतें, तें उखडून काढायचें असा मौलवीचा हेतु होता. प्रथम तो मोहमदी गांवास गेला. तेथें त्याला एक हिंदु व एक मुसलमान असे दोघे साह्यकर्ते भेटले. तावडतोब तो शहाजहानपुरास गेला. त्याची बातमी हेरामार्फत आधीं समजल्यानें तेथलें लष्कर सावध होऊन आपल्या बचावासाठीं तयार केलेल्या जागेंत शिरलें. मौलवीनें शहर ताब्यांत घेऊन ३ मे ते ता. ११ मे पर्यंत इंग्रजांच्या ठाण्यावर तोफांची सरबत्ती सारखी सुरू ठेवली होती. ता. ७ रोजीं कॅम्बेलला शहाजहानपुराचें वर्तमान समजलें. बरेली पडल्यामुळें कॅम्बेलला लष्कर कसें व कुठें पाठवूं ही चिंता उरली नव्हती. त्यानें एक अधिकारी बरोबर सैन्य देऊन मौलवीच्या समाचारासाठीं रवाना केला. मौलवीचें सैन्य जास्त असल्याची खात्री झाल्यामुळें हा नवा इंग्रज सरदार पहिल्या सैनिकांच्या ठाण्यांत शिरला व तेथून कॅम्बेलकडे जास्त कुमकेची मागणी त्यानें कळविली. इंग्रज सरदाराला जशी कुमक मिळाली तशीच मौलवीची कुमक वाढली. ही कुमक किरकोळ नव्हती. लखनौची बेगम, फेरोजशहा, या मातबर व्यक्ति मौलवीच्या गोटांत आल्या. नानासाहेबाबद्दल बोलवा होती, पण नानासाहेबांचीं कांहीं पथकें मौलवीच्या फौजेंत दाखल झाली, एवढेंच खरें दिसतें. ता. १५ रोजीं मौलवीनें आपलें बळसर्वस्व वेचण्याच्या निश्चयानें इंग्रजांचें ठाणें हल्ल्यामागून हल्ले चढवून झोडपलें. संध्याकाळपर्यंत हल्ल्यांची परंपरा चालू होती. इंग्रज त्याच्याशीं एक रेसभर जागा न सोडतां टक्कर देत राहिले. पुढील तीन दिवसांत दोन्ही पक्ष ता. १५ प्रमाणेंच लढत होते. कॅम्बेल येण्याच्या सुमारास मौलवीनें शहाजहानपुराहून आपली बरीच फौज मोहमदीस नेली. शेवटीं तेथून मौलवीनें नबाबशाहीच्या प्रदेशांत सुरक्षित प्रयाण केलें. कॅम्बेलच्या पदरीं जर कांहीं श्रेय पडलें असेल तर रोहिलखंडांत उठावाचें चिन्ह राहूं दिलें नाहीं एवढेंच. मौलवीशीं संबंध मे महिन्यांत कटकटी सुरू होत्या. पुढें लवकरच त्याला काळानें गांठलें, तो प्रसंग पूर्वी सादर केला आहे.

**मौलवीची हिकमत**

रोहिल खंडांतील उठावाची धामधूम शांत करतांना नबाबशाही मुलूख इंग्रजांनीं शांतिस्थापनेच्या उद्योगांतून सोडलेला नव्हता. त्या कामगिरीसाठीं

होप ग्रँट नांवाच्या लष्करी अधिकाऱ्याची निवड केली होती. ग्रँटनें ता. ७ एप्रिल रोजीं हा कारभार हातीं घेऊन ता. २१ रोजीं तो लखनौपासून २९ मैलांवर असलेल्या बारीं नांवाच्या गांवाकडे जाऊं लागला. मार्गांत एका जागीं त्याचा मुक्काम असतां मौलवीचे स्वार त्याच्या गोटांत शिरले. ग्रँटच्या नाकेदारांच्या पश्नाला त्यांनीं सरळ आपण अमुक पथकाचे आहों, असें उत्तर दिलें. त्या पथकानें उठाव केल्याची दाद ग्रँटच्या नाकेदारांना नव्हती म्हणून या उत्तराबद्दल त्यांना शंका आली नाहीं. मौलवीच्या स्वारांनीं साऱ्या गोटाच्या बारीक पाहणीचें काम आटपून तपशील मौलवीला कळविला. मौलवीनें ग्रँटवर कसा हल्ला करायचें तें ठरवून त्याप्रमाणें शिपाई पाठविलें. गोटांतील तोफा हिरावण्याच्या आकांक्षेची माशी शिंकली नसती तर ग्रँटचें सारें युद्ध-कौशल्य पणाला लागावें असा तो बांका प्रसंग होता. पण कांहीं शिपायांना त्या तोफांचा मोह न आवरल्यानें मौलवीचा डाव बारगळला. तोफांच्या प्रकरणानें ग्रँटचें लष्कर सावध झालें व त्याच्या घोडदळानें मौलवीच्या लोकांवर चाल करतांच तें पळालें. यानंतर मौलवीचा डाव सांवरणें शक्य नव्हतें. तो आपल्या शिपायांसह ज्या खेड्यांत राहिला होता, तें खेडें लढविण्यासारखें मजबूत असूनसुद्धां मौलवीला तें लढवितां येऊं नये, अशी त्याच्या लष्करानें हाय खाल्ली होती. त्यांनीं तें खेडें सोडलें.

ता. १५ ला ग्रँट महमदाबादला गेला. तेथें शिपाई भेटले नाहींत, म्हणून तो रामनगरकडे धावला. रामनगरास बेगम असल्याची बातमी होती, पण बेगमेनें सामना टाळण्याचा उद्देश अंमलांत आणून ग्रँटची धावाधाव फोल ठरविली. रामनगरानंतर बिठौली येथें ही बाई असेल या तर्कालाहि फळ आलें नाहीं; मग स्वदेशीं परतणाऱ्या नेपाळी फौजेच्या सोयींगैरसोयींच्या देखरेखींत ग्रँटनें कांहीं दिवस घालवून लखनौ-कानपूरच्या रहदारीला विघ्न करणाऱ्या शिपायांचा बंदोबस्त करण्यासाठीं तो लखनौकडे वळला. किरकोळ चकमकींनें हे रहदारीचे अडथळे निकालांत निघाले. ता. १६ मे रोजीं तो लखनौ-नजीकच्या जलालाबादेस आल्यावर वेणीमाधव नांवाच्या निस्सीम नबाबनिष्ठ तालुकदाराच्या उठावाचें स्वरूप ग्रँटच्या डोळ्यासमोर उभें राहिलें. वेणी-माधवानें लखनौवर हल्ला करण्याच्या आपल्या घोषणेनें लखनौकरांना घाबरविलें होतें. कानपूर-लखनौमधील रस्त्याच्या सुरक्षिततेला त्यानें बाध आणला होता; त्याच्या हाताखालीं ८० हजार लोक असल्याच्या बातम्यांनीं शांतिप्रिय जनतेचे

प्राण गुदमरल्यासारखे झाले होते. वेणीमाधव हें प्रकरण आहे तरी काय म्हणून ग्रँट पाहूं लागला तर तो एक पोकळ डोल्लारा आहे, असें सुरवातीस त्याच्या प्रत्ययास आलें. जसंदा नांवाच्या गांवीं वेणीमाधव आपल्या संपूर्ण सैन्यानिशीं सज्ज आहे, या बातमीचा आदर करून ग्रँट तेथें गेला तेव्हां वेणीमाधव तर नाहींच पण एकसुद्धां शिपाई त्याला आढळला नाहीं. नंतर कपुर्थळ्याचा राजा तीन तोफा व ९०० शीख लढवय्ये घेऊन आल्यानें ग्रँटच्या दळांत नवी भर पडली. ग्रँटनें ही भर कानपूरच्या रहदारीचें संरक्षण करण्यासाठीं ठेवली व वेणीमाधवाचा पाठलाग सोडून तो फैजाबाद रस्त्यावरील नबाबगंज गांवीं जमलेल्या लोकांकडे १२ जून रोजीं गेला.

**ग्रँटचा अदृष्टपूर्व युद्धानुभव**

हे लोक फार अडचणीची जागा धरून बसले होते. आपली जागा अडचणीची आहे, या समजुतीनें ते कांहींसे गाफील होते. ग्रँटनें जेव्हां त्यांवर धडकी मारली तेव्हां त्यांना ती आकस्मिक छाप्यासारखी वाटून ते गडबडले. हे सर्व जमीनदारी लढवय्ये होते. त्यांचे चार पुढारी होते. पुढाऱ्यांनीं कसलीच जुटीच्या लढाईची योजना निश्चित केलेली नव्हती. ग्रँट जेव्हां अंगावर आला तेव्हां लढवय्यांवरच सामन्याचा भार पडला आणि ते अतिशय निकरानें व कुशलतेनें लढले. 'हें लष्कर धाडसी होतें. त्यांनीं दोन तोफा आणून आपल्या पिछाडीवर हल्ला केला. मी हिंदुस्थानांत पुष्कळ लढाया पाहिल्या आहेत; मरूं किंवा जिंकूं अशा दृढ मनोनिग्रहाचे हिंदी शूर वीर माझ्या दृष्टीखालून गेले आहेत, परंतु या जमीनदारी योद्ध्यांच्या मर्दुमकीचा भव्यपणा कांहीं निराळाच होता. त्यासारखा अनुभव पूर्वीं कधींच आलेला नाहीं.' अशा अर्थाचा मजकूर ग्रँटनें आपल्या रोजनिशींत लिहून ठेवला. हॉडसनचे घोडेस्वार बहादरीसाठीं प्रख्यात असून त्यांची बहादरी या लढवय्यांसमोर लटपटून ग्रँटला दुसरे घोडेस्वार त्यांवर सोडावे लागले. त्यांच्यावर तोफांचा मारा आरंभला. त्या मारानें जमीनदारी लढवय्यांचें संख्याबळ प्रत्येक क्षणीं अधिकाधिक ऱ्हास पावत असूनहि त्यांनीं शत्रूला पाठ दाखवायची नाहीं, हा निश्चय कायम ठेवला. तोफांचें काम नाहीं असें दिसलें तेव्हां सदर लढवय्यांवर स्वारांनीं दोन वेळां हल्ले केले. आतां मात्र त्यांचें धैर्य ढासळलें व त्यांनीं रणभूमीवरून पाय काढला. हॉडसनच्या घोडदळाकडील तोफांच्या आसपास सवाशें प्रेतें पडलीं होतीं, ही या जमीनदारी लढवय्यांच्या पराक्रमाची साक्ष इंग्रजी इति-

हासांत दिसते. हा लढा तीन तास चालला होता. लढ्यानंतर चार पुढारी चार दिशांस चालते झाले आणि इतःपर सदर पुढाऱ्यांचे लढवय्ये कुठेंहि एकवटण्याला धजणार नाहींत, असा या इंग्रजी विजयाचा परिणाम घडल्याचें इंग्रज कामगारांना समजलें. त्यांचा मुलकी कारभार अधिक निर्भयतेनें चालू झाला, परंतु ग्रँटची कामगिरी संपली नव्हती. जुलईच्या तिसऱ्या आठवड्यांत इंग्रजांचें मित्रत्व जोडलेल्या मानसिंगाला शत्रूच्या वेढ्यांतून सोडविण्याबद्दलचा हुकूम कॅम्बेलनें ग्रँटला पाठविला.

**राजा मानसिंग**

मानसिंग हें माजी नबाबशाहींतलें एक ब्राह्मण जातीचें तालुकदारी प्रस्थ होतें. मानसिंग हा अतिशय कारस्थानी पुरुष होता. माजी नबाबाचा मुख्य प्रधान अली नकीखान याचा व मानसिंगाचा गाढ स्नेहसंबंध असल्यानें मानसिंग म्हणेल ती पूर्वदिशा असें त्याचें नबाबशाहींत वजन वाढलें होतें. १८५५–५६ मध्यें अयोध्येस मारुतीच्या मंदिरावरून मुसलमानांनीं जी कटकट उत्पन्न केली, तिच्याविरुद्ध हिंदु समाजाच्या अग्रभागीं मानसिंग उभा राहिला. प्रसंग रक्तपाताचा होता. इंग्रज वकिलाच्या दडपणामुळें नबाबानें आपली खास फौज पाठवून हा प्रसंग रक्तपातापर्यंत जाऊं दिला नाहीं. मानसिंगाची तालुकदारी नवीन असल्यानें नबाबशाहीच्या विनाशामागून जारी झालेल्या इंग्रजांच्या शेतकी कायद्याखालीं मानसिंगाच्या तालुकदारीचा विस्तार संकोचण्याची पाळी आली; यामुळें त्याला इंग्रजांविषयीं प्रेम नसेल तर तें योग्यच ठरेल. परंतु आपली खरी मनःस्थिति उघड न करण्याइतका तो सावध व धूर्त होता. नबाबशाही मुलखांतले जे कोणी इंग्रज–शिपायांच्या उठावापुढें पळणारे–त्याच्या आश्रयास आले, त्यांचें आदरातिथ्य करून त्यांना सुरक्षित स्थळीं पोचविण्याचें काम मानसिंग जेव्हां करीत होता तेव्हां हें आदरातिथ्य शिपायांच्या डोळ्यांत सलणार नाहीं, अशीहि काळजी खबरदारीनें घेण्याला तो चुकला नाहीं. हेवलॉक कानपुरास एकदां माघारीं गेला व हेवलॉक–आउटरॅम आपल्या फौजेसह लखनौच्या कोंडींत अडकले त्या वेळीं नबाबशाहीच्या जमीनदारांनीं आपला तटस्थतेचा बुरखा फेकला व ते शिपाई-गर्दींत सामील झाले, ही वस्तुस्थिति इंग्रजांनीं कबूल केली आहे. इतर जमीनदारांप्रमाणें मानसिंगहि मग शिपायांच्या उठावाचा साह्यकर्ता बनला. इंग्रजांकडे निरंतर मैत्रीची भाषा वापरणारा हा गृहस्थ शिपायांच्या जमावांत कसा गेला

याप्रमाणें इंग्रजांनीं प्रश्न उपस्थित करतांच या धूर्तानें खुलासा केला कीं, बेगमेच्या रखवालीसाठीं गेलों. कांहीं झालें तरी एकदां ही बेगम आमची मालकीण होती, हें विसरणें शक्य नाहीं. इंग्रज विजयी होण्याचीं लक्षणें दिसतांच मानसिंगानें शिपायांच्या डगरीवरील हात काढून घेऊन दोन्ही हात इंग्रजांच्या डगरीवर टेकले. इंग्रजांना वांचविल्याचें पुण्य त्याच्या पदरीं होतेंच. यामुळें इंग्रजाला त्याचें संरक्षण करणें भाग होतें. ग्रँटकडे कॅम्बेलचा हुकूम आला त्या वेळीं इंग्रजांचा दोस्त म्हणून इंग्रजविरोधी जमीनदारांनीं त्याला घेरलें होतें. मानसिंग शहागंज नांवाच्या गांवीं राहत असे. तेथेंच त्याला तिघां जमीनदारांनीं वेढलें होतें. त्याच्या सुटकेसाठीं ग्रँट ता. २२ जुलई रोजीं लखनौहून वेगानें शहागंजकडे मजल मारूं लागला; पण तो निघाल्याची वार्ता त्याच्या स्थूल वेगाहून जास्त वेगाची असल्यामुळें ती वेढा घालणाऱ्या जमीनदारांना आधीं समजली व तिघां वेढेकऱ्यांनीं तीन दिशांचा रस्ता धरून ग्रँटच्या सैन्याला काम शिल्लक ठेवलें नाहीं. मानसिंगाची याप्रमाणें सुटका झाली. ग्रँट आतां फैजाबादवरून अयोध्येच्या घाटावर गेला. तेथें नदीवरील नावा ताब्यांत घेण्याचें काम उठाववाल्यांनीं सुरू केलें होतें. ग्रँटनें त्या नावा आपल्या कबजांत आणल्या. नंतर त्यानें सुलतानपुराकडे मोर्चा वळविला. ऑगस्ट महिन्यांत त्यानें तेथें जमलेल्या लोकांना उधळून लावलें. कॅम्बेलच्या संमतीनें ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत ग्रँटचा सुलतानपुरास मुक्काम होता.

**पावसाळ्यांतला उठाव**

पावसाळा स्वारी शिकारीला गैरसोयीचा म्हणून ठिकठिकाणीं इंग्रजी लष्कर छावण्यांतून विश्रांति घेऊं लागले ही उठावाच्या पुरस्कर्त्यांना आपल्या हालचाली करायला अपेक्षित संधि होती. प्रदेशाची उत्तम माहिती व तेथील गांवकऱ्यांची अनुकूलता हें त्यांचें अप्रत्यक्ष बळ असलें तर जीवास जीव देतील असे साथीदार हें त्यांचें प्रत्यक्ष स्वरूपाचें बळ होतें. इंग्रजांचें वर्चस्व आपल्या भूमींत रुजूं नये, अशा इच्छेचे 'सिंघ' (सिंह) आणि 'खान' नबाबशाहीच्या टापूंत थोडेथोडके नव्हते. त्यांचीं नांवें-गांवें इंग्रजी इतिहासांतून पाहायला सांपडतात. या सिंघ-खानांपाशीं ७० हजार माणसें असल्याचा बोभाटा इंग्रजी कागद-पत्रांतून दाखल आहे. यांतली अर्धीं माणसें बेगम व मम्मूखान यांच्याकडे राहावी, हे बेगमेच्या दर्जावरून समजण्यासारखें आहे.

वरीलपैकीं एक ' शहा ' व चार खान हिंदुस्थान-नेपाळच्या सरहद्दीवर चळवळ-तांना दिसूं लागले. पीलीभीत हें त्या चळवळीचें ठिकाण होतें. इंग्रज अंमलदारांनीं तेथें लष्कर पाठवून शहा-खानांची रग जिरविली. यासारखीच तालुकदारांची धडपड इतरत्र चालू होती. ज्यानें मौलवीचा कंठच्छेद केला, त्या पोंवैच्या राजाला दगलबाजीचें प्रायश्चित्त देण्यासाठीं कित्येक तालुकदार त्याच्या गांवाला गराडा घालून झटत होते. त्याचप्रमाणें अलाहाबादजवळच्या सुरावचा जमीनदार इंग्रजांचा मित्र म्हणून त्याचें घरदार उठावाच्या भक्तांनीं जाळलें; त्याला व त्याच्या बायकामुलांना कैदेंत टाकलें; तेव्हां या दोघां दोस्तांच्या बचावासाठीं इंग्रजी फौजा रवाना होऊन त्यांनीं उठावखोरांना जागजागीं गांठून चोपलें.

**संडेलाचे पठाण**

जुलई—ऑगस्टमध्यें अनेक ठिकाणीं चालू असलेल्या या झटापटींपैकीं फेरोजशहानें मोहन गांवीं माजविलेली गडबड विचारांत घेण्यासारखी आहे. लखनौपासून सतरा मैलांवर हा गांव असून तेथें इंग्रजी राज्याची घडी नीट बसलेली होती. त्या ठिकाणीं फेरोजशहाला आपल्या कर्तृत्वाचें निशाण उभारतां आलें एवढेंच या प्रसंगाचें महत्त्व आहे. चोहोंकडे इंग्रजांचीं ठाणीं भक्कम रुजलेलीं असतां त्यांच्या पसाऱ्यांत एखाद्या लहानशा गांवीं कुणालाहि यश मिळण्याची आशा नव्हती, मग फेरोजशहाला तें मिळालें नाहीं यांत आश्चर्य कसलें ? संडेला नांवाच्या गांवांत पठाणांची वस्ती होती. हे पठाण इंग्रजांचे द्वेष्टे असल्यानें त्यांचे इंग्रजी राज्यव्यवस्थेला पुष्कळ बारीक मोठे चिमटे बसत होते. अखेरीस व्यक्तिशः एकेका अथवा समुदायशः या पठाणांना पकडून शिक्षा देण्याऐवजीं त्यांचा सारा गांवच मारावा, असा बेत इंग्रजांनीं सिद्धीस नेला. त्यानंतर पुनः या पठाणांनीं इंग्रजांच्या वाटेस जाण्याचें नांव काढलें नाहीं. हे पठाण आजूबाजूच्या जमीनदारांना सतावीत होते म्हणून किंवा पठाणांना मदत करीत असल्याच्या गुन्ह्याची घोरपड आपल्या मान-गुटीस बसूं नये म्हणून बऱ्याच जमीनदारांनीं इंग्रजांची कृपा संपादन केली. ते आपल्या खर्चानें हत्यारबंद लोक बाळगून इंग्रजांच्या साह्याला सिद्ध झाले. जेथें इंग्रजांच्या मतें उपद्रव असेल तेथें सैन्य पाठवून त्या उपद्रवाचा निचरा करायचा हें कार्य जमिनीवरून चाललें असतां गंगेचा किनारा सुरक्षित राहण्यासाठीं या नदीच्या प्रवाहांत पावसाळ्यामध्यें इंग्रजांनीं वाफारीं

(वाफेच्या लहान बोटी) फिरतीं ठेवलीं होतीं. या किनाऱ्यावरून त्या किनाऱ्याकडे हवें तेव्हां जाण्याची उठावाच्या भक्तांची स्वतंत्रता प्रस्तुत उपायामुळें गेली. पावसाळा संपल्याबरोबर इंग्रजांच्या आधींच उठावाच्या उपासकांनीं रणांगण सजविलें. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत तीन चार ठिकाणीं त्यांचे व इंग्रजांचे सामने घडले. ते किरकोळ होते. त्यावरून उठावाचे शौर्य, धैर्य, साहस, उत्साह वगैरे गुण क्षयावस्थेस पोचल्याविषयीं इंग्रजाला संशय उरला नाहीं. उठावाची शस्त्रसामग्री देखील कमालीची खालावली होती. इंग्रजानें या सर्व स्थितीची सूक्ष्म परीक्षा करून साम व दंड हे दोन उपाय योजण्याचें ठरविलें व ऑक्टोबरपासून हिंवाळ्याच्या मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली.

### कॅम्बेलची हिंवाळी मोहीम

कॅम्बेलच्या हाताखालीं या मोहिमेच्या वेळीं ८०००० हजार गोरे सैनिक सर्व प्रकारच्या साहित्यानें सज्ज होते. जमीनदार व त्यांचे बारगीर यांच्याशीं होणाऱ्या सामन्यांत त्यांचा गनिमी कावा यशस्वी होऊं द्यावयाचा नाहीं, याखेरीज कॅम्बेलच्या अंगावर महत्त्वाची कामगिरी नव्हती. गोंडचा राजा, वेणीमाधवसिंग, बेगम, खानबहादुर, नानासाहेब या पुढाऱ्यांच्या मागें जमीनदारी बारगिरांची संख्या दिसायला किंवा सांगायला प्रचंड असली व केव्हां केव्हां ते निधड्या छातीनें लढत असले तरी इंग्रजांसमोर त्यांचा टिकाव लागावा अशी जूट, शिस्त, संघटना, हत्यारें वगैरे गुण व साधनें त्यांच्याकडे नव्हतीं. प्रदेशाची खडानूखडा माहिती व शक्य तोंवर लढण्याचा निश्चय हेंच तेवढें त्यांचें बळ होतें. कॅम्बेलनें या सर्व स्थितीचा पुष्कळ दिवस बारीक विचार करून ज्या प्रदेशांत उठावाच्या पुढाऱ्यांची वस्ती व चळवळ होती त्या प्रदेशासभोंवार आपल्या लष्कराचें कडें पसरलें. उठावाच्या पुढाऱ्यांना पळून जातां येण्यासारखी या कड्यामध्यें कुठेंहि फट राहूं नये अशी कॅम्बेलनें खबरदारी ठेवली होती. उठावाच्या पुढाऱ्यांना व लोकांना अखेरीस नेपाळच्या मुलखांत शिरण्याची पाळी यावी असें या वेढ्याचें स्वरूप होतें. हा वेढा एकीकडे उठावाच्या प्रदेशाचा विस्तार कमी करीत असतां दुसरीकडे जमीनदार तालुकदारांना दिलेल्या आश्वासनांचाहि परिणाम घडत होता. कॅनिंगनें जमीनजप्तीचा जाहीरनामा काढून त्या वर्गाची सहानुभूति व उदासीनता

नाहींशी करून शिपाईगर्दीचें आयुष्य आणि बळ वाढविलें, ही इंग्रज अंमलदारांची तक्रार कांहीं अंशीं खरी असल्याचें ध्यानांत घेऊन कॅनिंगनें आतां त्यांना स्वतःच्या विवेकानुसार वागण्याची सवलत दिल्यामुळें जमीनदारांसाठीं जीं नवीं आश्वासनें पुकारलीं गेलीं त्यांच्या उदारपणानेंच पुष्कळसे जमीनदार संशयांत पडले व उठावांत राहिले. परंतु लष्करी माराचाहि त्यांनीं विचार करावा, अशी आतांची वेळ होती. इंग्रजांच्या लष्करी माराखालीं एकदम कायमचे गारद होऊन जाण्याऐवजीं इंग्रजांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आपल्या भवितव्याची शहानिशा पाहावी, हा मार्ग चोखाळण्याला जमीनदारांनीं प्रारंभ केला. त्यायोगानें साहाजिकच उठावाच्या बळाला गळती लागली. आणीबाणीच्या वेळीं आजचें मरण उद्यांवर ढकलण्याच्या शहाणपणानें पुष्कळदां मरण टळण्याचा संभव असतो.

**वेणीमाधव सिंगाची नबाबनिष्ठा**

ऑक्टोबरांत (ता. ६) संडेला येथें एक मातबर लढाई झाली. पुढें जमीनदारांचीं ठाणीं भराभर जिंकीत असतां नोव्हेंबरच्या आरंभीं (ता. ३) रामपूरखासिया येथील किल्ला इंग्रजांशीं झुंजून पडला. त्यामागून अमेठीच्या लाल माधवसिंगानें कांहीं वेळ शरण जाण्यासंबंधांत अळंटळं चालवून जेव्हां कॅम्बेलचें दडपण आलें तेव्हां लोटांगण घातलें. पण तसें करण्यापूर्वीं आपल्या लढाऊ लोकांना इष्ट स्थळीं जाऊं दिलें. नंतर वेणीमाधवसिंगाच्या शंकरपुरावर इंग्रजी लष्कर घसरलें. वेणीमाधव हा बाइसवाडा रजपुतांचा सर्वमान्य पुढारी होता. बाइस रजपूत उत्कृष्ट लढवय्ये अशी त्यांची ख्याति होती. या रजपुतांनीं बेंगाल आर्मीला हजारों शिपाई पुरविल्याची नोंद इंग्रजांच्या लष्करी दप्तरांत सांपडते. या शूर जमातीच्या पुढाऱ्याची गांठ पडली कीं घोर युद्धाला तोंड द्यावें लागेल, अशी इंग्रजांची समजूत होती. शंकरपुरास पोंचतांच शरण येण्याबद्दल कॅम्बेलनें वेणीमाधवाला निरोप कळविला. 'मला नबाबांचा अभिमान असल्यानें मी शरण येईन ही आशा सोडा. माझा देह नबाबाला अर्पण केलेला आहे. तो त्याच्या चरणीं पडेल किंवा डोंगरदऱ्यांत नष्ट होईल, पण तुमच्या हातीं लागणार नाहीं. तुमचें सामर्थ्य मोठें म्हणून फार तर किल्ला बळकावूं शकाल.' या आशयाचें उत्तर देऊन त्यानें आपलीं सर्व माणसें हत्यारांसकट मध्यरात्रीं चंद्र मावळल्यावर किल्ल्यांतून काढलीं. वेणीमाधव इंग्रजी सैन्याच्या नाकेबंदींतून खुशाल जातो, यावरून त्याच्या शिताफीची कल्पना

करतां येते. शंकरपुराहून जातांना त्याला अडथळा झाला नाहीं, पण पुढें दोन दिवसांनीं त्याची व इंग्रजी सैन्याची झटापट झाली. वेणीमाधवानें तीन तोफा गमावल्या, त्याला थोडी मनुष्यहानि सोसावी लागली; नंतर आणखी एक आठवडा लोटल्यावर वेणीमाधवाशीं खऱ्या अर्थानें लढण्याचा दिवस उगवला. मागें नदी, पुढें कांटेरी झुडुपांचें दाट रान अशी जागा वेणीमाधवानें धरली होती. परंतु लढाई झालीच नाहीं. आघाडीच्या चकमकींना तोंड लागतें न लागतें तोंच वेणीमाधवाचे लोक नदीकांठानें पळत सुटले. वेणीमाधवाचा तोच मार्ग होता. फिरून एकदां या स्वामिनिष्ठ जमीनदाराचें नांव शिपाई-गर्दीच्या इतिहासांत आढळतें. हा त्याचा नामोल्लेख त्याला पुनः एकवार इंग्रजानें हुसकल्याच्या संदर्भात केला जातो.

### फेरोजशहाची झुकांडी

वेणीमाधवाचा पिच्छा पुरवला जात असतां इतर भागांत बेगम, नाना इत्यादि पुढाऱ्यांना नेपाळच्या हद्दीकडे ढकलीत नेण्याचें काम चालू होतें. त्याला गोंडाच्या रजपूत राजानें (हा खानपुरिया रजपुतांचा प्रमुख होता) व मेहेंदी हसन यानें एकदांच अडथळा आणला. या दोघांच्या लष्कराला हारवून इंग्रजांनीं आपली वाट मोकळी केली. डिसेंबर अखेरीस सर्व पुढारी व शिपाई नेपाळांत घुसले आणि नेपाळच्या सरहद्दीवर इंग्रजी फौज थांबली. नबाब-शाहीचा सारा प्रदेश शांत होऊन इंग्रजांचा राज्यकारभार नीट सुरू झाला. या धामधुमींत ज्यानें इंग्रजांच्या वेढ्यांतून सहीसलामत निसटण्याचा डाव साधला असा एक फेरोजशहाच होता. तो नबाबशाहीच्या सीतापूर शहराजवळून इंग्रजी सैनिकांना झुकांड्या देत ता. ७ डिसेंबरला गंगा उतरून दुआबांत शिरला. आपण अमुक ठिकाणीं जात आहों, तमुक ठिकाणीं जात आहों, अशा अफवा त्यानें गांवोगांव पसरविल्या होत्या. त्यानें वाटेवरील तारा तोडून टाकल्या. याप्रमाणें आपलें ठावठिकाण इंग्रजाला न कळण्याच्या तजविजीनें तो मजल मारीत होता. इटाव्यास आडव्या आलेल्या इंग्रजांशीं झगडून व त्यांना फजीत करून फेरोजशहा ता. ९ रोजीं यमुनेपलीकडे गेला. यावरून त्याच्या वेगाची अटकळ करतां येईल. यमुना ओलांडून तो झांशीच्या रोखानें जातां जातां ता. १७ रोजीं त्यानें रानोद नांवाच्या एका मोठ्या गांवामध्यें मुक्काम केला व तेथें त्याची इंग्रज अडवणूक करूं शकला. फेरोजशहानें बेगम, नाना वगैरे मंडळींची संगत सोडून माळवा बुंदेलखंडाकडे जाण्याचें कारण इंग्रजी

इतिहासांत सांगितलें आहे. तात्या टोपे व फेरोजशहा हे एकमेकांना सतत आपापलें वर्तमान कळवीत असत. नबाबशाही मुलखांत इंग्रजानें पसरलेल्या लष्करी जाळ्यामध्यें धडपडत राहण्यापेक्षां जिकडे तात्यांचा संचार आहे, तिकडे आपल्या पराक्रमाला जास्त मोकळा अवकाश लाभेल, या अपेक्षेनें फेरोजशहा तात्यांच्या मुलखांत गेला, असा इंग्रज लेखकांचा फेरोजशहाच्या थारेपालटा-बद्दलचा खुलासा आढळतो.

**जमीनदारांची शरणागति**

कॅम्बेलची मोहीम सुरू होण्यापूर्वीं ता. १ नोव्हेंबर १८५८ या दिवशीं व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा देशभर डांगोरा पिटून लोकांच्या कानीं जावा, म्हणून प्रयत्न करण्यांत आला. कंपनीचें राज्य संपलें व राणीचें अर्थात् इंग्लंडचें राज्य जन्मास आलें, ही घटना लोकांच्या गळीं नीट उतरावी, अशा हेतूनें कॅम्बेल पुष्कळदां तालुकदारांच्या वस्तीवर एकदम हल्ला करण्याचें टाळीत असे. याचें एक उदाहरण अमेठीचें आहे. तेथील राजाला शरण येण्याबद्दल निरोप पाठवून किती मुदतींत शरण आलें पाहिजे त्याचाहि खुलासा त्या निरोपास जोडला होता. ही कारवाई चालू असतां त्याच्या भुई-कोटापाशीं इंग्रजी सैनिक गेल्यामुळें कोटावरून गोळीबार झाला. जें व्हायला नको होतें तें झाल्यामुळें कॅम्बेल संतापला. त्यानें उलट गोळीबार मना केला. अमेठीचा राजा आढेवेढे घेत छावणींत दाखल झाला. सर्व हत्यारें रुजू करावीं, ही अट त्यानें पाळली नव्हती. शिवाय त्यानें १५०० शिपाई व २००० बरकंदाज दुसरीकडे पाठविल्यावर तो शरण आला, हा त्याचा अपराध अधिकाऱ्यांना सलत होता. आपल्याकडे तोफासारखीं हत्यारें नव्हतीं व शिपाईप्यादे आपल्याला जुमानीत नव्हते, असें तो स्वतःचें समर्थन करीत होता. अमेठीचा किल्ला तपासला तेव्हां दारूगोळा बराच सांपडला व कसून शोध केला तेव्हां जमिनींत गाडलेल्या तोफांचा पत्ता लागून अमेठीच्या राजाच्या नाशिबीं कैद आली. परंतु सगळे जमीनदार अमेठीवाल्याच्या मासल्याचे नव्हते. नोव्हेंबर डिसेंबरांत जमीनदारी राणे राजे मोठ्या संख्येनें शरण येऊं लागले. छावणींतल्या प्रत्येक जणाला—मग तो कारकून असो, पहाऱ्यावरील यःकश्चित् शिपाई असो किंवा अधिकारी असो—लवून झुकून वंदन करण्याइतके ते नरमले होते. कधीं अशा राजातर्फे बोलणें करायला त्यांचे कारकून अथवा वकील येत असत. एकदां वेणीमाधवसिंगाचासुद्धां

वकील अधिकाऱ्यांना भेटला. त्याची भेट होण्याच्या ऐन वेळीं वेणीमाधवाच्या बरकंदाजांशीं थोड्याशा अंतरावर झटापट उडाल्याची वातमी आल्यामुळें भेटीची हिकमत वायां गेली. वेणीमाधव स्वामिभक्तीकरितां देशोधडीस जाण्याला सिद्ध असूनहि आपली मालमत्ता घराण्यांत राहावी, यासाठीं त्यानें मुलांच्या नांवानें एकदां सामोपचाराचा खडा टाकून पाहिला. 'बापाचा व आपला बेबनाव आहे, बापानें इंग्रजांशीं धरलेलें वैर आपल्याला पसंत नाहीं; आपण इंग्रजांना चाहणारे आहों, तेव्हां बापाच्या अपराधाकरितां त्याच्या मुलांबाळांना वनवास भोगायला लावणें न्यायाचें होणार नाहीं. बापाचा जमीनजुमला आपल्याला बहाल करावा,' अशा मतलबाचें पत्र मुलानें इंग्रज अधिकाऱ्यास लिहिलें होतें. पत्राच्या मजकुरांत वेणीमाधव सिंगाचा हात आहे असें ठरवून हा सिद्धसाधकपणाचा खेळ इंग्रजांनीं डोळ्याआड केला. बेगमे-कडूनहि एकदां वकील आला होता; नानासाहेब व बाळाराव यांनींहि इंग्रजांच्या सदयतेला, न्यायबुद्धीला कौल लावून पाहिला. १८५८ सालाच्या अखेरीस उठाव साफ मोडल्याबद्दल कुणालाच शंका नव्हती. नोव्हेंबरांत इंग्रजांच्या सर्वगामी वरचढ सामर्थ्याविषयीं खात्री पटल्यामुळें त्यांना शरण जाण्याचें भय जमीनदारांच्या अंतरंगांतून गेलें. जेव्हां मागूं तेव्हां इंग्रज साह्य करतील, असा भरंवसा नव्हतां तोंवर इंग्रजांशीं लढणारे जमीनदार इंग्रजांना मिळाल्यास आपली धडगत राहूं देणार नाहींत, या भीतीनें पुष्कळ जमीनदार इंग्रजांकडे जाण्याला धजले नाहींत. नोव्हेंबरपासून हा मनु पालटला. आतां जमीनदारांना इंग्रजांच्या सामर्थ्याविषयीं खात्री पटली. या दिवसांत सुमारें दीड वर्ष थांबलेल्या शेतसाऱ्याच्या धारा इंग्रजांच्या तिजोरींत वाहूं लागल्या.

**इंग्रजांचा चढेलपणा**

इंग्रज लोक विजयाच्या लाटेवर चढल्यानंतर हिंदी व्यक्तींशीं कसे वागत होते, याचा एक मासला येथें देण्याला हरकत नाहीं. जे अगतिक दीनपणानें शरण येत असत, त्यांचे घोडे जप्त करून त्यांना आपल्या जागीं पायीं दवडायचे, त्यांच्याशीं शिष्टाचारानें वागायचें नाहीं, अशा गोष्टी दर दिवशीं इंग्रजांच्या छावणींत चालू होत्या; पण जे इंग्रजाचे मनःपूर्वक मित्र होते, उठावांत ज्यांना अशा मैत्रीनिमित्त शिपायांनीं छळलें, त्यांच्याशीं देखील बेफिकीर उर्मटपणानें वागण्याची इंग्रजी तऱ्हा लंडन टाइम्सच्या बातमीदारानें लिहिलेली आहे. १८५८ च्या एप्रिलांत पाहिल्या तारखेला मुनीरुद्दौला नांवाचा

एक मोठ्या इभ्रतीचा वृद्ध गृहस्थ कॅम्बेलच्या भेटीस आला. हा एकदां नबाबशाहीचा मंत्री होता, नबाबाशीं त्याचें नातें होतें, असें असूनहि त्याची दाद लवकर लागली नाहीं. सेनापति कामांत आहेत, कांहीं वेळ थांबावें लागेल, हें मुनीरउद्दौल्याला कोणी सांगायचें यासाठीं दोघा इंग्रजांत वाद माजला. तोंवर मुनीरुद्दौला उभाच होता. मग त्याला 'बसा' म्हणण्याची एकाला बुद्धि झाली. पण बसण्यासाठीं ज्या खुर्च्या दाखविल्या त्या मोडक्या होत्या. मुनीरुद्दौला एका खुर्चीवर बसला, पण तिच्यावर बैठकीचा तोल राहण्यासाठीं त्याला कसरत करावी लागत होती. इकडे तो आल्याचें आंत वड्या साहेबाला कोणी कळवायचें, या प्रश्नाची घासाघीस माजली. आउटरॅम बाहेर येऊन त्यानें मुनीरउद्दौल्याचें स्वागत केलें तेव्हां तो मुसलमान गृहस्थ या चालू विटंबनेंतून सुटला. अगोदरच शिपायांनीं त्याला अपमानाच्या पराकाष्ठेस पोंचविलें होतें. त्या जखमेवर या प्रसंगाचें मीठ चोळलें जाऊन मुनीरुद्दौलाची मानसिक स्थिरता भंगली व तो पुढें लवकर मरण पावला, असें रसेलनें म्हटलें आहे.

– ३ –

**नबाबशाहीच्या पूर्वेकडे**

नबाबशाही प्रदेशाच्या पूर्वेकडे असलेल्या अलाहाबाद, बनारस, गोरखपूर, आझमगड, गया, पाटणा वगैरे जिल्ह्यांतून, क्वचित् क्वचित् बंगाल–ओरिसाच्या भागांत उठावाच्या ज्या लाटा उसळत होत्या, त्यांचा परामर्श याच प्रकरणांत करण्यांत विसंगति नाहीं. नबाबशाही मुलखाशीं हे जिल्हे संलग्न असल्यामुळें त्यांच्यांतील उठावांतहि परस्परसंबंध दृष्टीस पडतो. बिहारचा कुंवरसिंग, आझमगड, गोरखपूर या जवळच्या नव्हे तर बुंदेलखंडासारख्या दूरच्या भागांत गेल्याचे उल्लेख पाहिले म्हणजे उठावाच्या या प्रदेशांतील सार्वत्रिक एकजिनसीपणाबद्दल खात्री पटण्यासाठीं वेगळा पुरावा नको. बिहार हा कुंवरसिंगाच्या वास्तव्याचा प्रदेश असल्यानें तेथील व त्यालगतच्या भागांतील उठावाची पाहणी करण्यापूर्वीं बंगाल, ओरिसा, आसाम या मुलखांत जें घडलें तें आधीं दृष्टीखालीं घालणें कथानकाच्या सोयीचें आहे.

**बंगाल–बिहारचें इतिवृत्त**

बंगाल सामान्यतः शांत होता. तथापि १८५७ च्या नोव्हेंबर १८ रोजीं चितागांव येथें ३४ व्या पलटणीच्या शिपायांनीं इंग्रजी हुकुमत झुगा-

रण्यांचें ठरवून खून, लूट, तुरुंगफोडी वगैरे कार्यक्रम उरकून टिपरा संस्थानाच्या डोंगराळ टापूकडे ते निघाले. यामागून चार दिवसांनीं डाक्क्याच्या हिंदी लष्कराचीं हत्यारें काढून घेण्याच्या प्रसंगीं तेथें शिपायांनीं अटीतटीचा प्रतिकार केल्यामुळें बरीच गडबड उडाली, पण शिपायांचा मोड होऊन त्यांना पळावे लागलें. इंग्रजी माहितीप्रमाणें दोन्ही ठिकाणच्या शिपायांना लोकांनीं मुळींच मदत केली नाहीं. डाक्क्याच्या शिपायांना तर तेथील मुसलमानांनीं सळो का पळो करून सोडलें, असाहि एका ठिकाणीं उल्लेख आहे. चितागांवच्या शिपायांविषयीं एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मंगल पांड्याच्या प्रकरणानंतर चितागांवहून 'आपण पक्के राजनिष्ठ आहों' असें ज्यांनीं इंग्रज वरिष्ठांना कळविण्याची काळजी दाखविली, तेच हे शिपाई होत. बराकपुराच्या घटनेनंतर सुमारें आठ महिन्यांनीं त्यांना इंग्रजी वर्चस्वाचा कंटाळा आला. आतां इंग्रजांचें सामर्थ्य वाढून त्यांच्या राज्याविषयीं लोकांत विश्वास उत्पन्न झाला होता, याची कल्पना नसल्याप्रमाणें त्यांनीं जेव्हां उठाव करून टिपऱ्याचें रान धरलें तेव्हां टिपऱ्याच्या राजानें त्यांना अडविलें, मग इंग्रजी भागांत शिरण्याशिवाय शिपायांना गत्यंतर दिसलें नाहीं. इंग्रजांच्या हद्दींत ता. १८ डिसेंबरला सिल्हटच्या स्थानिक देशी सैनिकांनीं शिपायांचा खरपूस समाचार घेतला. त्यांतून वाचलेल्यांना ता. १२ जानेवारी १८५८ रोजीं पुनः पूर्वींसारख्या प्रसंगांत सांपडून जंगलाचा आश्रय घेण्याची पाळी आली. तेथें जे गेले त्यांचा फिरून विचार करण्याची इंग्रजाला गरज पडली नाहीं.

भागलपूर परगण्यांत इंग्रजी राज्य कधींच विस्कळलें नाहीं. दीनाजपूरच्या उठावानंतर घोडदळानें जेव्हां त्यांत उडी घेतली तेव्हां इंग्रजाला चिंतेने ग्रासलें. घोडदळाचा प्रत्यक्ष उठाव आणि जलपैगुरी येथें डाक्क्याच्या पलटणीच्या तुकड्या होत्या त्या उलटण्याचा संभव अशी इंग्रजांच्या चिंतेचीं दोन कारणें होतीं. जमीनदार इंग्रजनिष्ठ असले तरी लोकांत स्वस्थता नव्हती. सदर परगण्यांत दरवडेखोरीला ऊत चढला होता. इंग्रजांनीं जलपैगुरीस लष्कर पाठविलें व त्याच सुमारास जलपैगुरीच्या शिपायांनीं इंग्रजाच्या नोकरीला मूठमाती दिली. दीनाजपूर ठाण्यावर चाल करावी हा त्यांचा इरादा इंग्रजांचें दळ येत असल्याच्या बातमीनें विरघळला. शिपाई जेथें जातील तेथें इंग्रजी लष्कर बिनचूक भेटत गेल्यामुळें त्यांनीं नेपाळाचा आश्रय घेतला. ते नेपाळांत

अंतर्धान पावत होते इतक्यांत डाक्क्याचे शिपाई जलपैगुरीच्या रोखानें वाटचाल करीत असल्याचें इंग्रज अंमलदारांना समजलें आणि डाक्क्याच्या शिपायांना देखील त्या अंमलदारांनीं आपल्या पूर्वींच्या व्यवसायबांधवांची भेट घेण्यासाठीं नेपाळांत दवडलें.

१८५७ च्या नोव्हेंबरांत छोटा नागपूर परगण्यांत राज्यकारभाराच्या दृष्टीनें बराच अस्ताव्यस्तपणा उद्भवला होता. तेथील आदिवासी बिथरले होते. त्यांची वक्रदृष्टि जमीनदारांवर होती. ज्या जमीनदारांनीं त्यांना दुखावलें होतें त्यांचा सूड उगवणें हा आदिवासींचा मुख्य हेतु होता. कुठें कुठें एखाद्या जमीनदाराविरुद्ध दुसरा खरा किंवा तोतया हक्कदार आदिवासींच्या पाठिंब्यानें उभा राहून धामधूम चालवी. हा तंटा वरून आदिवासी व जमीनदार यांच्यांतला दिसला तरी जमीनदारांच्या रक्षणाचें कर्तव्य इंग्रजांना टाळणें शक्य नव्हतें. आदिवासींना दडपण्याकरितां परगणाभर छोट्या मोठ्या लष्करी तुकड्यांची धावाधाव चालू असूनहि त्या डोंगराळ रानटी मुलखांत कांहीं काळ इंग्रजांना निष्फळ यातायात भोगावी लागली. १८५८ मध्यें अपराधी वाटणारीं खेडीं जाळून तेथील गुरांची व धान्याची लूट चालविली तेव्हां इंग्रजांना आदिवासींची गडबड थांबविणें शक्य झालें. मग आदिवासींनीं शेतसारा भरायला सुरुवात केली व गडबड थंडावल्याचा अधिकाऱ्यांना प्रत्यय आणून दिला.

### वृद्ध वीर कुंवरसिंग

ता. २५ जुलई १८५७ मध्यें पाटणा शहराजवळच्या दीनारपूर येथील शिपायांच्या उठावाची व कुंवरसिंगाची हकीकत पूर्वीं सांगून झाली आहे. कुंवरसिंगाला आपलें वस्तीस्थान सोडून इंग्रजी लष्करानें अन्यत्र जायला भाग पाडलें व आराचा वेढा उठविला, हा त्या हकीकतीचा सारांश आहे. कुंवरसिंगाची फार मोठी जमीनदारी होती, परंतु त्या जमीनदारीच्या कारभाऱ्यांनीं आपल्या संबंधांतल्या कुंवरसिंगाच्या अंधविश्वासाचा फायदा घेऊन त्याला कर्जाच्या खाईत लोटलें. कर्जबाजारांतून त्याला तारावें, अशी स्थानिक अधिकाऱ्यांची वरिष्ठांकडे आग्रहाची शिफारस असूनसुद्धां वरिष्ठांनीं ती लाथाडली. कुंवरसिंग हा जुन्या वजनदार रजपूत घराण्याचा एक अतिशय उदार व लोकप्रिय पुरुष होता. १८५७ मध्यें तो कर्जापायीं बुडण्याच्या पंथांत असतां शिपायांच्या

उठावाची संधि साधून त्यानें कर्जाच्या काचांतून सुटण्याची नवी दिशा स्वीकारली. त्यानें शिपायांना उठविण्याचें किंवा ते उठल्यास त्यांना साह्य करण्याचें कारस्थान रचलें, असें म्हणणारे इंग्रज अधिकारी निघाले तर कुंवर-सिंगाचा शिपायांच्या उठावाशीं बिलकूल संबंध नाहीं, असें ठासून बजाव-णारेहि अधिकारी तेव्हां होते. परंतु या अधिकाऱ्यांच्या वादाचा अंतिम निर्णय कळेपर्यंत वाट पाहणें कुंवरसिंगाला धोक्याचें होतें. शिपायांसंबंधांत आपल्या-बद्दल अधिकारी-वर्गांत उद्‌भवलेला संशय आपल्याला केव्हां कैदखाना दाखवील, याचा भरंवसा नसल्यानें शिपायांचें व कुंवरसिंगाचें सूत जमायला उशीर लागला नाहीं. कुंवरसिंग हा त्यांचा पुढारी अर्थात् इंग्रजांचा कट्टा वैरी बनला. शिपायांना त्याच्याविषयीं परकेपणा नव्हता, कारण त्यांच्यांत पुष्कळसे रजपूत होते.

## कुंवरसिंगाची दौड

कुंवरसिंगाचें जगदीशपूर इंग्रजानें जिंकून उध्वस्त केल्यावर त्याची दौड कुठें कुठें झाली याची नोंद तत्कालीन इंग्रज अंमलदाराच्या आपसांतील पत्र-व्यवहारावरून करावी लागते. प्रथम अकबरपुरास व तेथून कुंवरसिंग रीव्यास गेला. रीवा संस्थानांत जर अडवणूक झाली नसती तर त्याचा दिल्लीस जाण्याचा बेत असल्याबद्दल तेव्हां बातमी होती. या काळांत शिपायांनीं त्याला सोडलें, अशी माहिती दृष्टीस पडते. सप्टेंबर महिना रीव्याच्या टापूंत सारून तो ऑक्टोबरांत बांद्यास होता. तेथून त्यानें काल्पी शहर गांठलें. त्या सुमारास काल्पीचे शिपाई कानपुरावर चढाई करण्याच्या तयारींत होते. कुंवरसिंग कानपूरच्या लढाईत होता, अशी त्याच्या एका साह्य-कर्त्याची साक्ष आहे. कानपूरच्या लढाईनंतर त्यानें लखनौ शहरीं जाण्याचें पसंत केलें. तेथें त्याचा अयोध्येच्या वलीनें—बिरजिस कुद्र, शिपायांचा नबाब—त्याचा उत्तम आदरसत्कार करून त्याला पोषाख व आझमगडावर राज्य करण्याचा परवाना दिला. १८५८ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत कुंवरसिंगाचा व इंग्रजांचा कुठें सामना जुंपला नाहीं. मार्च महिन्यांत कुंवरसिंगाला आपलें युद्ध-कौशल्य दाखविण्याचे दिवस आले. 'शिपाईगिरींत वाढलों असतों तर मी उत्कृष्ट सेनानी झालों असतों,' हा कुंवरसिंगाचा आत्मविश्वास पोकळ नव्हता, असें मार्चनंतर सिद्ध होण्याला अवकाश लागला नाहीं.

### इंग्रजांचा पराभव

मार्च महिन्यांत गोरखपुर आझमगड जिल्ह्यांतील फौजा लखनौला लढाईसाठीं गेल्या. अर्थात् त्या प्रदेशांत ब्रिटिशांचें सेनाबळ अगदींच तुटपुंजें आहे, असें पाहून कुंवरसिंग तिकडे वळला. त्यापूर्वी ता. १५ मार्चला तिकडे स्थानिक उठावाशीं इंग्रजांचा झगडा सुरू होता, त्यांत इंग्रजाला जय मिळाला, पण त्यामागून उठावाच्या लोकांचा पाठलाग करतां आला नाहीं, यामुळें ते लोक एका तटबंदी गांवाच्या आश्रयानें लढत राहिले. तेथून त्यांनीं कित्येक तुकड्या अत्रोलिया गांवीं पाठविल्या. मार्गांत त्यांचा पुढाकार कुंवरसिंगानें घेतला. नंतर कुंवरसिंग अत्रोलियास ता. १७-१८ मार्चला ठाण मांडून बसला. तेथून कुंवरसिंगाला इंग्रजांनीं हुसकलें. ता. २२ मार्च या दिवशीं ज्यांनीं ही कामगिरी पार पाडली त्यांना कुंवरसिंगानें असें ठोकलें कीं, या इंग्रजांना त्याच दिवशीं कोल्सिया गांवीं पळावें लागलें. इंग्रजांना यश आल्यावर ते विश्रांतीसाठीं लढाईच्या जागीं थांबून खाण्यापिण्यांत गुंतले असतां त्यांचा थकवा, उपासमार व अत्यल्प संख्या या गोष्टींचा कुंवरसिंगानें विचार केला व एकदम चढाई आरंभली. तिला अडविण्याचा इंग्रजांचा यत्न वायां जाऊन त्यांनीं लढत लढत पीछेहाट साधतांना बरींच माणसें गमावलीं, त्यांना सामान-सुमान टाकून द्यावे लागले व कोल्सियास मजबूत जागीं इंग्रज कसेबसे जाऊन पोचले. कुंवरसिंगानें सदर पीछेहाटीच्या वेळीं डुकर-मुसंडीची लगट केली नाहीं. इंग्रजानें मागें सरावें आणि कुंवरसिंगाच्या लोकांनीं पुढें सरकावें, या प्रकारामुळें इंग्रज बचावले. कोल्सियाहून इंग्रजांनीं कुमकेसाठीं लखनौ, अलाहाबाद, बनारस येथें निरोप रवाना केले.

### पुनश्च पराभवाचा प्रसंग

२४-२५ तारखांच्या दिवशीं बनारसकडून जी कुमक आली तिनें ता. २७ ला कुंवरसिंगाचा वेढा फोडण्याचा जो यत्न केला, तो यशस्वी झाला नाहीं. ३१ मार्चला अलाहाबादेहून नवी कुमक निघाली. ता. ६ एप्रिलपर्यंत ही कुमक ठिकठिकाणीं आपलें सामर्थ्य वाढवीत मजल मारीत होती. त्या दिवशीं कुंवरसिंगाची व या कुमकी फौजेची गांठ पडून सामना जुंपला. या वेळीं वृद्ध वीर कुंवरसिंग पांढऱ्या घोड्यावर बसून आपल्या लढवय्यांना उत्तेजन देत असतांना इंग्रजांना दिसला. त्यानें आपले शिपाई इंग्रजाभोंवतीं पसरले. इंग्र-

जाच्या पिछाडीस सामान-सुमानाचे गाडे, हत्ती वगैरे जो सरंजाम होता, त्याचे लोक पळाले. हत्तींचे माहूत हत्तींना चिकटले, गाडीवान गाड्या टाकून जीवाच्या भयानें झाडावरून चढले. हा सरंजान व मुख्य सैन्य यांच्या दरम्यान पाचरेप्रमाणें घुसून इंग्रजाची दाणादाण उडवावी अशी हिकमत कुंवरसिंगानें अंमलांत आणली. ही हिकमत फोल ठरावी म्हणून इंग्रजी लष्कर मागच्या बाजूस वळतांच कुंवरसिंगाच्या लोकांनीं जयघोष केला. या वेळीं इंग्रज सेनापतीनें समोरच्या एका इमारतीचा कुंवरसिंगाला मुख्य आधार आहे, असें ध्यानांत आणून तिच्यावर तोफांचा मारा चालविला. त्या माऱ्याला सहजासहजीं दाद देणारी ती इमारत नव्हती. म्हणून जेव्हां तिचें छप्पर व लाकडी बांधकाम पेटविलें तेव्हां कुंवरसिंगाचे शिपाई बाहेर पडले. त्यांच्यावर इंग्रजाचा हल्ला येतांच त्यांनीं आघाडी सोडली. परंतु कुंवरसिंगानें पिछाडी मारण्याचा उद्योग सोडला नव्हता. कुंवरसिंगानें एका उंचवटयावरून इंग्रजाची पिछाडी झोडगोळीबारानें संकटांत टाकली होती. समोरचा भाग मोकळा झाल्यामुळें इंग्रज सेनापति पिछाडी बांचवूं शकला. हल्ला करून त्यानें कुंवरसिंगाचे लोक पळविले व सामान-सुमानाच्या रक्षणासाठीं थोडेंसें लष्कर ठेवून तो आझमगडाकडे जोरानें निघाला. यामुळें कुंवरसिंगाच्या शिपायांनीं चोहोंकडून पळ काढला. त्यासरशीं माहूत, गाडीवान आपल्या ठिकाणावर आले. मग सेनापतीमागें आपोआप सामानाचा सरंजाम गेला. याउपर आझमगडापर्यंत इंग्रजाला एका पुलाच्या जागेखेरीज दुसरा कुठेंच विरोध झाला नाहीं. शिपायांनीं पुलाची मोडतोड केली होती व तेथें इंग्रज गेले तेव्हां त्यावर गोळीबार केला; ही किरकोळ अडचण धुडकावून इंग्रज आझमगडास पोचला. कुंवरसिंगाला या प्रसंगीं अमुक तमुक करतां आलें असतें, असें सुचाविणारे इंग्रज लेखक त्याच्या तरफदारीनें म्हणतात कीं, कुंवरसिंगाला केव्हां काय करावें हें समजत होतें, पण त्याच्या भोंवतीं जमलेले शिपाई वेगवेगळ्या पुढाऱ्यांचे होते व हे पुढारी आपसांत एका विचारानें जसे वागणारे नव्हते तसेच कुंवरसिंगाचें मनोगत सदैव अनुसरलेंच पाहिजे अशा बाण्याचे नव्हते, यामुळें कुंवरसिंगाच्या नेतृत्वाचे गुण फुकट गेले.

लखनौस आझमगडाच्या संकटाविषयीं निरोप कळतांच कॅम्बेलनें लुगार्ड नांवाच्या अधिकाऱ्याला फौज देऊन तिकडे २९ मार्च रोजीं रवाना केले. लुगार्डला वाटेंत एक लढाई करावी लागली. १४ एप्रिलला तो आझमगडापासून

सात मैलांवर आला. येथें त्याला एक नदी ओलांडायची होती. कुंवरसिंगानें या नदीचा उतार निकरानें लढविण्याचा निश्चय केला. येथें शिपाई आपली मर्दुमकी पणाला लावून लढले व माघार अशा थाटानें घेतली कीं, त्यांची मनुष्यहानि फारशी झाली नाहीं. जेव्हां पाठलाग अंगाशीं भिडला तेव्हां देखील त्यांनीं नेटानें झुंजून आपली फळी फुटूं दिली नाहीं. मैदान सोडणाऱ्या शिपायांनीं अशी लढाईची चिकाटी पूर्वीं कधींच दाखविली नव्हती. नंतर इंग्रजापुढें टिकाव लागणें शक्य नाहीं, असें वाटल्यावर त्यांनीं लढाई सोडली, पण जूट व शिस्त कायम राखून ते माघारी फिरले. ही नदी उतरून पलीकडे जातांच आझमगडच्या लष्करी तुकड्या मदतीस घेऊन नबाबशाही प्रदेशाकडे वळलेले दोघे जमीनदार व लखनौ सोडतांच ज्याच्याशीं पहिली लढाई झाली ते पुढारी, यांच्या समाचारास जाण्याचा लुगार्डचा संकेत होता. पण कुंवरसिंगाचा पाठलाग नाथूपूर गांवीं अडल्याची बातमी त्याच्या कानावर आली. लुगार्डनें ताबडतोब डग्लस नांवाच्या अधिकाऱ्याला फौज देऊन नाथूपुरास पाठविलें. कुंवरसिंग या गांवापासून चौदा मैलांवर होता. त्याची जागा अतिशय बळकट असून त्यानें केलेली सैन्याची मांडणी कौशल्यपूर्ण होती. १७ एप्रिल रोजीं डग्लसला याप्रमाणें अनुभव आला. कुंवरसिंगानें आपलें ठाणें सोडलें, पण त्यानें फौजेचे दोन भाग करून त्यांचा जमाव फुटणार नाहीं, असा बंदोबस्त ठेवल्यामुळें डग्लसच्या पाठलागाला कांहीं माणसें बळी पडलीं तरी फौज शाबूत राहिली. आतांसुद्धां मागल्या वेळेप्रमाणेंच शिपायांची शिस्त, जूट व लढण्याची हिंमत कायम होती. बऱ्याच अंतरावर हे दोन विभाग एकवटले. कुंवरसिंगहि आस्तेकदम आपल्या फौजेस जाऊन मिळाला. तथापि त्याची पीछेहाट व इंग्रजांनीं चालविलेला पाठलाग हा क्रम बंद पडला नाहीं. इंग्रजांची त्याला गांठण्यासाठीं घाई तर इंग्रजाला चुकविणारी कुंवरसिंगाची चपळाई, अशी उभयपक्षीं चढाओढ चालली होती. अखेरीस ता. २० रोजीं इंग्रजानें त्याला गांठलें. ही आकस्मिक धाड वाटली म्हणून म्हणा किंवा निकरानें लढण्यासारखी सोयीची जागा नव्हती म्हणून म्हणा कुंवरसिंगाच्या शिपायांनीं लढाई टाळून धूम ठोकली. शिपायांच्या खजिन्यासकट सगळें सामान—चार हत्ती, एक तोफ, गाड्या बैल वगैरे सर्व—इंग्रजांच्या हातीं लागलें. शिपाई पळाले खरे, पण तसें करतांना पुढें निश्चित केलेल्या संकेतस्थानीं ते एकत्र जमले. त्या संकेतस्थानाचा पत्ता इंग्रजांना समजला नाहीं.

इंग्रजी तुकडीचा फडशा

कुंवरसिंगाला गंगा उतरून आपल्या गांवीं—जगदीशपुराला—जायचें होतें. त्यानें गांवोगांव आपल्या शिपायांतसुद्धां अशी बातमी पसरविली कीं, गंगेवर नावांचा तुटवडा असल्यानें ती नदी हत्तींच्या साह्यानें उतरावी लागेल. पण त्यानें एका घाटावर गुप्तपणें नावा जमविल्या. त्या घाटापासून अवघ्या सात मैलांवर, दुसरी इंग्रजी फौज त्याची वाट मारण्यासाठीं सज्ज असूनहि तिचा उपयोग झाला नाहीं. कुंवरसिंगानें आपले बहुतेक शिपाई नदीपार नेले. दोनशें शिपाई कांठावर उरले होते, इतक्यांत डग्लस तेथें येऊन धडकला. हे शिपाई डग्लसच्या तावडींत सांपडले. त्याला कांहीं हत्ती व एक तोफ असा माल मिळाला. कुंवरसिंग जगदीशपुरास निर्विघ्न गेला. तेथें त्याच्या भावानें-अमरसिंगानें—हजारों हत्यारबंद गांवकरी गोळा केले होते. जगदीशपुरास कुंवरसिंग येतांच मागल्या वर्षीं व्हिन्सेंट आयरनें जसा पराक्रम गाजविला, तसा आपण गाजवावा या उमेदीनें ता. २३ एप्रिल रोजीं आऱ्याहून एक इंग्रज कप्तान फौज घेऊन जगदीशपुराकडे निघाला. परंतु त्याचा खटाटोप अंगावर उलटला. इतिहासकारांचा अंदाज आहे कीं, अगदीं आणीबाणीच्या क्षणीं कप्तानाचा हुकूम देण्यांत किंवा सैनिकांच्या समजण्यांत कांहीं घोटाळा होऊन ब्रिटिश सैनिकांनीं पळ आरंभला. गोऱ्यांपैकीं दोन तृतीयांश सैनिक मारले गेले. तोफांचे लोक तोफांभोंवतीं ठार पडले. कप्तान व दुसरे दोन अधिकारी प्राणास मुकले. खडतर पराभवांत न्यून म्हणून कांहीं उरलें नाहीं. ही बातमी ऐकून डग्लस तिकडे धांवला. इंग्रजांच्या पराभवाचा फायदा घेण्यासाठीं कुंवरसिंगाचे लोक आऱ्यावर चालून गेले. त्यांना आऱ्याच्या सैनिकांनीं थोपवून धरले होते; डग्लस आल्यानंतर कुंवरसिंगाच्या शिबंदीचा हल्ला होण्याचें भय आऱ्यास कमी झालें. लुगार्ड आला तेव्हां इंग्रजानें चढाईचा डाव टाकला. पण आतां कुंवरसिंग इहलोकीं राहिला नव्हता. त्याला गंगेपलीकडच्या लढाईत जखम झाली व तिनें त्याचा घात केला, अशी एक बातमी होती. जगदीशपुरास आल्यावर त्याचें मनगट कापावें लागलें अशी दुसरी जास्त खात्रीची बातमी होती. ता. २३ रोजीं त्यानें इंग्रजी फौजेचा बोजवारा उडविला व ता. २६ एप्रिल रोजीं त्याचें देहावसान झालें. १८५७च्या ऑगस्ट-पासून १८५८ च्या मार्चपर्यंत इंग्रजाला कुंवरसिंगाचा नुसताच धाक वाटत होता. मार्चपासून त्याच्या रणपटुत्वाची ओळख करून घेण्याचा योग आला,

परंतु युद्धोचित गुणांची थोडीं फार सफलता भोगण्याची वेळ १८५८त मागें पडली होती. यामुळें बचावाच्या शिताफीखेरीज दुसरे गुण दाखविणें कुंवर-सिंगाला शक्य नव्हतें; चढाईपेक्षां बचावाला जास्त कौशल्य लागतें, असा एक युद्धविद्येचा नियम सांगतात. त्यास अनुसरून इंग्रज लोक कुंवरसिंगाच्या युद्धकर्तृत्वाची प्रशंसा गातात. कुंवरसिंगासंबंधांत त्यानें तीन चार वेळां इंग्रजाला मार दिला ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. तात्या टोपे, मौलवी, झांशीकर लक्ष्मीबाई, यांच्या श्रेणींत कुंवरसिंगाला स्थान असून त्याच्या आयुष्याला अखेरच्या वर्षीं पराक्रमाचा उजळा मिळाला. तो १८५७ तील शिपाई-गर्दीच्या स्मरणांत कायमचा राहील.

### शहागडांतील दंगल

कुंवरसिंगामागून त्याच्या भावाच्या—अमरसिंगाच्या—नेतृत्वानें उठा-वाच्या उसळ्या शहागड जिल्ह्यामध्यें सर्वत्र सुरू झाल्या. कुंवरसिंगाचा शेवटचा विजय उठावाच्या दृष्टीनें अतिशय परिणामकारक ठरला. इंग्रजांचें राज्य त्या विजयानें नाश पावलें, या कल्पनेनें जिकडे तिकडे उठावाचे कैवारी पसरून त्यांनीं सारा मुलूख हादरून सोडला. लढायांपेक्षां झटापटी व चकमकी सर्वत्र माजल्या. असा एक दिवस जात नव्हता कीं ज्या दिवशीं बारीक मोठी झटापट कुठेंना कुठें उडाली नाहीं. इंग्रजाला ही निस्सीम अव्यवस्था काबूत आणण्याकरितां सात हजारांइतकें सैन्य वाढवावें लागलें. त्यानें रानांतून रस्ते तयार केले; जगदीशपुराच्या आसपासचें जंगल तोडलें; एकमेकांशीं जलद संबंध जोडतां येईल अशीं लष्करी ठाणीं जवळ जवळ उभारलीं; तो जिल्हा लष्कराच्या ताब्यांत दिला, इतकें करूनहि उठाववाले त्या भूमीचे माहीतगार असल्यानें इंग्रजांच्या चौकस नजरेंतून निसटून जात. पावसाळा संपल्यावर इंग्रजानें उठावाच्या यशस्वी चंचलतेला आळा घालण्याचा एक नवा उपाय काढला. त्यांनीं घोड्यावर पायदळाचे सैनिक चढवून उठाववाल्यांचा पाठलाग आरंभला. हे घोड्यावरचे पायदळ व खरें घोडदळ मिळून माणसें थोडीं होतीं, पण पळणाऱ्या शिपायांहून त्यांचा वेग जास्त असल्यानें त्यांची अडवणूक करण्याच्या दृष्टीनें हा नवीन उपाय अत्यंत कार्यक्षम असल्याचें अनुभवास आलें. या वेळीं इंग्रजांच्या हातीं लांब पल्ल्याच्या बंदुका आलेल्या होत्या. त्यांच्या मारानें शिपायांचीं हत्यारें निरुपयोगी बनलीं. चोहोंकडे पसरलेलीं इंग्रजांचीं ठाणीं शिपायांना आवळीत होतीं, त्यामुळें शिपायांच्या टोळ्या

आपसांत मिसळून त्यांचा जमाव एखाद्या ठिकाणीं आढळल्यास तेथें त्याला चिरडून टाकणारीं इंग्रजांचीं मोठीं दळें फिरत होतींच. शिपायांना क्षणाचीहि विश्रांति मिळूं द्यावयाची नाहीं अशा धोरणानें इंग्रजांनीं पिच्छा पुरवून शेवटीं शिपायांना कैमूरच्या डोंगर-झाडींत ढकललें. तेथें त्यांच्या तळावर इंग्रजानें नोव्हेंबर अखेरीस जो छापा घातला, त्यांत शिपायांचें सगळें सामर्थ्य संपलें. त्या छाप्यानंतर शहाबाद जिल्ह्यांत इंग्रजी राज्य झपाट्यानें भरारलें. आपण शिपायांचा बीमोड केल्याची फुशारकी इंग्रजाला मारतां येत असली तर उठावाच्या पुरस्कर्त्यांचा आपण इंग्रजाला वर्षभर नाचविलें हा यथार्थ अभिमान त्यांच्या कीर्तींतून हिरावतां येण्यासारखा नाहीं.

• • •



सेनापति तात्या टोपे

~ ९ ~

# तात्यांची भरारी – महाराष्ट्र

१८५८ च्या अखेरीस उठावाच्या मुख्य प्रदेशांत व इतरत्र शांतता निर्माण करून आपल्या राज्याचीं पाळेंमुळें घट्ट रुजविल्याची धन्यता इंग्रजांनीं बाळगावी अशी स्थिति प्राप्त झाली तरी अद्यापि उठावाच्या वादळाचा एक जोराचा झोत माळवा-बुंदेलखंड राजस्थानच्या भूमीमध्यें वाहात होता. तो म्हणजे पेशव्यांचा सेनापति तात्या टोपे हा होय. १८५८ जून महिन्यांत ग्वालेरच्या पराभवानंतर तात्या ग्वालेरहून जावरा–अलीपूर येथें गेले. ग्वालेरच्या पाडावापूर्वीं एक दिवस तात्यांनीं तें ठिकाण सोडलें होतें. ग्वालेरची इंग्रजांच्या मतानुसार योग्य व्यवस्था लागतांच त्यांच्या लष्करी तुकड्या तात्यांच्या पिच्छयावर निघाल्या. ता. २१ जून रोजीं सकाळीं जावरा-अलीपूर येथें इंग्रजी सैन्यानें तात्यांना गांठलें. लढाई झाली व उठावाच्या सैनिकांना जो पराभवाचा अनुभव पूर्वी येत होता तोच आतांहि आला. त्यांचे २००-४०० लोक धारातीर्थीं पडले. त्यांच्या २५ तोफा इंग्रजांनीं घेतल्या. त्याशिवाय पुष्कळसा दारूगोळा व इतर युद्धोपयोगी माल इंग्रजांच्या हातीं लागला तो निराळाच. जे शिपाई पळाले ते आसपासच्या खेड्यांतून शिरल्यामुळें तीं खेडी इंग्रजांनीं उध्वस्त केलीं. जावरा-अलीपूरपासून पुढें ३० मैलपर्यंत शिपायांची पाठ पुरवून त्यांची दाणादाण झाल्याच्या समजुतीनें इंग्रजी सैन्य ग्वालेरास परतलें.

## झालरा पाटणची लूट

तात्यांचा भरतपुराकडे जाण्याचा रोख आहे, असें पाहून त्या दिशेनें इंग्रजांनीं सैन्य पाठविल्याचें समजलें तेव्हां तात्यांनीं टोंक संस्थानाकडे भरारी मारली व ती यशस्वी झाली. टोंक येथें त्यांनीं तोफा हस्तगत केल्या-नंतर तात्या बूंदी संस्थानांत गेले. बूंदीच्या राजानें तात्यांकडे पाठ फिर-विल्यामुळें तात्यांनीं नीमच-नसीराबाद रस्त्यावरील संगमनेर गांवीं मुक्काम केला. परंतु त्या ठिकाणीं इंग्रजांचा हल्ला होऊन तात्यांना उदेपूर राज्याच्या

केंक्रोली गांवीं जाण्याची पाळी आली. तेथें इंग्रजांच्या पाठलागाचें भय लक्षांत घेऊन तात्या मुक्काम हालविण्याच्या विचारांत होते; पण पायदळ अतिशय थकलें होतें, त्यानें तात्यांचा विचार फेटाळला व पाठलागाची घोरपड आपल्या अंगावर ओढवून घेतली. ता. १४ ऑगस्टला इंग्रजांनीं तात्यांना तेथून उधळून लावलें. तथापि तात्यांचा उत्साह आणि विजयाचा अभिलाष कायम होता. त्याप्रमाणें झालरा-पाटण या संस्थानी शहरांत त्यांनीं विजय मिळविला. या संस्थानाचें सैन्य तात्यांच्या नेतृत्वाखालीं गेलें. तात्यांनीं राजाकडे १५ लाख रुपये मागितले. राजाची या बाबतींत खळखळ पाहून त्याला पकडून रावसाहेबाकडे नेलें. राजानें त्या रात्रीं ५ लाखांची रक्कम तात्यांच्या पदरांत टाकली. राजाची या प्रसंगीं अतिशय अप्रतिष्ठा झाल्यामुळें तो घाबरून रातोरात पळाला व महूस इंग्रजांच्या आश्रयास जाऊन राहिला. चंबल नदीला पूर असल्यानें ती नदी इंग्रजाला ओलांडतां येणार नाहीं, अशा खात्रीनें तात्यांनीं झालरा-पाटण येथें स्वस्थपणें पांच दिवस काढले. आपल्या सैनिकांना तीन महिन्यांचा पगार वाटला. त्या शहरांत जें जें मोलाचें होतें तें आत्मसात् केलें. या शहरीं तात्यांना ३० तोफांची प्राप्ति झाली होती. आतां त्यांनीं झालरापाटणप्रमाणेंच इंदूर जिंकण्याची आकांक्षा धरली. झालरापाटणच्या सैन्याप्रमाणें इंदूरचें सैन्य आपल्याकडे येईल अशी त्यांची अपेक्षा होती.

इंग्रजांनीं तात्यांचा हा डाव ओळखून तो उलथून पाडण्याची तजवीज केल्यामुळें तात्यांना इंदूरचा नाद सोडणें भाग पडलें. इंग्रज राजगड येथें तात्यांच्या वाटेवर आडवा येऊन त्यानें तात्यांच्या सैनिकांवर हल्ला चढविला. तात्यांचे लोक तोफा टाकून पळाले. फक्त एकाच तोफेचे गोलंदाज तोफ लढवीत ठार झाले. ही झटापट १४ सप्टेंबरची आहे. नंतर तात्यांची भरारी ग्वालेरच्या ईसागड या सुभ्याच्या गांवीं पोचली. तात्यांनीं यापूर्वीं सीरोंज येथें चार तोफा मिळवून आपल्या लष्कराला तोफांची जोड पुरविली होती. येथें आणखी ७ तोफांचा लाभ घडला. इंग्रजांच्या माहितीप्रमाणें ईसागड या गांवच्या लोकांचें तात्यांनीं झोडपून मातेरें केलें. २५ सप्टेंबर या दिवशीं तात्यांना या विजयाचा आनंद व आवेश भोगतां आला. ऑक्टोबर महिन्यांत तात्यांनीं ग्वालेर राज्यांतला चंदेरी किल्ला मारण्याचा यत्न करून पाहिला तो व्यर्थ ठरल्या-नंतर तात्या मांग्रोली गांवीं धावले, तेथें अनपेक्षितपणें इंग्रजांचा व त्यांचा सामना

झुंपला. (ता. ९ ऑक्टोबर) तात्यांनीं येथें इंग्रजाला थोडा हात दाखविला, पण जवळच्या पांच तोफा टाकून त्यांनीं ललितपुरास पळ काढला. तेथें तात्या व रावसाहेब एक झाले.

## दक्षिणेस उतरण्याचा संकेत

ऑक्टोबरच्या १८–१९ तारखांच्या दिवशीं सिंधवा येथें पुन: लढाई झडली. या वेळीं रावसाहेबाकडील तोफा आपलें काम आरंभीं उत्तम रीतीनें बजावीत होत्या. तरी इंग्रजांची हालचाल विशेष नाहीं, असें पाहून रावसाहेबांनीं आपलें घोडदळ पुढें सरकावलें. तेव्हां इंग्रजांच्या घोडेस्वारांनीं त्यावर हल्ला चढवून अतिशय हातघाईची लढाई केली. घोडेस्वारांची झोंबी चालू असतां इंग्रजांचें पायदळ रावसाहेबांच्या फौजेवर घसरलें. रावसाहेबांनीं मग ललितपुराचा रस्ता धरला. पाठलागाशीं झुंजण्यासाठीं त्यांनीं जे लढवय्ये ठेवले होते ते सर्व मारले जाऊन त्यांच्या तोफा इंग्रजांनीं बळकावल्या. त्यांनीं उठावाच्या शिपायांचा पाठलाग १२ मैलपर्यंत सोडला नाहीं. यानंतर नर्मदा उतरून महाराष्ट्रांत शिरण्याचा या दोघा पुढाऱ्यांचा एक महान् संकेत होता. पण या वेळीं इंग्रजी फौजा चोहोंबाजूंस एकमेकांपासून जवळ जवळ असल्यानें त्यांच्या हातावर तुरी देऊन निसटणें पूर्वींइतकें सोपें नव्हतें. एक लष्करी विभाग सारखा तात्यांच्या मागावर फिरत होता. त्यानें कुराई गांवीं ता. २५ ऑक्टोबर या दिवशीं तात्यांच्या पायदळांपैकीं सुमारें ३५० माणसांना मैदानावर कायमचें लोळवून अशी दाणादाण उडविली कीं, त्या पायदळानें रणांगणांत पुन: पाऊल ठेवलें नाहीं, असें इंग्रज इतिहासलेखकांचें कथन दृष्टीस पडतें. या पराभवामुळें तात्यांनीं नर्मदा ओलांडून दक्षिणेंत जाण्याचा उद्देश सोडला असेल अशी कल्पना करण्याइतके तात्या शिथिल निग्रहाचे नव्हते. कुराईमागून बागरोद येथें पुन: एकदां तात्यांना आपल्या सैन्याची हानि सोसावी लागली. तरीसुद्धां तात्यांनीं आपल्या भरारीचा वेग वाढवून हुशंगाबादपासून चाळीस मैलांवर नर्मदापार होण्याचें साहस अंमलांत आणलेंच. (ऑक्टोबर अखेर) याच सुमारास बांद्याच्या नबाबानें इंग्रजापुढें सपशेल लोटांगण घातलें.

तात्या दक्षिणेंत शिरल्यास दक्षिणची महाराष्ट्रीय प्रजा पेशव्यांच्या आस्थेची असल्यानें या प्रदेशांत मोठी गडबड उडून जाईल, अशी धास्ती मुंबई

इलाख्याच्याच नव्हे तर मद्रास इलाख्याच्या अधिकाऱ्यांनाहि पडली होती. तात्यांचा दक्षिणेंत जाण्याचा संकेत इंग्रजाच्या ध्यानांत लवकर आल्यामुळें त्यांनीं तात्यांना अडविण्याकरितां ठिकठिकाणीं आपलीं लष्करी पथकें सज्ज ठेविलीं होतीं. तात्या जेथें नर्मदा उतरले तो भाग पूर्वीच्या ( नागपूर-वऱ्हाड ) मध्यप्रांताचा होता. तेथून ते नागपूरच्या दिशेकडे झुकले. तिकडे जे महाराष्ट्रीय होते, ते इंग्रजाच्या द्वेषानें आपल्या स्वागताला धावतील ही तात्यांची अपेक्षा फोल ठरली, असें इंग्रजांनीं म्हटलें आहे. त्यांना एक दोन जमीनदारांची किरकोळ मदत मिळाली, पण ती उत्साहजनक नव्हती. लोकांची अनुकूलता नाहीं, व इंग्रजी लष्कर आपल्या राशीस बसलेले, अशा स्थितींत दक्षिणेंतून पाय मागें काढणें हें शहाणपणाचें, असें तात्यांच्या मनानें घेतलें व ते जितक्या झपाट्यानें नर्मदा पार झाले तितक्याच वेगानें नर्मदेवरून पलीकडे गेले. या वेळीं बडोदे संस्थानांत त्यांच्या स्वारीचें भय पसरलें. बडोद्यास नानांच्या पक्षाचे पुष्कळ जण आहेत, यामुळें जें ग्वालेरला घडलें तेंच बडोद्यास घडेल, अशी तात्यांची अपेक्षा होती. परंतु आतां ग्वालेरची वेळ राहिली नव्हती. तेव्हां त्यांच्यामागें एकटा ह्यू रोजच होता तर आतां तात्यांना कोंडून धरण्यासाठीं कितीतरी लष्कर चोहोंकडे फिरत होतें. तरी तात्यांनीं आपला निश्चितार्थ डोळ्यासमोरून ढळूं दिला नाहीं. बडोद्यावर झडप घालतां यावी, म्हणून ५० मैलांवरील छोटा उदेपूर ठिकाण गांठलें. (ता. १ डिसेंबर ) इंग्रजाच्या माहितीप्रमाणें तात्या तेथें पोचल्यावर तास दोन तासांच्या आंत इंग्रजांचें सैन्य आल्यामुळें त्यांच्याशीं तात्यांनीं सामना केला. इंग्रजांची डावी उजवी बाजू ठोकण्याचे तात्यांचे डाव इंग्रजांनीं चालू दिले नाहींत. तात्यांना मग बांसवाड्याच्या जंगलाचा आश्रय घेण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. बडोदें त्यांच्या पल्ल्याबाहेर गेलें. तात्यांच्या भरारीची सफाईदार करामत येथून बाहेर पडतांना कसोटीस उतरली.

**बांसवाड्याचा वनवास**

बांसवाड्याच्या जंगलाभोंवतीं इंग्रजी सैन्याचा गराडा होता. तात्या आतां आपल्या पंजांत सांपडल्याशिवाय राहात नाहींत, असा इंग्रजांचा पूर्ण विश्वास होता. पण बाहेर निघण्याचा उद्योग न करतां तात्या जंगलाच्या पोटांत जास्त खोल शिरले. हेतु असा कीं आपले लोक एकत्र यावे. तो हेतु सिद्ध होतांच तात्यांनीं १० डिसेंबरपासून आपल्या क्रियाशील अस्तित्वाची

इंग्रजांना खूण पटविली. त्यासरशीं रतलामकडून एक इंग्रज सरदार तात्यांच्या अगदीं जवळ ठेपला. तात्यांनीं मग उदेपुराकडे धाव मारली. पण पुनः इंग्रज आडवा आला तेव्हां ते आणखी एकवार गर्द झाडींत घुसले. लढायचे का शरण जायचें या प्रश्नाचा आपल्या लोकांबरोबर तात्यांनीं या ठिकाणीं खूप खल केल्याची बोलवा इंग्रजी इतिहासांत आहे. पण इतक्यांत तात्यांची सद्दी संपली नव्हती. काळ्याकुट्ट ढगांच्या दाटीमागून सूर्याचे किरण निघावे आणि अंधार ओसरावा, त्याप्रमाणें दोघां साह्यकर्त्यांची बातमी तात्यांना समजून निराशेचें धुकट वातावरण निवळलें. शिंदेशाहीविरुद्ध बंड करणारा नरवरचा मानसिंग आपल्यापासून दूर नाहीं व दिल्लीचा राजवंशज फेरोजशहा आपल्या साह्याला येत आहे अशी तात्यांना समजलेली बातमी होती. तेव्हां तात्यांची हिंमत वाढून त्यांनीं इंग्रजांची कोंडी फोडण्यासाठीं मुसंडी मारली. त्या कोंडींत जी फट होती तिच्यांतून बाहेर पडतांना तात्यांनीं इंग्रजांचा हल्ला थोपवून धरला (ता. २५ डिसेंबर). आपलीं सर्व माणसें व सामान सुरक्षित स्थळीं पोंचावें, यासाठीं तात्यांनीं या वेळीं चढाईचें धोरण ठेवलें होतें. तात्या पकडींत आले ही इंग्रजांची आशा विरमून पुनः धावपळीची धामधूम अंगीकारावी लागली.

### आपसांतला बेबनाव

तात्यांना मानसिंगाला भेटण्याची उत्कंठा असल्यानें ते प्रथम मंदेसर, नंतर झिरापूर या गांवीं किंवा गांवानजीक अति तडफेनें गेले. झिरापुरास ते पोंचले त्याच वेळीं इंग्रज आला म्हणून तात्यांना लढाईखेरीज दुसरीकडे झटकन् जाण्याची पाळी आली. नंतर सुमारें दोन दिवसांनीं लढाई होऊन कोटा संस्थानांतील नाहरगडास तात्या गेले. तेथें कोट्याच्या किल्लेदारानें त्यावर तोफा डागल्या. तात्या तोफांच्या माराबाहेर रात्रीं जाऊन राहिले व रावसाहेबांनीं मानसिंगाला निरोप धाडला. त्यानें या मंडळीला आपल्या पेरान गांवीं आश्रय दिला. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर तात्या इंद्रगडाला जाऊन ता. १३ जानेवारीस फेरोजशहाला भेटले. फेरोजशहाचें यापूर्वीचें कर्तृत्व मागें वर्णिलेलें आहे. फेरोजशहा रोहिलखंडांतून माळवा राजस्थानाकडे येत असतां त्याचा पिच्छा सोडला नव्हता. पण तो इंद्रगडापर्यंत आडवाटांनीं लांब लांब मजला मारीत येऊं शकला. मार्गांत लढाईचा प्रसंग टळला, असा याचा अर्थ नव्हे. १७ डिसेंबरला रानोद गांवीं इंग्रजाची गांठ पडून फेरोज-

शहा चंदेरीकडे वळला. तेथें वाटेवर एक झटापट झाली. आणखी एकदां त्याला इंग्रजांचा मार सोसावा लागला. ता. १३ जानेवारीच्या भेटीनंतर हे तिघे झुंजार जयपूर भरतपुराच्या मध्यावर असलेल्या देवासा गांवीं (इंग्रजांच्या बातमीप्रमाणें) भावी कार्यक्रमाच्या वाटाघाटींत गुंतले असतां त्यांवर शत्रूची चढाई होऊन पुनः त्यांनीं पळण्याचा प्रसंग स्वीकारला. प्रत्येक नव्या पळा-पळीमध्यें आतां माणसें व युद्धसाहित्य यांच्या मोठ्या हानीला या पुढाऱ्यांना तोंड द्यावें लागलें. ता. २१ जानेवारीला इंग्रजांच्या छाप्यानंतर फेरोजशहा तात्यांची संगत सोडून स्वतंत्रपणें आपला कारभार करण्याच्या उद्देशानें निघून गेला. तात्यांनीं मग रावसाहेबांनाहि सोडलें व ते 'दोन स्वयंपाकी ब्राह्मण व एक मोतद्दार' याप्रमाणें अवघ्या तिघां माणसांसह मानसिंगाच्या आश्रयास गेले. वांसवाड्याच्या रानांत भटकतांना रावसाहेबांचें व तात्यांचें बिनसलें असावें; कारण रावांना 'आतां धावपळ पुरे, मला योग्य संधि मिळा-ल्यास मी तुम्हांस सोडून देईन' असें सांगितल्याचा मजकूर तात्यांच्या जबानींत आहे.

**मानसिंग व इंग्रज**

मानसिंग हा शिंदेशाहींतील एक जहागीरदार होता. त्याची स्थावर मिळकत शिंदेशाहीनें सरकारजमा केल्यामुळें त्यानें बंड केलें. त्याच्या बंडाशीं इंग्रजांचा संबंध नसला तरी शिंदेशाहीच्या रक्षणाची जी जबाबदारी इंग्रजावर होती तिला अनुसरून त्यांच्या फौजांनीं मानसिंगाच्या गढीवर तोफांचा भडिमार करून त्याला वनवासांत धाडलें. या स्थितींत त्याची व तात्यांची भेट झाली असतां तात्यांशीं त्याचे विचार जमेनात म्हणून तात्यांनीं मानसिंगाला कैदेंत ठेवलें व तेथून तो पळाला अशी हकीकत क्वचित् दिसते. मानसिंगानें तात्यांचा जो विश्वासघात केला, त्याच्या समर्थनासाठीं मान-सिंगाला तात्यांनीं कैद केल्याची शक्कल लढविली गेली असें समजण्याला हरकत नाहीं. एवढें खरें कीं, या दोघांनीं कांहीं दिवस एकमेकांच्या सहवासांत घालविले. अंतिम साध्याविषयीं परस्परांमध्यें मतभेद असला तरी तात्यांनीं त्यांच्या आश्रयास जावें, ही घटना मानसिंगाबद्दल तात्यांना कसलाच संशय नव्हता हें सिद्ध करणारी आहे. मानसिंगाच्या प्रदेशांत तात्या असल्याची पक्की खात्री होतांच इंग्रज अधिकारी मानसिंगाला आपलासा करण्यासाठीं झटूं लागले. आधीं त्यांनीं मानसिंगाच्या विश्वासाचीं वजनदार माणसें हातीं धरलीं.

त्यांच्या मध्यस्थीनें मानसिंगाच्या कारभाऱ्याशीं बोलणें करून मानसिंगाची बायका-मुलें व इतर नातेवाईक मंडळी आपल्या छावणींत आणविलीं. इतकें झाल्यावर मानसिंगाशीं करार मदार ठरवितांना उभय पक्षांच्या अटींमध्यें तफावत पडल्यानें त्या संबंधांतला निर्णय लांबत गेला. जीवदान व निर्वाह-साधन या दोन गोष्टींपलीकडे जाण्याला इंग्रज तयार नव्हता. मानसिंगाला पूर्वीची सर्व मिळकत आपल्या हवालीं करण्यांत येईल, असें आश्वासन हवें होतें. तशीच कांहीं भरीव कामगिरी मानसिंगानें पार पाडली तर त्याच्या मागणीचा अनुकूलतेनें विचार केला जाईल, अशा रीतीनें इंग्रज त्याची आशा वाढवीत होता. एप्रिलच्या आरंभीं तीन दिवस ही घासाघीस चालतां चालतां भरीव कामगिरीचा अर्थ मानसिंगाच्या गळीं उतरला. मानसिंगाचा चुलता अजितसिंग हा मानसिंगाच्या बंडांत पुढाकारानें सामील झालेला होता. मान-सिंगानें इंग्रजाशीं जोडलेला सलोखा त्याला पसंत नव्हता म्हणून त्यानें बंडाचें निशाण कायम ठेवलें. त्याला पकडण्याची 'भरीव कामगिरी' पहिल्यांदा मान-सिंगाच्या गळ्यांत पडली. ही कामगिरी त्याला न साधल्यानें आपला शब्द व्यर्थ झाल्याच्या मनस्तापांत तो असतांना तात्यांना पकडून देण्याची कामगिरी इंग्रज अधिकारी मीड यानें त्याच्या मनांत भरविली. ही वाटाघाट चालू होती तेव्हां इंग्रजानें तात्यासंबंधांत अतिशय खबरदारी बाळगली होती. सबंध मार्च महिना व एप्रिलचा पहिला आठवडा मीड व मानसिंग यांच्या चर्चेत गेला.

**तात्यांची धरपकड**

तात्या या दिवसांत मानसिंगाच्या रानटी आश्रयानें विश्रांति घेत असतां अगदीं स्वस्थ नव्हते. फेरोजशहा, रावसाहेब हे जोडीदार कुठें काय करीत आहेत, याची माहिती मिळवून त्यांच्याकडे जाण्याच्या विचारांत तात्या गढले होते. यावरून इंग्रजाप्रमाणें तारायंत्रांचें साह्य नसूनहि उठाववाल्यांचें बातमी खातें किती जागरूक व कुशल होतें याची कल्पना करतां येईल. या खात्याशीं मानसिंगाचा संबंध नव्हता, असेंहि समजतां येत नाहीं. मान-सिंगानें या प्रसंगीं एक प्रकारें तारेवरील अवघड कसरत चालविली होती. शेवटीं तात्यांना पकडून देण्याला मानसिंग कबूल झाला. तात्यांनीं मान-सिंगाचा आश्रय सोडण्याचा निश्चय केला. ती वेळ आणि मानसिंगानें त्यांना इंग्रजांच्या हवाली करण्याबद्दल एक प्रकारें विडा उचलला ती वेळ एकच होती. तात्यांनीं 'मी आतां जावें कीं राहावें' असा प्रश्न मानसिंगाला विचारला,

त्याला मानसिंगानें ‘ उद्यां सकाळपर्यंत राहावें ’ असें उत्तर दिलें. हीं प्रश्नोत्तरें परस्परांच्या भेटींत समक्ष झाली होती. मानसिंगानें इंग्रजांशीं समेट केला, हें तात्यांना ठाऊक होतें एवढेंच नव्हे तर तात्यांशीं त्याविषयीं आधीं विचार-विनिमय केला होता, असें तात्यांनीं आपल्या जबानींत म्हटलें आहे. वरील प्रश्नोत्तरें होण्यापूर्वीं मीडकडे चालणाऱ्या खलबतांचा संदर्भ निघाला होता. ‘ एकंदरींत मीडची वृत्ति बरी दिसते ’ हें त्या खलबतांचें तात्पर्य सांगून झाल्यावर ‘ तुम्ही जावें कीं राहावें, या प्रश्नाचें उत्तर उद्यां सकाळीं सांगतों ’ असें बोलून मानसिंग निघून गेला व त्यानंतर मध्यरात्रीं तात्यांना इंग्रजांनीं कैद केलें. पकडलें तेव्हां तात्या गाढ झोपेंत होते. त्यांच्याजवळ दुसरा कोणीहि मनुष्य नव्हता. त्यांचे सोबती कागदपत्रें घेऊन आधींच आपल्या संकेतस्थानीं गेले असल्याचें दिसून आलें.

**तात्यांचा अंतकालीन स्वाभिमान**

तात्यांना पकडलें त्या वेळीं त्यांच्यापाशीं एक तलवार, एक कुक्री ( गुरख्यांचें हत्यार ) व सोन्याच्या मोहरापुतळ्यांची एक थैली याखेरीज आणखी कांहीं सांपडलें नाहीं. ता. ८ रोजीं त्यांना सिप्रीस इंग्रजी फौजेच्या मुख्य तळावर नेलें. तेथें त्यांचा खटला सुरू झाला. बंड व इंग्रजांशीं युद्ध असे त्यांवर दोन आरोप होते. तात्यांनीं हे आरोप नाकारले नाहींत. ‘ आपण नानासाहेबांचे आज्ञाधारक सेवक या नात्यानें काल्पी पडेपर्यंत नानांच्या हुकमाप्रमाणें वागलों व त्यानंतर रावसाहेब जें सांगतील तें करीत गेलों. युरोपियन बायका-मुलांच्या कत्तलीशीं माझा कांहीं संबंध नाहीं. कुणाला फांशीं देण्याचेंहि कृत्य माझ्या हातून झालेलें नाहीं. ’ दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत महाराष्ट्रामध्यें (१८१२) जन्मास आलेला हा पुरुष जन्मतः इंग्रजांच्या प्रजाजनांपैकीं नव्हता. नंतर बाजीरावाबरोबर बिठूरास असतांना त्या पेशव्यांचा आश्रित या नात्यानें इंग्रजांच्या सामान्य प्रजेंत आपली गणना होऊं शकत नाहीं, अशी तात्यांची भावना होती. बंड हा शब्द प्रजेच्या उठावाला लावतां येतो. जो प्रजेपैकीं नाहीं, त्याच्यावर बंडखोरीचा आरोप लादणें योग्य नव्हे हा ध्वनितार्थ वरील खुलाशांत आहे. इंग्रजाशीं लढाई केली हें सिद्धच असल्यानें ते आरोप शाबीत करण्यासाठीं खटल्याच्या नाटकाची गरज नव्हती. शत्रुत्वानें युद्ध केलें म्हणून जी काय शिक्षा द्यावयाची असेल ती विलंब न लावतां अंमलांत आणावी, असे खटल्याचे वेळीं प्रश्न विचारल्यास तात्या एकच

उत्तर वारंवार उच्चारीत होते. उत्तर देतांना हातापायांतल्या शृंखलाकडे लक्ष वेधून घेऊन ते 'या बंधनांतून मुक्त करा' असें सांगत असल्याचें वर्णन मीडच्या चरित्रांत आलेलें आहे. डोंगरदऱ्या, रानेंमैदानें यांवर ज्यानें हजारों मैल मोठाल्या सैन्यासह दोन वर्षे स्वच्छंद संचार केला, इतकेंच नव्हे तर आपल्या मागें इंग्रजी सैन्याला धापा टाकीत धावायला भाग पाडलें तो वीर पुरुष एखाद्या संकुचित जागीं मोकळेपणानें हातपाय हलविण्याचीहि अडचण अशा अवस्थेंत सांपडला तेव्हां त्याला मृत्युहून बंधनें जास्त क्लेशकारक वाटतील यांत नवल कसलें ? तात्या कैदेच्या काळांत कुणाशीं फारसें बोलत नसत. कांहीं विचारल्यास तुटक पण प्रांजळ उत्तर त्यांच्याकडून मिळे. उत्तरें हिंदुस्थानी भाषेनें देत असत. त्यांनीं साक्षीदारांना प्रश्न विचारले नाहींत. कोणी वात्रटपणानें थिल्लर प्रश्न विचारल्यास 'मालूम नहीं' हे शब्द तात्या अशा करड्या आवाजानें बोलत कीं पुनः पृच्छकाला तोंड उघडण्याची हिंमतच होऊं नये. तसाच अनुभव लुंग्यासुंग्या अधिकाऱ्यांना येत असे. एखादा निर्बुद्ध सामान्य अंमलदार सलगी किंवा अरेरावी करूं लागल्यास तात्या त्याला तुच्छतादर्शक तीव्र दृष्टिक्षेपानें पळवून लावीत असत. फक्त मीडबद्दल तात्यांना कांहीं आदर होता. तात्यांना उर्दू, मराठी, गुजराती या तीन भाषांचें ज्ञान चांगलें होतें. इंग्रजी लिपींत स्वतःची सही करण्यापुरतें इंग्रजीचें ज्ञान होतें. बोलायचा प्रसंग आल्यास लवकरच होऊं घातलेल्या आपल्या देहान्ताची चिंता त्यांनीं कधींहि दाखविली नाहीं. त्यांचें धैर्य आणि वर्तनांतलें गांभीर्य अखेरपर्यंत अढळ होतें. आपल्या कुटुंबीयांना भेटण्याची इच्छा त्यांनीं चुकूनसुद्धां दर्शविली नाहीं. मुलांबद्दल मात्र (बाबा लोक) अतिशय जिव्हाळ्यानें उद्गार काढीत असत. ता. १८ एप्रिल १८५९ रोजीं सायंकाळीं तात्या फांशी गेले. ते आपल्या पायांनीं फांशीच्या जागीं चालत गेले. आपण होऊन फांसांत त्यांनीं मान अडकाविली. त्यांचा देहान्त पाहण्यासाठीं फौजेखेरीज इतर पुष्कळ लोक जमले होते. तात्यांचा देहान्त झाल्यावर माळवा, बुंदेलखंड, राजस्थान या प्रदेशांतील उठाव थंडावण्याला उशीर लागला नाहीं.

### तात्यांचें स्वरूप

मीडच्या पुस्तकांत तात्यांच्या स्वरूपाची थोडीशी माहिती आहे. विषय-पूर्ततेकरितां तिचा अंतर्भाव प्रशस्त ठरेल. तात्या सुमारें ४५ वर्षांचे असले

तरी त्यांचा देहाचा बांधा धट्टा-कट्टा व चांगला होता. उंची साडेपांच फूट होती. त्यांच्या डोक्याचा आकार मोठा व या कानापासून त्या कानापर्यंत कपाळपट्टी खूप रुंद होती. दाढी, मिशा, कल्ले असा चेहऱ्यावरील केशभार असून डोकें पांढऱ्या केसांनीं झांकलेलें होतें. गालांचीं हाडें किंचित् उंच होतीं. भिवयांच्या कमानीखालीं डोळे काळेभोर, निर्मळ व पाणीदार असे शोभून दिसत. निश्चय, उत्साह व कार्यक्षमता हे स्वभावगुण चेहरा पाहतांच लक्षांत येण्याला उशीर लागत नसे.

उठावाच्या सेनापतींमध्यें तात्यांच्या युद्धनेतृत्वाविषयीं तत्कालीन लेखकांनीं व नंतरच्या इतिहासकारांनीं आपलीं मतें नमूद केलेलीं आहेत. इंग्रजांचा सेनापति ह्यू रोज याचा अभिप्राय वाचकांच्या दृष्टीखालून मागें गेलेला आहे. तात्यांचें सैन्य म्हणजे वेळोवेळीं व ठिकठिकाणीं त्यांच्याकडे विजयाच्या आशेनें जमणाऱ्या शिपायांचें सैन्य. त्यांत एकजिनसीपणा व एकसूत्रीपणा नव्हता, हें सहज कळणारें आहे. कानपूरच्या दुसऱ्या लढाईत (नोव्हेंबर–डिसेंबर १८५७) जशी ग्वालेरची एका शिस्तीची व जुटीची फौज होती तशी फौज त्यांच्या नेतृत्वाखालीं पुढें राहिली नाहीं. तात्या सर्वाधिकारी खरे, पण शिपायांचे असे जे कित्येक स्थानपरत्वें वेगळे पुढारी असत ते प्रसंगीं मन चाहील तसें वागण्याला कचरत नव्हते. याचे दाखले तात्यांनीं सिप्रीस स्वयंप्रेरणेनें लिहिलेल्या कैफियतींत पुष्कळ आहेत. कानपूरची कत्तल शिपायांनीं केली, झालरापाटणच्या राजाला शिपायांच्या एका मुसलमान पुढाऱ्यानें छळलें, हें कैफियतींतील दोन दाखले शिपायांच्या वागणुकीचा अंदाज करायला पुरेसे आहेत. एखाद्या जागीं लढाई हरल्यावर पळणारे सारे शिपाई, पुनः एकत्र येतील असाहि भरंवसा १८५८ सालीं उरला नव्हता. १८५८ तील राणीच्या जाहीरनाम्यानें तो भरंवसा आणखी खालावला. त्या जाहीरनाम्यांतील माफीच्या आश्वासनाचा फायदा मिळण्याची आशा असलेले शिपाई घरोघर जाऊं लागले. पुष्कळजण धावाधावीला कंटाळून गेले. तथापि सैन्याची संख्या पुनः पुनः जी इंग्रजी लिखाणांतून मोठी दिसते तिचें कारण जमीनदारी बारगीर व लुटारू वृत्तीचे लोक यांच्या भरण्याशिवाय दुसरें सांपडण्याचा संभव नाहीं. अशा बहुजिनसी व भिन्न वृत्तीच्या लोकांचा इंग्रजांसमोर टिकाव लागणार नाहीं, हें भवितव्य ठरलेलेंच होतें. येथें गोडशांनीं केलेलें शिपायांच्या वर्तनाचें वर्णन दुजोऱ्याप्रमाणें उपयोगी पडणारें आहे.

तात्यांचा आरंभापासून शेवटपर्यंत निरंतर पराभव होत असतां सुद्धां त्यांच्या नांवांत अशी जादू भरलेली होती कीं, तिच्या प्रभावानें तात्यांकडे युद्धाच्या उत्कंठेचे लढवय्ये आपोआप खेंचले जात असत. इतकेंच नव्हे तर खेडीं-पाडीं पुष्कळदां दाणापाणी व शत्रूची बातमी पुरवीत असत. ही जादू त्यांच्या गुणांची होती. ते गुण ह्यू रोजनें १८६० च्या जानेवारींत मीडला पाठविलेल्या पत्रामध्यें वर्णिलेले असल्यानें त्याचा मराठी भावार्थ येथें सादर केल्यास तात्यांच्या गुणांची ओळख पटेल—

'साहसी योजनेचा पुढाकार व दृढनिश्चय हे त्यांच्या युद्धनेतृत्वाचे मुख्य गुण होते. बंडाच्या पुढाऱ्यांत या गुणांचा दुसरा पुढारी दाखवितां येणार नाहीं. त्यांचें संघटनाचातुर्यहि असेंच विलक्षण होतें. 'पेशव्यांची फौज' या नांवानें ओळखली जाणारी फौज उभी करतांना तात्यांनीं जें संघटनाचातुर्य दाखविलें त्याची कल्पना तुम्हांला करतां येणार नाहीं. तात्यांना एकंदर प्रदेशाची व जनतेची किती बिनचूक माहिती होती, याचा पुरावा ते पाठलाग ज्या शिताफीनें चुकवीत असत, त्या शिताफींत दिसून येईल.' तात्यांच्या कीर्तीचें मोल ठरवितांना वारंवार पराभव होत असून व पुढें पुढें विजयाची लवमात्र आशा उरली नसतां ते इंग्रजांशीं लढत राहिले, या गोष्टीकडे लक्ष देणें अवश्य आहे. निःस्वार्थ स्वामिभक्ति हा त्यांचा दुसरा गुण असाच चित्तवेधक आहे. या गोष्टीमुळेंच अनेक इंग्रजांच्या हृदयांत उत्पन्न झालेली सहानुभूति त्यांच्या मृत्यूनंतर उघडकीस आली. 'फ्रेंड ऑफ इंडिया' पत्रानें तात्यांच्या वधाची वार्ता प्रसिद्ध होतांच शिक्षेच्या प्रकाराबद्दल निषेध व्यक्त केला व पूर्वोक्त सहानुभूतीला तोंड पाडलें.

— २ —

## मुंबईतील मोहरम व दिवाळी

पेशव्यांच्या महाराष्ट्राचा १८५७ मध्यें मुंबई इलाख्यांत समावेश असल्यानें या प्रदेशांतील शिपायांच्या व लोकांच्या उठावाचा वृत्तान्त सांगतांना मुंबई शहरापासून सुरुवात करणें चांगलें. या शहरांत सामान्यतः शांतता नांदत असली व इंग्रजनिष्ठेचें सार्वजनिक रीतीनें प्रदर्शन होत असलें तरी इंग्रजी राज्याविषयीं मुळींच असंतोष नाहीं, अशा कल्पनेच्या धोक्यांत इंग्रज अधिकारी नव्हते. मुंबईतील पोलिसांचा अधिकारी फोर्जेट हा एक अतिशय हुशार

धूर्त, सावध व तक्षक दृष्टीचा अंमलदार लोकांच्या मनोगताचा बिनचूक ठाव अतिकुशल धाडसें आचरून काढीत असे. ऑगस्टपर्यंत फोर्जेटला उठावाचीं चिन्हें दिसलीं नाहींत. त्या महिन्यामध्यें मुसलमानांचा मोहरम हा सण सुरू झाला. त्या सणांत उठाव होणार अशा बातम्या पसरल्या. सदर सणानिमित्त युरोपियन सैनिकांना कुठें उभे करावयाचें, ही व्यवस्था गव्हर्नर व त्या सैनिकांचा अधिकारी यांनीं आपसांत निश्चित केली. त्या व्यवस्थेंत दोष असल्याचें आढळलें म्हणून फोर्जेटनें जो मार्ग सुचविला तो सेनाधिकाऱ्याला पसंत पडला नाहीं. हिंदी सैनिकांचा उठाव होणार असल्याच्या खात्रीनें गोरे सैनिक शहरभर विखरून ठेवण्याऐवजीं ते शिपायांच्या छावणीजवळ राहावे, हा फोर्जेटचा बेत गोऱ्यांच्या सेनाधिकाऱ्याला पसंत पडला नाहीं. शिपाई उठावाचीं कारस्थानें करीत आहेत, या फोर्जेटच्या माहितीवर विश्वास ठेवायला शिपायांचे गोरे अधिकारी तयार नव्हते. शिपायांचे व सोजरांचे अधिकारी हे एका वर्गांतले म्हणून त्यांनीं फोर्जेटच्या सल्लामसलतीला विशेष भान दिला नाहीं. परंतु लवकरच एक प्रसंग असा घडला कीं, ज्या योगानें हिंदी लष्कर व पोलीस यांच्यांतील बेबनावाप्रमाणें हिंदी शिपायांचीं गुप्त खलबतें उघडकीस येऊन फोर्जेटच्या सल्लामसलतीचें धोरण योग्य होतें, असें गव्हर्नरापासून सर्व गोऱ्या अंमलदारांना मान्य करण्याची पाळी आली.

मोहरमाच्या मुदतींत फोर्जेटनें उठावाविषयीं सहानुभूति दाखविणारांना दरदिवशीं पकडण्याचा तडाखा आरंभला तेव्हां बाजारगप्पांची मुस्कटदाबी झाली. मुख्य पोलीस ठाण्यासमोर फांस उभा केला व शहरांतील ज्या थोरामोठ्यांचा फोर्जेटला संशय होता, त्यांना आपल्या ठाण्यावर बोलावून तो फांस दाखविला. कोणी गडबड करण्याचें मनांत आणल्यास त्याला फांशीं जावें लागेल, असें बजावून फोर्जेटनें निमंत्रितांना घरोघर पाठवून दिलें. भल्याबुऱ्या नागरिकांना अशा रीतीनें समज देऊन त्यांच्याबद्दलची आपली काळजी फोर्जेटनें कमी केली तोंच एका हिंदु देवतेच्या पायमल्लीवरून पोलीस व शिपाई यांच्यांतील विरोध निकरास गेला. मोहरमांतच हिंदु देवतेची ( बहुधा गणेशोत्सवांतील ) एक मिरवणूक निघाली होती. तिच्यांत घुसून एका बाटग्या खिस्त्यानें ती मूर्ति खालीं ओढली व अन्य प्रकारें त्या देवतेचा अपमान केला. हा बाटगा शिपायांच्या पलटणीचा ढोलक्या होता. त्याला पकडून पोलिसांनीं हिंदूंचा क्षोभ आवरला तर तिकडे शिपायांना त्वेष चढला.

ढोलक्याला बंधमुक्त करण्यासाठीं शिपाई धावून आले. हा बाटगा ज्या चौकींत होता तेथें शिपाई गेले. त्यांनीं बाटग्याला सोडविलें, एवढेंच नव्हे तर तेथील पहाऱ्याच्या दोघां पोलिसांनाहि आपल्याबरोबर नेलें. शिपायांच्या मागोमाग पांच सहा पोलीस शिपायांच्या तळावर पोचले व तेथें झोंबाझोंबी झाल्यावर शिपायांच्या तावडींतील पोलिसांची सुटका झाली. या झोंबाझोंबींत दोन शिपाई ठार पडले, यामुळें शिपायांनीं त्यांचा सूड घेण्याच्या विचारानें छावणी-बाहेर निघण्याची धामधूम सुरू केली. त्यांचे अधिकारी त्यांना थोपविण्याच्या खटपटींत असतां फोर्जेट गोऱ्या पोलिसांनिशीं तेथें पोचला. फोर्जेटला पाहून शिपाई जास्तच बिथरले. शिपायांच्या अधिकाऱ्यांना या वेळीं क्षणभर असें वाटलें कीं, फोर्जेट परत न गेल्यास हें प्रकरण आपल्या आंवाक्यांत राहणार नाहीं. पण फोर्जेट सोक्षमोक्षाच्या तयारीनें आलेला होता. 'शिपायांची तशी इच्छाच असेल तर त्यांचा समाचार याच वेळीं घेतलेला बरा' असें गरजून छावणीचे दरवाजे त्यानें उघडे करायला सांगितलें. शिपायांनीं आतां आवरतें घेऊन हा निकराचा प्रसंग टाळला.

कसलाच दंगाधोपा न होतां मोहरमचा सण संपला. त्यानंतर शिपायांचीं कारस्थानें उजेडांत आणण्याच्या उद्योगाकडे फोर्जेट वळला. कोणा गंगाप्रसाद नांवाच्या माणसाच्या घरीं शिपाई खलबतासाठीं जमत होते, ही खबर हेरांनीं फोर्जेटला पुरविली होती. तिचा खरेंखोटेंपणा प्रत्यक्ष पाहण्याच्या हेतूनें फोर्जेट त्या ठिकाणीं गेला व स्वतःची खात्री झाली तेव्हां शिपायांच्या अधिकाऱ्याला तेथें नेऊन त्याचीहि शिपायांच्या कारस्थानाविषयीं त्यानें खात्री पटविली. दिवाळीच्या दिवसांत उठाव करून शहर लुटायचें व मुंबई सोडायची वगैरे माहिती शिपायांच्या संवादांतून गोळाबेरजेनें फोर्जेटला समजली होती. त्या माहितीबद्दल आपल्या शिपायांना प्रत्यक्ष पाहून त्यांचा संवाद ऐकल्यावर सेनाधिकाऱ्यालासुद्धां शंका उरली नाहीं. मग शिपायांवर खटले भरून दोघांना तोफेच्या तोंडीं दिलें व सहा जणांना जन्मठेप काळ्या पाण्यावर पाठविलें. यानंतर दिवाळीचा सण लोकांनीं नेहमींच्या उत्साहानें व नेहमींच्या शांत वातावरणांत साजरा केला. हा प्रकार मुंबईस झाला म्हणून त्यांत महाराष्ट्रीयांचें अंग होतें असें मानणें चुकीचें ठरतें. मुंबईच्या फौजेमध्यें एकजिनसी पुर्भय्ये ब्राह्मण किंवा रजपूत मोठ्या प्रमाणांत नसले तरी त्यांचा भरणा बराच होता. मुंबई, सातारा, कोल्हापूर, बेळगांव, या गांवांच्या नांवा-

वरून तेथें झालेल्या उठावाशीं महाराष्ट्राचा संबंध होता, असें सकृद्दर्शनीं वाटणें स्वाभाविक आहे व तशा अनुरोधानें बेळगांवपर्यंत दक्षिणेंत उत्तरेच्या उठावाची झळ पोंचली होती, असें विधान उठावाची सार्वदेशिकता सिद्ध करण्यासाठीं बोलण्याचा प्रघात पडला आहे. मुंबई इलाख्यांतील सैन्यांत पुर्भय्ये होते, ही खूणगांठ लक्षांत ठेवली कीं, त्या विधानाची कच्ची बाजू कळायला उशीर लागणार नाहीं. प्राधान्यानें हा उठाव पुर्भय्या शिपायांचा होता, याला मुंबई इलाख्यांतील उठावानें दुजोरा मिळतो.

**पुनः एकदां कोल्हापूर**

कोल्हापूर येथें जुलई–ऑगस्टमध्यें झालेल्या धामधुमीची हकीकत पूर्वी एका प्रकरणांत दिलेली आहे. त्या महिन्यांतील उठाव इंग्रजानें मराठा शिपायांचें साह्य घेऊन दाबला. तेव्हां कोल्हापूर महाराजांच्या निष्ठेबद्दल इंग्रजाला शंका आली नाहीं. तथापि कोल्हापुरांत उठावाचें कारस्थान शिजत असल्याचा वास मधून मधून येत होता, म्हणून इंग्रज अधिकारी अतिशय जागरूकतेनें तेथील स्थितीची वारंवार बारीक चौकशी करीत असत. ता. ५ डिसेंबरला रात्रीं कोल्हापूरचा इंग्रज अधिकारी घोडदौडीचा आवाज ऐकून जागा झाला. हा चमत्कार कसला म्हणून तो विचारांत होता तोंच एका हिंदी लष्करी अंमलदारानें त्याला शहरांत आरोळ्यांचा कोलाहल माजला असल्याचें सांगितलें. पुढें थोड्याच वेळांत आणखी असें कळलें कीं, शहरांत उठावाचे अनेक लोक शिरलेले असून त्यांनीं शहराचे दरवाजे बंद केले आहेत. गोऱ्या अधिकाऱ्यानें क्षणाचाहि विलंब न लावतां आपलें लष्कर उठविलें आणि तटाचा एक दरवाजा तोफांनीं फोडून शहरांतील उठावांवर हत्यार उपसलें. उठाववाल्यांनीं पळ काढला. जे छत्तीस असामी सांपडले त्यांना लष्करी न्यायमंडळानें देहान्ताची शिक्षा ठोठावली. ती शिक्षा ताबडतोब अंमलांतहि आली. या उठावाच्या चौकशींत असें निष्पन्न झालें कीं, कोल्हापूरच्या राजाचा भाऊ या उठावामागें होता. हा भाऊ हुशार व महत्त्वाकांक्षी होता, अशी इंग्रज इतिहासकारांची कबुली आहे. त्याच्याकडे नानासाहेब पेशव्यांचे व दक्षिण महाराष्ट्रांतील कित्येक छोटया मोठ्या जहागिदारांचे दूत सारखे येत होते. हे दूत त्या राजबंधूला उठावाबद्दल उत्तेजन देत होते. त्या खटपटीचें पर्यवसान ता. ५ डिसेंबरच्या रात्रीस झालें. त्यानंतर महाराष्ट्रांतील उठावाचें वारें पडलें.

### चिमासाहेबाची कराचीस हद्दपारी

कोल्हापूरच्या दुसऱ्या उठावाच्या संदर्भात ज्याचा राजबंधु म्हणून उल्लेख केला, त्याचें नांव चिमासाहेब असें होतें. जुलई-ऑगस्टचा उठाव पडल्यावर चिमासाहेबानें पुढाकार घेऊन जीं कारस्थानें आरंभलीं, त्यांचें पर्यवसान डिसेंबरच्या उठावांत घडलें व तो उठाव दडपल्यावर चिमासाहेबाची व्यवस्था कशी लावावी याविषयीं इंग्रज अधिकाऱ्यांमध्यें वाटाघाट सुरू झाली. चिमासाहेबावर खटला केला तर गुन्हा शाबीत होण्याजोगा पुरावा जमणें शक्य नाहीं. पुरावा मिळाला तरी चिमासाहेबाला देहान्ताची शिक्षा देतां येणार नाहीं; दिल्यास फायद्यापेक्षां नुकसानच जास्त होईल. शिवाय कोल्हापूरचा राजा आपल्या पक्षाचा असल्यानें त्याचें मन दुखावेल असें वागणें योग्य नव्हे; चिमासाहेबाला फांशीं दिलें तर राजाचें मन निस्संशय दुखावेल. चिमासाहेब लोकप्रिय आहे त्यामुळें त्याचा वध केल्यास लोक जास्त बिघडण्याचें भय आहे; याप्रमाणें विचार करून मार्च महिन्यांत चिमासाहेबाला पकडून कैदेत ठेवावें, असा मुंबईच्या वरिष्ठ सत्ताधाऱ्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय ठरविला च हें धरपकडीचें काम शक्य तेवढ्या तांतडीनें उरकण्याविषयीं कोल्हापूरच्या स्थानिक अधिकाऱ्यांना सुचविलें. त्याप्रमाणें ता. ३१ मार्च रोजीं त्या अधिकाऱ्यांनीं चिमासाहेबाला आपल्या कचेरींत बोलावलें. मुंबईहून आलेले कांहीं हुकूम कानावर घालावयाचे आहेत, अशी या निमंत्रणामागें इंग्रजांची बतावणी होती. चिमासाहेबासंबंधाचे सर्व बेत अतिशय गुप्त ठेवले होते. त्यांतलें एक अक्षर जर फुटलें तर चिमासाहेबाचे साथीदार गडबड करतील, याबद्दल इंग्रजाला शंका नव्हती. इकडे चिमासाहेब इंग्रजाच्या भेटीस गेले व तिकडे शहराचे सगळे दरवाजे इंग्रजांनीं ताब्यांत घेऊन परवान्याशिवाय कोणी आंत बाहेर जाणार येणार नाहीं, असा बंदोबस्त अंमलांत आणला. त्याच रात्रीं चिमासाहेबाची कोल्हापुराबाहेर रवानगी झाली. चिमासाहेब राजबंदी या नात्यानें १८६९ पर्यंत कराचीस राहिले. त्या वर्षी ते कराचीस मरण पावले.

चिमासाहेबांना पकडण्याच्या आधल्याच दिवशीं बडोद्याहून आलेल्या मंडळींची इंग्रजांनीं धरपकड केली तेव्हां एका इसमाजवळ एक इंग्रजद्रोहाचें पत्र सांपडलें, तें त्यानें धरपकडीच्या वेळीं चावून गिळून टाकण्याचा यत्न केला. तें पत्र कोल्हापूरच्या राजाच्या विश्वासांतील एका बड्या मानकऱ्याला

पाठविलें होतें. या पत्रानें चिमासाहेबाच्या कारस्थानाच्या पुराव्यांत भर टाकली. बडोद्याहून आलेलीं एकूण २१ माणसें होतीं. त्यांचा दर्जा सामान्यच होता व कोल्हापूरच्या राणीची नोकरी करण्यासाठीं तीं आलीं होतीं. पण त्यांतल्या एकाजवळ द्रोहाचें पत्र सांपडल्यावरून राणीकडील नोकरी हें दिखाऊ कारण होतें, असें आपोआपच सिद्ध झालें. बडोद्याच्या इसमाखेरीज आणखी संशयित माणसें पकडण्याचें सत्र सुरूच होतें. याप्रमाणें दडपशाहीच्या साह्यानें चिमासाहेब गुन्हेगार आहे अशी इंग्रज राज्यकर्त्यांनीं आपली खात्री पटवून घेतली. चिमासाहेबाच्या अनेक साह्यकर्त्यांना विविध स्वरूपाच्या शिक्षा भोगाव्या लागल्या.

### बेळगांवच्या कटाची वासलात

कोल्हापुरास उठाव झाल्याची बातमी समजतांच बेळगांवच्या पलटणींनीं त्यांचा कित्ता गिरवायचा, असा आपसांत शिपायांचा संकेत ठरला होता. कोल्हापुराच्या उठावाची बातमी तारेनें तेथील इंग्रज अधिकाऱ्यांच्या डोळ्या-पुढें आली तेव्हां बेळगांवच्या शिपायांचा बंदोबस्त करण्याच्या योजनेमध्यें ते गुंतले. शिपायांना मात्र कोल्हापुराच्या उठावाची वार्ता नव्हती. बेळगांवच्या शिपायांचा पुढारी कोण याचा नक्की तपास काढून त्याला खास कामगिरीवर दुसरीकडे इंग्रजांनीं पाठविलें. यामुळें कोल्हापुराकडील बातमी बेळगांवच्या शिपायांच्या कानावर आली तेव्हां त्यांची डोक्यावांचून धड अशी स्थिति झाली होती. म्हणून त्यांनीं कांहींच हालचाल केली नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं गोऱ्या सैनिकांची तुकडी बेळगांवास जाऊन पोंचल्यानें हालचाल करण्याला शिपायांना मोकळीक राहिली नाहीं. आपल्या जवळ गोरे सैनिक नाहींत, हाच त्यांच्या उठावाचा मुख्य आधार होता. तो आधार नाहींसा झाल्यावर शिपायांच्या कारस्थानांची चौकशी इंग्रजांनीं सुरू केली. शिपायांचीं जीं पत्रें इंग्रजाच्या हातीं लागलीं होती त्यांवरून दक्षिण महाराष्ट्रांत उठाव होण्यासाठीं मुसलमान लोक संघटना करीत असल्याचा सुगावा इंग्रजाला लागला होता. त्याच्या अनुरोधानें कटवाले शिपाई इंग्रजांनीं पकडले. शिपायांचा पत्रलेखक व त्याचा मदतनीस या दोघांना मरणाची शिक्षा मिळाली. बेळगांवच्या शिपायांचा डाव याप्रमाणें गर्भावस्थेंतच निकालांत निघून दक्षिण महाराष्ट्रांतील उठावाचें संकट नाहींसें झालें. हें प्रकरण जुलई-ऑगस्टांतलें आहे.

**नरगुंदचे भावे**

१८५८ च्या मे महिन्यांत नरगुंदचे जहागिरदार बाबासाहेब भावे यांनीं उठावाचें निशाण उभारल्याची खबर लागल्यावरून मॉन्सन नांवाचा एक अधिकारी नरगुंदास गेला. इनाम कमिशनाच्या कारभारानें दुखावलेल्या जहागिरदारांपैकीं बाबासाहेब भावे हे एक जहागिरदार होते. वास्तविक महाराष्ट्रांतील साऱ्याच इनामदारजहागिरदारांना त्या कमिशनाची कारवाई भोंवली असल्यानें हें सगळे लोक इंग्रजी राज्याविषयीं कमी-जास्त द्वेषभाव आपल्या मनामध्यें पोषीत होते असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. इंग्रज राज्यकर्ते जहागिरदारांची ही स्थिति जाणत होते व ज्यांच्या संबंधांत द्वेषभावाचा पुरावा उभा करतां आला, त्यांना इंग्रजांनीं धारेवर धरल्याचीं उदाहरणें आहेत. परंतु नरगुंदच्या भाव्यांनीं लढाईचें शिंग फुंकून कारस्थानाची सीमा ओलांडली. जो मॉन्सन नरगुंदला गेला, त्याचा इनामकमिशनशीं संबंध असल्यानें तो बहुतेक सर्व इनामदारांना अतिशय अप्रिय झालेला होता. मॉन्सनला बढती मिळून तो दक्षिण-महाराष्ट्राचा बडा अधिकारी व्हावा, याचें सर्वांनाच वैषम्य वाटलें. हें वैषम्य पेटावें, असें एक कृत्य याच सुमारास मॉन्सननें केलें, ते भाव्यांना असह्य होऊन त्यांनीं सरळ हत्यार बाहेर काढलें. मॉन्सननें एका जहागिरदाराची धरपकड केल्यामुळें भाव्यांचा क्रोधाग्नि भडकला होता. जें एकाच्या बाबतींत घडलें तेंच आपल्या वांट्यास उद्यां येईल, अशा कल्पनेनें भाव्यांनीं पूर्वोक्त मार्ग धरला. मॉन्सनला त्याच्या वरिष्ठानें यासंबंधांत सल्लामसलतीकरितां आपल्याकडे बोलावलें असतां तो वरिष्ठाला भेटण्याऐवजीं नरगुंदाकडे गेला. पुष्कळसा प्रवास झाल्यामुळें मॉन्सन नरगुंदजवळच्या एका खेड्यांतील देवळांत जाऊन झोंपला. तेथेंच त्याला काळझोंप लागावी असा योग होता. मध्यरात्रीं त्या देवळावर छापा घालून भाव्यांनीं मॉन्सनच्या प्रतिकारास न जुमानतां त्याला लोळविलें व त्याचें डोकें तोडून तें नरगुंदच्या वेशीवर नेऊन उभें केलें. नरगुंदकरांवर चाल करून जाण्याचा हुकूम मिळालेली इंग्रजी सैन्याची निराळी तुकडी ता. १ जून रोजीं नरगुंदला पोंचली. मॉन्सनला ता. २९ मे या दिवशीं कंठस्नान घडलें होतें. त्याचा वचपा इंग्रजांनीं आतां काढला. त्यांनीं आणलेल्या सैन्याच्या तुकडीशीं भाव्यांचे बारगीर कितीसे लढणार? किल्ल्याबाहेर लढणें अशक्य जाणून त्यांनीं किल्ल्याचा आश्रय घेतला. पण रात्रींच भाव्यांनीं किल्ला

सोडला होता. सामान्य यात्रेकरूच्या वेषानें भावे एका रानांत लपले होते. तेथें पोलिसांनीं जाऊन त्यांना पकडलें. आपल्या भवितव्यावर भाव्यांनींच आपल्या हातानें मॉन्सनच्या रक्ताचें शिक्कामोर्तब केलें होतें. भाव्यांना पकडल्या-वर खटला, निकाल व त्याचा अंमल या गोष्टी तावडतोब उरकल्या गेल्या. भाव्यांच्या या किरकोळ उठावानंतर महाराष्ट्रांत सगळीकडे वातावरण थंडावलें. ता. १२ जून रोजीं भावे फांशीं गेले व त्यांची जहागीर जप्त झाली.

नरगुंदकर भावे यांनीं मॉन्सनच्या ज्या कृत्यामुळें लढाईच्या संकल्पाकडे आपल्या चित्ताचा कल झुकूं दिला, तें कृत्य जमखिंडीच्या अप्पासाहेब पटवर्धनांना १८५८ मार्चच्या २८ तारखेला कैदेंत टाकण्याचें होतें. त्यांचे उठावाच्या कारस्थानांत हात अडकले आहेत, या संशयाचे धागेदोरे पाहात असतां ज्या व्यक्ति इंग्रजी नोकरींतल्या लष्करी शिपायांशीं खलबतें करतांना चौकशीच्या सांपळ्यांत पकडल्या त्या अप्पासाहेबांच्या दिमतींतल्या असें निदर्शनास आल्यावरून अप्पासाहेबांनीं प्रथम बेळगांवास, नंतर वेंगुर्ल्यास कैदी या नात्यानें पाठविलें. १८५९च्या जानेवारी ७ पर्यंत त्यांचा कैदखाना सुटला नाहीं. व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्यांतील माफीच्या कलमाचा फायदा मिळण्यापूर्वीं आपलें निरपराधित्व सिद्ध करण्या-साठीं कायदे-पंडितांचें अप्पासाहेबांना साह्य घ्यावें लागलें, अशी माहिती उपलब्ध आहे. अप्पासाहेब कैदेंतून सुटले व स्वाधिकाराच्या आसनावर बसले तरी त्यांना आपल्या राज्यांतील तटबंदीचीं ठिकाणें पाडून टाकण्याची व हत्यारबंदीची शिक्षा टाळतां आली नाहीं. अप्पासाहेबांच्या कारस्थानांतलीं माणसें म्हणून पकडलेल्या लोकांना इंग्रजांनीं अनेक प्रकारच्या शिक्षा ठोठावल्या.

**सिंधप्रांतीं वावटळीची झुळूक**

सिंध प्रांत हा तीस वर्षांपूर्वींपर्यंत मुंबई इलाख्यांतच मोडत असल्यानें तेथें १८५७ च्या ऑगस्ट–सप्टेंबरांत ज्या उठावाच्या लहरी तीन ठिकाणीं उचंबळल्या, त्यांवर दृष्टिक्षेप करून मग महाराष्ट्रांतील एका अधिक महत्त्वाच्या प्रकरणाचा तपशील पहावयाचा आहे. सिंधमध्यें १८५७ मध्यें फ्रीअर नांवाचा चीफ कमिशनर होता. याचाच मागें सुभेदार या शब्दानें उल्लेख केलेला आहे. त्यानें सिंधमध्यें इंग्रजांच्या वर्चस्वाला विरोध होण्याचा संभव नाहीं, असें मानून पंजाबच्या मदतीला लष्कर पाठविल्याचें व तें तेथें उपयोगी पडल्याचें एकदां सांगितलें आहेच. पण दिल्लीच्या लढाया लवकर संपणाऱ्या नाहींत,

असें दिसूं लागल्यावर इंग्रजांची सद्दी संपत आल्याच्या बातम्या सिंधमध्यें पसरून तिकडचें वातावरण दूषित होत आहे, असा तेथील अधिकाऱ्यांचा अनुभव वाढत चालला. सिंधमध्यें मुंबईची फौज जशी होती, तशीच बंगालची देखील होती. ६ व्या क्रमांकाचा बंगाली रिसाला सिंधमध्यें आपल्या बेशिस्त वागणुकीनें सर्वांच्या चर्चेचा विषय होऊन बसला होता. इराणांतून परतलेलें सिंधी घोडदळ बंगाली रिसाल्याला जरबेंत ठेवण्याकरितां राहावें, ही अधिकाऱ्यांची इच्छा व्यर्थ ठरली. तें घोडदळ कराचीवरून मुंबईकडे गेलें. हें घोडदळ इराणांत गडप झालें नाहीं, हें त्या दळांतील स्वारांच्या नातेवाइकांना समजावें म्हणून त्यांतील कांहीं लोक सिंधमध्यें राहून घेतले होते. या घोडदळाची जी एक तुकडी या प्रदेशांत आधींपासून होती, तिच्या धाकानें ६ वा बंगाली रिसाला शांतपणाचें सोंग दाखवीत होता.

सिंधमध्यें उठावाचा पहिला धक्का हैदराबाद शहराला बसणार होता, पण तेथील कारस्थान पिकून फुटण्यापूर्वींच त्याचा छडा अधिकाऱ्यांना लागला. ता. ८ सप्टेंबरला तेथील तोफखान्याच्या सुभेदार-मेजरानें शिपायांची गुप्त खलबतें चालू असल्याचें इंगित अंमलदारांच्या निदर्शनास आणलें. ताबडतोब सोजरांनीं तोफा कबजांत घेऊन तेथील किल्ल्यांत नेऊन ठेवल्या व कटवाल्यांना पकडलें. फ्रीअरनें पुढील कारवाईसाठीं बरीच माणसें बोटींत भरून हैद्राबादेस पाठविलीं. तेथें जी १३ वी पलटण होती तिच्याबद्दल वहीम असूनहि कटवाल्यांना फांशीं देण्याच्या वेळीं तिला शिक्षेच्या जागीं उभें केलें होतें. ही पलटण शिक्षेचा अंमल होत असतां गडबड करील हें भय खरें ठरलें नाहीं.

१३ सप्टेंबरच्या रात्रीं कराची येथील २१ वी पलटण उठल्याची बातमी फ्रीअरला समजली. १४ व्या पलटणीला व शहरांतील मुसलमानांना आपल्या उठावांत सामील करून गोऱ्यांना मारायचें व दिल्लीस जायचें, असा या २१ व्या पलटणीचा बेत होता. आपली पलटण निमकहलाल असल्याच्या विश्वासाचा बुडबुडा अशा रीतीनें फुटला, याच्या खेदामुळें त्या पलटणीचा प्रमुख गोरा अंमलदार आपला जीव धोक्यांत टाकणार होता, म्हणजे तो पलटणीच्या लोकांची मनधरणी करायला जाणार होता. तसें केल्यास उठावाला जोर येईल, अशी इशारत एका हिंदी सुभेदारानें देऊन त्याला आवरलें.

फ्रीअरनें उठावाच्या स्थानाकडे जातांना तोफखाना व चारशें सोजीर २१ पलटणीच्या कवाइती मैदानावर पाठविले. इतक्यांत १४ व्या पलटणीचे शिपाई आले. सोजरांनीं आपल्याला वेढलें असें पाहून २१ व्या पलटणीनें हत्यारें टाकण्याचा हुकूम नाखुषी दाखवीत ऐकला. या पलटणीचे २१ शिपाई पळाले होते. त्यांतला एकजण परत आला तर नवे सहाजण फरारी झाले. जे पळाले, त्यांचा पाठलाग करून त्यांतले कांहीं पकडले, कित्येकजण लढतांना मरण पावले. एका आठवड्याच्या आंत पळालेल्या शिपायांचा निकाल लागला. लोकांनीं शिपायांबद्दल प्रतिकूलता दाखविली म्हणून त्यांना हुडकतां व पकडतां आलें असें फ्रीअरनें आपल्या वरिष्ठांना कळविलें. पकडलेल्या शिपायांचा खटला पलटणीच्या हिंदी अधिकाऱ्यांनीं चालविल्यास त्यांच्या मार्फत कोर्टांत शाबीत होणाऱ्या गोष्टी शिपायांना समजून त्यांच्या मनांत कसलाच किंतु राहात नाहीं, असा एक फायदा फ्रीअरनें या वाटाघाटींत दाखविला आहे. न्यायासनारूढ देशी अंमलदारांनीं एक-दोघांना वगळून बाकीच्या सर्वांना देहान्ताच्या शिक्षा फर्मावल्या. तोफ व फांस यांच्याद्वारें त्या अंमलांत आल्या.

## दिलमुराद व दर्याखान

सिंधच्या उत्तर भागीं शिकारपुरास एकंदर स्थिति जरा बिकट होती. तेथें तोफखान्यांतील अयोध्येचे शिपाई बिघडले होते व आसपास दोनशें मैलांत एकहि गोरा सैनिक नव्हता. रमजानच्या सणांत तेथें गडबड होण्याचीं लक्षणें उघडकीस आलीं. त्यापूर्वीं जूनपासून दर्याखान व दिलमुराद हे दोघे जमीनदार शिपायांना उठविण्याचा उद्योग करीत होते. बलुची जनतेमध्यें इंग्रजांविषयीं द्वेष पसरविण्याचेंहि काम ते करीत होते. जुलैमध्यें सरकार देणें थकल्यामुळें दिलमुराद कैदेंत पडला व या कारस्थानाला थोडा वेळ हिसका बसला. तथापि ऑगस्टमध्यें दर्याखानानें पुन: कारस्थानाचीं सूत्रें हातीं घेतलीं. ता. २१ ला जाकोबाबादला एक दरबार भरावयाचा होता. तेथें उपस्थित राहून साऱ्या गोऱ्यांची कत्तल उडवायची असा दर्याखानाचा बेत होता. त्याचा हा बेत जाकोबाबादच्या अधिकाऱ्यांना कळल्यामुळें हा खान त्या शहरीं जातांच त्याला पकडण्यांत आलें. या भानगडींतली महत्त्वाची गोष्ट म्हणजे सिंधच्या घोडदळानें कारस्थानी लोकांना त्यांचे बेत अधिकाऱ्यांच्या कानापर्यंत पोचल्याचें कधींच कळूं दिलें नाहीं, ही होय. या घोडदळाचे बहुतेक

स्वार मुसलमान होते, इतकेंच नव्हे तर दिल्लीच्या टापूंतले होते. ज्यांनीं मीरत, दिल्लीस व अन्यत्र उठाव केला, त्यांच्या वर्गांतले व प्रदेशांतले हे स्वार असून त्यांनीं कारस्थानी लोकांना चकविलें, याचें कौतुक इंग्रजांला वाटत होतें. दर्याखान व दिलमुराद यांना सहज पकडतां आलें, यावरून लोकांत त्यांच्या कारस्थानाची डाळ शिजली नाहीं हें उघड आहे.

२२ सप्टेंबराला शिकारपुराच्या १६ व्या पलटणींत व तोफखान्याच्या हिंदी शिपायांमध्यें इंग्रजांच्या द्रोहाची भाषा निघाल्यामुळें तीन-चार लोकांना पकडण्यांत आलें. आणखी तीन दिवसांनीं मध्यरात्रीं शिकारपुराच्या छावणींत तोफांचे बार वाजूं लागले. बिघडलेले गोलंदाज चार तोफा ताब्यांत घेऊन गोळे सोडीत होते. तेव्हां अधिकाऱ्यांनीं १६ वी पायदळ पलटण व निम्मेचें देशी गोलंदाज, कित्येक पोलीस, असे लोक जमवून तोफा गरजत होत्या तेथें नेले. त्यांनीं तोफा डागल्या. दोन तासपर्यंत दोन्ही बाजूंनीं अंधळा गोळीबार चालू राहिला. परंतु दाट काळोखामुळें त्याचा परिणाम उमगला नाहीं. उजाडलें तेव्हां दिसून आलें कीं, तोफखान्याच्या इमारतीचें नुकसान झालेलें असून उठावाच्या पक्षांत फक्त तिघेजणच काय ते दगावले होते. इंग्रजाकडील पोलिसांनीं व सैनिकांनीं उठावाच्या तोफा आपल्या ताब्यांत घेतल्या. हे तोफा वाजविणारे गोलंदाज होते तरी किती? चौकशीअंतीं निदर्शनास आलें कीं ते अवघे अकराजणच होते. तोफांचा आवाज ऐकून बाकीचे सैनिक उठाव करतील; तोफांचा आवाज जाकोबाबादला पोंचून दर्याखानाच्या संकल्पाप्रमाणें तेथें गोऱ्यांची कत्तल माजेल, अशी गोलंदाजांच्या आशेची कल्पना चौकस इंग्रजांनीं त्या अकराजणांच्या माथीं मारलेली आहे. 'आपण तूर्त अकराच असलों तरी तोफांचा आवाज ही संख्या वाढवील' अशी शिपायांची अपेक्षा या कल्पनेमध्यें दिसून येईल. फ्रीअरनें या सगळ्या धामधुमीचा सारांश वरिष्ठांना कळवितांना सिंधमध्यें जें घडलें त्याच्या मुळाशीं अयोध्येचे लोक होते, असें मत नमूद केलें आहे. उठावाचे शिपाई पकडले, मारले तरी त्यांच्या कटाचा तपास लावण्यांत गढलेल्या अधिकाऱ्यांना आपल्या समजुतीप्रमाणें कटाचा शोध लागेना म्हणून त्यांची निराशा झाली. खऱ्या अर्थानें सिंधमध्यें कटच नव्हता, असा फ्रीअरनें आपला अभिप्राय लिहून ठेवला आहे. ऑगस्ट-सप्टेंबरानंतर सिंधची सामान्य स्थिति उठावाच्या भीतीनें पुनः गढूळ झाली नाहीं. बलुचिस्तान हें इराणला जवळ असल्यानें तेथें

इराणचे कारस्थानी लोक बलुची जमीनदारांना भेदून इंग्रजाविरुद्ध भर देत होते. यामुळें इंग्रज अधिकाऱ्यांना निरंतर जागरूक राहण्याच्या तसदीपलीकडे जास्त त्रास सोसण्याची पाळी आली नाहीं.

## सातारा राजा-राणीची उचलबांगडी

१८५७ च्या जून महिन्यांत देशी तोफखान्याच्या एका मराठा शिपायानें साताऱ्च्या इंग्रज अधिकाऱ्याला शिपायांच्या उठावाची बातमी देऊन सावध केलें. या तोफखान्याचे लोक प्रामुख्यानें अयोध्येकडील उच्च जातीचे हिंदु होते. उठाव होण्याच्या आधींच तोफखान्याचें हें पथक एडनजवळील पेरीम बेटावर पाठविण्यांत आल्यानें उठावाचें कारस्थान फिसकटलें. नंतर चौकशीनें कटाचे धागेदोरे शोधून ते जुळविले तेव्हां कटाच्या पाठीशीं सातारकर छत्रपतींचा दत्तक वंशज व त्याला दत्तक घेणारी आई, अर्थात् राणी वगैरे मातबर मंडळी असल्याचें सिद्ध झालें. या राणीची तुलना इंग्रजांनीं झांशीच्या लक्ष्मीबाईशीं केलेली आढळते. कटाशीं संबंध जुळल्यावर या मातापुत्रांची अधिकाऱ्यांनीं मुंबईकडे (ठाण्यास) रवानगी केली. दिवस पावसाळ्याचे, पहाट फुटत होती. अजून दिशा फांकल्या नव्हत्या, अशा वेळीं साताऱ्च्या राजवाड्यासमोरील मैदानामध्यें इंग्रजांचें चतुरंग दळ येऊन त्यानें वाडा वेढला. तेथें छत्रपतींच्या तैनातीचीं बरींच हत्यारबंद माणसें होतीं, पण ही फौज कशासाठीं, पुढें काय होणार, हे प्रश्न सदर हत्यारबंदांना सुटण्या-पूर्वींच राणी व तिचा मुलगा या दोघांना वाड्यांतून काढून बाहेर तयार ठेवलेल्या घोड्याच्या गाड्यांत नेऊन बसविलें व गाड्या भरधांव निघाल्या. या धांदलींत दोघे स्वामिभक्त मराठे मोर्चेल घेऊन धांवत गाडीशीं पोंचले. गोऱ्या घोडेस्वारांना त्यांची स्वामीनिष्ठा खपली नाहीं. त्यांनीं तें राजत्वाचें चिन्ह मराठ्यांच्या हातून हिसकावलें व रस्त्याकडेच्या एका घरावरील छपरावर फेकून दिलें. राणी व राजपुत्र अटकेच्या मुक्कामाला सुरळित पोचली. वाटेवर जागजागीं गाडीचे घोडे व पहाऱ्याचे स्वार अधिकाऱ्यांनीं अगाऊच तयार ठेवले होते.

## रंगो बापूजी

साताऱ्च्या उठावाचा हा एक अंश होता. साताऱ्च्या संबंधांत हें लक्षांत धरणें अवश्य आहे कीं तेथें वाहणारें इंग्रजविरोधाचें वारें केवळ लष्करी

स्वरूपाचें नव्हतें. साताराचें राज्य इंग्रजांनीं खालसा ( १८४८ ) केल्यापासून तेथील जनतेमध्यें विशेषतः दरबारी मंडळींत इंग्रजांचा तिटकारा धुमसत होता. साताऱ्च्या एका छत्रपतीला १८३९मध्यें कंपनी सरकारनें बंडखोरीच्यां आरोपावरून तख्ताखालीं ओढलें व काशीक्षेत्रीं वस्तीला पाठविलें. मग त्याच्या भावाला गादीवर चढविलें आणि तो निधन पावल्यावर त्यानें आपल्या अंतकाळीं घेतलेल्या दत्तकाचा राज्यावर हक्क नाहीं असा निर्णय स्वीकारून कंपनीच्या राज्यकर्त्यांनीं साताराचें राज्य आपल्या कारभारांत आणून सोडलें. या कृत्यामधील न्यायान्यायाची चर्चा करण्याचें हें स्थळ नाहीं. परंतु कंपनीचें कृत्य न्यायाचें नव्हतें, अशी मनाची खात्री झालेला एक बुद्धिमान्, दृढ निश्चयाचा, निस्सीम स्वामिनिष्ठ पुरुष साताऱ्याच्या राजपरिवारांत होता. शिपायांच्या उठावानें तापलेल्या वातावरणांत आपली स्वामिनिष्ठा सार्थकीं लावावी, असें त्या पुरुषाच्या मनांत आलें व त्यानें लोकांच्या उठावणीचा प्रयत्न केला. १८५७ च्या हकीकतींत नानासाहेब, लक्ष्मीबाई, तात्या टोपे, फेरोजशहा, फैजाबादचा मौलवी—त्यांतल्या तिघांचीं नांवें स्तुतिपूर्वक सहज उच्चारलीं जातात, परंतु योग्यतेनें त्यांच्या बरोबरीचा असूनहि या पुरुषाचा परिचय महाराष्ट्राला अगदीं अलीकडे झालेला आहे. त्याच्या कामगिरींत जर चटकन् दिसणारी उणीव असेल तर ती तलवारबहादरीची आहे. तो तरवार फिरवीत घोड्यावरून धावल्याचा दाखला त्याच्या चरित्रांत नाहीं. ही न्यूनाची नोंद असली तरी 'एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जति' या सुभाषितानुसार त्याचें चरित्र पाहतांना हें न्यून डोळ्यावर येत नाहीं. कांहींच्या नांवाचा जप चालावा व या पुरुषाचें कर्तृत्व मुद्दाम सांगण्याची पाळी यावी, या भेदाचें संभाव्य कारण समजण्याकरितां प्रस्तुत न्यूनाचा निर्देश करावा लागला. छत्रपतींच्या राज्यासाठीं अखेरपर्यंत तन मन धन वेंचणारा हा पुरुष कोण याचा बोध वाचकांना झाला असेल. हा पुरुष दुसरा कोणी नसून रंगो बापूजी गुप्ते हे होत.

### विलायतची कामगिरी

पेशवाई जिंकतांना छत्रपति प्रतापसिंहाना कंपनीच्या कारभाऱ्यांनीं राज्यकर्तृत्वाचे अधिकार दिले व १८३९ मध्यें त्यांचे अधिकार बुडविले. तेव्हां इंग्लंडांत न्याय मिळतो असा एक भ्रम हिंदी राजेरजवाड्यांमध्यें रूढ होता. राघोबादादांनीं दोघां जणांना लंडनला पाठविल्याच्या कथेचें या संदर्भात

स्मरण होण्याला हरकत नाहीं. क्लाइवच्या व हेस्टिंग्जच्या कृताकृताची पार्लमेंटानें कसून कडक चौकशी केल्याच्या माहितीवरून हा भ्रम इकडे फैलावला असावा. राघोबामागून दिल्लीच्या नामधारी बादशहानें राममोहनरायांना इंग्लंडला आपली बाजू तेथील अधिकाऱ्यांना समजावून देण्यासाठीं पाठविल्याचें उदाहरण प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें आपल्यावर झालेला अन्याय कंपनीच्या विलायती वरिष्ठांच्या गळीं उतरविण्यासाठीं महाराज प्रतापसिंहांनीं प्रथम एका मुसलमान इसमाला पाठविलें व तो आपल्या कामाला नालायक आहे, असें दिसल्यावर रंगो बापूजींना तिकडे पाठविलें. रंगो बापूजी लंडनला गेल्यावर त्यांनीं निरनिराळ्या वेळीं वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे जे अर्ज सादर केले, ते पाहतांना निराशेच्या आहारीं न जातां केवळ स्वामिसेवाबुद्धीच्या चिकाटीनें इष्टसिद्ध्यर्थ झटणारे रंगो बापूजी, दादाभाई नौरोजींचें स्मरण करून देतात. फरक दाखवायचा तर स्वामिसेवा आणि देशसेवा हा दाखवितां येईल. गुणांमध्यें असा भेद दाखविणें शक्य नाहीं. रंगो बापूजी विलायतेस असतांना इकडे प्रतापसिंह वारले (१८४७). त्यांच्यामागून राज्यावर बसविलेल्या बंधूनें इहलोक सोडला (१८४८). सातारचे राज्यहि लोपलें; इतकेंच नव्हे तर प्रतापसिंहाच्या दत्तक चिरंजीवानें व त्याच्या मातुःश्रीनें आपण राज्यावर हक्क सांगणार नाहीं, यापुढें या हक्कासंबंधाची धडपड चालेल तर ती आमच्या प्रेरणेची समजूं नये, असें इंग्रजांना लिहून कळविलें. याप्रमाणें विलायतच्या उद्योगाला कसलाच आधार उरला नाहीं तरी रंगो बापूजी आपलें काम करीतच होते. आपल्या बायका-मुलांवर दडपण येऊन तीं राज्याच्या हक्काचा नाद सोडतील, हें भाकीत वर्तवून मरण्यापूर्वीं प्रतापसिंहांनीं रंगो बापूजींना आपला उद्योग चालू ठेवण्याची सूचना दिली होती. त्यांना आपल्या स्वामीचा हा शेवटचा आदेश एवढाच आधार होता. त्यावर रंगो बापूजींनीं आणखी चार वर्षें तेथें काढलीं.

### विलायतचे अनुभव

रंगो बापूजी लंडन शहरीं असतांना त्यांनीं आपला देशी पोषाख कायम ठेवला होता, हें मुद्दाम सांगण्याजोगें आहे. अलीकडे परदेशीं जाणाऱ्या हिंदी माणसांनीं आपला देशी पेहराव अंगावर बाळगल्यास त्याचें कौतुक ऐकूं येतें. रंगो बापूजींनाहि या कौतुकाच्या मानकऱ्यांत गणलें पाहिजे. त्यांच्या विलायती चहात्यांनीं लिहिलेल्या गौरवपर मजकुरांत त्यांनीं पोषाखच



रंगो बापूजी

मराठी ग्रं[illegible] ठा[illegible]
अनुक्र. 23233 वि [illegible]
क्रमांक ... ७०७ ... नों. दि. ८/५/४८

नव्हे बाकीचे हिंदु रीतरिवाज कटाक्षानें संभाळले होते, अशीहि माहिती दृष्टीस पडते. त्यांचा योग्य मान राखणारे इंग्रज विलायतेस निघावे यावरून त्यांनीं आपल्या चारित्र्याचा व कर्तृत्वाचा ठसा तेथें कित्येकांवर कसा उठविला होता, याची साक्ष पटते; पण हिंदी राज्यकारभाराशीं संबंध असलेले इंग्रज त्यांचा करवेल तेवढा अवमान करीत असावें, असें प्रमाण रंगो बापूजींच्या पत्रव्यवहारांत पुष्कळ आहे. अगोदर रंगो बापूजी हे प्रतापसिंहांचे प्रतिनिधि असें मानायलाच कंपनीच्या ऋणानुबंधांतले जवळचे व दूरचे इंग्रज तयार नव्हते. तरी 'दार ठोठाव म्हणजे उघडेल' या इंग्रजी लोकोक्तीप्रमाणें त्यांनीं कंपनीच्या कचेरीचे दरवाजे उघडावयास इंग्रजांना भाग पाडलें. या कामीं कांहीं ब्रिटिश नियतकालिकांनीं मदत केली. कंपनीच्या कामासाठीं भरणाऱ्या बैठकीमध्यें जाऊन आपले विचार बोलून दाखविण्याइतकी त्यांनीं आपली प्रतिष्ठा कंपनीच्या लोकांत वाढविली होती. इंग्रजी बोलतां येत नसल्यामुळें प्रथम त्यांनीं मराठींतच भाषण केलें व त्यांच्या मराठी जाणणाऱ्या इंग्रज मित्रानें त्याचें भाषान्तर सभासदांना ऐकविलें. इंग्रजी लिहिण्याची त्यांना अडचण पडत नसे. त्यांचा लेखनसंभार प्रचंड असून अधिकाऱ्यांना पाठविलेल्या अर्जांमध्यें त्यांच्या बुद्धिमत्तेचे अनेक पैलू दिसतात. आपल्या धन्यावर करण्यांत आलेल्या आरोपांचें निरसन व त्याच्या हिरावून घेतलेल्या वाजवी हक्कांचें समर्थन हें त्यांच्या अर्जदारीचें मुख्य ध्येय असल्यानें भक्कम पुरावा, कठोर सौम्य युक्तिवाद वगैरे गुण त्यांच्या लेखनांत भरपूर पाहावयास सांपडतात. कंपनीच्या कारभाराच्या जेवढ्या शाखा रंगो बापूजीना हालवितां आल्या तेवढ्या त्यांनीं हालवून पाहिल्या, परंतु त्यांच्या पदरांत फळ, पान यांपैकीं कांहींच पडलें नाहीं.

## स्वामिनिष्ठेची तपश्चर्या

इंग्लंडांत काम करायचें तर पैशाचें बळ सडकून असल्याशिवाय भागत नाहीं. रंगो बापूजी विलायतेस गेले त्या वेळींच त्यांच्यापाशीं पैशांची कमतरता होती. विलायतेस दाम व काम यांचें साहचर्य अभेद्य आहे. काम म्हटलें कीं आधीं दाम तयार पाहिजे. स्वदेशी धन्याला जर स्वतःचा योग्य प्रकारें निर्वाह करण्याची मारामार तर तो परदेशीं गेलेल्या चाकराला पैसा कसा देणार? पण आपल्या चारित्र्यानें विलायतेच्या हितचिंतकांत रंगो बापूजींनीं स्वतःची

जी पत उत्पन्न केली होती, तिच्या जोरावर कर्ज काढून त्यांनीं १२ वर्षें कंठलीं. आपल्या आर्थिक विपन्नावस्थेचें वर्तमान त्यांनीं कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या कानीं घातलें तेव्हां बऱ्याच दिरंगाईनंतर के या इतिहासकाराच्या म्हणण्याप्रमाणें कंपनीच्या लोकांनीं २५ हजार रुपये त्यांना देऊन हिंदुस्थानापर्यंत बोटीचा प्रवास फुकट करतां येईल अशी सोय अंमलांत आणली. विलायतेस न्यायप्राप्तीच्या आशेनें जाणाऱ्या संस्थानी प्रतिनिधींना द्रव्याच्या अभावीं कर्जाच्या खोड्यांत पडावे लागे, अशीं दुसरीं उदाहरणें आहेत. अयोध्येच्या पदभ्रष्ट नवाबाच्या आईची कर्जापायीं दुर्दशा उडाली व तिच्यांतून तिला कंपनी सरकारनें सोडविले हा वृत्तान्त इतिहासज्ञांना सांगायला नको. रंगो बापूजींवर तसाच प्रसंग ओढवला. वास्तविक ते १८४१ मध्येंच स्वदेशीं परत यावयाचे, त्याप्रमाणें ते माल्टयापर्यंत आले सुद्धां, पण तेथें त्यांना स्वामीची विलायतेस परत जाण्याबद्दल आज्ञा झाली व ते माघारे गेले; नंतर आणखी १०।११ वर्षें इंग्लंडची सामान्य जनता, पार्लमेंट, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स, बोर्ड ऑफ कंट्रोल, कमिटी ऑफ इंडियन टेरिटरीज इत्यादि सर्वांना हालवून जागे करण्याचा त्यांनीं यत्न चालविला. घरदार, बायकोमुलें, स्नेही सोबती यांच्या वियोगांत दूरदेशीं पैशाचें सामर्थ्य जवळ मुळींच नसतांना स्वामीच्या कल्याणाची काळजी अहोरात्र उराशीं बाळगून राहणें किती कठिण असेल याची कल्पना करणें उत्तम. या काळजीच्या दुःखावर पुनः पुनः बसणाऱ्या अपमान उपहासाच्या डागण्याहि रंगो बापूजींना अपरिमित सोसाव्या लागल्या. रंगो बापूजी हे मोठ्या इभ्रतीचे पुरुष होते. त्यांच्या हृदयाला अपमान उपहासाचे प्रसंग अतिशय झोंबत होते याचें त्यांच्या एका पत्रांत प्रत्यंतर आहे. विलायतेस कित्येक चांगले मित्र जोडतां आले, हेंच काय तें समाधान त्यांना विलायत सोडतांना लाभलेलें होतें. या मित्रांपैकीं २२ जणांनीं आपलीं नांवें कोरलेलें एक चांदीचें तबक रंगो बापूजींना देऊन त्यांच्या विषयींचें आपलें गुणग्राहक निरपेक्ष प्रेम व्यक्त केलें. त्यांमध्यें दोघेजण पार्लमेंटाचे सभासद आहेत. रंगो बापूजी १८५२ साल अखेरीस इंग्लंडहून निघाले.

**साताऱ्याचा कट व रंगो बापूजी**

हल्लींच्या राजकीय परिभाषेंत बोलायचें म्हणजे रंगो बापूजींनीं विलायतेस सनदशीर मार्गानें चळवळ केली असें म्हणतां येईल. १८५४ पासून १८५६ च्या डिसेंबरपर्यंत स्वगृहीं परत आल्यापासून ते काय करीत



रंगो बापूजीस देण्यांत आलेलें पदक

होते, याची माहिती पुरविणारीं साधनें उपलब्ध नाहींत. १८५७ च्या जूनमध्यें साताऱ्यास उठावाची खळबळ माजली तेव्हां रंगो बापूजींचें नांव सातारा टापूंतल्या लोकांच्या तोंडांत घोळलें जाऊं लागलें. साताऱ्च्या उठावाचें कारस्थान उलगडण्याकरितां संशयावरून पकडलेल्या आसामींच्या जबान्या पाहतां असें दिसतें कीं, डिसेंबर १८५६ पासून साताऱ्यास उठाव करण्याचें कारस्थान रंगो बापूजींच्या पुढाकारानें सुरू झालें. त्याचें स्वरूप शिपायांच्या उठावाहून स्वतंत्र आहे. पण शिपाई त्यांत भाग घेतील अशी सूचना कटाच्या पुराव्यांत सांपडली नाहीं. शिपायांत वावरणारांचा या कटांत संबंध होता. जेव्हां रंगो बापूजींचे लोक उठाव करतील तेव्हां आपण त्याच्या प्रतिकार करणार नाहीं, एवढेंच पोलीस शिपायांनीं रंगो बापूजींच्या सहकाऱ्यांना आश्वासन दिलें होतें. रंगो बापूजींच्या कटांत त्यांचा मेव्हणा व मुलगा हे दोघे उजव्या डाव्या हातासारखे महत्त्वाचे घटक होते. मांग, रामोशी, कोळी व कांहीं मराठे यांच्या भरंवशावर हा कट:उभारला जात होता. यांतले मराठे तेवढे छत्रपतींच्या अभिमानानें कटांत सामील झाले, असें मानतां येईल. पण रामोशी, मांग वगैरे जातींतील लोकांच्या अंगीं छत्रपतींच्या गादीचा अभिमान चिकटविणें सयुक्तिकतेच्या चतुस्सीमेंत बसण्याजोगें नाहीं. जूनच्या शेवटच्या तारखेस साताऱ्याजवळच्या परळी गांवांत दरवडा पडला. त्या दरवड्यानें या कटाचें गुपित उघड्यावर येऊन पुढील उठावाचें चित्र इंग्रजाला रेखाटतां आलें. दरवड्यापूर्वीं पुष्कळ माणसें रानांतून जमत असत. रंगो बापूजी ठिकठिकाणीं हिंडून इंग्रजी राज्य रसातळास नेण्याचा उपदेश करीत असत, वगैरे गोष्टी कटाच्या चौकशींतून बाहेर आल्या. कट सफळ करण्यासाठीं हजारों माणसें येतील, असें आपसांत कटवाले बोलत. इंग्रज मारणें, कैदी सोडणें या कार्यक्रमाचें अंतिम साध्य साताऱ्च्या सिंहासनाचें पुनरुज्जीवन असें निश्चित ठरलें होतें. सातारा गॅझेटिअरच्या लेखकानें तर यासारखें कारस्थान साताऱ्च्या राणीनें काशीहून परत आल्यापासून (१८५४) आरंभलें होतें व त्याला होळकरानें व रंगो बापूजींनीं उत्तेजन दिलें असें लिहून ठेवलें आहे.

जुलईत जेव्हां संशयितांची धरपकड चालू झाली, तेव्हां पंढरपुरास सरकारी खजिना लुटण्याचा जो एक प्रयत्न झाला, त्याचा या कटाशीं संबंध जोडला जातो. मूठभर लोकांनीं खजिन्यावर हल्ला केला. तो पोलिसांनीं मोडून काढला. त्या वेळीं चार पोलीस व मामलतदार असे पांच सरकारी इसम ठार

झाले. हल्ला करणारांपैकीं दोघे लढतांना ठार पडले, चौघांना तोफेच्या तोंडीं मरण आलें व बाकीचे काळ्या पाण्यावर गेले. रंगो बापूजींचे कटवाले म्हणून पकडलेल्या १७ जणांचा खटला ता. २७ ऑगस्टपासून सुरू झाला. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत तो संपून सर्व आरोपींना मरणाची शिक्षा फर्मावण्यांत आली. शिक्षेचा अंमल असाच तडकाफडकी झाला (ता. ८ सप्टेंबर). शिक्षा वजावतांना तीन साधनें योजिलीं होतीं. तोफ, बंदूक व फांस. कांहीं दोषामुळें तोफांनीं कामचुकारपणा केल्याचें पाहून त्यांची कामगिरी बंदुकांनीं शेवटास नेली. या नरमेधांत रंगो बापूजींचे चिरंजीव आणि मेहुणे या दोघांच्या आहुति पडल्या. एवढ्यावर हें प्रकरण थांबलें नव्हतें. धरपकड, चौकशी व शिक्षा, हा क्रम सातान्यास १८५८ च्या मार्च एप्रिलपर्यंत चालू होता. रंगो बापूजी मात्र धरपकडीच्या सुरवातीस जे अदृश्य झाले, ते पुनः कुणालाच गवसले नाहींत. त्यांना पकडण्याकरितां इंग्रजांनीं बक्षीस पुकारलें होतें; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. रंगो बापूजींना एकदां पकडून ग्वालेरला कैदेंत ठेवलें होतें, तेथून ते पळाले, अशी एक आख्यायिका आहे. रंगो बापूजी हे अतिशय बुद्धिमान्, चौकस व दूरदर्शी स्वभावाचे होते म्हणून ते असल्या कटाच्या खुळेपणांत शिरणें शक्य नाहीं; तरी साताऱ्च्या राज्यासंबंधांत कंपनीच्या राज्यकर्त्यांनीं केलेला नीचपणा रंगो बापूजींनीं वेळोवेळीं जगापुढें उघडून त्यांना लाजविलें असल्यामुळें रंगो बापूजींचा 'येन केन प्रकारेण' निःपात करण्यासाठीं टपलेल्या इंग्रजांनीं १८५७ च्या धुमाकुळाची संधि साधली व रंगो बापूजींच्या नांवानें साताऱ्च्या कटाचें नाटक उभें केलें असें 'साताऱ्ची कहाणी' ( Story of Satara ) हें पुस्तक लिहिणारे प. वा. मेजर बसू यांनीं आपलें मत स्पष्ट व्यक्त केलेलें आहे.

साताऱ्चा खटला बनावट कीं खरा या वादांत शिरण्याचें आज कारण नाहीं. तो खटला खरा असो वा खोटा असो, स्वामिभक्तीचा अर्वाचीन काळांतला एक अग्रगण्य आदर्श या नात्यानें रंगो बापूजींचें कर्तृत्व सदैव आदरणीय वाटावें.अशा कोटींतलें आहे. रंगो बापूजींच्या निष्ठेचा एक विशेष असा होता कीं, त्यांचे स्वामी त्यांची योग्य विचारपूस नेहमींच करीत नसत. गरजेच्या वेळीं हाक मारावी आणि गरज संपल्यावर रंगो बापूजी-विषयीं उदासीन वृत्ति धारण करावी, अशा तऱ्हेची छत्रपतींची वागणूक असूनसुद्धां रंगो बापूजींच्या निष्ठेंत लवमात्र अंतर पडलें नाहीं. हाच तो

विशेष होय. स्वामीसाठीं त्यांनीं आचरिलेलीं अनेक अद्भुतरम्य साहसें त्याच्या चरित्रांत नमूद आहेत. शिवाजी महाराजांचे जे पहिले सहकारी दादाजी नरस प्रभु त्यांचे रंगो बापूजी हें वंशज असून दादाजींची निष्ठा त्यांच्या रक्तांत उतरलेली होती. ज्या काळांत रंगो बापूजी जन्मास आले व ज्या संस्कारांत ते वाढले त्यांकडे लक्ष देऊनच त्यांच्या गुणाचें मोल ठरविलें पाहिजे. आज ध्येयविषयक दृष्टींत भेद उत्पन्न झाल्यासारखा वाटला तरी कोणतेंहि ध्येय सिद्धीस नेण्यासाठीं ज्या श्रेष्ठ लोकोत्तर गुणांची आवश्यकता असते त्या गुणांचें स्वरूप बदलत नाहीं. ते गुण असल्याखेरीज माणसामध्यें तीव्र व अढळ ध्येयनिष्ठाच उत्पन्न होऊं शकत नाहीं व यदृच्छेनें उत्पन्न झाल्यास ती दीर्घकाल टिकत नाहीं. रंगो बापूजींच्या ठिकाणीं ते सर्व गुण होते. त्या गुणांची नांवनिशीवार यादी सादर करण्याची गरज नाहीं. कोणत्याहि चिरकीर्तीच्या थोर पुरुषाचे गुण पाहून रंगो बापूजींचें चरित्र पारखावें म्हणजे रंगो बापूजींचे गुण सहज आकलन होतील. रंगो बापूजी ही महाराष्ट्रानें अभिमान बाळगावा अशी व्यक्ति असूनहि प्रायः त्यांच्याविषयीं उपेक्षा आढळते म्हणून येथें कांहींसें विस्तारपूर्वक लिहिलें आहे.

## भिल्ल, कोळी, बेरड वगैरे

मुंबई इलाख्यांत भिल्ल (खानदेश), कोळी (गुजरात), बेरड (कर्नाटक) यांनीं उठावानें निर्माण केलेल्या अस्वस्थतेंत भर टाकल्यामुळें त्याचा शिपाई-गर्दीशीं संबंध जोडला जातो. वस्तुतः या डोंगराळ जमाती इंग्रजी राज्य अस्तित्वांत येण्यापूर्वींच्या स्वराज्यांतहि नेहमीं धामधूम माजवीत असत, हें लक्षांत ठेवलें कीं, त्यांच्या १८५७ सालांतील दंगलीचें स्वतंत्र कौतुक गाण्याचें कारण सांपडत नाहीं. पेशवाईत भिल्ल कोळी पेशवाईच्या चालकांना पुनःपुनः हैराण करीत होते. डोंगरदऱ्यांच्या रानांतून राहावें आणि वाटमारेपणाच्या साधनानें जगावें हा त्यांचा व्यवहार प्राचीन काळापासून चालू असल्याचे पुरावे हवे तितके दाखवितां येतील. भिल्लांबद्दल जें लिहिलें तेंच थोड्याफार प्रमाणांत बेरड कोळ्यांना लागूं पडणारें आहे. खानदेशच्या भिल्लांना इंग्रज राज्यकर्त्यांनीं अर्वाचीन सुधारणेच्या मार्गावर आणण्याचा जो प्रयत्न केला होता, त्याचे परिणाम त्यांच्या जीवनांत मुरण्याइतका अवधि मध्यंतरीं लोटला नसल्यानें उत्तरेकडील उठावाच्या संकटानें इंग्रजी राज्य

जाईल.कीं काय असा संशय उत्पन्न होतांच भिल्ल हे आपल्या पूर्वीच्या वळणावर गेले. त्यांना मकराणी, रोहिले वगैरे परदेशी मुसलमान मिळाले होते. हे मुसलमान धारच्या किल्ल्यांतून पळालेले असल्यामुळें जेव्हां भिल्लांशीं एक लढाई झाली तेव्हां या मुसलमानांची मर्दुमकी विशेष दिसून आली. पकडलेल्या ७२ जणांना दोन हप्त्यांनीं ठार करण्यांत आलें. भिल्लांच्या बंडाळीबद्दल इंग्रज अधिकाऱ्यांमध्यें फारसा कडवटपणा वसत नव्हता, उलट थोडीशी त्यांच्याविषयीं सहानुभूतीच होती. १८५७–५८मध्यें खानदेश, नगर येथें भिल्लांची गडबड चालू राहून ती शमली. भिल्लांच्या बंडाळींत इंदूरच्या होळकरांची छाया इंग्रजांना दिसली, ती खोटी होती असें परिणामावरून समजावें लागतें.

बडोदें राज्याच्या उत्तर भागांतील कोळ्यांच्या दंग्यामागें बडोद्याचे एक दोन सधन वैश्य होते व गोविंदराव गायकवाडांचें नांव त्या दंग्याच्या चौकशींत उच्चारलें जात होतें. गायकवाडींतल्या या कोळ्यांचा जमाव व त्यांच्या गडबडीचा टापूहि भिल्लांच्या मानानें लहान होता. बडोद्याच्या संस्थानी फौजेला मदत करून ही गडबड इंग्रजांनीं मोडली. एका गांवांतल्या दंगेखोर प्रमुखानें सारा-वसुलीच्या अंमलदाराला इंग्रजी राज्य संपलें; यापुढें साऱ्याची मागणी करायला येऊं नका’ अशा अर्थाची उद्दाम भाषा वापरल्याची माहिती मुंबई सरकारच्या कागदपत्रांत दिसली म्हणजे या दंगेखोरांच्या भावनेचा छडा लावतां येतो.

बेरडांची गडबड मुधोळ व हलकली टापूंतली असून १८५७ च्या नोव्हेंबरांत तिनें डोकें वर काढलें व तें डोकें डिसेंबरांत पडलें. इंग्रजी राज्याविरुद्ध उठण्याला संधि आहे. कारण त्यामध्यें विशेष त्राण उरलेलें नाहीं. ही लोकांतील साधारण समजूत जमेला घेऊन इंग्रजांविषयीं द्वेष बाळगणारांची बेरडांना मिळालेली चिथावणी; मुधोळच्या संस्थानी अंमलदारांनीं बेरडासंबंधांत ठेवलेलें नरमाईचें धोरण; अशीं कांहीं कारणें इंग्रजांनीं आपल्या अहवालांत दाखविलीं आहेत. पण बेरडांच्या दंग्याचें तात्कालिक निमित्त म्हणजे हत्यारांची नोंदणी हें होतें. बेरडांनीं जेव्हां दांडगाईचें धोरण पत्करलें तेव्हां इंग्रजांच्या लष्करी तुकड्यांनीं त्यांना वठणीस आणलें. बेरडांची व लष्कराची किरकोळ झटापट होऊन ही गडबड निकालांत निघाली. झटापटींत

बेरडांचा पुढारी मेला. त्याचे मुख्य साथीदार म्हणून जे १९ आसामी पकडण्यांत आले, त्यांपैकीं तेरा जणांना शुक्रवारीं मुधोळचा बाजार भरतो म्हणून त्या दिवशीं मुद्दाम तेथें नेऊन फांशीं दिलें. बाकीच्या सहा जणांची हलगली येथें तीच वाट लागली. स्थानिक इंग्रज अधिकाऱ्यांनीं लिहून ठेवलें आहे कीं, हा फांशीचा सोहळा पाहण्यासाठीं बाजारचीं पुष्कळ माणसें जमलीं होतीं.

• • •

# ~ १० ~

## दडपशाहीचा कारभार

एका गालांत थप्पड बसल्यास दुसरा गाल पुढें करायला सांगून क्षमाशील सहिष्णुता शिकविणाऱ्या ख्रिस्ती धर्माचे अनुयायी या नात्यानें इंग्रज लोक मिरवीत असले व आधिभौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें माणुसकीच्या दृष्टीनें आपण हिंदी जनतेशीं तुलना केल्यास अधिक उंचावलेले आहों, अशी बढाई मारीत असले तरी त्यांच्या स्वार्थाला धक्का लागण्याच्या प्रसंगीं ते माणुसकीचे सर्व धरबंध सोडून रानटी पशुत्वाच्या निर्दय हिंस्र वृत्तीचा आविष्कार कसा करतात, याचीं उदाहरणें १८५७ नंतरच्या कालावधींतून आजपर्यंत वाटेल तेवढीं दाखवितां येतील. परंतु १८५७ तील शिपायांचा उठाव हा विषय प्रस्तुत असल्यानें तेव्हां त्यांनीं माणुसकीला काळिमा फांसणारा जो धिंगाणा घातला त्याचें किंचित् सविस्तर अवलोकन केल्याशिवाय एकंदर विवेचनाची पूर्तता व्हावयाची नाहीं. यासाठीं ज्या प्रदेशांतील जनतेनें इंग्रजी राज्यकर्त्यांना मनःपूर्वक साह्य केलें, त्या पंजाबाकडून इतर मुलखाकडे वळणें योग्य होईल.

### पुर्भय्यांची हकालपट्टी

पंजाबी जनता—हिंदु, मुसलमान, शीख—हीं शांत होती खरी, पण त्या मुलखांत बेंगाल आर्मीचे अर्थात् पुर्भय्या जातीचे 'हिंदुस्तानी' या नांवानें ओळखले जाणारे पुष्कळ लोक होते. हा उठाव प्रामुख्यानें पुर्भय्यांचा आहे, अशी खूणगांठ मनाशीं पक्की बांधून त्यांना पंजाबांतून खड्याप्रमाणें वेंचून बाहेर टाकण्याचें किंवा त्यांच्या हातून दंग्याधोप्याचा गुन्हा घडल्यास त्यांना ठार करण्याचें कंकण पंजाबांतील इंग्रज अधिकाऱ्यांनीं बांधल्याची थोडी माहिती मागील कथानकांत गोविलेली आहे. पंजाब जिंकून १८५७ मध्यें अवघीं नऊच वर्षें लोटलीं होतीं. यामुळें तेथील निदान शिखांनीं इंग्रजां-विरुद्ध उठाव केला असता तर तो स्वाभाविक गणला गेला असता, पण तसा उठाव झाला नाहीं, याचीं कारणें सांगतांना तेथील जनतेचीं हत्यारें इंग्रजांनीं काढून घेतलीं होतीं, हें एक महत्त्वाचें कारण इंग्रजांच्या लिखाणांत

दृष्टीस पडतें. तेथील जनतेवर लादलेले कायदे सौम्य स्वरूपाचे व लोकांत असंतोष उत्पन्न करणारे नव्हते; यामुळें ती जनता बिथरली नाहीं, असाहि खुलासा कित्येकांनीं दिलेला आहे. पंजाब शांत कां राहिला याचा काथ्याकूट सोडून तेथें इंग्रजांनीं तेथील जनतेची मदत घेऊन सुद्धां कशी दडपशाही चालविली होती यासंबंधाची माहिती पाहावयाची आहे.

पुर्भय्यांच्या फौजा हत्यारें काढून घेऊन बडतर्फ केल्या. त्यांतील ज्यांनीं पळापळ केली, त्यांचा वायव्य सरहद्दीच्या पठाणी भागांत इंग्रजांनीं कसा धुव्वा उडविला हा वृत्तान्त सांगून झाला आहे. परंतु पंजाबांत रावी, सतलज नदीच्या कांठीं पळून जाणाऱ्या हिंदुस्तानी शिपायांच्या कशा कत्तली उडविल्या, याचा थोडासा पाढा वाचावयाचा आहे. त्यासाठीं झेलमच्या उठावाकडे आधीं दृष्टिक्षेप केल्यास जो प्रकार दिसतो तो पाहायला हरकत नाहीं. उठाव होण्याचीं लक्षणें दिसतांच तेथें उठाव चिरडण्यासाठीं दुसरी फौज गेली. झेलमच्या शिपायांत शंभर शीख होते; ते पुर्भय्यांना सोडून वेगळे निघाले व पुर्भय्यांशीं नेटानें लढले. पुर्भय्यांनीं छावणींत असेतोंवर तशीच निकराची लढाई चालविली. रात्रीं छावणी टाकून ते एका खेड्यांत गेले. तेथें लढून फाटाफुटीनें सैरावैरा पळत असतां त्यांना अधिकाऱ्यांनीं धरलें व गांवकऱ्यांच्या हवालीं केलें. मग शिपायांनीं मरणाचें प्रायश्चित भोगलें. सिआलकोटच्या उठावाची कथा अशीच आहे. तेथील लुटीनें भारावलेले शिपाई आस्तेकदम दिल्लीकडे जात होते; तों रावी नदीवर त्यांना निकल्सन आडवा आला. वाट खुंटली व हल्ला अंगावर आला, असें पाहून शिपाई रावी नदीच्या एका बेटावर जाऊन राहिले. रावीचें पाणी उतरल्यावर चार दिवसांनीं निकल्सन त्या बेटावर पोंचला. बरेच शिपाई नदींत बुडाले, पुष्कळसे मारले गेले; त्यांतून जे निसटले त्यांना गांवकऱ्यांनीं पकडून ठार केलें. आणखी एका ठिकाणीं पळणाऱ्या शिपायांना थोडे पोलीस व पुष्कळसे गांवकरी यांच्या मदतीनें एक मामलतदार अडवूं शकला. पण सुमारें तीनशेंवर शिपाई सतलजच्या प्रवाहाजवळ पकडले गेले. त्यांतलें जे पाण्यांत शिरले त्यांना जलसमाधि मिळाली. जे शरण आले त्यांना गोळ्यांनीं मारण्याचें काम सुरू झालें. गोळ्या मारणारा एक जण बेशुद्ध पडला. शिपाई एका लहान जागेंत कोंडून ठेवलेले होते. ज्यांना बाहेर नेले ते मारले, या माहितीमुळें त्या जागेंत राहिलेल्या उर्वरित शिपायांनीं बाहेर निघण्याचे नाकारलें. मारेकरी अधिकाऱ्याचें आयतेंच काम झालें. शिपाई ठेवल्या जागीं श्वास

कोंडून मरणार आहेत तर त्यांना बाहेर ओढून काढण्याचे व गोळ्या झाडण्याचे श्रम करा कशाला, अशा समाधानानें अधिकारी गेला. दुसऱ्या दिवशीं या शिपायांचे मुडदे त्या कोंडवाड्यांत सांपडले. सारे मुडदे नंतर एका विहिरींत टाकले. ज्यानें ही कत्तल केली, त्यानें असें लिहिलें आहे कीं, या प्रसंगीं आपण कलकत्त्याचे ब्लॅकहोल व जिच्यांत ठार केलेल्या इंग्रज बायकामुलांचीं प्रेतें टाकलीं ती कानपूरची विहीर या दोन्ही स्थळांच्या घटनांचें उट्टें फेडलें.

पंजाबांत शिपायांचे जातभाई व देशभाई सामान्य सरकारी नोकरींत होते. असे २५०० पुर्भय्ये लाहोराहून हाकलले. पंजाबच्या वृत्तपत्रांवर नियंत्रणाचा (सेन्सारशिप) बडगा उगारला. हत्यारांचा तपास लावण्यासाठीं झडत्या आरंभल्या. हेरांचा पंजाबांत असा सुळसुळाट होता कीं, त्यांच्या तडाख्यांतून जनानखाने सुटले नाहींत. मग मंदिरें, मशिदी या सार्वजनिक स्थळांबद्दल बोलायलाच नको. विद्वान् मौलवी अटकेंत पडले. चांगल्या, प्रतिष्ठित व नामांकित माणसांना पोलीसठाण्याचें केव्हां बोलावणें येईल याचा नियम नव्हता. पुष्कळदां ऐन मध्यरात्रींसुद्धां त्यांना पोलिसांच्या भेटीला जावें लागे. प्रवाशांच्या धर्मशाळा, यात्रा, बाजारहाट, देवळांतल्या किंवा मशिदींतल्या प्रार्थना, तुरुंग, दवाखाने, छावणींतील दुकानें—सारांश जेथें माणसें जमण्याची शक्यता असेल तेथें हेर असायचेच, फार काय पण स्नानांचे घाटसुद्धां हेरांनीं व्यापले होते. रस्त्याच्या पुलांवर हवेसाठीं किंवा विश्रांतीसाठीं दहापांच माणसें जर गप्पा मारीत बसलीं असतील, तर त्यांत एखादा तरी हेर असायचाच. खेड्यांतून मोठ्या झाडाखालीं उन्हाळ्यांत सावलीनिमित्त व हिवाळ्यांत पाचोळा पेटवून शेकासाठीं माणसांनीं बसण्याचा प्रघात सर्वांच्या परिचयाचा आहे. तेथें सुद्धां हेर नाहीं असें होत नसे; सरकारी कचेऱ्यांच्या आसपास कामाच्या वेळीं रिकामटेकड्यांचा घोळका असतो. मोठाल्या सडकावर खडी फोडणारांचा जमाव असतो; त्यांच्यांत देखील हेर सोडलेले होते. पोस्टांतला पत्रव्यवहार सुरक्षित नव्हता. माणसानें आपल्या छायेला भ्यावें आणि श्वासोच्छ्वासाचें नियमन करावें, अशा तऱ्हेचें पंजाबच्या दडपशाहीचें विलक्षण उग्र स्वरूप होतें.

### दिल्लीकडील अत्याचार

मीरतहून उठावाचे शिपाई दिल्लीस गेल्यावर जेव्हां इंग्रजांचें काळें गोरें सैन्य आसपासच्या मुलखाचा बंदोबस्त करूं लागलें तेव्हां गांवें जाळणें व लुटणें

हीं कर्मे सामान्य खेळांप्रमाणें त्या सैन्यांत साहजिकतेच्या मर्यादेंत आणून सोडलीं होतीं. त्यांपैकीं ज्यांच्या संबंधांत गुन्हेगारीचा संशय त्या त्या जागेच्या तात्कालिक पुराव्यानें सिद्ध होईल, त्यांना फांसावर चढविणें किंवा बंदुकीनें ठार मारणें हें कृत्य धन्यतेचें समजलें जात होतें. मीरत अंबाल्याहून दिल्लीस जाणाऱ्या गोऱ्या सैनिकांनीं आपल्या अनुभवाच्या ज्या गाथा लिहून ठेवल्या आहेत, त्यांत गुन्हेगार म्हणून पकडलेल्या माणसांचा जीव घेण्याच्या कर्माची माहिती पाहायला सांपडते. मरण्यापूर्वीं या दुर्दैवी माणसांचे जे हाल केले जात असत त्यांचीं वर्णनें कोणत्याहि काळांत वाचणाऱ्याच्या अंगावर कांटा उभा करतील अशीं आहेत. झुपक्यांनीं केस उपटणें, संगिनीनें देह विदारणें, अशा प्रकारचे क्लेश मरणापूर्वीं संशयितांना सोसावे लागत होते.

दिल्लीस गोऱ्यांची छावणी पडून दर दिवशीं लढाया सुरू असतांना हीं क्रूर कर्मे घडत नसतील अशी कल्पना करायला इंग्रजांनीं आपल्या सूड घेण्याच्या इतिहासांत जागा ठेवलेली नाहीं. एके दिवशीं दिल्लींतून एक शिपाई इंग्रजी छावणींत आला व आपण जीवाला कंटाळलों आहों, असें सांगून तो इंग्रजाला शरण गेला. त्याला ठार करण्याची गरज नव्हती, असें कांहीं इंग्रजांचें मत असून सुद्धां त्याची मरणाची इच्छा इंग्रजांनीं पुरी केली. याला फांशी देत असतां दोनदां फांसाची दोरी तुटली. तेव्हां त्यानेंच 'आतां फांशीची उठाठेव नको, बंदुकीनें जीव घ्या' असें सुचविलें व त्याची ही सूचना इंग्रजांनीं अंमलांत आणली. काळ्या इसमाला मारण्याची गोऱ्याला लहर लागल्यास तो कसलेंहि निमित्त काढून काळ्याच्या जीवावर बंदुकीच्या गोळ्यांचा निखारा पाखडायला बिचकत नसे. एकदां एका काळ्या इसमानें समोरच्या गोऱ्याला अनुलक्षून 'गरीब परवर' (दीनांचा पालक) असा शब्द वापरला. त्या गोऱ्याला फक्त 'गरीब' या शब्दाचा अर्थ ठाऊक होता. हा मनुष्य आपल्याला हीन दीन भणंग भिकारी असें म्हणतो अशी अपमानाची कल्पना त्या गोऱ्याच्या हृदयांत उसळून त्यानें त्या काळ्या माणसाचा मुडदा पाडला. हिंदी माणसें मारण्याची हौस कांहीं गोऱ्यांमध्यें कशी बोकाळलेली होती, याचा खुलासा होण्यासाठीं आणखी एखादें उदाहरण सांगायला हरकत नाहीं. एकदां दोन तीन हिंदी माणसें एका गोऱ्या अंमलदाराकडे निरोप घेऊन आलीं. निरोपाचें काम आटोपल्यावर तीं परत फिरतांच त्यांच्यावर सदर अंमलदारानें गोळ्या झाडल्या व त्यांना परलोकीं पाठविलें. संशयावरून

पकडलेल्या इसमांच्या आरोपाची चौकशी एकदां चालू असतां शत्रु आल्याची हूल उठून चौकशीचे अंमलदार लढाईसाठीं निघून गेले. पुनः चौकशी करायला ते अंमलदार आले तों आरोपींचा पत्ता नाहीं. त्यांना पहारेकऱ्यांनीं मारून टाकलें होतें. अशीं उदाहरणें दिल्लीसच नव्हे तर अन्यत्र घडल्याच्या नोंदी १८५७ च्या ऐतिहासिक साधनांतून आहेत.

दिल्ली घेतल्यानंतर इंग्रजांनीं व त्यांच्या साह्यकर्त्या शीख पठाण गुरख्यांनीं जी लूट केली, तिचें वृत्त पूर्वीं सादर केलें आहे. लुटीबरोबर कत्तल-देखील सुरू होती. त्या शहरीं गोऱ्याकाळ्या ख्रिस्त्यांचें जें शिरकाण झालें तें मुसलमानांनीं केलें, अशी गोऱ्यांची समजूत असल्यानें मुसलमानाला दिल्लीस जगणें अशक्य होतें. मुसलमान दिसला कीं मेला, असा प्रकार दिल्लीस कित्येक महिने चालला होता. त्यांतून सुटलेल्या मुसलमानांचीं आत्मचरित्रें, रोजनिशा वगैरे जें साहित्य सांप्रत उपलब्ध आहे, त्यांत दिल्ली शहर म्हणजे एक प्रचंड कत्तलखाना असून त्यांत मुसलमानांच्या हत्येला मर्यादा उरलेली नाहीं अशा अर्थाचा मजकूर जास्त आढळतो. ही घोर आपत्ति ‘ असंगाशीं संग प्राणाशीं गांठ ’ म्हणतात त्याप्रमाणें पुर्भय्या हिंदु शिपायांच्या संगतीनें आपल्यावर ओढवली असा ग्रह एका मुसलमान कवीनें आपल्या शाहिरींत व्यक्त केला आहे. तो म्हणतो—“ आपल्या नांवामागें ‘ दीन ’ हा शब्द लावणारांना ‘ दीन ’ कशाशीं खातात याचें ज्ञान नव्हतें म्हणून त्यांच्या अत्याचारांचें प्रायश्चित्त मुसलमानांना भोगावें लागलें. ” उत्तर भारतीयाची गंगादीन, मातादीन अशीं नांवें असतात, त्यांतल्या दीन शब्दावर ही पूर्वोक्त इस्लामी कवीची कोटी आहे. ‘ दीन ’ म्हणजे धर्म अर्थात् इस्लामी धर्म, त्याचें ज्ञान या लोकांच्या गांवींहि नव्हतें, हा सदर कोटींतला टोमणा स्पष्ट करायला नको. इंग्रजांचा मुसलमानांबद्दल विशेष आकस होता, यामुळें हिंदूंचा दिल्लींत संहार झाला नाहीं, असें मानण्याचें कारण नाहीं, त्यांनाहि इंग्रजांनीं यथेच्छ ठोकलें. एकदां चारसहा दिल्लीचे व्यापारी आपल्या दुकानाकडे जात असतां ते गुन्हेगार नव्हत, अशी खात्री करून घेऊन एका इंग्रज ठाणेदारानें त्यांना पुढें जाऊं दिलें. दुसऱ्या ठाण्यावर त्यांच्या आयुष्याची दोरी तेथील पहारेवाल्यांनीं तोडली. दिल्ली जिंकणारे गोरे सैनिक इतके बेफाम झाले होते कीं, त्यांच्या दुष्कर्माआड जर कोणी गोरा अधिकारी आला तर त्याला सुद्धां ते सैनिक आपल्या उच्छृंखळपणाचा प्रसाद चाखायला लावीत, ही गोष्ट

दिल्लीस ज्याला गव्हर्नर नेमले होते, त्या अधिकाऱ्यानेंच कॅनिंगकडे स्वानुभवांचें गाऱ्हाणें कळवून उघडकीस आणलेली आहे. साक्षात् गोऱ्यांची त्यांतल्या त्यांत बड्या अंमलदारांची जर ही कथा तर हिंदु, मुसलमान व काळे ख्रिस्ती यांचें जीवन पराकाष्ठेचें दुर्धर व्हावें यांत नवल कसलें ?

दिल्ली हें शिपायांच्या उठावाचें पहिलें केंद्र म्हणून तें कायमचें उध्वस्त राहावें, अशा इच्छेनें इंग्रज अधिकारी सुमारें सहा महिनेपर्यंत नागरिकांच्या वस्तीला अडथळा करीत होते. त्यांनीं दिल्लीबाहेर हाकलून लावलेले हजारों स्त्री-पुरुष—त्यांच्याबरोबर मुलें अर्थातच होतीं—थंडीच्या कडाक्यांत उघड्यावर कित्येक महिने दिवस कंठीत असतां त्यांतले कितीजण प्राणास मुकले असतील याची गणना सांगणें साहजिकच अशक्य आहे. बाहेर पडणाऱ्या नागरिकांना जीवनोपयोगी वस्तु बरोबर नेतां येत नव्हत्या. स्त्री-पुरुषांची ताटातूट झाल्यामुळें बायकांची यथेच्छ विटंबना चालू राहिली हें निराळें सांगायला नको. दिल्लींत लढणाऱ्या शिपायांच्या लुटींत सुंदर तरुण स्त्रियांची बढाई पाहिली म्हणजे याविषयीं खात्री पटते. पंजाबचा चीफ कमिशनर लॉरेन्स हा दिल्लीच्या दुर्दशेविरुद्ध सतत निषेध करीत होता, पण त्याचा निषेध बहुतकाळपर्यंत अरण्यरुदनाप्रमाणें निष्फळ राहिला. शेवटीं दिल्लीची व्यवस्था त्याच्याकडे सोपविण्यांत आली, तेव्हां दिल्ली शहरामध्यें नागरिक जनता मोठ्या प्रमाणांत निर्भयपणें सुखानें नांदण्याला प्रारंभ झाला. त्यापूर्वीं दिल्लीच्या इस्लामी इमारती जमीनदोस्त कराव्या; तेथील जुम्मामशीद पाडून त्या इमारतीचा एखादा मनोरा फार झाल्यास खूण म्हणून शिल्लक ठेवावा; मशिदी धुळीस मिळवून त्यांच्या जागीं ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें उभारावीं; मुसलमान-समाजाला अभिमानानें पाहतां येईल असें एकहि जुनें बांधकाम—मग तें कलेच्या दृष्टीनें कितीहि मोलाचें असो—ठिकाणावर राहूं द्यावयाचें नाहीं; दिल्लीच्या बादशाही वाड्यावर नांगर फिरवायचा, वगैरे संकल्पांचा आग्रह कित्येक अंमलदारांनीं धरला होता. दिल्ली शहर नांगराखालीं जावें अशा अर्थाचे शब्द इंग्रजांच्या पत्रव्यवहारांतून दृष्टीस पडतात. पण सगळे वरिष्ठ राक्षसी वृत्तीचे नसल्यामुळें पुष्कळ इमारती वांचल्या. बादशाहाच्या वाड्याचें गंडांतर आसपासच्या इमारतींचा विध्वंस होऊन टळलें. दिल्लींत हिंदूंचीं देवळें लुटीच्या तडाख्यांतून सुटलीं नाहींत. आपली किमती चीजवस्त टाकून नांदतीं माणसें जेथून गेलीं त्या जागांची लूट संथपणें यथेच्छ व्हावी, या परिणामाचें

गणित इंग्रजांच्या दप्तरी कागदांत अवघें १४ लाखांच्या घरांत दाखविलेलें आढळतें. इंग्रजांच्या कांहीं आठवणींत हा आंकडा पाऊण कोटीइतका नमूद आहे, तर दिल्लीच्या इंग्रज लष्करी गव्हर्नरानें दिल्लीची लूट दोन कोटींची असा अभिप्राय लिहून ठेवल्याचें पाहायला सांपडतें. उठावाच्या शिपायांऐवजीं दिल्लीची खरी नागवणूक इंग्रजांनीं केली, असा निष्कर्ष निर्विवादपणें निष्पन्न होतो.

### कानपूरच्या वाटेवर

दिल्लीहून आग्रा व त्यापलीकडे कानपूरपर्यंतचे जिल्हे गोऱ्या-काळ्या सैनिकांच्या हातून मारल्या जाणाऱ्या गांवकऱ्यांच्या रक्तानें रोज भिजत होते. सप्टेंबर अखेरीस दिल्लीहून कानपुरास जाणारा सेनाविभाग शिपायांच्या जमावाशीं लढून त्यांना मारीत होताच, पण सामान्य गांवकरी सुद्धां त्यांच्या हत्यारांना बळी पडत होते. एकदां इंग्रजी फौज नजीक आल्याच्या बातमीनें सामानसुमान डोक्यावर घेऊन खेड्यांतले लोक आपल्या बचावासाठीं पळतांना या फौजेला दिसले, तोंच त्यांच्याकडे स्वार धावले. सुदैवानें या वेळीं फौजेबरोबर मुलकी अधिकारी होते, त्यांनीं मध्यस्थी करून त्या गांवकऱ्यांना वांचाविलें. एकदां एका खेड्यांत इंग्रजांच्या वापरांतल्या चार-दोन वस्तु सांपडल्याच्या गुन्ह्यासाठीं सैनिकांनीं सारे गांवकरी अधिकाऱ्यापुढें आणून उभे केले. त्यांना मारण्यासाठीं सैनिकांचे हात वळवळत होते, पण अधिकारी विवेकी व समंजस असल्यानें आपण यमासमोर उभे आहोंत, या कल्पनेनें भेदरलेल्या त्या सर्व गांवकऱ्यांना त्यानें सोडून दिलें. हळू हळू माणसें मारण्याचा गोऱ्या अंमलदारांना वीट येऊं लागल्याचें उदाहरण अल्फ्रेड ल्याल या अधिकाऱ्याचें आहे. तो बलंद शहराचा कलेक्टर होता. ऑक्टोबरांत तो आपल्या कामावर रुजू झाल्यानंतर त्यानें जिल्ह्याच्या खेड्यांतील गुन्हेगारांना फांशी देण्याचें काम सुरू केलें. शक्य तोंवर फांशी जाणाऱ्या गुन्हेगाराला सौजन्यानें वागवावयाचें असें त्याचें धोरण होतें. त्यानें ज्यांचा मृत्यूला नैवेद्य दाखविला ते सर्व आपसांतल्या खुनाचे आरोपी होते, असें त्यांच्या चरित्रांत लिहिलेलें आहे. हा गृहस्थ आशियांतील धर्माचा व पंथाचा संशोधक अभ्यासी या नात्यानें प्रसिद्धि पावला होता, यामुळें त्याच्या विचारांना महत्त्व आहे. ' आपल्याला माणसें मारण्याचा वीट आला ' असें एका पत्रांत त्यानें स्वच्छ म्हटलें आहे.

**रक्त चाटण्याची शिक्षा**

उठावाला ठेचण्याकरितां मद्रासकडून गोऱ्या सैनिकांना घेऊन कलकत्त्यास सर्वांआधीं पोचलेल्या नीलचा पराक्रम मागें बनारस अलाहाबादच्या हकीकतींत आला असून याच्या हाताखालील रेनोनें अलाहाबाद–कानपूरच्या रस्त्यावर खेडीं जाळलीं, खेड्यांतलीं माणसें झाडावर टांगून मारलीं, हा पाढा वाचून झाला आहे. रेनो हा हेवलॉकनें शिपायांशीं केलेल्या लढायांत प्राणांतिक जखमेच्या योगानें मेला. कानपुरास नील पोंचल्यावर त्यानें जीं हिंसा केली ती सर्वतोमुखीं ऐकायला सांपडते. कानपुरास जी बायकामुलांची कत्तल झाली तिचा सूड उगविण्यासाठीं नीलनें आपला कल्पक मेंदू घुसळून एक अशी शक्कल काढली कीं ज्याला गुन्हेगार म्हणून फांशी द्यावयाचें त्यानें कत्तलीच्या जागीं गोठलेलें रक्त आपल्या जिभेनें चाटून (एक औरस चौरस फूट) साफ करावें. प्रथम एक मुसलमान व एक हिंदु असे दोन आसामी नीलच्या तावडींत सांपडले. जिभेनें रक्त चाटण्याला आरोपींनीं नकार दाखवितांच त्यांच्या पाठीवर चाबकाचे आघात बसूं लागले. तो मार सोसेनासा झाला तेव्हां त्यांनीं रक्ताची जागा आपल्या जिभेनें स्वच्छ केली; नंतर फांसावरील मरण त्यांच्यासाठीं नेमलेलें होतेंच. नीलनें आपल्या खाजगी पत्रांतून आपल्या असल्या कर्मांची स्वधर्मांची आण वाहून फुशारकी मारलेली पाहिली म्हणजे त्याच्या उलट्या काळजाबद्दल खात्री पटते. ब्राह्मण जातीच्या मयताला जाळल्याशिवाय आणि मुसलमान मयताला गाडल्याशिवाय मरणोत्तर सद्गति नाहीं, यासाठीं नीलनें ब्राह्मणाचीं प्रेतें मातींत व मुसलमानांचीं आगींत लोटण्याचा कित्ता निर्माण केला. नीलचें हें आततायी वर्तन दुसऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना पसंत नसल्यानें नीलच्या जुलूमजबरदस्तीच्या उपायांना आळा घातला गेला, पण त्यापूर्वीं त्याच्या कर्मांचा जो विपरीत परिणाम ह्या भागांतील हिंदी जनतेवर व्हावयाचा तो झालाच. हिंदी जनतेमध्यें इंग्रजांची भीति किंवा दहशत उत्पन्न करावी हा नीलचा हेतु थोडा सिद्धीस गेला असेल, तथापि गोऱ्यांचा बेसुमार तिटकारा वाटणें हा परिणाम टळला नाहीं. नीलनें अलाहाबादेस आणि रेनोनें अलाहाबाद–कानपूरच्या वाटेवर जो संहार केला, त्याचा सूड या नात्यानें गोऱ्या स्त्री–पुरुषांची कत्तल कानपूर–बिठूरच्या टापूंत अंमलामध्यें आली असा ही कत्तल व नील-रेनोचीं कर्में यांच्यांतला कार्यकारणभाव इतिहासकारांनीं सुचविलेला आहे.

## जींवंत जाळण्याची करमणूक

लखनौस पकडलेल्या शिपायांना ठार करतांना जींवंत जाळण्याचा नवा क्रूरपणा इंग्रजांच्या सैनिकांनीं दाखविला. शिपायाला आधीं संगिनीनें भोसकून घायाळ करायचें, मग आगींत लोटायचें, नंतर त्याची मरण्यापूर्वींची तडफड हंसत खिदळत डोळे भरून पाहायची, अशी इंग्रजी सैन्यानें एक नवी करमणूक उत्पन्न केली होती. एकदां एका घायाळ शिपायाला हातपाय दोऱ्यांनीं बांधून आगींत ढकललें. त्याची धडपड सुरू असतां दोऱ्या जळून तो मोकळा झाला व आगीबाहेर पडला. त्याच्या शरीरावर जळके मांस लोंबत होतें, यामुळें त्याच्या अंगाला हात लावण्याची सोय नव्हती; तेव्हां सैनिकांनीं संगिनीच्या उपयोगानें दुरून त्याला आगींत ढकललें व आपली राक्षसी करमणूक भागवून घेतली. ही माहिती देणारा इंग्रज अतिशय उद्वेगपूर्वक म्हणतो कीं, सामान्य सैनिक असंस्कृत, रानटी समजून त्यांचा हा क्रूराचार कदाचित् क्षम्य गणला गेला असता. पण त्यांच्या करमणुकीच्या प्रसंगीं बडे अधिकारी भागीदार असल्याचे पाहिल्यावर युद्धाच्या रगाड्यांत मनुष्य वृत्तीनें किती भ्रष्ट होऊं शकतो, माणुसकीला कसा अंतरतो याची कल्पना करतां आली. वास्तविक अधिकाऱ्यांनीं सैनिकांच्या या कृत्याचा निषेध करायला पाहिजे होता असें तो लेखक सांगतो. हें एक उदाहरण झालें. एकदां एक लहान मुलगा जखमी स्थितींत आपण निर्भय आहों, अशा समजुतीनें इंग्रजी सैन्याजवळून जात असतां एका अधिकाऱ्याच्या दृष्टीस पडला. तो शिपाई नव्हता; गुन्हेगार नव्हता; परंतु काळ्या कातडीचा होता व लखनौच्या रहिवाशांपैकीं होता. रंग काळा आणि वस्ती लखनौची, एवढीं कारणें त्या अधिकाऱ्याच्या दृष्टीनें त्याला ठार करण्याला पुरेशीं होतीं. अधिकाऱ्यानें मुलावर हत्यार चालविलें. हत्यारानें आपलें काम बजावलें. त्याचें हें कृत्य जवळच्या दुसऱ्या अधिकाऱ्यांना अतिशय निषिद्ध वाटून त्यांनीं बाल-हत्या करणारांची फटफजीती केली. पण मुलगा मरायचा तो मेलाच. एका अधिकाऱ्याच्या स्मरणचित्रांतलें हें एक दृश्य आहे. असे प्रकार आणखी किती घडले असतील याची मोजदाद करणें शक्य नाहीं.

## सरकारी मालाचे इंग्रज चोर

अलाहाबाद बनारसची लष्करी दडपशाही, अशीच भीषण होती. त्या दडपशाहीची वाच्यता मागें एकदां थोडीशी केलेली आहे. ‘माणसांची शिकार’ हा शब्द प्रथम ह्या ठिकाणीं प्रचारांत आला. लष्करी कायदा

पुकारला जातांच त्याचा अंमल कोणी करावा, याबद्दल विधिनिषेध उरला नव्हता. एक सिव्हिल सर्जन व दोन खासगी धंदा करणारे ( सरकारी नोकरींत नसलेले ) याप्रमाणें तिघां इंग्रजांनीं आपण लष्करी कायद्याच्या कामगिरीला पात्र आहों, या समजुतीनें काळीं माणसें मारायला प्रारंभ केला. लवकरच त्यांच्या कर्मांचा बोभाटा कलकत्त्यास पोंचून त्यांच्या या स्वयंप्रेरित कामगिरीला आळा घातला गेला; पण त्यापूर्वींच्या अवधींत एकानें ६०, दुसऱ्यानें ६४ व तिसऱ्यानें ५४ माणसें ठार मारल्याचा हिशोब निघाला. ज्या इंग्रजानें हा वृत्तान्त सादर केला आहे, त्यानें सर्जनच्या मागील 'सिव्हिल' हा शब्द उल्लेखून त्याच्या दुरुपयोगाबद्दल देवाची दया भाकली आहे. इंग्रजांचे विश्वासू हिंदी नोकर कामासाठीं बाहेर गेले असतां बेपत्ता झाल्यावर शोध केला कीं, एखाद्या इंग्रज धन्याला ते फासावर लटकलेले दिसावे, असा अनुभव कित्येक दिवस येत होता. लुटालुटीविषयीं सदर लेखकाचें म्हणणें आहे कीं, शिपाई व त्याचे साथीदार यांच्या लुटारूपणाला निंदायचें कारण नाहीं. इंग्रजांचे गोरेकाळे सैनिकच, नव्हे तर अधिकारीसुद्धां आपल्या ताब्यांतील सरकारी मालाची लूट करीत होते. स्टॅम्पच्या कागदांचें या लेखकानें उदाहरण दिलें आहे; या कागदाचे इंग्रज रखवालदार हे कागद विकून त्याची किंमत खुशाल आपल्या खिशामध्यें जिरवीत होते. परंतु दुसरें उदाहरण लखनौच्या रेसिडेन्सीमध्यें सुरक्षितपणाकरितां ठेवलेल्या नबाबाच्या जडजवाहिराचें आहे. ती संपत्ति खास गोऱ्या सैनिकांच्या पहाऱ्यांत ठेवलेली होती, पण त्या पहारेकऱ्यांनींच त्यांतले जिन्नस लांबवायला सुरुवात केल्याचें आढळलें. रेसिडेन्सीच्या कोंडीचें संकट असें होतें कीं, या चोरीचा तपास करण्याला सवड नव्हती. जडजवाहिराची चोरी उघडकीस आल्यावर ती पुनः होणार नाहीं, एवढाच बंदोबस्त तेथील वरिष्ठांना करतां आला. शिपायांच्या तडाख्यांतून एका ठिकाणीं गोऱ्या ख्रिस्ती मिशनऱ्याचें घर बचावलें, पण त्याचा इंग्रजी सैनिकांनीं धुव्वा उडविला. गुन्हेगारीचा संशय असलेलीं खेडीं जाळतांना त्यांत म्हातारे, आजारी, बायकामुलें यांना अग्निसात् व्हावें लागेल, हा विचार इंग्रजी लष्कर प्रायः बाळगीत नसे; यामुळें अशा दुर्बळांचा घात झाल्याचें वृत्त कांहीं इंग्रज लेखकांनीं खेदपूर्वक नमूद केलेलें आहे. एकदां बंडखोर समजून सोजरांनीं

आपल्या चाकरींतल्या मोतद्दारांना संगिनी भोसकून मारलें. एकदां गांवांतल्या कबूतरांवर गोळ्या झाडणाऱ्या सोजरांना गांवकऱ्यांनीं हटकलें तर त्या गांवकऱ्यांपैकीं अनेकांना कबूतरांऐवजीं सोजरांच्या गोळ्यांना बळी पडावें लागलें. लष्करी कायदा हा केवळ माणसांचा जीव घेण्यापुरता मर्यादित नव्हता. तो कायदा गाजविणाऱ्या अंमलदारांना संशयितांच्या स्थावरजंगमाची जप्ती किंवा नासधूस करण्याची परवानगी असल्यानें बागा, घरें, दुकानें, भांडींकुंडीं यांची लूट व नासाडी होत असेल हें निराळें सांगायला नको. शिपायांच्या उठावांत ख्रिस्त्यांचीं प्रार्थनामंदिरें धुळीस मिळालीं होतीं. त्याचा वचपा काढण्याकरितां मुसलमानांच्या मशिदी व हिंदूंचीं देवळें सुरुंग लावून उडविण्यांत आलीं. दडपशाहीच्या कायद्यापैकीं एक कायदा संशयितांना डागण्याचा होता. परंतु त्याचा अंमल झाल्याचें उदाहरण नाहीं. वेठ-बिगारीच्या कायद्याची अंमलबजावणी केल्याचीं वर्णनें शिपाईगर्दीच्या वाङ्मयांत स्पष्ट न दिसलीं तरी तो जारी असल्याचें अनुमान करतां येतें.

**दडपशाहीचे कायदे**

१६ मे १८५७ रोजीं कलकत्त्याच्या वरिष्ठांनीं संशयितांच्या प्राणांची व्यवस्था लावणारा सर्वसामान्य स्वरूपाचा लष्करी कायदा पास केला. ता. २० मे रोजीं या कायद्याचा उपयोग कोणाहि गोऱ्या इसमानें करावा अशी पुस्ती जोडण्यांत आली. ६ जूनला शिपाई व त्यांचे साथीदार यांच्या पंक्तींत त्यांना चिथावणी देणारे लोक नव्या कायद्यानें आणून बसविले व चोरीचा माल ज्यांच्याजवळ सांपडेल त्यांना सुद्धां ठार करावें, अशा धोरणाचा कायदा ता. १३ जूनला पास झाला. २० जूनपर्यंत उठावाचा व नोकरींतून पळालेल्या शिपायांना शिक्षा देण्याचा अधिकार लष्करी वरिष्ठां-कडे होता. तो ता. २० जून पासून सामान्य मॅजिस्ट्रेटांना बहाल करून ता. ६ आगस्टच्या कायद्यानें या अधिकाऱ्यांना मरणाच्या शिक्षेला जोडून मालमत्ता जप्त करण्याची सत्ता देण्यांत आली. शिपायांच्या उठावापूर्वीं कंपनी सरकारानें आपल्या प्रजेचीं हत्यारें हिरावून घेण्याचा प्रयत्न केलेला नव्हता. पंजाबाखेरीज बाकीच्या प्रदेशांत लोकांकडे हत्यारें होतीं. जमीनदारांना तर किल्ले, थोडेफार लष्करवजा हत्यारबंद समुदाय, तोफा वगैरे लढाईचीं साधनें बाळगण्याची परवानगी होती. ता. ११ सप्टेंबरला या परवानगीविरुद्ध कायदा करण्यांत आला. नोव्हेंबरांत इंग्रजाला कळून चुकलें कीं, सगळ्या

गुन्हेगारांना ठार करणें शक्य नसल्यानें ज्याप्रमाणें जनावरांना डागतात, त्याप्रमाणें गुन्हेगारांना डागावें. हा कायदा त्या महिन्याच्या २० तारखेला पास झाला. कोणाहि परदेशी इसमाला हिंदुस्थानांत परवान्याखेरीज प्रवेश करतां येऊं नये, अशा स्वरूपाचा कायदा डिसेंबराच्या सुरवातीस अंमलांत आला. उठावाच्या योगानें तुरुंगांतून सुटलेले कैदी पकडले गेल्यास त्यांना मृत्यूची, जन्मठेपेची व फटक्यांची शिक्षा करण्याविषयींच्या आणखी एका कायद्याची मागील कायद्यांत भर पडली. (१) वेठबिगारीचा, (२) स्टँप-कागदाच्या विक्रीला आळा घालणारा, (३) ज्या खेड्यांनीं इंग्रजांच्या खासगी किंवा सरकारी मालमत्तेच्या लुटालुटींत आणि गोऱ्यांना मारण्यांत भाग घेतला असेल त्या खेड्यांतील मालमत्ता जप्त करण्याचा किंवा नुकसान-भरपाईसाठीं त्यांच्याकडून दंड वसूल करण्याचा, (४) ज्यांनीं उठावाच्या धामधुमींत बलात्कारानें दुसऱ्यांच्या जमिनी दडपल्या असतील, त्या परत मिळविण्याचा व (५) ज्यांच्याजवळ सरकारी हत्यारें व माल सांपडेल त्यांना शिक्षा देण्याचा, असे आणखी पांच कायदे जमेला धरले म्हणजे उठावाच्या बंदोबस्तासाठीं योजलेल्या कायद्यांची मालिका संपते.

**दडपशाही व ब्रिटिश लोकमत**

शिपायांचा उठाव मोडण्याच्या निमित्तानें येथें इंग्रजांनीं जी भयानक दडपशाही आरंभली होती, तिचें दिग्दर्शन येथवर केलें. उठावाच्या बातम्या इंग्लंडांत पोंचल्यावर आरंभीं या दडपशाहीला तेथील जनतेचें बहुमत अनुकूल होतें. शिपायांनीं ज्यांचे नातेवाईक मारले ते सर्वजण चिडून शिपाई व त्यांचे साथीदार या सर्वांचा समूळ निःपात करण्याबद्दल इंग्लंडच्या वृत्तपत्रांतून लेख लिहीत होते. पार्लमेंटांत जेव्हां शिपाई-गर्दीची चर्चा सुरू झाली तेव्हां कित्येक सभासदांनीं कंपनी सरकाराच्या कारभारावर ताशेरा झाडला. त्यांतून अधिकारी, मिशनरी, सेनापति यांपैकीं कुणीहि सुटले नाहींत. त्यांच्या सदोष व्यवहारानें शिपाई-गर्दीची आपत्ति कोसळली, असा प्रतिकूल टीकेचा सूर असला तरी पार्लमेंटाचे सभासद सर्व बंडखोरांचा जीव घ्यावा, असें सरसकट प्रतिपादन करणारे नव्हते. बंडखोरांच्या शिक्षेविषयीं एक कायदा ऑगस्टमध्यें पार्लमेंटानें पास केला. बंडखोरांशीं सुडाच्या भावनेनें वागूं नये, न्यायदृष्टीनें जी शिक्षा योग्य असेल ती अंमलांत आणावी, असें पार्लमेंटांतील पुढाऱ्यांचें सामान्यतः धोरण होतें. शिक्षेविषयींची चर्चा १८५७ मध्यें संपली नाहीं. १८५८ मध्यें

ती चालू राहिली. प्रत्येक बंडखोराला फांशी किंवा तोफेच्या तोंडीं देणें अशक्य आहे, शिवाय बंडखोर शिक्षा म्हणून वांट्यास येणाऱ्या मरणाला भीत नाहीं, हें ध्यानांत ठेवून त्याची प्रतिष्ठा कमी करणारी व देहाचे हाल वाढविणारी शिक्षा देणें योग्य; अशी कल्पना पार्लमेंटांच्या वादांत प्रामुख्यानें प्रचलित होती. इंग्रज हे हिंदी जनतेचे प्रभु ( मालक ) आहेत हा बोध मनांत ठसण्यासारखी शिक्षा देतांना इंग्रज हे हिंदी जनतेचे उपकारकर्ते— कल्याणकर्ते आहेत, याप्रमाणें त्या जनतेमध्यें श्रद्धा उत्पन्न होईल अशी खबरदारी बाळगली पाहिजे; असें इंग्लंडचे पुष्कळ जबाबदार लोक तेव्हां बोलत होते. हिंदुस्थानांतील राज्य-कारभारासाठीं शिक्षण घेणाऱ्या तरुणांना ईस्ट इंडिया कंपनीचा अध्यक्ष मँगल्स यानें १८५७ च्या डिसेंबरांत केलेल्या उपदेशावरून कंपनी सरकाराचें बंडासंबंधाचें धोरण स्पष्ट होईल. त्यानें बंडाचा व त्यायोगानें घडलेल्या अत्याचारांचा निर्देश करून म्हटलें कीं, या प्रकारानें हिंदी प्रजा व ब्रिटिश राज्यकर्ते यांच्यामध्यें बहुतकाळ अविश्वास, संशय, विरोध इत्यादि अनिष्ट भावनांचें प्रावल्य राहील. पण एकंदर हिंदी लोकसंख्येच्या मानानें ज्यांनीं इंग्रजांविरुद्ध हत्यार उपसलें त्यांची संख्या अणुप्राय अत्यल्प आहे, हें सदैव लक्षांत ठेवणें बरें. 'तुम्ही ज्यांवर आपला अधिकार गाजवाल त्यांना इंग्रजां-विषयीं प्रेम वाटेल व वाढेल अशा रीतीनें आपल्या अधिकाराचा उपयोग करायला विसरूं नका. तुम्हांला जर असें वागतां न आलें तर तुम्ही तो देश सोडून इकडे परत यावें हें उत्तम ' अशा अर्थाच्या शब्दांनीं मँगल्सनें आपल्या भाषणाचा समारोप केला. १८५८ च्या फेब्रुवारीमध्यें लॉर्डांच्या सभेंत जीं भाषणें झालीं त्यांचा रोख सरसकट सर्व बंडखोरांना ठार मारण्याच्या विरुद्ध होता.

**उठावांतले सन्मान्य शत्रु**

या सुमारास इंग्लंडचें प्रधानमंडळ बदललें; पण हिंदी परिस्थिती-संबंधानें जुनेंच धोरण कायम राहिलें. ज्यावर वादाचें रण पुढें थोड्या दिवसांनीं माजलें त्याचा विषय १८५८ च्या मार्च महिन्यांत कॅनिंगनें अयोध्येच्या नबाबशाहींतील तालुकदारांना अनुलक्षून काढलेला जाहीरनामा हा होता. त्या शाब्दिक रणाची माहिती मागें येऊन गेलेली आहे. त्या रणांत लॉर्ड एलनबरोला अधिकारत्याग करावा लागल्याची वाच्यताहि त्या माहितीच्या पोटीं झालेली आहे. नव्या प्रधानमंडळाला नबाबशाहीचें पुनरुज्जीवन कराव-याचें नव्हतें. पण ती शाही नुकतीच ( १८५६ ) नष्ट झालेली असल्यानें

तेथील प्रजा व जमीनदार यांच्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहावें, हे लोक इंग्रजी राज्याचे दीर्घकालीन प्रजाजन नसल्यामुळें त्यांचीं कृत्यें द्रोहाच्या चष्म्यांतून पाहणें उचित नव्हे; त्यांची दंगल ही दोन स्वतंत्र पक्षांतील कायदेशीर लढाई-प्रमाणें समजून नबाबशाहीच्या लोकांना सन्मान्य शत्रूप्रमाणें वागवावें, असा नवीन प्रधानमंडळांतील कित्येकांचा अभिप्राय होता. नबाबशाहीच्या प्रजेला नबाबशाही खालसा झाली हें इंग्रजी कृत्य पसंत नव्हतें. तिच्या नापसंतीला कस्पटाप्रमाणें लेखणें योग्य नव्हे, अशा समजुतीचा त्या अभिप्रायामागें आधार होता. कॅनिंगच्या जाहीरनाम्याचा वाद कांहीं महिने धुमसत होता व त्यांत इंग्लंडांतील राजकीय पक्षभेदाची आंच होती. प्रधानमंडळाचा पुनः पराभव होऊन निवडणुकीपर्यंत वादाची मजल जाऊं नये, अशी काळजी बाळगून दोन्ही पक्ष वाद करीत होते. कालान्तरानें कॅनिंगच्या जाहीरनाम्याला हिंदुस्थानांतील पोक्त, वजनदार व अनुभवी अधिकाऱ्यांचा भरपूर पाठिंबा नाहीं, असें विलायतेस कळल्यावर या वादाला थोडा बहर चढला; पण १८५८ च्या मे महिन्यांत तो बहर फळास यावा, अशी शिपायांच्या उठावाची स्थिति उरलेली नव्हती. दिल्लीचा पाडाव होऊन ८ महिने उलटले होते. गंगा-यमुनेच्या दुआबांत दंगे उद्भवण्याचा संभव असला व मधून मधून दंगे होत असले तरी इंग्रजी राज्याची घडी बसूं लागली होती. मार्च महिन्यांत लखनौ जिंकून इंग्रजांच्या वेगवेगळ्या लष्करी जमावांनीं शिपायांना व त्यांच्या साह्यकर्त्यांना कुठेंहि ठरूं न देण्याची कामगिरी चालविली होती. १८५८ च्या मे महिन्यांत रोहिलखंडांतून खानबहादुरानें पळ काढला होता. लखनौ प्रदेशाच्या व्यवस्थेसाठीं नेमलेले अधिकारी तेथील वतनदारांना जमीन-जप्तीचें भय निवारून इंग्रजी वर्चस्वाखालीं ओढण्याच्या तजविजींत गुंतले होते. त्यांना १८५९ च्या प्रारंभापर्यंत पुरेसें यश आलें नाहीं पण त्यांच्या यशाला १८५८ च्या हिवाळ्यांत सुरुवात झाली होती. हिवाळ्यांत स्वतः सर सेनापतीची स्वारी शिपाई व जमीनदार यांना चोहों बाजूंनीं अडवून नेपाळच्या दिशेनें रेटीत चालली तेव्हां उठावाचे पुढारी व शिपाई इंग्रजांना शरण जाऊं लागले; यामुळें उठावाचें कसेंबसें उरलेलें बळ आणखी हलकें पडत चाललें. वतन-दारांच्या शेतीभातीच्या क्षेत्रफळाचा इंग्रजांच्या नव्या राज्यव्यवस्थेमुळें विशेष संकोच झाला नाहीं; पण त्यांचे किल्ले, हत्यारें वगैरे लढाऊ सामर्थ्याची वाताहत करण्यांत आली. किल्ले इंग्रजांनीं जमीनदोस्त केले, त्यांच्या आसपासचीं दाट

रानें कापून काढलीं आणि सहज किंवा शोधून मिळालीं तेवढीं लहानमोठीं हत्यारें ताब्यांत घेतलीं. उठाव मोडल्यावर सर सेनापतीनें स्वतःच या संबंधांत सादर केलेला आढावा मोठा उद्बोधक आहे.

### हत्यारांची जप्ती

लखनौ काबीज केल्यानंतर इंग्रजांच्या सैन्यानें जी कामगिरी बजावली तिचा आढावा सेनापति कॅम्बेलच्या चरित्रांत दिलेला आहे. 'नबाबशाहीच्या प्रदेशांत दीड लाख माणसें–त्यांत कमींत कमी ३५ हजार तरी शिपाई असावे–ब्रिटिशांच्या शस्त्राला बळी पडलीं. इंग्रजांचा अधिकार जिकडे तिकडे अंमलांत असून नव्यानें उभारलेलीं पोलिसांचीं दलें जनतेमध्यें सुरक्षितपणाचा विश्वास वाढवीत आहेत. प्रत्यक्ष लढाईंत १५० तोफा प्रतिपक्षाकडून हिसकावल्या, परंतु ज्यांचा हिशोब नाहीं अशा आणखी पुष्कळ तोफा आपल्या हातीं पडल्या असून निरनिराळ्या तऱ्हेचीं साडेतीन लाख हत्यारें लोकांकडून गोळा केलीं आहेत व हत्यारांच्या जप्तीचें काम पद्धतशीर चालू आहे. जमीनदार तालुकदारांचे १४०० किल्ले जमीनदोस्त करून त्यावरील ७०० तोफा ताब्यांत घेतल्या आहेत.' अयोध्येच्या नबाबशाही प्रदेशाच्या या माहितीप्रमाणें तत्कालीन वायव्य प्रदेशाची माहिती येथें दिल्यास अनाठायीं होणार नाहीं. हा प्रदेश पंजाबाप्रमाणें एकदम सगळाच्या सगळा पादाक्रांत केला गेला नव्हता. आज कांहीं भाग, उद्यां कांहीं भाग, याप्रमाणें त्यावर इंग्रजांची सत्ता अस्तित्वांत आल्यामुळें तेथील जनतेचीं हत्यारें काढून घेण्याचें काम राहून गेलें होतें. १८५९ मध्यें तें काम शेवटास नेलें तेव्हां निरनिराळ्या जातींच्या ७९५ तोफा, ३०७३७२ बंदुकासारखीं हत्यारें, १४२१२२३ तरवारी, ६६४०१५ भाले, १२१५२७५ सुऱ्या व त्यासारखीं प्राणघातक शस्त्रें. इतकीं शस्त्रें जप्त करून देखील भिन्न भिन्न प्रकारचीं १४ लाख हत्यारें लोकांपाशीं राहून गेलीं, असा इंग्रज अधिकाऱ्यांचा समज त्या प्रदेशाचा ले. गव्हर्नर काल्विन याच्या चरित्रांत नमूद केलेला आढळतो. १८५७ च्या उठावांत या खाजगी हत्याराखेरीज इंग्रजांचीं हत्यारें लोकांना मिळालीं. त्यांची संख्या जमेला धरल्यास लोकांनीं हत्यारें कोठून आणली या प्रश्नाचा निर्णय करतां येतो.

### हिंसेविषयीं इंग्रजांचें समर्थन

कॅम्बेलच्या चरित्रांत नबाबशाही मुलखांमध्यें १८५८ मार्च नंतर किती मनुष्यसंहार झाला, याची गणती सांगण्यांत आलेली आहे. वायव्य प्रदेशां-

तील मनुष्यहिंसेचा हिशोब इंग्रजी ऐतिहासिक साहित्यांत न सांपडला तरी तो प्रचंड असल्याची कल्पना करतां येते. गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या हिंदी माणसांचा जीव घेणें म्हणजे किडामुंगीचा जीव घेण्याचा प्रकार अशी समजूत करून घेऊन इंग्रज सर्वत्र वागत होते. काळा गोरा खिस्ती—मग बायकामुलांपैकीं कोणी असो—त्याला जर शिपाई व त्यांचे जातभाई ठार मारल्याखेरीज राहात नव्हते, तर संशयास्पद काळ्या इसमाला जीवंत ठेवणें योग्य नव्हे हें एकच धोरण सगळ्या इंग्रजांनीं अवलंबिलें होतें. पुष्कळ इंग्रजांना या धोरणाची लाज वाटत होती, परंतु उठावाच्या लढाईत शिपायांनीं व त्यांच्या साथीदारांनीं इंग्रजांबद्दल न्यायबुद्धि किंवा दया दाखवायची नाहीं, असा बाणा अंमलांत आणल्यावर इंग्रजांनीं शिपायासंबंधांत तोच बाणा पत्करणें अवश्य होतें, असें समर्थन अनेक इंग्रजांच्या तत्कालीन लेखनांत पाहायला सांपडतें. 'निरंतर माणसें मारण्याच्या कसावकरणीनें आपल्यांतील माणुसकीचा पूर्ण ऱ्हास झाला आहे' असें हद्दत आपल्या जिव्हाळ्याच्या नातेवाइकांना कळविणारीं बऱ्याच इंग्रजांचीं खाजगी पत्रें सांप्रत उपलब्ध आहेत. पुनः कोणी इंग्रजांकडे वांकड्या नजरेनें पाहण्याला धजणार नाहीं, अशी दहशत जनतेमध्यें उत्पन्न करण्यासाठीं आपल्याला क्रूरपणा आचरावा लागत असल्याबद्दल दुसऱ्या कित्येक इंग्रजांचें मनोगत दृष्टीस पडतें.

### इंग्रजी राज्याचें पुनरुज्जीवन

दिल्लीच्या पाडावापूर्वीं इंग्रजांच्या दराऱ्यामुळें असो वा अराजकाचा कंटाळा आला म्हणून असो, दिल्लीनजीकच्या पंजाबकडील जिल्ह्यांतून इंग्रजांची सत्ता व परिणामीं शांतता स्थापन होत चालली होती. दिल्ली पडल्यावर दुआबांतल्या जिल्ह्यांतून शिपायांचे जमाव पिटाळले जाऊन लोक आपल्या नित्याच्या व्यवसायाकडे वळले. रोहिलखंड, नबाबशाहीचा प्रदेश, बुंदेलखंड, अलाहाबाद बनारसच्या उत्तरेकडील कांहीं जिल्हे यांमध्यें १८५८ च्या मे महिन्यापर्यंत इंग्रजांच्या वर्चस्वाला मूळ धरतां आलें नाहीं. परंतु त्या प्रदेशांतील पुढारी मारले गेल्यामुळें किंवा नेपाळांत पळाल्यामुळें इंग्रजी राज्याचा जम झपाट्यानें बसत चालला. नेपाळांतून शिपाई, त्यांचे साथीदार व पुढारी यांच्या मागावर असलेल्या इंग्रजांच्या फौजांनीं एकदां नेपाळांत शिरून त्यांची दाणादाण उडविली. नंतर नेपाळसरकारनें हिंदी निर्वासितांना आपल्या सीमेंत राहूं न देण्याचा निश्चय केल्यामुळें निर्वासि-

तांच्या व गुरख्यांच्या कटकटी उद्‌भवून त्यांत पुष्कळ भारतीयांचे प्राण गमावले. नेपाळांत भारतीयांची अत्यंत शोचनीय अवस्था झाली होती. न मानवणारी हवा, अन्नवस्त्राची टंचाई, गुरख्यांची प्रतिकूलता इत्यादि कारणांनीं शिपायांनीं आपलीं हत्यारें गुरख्यांना विकून कित्येक दिवस निभावून नेले. परंतु याप्रमाणें हळू हळू सर्वस्वाची हानि झाल्यावर त्यांना स्वदेशांत येऊन इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विसंबणें भाग पडलें. नेपाळच्या हद्दीवर शिपायांचें जें भय होतें, तें १८५९ च्या पहिल्या सहामाहींत मावळलें. त्याच कालावधींत तात्या टोपे व फेरोजशहा यांच्या भराऱ्या थांबून इंग्रजांच्या राज्याला भारतीयांच्या विरोधाचें विघ्न कुठेंच उरलें नाहीं.

**कंपनी राज्याची समाप्ति**

१८५७ च्या शिपाईगर्दीनें ईस्ट इंडिया कंपनीचें राज्य संपलें व इंग्लंडच्या पार्लमेंटामार्फत येथील राज्य चालविण्याची नवी व्यवस्था अंमलांत आली. इ. स. १६०० पासून १८५८ पर्यंत म्हणजे ठोकळ मानानें अडीचशें वर्षांत डच, फ्रेंच, जर्मन, येथील राज्यें, इत्यादिकांशीं लढून कंपनीनें आपला राज्यकारभार आसेतुहिमाचल पसरविला. कंपनीच्या राज्याचा इंग्लंडच्या राजकारणी व्यक्तींना हेवा वाटत असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. त्या राज्यावर ब्रिटिश पार्लमेंटाचें नियंत्रण होतें. १८५३ पर्यंत कंपनीच्या स्वतंत्र राज्याधिकारामध्यें पुष्कळ काटछाट करण्यांत आली होती. कंपनीच्या राज्याचा असा मत्सर इंग्लंडांत शिपायांच्या उठावानंतर एकदम जोरावून कंपनीच्या कारभाराविरुद्ध अतिशय हाकाटी माजली. त्या हाकाटीचा मंद प्रतिध्वनि १८५७ च्या डिसेंबरांत पार्लमेंटांत उठला व पुढें तो वाढत जाऊन कंपनीचा शेवट करणारीं एकामागून एक तीन बिलें पार्लमेंटानें सुमारें सहा महिन्यांच्या चर्चेनंतर पास केलीं. कंपनीच्या चालकांनीं आपल्यावर होणाऱ्या दुरारोपांच्या निरसनाचा कसून प्रयत्न केला, पण तो वायां जाऊन ता. १ सप्टेंबर या दिवशीं कंपनीचें अस्तित्व कायमचें संपलें. १ नोव्हेंबर या दिवशीं व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा हिंदुस्थानांत पुकारला गेला. कंपनीच्या लोपानें भारतीय सामान्य राज्यव्यवस्थेंत विशेष अंतर पडलें नाहीं. लष्करी संघटनेवर मात्र या फेरफाराचा परिणाम घडला. भारतीय जनतेला निराकार कंपनीबद्दल आदर वाटणें शक्य नाहीं. राज्यकर्त्या व्यक्तीबद्दल तिच्या ठिकाणीं पूज्यभाव शेंकडों वर्षांच्या परंपरेनें वसत आलेला असल्यानें त्याचा फायदा महाराणीच्या राज्यकर्तृत्वाला मिळेल, असा एक समज या फेरफाराच्या उलाढालींत दिसतो. तथापि १८५८ मध्यें कंपनीचा कारभार निकालांत निघाला ही वस्तुस्थिति लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

# वि वे च न

## पुढारी

### .... शिपाई

१८५७ सालीं बेंगाल आर्मीच्या शिपायांनीं आपल्याला इंग्रज राज्यकर्ते बाटविणार आहेत, या भीतीनें इंग्रजांविरुद्ध उठाव करून सुमारें सहा महिन्यापासून दोन वर्षांपर्यंत गंगा-यमुनेचा दुआब, रोहिलखंड, नबाबशाहीचा प्रदेश, माळवा, बुंदेलखंड, अलाहाबाद-काशीच्या उत्तरेकडील जिल्हे या भारतीय भूविभागांत इंग्रजी राज्याचें अस्तित्व जवळ जवळ नामशेष करून टाकल्यामुळें त्या घटनेच्या तात्त्विक आणि व्यावहारिक मीमांसेंत या शिपायांचा अग्रगण्यत्वानें उल्लेख करायला पाहिजे. हा हिंदु-मुसलमान शिपाई दुआब, रोहिलखंड व नबाबशाहीचा प्रदेश येथील रहिवासी होता. त्यांतल्यात्यांत हिंदू ब्राह्मण रजपुतांचें प्रमाण अतिशय मोठें होतें. त्यांत पुनः ब्राह्मणाचें माहात्म्य अधिक होतें हें शिपाई-गर्दीच्या विचारांत मुद्दाम लक्षांत ठेवणें अवश्य आहे. धर्महानीच्या भीतीचा त्याच्या हृदयावर पगडा बसल्या-नंतर बेंगाल आर्मीचा शिपाई आपसांत उठावाची भाषा बोलूं लागला; इंग्रजांच्या निःपाताखेरीज तरणोपाय नाहीं, ही कल्पना त्याच्या अंतरंगांत दिवसानुदिवस बळावत गेली; जीवावर उदार होऊन इंग्रजांविरुद्ध उठलें पाहिजे, असा त्याचा निश्चय वाढत चालला; पण उठावाचा संकल्प आधीं कोणी कुठें अंमलांत आणायचा, याविषयीं मात्र या फौजेंत कांहीं बेत ठरल्याचें दिसत नाहीं. एका इंग्रजानें ३१ मे हा उठावाचा दिवस ठरल्याचें लिहिलें आहे तर कलकत्त्यास मार्च महिन्याचा एक दिवस किंवा मे महिन्याची २५ तारीख ( ब्रिटिश राणीचा वाढदिवस ) याप्रमाणें शिपा-यांच्या उठावाबद्दल भिन्न भिन्न बातम्या होत्या. या दिवसांत आणखी वेगवेगळ्या तारखांची भर टाकतां येईल. परंतु ता. १० मे या दिवशीं मीरत

येथें शिपायांच्या क्षोभाचा सामुदायिकरीत्या स्फोट झाला व मागें सांगितलेल्या भूविभागांतील छावण्यांतून तो स्फोट पसरला ही वस्तुस्थिति समोर ठेवूनच त्या उठावाचें कार्यकारण पाहणें श्रेयस्कर आहे.

**क्षोभप्रसाराचीं केंद्रें**

पेशावरपासून बरहॅमपुरापर्यंत पश्चिमपूर्व प्रदेशांत दूरवर हा क्षोभ फैलावण्याचीं साधनें कोणतीं याचा तपास करतांना इंग्रजांनीं शिपायांचा पत्रव्यवहार, तालमीचे आखाडे व त्यांना नव्या हत्यारांचें शिक्षण देणाऱ्या संस्था अशीं तीन साधनें नमूद केलीं आहेत. नव्या हत्यारांच्या शिक्षणाचीं केंद्रें हिंदुस्थानांत कांहीं निवडक ठिकाणीं होतीं. तेथें वेगवेगळ्या शिबिरांतील सैनिकांचे हुशार प्रतिनिधि शिकायला पाठवायचे व ते शिकून तरबेज झाल्यावर त्यांनीं आपल्या छावण्यांतील शिपायांना त्या हत्याराच्या उपयोगाची दीक्षा द्यावयाची या व्यवस्थेमुळें प्रस्तुत केंद्रस्थानीं एकत्र आल्यावर आपसांत एकमेकांच्या सुखदुःखांचें हितगुज करायला जी सवड असे तिचा फायदा घेऊन सदर प्रतिनिधींनीं धर्महानीचा विश्वास सगळीकडे सैनिकांत पसरविला, असें कित्येक इंग्रजांचें मत दृष्टीस पडतें. सैनिकांच्या आखाड्यांचे वस्ताद (त्यांना खलीफा म्हणत) धर्महानीच्या कल्पनेचा प्रसार करीत असावे, हा शोध पंजाबांतील इंग्रज अधिकाऱ्यांचा आहे. १८५७ च्या जानेवारी महिन्यांत चरबीदार काडतुसाबद्दल बोभाटा होऊन शिपायांमध्यें उद्वेग उद्भवल्याचीं लक्षणें उघडकीस आल्यानंतर त्यांचा पत्रव्यवहार नजरेखालीं घालण्याला अधिकाऱ्यांनीं आरंभ केला व त्यांत हीं काडतुसें झिडकारणें अवश्य, मग परिणाम कांहीं होवो, अशा अर्थाचा उपदेश प्रामुख्यानें दिसून येत होता. परंतु इंग्रजी राज्य उलथून पाडण्याच्या कटाचा—पर्यायानें आपलें राज्य स्थापन करण्याच्या संकेताचा पक्का संशय येण्यासारखा मजकूर बहुधा या पत्रांतून नसल्यानें सैनिकांच्या कटाची कल्पना अनेक बड्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं स्वीकारलेली नाहीं. बरहॅमपूर-बराकपूरचीं प्रकरणें निकालांत निघून पलटणींची बडतर्फी अनुभवल्यावर हळू हळू सगळ्या सैनिकांवर तसाच प्रसंग ओढवणार, या धास्तीमुळें इतःपर स्वस्थ बसणें उचित नव्हे, अशी प्रेरणा शिपायांत उसळली. या वेळीं नोकरीवर लाथ मारून मोकळे होण्याचा उपाय बेंगाल आर्मीसमोर होता. तसें कित्येक ठिकाणीं इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्यांना सुचविलेंहि होतें व बऱ्याच ठिकाणीं तो मार्ग प्रत्यक्ष हकालपट्टीच्या रूपानें

शिपायांच्या अनुभवास आला होता. परंतु चारपांच पिढ्यांची शिपाईगिरी सोडायची म्हणजे पर्यायानें बेकारी पत्करून त्या पेशाच्या सुखाला व सवलतींना मुकायचें, याची जाणीव शिपायांना होती. अर्थात् नोकरीला रामराम ठोकण्याचा मार्ग शिपायांनीं टाळावा यांत आश्चर्य नाहीं. त्यापेक्षां इंग्रजांचें वर्चस्व नाहींसें करण्याच्या आकांक्षेला एकंदर स्थिति अनुकूल असल्याचें शिपायांतल्या चौकस चळवळयांना माहीत होतें. दिल्ली ते कलकत्ता या टापूंत गोरे सैनिक थोडे आहेत; क्रिमिया, इराणमध्यें गेलेली गोरी फौज परत आलेली नाहीं, अर्थात् इंग्रजी वर्चस्वाला धक्का देण्याला हीच अनुकूल संधि आहे, असें शिपायांतील चळवळयांच्या मनानें ठरविलें होतें. 'इंग्रज नको' हा शिपायांचा निश्चय मीरतला ता. १० मे रोजीं कृतींत उतरला. पण त्या निश्चयांतला एक महान् दोषदेखील त्याच दिवशीं स्पष्ट झाला. 'इंग्रज नको' या निश्चयामध्यें 'पुढें काय' या प्रश्नाचें योजनाबद्ध निर्णयात्मक उत्तर नव्हतें, हाच तो दोष होय.

### इंग्रजांचा वचक

'इंग्रज नको' या निश्चयांत इंग्रजांच्या राज्याऐवजीं स्वराज्य स्थापण्याची योजना मीरतच्या शिपायांच्या जवळ असती तर त्यांनीं आधीं शेजारच्या गोऱ्या फौजेशीं लढून तिचा पराभव करायला हवा होता. सामान्य इंग्रज अधिकारीच नव्हे तर गोऱ्या सैनिकांचे जमाव मागें ठेवून दिल्लीस घाईघाईनें निघून जाणें याला स्वराज्य स्थापन करण्याचें लक्षण समजतां येत नाहीं. मीरतची गोरी फौज सुरक्षित राहिल्यानें तीच पुढें सुमारें तीन आठवड्यांनीं दिल्लीवर चालून जाऊं शकली. मीरतला शिपायांची संख्या गोऱ्यांच्या बरोबरीची होती. पण त्या फौजेच्या वाटेस न जातां तडक दिल्लीची वाट उठावाच्या शिपायांनीं धरावी, ही गोष्ट सहज उपेक्षा करण्यासारखी नाहीं. मीरतच्या शिपायांना दिल्लीचे शिपाई मिळाल्यावर त्यांची संख्या आणखी वाढली तरी हे सर्व शिपाई तेथेंच राहिले; त्यांना मीरत, अंबाला या ठिकाणीं चढाईनें चालून जावेंसें वाटलें नाहीं ही गोष्ट शिपायांच्या इंग्रजद्वेषांतील कमकुवतपणावर प्रकाश टाकणारी आहे. गोऱ्यांच्या पराक्रमाचा शिपायांना दरारा वाटत होता, असें मानल्याखेरीज—व तसें मानायला लावणारीं उदाहरणें पुष्कळ आहेत—दिल्लींतील शिपायांच्या निष्क्रियतेचा उलगडा करणें कठिण

ओह. समोर आलेल्या किंवा आपल्या गराड्यांत सांपडलेल्या गोऱ्या अंमलदारांना व त्यांच्या बायकामुलांना मारल्याच्या कृत्यानें वरील निष्क्रियतेचें समर्थन होत नाहीं. किंबहुना बायकापोरांच्या प्रस्तुत हत्याकांडांत पुरुषार्थाचा गुण नसल्याचें दृष्टीस पडणारें आहे. मीरतच्या शिपायांनीं आपले व्यवसायबंधु कैदेंतून सोडवितांना इतर शेंकडों गुन्हेगार कैद्यांना मोकळे केल्यानें लुटालूट, जाळपोळ व थोड्याशा प्रमाणांत इंग्रजांचा वध या तीन अत्याचारांच्या तावडींत मीरत सांपडलें. हा प्रकार स्वराज्यसिद्धीच्या व्यवहारांत समावणारा नाहीं. जें मीरतला घडलें त्याचा कित्ता सगळीकडे शिपायांनीं गिरविला, हें पूर्वीं निदर्शनास आणलेलें आहे. इंग्रजाचें प्रभुत्व झुगारणाऱ्या शिपायांनीं उठावें, लुटावें, वाटल्यास किंवा सोयीनें साधल्यास इंग्रजांना मारावें किंवा इंग्रजांना मागें ठेवून दिल्लीस जावें असा त्यांचा सामान्यतः कारभार होता. दिल्लीस जातांना वाटेंत कुठें गोऱ्यांची गांठ पडूं नये एवढेंच नव्हे तर गोऱ्यांच्या नेतृत्वाखालीं जवळून जाणाऱ्या काळ्या पलटणीशीं सुद्धां संबंध टाळावा, अशीहि शिपाई काळजी घेत असल्याचे दाखले आहेत. हे दाखले शिपायांच्या मनोराज्याविषयीं जिज्ञासूला साशंक करून सोडतात.

### धर्महानीचा कस

शिपायांना वाटणारें धर्महानीचें भय सर्वांच्या ठिकाणीं सारख्या तीव्रतेचें नव्हतें, हा चमत्कार विचारांत घेण्याजोगा आहे. ता. २९ मार्चला मंगल पांडे यानें दुपारीं आपल्या पलटणींत गडबड माजविली. त्याला धरूं पाहणाऱ्या दोघा इंग्रजांना शस्त्र चालवून त्यानें घायाळ केलें. बाकीचे शिपाई एक प्रकारें ही मौज पाहात होते. मंगल पांडे त्यांना आपल्या मदतीकरितां धर्माच्या नांवानें हाक देऊन बोलावीत होता, परंतु प्रत्यक्षपणें त्याच्या साह्याला कोणीच धजून गेला नाहीं. नाकेदार ईसरी पांडे यानें तटस्थ राहून अप्रत्यक्ष स्वरूपाची मदत केली. नंतर त्यांच्या गुन्ह्याची लष्करी कोर्टांत जी चौकशी झाली त्या कोर्टाचे सभासद गोरे असते तर त्याचें आश्चर्य वाटलें नसतें. ते सर्व सभासद सुभेदार—मेजर, सुभेदार यासारखे एकजात हिंदु व मुसलमान होते; त्यांत पुनः हिंदु बहुसंख्य दिसतात. १५ सभासदांपैकीं अवघे तीनच मुसलमान होते. मंगल पांड्याच्या ३४ व्या पलटणीचा एक सुभेदार या मंडळांत पाहिला म्हणजे त्या पलटणींत सर्वांमध्यें धर्महानीचें भय सारखें तीव्र नव्हतें, याबद्दल

संशय राहात नाहीं. या सभासदांनीं मंगल पांड्याला फांशीची शिक्षा सुनावली. धर्माच्या अभिमानानें ज्या शिपायानें उठावाचा धडा घालून दिला त्याचा खटला चालविण्याचें किंवा शिक्षा देण्याचें काम न्यायपीठाच्या हिंदु मुसलमान सदस्यांनीं नाकारलें असतें तर ते चरबीदार काडतुसानें खवळलेल्या धर्माभिमानाला जागले असें समजण्याला जागा होती. परंतु त्यांनीं मंगल पांड्याच्या साहसी धर्माभिमानाला डोळ्याआड ठेवून आपलें काम बजावलें. ईसरी पांड्याच्या खटल्याचा वृत्तान्त थेट याच थाटाचा आहे. या चमत्काराचा आणखी एक अंश असाच विलक्षण आहे. ज्या ३४ व्या पलटणींतून मंगल व ईसरी पांडे हे दोघे धर्मवीर पुढें आले त्या पलटणीच्या दुसरी, तिसरी व चौथी अशा तीन तुकड्या चितागांवास होत्या. बराकपुराची हकीकत समजल्यावर त्यांनीं ताबडतोब 'आपण राज्यनिष्ठ आहों, सरकार आमच्या धर्मांत ढवळाढवळ करणार नाहीं अशी आमची खात्री आहे, आम्हांला बराकपुरांत दोघां जणांनीं केलेल्या लज्जास्पद कृत्याचा अतिशय खेद वाटतो,' वगैरे आशयाचा अर्ज पाठविण्याला दिरंगाई केली नाहीं. या अर्जामागें इंग्रज अधिकाऱ्यांची प्रेरणा होती म्हणून त्याला महत्त्व देणें उचित नव्हें, असें कदाचित् म्हणतां येईल; पण त्या तीन तुकड्यांचे शिपाई अर्ज करण्याला प्रवृत्त व्हावे यावरून त्यांच्या धर्माभिमानाची व धर्महानीच्या भयाची तीव्रता अजमावतां येते हें विसरून चालणार नाहीं. या तुकड्यांची इंग्रजनिष्ठा या अर्जानंतर सहा महिन्यांनीं एकाएकी खंगून त्यांनीं छावणी सोडली ही शिपायांच्या वर्तनाची आणखी एक निराळी मौज लक्षांत ठेवण्याजोगी आहे. या तुकड्या मधल्या काळांत वाढलेल्या इंग्रजी सामर्थ्यानें चिरडून टाकल्या.

## शिपायांच्या उठावांतील धरसोड

मंगल व ईसरी पांडे यांना बराकपुरास असलेल्या सर्व हिंदी शिपायांदेखत फांसावर चढविण्यांत आलें. त्याचप्रमाणें या दोघांची ३४ वी पलटण सर्वांसमक्ष बडतर्फ करून हाकलली. त्यापूर्वीं बरहॅमपुराच्या पलटणीची तशीच वाट लावली होती. धर्म बुडतो म्हणून काडतुसें नाकारणाऱ्या व हत्यार चालविण्याला मूक संमति असणाऱ्या पलटणींचा अशा रीतीनें होणारा निकाल थंडपणें डोळ्यांनीं पाहणाऱ्या शिपायांच्या धर्माभिमानाचा कस या माहितीवरून ठरवितां येईल. हिंदी पलटणींच्या शिक्षा अंमलांत आणतांना

थोडेसे गोरे सैनिक शिक्षेच्या जागीं हजर ठेवण्याची पद्धत होती. हिंदी शिपाई शिक्षेच्या वेळीं बिथरल्यास त्यांना ठोकण्याकरितां गोऱ्या सैनिकांची योजना असे, हें हिंदी शिपायांना माहीत होतें. गोऱ्या सैनिकांसमोर हिंदी शिपायांना गडबड करवत नाहीं, याची जाणीव इंग्रजांना होती. जेव्हां धर्महानीच्या भीतीनें हिंदी शिपाई ग्रासले गेले नव्हते तेव्हां त्यांनीं गोऱ्या सोजरांसमोर नमतें घ्यावें हें कदाचित् योग्य समजतां येईल, पण धर्मासाठीं तळहातावर शीर घेऊन हत्यार चालविण्याचा संकल्प ज्यांनीं कटानें केला असें सांगितलें जातें त्यांनीं सोजरांना व त्यांच्या तोफांना भ्यावें ही स्थिति शिपाई-गर्दीचा स्वातंत्र्याच्या दृष्टीनें विचार करणारांना बुचकळ्यांत टाकणारी आहे. इंग्रजांचा नाश करणें हेंच ज्यांचें इतिकर्तव्य होतें, त्यांनीं शिक्षेच्या वेळीं बंदोबस्तासाठीं येणाऱ्या सोजरांच्या वरचढपणाला आपल्या थंडपणानें मान्यता द्यावी हें विचित्र वाटलें तरी वस्तुस्थितीला धरून आहे. एवढ्यानें बराकपुराच्या शिपायांच्या वागणुकीचा पाढा संपत नाहीं. तेथें ४३ व ७० क्रमांकाच्या आणखी दोन पलटणी होत्या. ३४ वीची हकालपट्टी केल्यावर या पलटणींचीं हत्यारें काढून घेतलीं. मात्र त्यांना छावणींत राहूं दिलें. ‘तुम्ही इमानदार शिपाई असल्या-बद्दल सरकारची खात्री असली तरी सर्वत्र शिपायांचा उठाव माजल्यावर तुम्हांला त्यांत शिरण्याचा मोह होऊं नये म्हणून हत्यारापासून दूर ठेवण्याची खबरदारी सरकार अंमलांत आणीत आहे’ अशी या पलटणींची अधिकाऱ्यांनीं समजूत घातली. नंतर शिपाई समाधानानें राहिले. परंतु ‘एकदां आम्हांस दिल्लीला पाठवा, आम्ही तेथें लढून आमची निष्ठा सिद्ध करूं’ अशी ७०व्या पलटणीनें मागणी करून पाहिली. या पलटणीच्या इमानाबद्दल स्थानिक सेनापतीचा पूर्ण विश्वास होता. त्याच्या शिफारसीवरून स्वतः कॅनिंग त्या पलटणीला भेटला. त्यानें त्या पलटणीच्या शिपायांची प्रशंसा केली व योग्य वेळीं तुमच्या निष्ठेचें चीज केलें जाईल असें आश्वासन दिलें. बड्या लाटसाहेबाच्या भेटीचा व भाषणाचा लाभ ७० वीला मिळाला म्हणून ४३ व्या पलटणीला तिचा हेवा वाटला. ही ७० वी पलटण पुढें परदेशांतील धर्महानीचें भय सोडून चीनमध्यें गेली. बरहॅमपुरांतील बडतर्फ पलटणीच्या शिपायांनीं पोलिस-खात्यामध्यें नोकरी धरली, वगैरे माहिती उठावाच्या वाङ्मयांत पाहिल्यावर शिपायांच्या १८५७ मधील अंतरंगाचा बिनचूक थांग लावण्याचें काम अवघड वाटतें. मागें निवेदलेल्या वृत्तान्तामध्यें शिपायांच्या ठिकाणीं सर्वत्र उठावाविषयीं

एकवाक्यता नव्हती, याचीं कितीतरी उदाहरणें दिसतील. सागर येथील ३१ व्या व ४२ व्या पलटणींचा वेबनाव सहज ध्यानांत येणारा आहे. लखनौस असाच प्रकार १३व्या पलटणींच्या बाबतींत इंग्रजांच्या अनुभवास आला. तेथें इंग्रजांनीं या पलटणीच्या शिपायांना कोंडीच्या आघाडीवर ठेवलें होतें; परंतु ते शेवटपर्यंत इंग्रजांच्या बाजूनें लढले. शिपाईगर्दीच्या वाङ्मयांत शिपायांच्या असल्या वर्तनाचे आणखी पुष्कळ मासले पाहायला सांपडतात.

मीरतचा वृत्तान्त असाच विस्मयजनक आहे. तेथें रिसाल्याच्या ८५ जणांनीं आज्ञाभंगाचा गुन्हा केला. त्याची चौकशी ज्या न्यायपीठापुढें झाली त्याचे बहुसंख्य सभासद हिंदु होते. त्यांनीं सदर ८५आरोपींना कैदेची शिक्षा फर्माविली. ता. ९ मे रोजीं त्या शिक्षेची अंलमबजावणी पाहण्याला हे सभासद कवाइतीच्या मैदानावर दुसऱ्या पलटणीबरोबर उपस्थित होते. ज्यांना शिक्षा झाली, त्यांच्या चेहऱ्यावर उद्विग्नता पसरली असली तरी दुसऱ्या पलटणीचे शिपाई असे शान्त होते कीं या शिक्षेच्या माहिती-पत्रकांत त्यांच्या भल्या वर्तनाचा वरिष्ठ अधिकाऱ्याला मुद्दाम उल्लेख करावासा वाटला. त्यांची ता. १० ला उठाव करण्याइतकी मनःस्थिति क्षुब्ध झालेली नव्हती म्हणून ते ता. ९ ला जणूं काय विशेष कांहींच घडत नसल्याप्रमाणें अगदीं स्वस्थ राहिले, अशी कल्पना केल्याशिवाय या दोन दिवसांतल्या वर्तनाच्या अंतराचें गूढ उकलतां येत नाहीं. मीरतला ११, २० या क्रमांकाच्या दोन पायदळ पलटणी व ३ऱ्या क्रमांकाचें घोडदळ, अशी हिंदी फौज होती. ता. १० मेच्या दिवशीं गर्दीच्या वेळीं ११ व्या पलटणीचे शिपाई आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांच्या बचावाचा यत्न करीत असतां २०व्या पलटणीच्या शिपायांनीं त्यांवर गोळ्या झाडल्या तेव्हां त्यांनीं अधिकाऱ्यांना निघून जाण्यास सांगितलें व नंतर ते गर्दींत मिसळले. तथापि ११ व्या पलटणीचे २५ शिपाई आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांबरोबर राहिले. २० व्या पलटणीचे जे शिपाई कचेऱ्यांच्या पहाऱ्यावर होते त्यांनीं आपला पहारा सोडला नाहीं. मीरतच्या उठावाचा ज्यांना सामान्यतः पुढाकार दिला जातो त्या घोडदळाचे ५० स्वार आपल्या अधिकाऱ्यांचे प्राण वांचवून त्यांसह इंग्रज वरिष्ठांकडे दुसऱ्या दिवशीं आले. 'मारो फिरंगी' ही ज्यांची एकमुखी व एकसुरी घोषणा होती असें कोणी आग्रहानें सांगतात त्या शिपायांचे शें-सव्वाशें सोबती याप्रमाणें उठावाबाहेर पडावे, या अनुभवावरून मीरतच्या मुख्य लष्करी अंमलदारानें आपल्या

अहवालांत असा निष्कर्ष लिहिला आहे कीं, आपलीं हत्यारें काढून घेण्याचा इंग्रजांचा उद्देश आहे या बातमीनें शिपाई खवळले. संध्याकाळीं प्रार्थना-मंदिराकडे निघालेल्या सोजरांच्या कवाइतीमुळें त्या बातमीला शिपायांच्या दृष्टीनें दुजोरा मिळाला व त्यांनीं दंगा केला. दंग्याचा बेत आधींपासून निश्चित झालेला नसावा. या इंग्रजनिष्ठ शिपायांनीं पुढच्या काळांत पोलिसांचें काम उत्तम प्रकारें बजावलें. मीरतचें सामान्य लोक त्यांची निर्भर्त्सना करीत असत व पुष्कळदां आपल्या कामगिरींत कित्येकांवर मरण ओढवलें तरी त्या शिपायांनीं आपलें इमान सोडलें नाहीं, हा त्यांच्या वर्तनाचा इंग्रजांनीं वर्णिलेला विशेष मुद्दाम ध्यानांत ठेवण्याजोगा आहे.

शिपायांच्या उठावांत त्यांच्या वागणुकीचीं वरच्यासारखीं कितीतरी कोडीं आहेत. २० व्या क्रमांकाच्या पायदळाचें एक पथक मुजफरनगरास होतें. ता. १३ मेला तें इंग्रजाची नोकरी झुगारून मुरादाबादेस जात असतां तेथील २९ च्या पलटणीचे कांहीं लोक व ३० स्वार घेऊन एका अधिकाऱ्यानें त्यांना गांठलें व चोपलें. २० वीच्या पथकाचे ८ लोक ठार पडले. बाकीचे रात्रीच्या काळोखांत बचावले. नंतर २९ वें पायदळ उठावांत शिरलें. ९ वें पायदळ इटावा, मैनपुरी, बलंदशहर इत्यादि जिल्ह्याच्या ठिकाणीं विभागलें होतें. त्यानें उठाव करून दिल्ली गांठली. तेथें त्याचें इतर पलटणींशीं जमेना म्हणून तें दिल्लीच्या ब्रिटिश छावणींत इंग्रजाला शरण गेलें. ३ ऱ्या पायदळानें ७ जूनला उठावांत प्रवेश केला. पण त्यापूर्वीं फिलोरहून अंबाल्यास या पलटणीच्या लोकांनीं दारूगोळा बिनतक्रार पोंचविला. उठावाच्या आधीं एक दोन दिवस त्यांच्या पगाराची रक्कम हवालदारांच्या हवालीं केली होती. शिपायांच्या वागणुकींत चलबिचल पाहून ती रक्कम अधिकाऱ्यांनीं परत घेतली व हवालदारांनीं ती दिली. उठावाचें मंगलाचरण सरकारी खजिन्याच्या लुटीनें करणाऱ्या शिपायांनीं आयती हातांत पडलेली रक्कम मुकाट्यानें परत केली, याचें गूढ वाटल्याशिवाय राहात नाहीं. बिजनोरचा खजीना मीरतला बरोबर फक्त एकच पोरसवदा इंग्रज अधिकारी असतां ज्यांनीं बिनतक्रार पोचविला ते शिपाई नंतर थोड्याच दिवसांनीं उठावांत मिसळले, हें शिपायांच्या वर्तनांतील धरसोडीच्या गूढाचें दुसरें उदाहरण आहे. लाहोरजवळच्या मीयामीर छावणींत अवघ्या २५० (किंवा ५००) गोऱ्या सैनिकांसमोर दोन अडीच हजार शिपायांनीं बिनतक्रार हत्यारें टाकलीं व पुढें दोन महिन्यांनीं पळ

काढून आपला सर्वनाश करून घेतला. अंबाला येथील ५ व्या व ६० व्या पलटणीपैकीं इमानदारांना २७ ऑगस्ट रोजीं उठावाची लहर आली व त्यांच्यांतल्या बहुतेकांची कत्तल उडाली. फेरोजपुराच्या ४५ व्या पायदळाचा १० व्या हिंदी घोडदळाच्या स्वारांनीं पाठलाग केला तेव्हां पळण्याच्या सोयी-साठीं शिपायांनीं हत्यारें फेकून पांगून वेगवेगळ्या वाटा धरल्या. हे बहुतेक सारेजण इंग्रजांना पकडतां आले. ता. १५ मेला ज्यांनीं ४५ व्या पायदळाची दाणादाण उडविली तें स्वार ऑगस्ट १९ ला बिघडून दिल्लीस गेले. तरी त्यांतले १०० जण इंग्रजाला चिकटून राहिलेच. दोन भिन्न स्थळीं विभाग-लेल्या पलटणीच्या एका विभागांत इंग्रजद्वेषाचें वारें संचरावें व दुसरीकडील विभाग त्यापासून अगदीं अलिप्त राहावा, अशीं उदाहरणें पाहिल्यास शिपायांच्या उठावाचें एकहि कारण सयुक्तिक व सुसंगत असल्याची खात्री पटत नाहीं. पायदळ घोडदळासारखाच हिंदी तोफखान्याचा प्रकार होता. होशियारपूर येथील तोफखाना शेवटपर्यंत इंग्रजाच्या चाकरींत राहिला. मुलतान येथील तोफखान्याच्या देशी कंपूनें हिंदी पायदळांचीं हत्यारें काढून घेण्याला मदत केली व ३१ ऑगस्ट रोजीं उठावणी करून स्वतःला काळाच्या जबड्यांत लोटलें. जुलईनंतर इंग्रजाचें सेनाबळ वाढत गेल्यानें त्यानंतरच्या कोणत्याहि ठिकाणचा उठाव तत्काळ ठेंचून काढण्याची शक्यता उत्पन्न झाली होती.

### शिपाई व खजीने

धर्माच्या निष्ठेनें इंग्रजांविरुद्ध जीव पणास लावून उठलेल्या शिपायांचा द्रव्यविषयक व्यवहार मुद्दाम नजरेखालीं घालून ठेवण्यासारखा आहे. फत्ते-गडच्या १० व्या पायदळानें खजीना हालविण्याखेरींज अधिकाऱ्यांचे इतर सर्व हुकूम अंमलांत आणले. तुरुंगांतली बंडाळी मोडली, नदीवरील रहदारी बंद पडावी म्हणून पूल मोडून टाकला. ४१ व्या पलटणीकडून आलेलें द्रोहाचें पत्र अधिकाऱ्यांच्या हातीं दिलें. १८ जूनपर्यंत अशीं कामें बजावतां बजावतां जेव्हां ४१ व्या पलटणीचे शिपाई जवळ आले तेव्हां खजीना लुटून उठावाचें निशाण या पलटणीनें उभारलें. ४१ व्या पलटणीचा या खजीन्यावर डोळा होताच. त्यामुळें या दोन पलटणींत मारामारी होऊन उभयपक्षीं थोडीशी प्राणहानि झाल्यावर ही मारामारी थांबली. ४१ वीच्या शिरजोरीपुढें सदैव नमून वागण्याची इच्छा नसलेले १० वीचे पुष्कळसे शिपाई आपल्या वांट्यास आलेलें द्रव्य घेऊन घरीं जाऊं लागले. मार्गांत

त्यांना खेड्याच्या लोकांनीं लुटलें. खेड्यांच्या प्रतिकारांत पुष्कळ जणांनीं प्राण गमावले. अखेरीस जे उरले त्यांतल्या कांहींनीं ४१ व्या दळावरोबर राहून फरुक्काबादेच्या नवाबाची नोकरी धरली. कांहींनीं नानासाहेबांच्या लष्कराची संख्या वाढविली. आझमगड गोरखपुरांतील शिपायांच्या उठावाचा असाच वृत्तान्त आहे. दोन्ही जागचा मिळून १७ लाखांचा खजीना होता. तो बनारसला पाठविण्याच्या वेळीं शिपायांनीं उठाव केला. खजीना घेऊन हे शिपाई फैजाबादला जातांच तेथील २२ व्या पलटणीच्या लोकांनीं त्या द्रव्याचा बांटा मागितला. ही त्यांची मागणी हातघाईवर आली तेव्हां एक लाख साठ हजार एवढी रक्कम त्यांच्या पदरांत टाकून आझमगडच्या शिपायांनीं कानपूरचा मार्ग स्वीकारला. सिआलकोटच्या शिपायांनीं खजीना व शहरबाजार लुटण्यांत इतका वेळ घालविला कीं, इंग्रजांना त्यांच्यावर चालून जाण्याला भरपूर सवड मिळाली, असें इंग्रज लेखकांचें मत आहे. निकल्सननें त्यांना अडवून त्यांचा फडशा पाडला. 'सर्वारंभास्तण्डुलाः प्रस्थमूलाः' या सुभाषितानुसार शिपायांच्या लुटीची तरफदारी कदाचित् करतां येईल. पण आपसांतील कलह किंवा त्यापायीं आत्मघात हे परिणाम पाहिले म्हणजे ही लूट केवळ स्वार्थाची होती कीं एखाद्या लोकोद्धारक सत्कार्याच्या निर्वाहासाठीं होती या प्रश्नांचा निर्णय पहिल्या शंकेच्या बाजूस झुकतो, असें कबूल करावें लागेल.

### दिल्लीची बेबंदशाही

मीरतचे शिपाई दिल्लीस गेले. दिल्लीच्या बादशाहीचें पुनरुज्जीवन केल्यास आपोआप नवें राज्य उदयास येईल अशी शिपायांची भाबडी समजूत होती. ही समजूत शिपायांच्या राजकारणविषयक ज्ञानाचा कोतेपणा निदर्शनास आणणारी आहे. सैन्य हें राज्याचें मुख्य सामर्थ्य असलें तरी त्या सामर्थ्याचा उपयोग करणारें दूरदर्शी व्यापक बुद्धिमत्तेचें भांडवल शिपायांच्या उठावांत नव्हतें. ही उणीव नाहींशी करण्याचा त्यांचा उद्देश बहादुरशहाला बादशहा बनविल्यानें सिद्धीस जाण्याची आशा व्यर्थ ठरण्याला उशीर लागला नाहीं. बहादुरशहा हा कुंकवाचा धनी म्हणतात, त्यासारखा केवळ नांवाचा बादशहा होता. शिपायांनीं जें कारभारी मंडळ अस्तित्वांत आणलें, त्याच्या व्यवहारांत बहादुरशहाकडे कसलाच अधिकार नव्हता. शिपाईच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुसमर्थ होते. बहादुरशहाची दुबळी पुण्याई केव्हां तरी प्रसंगविशेषीं

शिपायांनीं आपल्या गरजेप्रमाणें वापरली. मुसलमान मुल्लामौलवींनीं जीहादचें निशाण उभारल्या वेळीं त्या संबंधाचें हिंदूंचें भय त्यानें निवारलें; बक्रेइदीच्या सणांत गोवध होऊं दिला नाहीं; शहरांत शिपायांनीं जुलूम-जबरदस्ती करूं नये, या दृष्टीनें बहादुरशहा निष्फळ धडपड करीत होता. सण सोडल्यास दुसऱ्या वेळीं गोवध करून मुल्लामौलवींनीं हिंदुमुसलमानांमध्यें वैमनस्य माजविल्याच्या बातम्या इंग्रजी वार्तासंग्रहांत आलेल्या आहेत. साधारणपणें शिपायांपुरती हिंदुमुसलमानांत एकजूट होती. तिच्या योगानें दिल्लीस व अन्यत्र हिंदुमुसलमान सैनिकांत धर्मभेदानिमित्त रक्तपात घडला नाहीं, असें म्हणतां येतें. वर्षानुवर्षे एका शिस्तींत जुटीनें वाढलेले व या वेळीं इंग्रजांशीं लढण्याच्या प्रसंगांत गुंतलेले शिपाई धर्मभेदाच्या आहारीं गेले नाहींत हें स्वाभाविक होतें. परंतु हे शिपाई दिल्लीच्या रहिवाशांशीं दंडेलीनें वागत होते, याचा इंग्रजांनीं किंवा त्यांच्या नोकरींतल्या लोकांनीं लिहून ठेवलेला नव्हे तर स्वतंत्र व्यक्तींनीं ग्रथित केलेला पुरावा उपलब्ध आहे. १८५७ मध्यें बहादुरशहाचा विश्वासू सल्लागार समजला जाणारा फजले हक खैराबादी यानें अंदमान बेटांत शिक्षा भोगीत असतां जें अरबी भाषेंत आत्मचरित्र लिहिलें त्याच्या उर्दू अनुवादाचा मराठी सारांश ता. १५-८-१९५७ च्या लोकमान्य विशेषांकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील पुढचा उतारा शिपायांच्या स्थितीची आणि वागणुकीची कल्पना करून देणारा आहे—' दिल्लींतील शिपाई निरनिराळ्या टोळ्यांमधून वाटले गेले होते. कांहीं तुकड्यांना पुढारी नव्हता. कांहीं तुकड्यांना राहण्यास जागा नव्हती. कांहीं तुकड्यांची अक्षरशः उपासमार चालली होती. कांहीं तुकड्यांतील लोक अनैतिक आचरण करूं लागले. कांहींनीं रणांगणावर जाणें सोडून दिलें. पण फौजेचा एक मोठा भाग शत्रूंशीं शौर्यानें लढत राहिला. ( पान ४ ).

या उताऱ्यांतील ' शिपायांचें अनैतिक आचरण ' हे तीन शब्द अतिशय व्यापक अर्थाचे असून त्या अर्थाचा संक्षेप या शब्दांनीं साधला आहे. शिपाई धनिकांचीं घरें लुटीत होते, खून करीत होते. परंतु त्यांच्या लुटींतून स्त्रिया सुटल्या नाहींत, ही स्पष्टता मूळच्या शब्दांत भरलेली आहे. कुणाला पुढारी नाहीं, कुणाची उपासमार चाललेली, कोणाला राहायला जागा नाहीं, कोणी रणांगणाकडे पाठ फिरविलेली; असे शिपाई बेशिस्तपणानें मन चाहील तसा धिंगाणा दिल्लीस घालीत असतील, हें सहज समजण्यासारखें आहे. हा

धिंगाणा आवरण्याची जबाबदारी सकृद्दर्शनीं ज्याच्यावर तो बादशहा खैराबादीच्या मतानुसार 'वृद्ध, निरुत्साही व अननुभवी' असून 'आपली बायको जीनत महल आणि वजीर अहसनुल्लाखान यांच्या पूर्णपणें कह्यांत होता.' खैराबादीनें बादशहाला नालायक ठरवून शिपायांच्या अव्यवस्थित वागणुकीचें खापर त्याच्या डोक्यावर फोडलें आहे. तथापि शिपायांची शिरजोरी विसरतां येत नाहीं. लढण्याचा भार जर शिपायांनीं उचललेला तर त्यांनीं शिरजोरी गाजवावी हें देखील स्वाभाविकांत मोडणारें आहे. मात्र या दोघांसमोर जो प्रसंग होता त्याकडे लक्ष दिल्यास बादशहा व शिपाई हे दोन्ही पक्ष सारखेच नालायक ठरतात. इंग्रजांचें निर्मूलन हें ध्येय दोन्ही पक्षांच्या ओढाताणींत गळाठलें व इंग्रजांच्या सरशीपुढें दोघांचा बळी पडला. ज्यांनीं इंग्रजाचें राज्य बुडवून स्वराज्य स्थापण्याची आशा धरली, ते दिल्लीच्या नागरिकांना आपल्याकडे वळवूं शकले नाहींत. 'दिल्लींतील हजारों नागरिक इंग्रजाचे पक्षपाती होते. मुसलमानांतहि दोन तट पडले होते.' अशी फजले हक खैराबादीची साक्ष आहे. दिल्लींत इंग्रजांनीं आपल्या हेरांचें जाळें पसरलें होतें. त्यांना दिल्लींतल्या घडामोडींची वित्तंबातमी समजत होती; हें इंग्रजांच्या अनुकूलतेची जनता दिल्लींत असल्याचें प्रमाण आहे. शिपायांनीं बादशहाकडे आपलें नेतृत्व दिलें, बादशहानें तें नेतृत्व स्वीकारलें, पण बादशहाला शिपाई कह्यांत ठेवतां आला नाहीं व नेता म्हणून शिपायानें त्याचा योग्य मान राखला नाहीं. शिपाई त्याची अरे तुरे सारख्या शब्दांनीं संभावना करूं लागले. हे शब्द 'सब घोडे बारा टक्के' या समानतासूचक क्रांतीचे दर्शक समजावे, असें मत अलीकडे पुढें आलें आहे. बादशहाला हें क्रांतीचे तंत्र परिचित नसल्यानें तो शिपायांना कंटाळला. ही शिपायांची व्याद दिल्लींतून जाईल तर बरी अशी त्याची भावना झाली. बादशहाच्या पुढारीपणावर शिपायांचा विश्वास नसला तरी भविष्यवादी मुल्लामौलवींवर आणि शास्त्री-पंडितावर त्यांचा विश्वास होता. ते भविष्यें वर्तवून शिपायांच्या उत्साहाचें उद्दीपन करीत असत. एखादा स्पष्टवक्ता मौलवी असाहि भेटे कीं, तो शिपायांची खरड काढायला मागेंपुढें पाहात नसे. 'तुम्ही धर्मरक्षणाचें निमित्त करून स्वार्थाचा बखेडा आरंभलेला आहे' असें एका मौलवीनें शिपायांना सांगितल्याचें वृत्त इंग्रजी वार्तापत्रांत आढळतें. बादशहा व शिपाई; शिपाई व त्यांचे लष्करी पुढारी; हे पुढारी व शहाजादे; शिपाई व दिल्लीचे नागरिक; या वेगवेगळ्या

व्यक्तींत आणि वर्गात बेबनाव होता. शिपाई आपलें लढण्याचें काम करीत होता. लढण्याशिवाय त्याला गत्यंतरच नव्हतें. इंग्रजाचें शत्रुत्व पत्करल्यावर व त्यांत पुनः बऱ्याचशा इंग्रज अंमलदारांना बायकामुलांसह मारल्यावर रणांगण हेंच त्याचें कार्यक्षेत्र ठरलें. दिल्लीबाहेर येऊन राहिलेल्या इंग्रजांशीं तो सतत उणेपुरे तीन साडेतीन महिने लढत राहिला. परंतु दिल्लीच्या आसपास त्याला नव्या बादशाहीचा विस्तार करतां आला नाहीं व दिल्लींतहि त्यानें बादशाही कारभाराचा पाया भरला नाहीं.

### शिपाई व जनता

दिल्लीजवळ मीरत, यामुळें मीरतच्या शिपायांनीं या बादशाही शहराची निवड योजनापूर्वक केलेली असो वा ती यदृच्छेनें झालेली असो, ही निवड एकप्रकारें कांहींशा चातुर्याची म्हणतां येते. बादशाहीविषयीं लोकांत वसणाऱ्या कौतुकादराचा लाभ पदरांत पडण्याची शिपायांची आशा असल्यास ती सर्वथैव अयोग्य समजतां येणार नाहीं. लखनवी नबाबशाहीच्या व जमीनदारीच्या संस्कारांत वाढलेला शिपाई बादशाहीच्या पुनरुज्जीवनानें निदान उत्तर भारतीय प्रदेश एकदम तिच्या साह्याला उभा राहील, या कल्पनेचा भक्त झाल्याचें दिसते. शिपायांची ही कल्पना ठिकठिकाणीं जे बादशाही सुभेदार उगवले त्यांनीं खरी असल्याचें दाखवून दिलें. पण दिल्लींतील बादशाहीशीं त्यापैकीं बहुधा कुणाचाच साक्षात् संबंध नव्हता; जो तो आपापल्या टापूंत बादशहाच्या नांवानें मनसोक्त वागत होता, यासंबंधाचें दिग्दर्शन पूर्वींच्या भागांत केलेलें आहे. दिल्लीप्रमाणेंच कानपूर, लखनौ येथील शिपायांच्या उठावाची अवस्था होती. कानपुरास शिपायांनीं पेशवाई तर लखनौस नबाबशाही उभी केली. पेशवाई महिन्या दीड महिन्यांत आटपली. लखनौची नबाबशाही जुलै १८५७ ते मार्च १८५८ पर्यंत म्हणजे जेमतेम नऊ महिने टिकली. दिल्लीस धनिकांवर जशी शिपाई-गर्दींतील लुटारूपणाची संक्रान्त गुदरली तशीच संक्रान्त लखनौच्या धनिकांना भोगावी लागली. कानपुराहून इंग्रजानें उठावाच्या शिपायांना जुलै महिन्यांत हाकललें. पण त्यापूर्वीं व नंतर नोव्हेंबर अखेरीस शिपायांच्या कारभारांत तेथील पुष्कळ सधनांच्या हवेल्या धुऊन निघाल्या. नवें राज्य उदयास आणूं इच्छिणाऱ्या उमेदवारांना द्रव्याची आवश्यकता असते व ती आवश्यकता भागविण्यासाठीं लूट करावी लागते; पण असें द्रव्यार्जन जर शिपायांच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्या वैयक्तिक लोभांत गडप झालें तर स्वराज्याकांक्षा

असल्यास ती बीजावस्थेंतच राहून शेवटीं नष्ट व्हावी हा परिणाम ठरलेला होता. शिपायांनीं इंग्रजी राज्याच्या खजीन्याचे लाखों रुपये आपल्या ताब्यांत घेतले; दिल्लीस कानपुरास त्यांना उत्तम दारूगोळ्यांचीं भांडारें मिळाल्यानें हत्यारांकरितां द्रव्य खर्चावें लागलें नाहीं. दाणापाण्यासाठीं काय ती त्यांवर गांठीचा पैसा बाहेर काढण्याची पाळी होती. शिपाई रोकडीच्या व्यवहारानें पोटाची सोय करीत होते, (असें मानायला पुराव्याचा भक्कम आधार नसला तरी) असें मानल्यास त्यांच्यापाशीं पैशाची टंचाई नव्हती. दिल्लीबाहेर इंग्रजांच्या छावणीचा बाजार खाद्यपेयांच्या समृद्धीनें व स्वस्ताईनें भरभराटावा आणि दिल्ली शहरांत शिपायांना उपास घडावे; यावरून इंग्रज व शिपाई या दोघांच्या व्यवहारांतील गुणदोष स्पष्ट कळणारे आहेत. शिपाई हे स्वराज्याचे कारागीर असा विश्वास जर दिल्लीच्या नागरिकांत आणि दिल्लीबाहेरील गांवखेड्यांच्या लोकांत उद्भवून स्थिरावला असता तर त्यांनीं सलोख्यानें व सवलतीनें शिपायांना हवा तो माल पुरविण्याची काळजी दाखविली असती हें समजण्याला कठिण नाहीं. बहादुरशहाच्या बादशाहीवर आणि शिपायांच्या स्वराज्याकांक्षेवर दिल्लीच्या नागरिकांचा विश्वास नव्हता, हें मागें खैराबादीची माहिती देऊन दाखविलें आहे. दिल्लीची निवड करणाऱ्या शिपायांच्या (गृहीत) चातुर्याला लोकांचा विश्वास आणि आदर संपादन करणाऱ्या व्यवहाराची जोड न मिळाल्यानें तें चातुर्य सफळ होण्याचा योग आला नाहीं.

**शिपायांच्या स्वाभिमानांतील दोष**

शिपायांनीं इंग्रजांच्या नोकरींतील सगळी व्यवस्था आपल्या कारभारांत शिल्लक ठेवावी हा प्रकार विचारांत घेतांना त्याच्या कित्येक अंशांचें समर्थन करतां येईल. त्यांनीं पोषाख बदलला नाहीं, आपल्या पथकांचीं (पलटणीचीं) निशाणें कायम ठेवलीं, कवाइतीच्या हुकमाचे शब्द पूर्वीप्रमाणें वापरण्याचा प्रघात चालू राखला; यांपैकीं जुनीं निशाणें बाळगण्याचें समाधानकारक रीतीनें मंडन होऊं शकत नाहीं. नव्या बादशाही राज्याचीं कांहीं लक्षणें त्यांच्या निशाणांत दिसण्याची अपेक्षा वायां जाते. परंतु याहून मनाचा जास्त हिरमोड करणारी गोष्ट पराक्रमाची खूण म्हणून इंग्रजांकडून मिळालेल्या रंगीबेरंगी फिती व पदकें शिपायांनीं अंगावर मिरवावी ही आहे. इंग्रजांकरितां केलेल्या लढायांत शिपायांनीं जें शौर्य धैर्य दाखविलें त्याचीं भूषणें हीं गुलामगिरीचीं चिन्हें आहेत, असें शिपायांच्या मनांत येऊं नये हें आश्चर्य आहे. इंग्रजांचें

दास्य झुगारून जे नवा मनु जन्मास घालण्याला सरसावले त्यांना हीं भूषणें केवळ गुलामगिरीचीं नसून स्वजनद्रोहाचीं लांछनें आहेत, असें वाटलें नाहीं. यासंबंधांत एकच कारण सांगतां येण्याजोगें आहे. लष्करी अधिकारांची आपसांत वांटणी करतांना आपली योग्यता पटविण्यासाठीं हीं भूषणें उपयोगी पडणारीं होतीं, असें कारण शिपायांतर्फे कदाचित् पुढें करतां येईल. स्वाभिमानाच्या—यांतच स्वराज्याकांक्षेचा अंतर्भाव होतो—दृष्टीला हें कारण सबळ वाटण्यासारखें नाहीं.

शिपाई लढाईंत पडला कीं त्याच्या अंगावरील द्रव्य लाटण्याकरितां इंग्रजांकडील काळे-गोरे सैनिक प्रयत्न करीत असल्याचें मागें सांगितलें आहे. इंग्रज अंमलदार मयत शिपायांच्या पेहरावांत कांहीं कागद असतील तर त्याची तपासणी करीत असत. कटाच्या कारस्थानाची माहिती मिळाल्यास पाहावी, असा या बाबतींतला अंमलदारांचा उद्देश गळीं उतरायला हरकत नाहीं. लखनौच्या एका लढाईंत शेंकडों शिपाई मारले गेले. त्यांचे कपडे धांडोळले तेव्हां पुष्कळांजवळ रजेचीं सर्टिफिकिटें आढळलीं. इंग्रजांविरुद्ध उठाव करून, लढाईंत प्रत्यक्ष भाग घेणारांनीं आपल्यापाशीं हीं सर्टिफिकिटें कां बाळगावीं, या प्रश्नाचा इंग्रज अंमलदारांनीं विचार आरंभला तेव्हां त्यांचा तर्क झाला कीं, शिपायांना आपल्या उठावाच्या विजयाबद्दल विश्वास नसावा, विजय न मिळाल्यास हीं सर्टिफिकिटें दाखवून आपल्या नोकरीवर रुजू व्हावें, याप्रमाणें सर्टिफिकिटवाल्या शिपायांचा बेत असला पाहिजे. अंमलदारांचा हा तर्क पुढें लवकरच खरा ठरला. दिल्लीचा पाडाव झाला; लखनौ शहराच्या वेगवेगळ्या ठिकाणीं शिपायांना झोडपून इंग्रजांनीं तेथें कोंडलेलीं माणसें सहीसलामत कानपुरास नेलीं; कानपुरास इंग्रजी सैन्याची संख्या सारखी वाढत होती; या घटना शिपायांच्या उत्साहाला बाधत होत्या. त्यायोगानें शिपायांनीं लढाईतून जीवंत राहिल्यास सरळ इंग्रजांची नोकरी करण्याचा हेतु मनांत ठेवला व जे शिपाई वांचले ते नोव्हेंबरपासून इंग्रज अधिकाऱ्यांसमोर नोकरी करितां उपस्थित होऊं लागले, अशी माहिती ऐतिहासिक इंग्रजी साधनांतून दृष्टीस पडते. या शिपायांना नोकरीवर घ्यावें कीं घेऊं नये याबद्दल पडलेला पेंच कुणाच्या तोंडावर वाटाण्याच्या अक्षता फेकून तर कुणाला नोकरींत घेऊन अधिकाऱ्यांनीं सोडविला. रजेची मुदत संपली तरी गैरहजर कां राहिला, या प्रश्नाला मुलखांतली धामधूम असें शिपायांचें ठराविक उत्तर होतें. धामधूम नसती तर

रजेच्या काळांतला पगार मिळाला असता व पुढें नोकरीचा मार्ग मोकळा नव्हता म्हणून कांहीं महिने पगार थकला तेव्हां या सर्व मुदतीचा पगार मिळावा अशीहि मागणी करायला हे शिपाई कचरत नव्हते. इंग्रज अधिकाऱ्यांपाशीं या शिपायांची योग्य चौकशी करण्याचें कांहींच साधन नसल्यानें आपल्या तारतम्यावर विश्वसून अधिकारी या बाबतींत निकाल देत होते. हे शिपाई भोळे कीं लफंगे याचा निर्णय करतांना शिपाई सामान्यतः भोळे असल्याच्या कल्पनेकडे अधिकारी झुकत असत. सर्व शिपायांत इंग्रजांचा द्वेष नव्हता, पुष्कळजण प्रवाहपतित होते, थोड्यांच्या दांडगाईनें पुष्कळांना उठावाच्या प्रवाहांत ढकललें व अशांच्या वागणुकीकडे सहानुभूतीनें पाहावें, असें आग्रहानें प्रतिपादन करणारे बरेच वरिष्ठ इंग्रज अधिकारी होते. परंतु येथें मुख्य प्रश्न शिपायांनीं जी गर्दी माजविली तिच्या मागील भावनेचा आहे. रजेच्या सर्टिफिकिटांची आशा धरणाऱ्या शिपायांची भावना इंग्रजविरोधाच्या दृष्टीनें शंभर नंबरी ठरण्यासारखीं नाहीं. शेवटपर्यंत निभावलें तर नव्या युगाचे लाभ, मधल्या धामधुमींत लूट किंवा मृत्यु, नाहीं तर इंग्रजांची नोकरी, असल्या तिहेरी ओढाताणीच्या मनःस्थितीनें शिपायांतले पुष्कळजण वागत होते. ही वागणूक स्वराज्य व स्वातंत्र्य या ध्येयांना उणेपणा आणणारी आहे. रजेच्या सर्टिफिकेटाचे शिपाई लखनौच्या भागांत आढळले याचें कारण त्यांचीं घरेंदारें त्या भागांत होतीं हें सांगणें म्हणजे द्विरुक्ति करण्यासारखें आहे.

### शीख व पुर्भय्या शिपाई

शिपाई हा धर्मनिष्ठेपुरता कितीहि उच्च श्रेणीचा मानला तरी तो शिपाई होता, हें विसरणें योग्य नव्हे. त्याच्या ठिकाणीं युद्धाचे मानसिक व शारीरिक गुण भरपूर होते. पण राजकीय ज्ञानाच्या गुणापासून तो अतिशय दूर होता. त्याच्याबरोबर शिपाईगिरींत वाढलेले पुढारी राजकीय ज्ञानाच्या दृष्टीनें त्याच्याहून जास्त योग्यतेचे नव्हते. यामुळें दिल्लीस जाण्याच्या फायद्याचा त्यांनीं विचार केला, पण नुकसानीचा अंदाज त्यांच्या बुद्धीला ताडतां आला नाहीं. दिल्लीची बादशाही आग्र्याच्या वायव्यप्रदेशाला प्रिय होती असें मानतां आलें तरी पंजाबांतील शिखांना ती अत्यंत अप्रिय होती. अगोदर पुर्भय्ये लोक शिखांच्या गैरमर्जीचे विषय होते. शिखांचें राज्य बुडविण्याला पुर्भय्यांची फौज इंग्रज़ांच्या उपयोगी पडली, हें शीख विसरला नव्हता; नंतर पंजाबच्या बंदोबस्तासाठीं ठिकठिकाणच्या छावण्यांतून पुर्भय्यांच्या पलटणी ठेवलेल्या

असल्याचें शीख प्रत्यक्ष पाहात होता; पुर्भय्यांच्या पलटणीला जोडण्यांत आलेल्या शिखांच्या तुकड्यांना पुर्भय्यांनीं सळो कां पळो करून सोडल्याचा अनुभव शिखांना आला होता. रोजच्या व्यवहारांत पुर्भय्या शिपाई आपण उच्च वर्णाचे म्हणून शिखाला हिणवून चिडवीत असे, अशा बऱ्याच कारणांनीं शिखांमध्यें पुर्भय्याबद्दल प्रेम नव्हतें. पुर्भय्या शिपायांनीं दिल्लीच्या बादशाहीचें पुनरुज्जीवन केल्याचें जाहीर झाल्यावर शिखाला मोगलाईंतील आपल्या धार्मिक छळाचें स्मरण होऊन तो इंग्रजांच्या साह्याला तत्परतेनें सिद्ध झाला. शिखांचें पंजाबांत स्वतंत्र राज्य असतांना त्याविरुद्ध मुसलमानांचीं कारस्थानें सारखीं चालू होतीं व तीं कारस्थानें इंग्रजाला पसंत होतीं. शिखांचें राज्य मोडल्यावर त्या कारस्थानाचे पुढारी इंग्रजांवर उलटून शिपाईगर्दीच्या उठाठेवींत शिरले. त्यांच्या व शिपायांच्या सहकार्यानें बादशाहीच्या पुनरुज्जीवनाचा डाव यशस्वी झाल्यास पुनः आपल्याला जुन्या धार्मिक छळाच्या फेऱ्यांत सांपडावें लागेल हें शिखांचें भय निराधार नव्हतें. शिखांनीं इंग्रजाला मनःपूर्वक मदत केली म्हणून शिपायांविषयीं प्रेम दाखविणारी मंडळी आज शिपाईगर्दीच्या संदर्भांत शिखांची नाराजीच्या शब्दांनीं संभावना करीत असतात. येथें वर्णिलेल्या भीतीमुळें शिखांनीं इंग्रजांना साह्य केलें, इंग्रजांबद्दल निरतिशय प्रेम म्हणून तें साह्य केलें नाहीं, अशी माहिती इंग्रजांच्या पुस्तकांतून सांपडणारी आहे. एकदां एका वृद्ध शिखानें 'दिल्ली केव्हां काबीज करणार?' अशा अर्थाचा सवाल इंग्रज अधिकाऱ्यासमोर ठेवला. 'दोन तीन महिन्यांत दिल्ली पडेल' असें उत्तर ऐकल्यावर 'हें पाहा, दिल्ली लवकर न पडल्यास पंजाबांतून इंग्रजांचें राज्य गुंडाळलें जाईल याबद्दल संशय नको' या आशयाचें रोखठोक मनोगत त्या शिखानें व्यक्त केलें. या गोष्टीचा संदर्भ कित्येक इंग्रजांनीं पेशावर सोडण्याच्या इंग्रजी वाटाघाटीकडे लावलेला आहे. इंग्रजाला दिल्ली न घेतां आल्यास किंवा त्यांनीं पेशावर सोडल्यास पंजाबांतून त्याचें वर्चस्व उखडल्याशिवाय आपली धडगत नाहीं, हें रहस्य त्या शिखाच्या मनोगतांत होतें, हें विचार करणारांना समजण्यासारखें आहे. बादशाहीच्या पुनरुज्जीवनानें शिपाईगर्दीचें राजकीय दृष्ट्या हें एक नुकसान झालें.

**इंग्रजांचा विनायास लाभ**

थोडाफार नवा प्रदेश जिंकून तेथें आपलें वर्चस्व निरनिराळ्या रीतीनें भक्कम केल्यावर पुढें सरकायचें असा राज्यस्थापनेचा साधारणपणें एक

अटळ नियम आहे. पादाक्रांत केलेल्या भागांत आपले अधिकारी व सैन्य ठेवून तेथें आपल्या वर्चस्वाला संकटांचें भय नाहीं अशी खात्री झाल्यावर त्या भागापुढें हातपाय पसरायचें ही राज्य मिळविण्याची आणि वाढविण्याची पद्धत साफ सोडून जागोजागचे हजारों शिपाई दिल्ली शहरांत गेले. लष्कराच्या व राज्यकारभारांतल्या पांच दहा अधिकाऱ्यांना मारल्यानें किंवा पळवून लावल्यानें राज्य मोडत नाहीं, याचा बोध शिपायांना नव्हता. अर्थात् चोहोंकडून शिपाई दिल्लींत एकटवल्यानें इंग्रजांचा विनायास एक फायदा झाला. एका ठिकाणीं चिकटून राहिलेल्या शिपायांचा असल्या जागीं फडशा उडविण्याची सोय आयतीच झाली. शिपाई जर देशभर विखरून राहिले असते तर पुरेशा मनुष्यबळाच्या अभावीं त्यांचें पारिपत्य करण्याचें काम अतिशय जड गेले असतें व मोठा कालावधि लागला असता. शिपायांनीं दिल्लीस जाऊन या दोन्ही अडचणींचा परिहार केला, याप्रमाणें शिपायांचा प्रमाद उघडकीस आणून इंग्रजांनीं आपसांतल्या लेखी गुजगोष्टींत आपल्या सद्भाग्याचें कौतुक गाइलें आहे. तो काळ ईश्वरविषयक श्रद्धेचा असल्यानें कित्येक इंग्रजांनीं ईश्वराला धन्यवाद दिला आहे. शिपायांशीं पहिल्या लढाया झाल्यानंतर इंग्रजांना हे योद्धे संख्येनें व हत्यारांच्या समृद्धीनें वरचढ असले तरी ते आपला पराभव करतील अशी धास्ती कधींच वाटली नाहीं. शिपायांचा उठाव सर्वत्र एका दिवशीं झाला नाहीं; ता. १० मे नंतर पुढें सुमारें पंधरा दिवस जी स्वस्थता राहिली तिचा इंग्रजांना एकमेकांशीं विचारविनिमयानें आपला बंदोबस्त करायला उपयोग झाला, हें या विषयांत ध्यानांत ठेवणें योग्य आहे.

दिल्लींत शिपाई जमल्यानें इंग्रजांना मिळालेल्या फायद्याचा दुसरा भाग सांगायला पाहिजे. तेथें जमलेल्या शिपायांना दिल्लीबाहेरील इंग्रजांवर केव्हांच विजय मिळाला नाहीं. यामुळें त्यांचा उत्साह ओसरत जाऊन आपसांतील बेबनाव व अविश्वास वाढूं लागला. पुष्कळ शिपाई दिल्लींतून बाहेर निघाले. इंग्रजाला त्यांच्या या स्थितीची माहिती आपल्या विश्वासू बातमीदारांमार्फत समजत होती. ही स्थिति लक्षांत घेऊन दिल्लीवरील अखेरचा हल्ला जेवढा लांबणीवर पडेल तेवढें चांगलें, अशी कित्येक इंग्रज सेनाधिकाऱ्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली. वस्तुत: पुरेशा सेनेच्या व युद्धसामग्रीच्या अभावीं इंग्रजांनीं दिल्लीवरील अखेरच्या हल्ल्याचें साहस कालावधीवर सोडलें होतें. तोंवर इंग्रजांशीं लढून व आपसांतील कलहाच्या

परिणामीं शिपायांची जूट, संख्या व युद्धसाहित्य खालावेल आणि त्यांना दिल्लींतून हाकलण्याचें काम सुकर होईल, अशी इंग्रज अधिकाऱ्यांची श्रद्धा वाढत होती. लढाईसाठीं तोफा घेऊन वाहेर यावें आणि तोफा व माणसें गमावून वहुधा दिल्लींत परतावें हा शिपायांसंबंधांतला अनुभव इंग्रज प्रत्येक लढाईच्या वेळीं प्रत्यक्ष घेत होते. आपला दारूगोळा निरर्थक रीतीनें शिपाई कित्येकदां खर्चून टाकीत असल्याचे प्रसंगहि इंग्रजांच्या परिचयाचे झाले होते. यामुळें दिल्लीवरील अखेरचा हल्ला करण्याला अवश्य तेवढें आपलें मनुष्यवळ व युद्धसाहित्य वाढण्याला थोडी दिरंगाई झाली तरी चालेल, अशा दृष्टीनें इंग्रज जुलईनंतर वागत होते. याचा अर्थ दिल्ली काबीज करण्याचें महत्त्व दिल्लीबाहेरील इंग्रज अधिकाऱ्यांना समजत नव्हतें किंवा त्याच्यामागें दिल्ली जिंकण्याबद्दल कलकत्ता पंजाबच्या वरिष्ठांची टोंचणी नव्हती असा नाहीं. दिल्लींतल्या शिपायांशीं लढण्याची काळजी त्यांना होती, दिल्ली जिंकण्याचें महत्त्वहि त्यांना समजत होतें; परंतु दिल्लींतील शिपायांच्या पूर्वोक्त दुःस्थितीमुळें अखेरचा विजय आपली विशेष हानि झाल्यावांचून साधेल हा इंग्रजांचा पक्का ग्रह शिपायांच्या हकीकतींत विसरून चालणार नाहीं.

### शिपाई व मरण

शिपाई पराकाष्ठेचा शूर व मरणाविषयीं मुळींच भय बाळगणारा नव्हता, हें मागील वृत्तान्तामध्यें पुष्कळदां वाचकांच्या निदर्शनास आलें आहे. तो पकडला जाऊन फासाची किंवा तोफेच्या तोंडीं जाण्याची शिक्षा भोगतांना ज्या वृत्तीनें मृत्यूचा आदर करी त्या वृत्तीमुळें शिक्षा देणारे व ती अंमलांत आल्याचे पाहणारे अधिकारी चकीत झाल्याशिवाय राहात नसत. अनेक अधिकाऱ्यांनीं आपल्या आठवणींत या वृत्तीचीं उदाहरणें नमूद केलेलीं पाहायला सांपडतात. स्वतःच्या हातांनीं आपल्या गळ्याला फास आवळणें किंवा तोफेच्या तोंडीं बांधल्याशिवाय आपल्या पायांनीं तोफेपर्यंत चालत जाऊन तिच्या तोंडाशीं आपली छाती भिडवून अगदीं स्वस्थपणें तोफ उडण्याची वाट पाहणें, यासारखे शिपायांच्या धैर्याचे मासले इंग्रजांच्या आठवणींतून वाचणारांमध्यें शिपायांबद्दल अभिमान वाढविल्याखेरीज राहात नाहींत. लढाईच्या मैदानावरून पळणारा शिपाई दहापांच शत्रूंनीं गांठल्यास तो आपल्या समशेर चालविण्याच्या करामतीनें त्यांच्याशीं बहुत काळ मरेपर्यंत लढे, अशा गोष्टींची इंग्रजांच्या आठवणींतून कमतरता नाहीं. शिपाई व्यक्तिशः

जी मरणविषयक निर्भयता दाखवीत असत, ती युरोपियन लढवय्यांमध्यें दिसून येत नाहीं, असेंहि कांहीं इंग्रजांच्या आठवणींत लिहिलेलें दृष्टीस पडतें. परंतु समुदायानें लढतांना त्यांचें शौर्य निष्फळ ठरत होतें. किल्ले, दाट झाडीनें व्यापलेलीं टेकाडें, खांचखळग्यांचीं रानें, तटबंदीचीं खेडीं, शहरांतील घरें, नद्यांच्या दरडी, वगैरेसारख्या ठिकाणांचा आश्रय घेऊन इंग्रजांशीं लढण्याचा त्यांचा प्रघात होता. लढाईकारितां रचलेला व्यूह एखाद्या बाजूनें खिळखिळा होतांच तो सावरून इंग्रजाची चढाई आवरण्याची कुशलता शिपायांना कधींच दाखवितां आली नाहीं. यामुळें सैन्याच्या रचनेची एखादी बाजू ढिलावतांच मैदान सोडून पळ काढण्याची त्यांची रीत क्वचित् आश्चर्यानें तर क्वचित् तुच्छतादर्शक शब्दांमध्यें वर्णिलेली इंग्रजांच्या लेखनांत आढळते. ज्या शिपायांनीं आपल्या नेतृत्वाखालीं अफगाण, शीख यांना खडे चारले, त्यांची आतां दोन तीन तासांत, कित्येकदां तर दहापंधरा मिनिटांत दाणादाण कां उडावी, याचें कित्येक इंग्रजांनीं आश्चर्य व्यक्त केलें आहे. शिपायांच्या शौर्याचा ज्या इंग्रजांना अभिमान होता ते इंग्रज उठावाच्या लढायांतून शिपाई सदैव हार खातात म्हणून कोणी त्यांच्याविषयीं हेटाळणीनें बोलल्यास रागावून हमरीतुमरीवर येत असल्याचीं तुरळक उदाहरणें आहेत. परंतु शिपायांना दहापांच प्रसंग सोडल्यास उठावाच्या लढाईत कधींहि विजय मिळाला नाहीं, ही वस्तुस्थिति उघड आहे. आणि याचें कारण विचार करणारांना सहज कळणारें आहे.

**योग्य पुढाऱ्यांचा अभाव**

शिपायांचा विजय नेत्यांच्या युद्धविषयक ज्ञानावर अवलंबून असतो. ज्ञानाच्या अभावीं शिपायांचें शौर्य, धैर्य, संख्याबळ आणि युद्ध-साहित्य कारणीं लागत नाहीं. नेतृत्व हा एक स्वतंत्र गुण असून तो विकास पावेल अशी संधि शिपायांना कधींच मिळाली नव्हती. ते व त्यांचे हिंदी अधिकारी हे इंग्रजी नेतृत्वाचे अंकित होते. इंग्रजानें दिलेला हुकूम युद्ध-प्रसंगीं गोऱ्या सैनिकांच्या सोबतीनें प्राणांची काळजी सोडून अमलांत आणावा, या वहिवाटींत शिपाई वाढले असल्यानें नेतृत्वाला अवश्य असणाऱ्या युद्ध-विषयक ज्ञानापासून ते दूर राहिले होते. त्यांना मिळालेल्या युद्धाच्या शिक्षणाचा त्यांनीं पुष्कळदां उत्तम उपयोग केला. परंतु त्या शिक्षणाला उपजत नेतृत्वाची जोड देणारा कोणी युद्धाच्या प्रतिभेचा बाबर, अकबर,

23233 विनांक ... १०/० ... नों दि: ...१/६/५८

शिवाजी, नेपोलियन यासारखा पुरुष त्यांच्यांत निपजला नाहीं, असें जें एक दोन इंग्रजांनीं म्हटलें आहे तें नाकारणें कठिण आहे. शिपायांनीं उठाव आरंभल्यावर जे पुढारी जोडले, त्यांना प्रत्यक्ष युद्धाची ओळख नव्हती. निरनिराळ्या जिल्ह्यांतून जे लोक शिपाईगर्दीनें निर्माण केलेल्या अराजकाचा फायदा घेण्यासाठीं सरसावले त्यांना युद्धकर्माचें शास्त्र अवगत होतें, असें म्हणायला आधार सांपडत नाहीं. यामुळें उठावाच्या इतिहासांत शिपायांचें शौर्य झळकलें तरी त्यांच्या पुढाऱ्यांचें चित्तवेधक विजयशाली युद्धचातुर्य जिज्ञासूसमोर ठळकपणानें उभें राहात नाहीं. या अनुभवाला थोड्याशा प्रमाणांत झांशीच्या लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवरसिंग व फैजाबादचा मौलवी, यांचीं नांवें अपवाद म्हणून उच्चारतां येतील. तथापि यांतल्या एकालाहि चिरस्थायी स्वरूपाचा विजय मिळाला नाहीं. शिपायांच्या शौर्याचें तेज पुढाऱ्यांच्या कामगिरीला उजळा देऊन गेलें, असें या पुढाऱ्यांच्या चरित्राचें तात्पर्य आहे. उठाव केल्यानंतर शरण गेल्यासहि मरण टळत नाहीं, अशी जोंवर स्थिति होती तोंवर शिपायांना लढण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. शिपायांच्या उठावाशीं एकरूप झाल्यामुळें, त्यांच्या आयत्या वेळच्या पुढाऱ्यांनाहि लढणें हाच एक मार्ग उरला होता. ज्यांचा इंग्रजांच्या संहाराशीं संबंध नसल्याचें सिद्ध होईल, ते शिपाई शरण आल्यास उठावाबद्दल त्यांना मरणाचें प्रायश्चित्त भोगावें लागणार नाहीं, अशा धोरणाचीं आश्वासनें इंग्रजांतर्फे उठावाच्या सुरवातीस पुकारलीं गेलीं होतीं, पण तेव्हां शिपायांमध्यें विजयाचा विश्वास असल्यामुळें त्यांनीं सदर आश्वासनें झिडकारलीं. १८५८ च्या नोव्हेंबरांत कंपनीचें राज्य मावळून नव्या राणीसरकाराच्या वतीनें पुनः तसेंच आश्वासन जाहीर झालें तेव्हां उरल्यासुरल्या शिपायांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं शरण जाण्याचा उपाय स्वीकारला. उरल्यासुरल्या म्हणण्याचें कारण १८५८ च्या नोव्हेंबरापर्यंत शिपायांची मोठी संख्या मारली गेली होती. जे शिपाई उरले त्यांच्या पुढें इंग्रजांच्या हत्येशीं आपला संबंध नसल्याचें सिद्ध करण्याची अवघड जबाबदारी होती. यामुळें त्यांनीं नेपाळच्या सरहद्दींतील असुरक्षित वनवास पत्करला. त्या वनवासाला कंटाळून जे इंग्रजाला शरण गेले त्यांतल्या कांहींना आपल्या घरादाराचें सुख मिळालें; याप्रमाणें उठावाच्या शिपायांचें इतिवृत्त आहे.

शिपाई आणि ‘ विलायती ’

शिपाई हा शब्द इंग्रजी लष्करांत नोकरी करणाऱ्या लोकांना अनुलक्षून येथें वापरला आहे–मग तो हिंदु असो किंवा मुसलमान असो. त्याला धर्महानीचें भय वाटलें व तो इंग्रजांशीं लढण्याला उभा राहिला. त्याच्या उठावांत जे अरब, पठाण वगैरे ‘ विलायती ’ या संज्ञेनें ओळखले जाणारे आयुधजीवी-लढाईच्या गुणानें किंवा शस्त्रविद्येनें पोट भरणारे–परदेशी लोक सामील झाले त्यांना शिपायांच्या वर्गांतून वगळलें पाहिजे. जो भाकरी देईल त्याची जीवाच्या करारानें चाकरी करणारीं परदेशी माणसें पदरीं बाळगण्याची प्रथा इंग्रजी राज्यापूर्वींपासून येथील राजेरजवाड्यांनीं व श्रीमंतांनीं चालू केली होती. आज पुर्भय्ये, शीख, पठाण, गुरखे वगैरे आपल्या प्रांताबाहेरचीं माणसें नोकरींत ठेवण्याचा जो प्रघात महाराष्ट्रांत दिसतो तो त्या प्रथेचा अवशेष आहे. पेशवाईच्या अखेरीस नाना फडणविसांनीं पुष्कळसे अरब आपल्या संरक्षणाकरितां ठेवले होते. नाना वारले तेव्हां त्यांचा पगार थकला असल्यामुळें त्यांनीं नानांचें शव उचलण्याला हरकत केली. अरबांच्या पगाराचा हवाला एका सावकारानें घेतला तेव्हां शव बाहेर निघालें. ही माहिती ‘ विलायती ’पैकीं एका वर्गाचा रोजगार समजण्याला उपयोगी आहे. हे विलायती लोक केवळ द्रव्यार्थी असल्यामुळें उद्यां अधिक द्रव्य देणारा कोणी पुढें आल्यास आजच्या मालकाकडे पाठ फिरविण्याची त्यांना दिक्कत वाटत नसे. धर्म, देश, राष्ट्र, स्वराज्य, परराज्य या कल्पनांची त्यांना अटक नव्हती. शिपायांच्या उठावानें माजलेल्या अराजकांत आपला तळीराम गार करण्याच्या आशेनें ते उठावाशीं समरस होऊन धारचा राजा, फेरोजशहा, झांशीच्या लक्ष्मीबाई, सुरापुराचा वेंकटप्पा यांसारख्यांची नोकरी त्यांनीं धरली. त्यांतले कित्येक खानदेशच्या भिल्लांशीं एकरूप झाले. त्यांची व अफगाण सरहद्दीवरून दिल्लीस इंग्रजांनीं लढायला आणलेल्या पठाणांची योग्यता समान ठरते. मुसलमानानें मुसलमानांशीं लढूं नये, हा इस्लामचा धार्मिक संकेतहि त्यांनीं गुंडाळून ठेवला होता. दक्षिणेंतील निजामशाहीचे मुसलमान स्वार शिपाई उत्तरेच्या उठावांतील मुसलमानांशीं ईर्ष्येनें लढले. याचीं मनोरंजक उदाहरणें शिपाई-गर्दीच्या इतिहासांत कितीतरी आहेत व त्यांतलीं कांहीं वाचकांच्या नजरेखालून पूर्वीं गेलेलीं आहेत. येथें शिपाई-गर्दीच्या गौरवपर तात्त्विक चर्चेतून सदर ‘ विलायती ’ वर्गाला वगळलें पाहिजे एवढेंच सुचवावयाचें आहे.



वहादुरशहा

## .... बहादुरशहा

शिपायांनीं दिल्लीस जाऊन बहादुरशहाला पुढारी बनविल्यामुळें शिपाईगर्दीच्या पुढाऱ्यांमध्यें त्याला अग्रस्थान देणें क्रमप्राप्त आहे. बहादुरशहाचें चरित्र व त्याच्या बादशाहीची स्थिति पूर्वीं एकदां वर्णिली आहे. त्यानें शिपायांचा पुढारीपणा कसा पत्करला व नंतर काय केलें याची वाच्यता मागें केली असली तरी तेवढ्यानें त्याच्या नेतृत्वाची वस्तुतः नेतृत्वाच्या अभावाची संपूर्ण कल्पना होऊं शकत नाहीं. त्याच्या पुढारीपणाचें चित्र अगदीं अलीकडे श्री. निगम नांवाच्या एका लेखकानें '१८५७ मधील दिल्ली' (Delhi in 1857) या पुस्तकांत रेखाटलें आहे व त्या पुस्तकांतील महत्त्वाचा भाग अन्यत्र असलेल्या माहितीसह सादर केल्यानें बहादुरशहाच्या योग्यतेविषयीं निराळें जास्त लिहिण्याची गरज उरणार नाहीं. श्री. निगम हे शिपायांचे अभिमानी असून सर्वत्र त्यांनीं शिपायांच्या जमावाला 'राष्ट्रीय सैन्य' (Nationalist forces) या शब्दांनीं गौरविलें आहे; यामुळें त्यांची भावना शिपायांच्या उठावाबद्दल अनुकूल होती हें ध्यानांत येईल. परंतु संशोधनपूर्वक जीं प्रमाणें समोर आलीं, त्यांच्या आधारें लिहिण्याच्या जबाबदारीमुळें श्री. निगम यांना बहादुरशहाबद्दल जें योग्य तेंच लिहावें लागलें. '१८५७ ची दिल्ली' या पुस्तकांत अपूर्व असें कांहीं नाहीं. परंतु पूर्वींच्या माहितीला नव्या अभ्यासाचा व संशोधनाचा दुजोरा, या नात्यानें त्याला महत्त्व आहे.

### इंग्रजांशीं सूत्र

राज्यकारभाराची जोखीम अंगावर पडली तेव्हां बहादुरशहाला शहरांतील अंदाधुंदीचा बंदोबस्त करण्याकडे लक्ष देणें भाग होतें. बंदोबस्ताला अधिकारी लागतो म्हणून त्यानें एकाला कोतवाल नेमलें. एकाची मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक केली, त्यानंतर दुकानें उघडलीं आणि व्यापार सुरू झाला. ता. १२ मे या म्हणजे बादशाहीच्या दुसऱ्या दिवशीं 'दीवानी आम' मध्यें दरबार भरवून त्यानें एक फर्मान जाहीर केलें. 'माझ्या लोकांचा पक्ष जबाबदारीनें घेण्याचें मीं ठरविलें आहे. इंग्रजांवर भयानें किंवा भोळेपणानें जे विश्वास ठेवतील ते तोंडघशी पडतील. इंग्रजांविरुद्ध हिंदु-मुसलमानांनीं एक झालें पाहिजे, कारण तें त्यांचें अपरिहार्य कर्तव्य आहे. गांवोगांव त्यांनीं आपल्या पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालीं बंदोबस्त राखला पाहिजे. या फर्मानाच्या नकला

शहरोशहरीं वाटाव्या, पण त्यापूर्वी हत्यारें घेऊन इंग्रजांशीं युद्ध पुकारलें पाहिजे.' याप्रमाणें त्या फर्मानाचा आशय आहे. या फर्मानावर बहादुरशहानें केलेल्या सहीशिक्क्याची शाई वाळते न वाळते तोंच त्यानें 'आपल्याला शिपायांची करणी मान्य नाहीं' असें इंग्रजाला कळविलें. आग्र्यास ले. गव्हर्नरला 'आपण शिपायांच्या कैदेंत आहों, इंग्रजांनीं त्यांच्या तावडींतून सोडवावें' अशा अर्थाचें पत्र पाठविलें. बहादुरशहाकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, असा इंग्रजांचा निश्चय झालेला होता व तसा निश्चय नसता तरी त्यांना बहादुरशहाकडे पाहायला सवड नव्हती. बादशहा शिपायांच्या गराड्यांत असल्यामुळें त्याला बादशाहीच्या इभ्रतीखातर कांहीं तरी करणें जरूर होतें, म्हणून त्यानें शिपायांच्या उठावाशीं एकरूप झालेल्या मिर्झा मोगल या आपल्या मुलाला शिपायांच्या हालचालींचा सूत्रधार नेमलें. मिर्झा मोगल किंवा बहादुरशहाचे दुसरे मुलगे शस्त्रविद्येंत निपुण नव्हते. लढाईशीं तर त्यांचा संबंध कधींच आला नव्हता. परंतु मिर्झा मोगल शिपायांचा सेनानी व दुसरे शहाजादे हे कर्नल बनले. श्री. निगम यांचा तर्क आहे कीं, बहुधा शिपायांनीं त्यांची सदर अधिकारासाठीं निवड केली असावी.

### शिराळशेटी बादशाहीचा गोंधळ

बहादुरशहा शहराचें स्वास्थ्य कायम राहावें म्हणून सारखा प्रयत्न करीत होता. दिल्लीच्या आसपास गुजर लोक लुटालूट करीत होते, ती थांबवण्यासाठीं त्यानें विशेष तजवीज केली. नाजफगडच्या बादशाही पोलीस अंमलदारानें करवसुलीसाठीं व दंगेखोरांचा उपद्रव थांबविण्यासाठीं फौजेची मागणी केल्या-वरून मिर्झा मोगल याला त्यानें ताबडतोब पायदळाची पलटण पाठविण्याचा हुकूम दिला. ता. १६ मे रोजीं ख्रिस्त्यांची कत्तल झाली व बादशहा शिपायांच्या व्यवहारांत जास्त लक्ष घालूं लागला. इस्लामची दीक्षा घेतलेल्या अबदुल्लाबेग नांवाच्या एका युरोपियन इसमाच्या सांगण्यावरून त्यानें जयपूर, जोधपूर, बिकानेर वगैरे पांच सहा संस्थानांच्या राजांना दिल्लीस पैसा व फौज घेऊन जलदीनें येण्याविषयीं पत्रें पाठविलीं. राजांनीं हीं पत्रें इंग्रजांच्या हवालीं केलीं. नंतर राजे, महाराजे, नबाब यांना अनुलक्षून जें फर्मान काढलें त्यांत हिंदूंना गंगा, तुळस, शाळिग्राम यांची आणि मुसलमानांना ईश्वर व कुराण यांची शपथ घालून इंग्रजांना ठार करा व आपला धर्म संभाळा अशी शेवटीं हांक दिली होती. सतीला बंदी, विधवा-विवाहाला परवानगी, ख्रिस्ती धर्माचा प्रचार,

दत्तकाला मनाई, तुरुंगांत सर्वांसाठीं एक पाकशाळा, इत्यादि साधनांच्या द्वारें इंग्रज लोक हिंदुस्थानांतील धर्म व संस्कृति हीं बुडवीत असल्याचा पाढा त्या फर्मानाच्या आरंभीं वाचलेला आहे. हिंदु-मुसलमानांत दुही माजविण्याचा यत्न इंग्रज करतील तर त्यांना दाद देऊं नका असाहि त्यामध्यें इशारा आहे.

बादशहाला पैशाची अडचण होती. दिल्लींतले सधन लोक शिपायांना अनुकूल नसल्यानें प्रथम पैसा मिळाला नाहीं, पण धान्याची थोडी सोय झाली. ऑगस्ट अखेरपर्यंत बादशहाला एका सावकारानें पुष्कळसें कर्ज वेळोवेळीं दिल्याची नोंद सांपडते. आतां कोतवाल मॅजिस्ट्रेटाच्या जोडीला एका गव्हर्नराची साथ मिळाली. या वेळीं पहिला कोतवाल जाऊन दुसरा इसम त्या जागीं नेमला गेला. बादशहाला सल्लामसलतीची मदत करण्यासाठीं सहा इसमांचें मंडळ अस्तित्वांत आलें; हे सारेजण एकजात मुसलमान होते. याशिवाय १० जणांचें कारभारी मंडळ उभें केल्याचा उल्लेख मागें केलेला आहेच. त्या मंडळाच्या कामाचें स्वरूप पंचशाहीचें होतें. या सुमारास कपुर्थळयाच्या राजाकडे जें बातमीपत्र गेलें, त्याचा सारांश असा:—'बादशहा म्हातारा असून त्याचे अधिकारी तसेंच जुन्या विचाराचे आहेत. जहागीरदार ब्रिटिशांच्या बाजूस आहेत. दाण्यागोट्याची तरतूद नाहीं. शिपाई जीव देण्याला व घेण्याला सिद्ध आहेत. लोकांच्या समाधानासाठीं बादशहा शहरांत हिंडला, पण लोकांचें समाधान झालें नाहीं. पुष्कळशीं दुकानें बंद आहेत. ५२ वर्षांतील संस्कृतीची (सुखस्वास्थ्याची) तीन दिवसांत राखरांगोळी झाली. राजानें बंदोबस्ताकरितां शहरचे मोठे लोक बोलावले असतां त्यांनीं आजार व अपात्रता या सबबीवर जबावदारी टाळली. अलवर जयपूरला स्वार पाठविले आहेत. दिल्लीचे लोक संकटांत आहेत. इश्वराच्या इच्छेप्रमाणें घडेल. लोक जीवंत आहेत पण जीवाची शाश्वती नाहीं. शिपायांना कोणी पुढारी नाहीं.'

ता. २० मेला बादशहानें मिर्झा मोगल यांस लिहिलेल्या पत्रांत शिपायांच्या वागणुकीबद्दलच्या अनेक तक्रारी नमूद केलेल्या आहेत. शिपाई आले तेव्हां आपल्याजवळ पैसा नसल्याचें त्यांना स्पष्ट सांगितलें होतें. तरी त्यांनीं आपल्यास पुढाकार दिला. त्यांनीं दिवाणी आम व मेहताब बाग येथें वस्ती केली व ते ऐषआरामांत दंग झाले. त्यांच्याशीं आपण कसलाहि करार केलेला नाहीं. त्यांनीं लोकांवर जुलूम केला. बरेच बाजार लुटले. इंग्रजांना लपविलें आहे,

या वहाण्यानें ते वाटेल त्याच्या घरांत शिरतांत. शिपायांनीं चंगीजखान, नादीरशहा यांच्यावरहि ताण चालविली आहे. बादशाही नोकरांनासुद्धां शिपाई धमक्या दाखवितात; यासारखीं गाऱ्हाणीं लिहून शिपाई आपल्या वर्तनांत फरक करणार नसतील तर 'बादशाही नको; निजामुद्दीनच्या दरग्यांत राहून मक्केला जाण्याची तयारी करावी' असा वैताग शेवटीं त्यानें व्यक्त केला आहे. 'राज्यकारभार म्हणजे पोरखेळ नव्हे' अशा अर्थाच्या वाक्यानें पत्राचा शेवट झालेला आहे. शिपायांच्या ज्या मागण्या अंमलांत आणल्या, त्यांमध्यें इंग्रज कैद्यांच्या कत्तलीची मागणी आपण पुरविली, असाहि मजकूर या पत्रांत आहे. या पत्राचा उपयोग न होतां शहरांत शिपायांची दांडगाई चालू राहिली. बादशहाकडे दांडगाईविरुद्ध अर्ज गेले म्हणजे बादशहा अमुक प्रकारें बंदोबस्त करावा, असें मिर्झा मोगलला लिहून कळवी. पालथ्या घड्यावर पाणी म्हणतात त्याप्रमाणें बादशाही हुकूम विल्हेस लागत.

दिल्लींत फौजेची संख्या व नागरिकांची दुर्दशाहि वाढत जावी, हें मागें लिहिलेल्या हकीकतीवरून कळण्यासारखें आहे. बादशहानें फौजेसाठीं पैसा मिळावा म्हणून खटपट करावी व येणारा पैसा शहाजाद्यांनीं व त्याच्या बेगमेनें मध्येंच गडप करावा, हा प्रकार उघडकीस येऊन बादशहाच्या व लष्करी पुढाऱ्यांच्या उद्वेगांत भर पडली. लष्करानें एकदां बेगमेला लुटण्यासाठीं चंग बांधला, परंतु बेगमेच्या इमानी पहारेकऱ्यांमुळें तो प्रसंग टळला. शहाजाद्यांना कोणी पैसे देऊं नयेत असें बादशहानें फर्मान काढलें. बादशहानें इंग्रजाशीं समेटाचें बोलणें करून पाहिलें, तें अर्थातच सफळ झालें नाहीं. एकदां झिन्नत महाल बेगमेनें इंग्रजाकडे खडा टाकून त्यांच्या मनोगताचा सुगावा घेतला, तो अनुकूल नव्हता, यामुळें तिनें हा नाद सोडला. इंग्रजांकडील माहितीप्रमाणें शहाजादेसुद्धां इंग्रजांकडून क्षमेची अपेक्षा करीत होते. त्यांचीहि दाद इंग्रजांनीं घेतली नाहीं. तिकडे इंग्रज ताठ तर इकडे शिपाई अनावर झालेले, या ओढाताणींत कित्येकदां शिपायांसमोर बादशहा अक्षरशः रडल्याचें वृत्त इतिहासांत आहे. 'बादशहाच्या शिक्कामोर्तबाचा शिपाई मनसोक्त उपयोग करतात.' असें एका इंग्रजाकडील हेराच्या बातमीपत्रांत म्हटलें आहे. बादशहा अशा तऱ्हेच्या अव्यवस्थेनें टेकीस आला आणि त्यानें लष्कराचे व नागरिकांचे प्रतिनिधि बोलावून दरबार भरविला. त्यामध्यें चालू अव्यवस्थेपेक्षां इंग्रजांशीं लढणें पुरें असें बादशहानें म्हटलें, तेव्हां 'युद्ध चालू राहिलें

पाहिजे ' असें सर्वांनीं एकसुरी उत्तर दिलें. बहादुरशहापुढें लोकांच्या निश्चयाला मान देऊन इंग्रजाशीं लढण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. लढायचें तर मनुष्यबळ धड पाहिजे, याकरितां त्यानें दिल्ली सोडून जाणाऱ्या शिपायांना कैद करण्याचा हुकूम दिला. शिपायांबरोबर सर्व नागरिकांनीं लढावें आणि हत्यारें व दारूगोळा वगळून शत्रूचा ( इंग्रजांचा ) जो माल त्यांच्या हातीं पडेल तो स्वतःपाशीं ठेवावा, असें बादशहाचें हिंदुमुसलमानांना उत्तेजक आश्वासन होतें. इंग्रजांकडील हिंदी सैनिकांनीं इंग्रजांची नोकरी लाथाडून दिल्लीकरांशीं हातमिळवणी केल्यास त्यांच्या पदरांत चांगली मिळकत पडण्याची आशा दाखविली. इंग्रजांची नोकरी सोडावी, अशी शिखांबद्दल बादशहानें आपल्या सदर युद्धाच्या जाहीरनाम्यांत मुद्दाम विनंती केली होती. बादशहाची ही इच्छा इंग्रजी दळांतील एकट्या पुर्भय्यांनीं मनावर घेतली असें श्री. निगम यांचें म्हणणें आहे.

### बादशहाचा बंदिवास व खटला

ता. १४ सप्टेंबर ते २० सप्टेंबरपर्यंत दिल्लींत इंग्रजांनीं अटीतटीची लढाई केली. शिपाई व नागरिक कांहीं जागीं जीवाच्या करारानें लढले; परंतु त्यांची हार झाली. ता. २१ रोजीं बादशहा, बेगम व लाडका मुलगा जवानबख्त असे तिघे हॉडसनच्या कारवाईनें इंग्रजाच्या कैदेंत पडले. त्यानंतर बादशहाला त्याच्या वाड्याजवळच्या एका लहानशा खोलींत ठेवलें होतें. बैठकीमागें चिकाच्या पडद्याआड झिन्नतमहाल राहात होती. या दुर्दैवी वृद्ध मोगल वंशजाची अशी दशा असूनहि इंग्रजांनीं त्याची चैन चालविल्याचा गिल्ला करून पाहिला. पिंजऱ्यांतलें एखादें नवें रानटी जनावर पाहण्याची जशी सामान्य माणसें उत्सुकता दाखवितात तशी बहादुरशहाला पाहण्याची उत्सुकता पुष्कळ इंग्रज स्त्रीपुरुष दाखवीत असत. पाहणाऱ्या इंग्रजांशीं तो कधीं नीट बोलत नसे. त्याचे शब्द तोंडांतल्या तोंडांत घोटाळून बाहेर स्पष्ट ऐकूं येत नसत. कधीं तो स्वकृत कविता गुणगुणत असे. कैदेंत बेगमेच्या पडदपोषीची कदर इंग्रजांनीं ठेवली नाहीं. त्याचा व बेगमेचा एरवीं अपमान चालू असला तरी पहाऱ्यांपैकीं एखाद्या सोजराला त्याच्या दाढीचे केस ओढावेसे वाटत व हे क्लेश त्याला सहन करावे लागत. बादशहाला रोजच्या खर्चासाठीं अवघे दोन आणे दिले जात होते. सप्टेंबर २१ पासून जानेवारी २७ पर्यंत त्याच्या खटल्याची

तयारी इंग्रज करीत होते. ता. २७ जानेवारीला खटल्याचें काम सुरू होऊन ता. ९ मार्चला तें संपलें. खटल्याकरितां पांच लष्करी गोऱ्या अंमलदारांचें न्यायमंडळ नेमलें होतें. बादशहावर चार आरोप होते. पहिले तीन आरोप बंडाशीं संलग्न असून चौथा आरोप गोऱ्या स्त्रीपुरुषबालकांच्या कत्तलीचा होता. या खटल्यामध्यें अनेक हिंदी साक्षीदार बादशहाला अत्यंत नम्रतेनें वंदन करीत असल्याचा निर्देश एका इंग्रजानें केला आहे. आरोपी या नात्यानें या बादशहाला पाहतांना एका सहृदय इंग्रजाला मोगलाईचें जुनें ऐश्वर्य आठवलें. ज्याचे पूर्वज एकदां एकपंचमांश मानव समाजाचें प्रभुत्व भोगीत होते, ज्यांच्यापुढें १८५७ तील इंग्रजांचे पूर्वज अदबीनें हात जुळवून व्यापाराच्या सवलती मिळण्यासाठीं अर्जदार म्हणून उभे राहात होते, त्यांचा हा वंशज त्या अर्जदार इंग्रजांच्या वंशजाचा गुन्हेगार ठरावा हा दैवाचा विचित्र खेळ त्या इंग्रजानें आपल्या अनुभवांत गोंवला आहे. श्री. निगम यांनीं बादशहाची कैदेंतील दुर्दशा विशेष वर्णिलेली नाहीं.

खटल्याच्या वेळीं बहादुरशहानें सगळे आरोप नाकारले. वीस जणांच्या साक्षी झाल्या. पुराव्यानिमित्त सत्तावीस कागद फिर्यादीतर्फे दाखल करण्यांत आले होते. बहादुरशहानें आरोप नाकारतांना शिपाई दिल्लीस आल्यापासून आपल्या नांवानें जें जें घडलें तें शिपायांच्या दंडेलीपायीं घडलें. शिपाई आपल्या कह्यांत कधींच नव्हते; इंग्रजांच्या कत्तलीला आपली संमति नव्हती; आपल्या मुलांना शिपायांनींच अधिकार दिले; आपण इराणच्या शहाकडे कुणालाच पाठविलें नाहीं, इत्यादि आशयाचें समर्थन केलें. याप्रमाणें बादशहाची बाजू सारांशानें सांगून ' बहादुरशहाचें आत्मसमर्थन खरें समजल्यास स्वातंत्र्यासाठीं झालेल्या राष्ट्रीय चळवळीचा पहिला पुढारी या नात्यानें त्याची स्तुति करणें तर राहोच, पण त्याविषयीं सहानुभूति सुद्धां दाखविणें शक्य नाहीं. त्याचा मुलगा मिर्झा मोगल हा शिपायांच्या कामगिरींत मनःपूर्वक भाग घेणारा म्हणून त्याच्या पदरीं श्रेय टाकायला जावें तर मुख्य ध्येय बाजूस ढकलून त्यानें स्वार्थाला महत्त्व दिलें म्हणून त्याचा तीव्र निषेधच करणें प्राप्त आहे. बादशहानें या वेळीं परिणामाचें भय न बाळगतां जास्त धैर्य निदर्शनास आणायला हवें होतें. कांहीं झालें तरी त्याचें आयुष्य संपत आलें होतें. त्यानें शिपायांच्या चळवळीची जबाबदारी आपल्याकडे घेतली असती तर हुतात्मा म्हणून भावी पिढ्यांनीं त्याचा आदर केला असता. ' या अभिप्रायानें श्री. निगम यांनीं



बेगम झिन्नतमहाल

बहादुरशहाची संभावना केली आहे. बहादुरशहाला न्यायमंडळानें गुन्हेगार ठरविलें, हा न्याय गव्हर्नर जनरलनें मान्य केला. त्याला कुठें हद्दपार करायचें याबद्दल सरकारांत वाटाघाट होऊन शेवटीं रंगूनला त्याची बेगमेसह रवानगी करण्यांत आली. ता. ७ नोव्हेंबर १८६२ या दिवशीं अर्धांगवाताच्या दुखण्यामध्यें त्याचा अंत झाला.

बेगम झिन्नतमहाल हिनें हद्दपारींतून दोनदां हिंदुस्थानांत प्रवास केला. तिचा याप्रसंगीं लोकांनीं जो मानसन्मान केला तो इंग्रजांना रुचला नाहीं. १८८२ मध्यें तिचा ब्रह्मदेशांत मृत्यु घडला. बहादुर-शहाशीं तिचें १८४० मध्यें लग्न झालें होतें. अत्यंत सुंदर अशी तिची ख्याति होती. आपला मुलगा बहादुरशहाच्या पश्चात् बादशाहीचा प्रतिनिधि व्हावा, याकरितां तिची धडपड चालली होती. परंतु इंग्रज या इच्छेला धूप घालीत नाहीं, असें तिच्या अनुभवास आलें. इंग्रजांनीं मान्य केलेला वारस फक्रुद्दीन १८५६ सालीं अकस्मात् वारला. ह्यापूर्वीं जॉन मेटकाफ असाच निधन पावला. या दोघांच्या मृत्यूशीं या बेगमेच संबंध असावा याप्रमाणें संशय होता. तिनें दिल्लींत शिपाई आल्यावर आपल्या मुलाखातर शिपायांत फाटाफूट उत्पन्न केली व शिपायांच्या लढाऊ एकजुटींत विष कालविलें. नवरा, आपण व मुलगा यांचा जीव वांचविण्यांत बेगमेनें इंग्रज अंमलदारांना ता. १८ सप्टेंबरला दोन लाख रुपये देऊं केल्याचा मजकूर श्री. निगम यांच्या पुस्तकांत आहे. आपल्या दागदागिन्यांच्या रूपानें या रकमेची भरपाई करावयाची होती. तिच्या वाड्यांतील जडजवाहीर ठेवण्याची गुप्त जागा जवान बख्तानें इंग्रजांना दाखविली व इंग्रजांनीं तेथून जें जडजवाहीर उचललें, त्याचें मोल दोन लाखांहून जास्त होतें. इंग्रजी हिशोबांत त्याची किंमत एक लाख रुपये एवढीच लिहिली आहे. बहादुरशहानें आपले अलंकार ऑक्टोबरांत इंग्रजांच्या हवालीं केले. ते विलायतेस रवाना झाले.

### संघराज्याची बेगडी कल्पना

वाचकांनीं येथवर बादशहा, बेगम, शहाजादे यांचें जें चरित्र पाहिलें त्यावरून त्यांच्या शिपाई-गर्दींतील आकांक्षांचा व कामगिरीचा यथोचित बोध होण्याला हरकत नाहीं. परंतु या नाकर्त्या बादशहाच्या जरठ बुद्धीला आजच्या-सारख्या संघराज्याच्या निर्मितीची कल्पना चिकटविण्याचा यत्न कित्येक

बहादुरशहाची संभावना केली आहे. बहादुरशहाला न्यायमंडळानें गुन्हेगार ठरविलें, हा न्याय गव्हर्नर जनरलनें मान्य केला. त्याला कुठें हद्दपार करायचें याबद्दल सरकारांत वाटाघाट होऊन शेवटीं रंगूनला त्याची बेगमेसह रवानगी करण्यांत आली. ता. ७ नोव्हेंबर १८६२ या दिवशीं अर्धांगवाताच्या दुखण्यामध्यें त्याचा अंत झाला.

बेगम झिन्नतमहाल हिनें हद्दपारींतून दोनदां हिंदुस्थानांत प्रवास केला. तिचा याप्रसंगीं लोकांनीं जो मानसन्मान केला तो इंग्रजांना रुचला नाहीं. १८८२ मध्यें तिचा ब्रह्मदेशांत मृत्यु घडला. बहादुर-शहाशीं तिचें १८४० मध्यें लग्न झालें होतें. अत्यंत सुंदर अशी तिची ख्याति होती. आपला मुलगा बहादुरशहाच्या पश्चात् बादशाहीचा प्रतिनिधि व्हावा, याकरितां तिची धडपड चालली होती. परंतु इंग्रज या इच्छेला धूप घालीत नाहीं, असें तिच्या अनुभवास आलें. इंग्रजांनीं मान्य केलेला वारस फक्रुद्दीन १८५६ सालीं अकस्मात् वारला. ह्यापूर्वी जॉन मेटकाफ असाच निधन पावला. या दोघांच्या मृत्यूशीं या बेगमेच संबंध असावा याप्रमाणें संशय होता. तिनें दिल्लींत शिपाई आल्यावर आपल्या मुलाखातर शिपायांत फाटाफूट उत्पन्न केली व शिपायांच्या लढाऊ एकजुटींत विष कालविलें. नवरा, आपण व मुलगा यांचा जीव वांचविण्यांत बेगमेनें इंग्रज अंमलदारांना ता. १८ सप्टेंबरला दोन लाख रुपये देऊं केल्याचा मजकूर श्री. निगम यांच्या पुस्तकांत आहे. आपल्या दागदागिन्यांच्या रूपानें या रकमेची भरपाई करावयाची होती. तिच्या वाड्यांतील जडजवाहीर ठेवण्याची गुप्त जागा जवान बख्तानें इंग्रजांना दाखविली व इंग्रजांनीं तेथून जें जडजवाहीर उचललें, त्याचें मोल दोन लाखांहून जास्त होतें. इंग्रजी हिशोबांत त्याची किंमत एक लाख रुपये एवढीच लिहिली आहे. बहादुरशहानें आपले अलंकार ऑक्टोबरांत इंग्रजांच्या हवालीं केले. ते विलायतेस रवाना झाले.

## संघराज्याची बेगडी कल्पना

वाचकांनीं येथवर बादशहा, बेगम, शहाजादे यांचें जें चरित्र पाहिलें त्यावरून त्यांच्या शिपाई-गर्दीतील आकांक्षांचा व कामगिरीचा यथोचित बोध होण्याला हरकत नाहीं. परंतु या नाकर्त्या बादशहाच्या जरठ बुद्धीला आजच्या-सारख्या संघराज्याच्या निर्मितीची कल्पना चिकटविण्याचा यत्न कित्येक

भारतीय लेखकांनीं केल्यामुळें त्या कल्पनेच्या परामर्शाखेरीज बादशहाच्या पुढारीपणाचें प्रकरण पुरें होणार नाहीं. या कल्पनेचा उगम शिपायांच्या कैदेंतील जीवनलाल नामक इंग्रजांच्या नोकरींतील कारकुनाच्या रोजनिशींत सांपडतो. ता. ४ सप्टेंबर १८५७ च्या नोंदींत जीवनलालानें जयपूर, जोधपूर, बिकानेर अलवरच्या राजांना इंग्रजांचा नाश करण्याबद्दल दस्तुरखुद्द पत्रें पाठविलीं. 'हे राजे जर या कार्यानिमित्त एकवटतील तर त्यांचें संघराज्य (Confederacy of States) स्थापून आपण बादशाही त्याच्या हवालीं करूं' अशा अर्थाचें एक वाक्य त्या नोंदीच्या मजकुरांत आहे. बादशहानें शिपायांच्या इच्छेस अनुसरून अनेक हिंदी राजेरजवाड्यांना पत्रें लिहिल्याचा पुरावा बादशहाच्या खटल्यांत पुढें आलेला होता. जीवनलालची रोजनिशी मुळांत फारसी भाषेंत लिहिलेली होती. तिचा इंग्रजी अनुवाद लोकांपुढें आलेला असल्यानें (Confederacy of States) हा अर्थ व्यक्त करणारांना मूळचा शब्द कोणता हें समजायला आज मार्ग नाहीं. परंतु इंग्रजी शब्द अर्थदृष्ट्या बिनचूक आहेत असें मानलें तरी जीवनलालला मिळणाऱ्या माहितीची स्थिति लक्षांत घेऊन मग त्या शब्दांची युक्तायुक्तता ठरविली पाहिजे. कैदेंतला जीवनलाल त्याच्यावर देखरेख करणाऱ्या शिपायांच्या स्वतःशीं होणाऱ्या किंवा आपसांत चालणाऱ्या संवादाच्या निष्पत्तीचा गोषवारा आपल्या आकलनाप्रमाणें लिहीत होता. 'इंग्रजांना मारून तुम्ही सर्वजणांनीं एकजुटीनें राज्य करावें' अशा रोखाच्या वाक्यांतून इंग्रजी भाषांतरकारानें आपलें इतिहासाचें ज्ञान कारणीं लावून (Confederacy of States) या शब्दांचा प्रयोग केल्याचा संभव ध्यानांत घेतल्यास त्या शब्दांवरून संघराज्याच्या कल्पनेचा डोलारा उभारणें योग्य दिसत नाहीं. असा डोलारा उभारणारे जगांतील वेगवेगळ्या राज्यपद्धतींविषयीं स्वतःला असणारें ज्ञान उघडकीस आणतात. बादशहानें इंग्रज दिल्ली घेणार अशी खात्री झाल्यावर पुष्कळशा राजांना मदतीनिमित्त पत्रें पाठविलीं व 'मला बादशाहीचा लोभ नाहीं, तुम्हीच सारेजण मिळून राज्य करा' असें त्या राजांना अगतिकतेनें कळविलें, याहून त्याच्या पत्रांचा अधिक अर्थ लावण्याइतकी योग्यता बादशहाच्या तत्कालीन कामगिरीमध्यें सांपडत नाहीं.



नानासाहब पेशवे

## .... धोंडोपंत नानासाहेब

दुसऱ्या बाजीराव पेशव्याचे दत्तक चिरंजीव धोंडोपंत नानासाहेब हे शिपाई-गर्दीच्या इतिहासांत विशेष गाजविले जाणारे दुसरे पुढारी आहेत. इंग्रज लेखक व अलीकडील कित्येक भारतीय लेखक यांची दृष्टि त्यांच्या विषयीं अगदीं भिन्न आहे. पहिले नानासाहेबांची गणना एक भयंकर दुष्ट पुरुष म्हणून करतात तर दुसरे त्याला राज्यक्रांतीचा नेता समजतात. त्यांचा जन्म अनेक लेखकांनीं इ. स. १८२४ हा मानला असल्यानें १८५७ सालीं त्यांचें वय सुमारें ३३–३४ वर्षांचें ठरतें. त्यांना ओळखणाऱ्या इंग्रजांनीं ते १८५७ सालीं ४० वर्षांच्या वयाला शोभणारे दिसत असल्याचा निर्देश केलेला आहे. यांच्या जनक पित्याचें आणि मातेचें नांव अनुक्रमें महादेव व गंगाबाई असें होतें. वयाच्या तिसऱ्या वर्षीं त्यांचें दत्तविधान झालें. १८५१ मध्यें बाजीराव निवर्तेपर्यंत नानासाहेब काय करीत होते यासंबंधाची माहिती उपलब्ध नाहीं. १८३६ सालीं त्यांच्या विवाहाची कारवाई करण्यांत आली. कानपूरच्या इंग्रज अंमलदारांना व इतरांना बाजीरावाच्या हयातीमध्यें नानांच्या वागणुकीकडे पाहण्याचें कारण नव्हतें. त्यांच्या पश्चात् नानासाहेबांनीं जेव्हां आपल्या पित्याचें पेन्शन आपल्याला मिळावें म्हणून प्रयत्न आरंभला तेव्हां त्यांच्याकडे इंग्रज अधिकाऱ्यांचें लक्ष गेलें. कित्येक इंग्रजांनीं लिहिलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, नानासाहेब इंग्रजांचें आपल्याकडे लक्ष वेधावें असें वागत होते. कोणी इंग्रज भेटीला आल्यास त्याचें इंग्रजी पद्धतीप्रमाणें आदरातिथ्य करणें, असा त्यांचा नियम होता. पुष्कळदां कानपुरासहि ते युरोपियन समाजाला मेजवान्या देत असत. मात्र राजा या नात्यानें त्यांना वागविण्याला कंपनी सरकार तयार नसल्यानें ते इंग्रजांकडील मेजवानीचा मान नाकारीत असत. इंग्रजांना दिल्या जाणाऱ्या मेजवान्यांतून कोणत्याहि प्रकारच्या खाद्यपेयांचा विधिनिषेध बाळगण्याचा नानांचा प्रघात नव्हता. कानपूरच्या अधिकारी इंग्रजासंबंधांतील घडामोडीची बातमी राखून त्याबद्दल विचारपूस करण्याची त्यांची रीत होती. इंग्रज स्त्री-पुरुषांच्या सामान्य गरजा पुरविण्याची तत्परतादेखील नानासाहेब दाखवीत होते. त्यांना बिलियर्ड चांगल्या प्रकारें खेळतां येत असे व त्या खेळाच्या किंवा इतर निमित्तानें ते इंग्रजांमध्यें मिसळत असल्यामुळें कानपूरच्या इंग्रजांना त्यांच्या विषयीं अविश्वास किंवा संशय कधींच वाटला नाहीं. शिपाई-गर्दीच्या उठावाचा

पुढाकार नानासाहेबांना मिळाल्यावर त्यांच्या नांवानें कानपुरास जें घडलें, त्याचा मागाहून विचार करतांना इंग्रजांचा असा ग्रह झाला कीं, स्थानिक इंग्रजांना आपल्या उदार वागणुकीनें प्रसन्न करून त्यांच्या द्वारें आपल्या बाबतींत वडिलांचें पेन्शन नाकारण्याचा जो अन्याय झाला त्याची दाद लावून घ्यावी, यासाठीं नानासाहेब इंग्रजांच्या प्रेमाचा देखावा करीत होते.

**नानांची धनिकता**

पेन्शन बंद झालें तरी नानासाहेबांपाशीं पुष्कळ द्रव्य होतें व त्याच्या जोरावर त्यांनीं आपला बाजीरावाच्या काळांतला डौल कायम ठेवला होता. हत्ती, घोडे, उंट याखेरीज त्यांनीं नानाविध पशुपक्ष्यांचा मोठा संग्रह बाळगला होता. त्यांचें शस्त्रभांडार विविध आणि संपन्न होतें. बहुमोल वस्त्रालंकारांची कमतरता नव्हती. सणावाराला ते वस्त्रालंकार घालून बाहेर निघाले कीं त्यावर बिठूरच्या स्त्री-पुरुषांचे नेत्र खिळून जात असत. नानासाहेब घराबाहेर फिरायला निघाले कीं खऱ्या राजासारखा लवाजमा त्यांच्या बरोबर असे. नानांजवळ असा लवाजमा फार मोठा होता. नानांनीं आपलें गाऱ्हाणें विलायतेस पोंच-विण्याकरितां अझीमुल्ला नांवाच्या एका हुशार मुसलमानाला हाताशीं धरून जो खर्च केला तो एका इंग्रजाच्या माहितीप्रमाणें पांच लाखांइतका मोठा असल्याचें दिसतें. अझीमुल्लानें लंडनच्या उच्चकुलीन स्त्रियांमध्यें आपल्याविषयीं जें आकर्षण उत्पन्न केलें, त्याचा पुरावा इंग्रजांनीं शिपायांना कानपुरांतून पळविल्यावर इंग्रजांच्या हातीं आला व तो पाहून त्यांना अतिशय लाज वाटली. असें आकर्षण उत्पन्न करण्यामागें अझीमुल्लाचा देखणेपणा व बोलण्या-चालण्यांतली हुशारी या गुणाबरोबरच पैशाचें भरपूर बळ होतें, हें समजायला कठिण नाहीं. बिठूरच्या विहिरींतून जी रोकड व जडजवाहीर इंग्रजांनीं १८५७ च्या डिसेंबरांत हस्तगत केलें आणि नानांनीं बिठूर सोडतांना जें द्रव्य बरोबर नेलें असेल त्याचा विचार केल्यास नानांच्या धनिकतेबद्दल इंग्रजी लेखनांत आढळणारी कल्पना अतिशयोक्तीची नव्हती असें समजावें लागतें. बिठूर सोडतांना नानांपाशीं कांहींच द्रव्य नव्हतें, अशी माहिती गोडशांच्या प्रवासवृत्तांत आहे.

**नानांचें रूप आणि वर्तन**

नानांचा वर्ण तांबुसपणाचा अंश असलेला पिवळसर होता. उंची मध्यम, चेहऱ्याची ठवण घवघवीत, शरीराचा बांधा लठ्ठपणाकडे झुकलेला,

असें त्या विषयींचें वर्णन इंग्रजी लेखकांनीं दिलेलें आहे. चेहरा घवघवीत असला तरी त्यावर मनांतले भाव चटकन् प्रगटावे अशी त्याची स्थिति नव्हती. परिचित इंग्रजांच्या मतें नानांचा चेहरा मठ्ठ होता. त्यांच्या मराठेशाही पागोट्यांतहि कांहीं ठळक विशेष नव्हते. नानांमध्यें झटकन् एखाद्याला आपलेसे करील असा गुण नव्हता. इंग्रजांचा धर्म, इतिहास, कला, राज्यकारभार, चालीरीती याविषयीं माहिती मिळविणारी नानांची हौस इंग्रजांच्या लक्षांत आली होती. इंग्रजी भाषेचें ज्ञान नसलें तरी नानासाहेब देशांतील प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रांचे वर्गणीदार होते व त्यांत येणारे विषय भाषांतराच्या साह्यानें ते दर दिवशीं समजावून घेत असत. या कामावर त्यांनीं एक स्वतंत्र इंग्रज इसम नेमलेला होता. परंतु नानासाहेब बेताच्या बुद्धिमत्तेचे होते, असें बहुतेक इंग्रजांचें मत दृष्टीस पडतें. त्यांची एकंदर राहणी फारशा हालचालींची नव्हती. नानांशीं प्रत्यक्ष संबंध आलेल्या एका इंग्रज डॉक्टराकडून या पुरुषाविषयीं जें ज्ञान मिळालें तें दुसऱ्या इंग्रज अधिकाऱ्यानें आपल्या आठवणींत नमूद केलेलें आहे. त्यावरून त्यांना तुपाच्या बाबतींत कांहीं विशेष प्रकारची रुचि होती, असें मानावें लागतें. त्यांना नाचगाण्याचा षोक होता. नानांच्या निजण्याच्या खोलींत एक कालवड सोडलेली असे.

१८५७ आक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यांत नानासाहेब गंगेच्या अलीकडे येणार असल्याची बातमी समजल्यावर कानपूरच्या कलेक्टरानें आग्र्याच्या अधिकाऱ्याला जें पत्र लिहिलें त्यांत नानांच्या देहरचनेचें वर्णन दिलेलें आहे. नाना ग्वालेरला व तेथून पुण्याला जातील, अशी कलेक्टराची पक्की समजूत होती तेव्हां ग्वालेरला किंवा त्या भागांत नानासाहेबांना ओळखून पकडण्याच्या हेतूनें त्यांचें वर्णन आलेलें आहे – 'वय वर्षें ४२, केस काळे; वर्ण फिकट गव्हासारखा; डोळे मोठे; चेहरा जाड वाटोळा; हल्लीं त्यानें दाढी वाढविली आहे असें समजतें; उंची सुमारें ५ फूट ८ इंच; केस डोक्यासरसे कापलेले. अगदीं आखूड (निदान पूर्वीं तरी असा प्रकार होता.) देह पुष्ट व शक्तिशाली; मराठ्याचें नाक टोकदार पण रुंद नाकपुड्यांचें असतें; नानाचें नाक चांगल्या सरळ आकाराचें आहे. त्याच्या बरोबर तुटक्या कानाचा एक नोकर असतो व तो त्यापासून कधींहि दूर जात नाहीं.

## नानांच्या डौलाची काटछाट

बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर त्यांचें पेन्शन इंग्रजांनीं बंद केलें, हें एक नानासाहेबांच्या हृदयाचें महच्छल्य होतें. आपल्यामागें आपल्या मुलाला पेन्शन मिळणार नाहीं, याची जाणीव बाजीरावाला होती, असें त्यांनीं आपल्या पश्चात् पेन्शन चालू राहण्यासाठीं केलेल्या प्रयत्नावरून म्हणावें लागतें; पण तेव्हां बाजीराव जीवंत असल्यामुळें या प्रश्नाचा विचार करण्याचें कारण नाहीं, असें ठरवून इंग्रज राज्यकर्त्यांनीं तो विषय आपल्या दप्तरांत टाकून दिला. पेन्शनच्या मूळ अटींत 'बाजीराव व त्याचें कुटुंब' अशा अर्थाचे शब्द असल्यामुळें बाजीरावामागून कुटुंब शब्दाच्या आधारानें पेन्शन मिळण्याबद्दल एकट्या नानासाहेबांनींच नव्हे तर दुसऱ्या कुटुंबियांनीं जोराची खटपट आरंभली. नानांच्या जोडीनें पेन्शनवर हक्क सांगायला त्यांच्या दोघा बहिणींचा पक्ष पुढें आला. त्यावर हरताळ फासून नानासाहेब हेच पेशवे कुटुंबाचे प्रमुख असा सरकारानें निकाल दिला. बाजीरावाच्या बायका या उलाढालींत शिरल्या असाव्या, असें सुचविणारा पुरावा आहे. इंग्रजांनीं पेन्शन बंद केल्यामुळें त्यांना पेशव्यांच्या गृहकलहांत लक्ष घालण्याचें कारण नव्हतें. परंतु पेन्शन बंद करून इंग्रज राज्यकर्ते थांबले नाहींत. त्यांनीं बाजीरावाच्या हयातींतील दुसऱ्या हक्कांची पेन्शनप्रमाणेंच वासलात लावून जखमेवर मीठ चोळण्याचें काम केलें. बिठूर येथील बाजीरावाच्या जहागिरीचा भाग सामान्य न्यायालयाच्या अधिकाराबाहेर ठेवला होता. आतां ही सवलत रद्द होऊन पेशवेपरिवार सामान्य नागरिकाच्या सपाटीवर आला. बाजीरावाची जहागीरहि सरकारजमा झाली. एवढ्यानेंच ही अवदशेची कथा संपत नाहीं. इंग्रज नानासाहेबांना 'बिठूरचा महाराजा' या नांवानें ओळखीत असले तरी नानासाहेबांनीं आपल्या नव्या शिक्क्यांत घातलेले 'पेशवाबहादुर' हे शब्द इंग्रजांना सोसले नाहींत. त्यांनीं ते शब्द शिक्क्यांतून काढायला नानासाहेबांना भाग पाडलें. अर्थात् 'श्रीमान् नाना धोंडोपंतबहादुर' या नव्या शब्दांच्या शिक्क्यानें नानासाहेबांचा व्यवहार चालू झाला.

## तीर्थयात्रेचा पोकळ दावा

शिपायांच्या उठावांतील नानासाहेबांचें चरित्र पूर्वीच्या वृत्तान्तामध्यें येऊन गेलेलें आहे. नानासाहेबांनीं आपल्यावरील इंग्रजांचा विश्वास कायम राहावा,

असें धोरण उठावापर्यंत ठेवलें होतें. त्यानंतर शिपायांच्या अनिवार्य प्रेरणेनें ते उठावांत मिसळले याची वाच्यता मागें झालेली आहे. ते तीर्थयात्रेच्या मिषानें शिपायांच्या छावण्यांतून हिंडले व इंग्रजाविरुद्ध त्यांनीं टोलेजंग कट रचला असें लंडनटाइम्सचा बातमीदार रसेल यांच्या रोजनिशींतील मजकुराच्या आधारें सांगितलें जातें. परंतु रसेल १८५८ च्या प्रारंभीं कलकत्त्यास उतरून फेब्रुवारी महिन्यांत कॅम्बेलनें चालविलेल्या मोहिमेमध्यें सामील झाला. तो कानपुराकडे आला त्या वेळीं कानपूरच्या उठावाची स्वानुभवाच्या जोरावर विश्वसनीय माहिती सांगणारा एकहि इंग्रज तेथें नव्हता. कानपूरच्या कत्त-लींतून बचावलेल्या चौघा इंग्रजांपैकीं एकानें कानपूरचें प्रकरण लिहून काढलें आहे, त्यांत नानासाहेबांच्या उत्तर भारतीय लष्करी तीर्थयात्रेचा संदर्भ आलेला नाहीं. ज्या दुसऱ्या इंग्रजांना नानासाहेबांविषयीं ज्ञान होतें, त्यांनाहि या तीर्थयात्रेचा पत्ता नाहीं. कानपूर प्रकरणाच्या चौकशींत तीर्थयात्रेची वाच्यता कोणींहि केल्याचें आढळत नाहीं. जे येथें १८५७ मध्यें होते त्यांपैकीं कुणाच्याच गांवीं नसलेल्या गोष्टीला रसेलनें आपल्या बातमीपत्रांत जागा दिली म्हणून तिचा आदर करण्याचा मोह इतिहासजिज्ञासेला तर नाहींच पण साध्या व्यवहारज्ञानाला सुद्धां शोभणारा नाहीं. तीर्थयात्रेच्या मिषानें इंग्रजांविरुद्ध पुष्कळशा छावण्यांतून ज्यानें कटाचें जाळें पसरलें त्याला कानपूरच्या शिपायांनीं एखाद्या तिन्हाइताप्रमाणें वागवावें, ही स्थिति नानांच्या अंगीं चिकटविल्या जाणाऱ्या उठावाच्या स्वयंप्रेरित पुढारीपणाला दुजोरा देणारी नाहीं. इंग्रजांनीं केलेल्या नानाच्या स्वभावाचें वर्णन त्यांच्या ठिकाणीं चळवळ, कल्पकता, स्फूर्तिदायकता, वगैरे गुणांचा अभाव सिद्ध करणारें आहे. तथापि शिपायांनीं त्यांना पेशवेपदावर चढविलें व त्यांच्याकडे राज्यकर्तृत्व आलें.

### नानांचा राज्यकारभार

आपल्या नव्या राज्यांत कानपुरास एक कोतवाल नेमून नानांनीं तेथील नागरिकांच्या संरक्षणाची व्यवस्था केली. फौजेला अन्न पुरविण्याच्या कामासाठीं एक इसम उभा केला. नानांचा सहकारी बाबाभट याच्या अध्य-क्षतेनें अझीमुल्ला, ज्वालाप्रसाद इत्यादिकांचें एक न्यायमंडळ अस्तित्वांत आलें. न्यायमंडळानें गुन्हेगार म्हणून समोर येणाऱ्या इसमांचे हातपाय तोडण्यासारख्या शिक्षा ठोठावल्या, कुणाची गाढवावर बसवून धिंड काढली,

कुणाकडून कैदेच्या सक्तीनें लष्करी गरजेचा जिन्नस मिळविला व पुढें पुढें तर हें न्यायमंडळ आपल्या कामाची मर्यादा ओलांडून मन चाहील तसा कारभार करूं लागलें, अशी माहिती इंग्रजांच्या कागदपत्रांतून सादर झालेली आहे. एकीकडे इंग्रजांशीं लढाई चाललेली, दुसरीकडे इंग्रजांच्या चढाईचें भय, दरदिवशीं निरनिराळ्या ठिकाणांहून येणाऱ्या अनियंत्रित शिपायांचे जमाव वाढत आहेत, आसपासचे जमीनदार आपले जुने हेवेदावे उगवून घेण्याच्या झटापटींत गुंतलेले आहेत, या ओढाताणींत नानासाहेबांची राज्ययोजना अगदीं शिथिल स्वरूपाची असल्यास नवल वाटायला नको.

## नानांचा शेवट

नानासाहेबांनीं १८५७ च्या १७ जुलईला बिठूर सोडल्यावर कानपूर-पासून २५ मैलांवर असलेल्या फत्तेपूर चौरासी या गांवीं आपल्या एका स्नेहीं जससिंग नांवाच्या जमीनदाराकडे जाऊन वस्ती केली. हा मित्र हेवलॉकच्या एका लढाईत मरण पावला. तरी ऑक्टोबर अखेरपर्यंत किंबहुना नोव्हेंबर मध्यापर्यंत नानांनीं त्या गांवचा मुक्काम हलविला नव्हता. त्यांचे प्रेषित मात्र अनेक स्थळीं फिरत होते, असे इंग्रजी बातमीपत्रांतून उल्लेख आढळतात. सप्टेंबरांत ग्वालेरची फौज आपल्या बाजूस वळविण्यासाठीं त्यांनीं झांशीच्या राणीप्रमाणेंच तेथें आपला वकील पाठविला होता. त्यानें ग्वालेरच्या शिपायांना मोठमोठे लष्करी अधिकार व पैसा देण्याचें कबूल केलें, असें वृत्त इंग्रजांच्या आपसांतील पत्रव्यवहारांत दृष्टीस पडतें. हा वकील म्हणजे तात्या टोपे असले पाहिजेत, असें निराळ्या साधनांवरून ठरवितां येतें. एकदां गंगेच्या अलीकडे येण्याचा त्यांचा विचार होता व त्याप्रमाणें ते काल्पीस आले असावे असें सुचविणारे कांहीं इंग्रजी कागद आहेत. एकदां ते लखनौस गेले तेथें हजरत बेगमेनें त्यांचा यथोचित सन्मान केला. १८५८ च्या सुरवातीस नानासाहेबांनीं रोहिलखंडाकडे मोर्चा वळविला. कानपुरास डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत कॅम्बेलनें ग्वालेरच्या लष्कराशीं जी लढाई केली, त्या वेळीं नानासाहेब तेथें उपस्थित होते कीं नव्हते याचा निर्विवाद निर्णय करण्याजोगीं साधनें उपलब्ध नाहींत. मार्च महिन्यांत शहाजहानपूर, (ता. १२ ) अलीगंज ( ता. १९ ) बरेली ( ता. २५ ) अशी त्यांच्या प्रवा-साची नोंद आढळते. बरेलीस खानबहादुर खान, फेरोजशहा इत्यादि पुढा-

त्यांशीं त्यांनीं खलबतें करून एप्रिल अखेरीस तें शहर सोडलें. नंतर फरीदपुरास त्यांनीं आपलें ठाणें नेलें व तेथून ते पीलीभीत जिल्ह्याच्या बीसलपूर गांवीं जाऊन राहिले. इंग्रजांच्या पाठलागांतून निसटण्याकरितां हें स्थलान्तर चालू होतें. १८५७ मध्यें नानासाहेबांना पकडणाराला ५० हजार रुपयांचें बक्षीस मिळेल असें विलोभन इंग्रजांनीं सामान्य जनतेपुढें ठेवलें. १८५८मध्यें ही बाक्षिसाची रक्कम दुपटीनें वाढविण्यांत आली. नानासाहेबांनीं आपल्या बचावासाठीं आपल्यासारखींच हुबेहूब दिसणारीं माणसें आपल्या भोंवतीं जमविलीं व आपल्या वस्तीजवळ जो कोणी फार बारकाईनें चौकशी करतांना सांपडेल, त्याला उभ्या जागीं तत्काळ ठार करण्याची व्यवस्था अंमलांत आणली. इंग्रजांनीं बरेली जिंकल्यावर नानासाहेब व हजरत बेगम या दोघांनीं इंग्रजांसमोर हटत हटत नेपाळी हद्दीच्या जंगलाची वाट धरली. पुढें त्यांचें काय झालें याचा शंकातीत निर्णय करण्याचीं साधनें उपलब्ध नसलीं तरी १८५९च्या शेवटच्या तिमाहींत त्यांना मृत्यु झाला असल्याबद्दल विश्वास बाळगणारे बरेच इंग्रज अधिकारी त्या काळामध्यें होते. कानपुरास १८५९ मध्यें कलेक्टर शेअरर यानें आपल्या आठवणींत नानांचा एक लष्करी हस्तक ज्वालाप्रसाद याच्याशीं झालेल्या संवादांतून नानांच्या मृत्यूविषयीं वरीलप्रमाणें निष्कर्ष नमूद केलेला आहे. नेपाळच्या सरहद्दीवरील तेव्हांचा इंग्रज सेनापति होप-ग्रँट याच्या प्रकाशित रोजनिशींत नानांचा शेवट झाल्याचा वरीलप्रमाणेंच निर्देश आहे. तरी नाना विसाव्या शतकाची पंचविशी उलटेपर्यंत जीवंत होते, असें मानणारे कांहीं लोक यासंबंधाची माहिती मिळविणारांना ठाऊक आहेत. परंतु नानांनीं बिठूर सोडल्यानंतर किंवा त्यांनीं नेपाळांत प्रवेश केल्यावर स्वदेशांतूनच नव्हे तर शिपाई-गर्दीच्या इतिहासांतूनहि ते बाहेर पडले, हें तात्पर्य टाळतां येण्यासारखें नाहीं.

**नानांचीं पत्रें**

लखनौ इंग्रजांनीं जिंकलें व या कामीं नेपाळच्या जंगबहादुरानें त्यांस मदत केली हें ठाऊक असूनहि नानासाहेब त्याला पत्रें लिहीत होते; परंतु नानासाहेबांनीं नेपाळांतून इंग्रज राज्यकर्त्यांना लिहिलेलीं पत्रें विचारांत घेतल्याखेरीज त्यांचें प्रकरण पुरें व्हावयाचें नाहीं. १८५९ च्या एप्रिलांत नानांनीं इंग्रजांशीं पत्रव्यवहार सुरू केला. पहिल्या ता. २० च्या पत्रांत ‘प्रत्यक्ष ज्यांनीं इंग्रज बायकामुलांचा खून केला, त्यांना तुम्ही क्षमा करायला

तयार असून मला मात्र क्षमा करायला तयार नाहीं' यावद्दल आश्चर्य व्यक्त केलें असून पुढें 'आपण शिपायांच्या उठावांत केवळ निरुपायानें मिसळलों' असें म्हटलें आहे. कानपूरच्या गोऱ्या सेनापतीनें नानांना आपल्या बचावाच्या जागीं बोलावलें होतें, पण त्यांच्या कुटुंबियांना तेथें नेण्याला सदर सेनापतीनें परवानगी दिली नाहीं. आपण सेनापतीचें बोलावणें पतकरलें तर बाहेर असलेल्या कुटुंबियांना शिपाई ठार करतील या भीतीमुळें नानांनीं तें निमंत्रण नाकारलें असा मजकूर पत्राच्या एका भागांत आलेला आहे. नानासाहेबांनीं उठावाची व इंग्रजांच्या कत्तलीची सगळी जबाबदारी शिपायांवर टाकून आपली क्षमेची मागणी सजविली आहे. माफीच्या मागणीचा मजकूर संपवून नानासाहेबांनीं त्याच पत्रांत शिपायांच्या शौर्याची वढाई उच्चारून आपण आजवर लढलों व यापुढेंहि लढूं. पुढच्या लढाईत तुमच्या रक्ताचा गुडघाभर खोल असा प्रवाह निर्माण होईल. मी मरणाला भीत नाहीं. केव्हांतरी मरण येणारच तर त्याची भीति कशाला? अशीहि धमकी दिलेली आहे. (माफीची मागणी व लढाईची धमकी या चमत्काराविषयीं चर्चा करायला नको.) या पत्राला इंग्रजांकडून राणीच्या जाहीरनाम्याच्या हवाल्याचें उत्तर गेलें. 'राणीच्या हातचें व तिचा खास शिक्का-मोर्तबाचें पत्र फ्रेंच सेनापतीच्या किंवा त्याच्या दुय्यमाच्या हस्तें माझ्याकडे पाठविल्यास मी तुम्हांला शरण येईन, एरवीं नाहीं. कारण तुम्ही दगलवाज आहां' अशा अर्थाचें उत्तर नानांनीं पाठविलें. त्यावर 'आपण पूर्वीच्या पत्रापेक्षां अधिक कांहीं लिहूं शकत नाहीं. तुमचें म्हणणें कळविण्यासाठीं एखादा इसम पाठवा. त्या इसमाचा घातपात होणार नाहीं.' असें इंग्रज अधिकाऱ्यानें कळविलें व हा पत्रव्यवहार थांबला (याचे एक कारण कॅनिंगची त्याविषयीं नापसंती हें आहे) आणखी अशाच थाटांचीं नानासाहेबांचीं कांहीं पत्रें आहेत असें म्हणतात; पण तीं प्रकाशांत आलेलीं नाहींत. नानांचीं हीं पत्रें त्यांच्या नेतृत्वाची गाइली जाणारी महती कितपत योग्य याचा अंदाज करायला उपयोगी पडणारीं आहेत.

नानांचे बंधु बाळाराव यानें इंग्रजांस लिहिलेल्या पत्रांत 'तुम्ही माझे काय वाटेल तें करा. शिपाई-गर्दीत नानांनीं मला लोटलें. शिपाई व नाना यांच्या कोंडींत सांपडल्यामुळें नाना सांगतील तसें मला वागावें लागलें.' अशा तऱ्हेचा आशय आहे. नानासाहेबांनीं आपलें पत्र हें केवळ पत्र नसून तो एकप्रकारें जाहीरनामा असल्याचें सुचविलें आहे. नाना व बाळाराव

यांच्या पत्रांचा निर्देश नेपाळ हद्दीवरील इंग्रज सेनापतीच्या रोजनिशींत पूर्वी झालेला होता. आतां ऐनजिनसी तीं पत्रें लोकांपुढें आलेलीं आहेत.

**नानांचे हस्तक**


नानांचे प्रेषित या नात्यानें दक्षिण महाराष्ट्रांत इंग्रज-विरोधाची खटपट करणारांचे उल्लेख पुष्कळ आहेत; पण गाजले असे दोनच–एक तात्या व दुसरा अझीमुल्ला. नानांच्या बरोबर कानपूरच्या पहिल्या धुमश्चक्रींत अझीमुल्ला या एका मुसलमानाचें नांव कांहीं काळ दृष्टीस पडतें. नानांच्या वतीनें बाजीरावाच्या पेन्शनसंबंधांत खटपट करण्यासाठीं अझीमुल्ला लंडनला जाऊन परत आला. परत येतांना क्रिमियामध्यें इंग्रज-फ्रेंचांनीं रशियाशीं चालविलेलें युद्ध पाहण्याची संधि त्यानें घेतली. तेथें त्याचा इंग्रजांच्या बळाविषयीं प्रतिकूल ग्रह होऊन स्वदेशीं परतल्यावर त्यानें इंग्रजांचें राज्य उलथून पाडण्यासाठीं जो उद्योग केल्याचा संदिग्ध संदर्भ आढळतो, त्याचें स्वरूप स्पष्ट तपशिलाच्या अभावीं नीट आकलन होत नाहीं. परंतु इंग्रजांचें वर्चस्व उपटून टाकण्याचा त्याचा संकल्प असल्याची गोष्ट महमद अली नांवाच्या त्याच्या जोडीदारानें हेर या नात्यानें कैदेंत पडल्यावर आपल्या पहारेकरी इंग्रज अंमलदाराला सांगून टाकल्याचा पुरावा आहे. महमद अली हा नानांच्या खर्चानें अझीमुल्ला-बरोबर एक मदतनीस म्हणून लंडनला गेला होता. क्रिमियाच्या भागांत या दोघांना कोणी रशियन भेटले व हिंदुस्थानांत इंग्रजाविरुद्ध उठाव झाल्यास आपण मदत करूं असें त्यांनीं आश्वासन दिल्याची माहिती महंमद अलीच्या हकीकतींत आहे. महंमद अली १८५८ च्या प्रारंभीं फाशीं गेला व त्यानंतर नेपाळच्या हद्दींत अझीमुल्लाचा अंत झाला. अझीमुल्ला ही दारिद्र्यांत वाढलेली परंतु तैलबुद्धीची देखणी व्यक्ति होती. सामान्य खिदमतगारांपासून तों शिक्षक मुंशीच्या दर्जापर्यंत अझीमुल्ला वाढत गेला. १८५७ च्या जानेवारींत तो अंबाल्यास गेल्याचा उल्लेख आढळतो. दिल्लीकडे जाणाऱ्या उठावाच्या शिपायांना लगामीं लावून कानपुरास नानासाहेबांनीं सवता सुभा स्थापावा, अशी मसलत देणारा अझीमुल्ला, अशी त्याच्याबद्दल आख्यायिका आहे. कानपुरास इंग्रजांना सांपडलेल्या कागदांत कांहीं फ्रेंचांना व तुर्की सुलतानाला अझीमुल्लानें लिहिलेलीं पत्रें सांपडलीं. तीं पाठविलीं गेलीं कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे. इंग्रजांनीं कानपूर जिंकल्यावर नानासाहेब व अझीमुल्ला हे अज्ञातवासांत अधिकाधिक मागासत गेले ते कायमचेच.

**नानांविषयीं एकमत**

शिपाईगर्दी मोडून इंग्रजी राज्य येथें पूर्वींपेक्षां अधिक बळकटीनें स्थिरावल्यानंतरच्या काळांत नानासाहेबांकडे एखादा भाविक अपवाद सोडल्यास देशांतील सुविद्य विचारवंतांनीं फारशा कौतुकादरानें पाहिल्याचा अनुभव दृष्टीस पडत नाहीं. त्यासंबंधीं लोकांना काय वाटत असावें याचें अनुमान १९१६ नंतर झांशीकर लक्ष्मीबाईच्या पुण्यस्मरणप्रसंगीं प. वा. श्री. न. चिं. केळकर यांनीं जे उद्गार काढले त्यावरून करतां येईल. नानासाहेब शिपाईगर्दीच्या लाटेंत सांपडले यामुळें त्यांच्या ख्यातीला निराळी गति लागली, हा अभिप्राय केळकरांनीं पुढीलप्रमाणें सांगितला आहे:—'नानासाहेब बंडवाले म्हणून प्रसिद्ध आहेत, पण खरा इतिहास तसा नाहीं. इंग्रज अधिकाऱ्यांची खुषामत करणारे, त्यांना मेजवान्या देणारे सरदार अशी त्यांची प्रसिद्धि होती. या सगळ्याचा हेतु बाजीरावसाहेब मेल्यावर जें पेन्शन बंद झालें तें परत मिळावें असा स्वार्थी होता.' हा इंग्रजांची खुषामत करणारा गृहस्थ 'बंडवाला' कसा झाला, याची हकीकत केळकरांनीं 'समकालीन लोकांनीं लिहिलेला व सांगितलेला तोच खरा इतिहास' हा सिद्धान्त प्रस्तावनेप्रमाणें उच्चारून नमूद केलेली आहे. त्यांना धारवाडच्या सुभेदार घराण्यापैकीं एक वृद्ध गृहस्थ १९१६ सालीं ब्रह्मावर्तास भेटले. ते बंडाच्या वेळीं हजर होते. त्यांच्या तोंडून ऐकलेल्या माहितीचा भावार्थ असा—बंडवाले नानांना भेटले व 'आमचे पुढारी व्हा नाहीं तर मरा' असा पेंच त्यांनीं नानांपुढें टाकला. यामुळें नानासाहेबांना त्यांत सामील व्हावें लागलें. इंग्रज या देशांतून जावें म्हणून हें बंड नव्हतें तर तें अन्यायाविरुद्ध होतें. बंडवाले दिल्लीकडे निघाले, पण दिल्ली तर दूर होती, तेव्हां उतावळेपणानें ते जवळपास राजा शोधूं लागले व पेशव्याचा वंशज असल्याचें कळलें, त्याला शिपायांनीं पुढारी बनविलें. अशा अर्थाचा मजकूर केळकरांच्या प्रकाशित भाषणांत आहे. (इतिहासखंड, इतिहासविहार पान ९२४–९२७).

## .... लक्ष्मीबाई

१८५७ च्या शिपाईगर्दींत झांशीच्या राणी लक्ष्मीबाईनीं जें कर्तृत्व दाखविलें त्यांचा वृत्तान्त पूर्वीं वाचकांच्या नजरेपुढून गेलेला आहे. एक अल्पवयस्क, राज्यहीन, विधवा स्त्री इंग्रजांनीं फसगत केल्यामुळें स्वाभिमानानें



राणी लक्ष्मीबाईचें हस्ताक्षर
( शेवटच्या ओळींतील )

शिपायांच्या उठावापायीं माजलेल्या धामधुमींत शिरली व रणांगणांत पडली अशी तिची थोरवी मागें दाखल केलेली आहे. राज्य खालसा झालें हें लक्ष्मी-बाईच्या काळजाला १८५४ पासून सतत टोंचणारें खरें दुःख होतें. त्या दुःखाची तीव्रता इंग्रजांनीं निरनिराळ्या प्रकारें वाढविली. परंतु मिळणारा तनखा व पूर्वार्जित खाजगी संपत्ति यांच्या जोरावर होणारें दुःख पोटांत ठेवून त्या आपलें आयुष्य सुखांत घालवीत होत्या. झालेल्या अन्यायाचें परिमार्जन व्हावें, अशा हेतूनें त्यांचा उद्योग चालू होता. तथापि त्या आपल्या अंतरंगांत इंग्रजाविरुद्ध शस्त्र चालविण्याच्या भावना पोषींत होत्या, असें मानायला पुरावा नाहीं. त्यांचें राज्य इंग्रजांनीं आपल्या सत्तेंत जिरवून टाकलें म्हणून शिपायांना विषाद उद्वेग वाटत होता, असेंहि मानायला जागा नाहीं. झांशीच्या बंदोबस्ता-करितां शिपायांच्या ज्या पलटणी आल्या त्यांचा व लक्ष्मीबाईचा राज्य गेल्याच्या दुःखानिमित्त कांहीं अंतःस्थ संबंध उठावापूर्वी उत्पन्न झालेला नव्हता. उठा-वाच्या शिपायांना दिल्लीचा ओढा होता. लक्ष्मीबाईंना झांशीस सोडून त्यांनीं सरळ दिल्लीचा रस्ता धरला. राणीसाहेबांना अशा असुरक्षित स्थितींत इंग्रजांच्या तोंडाकडे पाहण्याखेरीज गत्यंतर नसल्यानें त्यांनीं इंग्रजांना आपली दुर्दशा कळविली. शिपायांच्या उठावाचा व त्यांच्या अत्याचारांचा बाईंना मुळींच स्पर्श झालेला नाहीं, अशी खात्री करून घेऊन जबलपूरच्या इंग्रज अंमलदारानें राणीसाहेबांना इंग्रजांच्या वतीनें राज्य करण्याची संमति दिली. १८५७ च्या नोव्हेंबरपर्यंत बाईसंबंधाचा इंग्रजांचा विश्वास डळमळलेला नव्हता; पुढें त्याला धक्का बसून बाईंना युद्धाची कांस धरावी लागली, अशी माहिती आतां लोकां-समोर आलेली आहे. परंतु या माहितीचा बराच भाग १८९४ सालीं प. वा. दत्तात्रय बळवंत पारसनिसांनीं ग्रंथरूपानें सादर केला तेव्हां लक्ष्मीबाईच्या गुणांची ओळख व पारख लोकांत सुरू झाली. केसरीनें पारसनिसांच्या ग्रंथाचा गौरव एका अग्रलेखांत केला व तो लेख लो. टिळकांच्या लेखसंग्रहांत प्रसिद्ध झालेला आहे. दुसरा लेख १८९५ सालीं विविधज्ञानविस्तार मासिकाच्या दोन अंकांत छापलेला असून तो प. वा. राजारामशास्त्री भागवतांनीं लिहिलेला आहे. साठ वर्षांमागें लक्ष्मीबाईची योग्यता कोणत्या समजुतीच्या मापानें जोखली जात होती, त्याची कल्पना करून देण्याला हे दोन्ही लेख उप-योगाचे आहेत. तेव्हां शिपाईगर्दी म्हणजे राज्यक्रान्तीची उसळी ही व्याख्या अस्तित्वांत आलेली नव्हती.

**लो. टिळकांचें मत**

टिळकांची विचारशक्ति या व्याख्येपासून १८९५ सालीं दूर असल्यानें त्यांनीं असह्य छळानें बेफाम होणाऱ्या गरीब गाईच्या दाखल्यानें लक्ष्मीबाईच्या लष्करी व्यवहाराचा केसरीच्या वाचकांना परिचय करून दिलेला आहे. लक्ष्मीबाई या स्वयंप्रेरणेनें इंग्रजाशीं लढण्याला उभ्या राहिल्या असाहि टिळकांचा ग्रह नव्हता. वय लहान तशीच बुद्धीहि कोती यामुळें त्या कुणाच्या तरी गैरसल्ल्यानें युद्धांत पडल्या असें टिळकांचें मत तेथें स्पष्ट दृष्टीस पडणारें आहे. यासाठीं टिळकांची विचारसरणी त्यांच्याच शब्दांत पाहणें बरें. 'झांशीची राणी कोणी बंडखोर कृत्या नसून कपटपटु डलहौसीच्या अपहार-बुद्धीनें सर्वस्वीं नाडलेली व अतिशय जुलमामुळें बेफाम होऊन गेलेली गरीब गाय होती असें त्यांनीं (पारसनिसांनीं) मोठ्या खुबीनें दाखविलें आहे. निकट पाठलाग केला असतां निरुपद्रवी हरणाहि पारध्यांवर उलटतात....... तेव्हां लक्ष्मीबाईसारखी मानी स्त्री आपलें नैसर्गिक भीरुत्व क्षणभर विसरून जाऊन बंडखोरांस मिळाली यांत नवल तें कोणतें?.......नाना किंवा तात्या किंवा इतर बंडवाले यांचे दुसरे कांहीं हेतु असतील; पण झांशीची राणीतरी इंग्रजांच्या जुलुमाला त्रासून व स्वेच्छेविरुद्ध त्या भोंवऱ्यांत सांपडली व स्त्री जाति पडल्यामुळें लवकर निसटणें तिला दुरापास्त झालें, हें प्रस्तुत चरित्रकारांनीं चांगलें दाखविलें आहे.' यानंतर राणी इंग्रजांविरुद्ध नव्हती ही कल्पना जमेस धरून टिळकांनीं 'सर ह्यू रोज आल्याबरोबर सर्व संशयाचा निरास करण्यास तिनें मागेंपुढें पाहिलें नसतें व तसें केलें असतें तर सर ह्यूरोज सारख्या माणसानें तिचें कल्याण केलें असतें असें आम्हांस वाटतें. पण राणीनें इंग्रज आल्याबरोबर एकदम किल्ल्यांत तटबंदी करून लढाईस सुरुवात केली. कदाचित् भोंवतालच्या लोकांनीं तिला तसें करणें भाग पाडलें असेल; पण स्त्रीस्वभावाच्या साहजिक कोतेपणानें ती कोणाच्यातरी नादीं लागून पुढें बंडवाल्यांत अग्रगण्य झाली हें आपणांस कबूल केलें पाहिजे.' बाईची श्रेष्ठ योग्यता सिद्ध करण्यासाठीं फाजील तरफदारी करणें निषिद्ध असें सुचवून टिळकांनीं लक्ष्मीबाईच्या कर्तृत्वाचें समालोचन करतांना म्हटलें आहे:—

'लक्ष्मीबाई किती झाली तरी माणूस, त्यांतून स्त्री-जाति व त्यांत मानी स्वभावाची असून डलहौसीसारख्या अधाशी गव्हर्नराच्या जुलुमानें गांजलेली,

तेव्हां तिच्या हातून एखादी राजकारणी चूक झाली असली तरी कोणी सुज्ञ मनुष्य तिला फारसा दोष देणार नाहीं. ' प्रस्तुत अवतरणांत टिळकांचे अनेक शब्द, वाक्यें आणि वाक्यांश मननीय तर आहेतच, परंतु लक्ष्मीबाईच्या चरित्राविषयीं अवास्तव कल्पना बाळगणारांना धक्का देणारे आहेत.

## विविधज्ञानविस्तार व लक्ष्मीबाई

विविधज्ञानविस्ताराच्या लेखामध्यें शिपाईगर्दींतील महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या कामगिरीचें स्वरूप अतिशय बारकाईनें तपासलेलें आहे. बाजीरावाचें पेन्शन आपल्याला देऊं केलें नाहीं म्हणून नाना तर राज्य हिरावलें म्हणून लक्ष्मीबाई इंग्रजावर रागावलेल्या होत्या. लक्ष्मीबाईविषयीं त्या लेखांत जो मजकूर आहे तो असाः—' जर झांशी संस्थान खालसा न होतें तर झांशीकरीणहि मिळालेल्या अधिकाराचा व दौलतीचा उपभोग घेऊन झांशी मुक्कामीं किंवा झांशी इलाख्यांत अनेक ठिकाणीं बांधलेल्या रंगमहालामध्यें सुखांत आणि आनंदांत आपली ज्वानी सफळ करती. तेव्हां नानासाहेब आणि झांशीकरीण हीं दोन बडीं पात्रें बंडाच्या रंगभूमिवर आलीं, तीं नाहींत धर्मासाठीं आलीं, नाहींत देशासाठीं आलीं, तर निवळ स्वार्थ साधून घेण्यासाठीं आलीं. ज्यांच्या वाजवी हक्कांची पायमल्ली वरिष्ठांकडून होते, त्यांच्या मनांत जर सूड घेण्याचें आलें तर त्याबद्दल दोष देणें वाजवी होणार नाहीं. पण जे हक्क बुडविल्यामुळें बंडवाल्यास मिळाले ते उघड आपल्या बुडालेल्या हक्कासाठीं मिळाले. राज्यसंस्थापनेसाठीं किंवा धर्मरक्षणासाठीं मिळालेले नव्हते.....झांशीचा प्रांत खालसा होण्याबरोबर झांशीकरणीनें आपला आवेश दाखविला असता तर ती बुडवलेल्या राज्यासाठीं भांडली असें म्हणतां आले असते. पण राज्य बुडवल्यानंतर कैक वर्षे व दिवस चैनबाजींत काढून पुढें पांच वर्षांनीं बंडवाल्याकडे वळणारी झांशीकरीण बुडवलेल्या राज्यासाठीं नव्हे तर उघड सूड घेण्याच्या हेतूनें म्हणून इंग्रजाच्या विरुद्ध उलट फिरलेली दिसते. ' याप्रमाणें लक्ष्मीबाईच्या चरित्राची झडती संपल्यावर पुनः ' हक्काचा दावा मांडून तो न मानल्यास बंडवाल्यांना मिळूं असें कळविलें असते तर सुरेख झालें असतें ' अशी आपल्या मताची परिस्फुटता करून त्यावर ' हीं पात्रें निवळ स्वार्थ साधण्याच्या किंवा सूड घेण्याच्या नादास लागलीं. ' या विधानाचें शिक्कामोर्तब ठोकलेलें आहे.

वि. ज्ञा. विस्ताराच्या लेखांत 'कथारसी' आणि 'वाग्जाळी' असे अर्वाचीन लेखनपटूंचे दोन वर्ग पाडून पारसनीस हे 'वाग्जाळी' पैकीं असें म्हटलें आहे. पारसनिसांच्या वाग्जालाची गुंतागुंत सोडवून लक्ष्मीबाईंना राज्य-कारभाराचें ज्ञान नव्हतें, माणसांची पारख नव्हती, जवळ बाळगलेलें लष्कर अवसानघातकी होतें, पदरच्या माणसांचा फाजील विश्वास त्यांच्या ठिकाणीं होता वगैरे बाईंच्या अंगचे दोष पारसनिसांचीं विधानें घेऊनच तेथें निदर्शनास आणलेले आहेत. आज गोडसे भटजींच्या पुस्तकाच्या आधारें त्यांतल्या कांहीं दोषाचें निराकरण होऊं शकेल, पण त्या पुस्तकाचें हस्तलिखित पारसनिसांपुढें असून त्यांनीं त्याचा योग्य उपयोग केलेला नाहीं, ही गोष्ट झांकली जात नाहीं. शेवटीं लक्ष्मीबाईंची महती त्यांना रणांत मृत्यु आला या एका घटनेवर अवलंबून असल्याचें वि. ज्ञा. विस्तारांतील लेखामध्यें स्पष्ट म्हटलेलें आहे. इंग्रजांचें राज्य उलथून पाडून नवें राज्य निर्माण करणें किंवा स्वधर्माचें रक्षण साधणें हे लक्ष्मीबाईंच्या कर्तृत्वाला चिकटविले जाणारे गुण साधार नाहींत, असें साठ वर्षांमागील विचारवंतांना वाटत होतें. हा बोध टिळक व भागवत यांच्या लेखांच्या द्वारें स्वीकारतां येईल. १८९५ नंतर अनेक वर्षांनीं शिपाईगर्दीवर पारतंत्र्यनिवारणाच्या प्रयत्नांचा रंग चढविण्यांत आला. तथापि तो रंग अयोग्य होता असें सांगण्याचें धैर्य प. वा. केळकरांनीं केलें. नानासाहेबांविषयीं त्यांनीं जें म्हटलें त्याची वाच्यता पूर्वी नानांच्या संदर्भात केली. आतां लक्ष्मीबाईंना अनुलक्षून त्यांनीं जे विचार व्यक्त केले ते वाचकांसमोर ठेवावयाचे आहेत.

**प. वा. केळकरांचे उद्गार**

१९१६ सालानंतर केळकरांना लक्ष्मीबाईंच्या पुण्यस्मरणाचा योग आला व त्यांनीं आपल्या भाषणाच्या प्रारंभीं 'हा उपक्रम नवा' असे शब्द वापरले आहेत त्यांवरून लक्ष्मीबाईंची पुण्यस्मरणीयता किती अलीकडची आहे, हें सहज लक्षांत येईल. केळकरांच्या कोणा एका इतिहासप्रेमी परिचितानें पुण्य-स्मरणाच्या प्रसंगीं उपस्थित राहण्याचें टाळलें, त्याच्या अनुरोधानें केळकर म्हणालेः– 'त्या (लक्ष्मीबाई) बंडांत सामील झाल्या एवढाच त्यांच्या बाबतींत दोष दाखविण्यांत येतो. त्या बंडांत सामील झाल्यावर ज्या रीतीनें शेवट व्हावयाचा त्या रीतीनें झाला....... त्यांच्यांत जे उदात्त गुण दिसून आले त्यांची आठवण म्हणून हा उत्सव करीत आहोंत. यांत वर्तमान राजकारण नाहीं व गतकालाचेंहि राजकारण नाहीं.... बंड करा असें कोणी सांगत नाहीं.'

याप्रमाणें प्रस्तावना करून पुढें केळकरांनीं इतिहासाच्या दृष्टीनें आपले जे विचार मांडले ते जास्त महत्त्वाचे आहेत. 'शिवाय आपण जर इतिहास चाळला तर असें दिसून येईल कीं, ज्या राजकीय दृष्टीनें बंडाला बंड म्हणतों त्या दृष्टीनें लक्ष्मीबाईसाहेबांनीं बंड केलें नव्हतें. इंग्रज सरकारला येथून घालवून द्यावें, असा त्यांचा हेतु नव्हता; तर त्यांची सरकारविरुद्ध तक्रार होती. लक्ष्मीबाईंना शेवटीं सरकारकडून जी वागणूक मिळाली त्यामुळें त्या बेफाम झाल्या व शेवटीं नाइलाजानें बंडांत सामील झाल्या.' यानंतर नानासाहेबाकडे दृष्टिक्षेप करून पुनः लक्ष्मीबाईकडे केळकर वळले व म्हणाले:— 'लक्ष्मीबाई बंडांत सामील झाल्या तरी त्यांत राज्यक्रांति नव्हती. ही एवढी हकीकत सांगण्याचें कारण कांहीं सुज्ञ माणसांना अजूनहि या बाबतींत शंका येते म्हणून हा वृत्तान्त सांगितला.'

## .... बेगम हजरत महाल

लखनौस इंग्रज लोक रेसिडेन्सीमध्यें कोंडले गेल्यावर कलकत्त्यास नेऊन ठेवलेल्या नबाबाच्या बेगमांपैकीं एक हजरत महाल नांवाची बेगम नबाब शाहीच्या पुनरुज्जीवनाकरितां शिपाईगर्दीच्या अघाडीस आली. ही बेगमेच्या दर्जास पोंचण्यापूर्वी एक नर्तकी होती. नबाब वाजिदअलीची मेहरनजर तिच्याकडे वळून तिचा बेगम या नात्यानें नबाबी जनानखान्यांत केव्हां प्रवेश झाला व ती कितव्या क्रमांकाची बेगम हें समजण्याला साधनें नाहींत. बिर्जीस कद्र या नांवाचा ११ वर्षे वयाचा एक मुलगा तिला असल्यानें बाकीच्या कित्येक बेगमांची उपेक्षा करून शिपाईगर्दीनें हजरत महालकडे पुढाकार सोंपवून तिच्या मुलाला नवाबी सिंहासनाचा अधिकारी मानलें. जुलईच्या आरंभीं बिर्जीस कद्राच्या नांवानें हजरत महाल राज्याधिकार गाजवूं लागली. तिनें पुष्कळशीं हिंदुमुसलमान माणसें निरनिराळ्या हुद्द्यांवर नेमलीं. लखनौस फैजाबादचा मौलवीदेखील आलेला होता. त्यालाहि शिपाई आपला नेता मानीत असल्यानें मौलवी व महाल यांचे आपसांत न पटण्याचे प्रसंग वारंवार उत्पन्न व्हावे याचें आश्चर्य वाटायला नको. मौलवी अत्यंत प्रभावशाली वक्तृत्वाचा, इंग्रजांना अखंड पाण्यांत पाहणारा आणि साहसी आचरणाचा असला तरी नबाबशाहींत वाढलेल्या परंपरासक्त शिपायांना आणि जमीनदारांना नबाबाचे बेगमेसारखे व तिच्या मुलासारखें नातलग जितके प्रिय व आदरणीय वाटत असतील तितके मौलवी किंवा त्यासारखे इतर पुरुष वाटणें शक्य नव्हते,

हें सरळ आहे. यामुळें मौलवी हलका पडून बेगमेचे हुकूम शिपाई जास्त प्रमाणांमध्यें ऐकत होते. लढाईचा भार शिपायांवर असल्यानें त्यांनीं स्वतःचें वजन राहील अशा बऱ्याच अटी हजरत महालशीं झालेल्या करारांत घातल्या होत्या; त्यांतली एक अट बिर्जीस कद्रानें स्वतःला दिल्लीच्या बादशाहीचे अंकित मानावे ही होती, म्हणून त्यानें 'वली' हें नांव स्वीकारलें होतें; पण त्या अटींचा अंमल कटाक्षानें कधींच झाला नाहीं. शिपाई, मौलवी आणि हजरत महाल याखेरीज इतर बेगमा हा लखनौस इंग्रजांशीं चाललेल्या झगड्यांत एक चौथा पक्ष होता. हजरत महाल विजयी होऊन मुलाच्या नांवानें उद्यां राज्य करूं लागल्यास आपली वाट काय होणार याविषयीं बाकीच्या बेगमांना काळजी पडली होती. त्यांनीं हजरत महालसमोर आपली काळजी व्यक्त केली, परंतु हजरत महालनें या बेगमांना झिडकारलें. लखनौ काबीज केल्यावर एका इमारतीमध्यें बऱ्याचशा बेगमा इंग्रजांना आढळल्या व त्यांनीं त्या आपल्या ताब्यांत घेतल्या, ही माहिती वाचकांच्या स्मरणांत असेल. या बेगमा इंग्रजांना अनुकूल असल्याबद्दल शिपाईगर्दीच्या लखनौंतील इतर पुढाऱ्यांना संशय होता. परंतु सदर बेगमा इंग्रजांच्या तावडींत सांपडूनहि शिपाई शेवटीं विजयी होतील ही आशा इंग्रजांच्या निदर्शनास आणायला चुकल्या नाहींत हें येथें ध्यानांत ठेवणें बरें.

**बेगमेचें एक वक्तृत्व**

मौलवी, महाल व शिपाई या तिघांना शिकस्त करूनहि कोंडींतील इंग्रजांचा पराजय करतां आला नाहीं. हेवलॉकला ऑगस्टांत लखनौजवळ जाऊन कानपुरास माघारी फिरावें लागलें; सप्टेंबर अखेरीस हेवलॉक–आउटरॅम हे दोघे रेसिडेन्सीच्या कोंडीबाहेर निघूं शकले नाहींत, पुढें नोव्हेंबरांत कॅम्बेलनें लखनौस शिपायांना ठोकलें, पण तो तेथें न राहतां कोंडींतल्या इंग्रज लोकांना बरोबर घेऊन कानपुरास गेला, वगैरे गोष्टींच्या आधारानें इंग्रजांचा कमीपणा सांगण्याचा अलीकडे कित्येकांचा प्रघात आहे. पण रेसि-डेन्सीचा शिपायांना पाडाव करतां आला नाहीं, हेवलॉक, आउटरॅम, कॅम्बेल यांना कायमचें अडवितां आलें नाहीं किंबहुना रेसिडेन्सींतल्या माणसांचें कानपूरच्या रस्त्यावर अनेक मैल पसरलेलें लटांबर कॅम्बेल नेत असतां त्यावर शिपायांना हल्ला करतां आला नाहीं, हा वृत्तान्त शिपायांच्या कर्तबगारींतील न्यूनें उघड-कीस आणल्याशिवाय राहात नाहीं. मग हजरत महालविषयीं पुढीलप्रमाणें

कथा सांगाव्या लागतात.—नोव्हेंबरमध्यें एका लढाईच्या वेळीं हजरत महालच्या वाड्यावर तोफेचे गोळे पडून शिपायांनीं पोबारा केला तरी हजरत महाल जागची न हालतां 'माझें डोकें तोडून मग तुम्ही हवें तिकडे जा' असें आपल्या सरदारांना म्हणाली, तेव्हां सरदारांचे पाय ठिकाणीं राहिले. कॅम्बेलनें लखनौ सोडतांच बेगमेनें बनारस, अलाहाबाद जिंकावें आणि आझमगड जौन-पूरवर चालून जावें, असे हुकूम आपल्या सरदारांना सुनावले. युद्ध-मंडळाच्या बैठकी सारख्या चालू होत्या आणि वाटाघाटींना खळ नव्हता हें जितकें खरें तितकेंच शिपाई व त्यांचे सरदार विजयाबद्दल निराश झालेले होते व लखनौपेक्षां अधिक सुरक्षित जागेकडे जात होते, हें सुद्धां खरें आहे. कॅम्बेलनें रेसिडेन्सी व शहर हीं ठिकाणें मोकळीं टाकलीं तरी त्यानें चार हजार फौजेसह आउटरॅमला लखनौला खेटून आलमबागेंत ठेवलें होतें. त्याचा धुव्वा उडविण्याचें कर्तव्य हजरत महालनें बनारस, अलाहाबाद वगैरेंचा नाद सोडून जेव्हां हातीं घेतलें, तेव्हां आउटरॅम कांहीं केल्या आटपत नाहीं, असें अनुभवून तिनें आपल्या सरदारांपुढें जें वक्तव्य मांडलें तें उजेडांत आलें आहे. दिल्ली–कानपूरचा पाडाव, नानांचा पराभव, शिखांची व राजांची इंग्रजांना होणारी मदत, या स्थितीचा पाढा वाचून हजरत महालनें 'लखनौंत शिपाई आहेत, पण त्यांच्या ठिकाणीं धैर्य उरलेलें नाहीं. या शिपायांना मी किती दिवस तनखा चारायचा? तुम्ही लढणार नसाल तर मी इंग्रजांकडे आपला जीव वांचविण्याविषयीं बोलणें सुरू करीन.' याप्रमाणें उद्गार काढ-ल्यावर तिच्या सरदारांनीं जें उत्तर दिलें तें मासलेवाईक आहे. 'भिण्याचें कारण नाहीं. आम्ही लढूं; न लढलों तर इंग्रज आम्हांला फांसावर चढवील. आम्हांला ही भीति आहे.' हजरत महाल व सरदार या दोघांच्या सवाल-जबाबांत स्वधर्म, स्वराज्य यांचा गंध नाहीं, हें त्यावर भाष्य न करतांसुद्धां वाचकांच्या लक्षांत येईल.

### बेगमेचा जाहीरनामा

आलमबाग येथें आउटरॅमशीं ज्या लढाया झाल्या, त्यांपैकीं ता. २५ फेब्रुवारी १८५८ च्या लढाईंत शिपायांना उत्तेजित करण्यासाठीं बेगम हत्तीवर बसून रणांगणावर आली होती, असा इंग्रजी साहित्यामध्यें दाखला आहे. आउटरॅमनें शिपायांना उधळून लावलें, त्याची गति बेगमेनें स्वीकारली. मार्च

महिन्याच्या पहिल्या पंधरा दिवसांत कॅम्बेलनें लखनौ सर केलें तेव्हां बेगम शहरांत होती. बेगमकोठी नांवाच्या इमारतीनिमित्त इंग्रजांना तुंबळ युद्ध करावें लागलें, त्याचें श्रेय बेगमेशीं जोडलें जातें. इंग्रजांसमोर हार खाऊन शिपायांनीं शहर सोडलें, तेव्हां हजरत महाल दुसरीकडे निघून गेली. तिचें व मौलवीचें फारसें सूत नसल्यामुळें शहर इंग्रजांनीं पादाक्रान्त करण्यापूर्वी या दोघांकडील लढवय्यांची आपसांत मारामारी झाली होती. पण इंग्रजांचें शत्रुत्व हें दोघांचें समान ध्येय असल्यामुळें पुढें क्वचित् त्यांनीं एकोप्याची वागणूक केली, असेंहि उदाहरण आढळतें. परंतु हा एकोपा फार वेळ न टिकतां बेगम व मौलवी यांनीं भिन्न दिशा पतकरल्या. इंग्रजांचा पाठलाग चुकवितां चुकवितां १८५९ मध्यें नेपाळांत जाण्याची बेगमेवर पाळी आली. बेगम जंगबहादुराशीं पत्रव्यवहार करीत होती. ती शरण आल्यास तिला तिच्या योग्यतेला साजेशा बहुमानानें वागविण्याला इंग्रजांची तयारी होती. जंगबहादुरानें तिला नेपाळांत राहूं देण्याचा काय तो उपकार केला. इंग्रजांना शरण जाण्याचें टाकून बेगमेनें स्वाभिमान राखला. व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्याला अनुलक्षून बेगमेनें (३१-१२-१८५८) एक जाहीरनामा बिर्जीस कद्रच्या नांवानें लोकांपुढें ठेवला. त्यामध्यें इंग्रजांनीं बळकावलेल्या अनेक राज्यांची जंत्री असून 'आम्हांला इतःपर राज्यविस्तार करावयाचा नाहीं.' हें राणीचें वाक्य 'मग आजपर्यंत ज्यांचा अपहार केला, तीं राज्यें ज्याचीं त्याला परत कां करीत नाहीं?' या प्रश्नानें उलटविण्याचा यत्न बेगमेनें केलेला आहे. बेगमेच्या जाहीरनाम्यांत धर्म, न्याय, द्रोहासाठीं सर्व जनतेला व फौजेला दिली जाणारी शिक्षा इत्यादि पुष्कळ विषय आहेत. त्याच्या युक्तायुक्ततेचा येथें काथ्याकूट करण्याची गरज नाहीं. ता. १ जानेवारी १८५९ च्या पूर्वी गांवोगांवच्या पाटलांनीं आपल्या छावणींत येऊन हजेरी द्यावी, असेंहि बेगमेनें एका ठिकाणीं म्हटलें आहे. नेपाळच्या वनवासांतून बाहेर आलेल्या प्रस्तुत जाहीरनाम्याला इंग्रजांनीं तर नाहींच, पण जनता, जमीनदार व शिपाई यांनींहि धूप दाखविला नाहीं. १८५९ च्या प्रारंभीं नबाबशाहीचे लढवय्ये इंग्रजांपुढें लोटांगण घालूं लागले होते.

## .... मौ. अहमदुल्ला शहा

फैजाबादचा मौलवी या नांवानें लखनौकडील शिपाईगर्दीत अहमदुल्ला शहा या नांवानें प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीवर अनेक इंग्रज लेखकांनीं स्तुति-सुमनें उधळून ठेवल्यामुळें त्याचें उपलब्ध चरित्र सादर करणें अवश्य आहे. मद्रास इलाख्यांतील अर्काटचा राहणारा व थोर घराण्यांत जन्मास आलेला हा पुरुष होता, असें इंग्रज सांगतात. फकीरी पत्करून तो लखनौच्या भागांत येऊन राहिला; मात्र केव्हां आला, याची निश्चित माहिती सांपडत नाहीं. त्याचा जो कोणी गुरु (पीर) होता, त्यानें मौलवीला इंग्रजांच्या शत्रुत्वाची दीक्षा व कांहीं हत्यारें दिलीं अशी अहमदुल्ला शहासंबंधांत एक आख्यायिका आहे. शिकंदरशहा असें त्याचें आणखी एक नांव असून नगारा हें एक त्याचें चिन्ह होतें, म्हणून त्याला नगाराशहा असेंहि लोक म्हणत. शिपाई-गर्दीच्या वेळीं तो वयानें ४० वर्षांचा असल्याचें एक इंग्रज सांगतो. तो उंच, सडपातळ पण पीळदार शरीराचा देखणा पुरुष होता. १८५७ पूर्वीं लखनौची नबाबशाही खालसा झाल्यावर या मौलवीनें दिल्ली, मीरत, पाटणा, कलकत्ता, आग्रा वगैरे शहरांतून इंग्रजाविषयीं द्वेष फैलावण्याची कामगिरी केली, असें त्याच्या भक्तांनीं लिहून ठेवलेलें आहे. आग्र्यास असतां त्याला तें शहर इंग्रजांनीं सोडायला लावलें. तो मोठा प्रभावी लेखक आणि वक्ता असल्या-बद्दल त्याची ख्याति होती. १८५७च्या जानेवारींत मौलवीची स्वारी लखनौस होती. तेथें त्यानें उघडपणें इंग्रज-द्वेषाचा प्रचार चालविल्यामुळें व त्याच्या भजनीं पुष्कळ लोक लागल्याचें पाहून इंग्रजांनीं त्याला लखनौंतून हाकललें. फेब्रुवारींत फैजाबाद येथें एका सराईमध्यें मौलवीची वस्ती असतां इंग्रजांनीं त्याला कैद केलें. पकडतेवेळीं मौलवीचे शस्त्रधारी अनुयायी व इंग्रजांचे शिपाई यांमध्यें झटापट होऊन मौलवी जखमी झाला. मौलवीजवळ सांपडलेल्या कागदपत्रांत इंग्रजाविरुद्ध चाललेल्या कटकारस्थानाची माहिती असल्यानें त्याला इंग्रज न्यायाधीशांनीं प्राणदंडाची शिक्षा फर्माविली होती. तुरुंगांत असतांना एका मुसलमान डॉक्टरानें मौलवीला अनेक प्रकारच्या सवलती दिल्यामुळें शिपाईगर्दी संपल्यावर त्या डॉक्टराच्या वांटणीस चौदा वर्षांची कैद आली. मौलवीला सुनावण्यांत आलेली फांशीची शिक्षा जूनपर्यंत अंमलांत न आल्यानें मौलवीची शिपायांच्या उठावांत सुटका झाली.

**मौलवीचें व्यवहारचातुर्य**

जूनच्या प्रारंभीं फैजाबादला शिपायांनीं इंग्रजांविरुद्ध उठाव केल्यावर तेथें राज्यपद कुणाला द्यायचें हा प्रश्न उपस्थित झाला; तेव्हां मौलवीनें जें वर्तन केलें तें त्याचें व्यवहारचातुर्य सिद्ध करणारें आहे. फैजाबादचे मुसलमान सुन्नी पंथाचे नसल्यानें तेथें आपला अधिकार सुरक्षित नसल्याचें जाणून मौलवीनें शुजाउद्दौलाच्या (पूर्वीचा एक नबाब) मिर्झा अब्बास नांवाच्या नातवाला राज्यपदीं चढविण्याचें ठरविलें; परंतु त्याच्या अति-वृद्धत्वामुळें राज्यकारभार त्याला झेपणार नाहीं असें लक्षांत घेऊन त्याची जागा बलाढ्य जमीनदार मानसिंग याजकडे सोंपविण्यांत आली. फैजाबादचें राज्यपद हें केवळ सोंग होतें असें पुढील इतिहासावरून दिसतें. लखनौस मौलवीनें असेंच व्यवहारचातुर्य निदर्शनास आणलें. तेथें माजी नबाबाचा एक मुलगा व त्याची आई याप्रमाणें नबावी राज्यकर्तृत्वाचे वारस असतांना मौलवीनें जर राजत्वाचा लोभ धरला असता तर नबाबशाहीच्या अभि-मान्यांनीं मौलवीची मात्रा चालूं दिली नसती, हें समजण्याइतका मौलवी निस्संशय चाणाक्ष होता. तो लखनौस राज्य करण्याच्या आकांक्षेनें गेला होता असें एका मुसलमान इतिहासकाराचें म्हणणें आहे, पण लोकवृत्तीचा कल पाहून त्यानें हजरत महाल व बिर्जीस कद्र यांच्यावर राज्याची जबाबदारी टाकली व शिपायांचा पुढाकार आपल्याकडे ठेवला. परंतु शिपाई बेगमेच्या हुकमाला जेवढा मान देत होते तेवढा मान मौलवीच्या शब्दाला देत नसल्यानें 'माझें ऐकायचें नसेल तर बेगमेकडून पगार घ्या' असें शिपायांना सांगण्याचा प्रसंग मौलवीवर येत असे. प्रारंभीं बेगमेनें मौलवीस सन्मानानें वागविलें. पुढें बेगम व मौलवी यांचें मधून मधून बिनसत असे. एकदां हा बेबनाव रक्तपातापर्यंत गेल्याचें वृत्त दुसरीकडे नमूद केलेलें आहे. एका लढाईत मौलवी जखमी झाला तेव्हां बेगमेनें या जखमेचा सूड उगविण्याची प्रतिज्ञा केली, अशी माहिती उपलब्ध आहे. फैजाबाद व लखनौ येथें मौलवीनें राजत्व नाकारलें म्हणून तो मोठा स्वार्थत्यागी होता, असा दावा अलीकडे क्वचित् दृष्टीस पडतो. परंतु त्यानें खलीफा ही पदवी धारण केली होती व त्याचा वध होण्यापूर्वीं आपण देशाचे बादशहा आहों, असें त्यानें जाहीर केलें होतें. या दोन गोष्टी त्याच्या स्वार्थत्यागाचें स्तोम

कमी करणाऱ्या आहेत. बादशहा व नबाब यांपेक्षां 'खलीफा' श्रेष्ठ हें ध्यानांत घेतलें म्हणजे 'खलीफा' या पदवीनें तो सामान्य ऐहिक राजेपणाच्या कटकटीबाहेर राहिला, असा बोध होतो. दिल्लीचा बादशहा प्रथम कैदी व नंतर हद्दपार झाला; लखनौची बेगम व तिचा मुलगा या दोघांवर नेपाळचा आश्रय घेण्याची पाळी आली. त्या काळांत मौलवीनें आपण बादशहा असल्याचें जाहीर केलें. आपल्याशीं स्पर्धा करायला कोणीहि उरलें नाहीं, अशा वेळीं मौलवीनें आपली बादशाही पुकारावी, हें त्याच्या व्यवहारचातुर्याचें लक्षण ठरतें.

## लखनौंतील पुढारीपणा

ता. १ जुलईपासून २० नोव्हेंबरपर्यंत लखनौस व त्यानंतर मार्च (१८५८) पर्यंत आलम बागेस जेवढें रणकंदन घडलें तेवढें सर्व मौलवीच्या प्रेरणेचें, योजनेचें व पुढाकाराचें होतें, अशी हकीकत उत्तर प्रदेश सरकारातर्फे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत (संघर्षकालीन नेताओंकी जीवनियाँ) सांठविलेली आहे. ही हकीकत लिहिणाराच्या मतें लखनौला मौलवी नसता तर इंग्रजांच्या वाटेस कोणीहि गेले नसते. लखनौची बेगम, तिचे साह्यकर्ते, शिपाई व त्यांचे पुढारी या सर्वांना शून्यवत् ठरवून ती जीवनी लिहिणारानें एकट्या मौलवीला प्रत्येक प्रसंगाच्या अग्रस्थानीं उभें केलेलें आहे व ही त्या लेखकाची मौलवीसंबंधाची भक्ति आपल्या अपरिमितपणानें मौलवीच्या योग्यतेविषयीं जिज्ञासूंना साशंक करून सोडणारी आहे, याचेंहि त्याला भान उरलेलें नाहीं. इंग्रजांनीं आपल्या दृष्टीप्रमाणें जीं पापें अथवा बऱ्यांतलीं कृत्यें नाना व बेगम यांच्या चरित्राला चिकटविलीं आहेत, तीं देखील उत्तर प्रदेशाच्या राज्यानें प्रकाशिलेल्या 'जीवनी' कारानें एकट्या मौलवीच्या झोळींत टाकण्याला मागेंपुढें पाहिलेलें नाहीं. इंग्रजी कागदपत्रांतून आलेले मौलवीच्या कर्तृत्वाचे संदर्भ पूर्वीं निवेदन केले असल्यामुळें त्यांची पुनरुक्ति येथें करायला नको. त्याचा शेवट कसा झाला, याचें ज्ञान वाचकांना झालेलें आहे. तोच खरा शूर व देशभक्त होता, किंवा हिंदुस्थानचा बादशहा होण्याला तोच एकटा योग्य होता, या इंग्रज लेखकाच्या मताविषयीं त्याची उपलब्ध चरित्रकथा दुजोरा देणारी नाहीं.

### .... खानबहादुर खान

रोहिलखंडाचे पठाण अयोध्येच्या नबाबशाहीचा अंमल मानीत नसल्यानें १७७४ मध्यें इंग्रजांची मदत घेऊन नबाबानें त्यांची अशी खोड मोडली कीं, पुनः त्यांचें डोकें १८५७ पर्यंत वर निघालें नाहीं. तेथील शेवटचा स्वतंत्र राज्यकर्ता हाफीज रहमतखान १७७४ मध्यें मारला गेला. खानबहादुर खान हा त्याचा नातू असून त्याला दरमहा शंभर रुपयांचा तनखा इंग्रजांमार्फत मिळत होता. त्यानें इंग्रजांच्या न्याय-खात्यांत नोकरी केली असल्यामुळें या शंभर रुपयांखेरीज १८५७ मध्यें नोकरीचें पेन्शन मिळत होतें. त्याचें वय तेव्हां सत्तरीच्या घरांत होतें. ३० मे या दिवशीं बरेलीचे शिपाई इंग्रजांविरुद्ध उठले व त्याच दिवशीं संध्याकाळीं रोहिलखंडाचा बादशाही सुभेदार या नात्यानें खानबहादुरानें आपल्या अधिकाराचा समारंभ पार पाडला. त्याच्याशीं स्पर्धा करूं इच्छिणाऱ्या दुसऱ्या खानानें हाफीज रहिमत खानाचा नातू म्हणून लोकांत असलेली खानबहादुराची मानमान्यता ओळखून माघार घेतली व तो खानबहादुराच्या कारभारांत सामील झाला. शिपायांचा पुढारी बख्तखान याला राजी राखणें अवश्य असल्यामुळें खान-बहादुर त्याच्या भेटीस गेला व बख्तखान नको म्हणत असतांहि त्याला नजराणा देऊन खानबहादुरानें खूष केलें. बख्तखान नंतर लवकरच दिल्लीस निघून गेला. खानबहादुर व बख्तखान यांचें आधींपासून सूत नव्हतें. बख्तखानालाहि स्वतंत्र राज्याची आकांक्षा होती. त्यानें दिल्लीची वाट धरल्यावर खानबहादुरानें आपला राज्यकारभार आरंभला. मोठाल्या पगाराचे मुलकी व लष्करी अंमलदार नेमले. न्यायमंडळ अस्तित्वांत आणलें. कोष उभारण्यासाठीं एक समिति नेमली. हिंदु-मुसलमानांत एकोपा राहावा यासाठीं खानबहादुरानें आपल्या व्यवस्थेंत मुसलमानांप्रमाणें पुष्कळसे हिंदूहि भरले होते. त्यांतल्या त्यांत द्रव्यार्जनाच्या कामावर बहुधा सारेच हिंदूच होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राज्यकारभारांत हिंदु-मुसलमान एकत्र दाखविल्यानें सामान्य जनतेमध्यें त्यांचा सलोखा राहावा, असा नियम नाहीं. रोहिलखंडांतील बरेच जमीनदार ठाकूर खानबहादुराच्या विरुद्ध होते व एका ठाकुराचा तर 'आपण राजा व्हावे' असा उघड प्रयत्न सुरू होता. खान-बहादुरानें आपल्यास चहाणाऱ्या ठाकुरांच्या मदतीनें हा प्रयत्न मोडून काढला. हिंदूंवर त्यानें जय मिळविला. मात्र नैनीतालच्या इंग्रजांना पिटाळण्याचा उद्देश त्याला एकदांहि सफल करतां आला नाहीं.

## बरेलीचे हिंदु-मुसलमान

मोठी फौज व बड्या पगाराचे अनेक अधिकारी यांचा खर्च चालण्या-साठीं अवश्य तेवढें द्रव्यबल खानबहादुरापाशीं नसल्यानें प्रत्येक धनिकाच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा घेण्याविषयीं मौलवीमार्फत शास्त्रार्थ काढला. हिंदु-पंडितांचा त्याला पाठिंबा होता. हळू हळू हिंदु-मुसलमान धनिकांच्या मालमत्तेवर खानबहादुराच्या धाडी पडूं लागल्या. तेवढ्यानें भागेना म्हणून टांकसाळ चालू केली; पण चांदीवांचून टांकसाळ वायां गेली. खानबहादु-राच्या कारभारांत हिंदूंचा संबंध मुळींच नसावा, असें मानणारा कडव्या मुसलमानांचा एक वर्ग बरेलींत होता. यामुळें दोन्ही समाजांचा खानबहादुरानें उभा केलेला सलोख्याचा देखावा विरला आणि हिंदु-मुसलमानांच्या मारामाऱ्या उघड सुरू झाल्या. एक मुसलमान एका हिंदूशीं व त्याच्या बायकोशीं दंडेलीनें वागला तेव्हां हिंदूनें त्याला ठार केलें. खानबहादुराच्या न्यायमंडळानें त्या हिंदूला निरपराध ठरवून सोडलें तरी मयत मुसलमानाच्या नातेवाइकानें सदर हिंदूचा प्राण घेतला. हा खुनी मुसलमान उजळ माथ्यानें समाजांत वावरत होता. खानबहादुर त्याला कसलेंच प्रायश्चित्त देऊं शकला नाहीं. यांतून हिंदु-मुसलमानांचें वैमनस्य उपस्थित होऊन तें इंग्रजांनीं बरेली काबीज करीपर्यंत चालू राहिलें. 'हिंदु जर मुसलमानांना इंग्रजांविरुद्ध साह्य करतील तर आपण गोवध बंद करूं' असें खानबहादुराचें आश्वासन होतें. त्यांतील आधीं साह्य व मग गोवधबंदी हा प्रकार सहज ध्यानांत येण्यासारखा आहे. हिंदूंनीं साह्य केलें पण मुसलमानांनीं गोवध बंद केला नाहीं. दिल्लीच्या पाडावानंतर बरेलीस शिपाई गेले त्या वेळीं तर अत्याचारांना सुमारच राहिला नव्हता. लूट व बायकांच्या बाबतींत जुलूमजबरदस्ती यांना ऊत आला. मुसलमान हिंदूंच्या अंगावर थुंकत व त्यांच्या घरावर गाईचें रक्त शिंपडून त्यांच्या अंगणांत गाईचीं हाडें टाकीत. हिंदूंना छळूं इच्छिणाऱ्या मुसलमान गुंडांशीं हिंदु शिपायांच्या झटापटी सुरू होऊन मग हिंदु मुसलमानांच्या दंग्यांत त्यांचें रूपान्तर झालें. लुटालुटींतून मुसलमान देखील सुटत नसल्यानें ते देखील हिंदूंप्रमाणेंच इंग्रजी राज्याच्या पुनरुज्जीवनाची वाट पाहूं लागले. लुटारूंच्या तडाख्यांतून खानबहादुराच्या शोभाराम दिवाणाचें घर सुटलें नाहीं तर इतरांच्याबद्दल बोलायलाच नको. खानबहादुराच्या सुभेदारींत मुसल-मानांपेक्षां हिंदूंची जास्त हानि झाली. खानबहादुरानें आपल्या १० महिन्यांच्या बादशाहीच्या काळांत साडे सव्वीस लाखांवर सैनिकांना पगार वांटला, अशी

एक नोंद पाहायला सांपडते. ही एवढी मोठी रक्कम त्यानें कशी उभी केली याचें उत्तर वरील लुटालुटीच्या हकीकतींत दिसून येईल. १८५८ च्या मार्च महिन्यांत नाना व फेरोजशहा यांनीं बरेलीस भेट दिली, परंतु एकंदर लोकस्थितींत फरक पडला नाहीं. लखनौ इंग्रजांनीं जिंकल्यावर आतां लवकरच इंग्रजी फौजा बरेलीचा समाचार घेतील म्हणून खानबहादुर आपलें ठाणें संभाळण्याची तयारी करण्यांत गुंतला. आतां स्वार शिपायांच्या पगाराचें मान खालावून पांच सात रुपये पगारावर जे लोक मिळतील त्यांचें सैन्य खानबहादुरानें उभारलें. मे महिन्याच्या ५ व्या तारखेला (१८५८) पांचसहा तास लढाई करून खानबहादुरानें बरेलीबाहेर पळ काढला. बरेलीची शेवटची लढाई व त्यापूर्वीची खानबहादुराची करामत यांची माहिती मागें थोडक्यांत दिलेली आहे. एका मुसलमान इतिहासकारानें खानबहादुर कैदी झाल्यावर इंग्रज पृच्छकाशीं बोलतांना 'तुमच्या शिपायांनीं बंड केलें, त्यांनींच मला राज्य दिलें.' असें म्हटल्याची कथा सांगितली आहे. 'शिपाई आधीं व मग आपण' हें या विधानांतलें तात्पर्य स्पष्ट आहे.

### .... बाबू कुंवरसिंह

बिहारच्या शहाबाद जिल्ह्यांतील बाबू कुंवरसिंह याच्या पराक्रमाचें निवेदन पूर्वी केलें आहेच. उठावाचा पुढारी या नात्यानें त्याची कामगिरी पाहतांना त्याची वृद्धावस्था प्रथम डोळ्यापुढें येऊन मग त्यानें केलेल्या हालचालींचा विस्मय वाटल्याशिवाय राहात नाहीं. शिपायांनीं त्याला आपल्या उठावांत खेचलें कीं शिपाई उठल्यावर तो स्वेच्छेनें त्यांना जाऊन मिळाला हा विषय वादग्रस्त आहे. कुंवरसिंहाच्या मरणानंतर त्याच्या कित्येक साथीदारांना पकडून इंग्रजांतर्फे जी चौकशी झाली तिच्यांत एका साथीदारानें शिपायांच्या धमकीवजा आग्रहामुळें कुंवरसिंहाला त्याचा पुढाकार घ्यावा लागला अशा मतलबाची जबानी दिली म्हणून हा वाद उत्पन्न झालेला आहे. कुंवरसिंगाच्या मनांत शिपायांच्या उठावापूर्वींच कंपनी सरकाराविषयीं वैषम्य उत्पन्न झालेलें होतें, ही गोष्ट लक्षांत बाळगल्यास शिपायांच्या उठावानें विस्कटून टाकलेल्या इंग्रजी राज्याच्या स्थितीचा फायदा घेण्याचें कुंवरसिंहाच्या मनांत येणें स्वाभाविक होतें. कुंवरसिंहाला उठावाच्या आरंभीं इंग्रजांविरुद्ध एक लहानसा जय मिळाला आणि १८५८मध्यें विजयाच्या समाधानांत तो कालवश झाला, हा त्याचा पुढाकाराचा विशेष आहे.



बाबू कुंवरसिंह

१८५७च्या ऑगस्टमध्यें त्याला आपलें ठाणें व जिल्हा सोडावा लागल्यावर रीवा, बांदा वगैरे बुंदेलखंडी टापूंतला कुंवरसिंहाचा संचार डोळ्यांत भरण्यासारखा नाहीं. रीवा संस्थानांत कुंवरसिंह गेल्यानें इतस्ततः लोकांत अस्वस्थता उत्पन्न झाली असेल, तेथील इंग्रज अधिकारी काळजींत पडला असेल, परंतु एवढ्यानें कुंवरसिंहाचा थोडासा प्रभाव सिद्ध झाला तरी पराक्रम सिद्ध होत नाहीं. तेथून त्याला पाय काढावा लागला हें त्याच्या गौरवाला बाधक असून त्याच्या सैनिकांनीं त्याला सोडलें व जे राहिले ते केवळ बाजारबुणगे होते, ही इंग्रजांच्या बातमीपत्रांतील माहिती, त्याच्या कर्तबगारीवर सैनिकांचा विश्वास राहिला नव्हता, असें प्रत्ययास आणून देणारी आहे.

ऑगस्टांत त्यानें आपल्या वास्तव्याचा प्रदेश सोडून सप्टेंबरांत रीवा संस्थानाच्या मुलखामध्यें रिकामे दिवस घालविले. बांद्यास त्याचें बस्तान जमलें व तेथून सुमारें दीड दोन हजार लोकांनिशीं त्यानें काल्पी गांठली; नंतर तो कानपूरच्या नोव्हेंबर अखेरीस झालेल्या आक्रमणांत होता, अशी लोकवार्ता सांपडते. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत कानपुरास पराभव पावलेल्या ग्वालेरच्या फौजेला सोडून कुंवरसिंह लखनौच्या भागांत गेला. तेथें त्याचें नांव निघण्याची संधि त्याला मिळाली नाहीं. मार्च महिन्यांत तो आझमगडकडे गेल्यावर त्याच्या पराक्रमाला वाव सांपडला. त्यानें इंग्रजांच्या फौजेवर लहान लहान क्षणभंगुर जय मिळविले, परंतु विजयानंतर एखाद्या ठिकाणीं पाय रोवून उभा राहण्याचा योग त्याच्या वाटणीस येऊं देण्यासारखा इंग्रज आतां कमजोर नसल्यानें विजयांमागून स्थलान्तर करीत तो आपल्या जगदीशपूर गांवीं पोंचला. तेथें त्याला आणखी एकदां विजय मिळाला; नंतर एप्रिल अखेरीस त्याला मृत्यूनें गांठलें. हा अंतकालीन विजय कुंवरसिंहापुरता धन्यतेचा असला तरी त्या विजयाचें त्याच्या हयातींतल्या इतर विजयांप्रमाणेंच पर्यवसान घडलें. पूर्वीं ज्याप्रमाणें विजयोत्तर विजयस्थळाचा त्याग आणि इंग्रजांचा पाठलाग कुशलतेनें चुकवून दुसऱ्या सुरक्षित स्थानीं इंग्रज नजीक येईपर्यंत विश्राम, हीं कर्तव्यें पार पाडावीं लागत होतीं, त्याचप्रमाणें मार्च-एप्रिलांत कुंवरसिंहाचा क्रम होता. त्याच्या मृत्यूनंतर एका पंध्रवड्यांत इंग्रजानें जगदीशपूर झडपलें. हा भाग दाट रानाचा असल्यानें इंग्रजांनीं तेथील धामधूम कशी आटोक्यांत आणली याचें इतिवृत्त मागें सादर केलेलें आहे. वृद्धावस्थेंतील चपळाई व कांहीं ठिकाणीं मिळविलेले विजय हाच कुंवरसिंहाच्या कीर्तीचा खरा आधार आहे.

**.... पुढाऱ्यांचें समालोचन**

येथें ठळक ठळक पुढाऱ्यांच्या कर्तृत्वाचा जो आढावा दिलेला आहे, त्यावरून आपल्या देशाला स्वराज्य आणि स्वातंत्र्य मिळवून देण्याचा त्यांनीं शिपायांच्या उठावांशीं एकरूप होऊन उद्योग केला, असें समजायला एकहि भक्कम जागा दिसत नाहीं. आधीं शिपायांचा उठाव आणि नंतर पुढारी, या प्रकारामुळें शिपाई व त्यांनीं उभे केलेले पुढारी यांच्यामध्यें आधींपासून इंग्रजांशीं लढण्याविषयीं संगनमत असल्याचें सिद्ध होत नाहीं. इंग्रजी राज्यव्यवस्थेनें पुढारी व्यक्तींच्या अंतरंगांत इंग्रजाविषयीं अप्रेम, द्वेष कदाचित् त्वेष इत्यादि भावना उत्पन्न केल्या होत्या, असें मानलें तरी शिपायांचीं दुःखें निराळीं व पुढाऱ्यांचीं दुःखें निराळीं होतीं, हें स्पष्ट प्रत्ययास येणारें आहे. नानासाहेबांचें पेन्शन बंद केलें म्हणून, झांशीचें राज्य खालसा केलें म्हणून किंवा बहादुरशहा केवळ नांवाचा बादशहा आहे म्हणून शिपाई कष्टी होता, असा दाखला नाहीं; उलटपक्षीं शिपायाचा भत्ता कापला गेला, त्यावर परदेशांत जाण्याचा प्रसंग आला किंवा गाईडुकरांची चरबी चोपडलेलीं काडतुसें दातांनीं तोडण्याचें धर्महानिकारक संकट ओढवलें म्हणून पुढाऱ्यांपैकीं कोणी बेचैन होऊन त्यानें इंग्रजांकडे आपला याबद्दलचा निषेध कळविला, असेंहि उदाहरण नाहीं. फैजाबादचा मौलवी सोडल्यास बाकीच्या पुढारी व्यक्ति शिपायांच्या उठावापूर्वीं इंग्रजांच्या कारभाराविषयीं द्वेष फैलावण्याचें काम करीत होत्या, असा ग्रह निर्माण करणारा पुरावा नाहीं. शिपायांनीं पुढारीपणा दिल्यावर किंवा तो घेतल्यावर पुढाऱ्यांच्या युद्धकौशल्याचा शोध करावा तर निराशाच वांटणीस येते. शिपाई एकाच पुढाऱ्याला चिकटून शेवटपर्यंत राहिला, असाहि प्रकार नव्हता. दिल्लीला, कानपूरला, लखनौला शिपाई व त्यांचे साथीदार यांच्या पासंगासहि न लागण्यासारखी इंग्रजांची संख्या क्षुल्लक असूनसुद्धां दिल्लीची इंग्रजी पकड शिपायांच्या पुढाऱ्यांना सोडवितां आली नाहीं. उघड्या जागीं कानपुरास मूठभर इंग्रज एकवीस दिवस लढत राहिले. लखनौस लाखों लढवय्ये असूनहि तीन महिन्यांत त्यांना इंग्रजांच्या तळाचा कबजा घेतां आला नाहीं. आरा येथें एका लहानशा जागीं बचावासाठीं राहिलेल्या ६०-७० इंग्रज व हिंदी इसमांनीं शिपायांना धाब्यावर बसविलें व शिपायांच्या तडाख्यांतून त्यांची सुटका झाली. शिपाई लढले व मेले; पण कुशल योद्धे म्हणून

त्यांच्या पुढाऱ्यांचें कौतुक करतां येत नाहीं. कुंवरसिंह, मौलवी, तात्या, राणी लक्ष्मीबाई यांनीं रणांगणें गाजविलीं, परंतु थोडें पृथक्करण केल्यास शिपायांचें रणांगण इंग्रजांच्या हवालीं झाल्याचा भाग सदैव दृष्टीस पडतो. तटबंदीच्या आश्रयानें उठावाच्या लोकांना दिल्ली तीन महिने व झांशी दहा दिवस लढवितां आली; परंतु हा आश्रय गमावतांच इंग्रजांच्या थोड्याशा फौजा उठावाच्या मोठाल्या फौजांना एकेका दिवसांत रणांगणावरून हाकलून लावीत होत्या, हा निष्कर्ष खेदकारक किंबहुना लज्जास्पद असूनहि नाकारण्याजोगा नाहीं. १८५७ च्या नोव्हेंबर अखेरीस तात्या टोप्यांच्या नेतृत्वानें ग्वालेरच्या लष्कराला कानपूर शहर ताब्यांत घेण्याइतकें यश लाभलें; तें अकरा दिवस टिकलें, परंतु तेथें जवळच इंग्रजांची फौज थोडी असूनहि कानपूर काबीज करण्यापलीकडे तात्यांची प्रगति झाली नाहीं. हें अकरा दिवसांचें यश ता. ६ डिसेंबर या एका दिवसांत कॅम्बेलनें धुळीस मिळविलें. कुंवरसिंहाच्या विजयाचें मूळ इंग्रजी लष्कराच्या क्षुद्र संख्याबळांत सांपडतें. तथापि कुंवरसिंहाच्या नांवानें एक दोन तरी विजय सांगतां येतात. मौलवीच्या नशिबीं असा विजय नव्हता. इंग्रजांचें क्षुद्र संख्याबळ सुद्धां त्याला एकदांहि निकालांत काढतां आलें नाहीं.

### शिपाई-गर्दीचें स्वराज्य

ज्यांना रणभूमीवर आपलें प्रभुत्व कायम राखतां आलें नाहीं, त्यांच्या राज्यव्यवस्थेचा विचार करण्याची गरज नाहीं. इंग्रज जवळ नाहीं, असल्यास तो कोंडलेला किंवा संख्येनें दुबळा आहे, अशा काळांत या पुढाऱ्यांनीं राज्य-कर्तृत्वाचा देखावा उभा करावा व हा देखावा इंग्रजांची धडक अंगावर येतांच लहानशा फुंकरीनें पत्त्याचा बंगला कोसळतो त्याप्रमाणें कोसळावा, असा त्यांच्या राज्यकर्तृत्वाचा अनुभव येतो. नानासाहेबांच्या पेशवाईला उचलून धरण्यासाठीं शिपायांखेरीज शेंपन्नास जमीनदार व त्यांचे हजारों बारगीर असूनहि इंग्रजांनीं जुलईमध्यें ती पेशवाई कायमची नामशेष करून टाकली. दिल्लीची बादशाही तेथील तटबंदीबाहेर पत्रद्वारें किंवा दूतांच्याद्वारें जवळच्या दूरच्या नबाबराजांना कळत असेल, पण तिचा साक्षात्कार तट-बंदीबाहेरील जनतेला बादशहाच्या नांवानें गांवोगांव लूट, जाळपोळ, रक्तपात यांच्याद्वारें घडत होता. दिल्ली जिंकतांच या साक्षात्काराचा खेळ इंग्रजांनीं थोड्याच अवधींत विलयास नेला. खुद्द दिल्लींत बादशाहीचा कारभार कसा

होता, याची माहिती विस्तारानें मागें येऊन गेलेली आहे. जशी बादशाहीची तशीच रोहिलखंडांतील खानबहादुरशाहीची व लखनौंतील बेगमशाहीची कथा आहे. खानबहादुराला रोहिलखंडाचें रान मोकळें सांपडलें. पण इंग्रज इतःपर नको असें वाटायला लावणारें राज्य त्याला अस्तित्वांत आणतां आलें नाहीं. खानबहादुरानें खाण्यापिण्याच्या व्यवहारांत चंगळ करून सोडली होती, अशा आजोबाच्या गोष्टी सांप्रत पुढें आलेल्या आहेत. बेगमेला खानबहादुरा-इतकी लखनौस मोकळीक नव्हती. तेथें एकदां रेसिडेन्सींतील व दुसऱ्यांदां आलमबागेंतील इंग्रजांशीं नित्य लढण्याची पाळी असल्यानें राज्याची घडी चापून चोपून बसविण्याला सवड नव्हती, असें क्षणभर मानलें तरी कारभारी नेमले गेले, पण प्रत्यक्ष कारभार म्हणून कांहींच योग्य प्रकारें चालू नव्हते, असा निर्णय पत्करणें भाग पडतें. झांशीस लक्ष्मीबाईनीं राज्यकर्तृत्वाला शोभणारें वर्तन ठेवलें होतें, असें त्यांच्याविषयींच्या माहितीवरून म्हणणें प्राप्त आहे. कुंवरसिंहाला आपला राहता गांव उठावामागून ताबडतोब सोडावा लागला, तेव्हां त्याच्या राज्यकर्तृत्वाचा विचारच न करणें चांगलें. इंग्रजांबद्दल द्वेष जागोजाग पिकविणारा व गनिमी काव्यानें लढणारा असा मौलवीचा लौकिक एकंदर उलाढालीच्या तळाशीं सांपडतो.

### अनेक राज्यघोषणा

ज्यांच्या गांठीस राज्यनिर्मितीचें किंवा तशा आकांक्षेचें श्रेय बांधलें जातें, त्यांच्या राज्यांची अवस्था कशी होती याची थोडीशी छाननी मागें केली आहे, पण त्यांमध्यें दिसणाऱ्या खाचाखोंचा स्पष्ट दाखविल्याशिवाय हा विषय योग्य रीतीनें गळीं उतरणार नाहीं. शिपायांचा उठाव राष्ट्रीय स्वरूपाचा होता व त्याच्या योगानें देशाचें स्वातंत्र्य व स्वराज्य अस्तित्वांत यावयाचें होतें, असें मोठ्या अट्टाहासानें प्रतिपादन करण्याचा एक नवा प्रघात उपस्थित झालेला आहे. ' विश्व देवाचें, प्रदेश बादशहाचा व कारभार इंग्रजांचा ' असें घोषणा वाक्य एकदां प्रचारांत होतें. उठावाच्या काळीं त्यामध्यें स्थानपरत्वें किंवा अग्रणीपरत्वें जो फरक झाला तो अभ्यासण्याजोगा आहे. कुठें कारभार अर्थात् राज्य शिपायांचे असे नगारे वाजले तर झांशीस राज्य राणीचें अशा घोषणेचा ढोल पिटून शिपाई दिल्लीस चालते झाले. कानपुरास पेशवाईचे डंके खणखणून नानासाहेबांनीं मागील पेशव्यांचीं बिरुदें आपल्या नांवास जोडलीं. आपली पेशवाई जाहीर केल्यावर वस्तुतः इंग्रजांच्या तोंडाकडे

पाहणें योग्य नसतांहि आपल्या पित्याच्या पेन्शनबाबत स्थानिक इंग्रज अधिकाऱ्यांकडे नानांनीं चौकशीचें पत्र पाठविलें, हा चमत्कार ध्यानांत ठेवायला पाहिजे. ज्यानें स्वतंत्रता अंगिकारली त्यानें पेन्शनबद्दल वाटाघाटीचें पत्र इंग्रजांकडे रवाना केलें, ही विसंगति सहज डोळ्याआड करण्याजोगी नाहीं. तूर्त कानपूरचें राज्य नानासाहेबांचें, एवढेंच जमेला धरून बाकीच्या राज्यांची पाहणी करणें बरें. रोहिलखंडावर आपला अधिकार व्हावा अशी मनीषा बाळगणाऱ्या हिंदु-मुसलमान स्पर्धीकारांची चळवळ मोडून खानबहादुर राज्याधिकारावर आला. आपण दिल्लीच्या बादशाहीचे सुभेदार आहों, असें तो म्हणवीत होता. नानासाहेबांना देखील बादशहाचें स्मरण होतें, परंतु खानबहादुराइतकाहि त्यांचा बादशहाशीं संबंध नव्हता. लखनौंतील बेगमेच्या अधिकारामागें नुकत्याच नष्ट झालेल्या नबाबशाहीची परंपरा असून तिला खानबहादुर ओळखीत नव्हता तर खानबहादुराला बेगम ओळखीत नव्हती. प्रत्येकजण शक्यतोंवर आपल्या जागीं स्वतंत्र होता. नानासाहेब नबाबशाहीच्या मुलखांत जाऊनहि बेगमेच्या व्यवहाराशीं त्यांचा संबंध कित्येक महिने आला नाहीं. झांशीची विचारपूस करावी, असें नानासाहेबांना सुचल्याचें दिसत नाहीं. जेव्हां हे सारे नवे राज्यकर्ते इंग्रजानें घेरले तेव्हां ते एकत्र आले, असें त्यांच्या कालान्तरानें झालेल्या गांठीभेटीचें तात्पर्य आहे. फरुक्काबाद, नजीबाबाद येथील नबाबांचा वर्तनक्रम असाच स्वच्छंद होता. गांवोगांवचे हिंदु ठाकूर जमीनदार, तालुकदार, हे अशा वर्तनक्रमाला अपवाद नव्हते. योजना, मेळ, एकसूत्रीपणाचें परस्परांना साह्य, यांतला कोणताच गुण पुढाऱ्यांमध्यें नव्हता.

### इस्लामका बोलबाला

पुढारी व्यक्तींच्या वागणुकीबरोबरच हिंदु-मुसलमान या समाजांच्या आपसांतील विरोधाची आठवण बाळगणें अवश्य आहे. धर्मरक्षणार्थ हिंदु-मुसलमानांनीं एक व्हावें, अशा आरोळ्या जाहीरनाम्यांतून असल्या तरी मुसलमानांनीं हिंदूंच्या डोळ्यांना अप्रिय असलेला इस्लामचा हिरवा झेंडा उभारावा आणि हिंदूंनीं केव्हां केव्हां आपला बजरंग छाप महावीर झेंडा फडकवावा असा एकमेकांतील दुजेपणा उठावाच्या काळांत वारंवार उघडकीस येत होता. मुसलमानांनीं 'जीहाद'चा डांगोरा पिटावा आणि केवळ ख्रिस्त्यापुरता जीहादचा रोख आहे, असा खुलासा हिंदूंना शांत ठेवण्यासाठीं

मागाहून सांगण्यांत यावा, असे प्रसंग कितीतरी आहेत. इस्लामचा हिरवा झेंडा जितक्या वेळां फडफडला तितक्या वेळां हिंदूंचा झेंडा आकाशांत चढला, असा समज करून घेण्याला शिपाई-गर्दीच्या इतिहासांत अवकाश नाहीं. बरेलीस हिंदुमुसलमानांचें वैमनस्य चिघळलें व इंग्रजांचें लष्कर जवळ येऊन ठेपलें, तेव्हां त्या वैमनस्याला मूठमाती देण्याच्या इराद्यानें दोन्ही समाजांच्या माणसांनीं आपापलीं वेगळीं निशाणें घेऊन मिरवणूक काढली, ही माहिती स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं दोन्ही समाज आपला भेदभाव विसरल्याची साक्ष देणारी नाहीं. इंग्रजाशीं लढण्यासाठीं हा एकोप्याचा देखावा होता. शेवटीं निकरानें लढण्याचा जास्त भार मुसलमानांनाच उचलावा लागला. खानबहादुराबद्दल ज्या आजोबाच्या गोष्टी लोकांसमोर आलेल्या आहेत त्यांत 'इस्लामका बोलबाला, फिरंगीका मू काला' अशी त्या दिवसांत प्रचलित असलेली म्हण गोवलेली दिसते. 'इस्लामका बोलबाला' हिंदूंच्या चित्ताला अस्वस्थ करणारा होता व एकट्या इस्लामचा बोलबाला हा एकंदर राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कल्पनेंत बसणारा नाहीं. ज्या प्रदेशांत—नबाबशाहीचा भाग सोडून—इस्लामचा बोलबाला सुमारें पन्नास व कांहीं जागीं पन्नासाहून अधिक वर्षें स्तब्ध पडला होता तेथें त्याची पुनः गडबड माजल्यास हिंदूंना आपला पक्ष उणा आहे, असें वाटणें स्वाभाविक आहे. हा इस्लामचा वरचढपणा केवळ बरेलीच्या टापूंत होता असें नसून त्यानें अनेक स्थळीं आपला प्रभाव गाजविल्याचीं उदाहरणें दाखवितां येतील. इंग्रजांना हिंदुमुसलमानांचा बेबनाव इष्ट होता, पण इंग्रज दोघांना दाबण्याला समर्थ होता. त्यामुळें हिंदुसमाज दोन पिढ्या इस्लामच्या स्वतंत्र बोलबाल्यापासून मुक्त होता.

**शिपाई व जनता**

इंग्रजी कारभारांतील शेतकी कायद्यामुळें इंग्रजपूर्व काळांत बळकावलेलीं बिनसनदी गांवें गमावलेले जमीनदार शिपाईगर्दीनें इंग्रजांचें वर्चस्व लोपतांच उत्पन्न झालेली अधिकाराची पोकळी भरून काढायला सरसावले व शिपाई-गर्दीनें व्यापलेल्या प्रदेशांत बरेच महिने त्यांनीं धुमाकूळ घातला, अशी जमीनदारांच्या वर्तनाची मीमांसा मागें सांगून झाली आहे. कॅनिंगनें म्हटल्याप्रमाणें आपल्या अनियंत्रित अधिकाराला बसलेला आळा, ही स्थिति जमीनदारांना अधिक जाचत होती. जमीनदार, त्यांचे गांवकरी आणि शिपाई हे एकाच प्रदेशांतले रहिवासी असल्यामुळें शिपायांनीं इंग्रजांचें वर्चस्व

झुगारण्याच्या उद्योगापायीं आपलें जीवनसर्वस्व संकटांत लोटल्यावर त्यांच्या साह्याला जमीनदार व गांवकरी उभे राहिल्यास त्या स्थितीमध्यें राष्ट्रीय स्वातंत्र्यसाधनाचा महान् उद्देश भरलेला होता, असें म्हणणें भ्रामक ठरतें. नबाबशाही मुलखांतील जमीनदारांच्या मानानें इंग्रजी राज्याखालीं सुमारें ५० वर्षें नांदलेल्या गंगायमुनेच्या दुआबामध्यें जमीनदारांची संख्या शिपाई-गर्दीमध्यें कमी दृष्टीस पडते. खच्ची झालेला अधिकार व त्या अधिकाराखालीं एकदां असलेल्या गांवांच्या संख्येचा संक्षेप या दोन्ही गोष्टी तेथील जमीन-दारांच्या अंगवळणीं पडलेल्या होत्या. त्या शल्याची वोंच कमी झालेली होती. परंतु जमीनदारांपेक्षां इंग्रजी वर्चस्वाच्या अभावाचा फायदा घेऊं इच्छिणारे इतर लोकच संख्येनें अधिक दिसतात. अलीकडे कलकत्त्यास 'शिपायांच्या बंडांतील लोकांची दंगल १८५७–५९' (Civil disturbances during the Indian mutinies 1857-1859) या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. शिक्षणक्षेत्रांतील इतिहास विषयाशीं संबंध असलेले श्री. शशिभूषण चौधरी हे सदर पुस्तकाचे लेखक आहेत. त्या पुस्तकांत शिपाई-गर्दीच्या सगळ्या प्रदेशांतील लोकांनीं चालविलेल्या बेबंदशाहीची हकीकत दिलेली आहे. १८५७–१८५९ या दोन वर्षांत आजच्या उत्तर प्रदेशांत जें घडलें ती निवळ शिपायांची बंडाळी नव्हती, तर सगळी जनता त्या घटनेंत सामील होती, असें दाखवून तिची थोरवी वाढविणें हा या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे. सदर पुस्तकांत जमीनदार, मौलवी आणि स्वयंमन्यतेनें मिरविणारे दंगलीच्या काळांतील नवे जुने नबाब किंवा राजे यांची इंग्रजांनींच ग्रथित केलेली माहिती पूर्वोक्त उद्देशानुसार निराळ्या रंगामध्यें मांडलेली जिज्ञासूंना आढळेल. गांवोगांव इंग्रजांच्या नष्टचर्याचा फायदा उकळणारीं माणसें शेंकड्यांनीं पुढें आलीं, पण त्यांनीं साधलें काय या प्रश्नाचें उत्तर या पुस्तकाच्या लेखकाला देतां आलेलें नाहीं. त्यांनीं थोडा वेळ चैन करून घेतली, सत्ता गाजविली आणि चार सहा महिन्यांच्या आंत अज्ञातवास किंवा मृत्यु पत्करला, असें 'त्यांनीं साधलें काय' या प्रश्नाचें उत्तर सदर पुस्तकांत दिलेल्या माहितींतून वाचकांना काढावें लागतें. जी गत स्वयंमन्य पुंडांची तीच जमीनदारांची. नबाबशाहीचे जमीनदार शिपाईगर्दींत किती होते व त्या गर्दींत केवढ्या संख्येच्या लढवय्या लोकांनिशीं ते केव्हां शिरले हा प्रश्न गौण आहे. त्यांचा उद्देश काय होता? नबाबशाहीचा पुनरुद्धार हा होता कीं,

सावकारांच्या हातीं पडलेलीं आपलीं गांवें पुनः मिळविण्याचा होता? इंग्रजांचा अधिकार जेथें उरला नाहीं तेथें पुष्कळशा जमीनदारांनीं कर्जापोटीं सावकाराकडे गेलेलीं गांवें सावकारांना लुटून व ठार करून आपलीशीं केलीं. हा प्रकार अखिल भारताच्या स्वातंत्र्याशीं कसा जोडायचा? नबाव-शाहीचा उद्धार म्हणजे अखिल भारतीय राज्यस्थापनेला हातभार, हें समी-करण पटणारें नाहीं. इंग्रज जोरावतांच नबाबासंबंधाच्या एकान्तिक निष्ठेचे कांहीं नामवंत अपवाद सोडल्यास बाकीच्या बहुतेक जमीनदारांनीं "घालीन लोटांगण, वंदीन चरण" हा मार्ग चोखाळून खरा स्वार्थ दृष्टीआड होण्यासाठीं पत्करलेला नबाबशाहीचा उद्धार हा एक वहाणा होता, असें निदर्शनास आणून दिलें. इंग्रजांना शरण जाणारांपैकीं पुष्कळांचा शिपाईगर्दी मोडल्यावर फायदा झाला व नबाबशाहीच्या कबरीवर विस्मृतीची आणखी माती व तीसुद्धां कायमची पडली. इंग्रजांच्या कृपेनें आपल्या पोळीवर तूप ओढतेवेळीं कुणाहि जमीनदाराला ना बेगमेची ना तिच्या पुत्राची, ना बिठूरच्या पेशव्याची आठवण झाली. ही वस्तुस्थिति डोळ्यासमोर ठेवूनच शिपाईगर्दीची स्वातंत्र्यप्राप्तीच्या कसोटीवर परीक्षा केली पाहिजे. जमीनदारांनीं गोळा केलेले बारगीर हे जमीनदारांचे अंकित असल्यानें त्यांचा स्वतंत्र विचार करायला नको.

### इंग्रज व जनता

ज्या टापूंतला शिपाई त्याच टापूंतली जनता होती, दोघांचे हितसंबंध बहुतांशीं सामान्य होते, ही गोष्ट न विसरल्यास शिपाईगर्दी मागोमाग जनतेचें अराजक माजलें हें क्रमप्राप्त समजावें लागतें. मीरत दिल्लीच्या भागांत गुजर, रंगर, मेवाती, वगैरे समाज हे लुटारू वृत्तीचे असल्यानें इंग्रजी सत्तेचें दडपण गेल्याबरोबर त्यांनीं आपला पिढीजाद व्यवसाय आरंभला. हा शिपाई, हा व्यापारी, हा गोरा, हा काळा असा भेद न पाहतां जो कोणी तडाख्यांत सांपडेल त्या सर्वांना त्यांनीं सारखेच नागविलें व जरूरीप्रमाणें योग्य वाटल्यास मारलें. या लुटारू जमातींना सामान्य जनतेच्या विचाराबाहेर ठेवलें पाहिजे. अलीगड, मैनपुरी, बलंदशहर वगैरे जिल्ह्यांतून रजपूत, जाट, अहीर या समाजांत ऐक्य नसल्यानें त्यांच्यांत रक्तपाताचे तंटेबखेडे सुरू झाले. मीरत, मुजफरनगर, या जिल्ह्यांतील लोकांच्या उठावाचा बंदोबस्त मीरतला बरेच गोरे असल्यामुळें आग्र्यापलीकडच्या जिल्ह्यांपेक्षां लवकर करतां आला.

तेथें शेतसाऱ्याची वसूली जुलई ऑगस्टपासून बिनबोभाट होऊं लागली. दिल्ली पडल्यावर कानपूरच्या दिशेकडील जिल्ह्यांचे गोरे अंमलदार कंपनीच्या राज्याचें पुनरुत्थान साधण्यांत गुंतले, इतकेंच नव्हे तर हळूहळू त्यांना यश येत चाललें. एखादा इंग्रज एकटा किंवा एक दोन शिपाई सोबतीला घेऊन पुष्कळशा खेड्यांतून ऑक्टोबरच्या सुमारास हिंडण्याइतका बलंदशहर, मैनपुरी इत्यादि जिल्ह्यांतून इंग्रजांविषयीं लोकांना वाटणारा द्वेष ( खरोखरीच वाटत असल्यास ) थंडावला होता. तेथील सारावसूलीचें काम सोपें झालें होतें. इंग्रज गेल्यावर कुणालाच कांहीं द्यायला नको, या भावनेनें जनता वागत होती; असें मत कित्येक इंग्रज अधिकाऱ्यांनीं आपल्या अनुभवकथांतून व्यक्त केलेलें आहे. श्री. चौधरींच्या पूर्वोक्त पुस्तकांत गांवोगांव 'खान' व 'सिंग' उगवल्याची जी हकीकत आहे तिचा मथितार्थ असा निघतो कीं, आपसांत लूट, मारामारी व जाळपोळ करण्यांत हे खान व सिंग मग्न होते. दंगलीच्या पुढाऱ्यांची कामगिरी गेलेलीं गांवें व जमिनी नव्या मालकांपासून हिसकावणें, सराफांना व सावकारांना लुटणें व मारणें एवढीच सांगतां येते. सरकारी कचेऱ्या व ठाणीं उध्वस्त केल्यावर इंग्रजी राज्यकारभारानें ज्यांना जमिनी मिळाल्या व ज्यांचा हितसंबंध इंग्रजी राज्यव्यवहाराशीं गुंतलेला होता, त्यांच्याविरुद्ध नुसती धामधूम व दंगल माजविणें हेंच या सिंगादिका-पुढें एक कर्तव्य होतें आणि त्यालाच जनतेचा इंग्रजविरोध पटवूं पाहणारे अवास्तव महत्त्व देत असतात. या प्रकारांत इंग्रजी राज्यव्यवस्थेचा संबंध असला तरी इंग्रज त्यांत नाहीं; कारण त्यांच्या जवळपास कोणी इंग्रज नव्हता; जेथें इंग्रज होता तेथें जाण्याची खानसिंगांत धमक नव्हती, इंग्रज अंगावर आल्यास त्याला हाकलून लावण्याची त्यांच्यापाशीं शक्ति व हिंमत नव्हती; त्यांच्या संख्याबळामुळें इंग्रज एखाद्या ठिकाणीं कधीं माघारी जात असे; कुठें इंग्रजाला झोडपून मागें पिटाळला, असें उदाहरण नसलें तरी तो आपल्या दुर्बलतेमुळें परत गेला, या गोष्टीच्या फुशारकीनें लोकांची प्रशंसा फुगविण्याची तऱ्हा या इतिहाससंबंधांत कित्येकांनीं स्वीकारल्याचें दिसून येतें. इंग्रजांनीं सूड घेतांना जो आततायीपणा आचरला तोसुद्धां लोकांच्या इंग्रजविरोधी वागणुकीचा पुरावा म्हणून दाखल केला जातो. असल्या युक्तिवादाचें खंडन करूं लागल्यास निष्कारण जागा अडवावी लागेल. लोक इंग्रजाविरुद्ध उठले हें कोणीच नाकबूल करीत नाहीं. पण हे लोक कोण, कुठले, त्यांचा

इंग्रजद्वेष किती तीव्र व टिकाऊ या प्रश्नांच्या उत्तरावर त्यांच्या वागणुकीचें महत्त्व अवलंबून आहे. परंतु लोक उठले या स्थितीची वरच्यासारखी दुसरी बाजू पाहिल्यास लोक उठल्याच्या महत्त्वाचा कच्चेपणा सहज गळीं उतरेल.

**इंग्रजांचे बिनलष्करी नोकर**

दिल्लीसमोरच्या टेकाडावर इंग्रजांचें ठाणें बसलें तेव्हां त्याची चाकरी करणाऱ्या लोकांची संख्या सुमारें ४० हजारांपर्यंत वाढली. एकेका अधिकाऱ्या-मागें किमान तरी सहा काळे नोकर असायचे हा नियम होता. याखेरीज फौजेचे भिस्ती, डोलीवाले, धोबी, तोफासाठीं चबूतरे उभारणारे मजूर, स्वयंपाकी, दवाखान्याकडील खिदमतगार, झाडूवाले, पंखेवाले, बाजारचे लोक, याप्रमाणें सुमारें ४० हजारांपर्यंत काळ्या नोकरांचा आंकडा एका इंग्रजानें सुचविला आहे. भिस्ती व खानसामे यांच्या नोकरीची स्तुति बहुतेक सर्व इंग्रज लेखकांनीं मुक्तकंठानें गाइलेली आहे आपल्या मालकाला वक्तशीर गरम गरम अन्न पोंचवावें, अशी खबरदारी खानसामे घेत होते. ऐन लढाईच्या धडाक्यांत तहानेल्यांना पाणी पुरविण्याचें काम भिस्त्यांनीं अशा रीतीनें पार पाडलें कीं, लढाई संपल्यावर व्हिक्टोरिया क्रॉस त्याला मिळावा, अशी इच्छा गोऱ्यांनीं देखील सेनापतीपुढें व्यक्त केली. दिल्लींतील शिपायांच्या भिस्त्यांना मारायचें नाहीं, असा निश्चय आपल्याकडील भिस्त्याबद्दलच्या कृतज्ञतेनें दिल्ली जिंकणारांनीं अंमलांत आणला. तोफांसाठीं चबूतरे उभारणाऱ्या काळ्या मजुरांनीं तर इंग्रजांना आश्चर्यचकित करून सोडलें. दिल्लीच्या तटबंदीवरील तोफाबंदुकांच्या गोळ्यांनीं आपला सोबती पडल्यास त्याविषयीं शोकाचे उद्गार काढावे, अश्रु गाळावे, पण आपल्या कामांत खळ पडूं देऊं नये, अशी त्यांची वागणूक होती. काळ्या नोकरांचे सगळे धनी समंजस नसल्यानें नोकराची चूक झाली तर एखादा धनी काय करील याचा भरंवसा नव्हता. त्याचे पाशवी कोर्टींतील दुर्वर्तन ज्याचा तो तर सोशीत असेच, पण इतर नोकर त्याकडे दुर्लक्ष करून आपल्या कामांत कुचराई होऊं देत नसत. प्रत्यक्ष लष्करी नोकरीबाहेरच्या काळ्या माणसांना आजारी पडल्यास किंवा जखमी झाल्यास उन्हांत पावसांत उघड्या जागीं दिवस कंठावे लागत; त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असें इंग्रजांना कधीं वाटलें नाहीं. काळ्या माणसांना वाईट रीतीनें वागविण्याला कालान्तरानें प्रतिबंध करण्यांत आला, पण त्यांची स्थिति विशेष सुधारली, असें समजणें चुकीचें ठरेल. घरगुती किंवा

खाजगी नोकरांच्या इमानदारीची तारीफ बहुतेक साऱ्या इंग्रजांनीं लिहून ठेवलेली आहे व अशा इमानदारीचीं कांहीं उदाहरणें तर विस्मयकारक आहेत.

## इंग्रजांच्या खाद्यपेयांचा बाजार

दिल्लीसमोरील इंग्रजी छावणीच्या बाजारांतील सगळे दुकानदार हिंदी होते. सुरवातीस त्यांनीं इंग्रजांना माल पुरविण्यांत कुचराई चालविली होती. इंग्रजांना दिल्लींतले शिपाई हालवूं शकत नाहींत अशी खात्री पटल्यावर धान्य, भाजीपाला, फळफळावळें, अंडीं, कोंबडीं, मांस, मासे, दूधदुभतें वगैरे खाद्यांची छावणीच्या बाजारांत रेलचेल दिसूं लागली. रेलचेलीमागोमाग महागाई कमी झाली. इंग्रजांना माल पुरविणारांना किंवा इतर रीतीनें मदत करणारांना शिपाई लोक भयंकर शिक्षा भोगायला लावीत, यामुळें इंग्रजांच्या बळाची खात्री पटेपर्यंत खेड्याची जनता भीत होती. अलाहाबादेस इंग्रजांना पावरोटी पुरविणारांचे शिपायांनीं हात तोडल्याची एकच गोष्ट जनतेच्या भयाची सकारणता पटवून देईल. एकदां एका ठिकाणीं दुधांत विष असल्याचा इंग्रजांना संशय आला व तो खरा असल्याचें निदर्शनास आल्यामुळें इंग्रजांनीं त्या दूधविक्यांचे प्राण घेतले. आपखुषीनें माल आणणाऱ्या लोकांविषयीं इंग्रज शंका बाळगून व्यवहार करीत होते; परंतु हळूहळू या शंका उभयपक्षीं ऱ्हास पावून बाजार भरभराटला. इंग्रजाला सर्व प्रकारचा माल देणारे लोक हिंदीच होते. त्यांच्या कामामध्यें दिल्लींतल्या शिपायांनीं तर नाहींच पण खेड्याच्या जनतेनेंहि कधीं अडथळा आणला नाहीं. जनता इंग्रजांविरुद्ध होती असें सांगणारीं माणसें जनतेचा फार मोठा भाग इंग्रजाला मनापासून मदत करीत होता, इकडे बुद्धिपुरस्सर डोळेझांक करतात. कित्येक इंग्रजांनीं अशा स्वरूपाच्या लोकसहकाराबद्दल आश्चर्य व्यक्त केलें आहे. लोकांचा सहकार नसता तर इंग्रज बलात्कारानें माल मिळविण्याला असमर्थ ठरून पुरेशा खाद्यपेयांच्या अभावीं दिल्लीसमोरचा तळ महिनोगणती कायम ठेवणें त्याला अशक्य झालें असतें, असें कांहीं इंग्रजांचें मत ग्रंथांतरीं प्रसिद्ध आहे.

## कानपूर-लखनौची हीच कथा

पंजाबच्या हद्दीनजीक दिल्ली व पंजाबी हा इंग्रजांचा साह्यकर्ता म्हणून दिल्लीस इंग्रजांच्या चाकरींत हजारों काळीं माणसें मिळालीं, अशी समजूत जनतेच्या उठावाचे अभिमानी पुढें आणतील यासाठीं कानपूर लखनौकडे

हिंदी जनतेचे घटक कसे वागले, याची माहिती सांगणें अवश्य आहे. आग्र्याच्या किल्ल्यांतील इंग्रजांच्या वस्तीला लोकांकडून भरपूर खाद्यें मिळत होती, हें सांगितलें आहे. लखनौची कोंडी पुढाकारानें लढविणाऱ्या एका अंमलदारानें काळ्यांच्या इंग्रजनिष्ठेचीं पुष्कळशीं उदाहरणें आपल्या पुस्तकांत दाखल केलेलीं आहेत. त्यांत कांहीं व्यक्तींचीं, तर कांहीं समुदायाचीं उदाहरणें आहेत. कोंडीचा लढा लांबल्यानें हिंदी नोकर निराश होऊन पळून जात, पण त्यांची उणीव भरून काढणारे दुसरे हिंदी लोक कोंडींत येत असत. कांहीं नोकरांनीं दरमहा पगार घेण्याचें टाळलें व एक प्रकारें पळण्याच्या प्रवृत्तीला स्वयमेव बांध घातला. हिंदी नोकरांची दिल्लीसारखीच दुःस्थिति होती. त्यांच्या सुखसोयीकडे इंग्रज लक्ष देत नव्हते; पण त्यांची फार मोठी संख्या इंग्रजाशीं विश्वासानें वागली. एकदां कित्येक हिंदी पळाले तर दर रात्रीस दोन रुपये मजुरी घेऊन पुष्कळसे नवे लोक कामावर आले. त्यांचा नेहेमींचा दर दोन आणे होता, त्या दोन आण्यांऐवजीं दोन रुपये गांठीस मारण्याचा योग प्रेरक असला तरी त्याला बळी पडणारीं हिंदी माणसें इंग्रजाला पाण्यांत पाहणारीं नव्हतीं, हा निष्कर्ष टळत नाहीं. रात्रीं कोंडीच्या आंतून व बाहेरून गोळीबार चालत असल्यानें या लोकांना मरणाचें भय असून सुद्धां इंग्रजांचें काम करण्याची त्यांनीं हमी घेतली. कुटुंबाची मंडळी बाहेर शहरांत ठेवून आपण प्रतिरात्रीं रेसिडेन्सींत कामाला जातो हें धोक्याचें समजून कित्येकजण बायकामुलांसह कामावर रुजू राहिले. ही साध्या मजूरवर्गाची माहिती झाली. जे हिंदी सैनिक रेसिडेन्सींत इंग्रजांच्या खांद्याला खांदा भिडवून लढत होते, त्यांच्या इमानाची तारीफ करायला आपल्यापाशीं शब्द नाहींत, असें बऱ्याच इंग्रजांनीं म्हटलें आहे. या सर्वांच्या चाकरीचें इंग्रजांनीं कोंडी सैलावल्यावर पहिल्यांदा व लखनौची लढाई संपल्यावर पुनः एकदां उदारपणें जें चीज केलें त्याचा पाढा वाचण्याची आवश्यकता नाहीं. इंग्रजांच्या हिंदी हेरांना मिळालेल्या बक्षिसाच्या माहितीवरून इतरांचें चीज कसें झालें असेल याची अटकळ होऊं शकेल.

अलाहाबादेहून कानपुरास. हेवलॉकबरोबर जाणाऱ्या फौजेंत निरनिराळीं कामें करणारे जे सामान्य हिंदी होते, त्यांची कहाणी वरच्यासारखीच आहे. शिपाई उठले तेव्हां आरंभीं बनारस अलाहाबादच्या मार्गावर इंग्रजांना खेड्यांतील जनता आपल्याबद्दल तिटकारा दाखविते असा अनुभव आला.

इंग्रजांनीं केलेल्या हिंसेच्या वातम्या हें त्या तिटकाऱ्याचें कारण असूं शकेल. पण हा तिटकारा लवकरच मंदावला आणि हेवलॉकच्या तोफा वाहण्याला हिंदी माणसें लाभलीं. हे हिंदी तोफवाले चुकारपणा करतात असें दिसल्यावर त्यांचा पगार अधिकाऱ्यानें वाढविला आणि त्यांचा चुकारपणा थांबला व उत्साह वाढला; इतका कीं त्यांची चाल सदैव इतरांपुढें असल्याचें प्रत्ययास येऊं लागलें. फत्तेपूर पडल्यावर तें शहर लुटण्याची सेनापतीनें परवानगी दिली. तोफखान्याच्या या लोकांना रोकड रुपयांची लूट मिळाली. त्यांनीं ती टिकाऊ पिशव्यांत कोंबून तोफेच्या गाड्यावर बांधली. इंग्रज अधिकाऱ्यानें पिशव्याच्या रक्षणाची जबाबदारी घेतली होती. त्या पिशव्यांत वेळोवेळीं भर पडत असे. लढाईत या लोकांपैकीं पुष्कळजण मेले. लखनौची लढाई संपल्यावर जे जीवंत राहिले त्यांनीं आपल्या पिशव्या मागून घेतल्या व जे मेले त्यांच्या वारसांना पैनूपै हिशोब करून त्या पोंचविण्यांत आल्या. इंग्रजांच्या हाताखालीं काम करणाऱ्या भारतीयांमध्यें इंग्रजांचा द्वेष तर नव्हताच उलट विश्वास होता, हें या छोट्याशा कथेचें रहस्य मुद्दाम डोळ्याआड न केलें तर 'जनता-देखील इंग्रजाविरुद्ध होती' या प्रवादाच्या मर्यादा संकुचित झाल्याशिवाय राहणार नाहींत. कानपुरास फौजेच्या रक्षणासाठीं तयार केल्या जाणाऱ्या जागेच्या कामाकडे ३ ते ४ हजार हिंदी मजूर दरदिवशीं हेवलॉक राबवीत होता. नुकत्याच खालसा केलेल्या नबाबशाहीच्या प्रदेशांतील जनता इंग्रजां-विरुद्ध होती, पण तिला आपल्या रक्तानुबंधी शिपायाचें रक्षण करावयाचें होतें, हें पूर्वीं सुचविलें आहे. बेंगाल आर्मीचे शिपाई त्या प्रदेशांतील प्रत्येक खेड्यांतून पुरविले जात होते. अशा खेड्याच्या जनतेनें आपल्या नातलग शिपायाकरितां लढायला उभें राहावें, याचें कारण इंग्रजद्वेषाहून त्यांना वाटणारें शिपायाचें ममत्व जास्त व स्वाभाविक होतें असें दिसून येईल.

### जनतेची स्वयंसेवा

दिल्ली, कानपूर, लखनौ वगैरे ठिकाणीं इंग्रजांची सेवा करणारे हिंदी द्रव्यप्राप्तीच्या लोभानें वागले असें म्हणावें लागतें. परंतु सामान्य जनतेनें इंग्रजांना लोभावांचून जें साह्य केलें, तें एकप्रकारें अपूर्व ठरण्यासारखें आहे. मीरत, दिल्ली, बरेली व नबाबशाहीचा एखादा जिल्हा, या टापूंत गोऱ्या काळ्या खिस्त्यांची कत्तल झाली; तथापि पळालेल्या गोऱ्या स्त्रीपुरुषांना जागोजाग गांवकऱ्यांनीं वांचविल्याच्या गोष्टी थोड्या नाहींत. गांवकऱ्यांनीं

पळपुट्या गोऱ्यांना लपवावें, खायला प्यायला द्यावें आणि योग्य संधि सांपडली कीं, सोबत पुरवून जेथें त्यांना प्राणसंकटाचें भय नसेल तेथें रवाना करावें; ही जनतेची स्वयंसेवा 'दया भूतेषु' या गुणाची होती. ही सेवा इंग्रजां-विषयीं सर्वत्र सारखा द्वेष नव्हता, या स्थितीचा परिचय घडविणारी आहे. ज्यांना जीवदान मिळालें ते गोरे नागवले गेले नाहींत, असा या निवेदनाचा अर्थ नाहीं. आपलें अधिकारभ्रष्टतेच्या काळांतील दैन्य पुकारणारे इंग्रज आपल्याला राहायला गुरांच्या गोठ्यांत जागा दिली; नुसत्या गव्हाच्या चपात्या व मडक्यांतलें पाणी दिलें, अशी माहिती सांगून आपले हाल रंगवीत असतात. इंग्रजाला अतिशूद्र मानणारा तेव्हांचा हिंदु समाज होता, यामुळें गुरांच्या गोठ्यांत इंग्रजाला जागा दिली हा त्या समाजाचा गुन्हा समजतां येणार नाहीं. आपलें रोजचें खाद्य पेय इंग्रजांना दिलें, यांतहि हिंदु समाजाची चूक नव्हती. गोऱ्यांना आश्रय दिल्याच्या पापाबद्दल शिपाई व तत्सम लोक आपल्याला छळतील, असें भय आश्रयदात्या गांवकऱ्यांना होतें, तरी त्यांनीं गोरे आश्रित जीवंत राखण्याचा यत्न केला, हीच त्यांची खरी थोरवी आहे. एका बैराग्यानें एक तान्हें मूल संभाळून ते मीरतला पोंचविल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. इंग्रज बायकांचीं तान्हीं मुलें आपल्या अंगावरील दूध पाजून जगविणाऱ्या हिंदु स्त्रिया तेव्हां पुढें आल्या, अशा गोष्टी पाहिल्या म्हणजे त्या स्त्रियांच्या निस्सीम व निरपेक्ष दयाळू वृत्तीविषयीं धन्यता वाटल्याशिवाय राहात नाहीं. इंग्रजांना संरक्षण देणाऱ्या पुष्कळ गांवकऱ्यांना पुढें इंग्रजांकडून पारितोषिकें मिळालीं. पण संरक्षण देतांना त्या गांवकऱ्यांनीं पारितोषिकाची अपेक्षा धरली नव्हती. सारी जनता इंग्रजविरोधी नव्हती, या निष्कर्षाला हीं उदाहरणें पुष्टिकारक आहेत.

### शिपाई व खेडीं

शिपाई व जनता यांच्या ममत्वाचा उल्लेख मागें केला. शिपायांचा समुदाय ज्या जनतेमधला ती जनता अनेकदां शिपायांचें विविधप्रकारें रक्षण करीत होती, हें जितकें खरें आहे तितकेंच शिपायांच्या धाकानें पुष्कळ ठिकाणीं शिपायांच्या पाठीशीं ती उभी राहत होती, हें देखील खरें आहे. हेवलॉकला मदत करणाऱ्या खेड्यांतील लोकांना शिपायांनीं छळल्यामुळें हीं खेडीं हेवलॉक-आउटरॅमच्या मोहिमेच्या आड आलीं. शिपाई व इंग्रजी फौज या दोघांनीं खेड्यांना सतावलें; पण इंग्रज विजयी होणार, असा विश्वास

उत्पन्न झाल्यानंतर खेड्यांतील जनता शिपायांनीं केलेल्या छळाचा सूड उगवूं लागली. शिपायांना खेड्यांतून मग थारा मिळेनासा झाला. खेड्यांतून इंग्रजांचा पाठलाग चुकविण्यासाठीं लपणारे शिपाई इंग्रजांच्या हवाली करण्याची तत्परता खेडकरी दाखवूं लागले. इंग्रजांसमोर पळणाऱ्या शिपायांना लुटणें हा खेड्याच्या लोकांचा एक किफायतीचा धंदा होता. शिपाई दिल्लीकडे जातांना इंग्रजांना मारल्याच्या किंवा इंग्रजांना पळवून लावल्याच्या गुर्मीनें संपन्न खेडीं व गांवें लुटीत असत. अशा खेड्यांना व गांवांना शिपायांविषयीं प्रेम नसावें, यांत आश्चर्य नाहीं. सामान्य जनतेला गवताप्रमाणें तुडवीत पुष्कळशा भागांतून शिपाई दिल्लीस गेले. शिपायांच्या मागून ठिकठिकाणीं जे खान व सिंग उदयास आले त्यांच्या धुमाकुळानें जर कोणी पिडली गेली असेल तर ती खेड्यांतीलच जनता. खाकी रिसाल्याच्या डनलापनें ग्रथित केलेल्या व श्री. चौधरींच्या १८५७-५९ मधील लोकांच्या दंगलींत आढळणाऱ्या गोष्टींचें तात्पर्य जेथें इंग्रजांचें राज्य कांहीं काळ नामशेष झालें तेथें अराजक माजलें, एवढेंच सांपडतें. एका खेड्यांतील पुंडांनीं दुसऱ्या खेड्यांत लूटमार करावी, आणि इंग्रजांसमोर हार खावी, या स्थितीला स्वराज्य किंवा स्वातंत्र्य म्हणणारे खुशाल म्हणोत. पण ही स्थिति अराजकाच्या व्याख्येला शोभणारी होती, असा निर्णय विचारान्तीं स्वीकारणें भाग आहे. इंग्रजांचें थोडेसें बळ दिसूं लागतांच भराभर पुष्कळशीं खेडीं इंग्रजी कारभाराला मान्यता देण्यास पुढें आलीं हें इंग्रजांबद्दल स्वराज्याच्या दृष्टीचा द्वेष जनतेमध्यें नव्हता, याचें भक्कम प्रमाण आहे.

### हिंदुमुसलमान

१८५७ सालीं हिंदुमुसलमान एकमेकांशीं सर्वत्र सलोख्यानें वागले व त्यानंतर इंग्रजांच्या कारवाईनें त्यांच्यामध्यें दुजाभाव वाढला, असा एक सिद्धान्त अतिशय आवेशानें मांडला जात असतो. या सिद्धान्ताचा पोंचटपणा मागें किंचित् उघडकीस आणला आहे. शिपाईगर्दीच्या पुरांत हिंदुमुसलमान दोघे सांपडले व सगळीकडे ते एकमेकांशीं भांडत नव्हते, हें खरें असलें तरी जिकडे तिकडे त्यांच्यामध्यें सख्य व तेंहि शत्रूला खडे चारण्याच्या उत्साहानें नांदत होतें, अशी समजूत करून घेण्याला आधार नाहीं. मुसलमानांनीं बऱ्याच ठिकाणीं हिंदूंशीं रक्तपाताचा झगडा केल्याची माहिती जनतेच्या ऐक्याचे पोवाडे गाणारांनाहि झांकतां आलेली नाहीं. शिपाईगर्दीचा येथें

निरूपिलेला वृत्तान्त वाचणारांच्या डोळ्यांपुढून हिंदुमुसलमानांच्या संघर्षाची माहिती गेलेली आहे. शिपायांपुरता हिंदुमुसलमानांमध्यें विरोध नव्हता. जेव्हां शिपायांची संघटना मोडली तेव्हां तिच्यांतील हिंदुमुसलमानांमध्यें कुठें कुठें दुफळी दिसून आली, पण ही दुफळी विकोपास गेल्याचीं उदाहरणें नाहींत. जनता ही शिपायांसारख्या एका शिस्तीच्या व ध्येयाच्या संघटनेची नसल्यामुळें तिच्यांतील या प्रमुख समाजविभागाचें द्वैत कित्येक ठिकाणीं अनावर होऊन त्यांनीं एकमेकांच्या कत्तली केल्याच्या हकीक़ती शिपाईगर्दीच्या इतिहासांत नमूद झालेल्या आहेत. शिपायांकडून गांजल्या गेलेल्या हिंदूंनीं हिंडनवरील पहिल्या लढाईंत शिपायांचा पराभव झाल्याबरोबर आनंद व्यक्त केला, हा हिंदूंच्या मुसलमानविरोधी नव्हे तर शिपाईविरोधी भावनेचा एक पुरावा आहे. रोहिलखंडाच्या बिजनोर, बरेली, बदायूं, शहाजहानपूर या जिल्ह्यांतून हिंदूंना रगडण्याचा डाव मुसलमान खेळत होते. अलीगडच्या मुसलमानांनीं हिंदूंना लुटलें, मारलें व कित्येकांना बाटवलेंसुद्धां. हे जिल्हे मुसलमानांच्या वरचष्म्याचे म्हणून तेथील दंगे हिंदुमुसलमान एकोप्याच्या दृष्टीनें उपेक्षणीय ठरत नाहींत. बनारस जिल्हा प्राधान्यानें हिंदु वस्तीचा असूनहि तेथें मुसलमानांनीं इस्लामी झेंडा उभारून हिंदूंना बिथरविल्याची घटना तत्कालीन लेखकांना लपवितां आलेली नाहीं. हिंदुमुसलमानांतल्याच कटकटीनें नव्हे तर मुसलमानमुसलमानांतल्या व हिंदूहिंदूंतल्या अंतःस्थ भेदभावापायीं जनतेचा उठाव अनेक जागीं पोखरला गेला; असें जनतेच्या उठावाचे स्तुतिपाठकदेखील कबूल करतात. या अंतःस्थ भेदभावाचा खुलासा मार्मिक वाचकांना पूर्वीच्या निवेदनांत पाहायला सांपडेल. जेथें पुढाऱ्यांत मेळ नाहीं, जनतेमध्यें जूट नाहीं, त्या प्रदेशांत स्वातंत्र्य व स्वराज्य जन्मास येणार होतें, हा ग्रह अवास्तव असल्याचें आतां ध्यानांत येईल.

### शिपाईगर्दीचें विस्मरण

१८५९ मध्यें शिपाईगर्दी संपून इंग्रजांचें राज्य पुनः १८५७ पूर्वींपेक्षां जास्त बळकटीनें देशांत रुजलें व पसरलें. १८५९ नंतर १९४७ पर्यंत तें टिकलें. १९४७ मध्यें आपला देश स्वतंत्र झाला, अर्थात् हें स्वातंत्र्य इंग्रजांच्या केवळ कृपेनें मिळालेलें नसून लोकांच्या दीर्घकालीन चळवळीनें मिळालें. या चळवळीचे दोन विभाग स्पष्ट दिसतात. फडके, चाफेकर बंधु, बंगाल व महाराष्ट्र या प्रदेशांतून इंग्रजाविरुद्ध झालेले कट; त्याला पंजाब, उत्तर प्रदेश,

मद्रास इत्यादि भागांत फुटलेल्या शाखा, हा त्या चळवळीचा एक विभाग असून १८८५ सालापासून १९४७ पर्यंत काँग्रेसच्या विद्यमानें झालेला उद्योग हा स्वातंत्र्यसाधनाचा दुसरा विभाग आहे. त्यांत पुनः म. गांधींच्या नेतृत्वाच्या १९२० सालापासून पुढील काळांतील चळवळीचा एक निराळा टप्पा आहे. या चळवळीच्या इतिहासांत १९२० पर्यंत स्थूलमानानें १८५७ च्या शिपाईगर्दीचा संदर्भ मुळींच आढळत नाहीं. पुनः १८५७ सारखा शिपाई-गर्दीचा प्रसंग उद्भवूं नये म्हणून इंग्रजांनीं आपल्या कारभारांत काळजी घेतली असेल; परंतु लोक १८५७ तील शिपायांचा उठाव पूर्णपणें डोळ्याआड ठेवून वागत होते याची साक्ष बंगाली, महाराष्ट्रीय, हिंदी, उर्दू या भाषेच्या साहित्याचें समालोचन केल्यास पटणारी आहे. महाराष्ट्राचे लेखक गॅरिबाल्डी, मॅझिनी, काव्हूर ( इटाली ), आयरिश राष्ट्रवीर यांचीं चरित्रें लिहून आपली स्वातंत्र्यप्रीति तृप्त करीत होते, याची कल्पना 'ग्रंथसूची'च्या चाळनेनें होऊं शकेल. इंग्लंडच्या जनतेला व हिंदुस्थानांतील इंग्रज राज्यकर्त्यांना शिपाईगर्दीचा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा वाटत असल्यानें त्यांनीं यासंबंधाचीं पुस्तकें १८५७ सालापासूनच लिहिण्याला सुरुवात केली व १९५७ पर्यंत ही त्यांची लेखनपरंपरा चालू आहे. १८५७ कडे गेल्या दहा-पांच वर्षांत इकडील इतिहासज्ञांचें लक्ष वेधलें व कांहीं संशोधनपर साहित्य प्रकाशांत आलें.

शिपायांच्या उठावप्रकरणाचे लहान मोठे इतिहास पूर्वनिर्दिष्ट भाषांतून लिहिले गेले. मराठीपुरतें बोलायचें तर १८६० मध्यें प. वा. वि. कों. ओक यांनीं लिहिलेल्या इतिहासाचें नांव सांगतां येईल. त्यांच्यामागून तीन तपें उलटत असतां झांशीच्या लक्ष्मीबाईचें चरित्र प्रकाशांत आलें. पुढें दोन अडीच तपें लोटल्यावर आणखी एक इतिहास प्रसिद्ध करण्यांत आला. परंतु लोकांच्या राजकीय विचारसरणींत शिपायांच्या उठावाला स्थान नव्हतें, हा मुद्दा अगदीं स्पष्ट आहे. १८५७ ची धामधूम उत्तर भारतामध्यें चालू होती तेव्हां ती यशस्वी झाल्यास देशाचें नुकसान होईल, असा प. वा. वि. ना. मंडलिकांचा अभिप्राय त्यांच्या चरित्रांत नमूद आहे. दादाभाई नौरोजी, फेरोजशहा मेथा, सुरेंद्रनाथ बानर्जी, रानडे, टिळक, गोखले, लजपतराय, मालवीय, यांनीं लोकोद्धाराविषयीं प्रगट केलेल्या विचारांत शिपाईगर्दीला मान दिल्याचा दाखला नाहीं. बिपिनचंद्र पाल यांनीं शिपाईगर्दीबद्दल बंगाली जनता अत्यंत उदासीन

( cold ) असल्याचें आपल्या चरित्राच्या प्रस्तावनेंत ( द्वितीय खंड ) कांहीं आड पडदा न ठेवतां बजावलें आहे. हिंदी व उर्दू भाषेचें जेथें प्राधान्य त्या उत्तर प्रदेशांतील वाङ्मयांत शिपायांच्या उठावाची निस्सीम उपेक्षा दृष्टीस पडते. याची चर्चा कम्यूनिस्ट पक्षानें छापलेल्या १८५७ संबंधांच्या लेखसंग्रहामध्यें आलेली आहे. १८५७ मध्यें होरपळलेल्या कित्येक मुसलमान लेखकांनीं आपल्या आठवणी किंवा शिपायांच्या उठावाचे समग्र इतिहास लिहिले आहेत, परंतु इतिहास लिहिणें निराळें आणि सामान्य वाङ्मयांत अथवा राजकीय चळवळीच्या विचारांत या विषयाच्या छटा वारंवार उठत राहणें निराळें हें समजायला कठिण नाहीं. १८५७ मध्यें जणूं कांहीं विशेष घडलेंच नाहीं, अशा भूमिकेवरून पुढील राजकीय चळवळ चाललेली होती. राज्यकारभारांतील इंग्रज व हिंदी अधिकारी ठार मारण्याच्या ध्येयाचा प्रयत्न हिंदुस्थानामध्यें अस्तित्वांत आल्यानंतर १९२० सालाच्या सुमारास अधिकारी मारण्याच्या इतिहासाकडे लक्ष जाऊन १८५७ च्या उठावाचें प्रशंसन होऊं लागलें. इंग्रजांचें राज्य तेव्हां चालू असल्यानें या प्रशंसनाला कायद्याच्या मर्यादा संभाळण्याची आवश्यकता होती. त्यापूर्वीं १८५७ च्या शिपाईगर्दीला स्वातंत्र्ययुद्ध क्रान्तियुद्ध मानण्याच्या प्रघातानें लोकांत मूळ धरलें होतें. त्याच्या प्रभावानें त्या प्रसंगांतील प्रख्यात स्त्रीपुरुषांना स्वातंत्र्यवीर किंवा क्रांतिवीर या शब्दांनीं गौरविण्याची प्रथा पडली. तथापि या प्रशंसनाचा ध्वनि सगळा देश दणाणून सोडण्याइतका मोठा नव्हता. लहानशा वर्गाच्या द्वारें त्या प्रशंसनाचें अनुवादन घडत होतें म. गांधींच्या अहिंसेची शिकवण शिपाईगर्दीच्या नवप्रचालित प्रशंसनाला अनुकूल नव्हती. देशाच्या राजकीय विचारांत १८५७ ला जागा नव्हती ही प्रारंभीं सुचविलेली स्थिति या विवेचनानें लक्षांत येईल. याचें कारण उघड आहे. इंग्रजांच्या विद्यादानाचा लाभ घेणाऱ्या समाजाला इंग्लंड युरोपचा इतिहास शिकून देशभक्तीचीं जीं तत्त्वें आकलन झालीं, तीं शिपाईगर्दीसारख्या व्यवहाराला उचलून धरणारीं नव्हतीं. स्वातंत्र्य, क्रान्ति इत्यादि विषयांबद्दल नवीन दृष्टि इंग्रजी शिकलेल्यांच्या अंगवळणीं पडली होती व त्या दृष्टीनें जो स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग दाखविला त्या मार्गानें नवे पुढारी व लोक जात होते.

## ....'राष्ट्रीय' शब्दाची मीमांसा

शिपायांच्या उठावाला 'राष्ट्रीय' शब्दानें शोभविण्याचा जो प्रयत्न आहे त्याची बारीक पाहणी केल्याखेरीज या विषयाचा परामर्श पूर्ण होणार नाहीं. यासाठीं उठावापूर्वीच्या दहा वर्षांपर्यंत हिंदुस्थानाचें राजकीय दृष्ट्या जें स्वरूप होतें त्याचें निरीक्षण करणें अवश्य आहे. अठराव्या शतकाच्या मध्यांत इंग्रजांनीं बंगालचा मोगल सुभा बगलेंत मारून खऱ्या अर्थानें आपल्या व्यापारी रोजगाराखालीं राज्यसत्तेचा लष्करी आधार निर्माण केला. पुढें पन्नास वर्षांमध्यें उत्तरेस अयोध्येची नबाबशाही, दक्षिणेस निजामशाही, मराठेशाही, म्हैसूरची हैदर टिपूशाही इत्यादि राज्यांना प्रथम आपल्या शहांत आणून इंग्रजांनीं आधीं टिपूचा व त्यामागून सुमारें २० वर्षांच्या आंत पेशवाईचा नाश साधला. याच काळांत शिंद्याच्या राज्यसत्तेवर आपल्या सामर्थ्याची कात्री चालवून गंगा-यमुनेचा दुआब इंग्रजांनीं आपल्या कारभारांत जिरविला होता. पेशवाईच्या अस्तामागून बुंदेलखंडांतील मराठ्यांची सुभेदारी संपुष्टामध्यें आली आणि झांशीचें राज्य इंग्रजांच्या कृपेनें चालू राहिलें. माळव्यांतील शिंदे, होळकर, नागपूरचे भोसले, गुजरातमधील गायकवाड या सर्वांना इंग्रजांच्या शक्तीनें आवळून टाकलें होतें. पश्चिमेकडे सिंध, पंजाब हे दोन प्रदेश स्वतंत्र होते, पण १८४३ व १८४९ मध्यें त्या प्रदेशांची स्वतंत्रता निमाली. हा इतिहास कराची ते कलकत्ता आणि हिमालय ते रामेश्वर एवढा सर्व देश सामाजिक, धार्मिक, भाषिक व राज्यविषयक एकत्वाच्या भावनेनें 'राष्ट्र' शब्द सार्थ करणारा होता असें प्रत्ययास आणून देणारा नाहीं. राष्ट्रत्वाला एक भाषा, एक धर्म हे घटक अपरिहार्य नसले तरी एक राज्य अवश्य असतें. १८५७ पर्यंतचा इतिहास पाहिला तर देशभर निरनिराळीं राज्यें होतीं व त्यांच्या अधिकाराखालीं जनता विभागलेली होती, असें दिसतें. आपल्यावर राज्यकर्ता या नात्यानें कोण अंमल गाजवितो हा प्रश्न मनाला जाचूं न देतां जनता जो राज्यकर्ता येईल त्याची हुकुमत मानणारी होती. दिल्लीची सुलतानशाही जाऊन मोगलांची बादशाही आली याचा विचार जनतेला नव्हता. मोगल बादशाहीच्या जागीं मराठे, इंग्रज, जाट आले तर त्यांची क्षिति जनतेनें बाळगली नाहीं. जो कोणी आपलें प्रभुत्व स्थापण्याला समर्थ असेल त्याचें प्रभुत्व अंगिकारून दिवस काढायचे असा जनतेचा स्वभाव शेंकडों वर्षांपासून दृष्टीस पडतो. ज्या प्रदेशांत शिपाईगर्दी घडून

गेली, तेथील धडधाकट देहाचे पुरुष इंग्रजांच्या सैन्यांत दाखल होऊन मराठे, जाट, मोगल, शीख यांचीं राज्यें मोडायला मदत करीत होते. या प्रदेशांत पेंढारी, ठग, यांच्या जोडीनें इतर कित्येकजण लुटालूट, जाळपोळ, मारामारी याप्रमाणें अत्याचार करीत होते. इंग्रजांच्या चाकरींतले शिपाई हे पेंढारी, ठग यांच्या जमावाशीं व मराठे, जाट यांच्या राज्याशीं अभेदभावानें वागत होते.

राज्यविषयक एकत्वाच्या अभावाप्रमाणें सामाजिक राहणी, भाषा, धर्म यासंबंधांतहि एकत्वाचा अभावच आढळतो. पारशी, यहुदी यांची संख्या अत्यल्प म्हणून त्यांची उपेक्षा केल्यास चालेल. पण हिंदु, मुसलमान, शीख व ज्या काळांत शिपाईगर्दी उसळली त्या काळांतला ख्रिस्ती हे धर्मभेद उपेक्षणीय नाहींत. धार्मिक—त्यांतच परमार्थाचा अंतर्भाव करावा—त्या अंगानें हिंदु समाजांत बहुतांशीं एकजिनसीपणा दिसणारा असला तरी सर्वत्र सगळ्या हिंदूंची राहणी एका स्वरूपाची नव्हती ( व आजहि नाहीं. ) बंगाली, बिहारी, रजपूत, गुजराती, मराठा, तेलंगी यांची राहणी व त्यामागील समजुती यांतील फरक सहज लक्षांत येणारा आहे. मुसलमान, शीख अथवा ख्रिस्ती यांच्या राहणींतील फरक व त्यावर आधारलेला विरोध हा इतका स्पष्ट आहे कीं, त्याचा जास्त विचार करायला नको. स्थूल मानानें धर्म एक असूनहि जसा हिंदूला हिंदूचा जिव्हाळा नव्हता, तसाच मुसलमान–मुसलमानांत सुद्धां जिव्हाळा नव्हता. अफगाणांवर इंग्रजानें चढाई केली तेव्हां त्यांच्या फौजेंतील कित्येक मुसलमान शिपायांनीं अफगाणांवर गोळ्या झाडल्या नाहींत, ही गोष्ट खरी मानली तरी शिपाईगर्दी चिरडतांना मुसलमानांनीं मुसलमानांविरुद्ध मदत केल्याची वस्तुस्थिति स्पष्ट आहे. मुसलमान, रजपूत, मराठे, शीख, जाट यांना स्वराज्याची ओळख होती. शिपायाला स्वराज्य ठाऊक नव्हतें. त्याला धर्म तेवढा माहीत होता. हिंदु शिपायांत मोठें प्रमाण ब्राह्मणांचें होतें, यावरून त्याला धर्मशास्त्राचें ज्ञान होतें, अशा भ्रमांत न पडणें चांगलें. मात्र ब्राह्मण म्हणून त्यांचें समाजांत महत्त्व होतें. परंपरागत आचारविचारालाच तो धर्म समजत होता आणि धर्माच्या निमित्तानेंच त्यानें १८५७ मध्यें इंग्रजांविरुद्ध हत्यार उपसलें. त्याच्या उठावांत मुसलमान सामील झालें तेहि धर्मरक्षणाची घोषणा करीत होते. परंतु सती जाण्याला बंदी, विधवाविवाहाला परवानगी, परदेशगमन इत्यादि कायद्यांमुळें मुसलमानांचा धर्म बुडणार नव्हता. डुकराची चरबी चोपडलेलें काडतूस हें त्याचें एकच भयस्थान होतें. राजकीय वर्चस्वाची

हानि हें मुसलमानाचें खरें दुःख असल्यामुळें तो आपलें राजकीयच नव्हे तर धार्मिक वर्चस्व कमावण्याच्या इर्ष्येनें हिंदु शिपायांच्या उठावांत मिसळला. उठावाच्या अराजकांत मुसलमान समाज अनेक ठिकाणीं हिंदूंशीं हाडवैरानें वागला हें लक्षांत ठेवल्यास हिंदु धर्माचें प्रेम त्याला कितीसें होतें; याचें अनुमान करतां येईल. मुसलमान एकदां राज्य करीत असल्यानें त्यांच्या ठिकाणीं गमावलेल्या धर्मप्रधान राजकीय थोरवीविषयीं इंग्रजाविरुद्ध दंश होता असें त्यांच्या शिपाईगर्दींतल्या कामगिरीवरून म्हणावें लागतें. येथें वर्णिलेली सामाजिक व राजकीय स्थिति 'राष्ट्र' शब्दानें सूचित होणाऱ्या एकजिनसी-पणाशीं पूर्णपणें विसंगत असल्यानें त्या शब्दाचें लेणें शिपायांच्या उठावावर चढविणें उचित ठरत नाहीं. बंगालच्या फाळणीनें, जालियनवाला बागेंतील कत्तलीनें, बिहारच्या धरणीकंपांतील हानीनें, सारा देश हादरला ही भारताच्या राष्ट्रीयत्वाची साक्ष पटविणारीं उदाहरणें आहेत. शिपाई-गर्दीला देशभर वरील उदाहरणाप्रमाणें अनुकूलता लाभली नाहीं हें भारत देश राष्ट्राच्या योग्यतेस पोंचला नव्हता, यांचें मोठें प्रमाण आहे.

शिपाई इंग्रजांचें प्रभुत्व झुगारण्याला उभा राहिला, यावरून त्याला इंग्रज नकोसा वाटत होता, ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. 'इंग्रज नको' हा उद्देश नकारात्मक (Negative) आहे. इंग्रजांची जागा कोणी घ्यावयाची अर्थात् इंग्रजांमागून राज्य कोणी करावयाचें, कुणाचें सरकार अस्तित्वांत यावयाचें या महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर 'इंग्रज नको' या उद्देशांत नसल्यानें दिल्लीची बादशाही, नानासाहेबांची पेशवाई, अयोध्येची नबाब-शाही या मृतावस्थ राजकीय संस्थांना सजीव करण्याकडे शिपाई वळले. या संस्थांची ऐतिहासिक दृष्टया महती असली तरी त्यांच्या कर्तृत्वाचा जिवंतपणा संपल्याला नबाबशाही सोडल्यास सुमारें पन्नास वर्षे लोटलीं होतीं. नबाब-शाहीचा खरा मालक कलकत्त्यास असल्यानें त्याची बेगम व पुत्र या दोन व्यक्ति नबाबशाही जीवंत करण्याला समर्थ नव्हत्या. त्यांच्या पुढारीपणानें जी धुगधुगी उत्पन्न केली तिचें चलन-वलन वर्षभर चालू राहिलें. इंग्रज नको म्हणजे इंग्रजांचें राज्य नको, या भावनेंत 'स्वराज्य व्हावें' या कल्पनेचा जो सूक्ष्म ध्वनि आहे तो साकार करणाऱ्या बुद्धिमत्तेचें बळ शिपायांत तर नव्हतेंच पण त्यांच्या पुढाऱ्यांतहि नव्हतें. इंग्रजांचें राज्य जेथें नाश पावलें तेथें लोक स्वतंत्र झाले. त्यांना कोणी नियंता नसल्यानें त्यांच्या स्व-तंत्रतेला अराजकाचें-

बेबंदशाहीचें–रूप यावें यांत आश्चर्य नाहीं. अराजक हें एक प्रकारचें स्वातंत्र्यच आहे. आपापल्या बळाला अनुसरून यथेच्छ वागण्याची संधि किंवा स्वतंत्रता अराजक स्थितींतहि माणसाला असते. १८५७ तील शिपाई-गर्दीला देशाच्या स्वातंत्र्याची लढाई म्हणणारे 'इंग्रज नको' 'फिरंगी मारला' या घटनेकडेच फक्त लक्ष देतात. जेथून इंग्रज गेला तेथें 'वळी तो कान पिळी' या प्रकाराचा धिंगाणा सुरू झाला, या परिणामाकडे शिपाई-गर्दीला स्वातंत्र्ययुद्ध मानणारे पाहतच नाहींत. एक राज्य जाऊन दुसरें राज्य होण्यापूर्वी थोडासा काळ बेबंदशाही चालते असा नियम आहे. पण ही बेबंदशाही मोडून काढणारें नवें राज्य जन्मास येण्याची अपेक्षा जर सफळ झाली नाहीं व ज्याच राज्य नको म्हणून उठावणी तोच साहेब जर शास्ता या नात्यानें चार सहा महिन्यांनीं अराजकाच्या प्रदेशांत पूर्ववत् अधिकार गाजवूं लागला आणि लोकांनीं जर त्याच्या अधिकाराचें स्वागत आरंभलें तर शिपाईगर्दीच्या संकेतामधील स्वराज्यस्थापनेची आकांक्षा कशी निःसत्त्व होती याचें आणखी विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं.

शिपाईगर्दीच्या संदर्भांत 'राष्ट्र' शब्दाच्या व्याप्तीचा नीट विचार होत नाहीं हें ध्यानांत येण्यासाठीं आणखी थोडासा ऊहापोह करणें अवश्य आहे. हिंदुस्थान देशाला 'राष्ट्र' हा शब्द लावतांना पंजाब, सिंध, मुंबई, मद्रास, ओरिसा, बिहार, बंगाल, आसाम हे प्रांत; ग्वाल्हेर, इंदूर, कोल्हापूर, निजाम, म्हैसूर, त्रावणकोर त्याचप्रमाणें राजस्थानांतील संस्थानें या सर्वांचा समावेश करण्याची रीत होती. शिपाईगर्दीचा मुलूख एकंदर देशाकडे पाहतां सहाव्या हिश्शाएवढा होता व लोकसंख्या एक दशांश होती, असा हिशोब इतिहासकारांनीं काढलेला आहे. या अंशाला 'राष्ट्रीय' हें विशेषण चिकटविल्यानें बाकीच्या अंशांची–त्यांची संख्या फार मोठी आहे–काय वाट करावयाची हा प्रश्न ते अंश इंग्रजधार्जिणे, पर्यायानें स्वजनद्रोही अथवा स्वदेशद्रोही होते अशा उत्तरानें सोडवावा लागेल. देशाच्या पांच षष्ठांशाइतक्या भागांतील जनतेवर द्रोहाचा आरोप करणें हें विलक्षण धाडस आहे. शंभर वर्षांनंतर असें बेजबाबदार धाडस करणें सोपें आहे; पण हें धाडस समंजसपणाच्या किंवा सज्ञान युक्तिवादाच्या चौकटींत बसणारें नाहीं. पांच षष्ठांश प्रदेशांतील जनतेची शिपाईगर्दीविषयीं प्रामाणिक प्रतिकूलता असल्यामुळें त्या जनतेनें उदासीनतेची किंवा उघड विरोधाची भूमिका स्वीकारली, असें मानल्याशिवाय

गत्यंतर नाहीं. कालपर्यंत इंग्रजी राज्याचा अतिशय निष्ठावान् घटक असलेला जो शिपाई त्यानें आज इंग्रजांशीं लढाई आरंभली एवढ्याकरितां त्याला व त्यानें आयत्यावेळीं जोडलेल्या पुढाऱ्यांना देशाच्या स्वातंत्र्यसाधनाचा प्रतिनिधि समजण्याला जर संस्थानिक व शिपाईगर्दीच्या व्यापाबाहेरील प्रदेशांची जनता तयार नसेल तर या सर्वांवर देशद्रोहाचा छाप मारून मोकळें होण्याऐवजीं त्यांच्या प्रतिकूलतेचा अधिक खोलांत जाऊन विचार केला पाहिजे. शिपाई व त्यांचे पुढारी नवें राज्य निर्माण करण्याला असमर्थ असल्याबद्दल जर तत्कालीन संस्थानिकांना व निरनिराळ्या प्रदेशांतील जनतेला खात्री वाटत असेल तर त्यांनीं शिपायांच्या धामधुमीपासून अलिप्त राहण्याची किंवा इंग्रजाला मदत करण्याची वृत्ति अंमलांत आणली, म्हणून आज त्यांच्या नांवानें खडे फोडण्यांत हंशील काय? शिपाई व दिल्लीची बादशाही शिखांना पसंत नव्हती, राजस्थानी संस्थानिकांना तसेंच निजामाला पेशवाईचें पुनरुज्जीवन आपल्याला घातक असें वाटत होतें, वगैरे माहिती पूर्वीं दाखल केलेली आहे.

### इंग्रजांचे अभिप्राय

शिपाईगर्दीच्या एकंदर स्थितीचा येथें वर्णिलेला अनुभव घेऊन त्याविषयीं लेखन करणाऱ्या इंग्रजांनीं त्या प्रसंगाला 'शिपायांचें बंड' किंवा 'शिपायांचें युद्ध' असें नांव दिलें. विल्यम म्यूर नांवाचा एक आग्रा येथील इंग्रज अधिकारी शिपाईगर्दीच्या बातम्या मिळविण्याचें काम पाहात होता. त्यानें आपल्या भावाला ता. २ जून रोजीं पाठविलेल्या पत्रांत आग्रा ते मीरत यामधील दळणवळण सुरू झाल्याची हकीकत कळवितांना दोघां इंग्रज स्वयंसैनिकांची यासंबंधांतील कामगिरी नमूद केली आहे. या दोघांच्या प्रवासाला मार्गावरील जनतेनें विरोध केला नाहीं. उलट अलीगड व हाथरस या ठिकाणीं त्यांचें लोकांनीं स्वागत केलें. तेव्हां हा वाद (Controversy) जनता (people) व सरकार यांचा नसून फक्त सरकार आणि त्याची देशी फौज यांचा हा वाद आहे असा आपला ग्रह लिहिला आहे. हाच ग्रह म्यूरच्या इतर लेखनांत शेवटपर्यंत राहिलेला आढळतो.

जॉर्ज कॅम्बेल हा दुसरा एक बडा अधिकारी. त्यानें आपल्या आठवणींच्या पुस्तकांत पुढील आशयाचा मजकूर ग्रथित केला आहे. (Memoirs

of my Indian career. Vol. 1 ) "हें निर्भेळ शिपायांचें बंड होतें. तें सुद्धां बेंगाल आर्मीतील म्हणजे हिंदुस्थानी शिपायांचें बंड होतें. देशी संस्थानांचीं दळें याच शिपायांचीं होतीं म्हणून तींहि त्या बंडांत सामील झालीं. त्यांतून पंजाबी व नेपाळी सैन्य वगळलें पाहिजे. कामगारांनीं संप करावा त्यांतलाच हा लष्करी प्रकार (A kind of military trades-unionism) समजावा लागतो ( पान २१२–२१३ ). शिपायांचे वेळोवेळीं लाड पुरविले गेल्यामुळें ते शेफारले होते. त्यांत चरबीदार काडतुसांची भर पडली आणि बंड उठलें ( पान २१५ ). बंडाची तयारी गुप्तपणें व चुपचाप झाली, ही समजूत चुकीची आहे. शिपायांना खरोखरी बंड करावयाचें नव्हतें तर आपलें मनोगत हट्टानें पूर्ण करून घ्यावयाचें होतें. त्यांच्या असंतोषाचीं लक्षणें बरेच महिने दृष्टोत्पत्तीस येत होतीं. ( पान २१७ ). शिपाई दिल्लीस गेले ते यदृच्छेनें असें सगळ्या घडामोडींच्या निरीक्षणानें माझें मत झालेलें आहे. शिपायांपाशीं (दिल्लीस जाण्याची) योजना किंवा संघटना नव्हती." दिल्लीहून कानपूरकडे निघालेल्या इंग्रजी लष्कराबरोबर जात असतां अलीगड, बलंदशहर वगैरे जिल्ह्यांतील सामान्य जनता लष्कराला खायपेयें पुरवून कशी सलोख्यानें वागली, याची माहिती कॅम्बेलनें बरींच पानें खर्चून सादर केली आहे. लखनौचा गूबिन्स आणि दिल्लीस लढणाऱ्या तोफखान्याचा एक अधिकारी मेडले, आग्र्याचा रेक्स यांनीं शिपायांच्या उठावाला क्रान्तीचा किंवा स्वातंत्र्याचा झगडा म्हणतां येईल किंवा कसें याची छाननी आपल्या अनुभवकथांतून केलेली असून या तिघांचा अभिप्राय या उठावाला 'राष्ट्रीय' हें विशेषण लावणें चुकीचें असा स्वच्छ आहे. 'शिपाईगर्दीनें सामान्य जनतेला दंगल करण्याची सवड दिली. जनतेचा धुमाकूळ हा शिपाईगर्दीचा परिणाम होता. जनतेच्या बंडाळीनें शिपायांचा उठाव घडवून आणलेला नव्हता. शिपायांतील झोटिंगांनीं अधिकाऱ्यांना ठार करून त्या गुन्हेगारीच्या फासानें इतर शिपायांना उठावांत ओढलें. सारे शिपाई उठावाला अनुकूल नव्हते. जनतेला थोड्याच दिवसांत दंगलीचा कंटाळा आला व जेव्हां दिल्ली जिंकून इंग्रज पुन: आपला अधिकार स्थापण्याला सरसावले तेव्हां ते इंग्रजाला साह्य करण्यास पुढें आले' अशा तऱ्हेची माहिती या तिघां लेखकांनीं आपल्या अभिप्रायास जोडली आहे. अल्फ्रेड चार्लस ल्याल या इंग्रजानें In my opinion, a national revolt, in the European sense is unknown in India या एका

वाक्यांत प्रस्तुत प्रश्नाचा निर्णय केला आहे. सगळे शिपाई बिघडले नव्हते; शिपायांचा उठाव मोडण्याकरितां हिंदी प्रजेनें इंग्रजाला मदत केली, हीं कारणें सांगून सीली नांवाचा ब्रिटिश इतिहासज्ञ म्हणतो कीं, ज्या क्षणीं देशव्यापी राष्ट्रीयत्वाचा आविष्कार बंडाळीच्या रूपानें होईल त्या क्षणीं आपलें वर्चस्व संपेल. १८५७चें बंड राष्ट्रीय स्वरूपाचें नव्हतें असा स्पष्ट ध्वनि या अभिप्रायांत आहे. इंग्रजांचें लेखन प्रायः आत्मश्लाघेचें असतें म्हणून त्यावर विश्वास ठेवूं नये असें मानणारांच्या समाधानासाठीं शिपाईगर्दीविषयीं आधुनिक भारतीय अभ्यासकांनीं जें लिहून ठेवलें आहे, त्याकडे लक्ष देणें अवश्य आहे.

**हिंदी विद्वान् मानवेंद्र रॉय**

गेल्या चाळीस वर्षांमागें बंगालमध्यें जे क्रान्तिकांक्षी तरुण होऊन गेले, त्यांमध्यें प. वा. मानवेंद्र रॉय यांना उच्च स्थान द्यावें लागतें. स्वदेशीं परत आल्यावर त्यांच्या आयुष्यांत झालेलीं स्थित्यंतरें त्यांनीं १९२२मध्यें जें लेखन केलें त्याला बाधणारीं नाहींत. 'संक्रमणावस्थेंतील भारत ( India in transition ) या नांवाच्या पुस्तकांत त्यांनीं शिपाईगर्दीचें विवेचन केलें असून त्या गर्दीला कोणत्याहि रीतीनें राष्ट्रीय चळवळ समजतां येणार नाहीं, असें त्यांचें निस्संदिग्ध मत त्या पुस्तकांत पाहायला सांपडतें. १८५७चें बंड हा ब्रिटिशांचें वर्चस्व झुगारण्याचा पहिला गंभीर प्रयत्न होता. पण तो मरूं घातलेल्या सरंजामशाहीचा अखेरचा आचका होता. सामाजिक हिताच्या दृष्टीनें विचार केल्यास मोगलाई किंवा पेशवाई या सरंजामी साम्राज्यशाहीचें पुनरुज्जीवन करूं पाहणारी ही चळवळ प्रतिगामी स्वरूपाची होती असा निष्कर्ष निघतो. १८५७ची बंडाळी ही प्रामुख्यानें लष्कराची बंडाळी असून पदभ्रष्ट व असंतुष्ट अशा सरंजामी सरदारांच्या कारस्थानांतून ती उद्भवली. सामान्य जनतेपैकीं बहुसंख्य निष्क्रिय राहिले. पुष्कळांनीं ब्रिटिशांना साह्य केलें. इंग्रजांच्या विद्यादानाचा लाभ घेतलेला वर्ग अर्वाचीन पुरोगामी विचारांचा असल्यानें तो इंग्रजांच्या बाजूस राहिला. मागासलेल्या सामाजिक विचारांचा पक्ष पारतंत्र्याविरुद्ध देशाचें ऐक्य निर्माण करूं शकला नाहीं. दीर्घकालीन अराजकाच्या तावडींतून आपल्याला सोडविणाऱ्या राजकीय सत्तेची कांस जनतेनें धरावी हेंच एक प्रकारें योग्य होतें. सनातनी वृत्तीचे अलीकडील राष्ट्रवादी शिपायांचा उठाव हा पारतंत्र्याविरुद्ध महान् संग्राम होता असें मत मांडून जनतेची घातकी दिशाभूल करतात. तो उठाव ब्रिटिश

सरकारविरुद्ध नव्हता तर पुरोगामी सामाजिक आणि राजकीय विचारांविरुद्ध होता. हे पुरोगामी विचार इंग्रजी विद्येच्या दीक्षितांनीं आत्मसात् केलेले होते. आपल्या राज्याला बळकटी यावी यासाठीं इंग्रजांनीं विद्यादानाला आरंभ केला. इंग्रजांच्या शिक्षणानें ज्यांची बुद्धि विकसली ते प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रांत चळवळीच्या रूपानें उतरले नसले तरी सामाजिक व धार्मिक व्यवहारांत सुधारणा करण्याचा त्यांचा प्रयत्न ईर्ष्येनें चालू होता. ही इंग्रजी शिकलेल्यांच्या कर्तृत्वाची बाल्यावस्था असली तरी जुन्या धार्मिक व सामाजिक विचारसरणीला त्यांच्या कर्तृत्वामुळें आव्हान दिलें गेलें होतें. हें आव्हान म्हणजे यथार्थतेनें क्रांतिकारक सामर्थ्य असल्यानें १८५७ची बंडाळी त्या सामर्थ्याला मारण्यासाठीं अवतरली होती असा सामाजिक दृष्ट्या तिचा अन्वयार्थ लावतां येतो. मानवेंद्र रॅाय यांच्या विचारांचा हा सारांश पाहतांना 'राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्ध' या प्रवादाकडे १९५७पर्यंत कोणी प्रतिकूल कटाक्ष व्यक्त केला नाहीं, ही समजूत चुकीची असल्याचें ध्यानांत येईल. मानवेंद्रांचें मूळ पुस्तक सांप्रत दुर्मिळ असल्यानें त्यांतील १८५७ संबंधाचा मजकूर The Radical Humanist या कलकत्त्यास प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकाच्या १२ मे १९५७च्या अंकांत छापलेला आहे. या मजकुराला S. R. या आद्याक्षरांकित लेखकानें जी पुस्ती जोडलेली आहे, ती देखील वाचनीय आहे.

**पं. जवाहरलाल नेहरू**

१९४६च्या सप्टेंबरांत पं. जवाहरलाल नेहरू यांचें Discovery of India हें पुस्तक प्रकाशांत आलें. पं. नेहरूंनीं 'लोकांचें बंड' आणि 'स्वातंत्र्ययुद्ध' दोन्ही शब्द उपयोगांत आणलें असून दिल्लीचा परिसर, उत्तर प्रदेश, मध्य हिंदुस्थानाचा व बिहारचा कांहीं भाग, याप्रमाणें 'लोकांचें बंड' या शब्दाच्या व्यापकतेला भौगोलिक मर्यादा घातलेली आहे. 'तत्त्वतः हा सरंजामशाहीचा स्फोट होता....साहजिकच या स्फोटाचे प्रवर्तक दिल्लींतील मोगलवंशाच्या अवशेषाकडे धांवले. हे सरंजामी पुढारी (Feudal chiefs) दुबळे व असंघटित होते; इतकेंच नव्हे तर त्यांच्या ठिकाणीं विधायक ध्येय किंवा परस्परांच्या हिताचें ऐक्य यांचाहि अभाव होता. त्यांच्या अस्तित्वाला भविष्यकाळांत जागा नव्हती.' हा पं. नेहरूंच्या लेखनाचा गोषवारा असून त्यांचें पुढील विधान जास्त महत्त्वाचें आहे. 'हिंदुस्थानच्या जनतेला एकत्वानें जखडणाऱ्या राष्ट्रीय भावनेचा (त्या काळीं) अभाव होता.

अर्वाचीन पद्धतीचें राष्ट्रीयत्व अजून जन्मास यावयाचें होतें. It is clear, however, that there was a lack of nationalist feeling which might have bound the people of India together. Nationalism of the modern type was yet to come.

श्री. अशोक मेहता

जेव्हां पं. नेहरू आपलें पुस्तक रचीत होते, त्याच वेळीं (१९४०–१९४५) तुरुंगवासांत श्री. अशोक मेहता अर्वाचीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास करून ग्रंथलेखनाचें काम करीत होते. १८५७ च्या शिपाईगर्दी-संबंधाचा प्रबंध हा त्यांच्या संकल्पित महाग्रंथाचा एक अंश त्यांनीं प्रसिद्ध केला. Great Rebellion या नांवानें हा प्रबंध उपलब्ध आहे. शिपाईगर्दीच्या असफळतेचीं कारणें सांगतांना श्री. अशोक मेहतांनीं जें म्हटलें आहे, तें जास्त महत्त्वाचें असल्यानें त्याचा उल्लेख करणें उचित ठरतें. "इंग्रजांना लष्करी दृष्ट्या काळ अनुकूल होता. त्यांनीं शिपाईगर्दी चिरडण्याकारितां या देशांत लाखाहून जास्त सैनिक विलायतेहून आणले व तीन लाखांवर येथें देशी सैन्य उभें केलें. त्यांच्यापाशीं 'एन्फील्ड' नांवाच्या नव्या बंदुका होत्या. तारायंत्राचा इंग्रजांनीं अतिशय उपयोग केला. शिपायांचा उठाव कांहींसा अवेळीं झाल्यानें उठावाचा सारा कार्यक्रम ढासळला. भारतीय राजमंडळ व जमीनदार इंग्रजांना चिकटून राहिले. मुंबई व मद्रासच्या फौजा उत्तरेकडील शिपायांच्या उठावांत सामील झाल्या नाहींत; कारण त्या फौजेचे शिपाई कनिष्ठ जातींचे होते." इत्यादि कारणपरंपरा दाखवून मेहतांनीं पुढीलप्रमाणें समारोप केला आहेः—'सत्ताशून्य राजे, खालावलेले सरदार आणि उलथून पडलेले सरंजामी हितसंबंध यांच्या साह्यावर बंडाळीची भिस्त होती. यांमध्यें ब्रिटिशांच्या शक्तीची देशांत भक्कम रुजलेलीं पाळेंमुळें खणून काढण्याचें अवसान नव्हतें. समाजाच्या दलित (Sub-merged) विभागांत तसें सामर्थ्य होतें. हें बंड आहे या कल्पनेमुळें त्याचा प्रभाव या विभागापर्यंत पोंचला नाहीं. उठावांतील हें अंतर्विरोध उठावाला सुरवातीपासूनच बाधत होते.' याखेरीज आणखी एक उठावाला पोखरणारें जें कारण श्री. मेहतांच्या विवेचनांत आलें आहे, तें जमीनदारांच्या विरोधाचें असून हा विरोध शिपायांनीं स्वीकारलेल्या समतेच्या तत्त्वामुळें उत्पन्न झाला, असें त्यांनीं म्हटलें आहे. ज्यांच्या जमिनीचा विस्तार इंग्रजांच्या शेतकी कायद्यापायीं संकोचला किंवा ज्यांच्या जमिनी कर्जापायीं

साफ दुसऱ्यांच्या हातीं गेल्या त्यांनीं आपलें गमावलेलें वैभव मिळविण्यापुरता शिपायांशीं सहकार केला व जेव्हां शिपाई श्रेष्ठकनिष्ठतेचा भेद गाडून समानता स्थापन करूं इच्छितो असें दिसलें तेव्हां या जमीनदारांचें पुढारीपण मंदावलें, किंबहुना ते इंग्रजांच्या आश्रयास गेले, असा श्री. मेहतांच्या अनेक विधानांतून निष्कर्ष निघतो. सरंजामशाहीचें मागसलेलें शौर्य, लोकजागृतीची शैशवावस्था, किंचित् मोड फुटूं लागलेल्या राष्ट्रीयत्वाच्या आकांक्षा, सामाजिक व धार्मिक जुलमांविरुद्ध जळजळीत भावना, अशा विविध रंगांनीं १८५७ चें शिपाई–प्रकरण नटलेलें आहे, असा एका ठिकाणीं श्री. मेहतांचा समारोप पाहायला सांपडतो. लोकजागृति व राष्ट्रीयत्व हे दोन्ही घटक अगदीं निकृष्ट स्थितींत असल्याची जाणीव मेहतांच्या वर्णनांत आहे. नेहरू व श्री. मेहता यांच्या विचारसरणींतलें साम्य मुद्दाम विशद करायला नको. इंग्रजांनीं विलायतेहून सैन्य आणलें, त्यांच्या बंदुका जास्त पल्लेदार होत्या; (या बंदुका उन्हाळ्यांत कार्यक्षम राहात नसत व इंग्रजांच्या साऱ्या फौजेंत त्या बंदुकांची वांटणी झालेली नव्हती, या बंदुका क्वचित् शिपायांनीं वापरल्या इकडे श्री. मेहतांनीं लक्ष दिलेलें नाहीं.) इंग्रजांना तारायंत्राचा उपयोग झाला. (एका ठिकाणीं शिपायांनीं तारघरें जाळलीं व दोन हजार मैलांच्या भागांतील तारा तोडल्या याचा श्री. मेहतांनीं गौरवपूर्वक उल्लेख केलेला आहे.) इंग्रज सेनापति युद्धकुशल होते, इत्यादि श्री. मेहतांच्या तक्रारी सयुक्तिक नाहींत. दोन पक्षांत शत्रुत्व उद्भवल्यावर प्रत्येक पक्षानें आपलें बळ वाढवून प्रतिपक्षावर मात करण्यासाठीं झटावें, हा नियमच आहे. त्या नियमानुसार वागून इंग्रज अखेरीस विजयाचा धनी झाला. याबद्दल बोटें मोडण्यांत स्वारस्य नाहीं.

**डॉ. सुरेंद्रनाथ सेन**

१९५७ हें वर्ष जवळ आल्यावर येथील इतिहाससंशोधकांनीं आपापल्या प्रादेशिक राज्याचीं दप्तरें धुंडाळून त्या प्रदेशांमध्यें १८५७ सालीं झालेल्या धामधुमीची तपशीलवार हकीकत उजेडांत आणायला सुरुवात केली. या संशोधनानें कांहीं घटनांचा एखादा तपशील जास्त स्पष्ट झाला असेल, परंतु १८५७ च्या एकंदर ज्ञानांत विशेष महत्त्वाची भर पडलेली नाहीं. तथापि एखाद्या योग्य भारतीयानें १८५७ चा इतिहास लिहावा असें मध्यवर्ती सरकारचे शिक्षणमंत्री मौ. आजाद यांनीं ठरविलें आणि कलकत्त्याचे इतिहासलेखक डॉ. सुरेंद्रनाथसेन यांनीं सुमारें वर्ष सवा वर्ष खपून जो इतिहास

लिहिला तो १९५७ च्या १० मे रोजीं दिल्लीस मोठ्या समारंभानें प्रसिद्ध करण्यांत आला. स्थळवारीनें १८५७ तील शिपायांच्या व लोकांच्या उठावाचें स्वरूप शक्य तेवढें सविस्तर दाखवून शेवटीं समालोचनांत जे विचार डॉ. सेन यांनीं दाखल केलेले आहेत ते 'राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्धा' च्या कल्पनेला प्रतिकूल असल्याबद्दल शंका राहात नाहीं. शिपायांमध्यें उठावाचा कट किंवा कारस्थान नव्हतें; चपात्यांचा संबंध इंग्रजविरोधी असंतोषाच्या प्रसाराशीं लावतां येत नाहीं; शिपाई व त्यांचे पुढारी यांच्यामध्यें उठावापूर्वीं खलबतें चालल्याची समजूत चुकीची; केवळ लुटालूट करण्यासाठीं उठावांत सामील झालेल्या गुजर-मेवाती सारख्या लोकांना शिपायांसंबंधाच्या भावनेनें विचारांत घेणें अयोग्य; इत्यादि मतें मांडल्यावर डॉ. सेन नबाबशाहीचा प्रदेश, रोहिल-खंड आणि गंगा-यमुनेचा दुआब या टापूंतील उठावाच्या परीक्षणाकडे जेव्हां वळले तेव्हां नबाबशाहीचा मुलूख व बिहारचा शहाबाद जिल्हा या टापू-बाहेर 'राष्ट्रीय स्वरूपाचें युद्ध' असा गौरव करण्याजोगी उठावाची स्थिति नव्हती. नबाबशाहीच्या प्रदेशांत उठावाचा आकार राष्ट्रीय स्वरूपाचा दिसला तरी तो मर्यादित अर्थानें स्वीकारला पाहिजे, कारण हिंदुस्थान म्हणजे एक राष्ट्र हें तत्त्व अजून गर्भावस्थेंत होतें (For the conception of Indian nationality was yet in embryo — पान ४११ ) असें डॉ. सेन यांनीं म्हटलें आहे. यानंतर पंजाबी, हिंदुस्तानी, रजपूत, बुंदेले, मराठे वगैरे समाज एकमेकांना परके होते, आपण एका जन्मभूमीचीं लेकरें आहों, ही जाणीव त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेली नव्हती असें डॉ. सेन यांनीं मान्य केलें आहे. यामागून राष्ट्रीय ऐक्याची निराकार गर्भावस्था सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं चिंत्य आहेत. पुष्कळदां धर्माभिमान हा देशाभिमानाचें कार्य घडवून आणतो, या अनुभवाप्रमाणें नबाबशाहीच्या तालुकदारांनीं धर्मरक्षणाची हाक देऊन आपलीं माणसें जमविलीं पण धर्मा-सोबत त्यांनीं नबाबालाहि ठेवलें होतें. तथापि ते तालुकदार स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते नव्हते, कारण त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्याची ओळख नव्हती. ( They were not champions of freedom for they had no conception of individual freedom पान ४१२. ) पुढें डॉ. सेन यांनीं स्वच्छच सांगून टाकलें आहे कीं, उठावाच्या पुढाऱ्यांनीं सामाजिक प्रगतीच्या दृष्टीनें घड्याळाचा कांटा मागें ढकलला असता. नंतर हें काळ्यागोऱ्यांचें युद्ध नव्हतें.

कारण गोरे राज्यकर्ते काळ्यांच्या मदतीनें विजयी झाले. उठावाच्या दणक्यांत उभयपक्षीं नीतिनियम पाळले गेले नाहींत, असे विषय वेगवेगळ्या परिच्छेदांत चोखाळून डॉ. सेन यांनीं आपलें समालोचन संपविलें आहे. राष्ट्रीय आणि स्वातंत्र्य या दोन शब्दांच्या अनुसंधानाला डॉ. सेन यांनीं ज्या मर्यादा प्रत्येक वेळीं घातल्या आहेत, तिकडे लक्ष दिल्यास त्या शब्दांची अर्वाचीन लोकप्रियता येनकेन प्रकारेण प्रसन्न ठेवण्यासाठीं सेनबाबूंची धडपड असल्याचें लक्षांत येण्याला उशीर लागणार नाहीं. डॉ. आर. सी. मुजूमदार यांनीं दिल्ली येथील हिंदुस्थान टाइम्स दैनिकाच्या ( १८ ऑगस्ट १८५७ ) अंकामध्यें डॉ. सेन यांचें पुस्तक विचारांत घेऊन लिहिलेल्या टीकालेखाचा उल्लेख येथें अप्रस्तुत ठरणार नाहीं.

डॉ. मुजूमदारांच्या पुस्तकाचा परिचय करून देण्यापूर्वीं डॉ. सेन यांनीं शिपायांचा उठाव एकंदर देशाच्या लहानशा भागांत व लहानशा लोकसंख्येचा असल्यानें त्याच्या राष्ट्रीयत्वाविरुद्ध निघणाऱ्या आक्षेपाचा परिहार होण्यासाठीं दृढ निश्चयाचीं थोडींशीं माणसें, क्रान्ति सफळ करतात असा एक सिद्धान्त पुढें आणला आहे. मात्र हा सिद्धान्त शिपाईगर्दीला कसा लागू पडतो याचें स्पष्टीकरण टाळलें आहे. A small determined group possessed of political initiative can turn to their purposes the discontent of a mass which can achieve nothing by itself ( The modern state by maciver पान २१४). इंग्रजी भाषेंतील राज्यशास्त्राच्या पुस्तकांतून या आशयाचे आणखी उतारे दाखवितां येतील. राजकीय पुढाकार असलेला दृढ निश्चयाचा लहान समुदाय सामान्य जनतेचा असंतोष कारणीं लावतो. सामान्य जनता स्वयमेव कांहींच करूं शकत नाहीं, असा सदर इंग्रजी मजकुराचा अर्थ आहे. शिपायांच्या उठावाशीं त्यांच्या ममतेची जनता संलग्न होती; यामुळें दृढ निश्चयाचा लहान समूह शिपायांचा समजायचा का त्यांच्या पुढाऱ्यांचा ठरवायचा हा प्रश्न उद्भवतो. शिपाई ज्या प्रदेशांतला तेथील जनता हा एक निराळा स्वतंत्र वर्ग होता. शिपायांची संख्या सवा लाखाइतकी होती म्हणून त्यांचा जनतेमध्यें समावेश करून मौलवी, बेगम, सिंह, शहा, नाना, बाई यांना दृढ निश्चयाचा लहान समूह समजावें लागतें. एका संकल्पाचा दृढ निश्चय—जसा अमेरिकन, फ्रेंच व इतर देशांतील क्रांतीच्या पुढाऱ्यांमध्यें आढळतो, तसा शिपाईगर्दीच्या

पुढाऱ्यांत होता असें सिद्ध करतां आल्यास मग वरील उताऱ्यानें सुचविलेलें श्रेय त्यांच्या पदरीं बांधतां येईल. १८५७चा वृत्तान्त पाहावा तर शिपायांचा उठाव आधीं व पुढारी मागून असा उलटा देखावा दृष्टीस पडतो. पुढाऱ्यांनीं शिपायांना उठविण्याऐवजीं शिपायांनीं पुढारी उभे केले असा १८५७चा प्रकार होता. त्या पुढाऱ्यांचा समूह दृढ निश्चयाचा होता, असें त्यांचा शेवट लक्षांत घेऊन क्षणभर मानलें तरी निश्चय कशाचा हा प्रश्न शिल्लक राहतो व त्याचें समाधानकारक उत्तर सांपडत नाहीं. जिज्ञासूंनीं इतर देशांतील क्रांतीच्या पुढाऱ्यांच्या दृढनिश्चयाशीं शिपाईगर्दीच्या मनोवृत्तीची तुलना केल्यास परदेशांतील क्रांतीच्या इतिहासांतून उचललेलें वरील वाक्य शिपाईगर्दीपुरतें सर्वथैव भ्रामक आहे, अशी खात्री पटेल.

## डॉ. आर. सी. मुजुमदार

डॉ. आर. सी. मुजुमदार यांनीं १८५७ तील शिपायांचा उठाव आणि बंडाळी The sepoy mutiny and revolt of 1857 या नांवाचें आपलें पुस्तक १९५७ च्या एप्रिलांत प्रसिद्ध केलें. त्या पुस्तकांत डॉ. मुजुमदार यांनीं १८५७ चें प्रकरण हें स्वातंत्र्ययुद्ध नव्हतें, अशी आपली निश्चित भूमिका मांडली आहे. शिपायांच्या उठावांत संकेत, कारस्थान, योजना, योग्य पुढारीपणा, संघटना इत्यादि स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अवश्य असणारा एकहि विशेष आढळत नाहीं. शिपाई इंग्रजांवर उठले, इंग्रजी राज्याचें दडपण मावळतांच लोकांनीं बंडाळी आरंभली, साहसी संधिसाधूंनीं जेवढ्या लाभावर हात मारतां आला तेवढा मारला. गांवोगांवचे पुढारी सोडून बहादुरशहा, नानासाहेब, कुंवरसिंग, हजरत महाल, इत्यादि पुढारी कुळपरत्वें मोठे असले तरी त्यांचा पुढारीपणा स्वातंत्र्यसिद्धीला उपकारक होण्यासारखा कार्यक्षम नव्हता. या व्यक्तींना कित्येकांनीं जनतेचे निसर्गसिद्ध (Natural) पुढारी या व्याख्येनें शृंगारलें आहे. राज्यभ्रष्टांना (लक्ष्मीबाई, हजरत महाल इत्यादि) अन्यायरुष्टांना (कुंवरसिंगासारखे जमीनदार व नबाब) किंवा राज्यहीनांना (नानासाहेब) जर जनतेचे निसर्गसिद्ध पुढारी मानायचे तर शिंदे, निजाम, राजस्थानांतील संस्थानिक इत्यादि प्रत्यक्ष राज्यकर्त्यांना जनतेचे नैसर्गिक पुढारी कां मानायचे नाहीं, असा डॉ. मुजूमदार यांचा सवाल आहे. परंतु इंग्रजी राज्यकर्तृत्वाचा प्रतिकार हें शिपायांच्या व त्यांच्यामागून झालेल्या कांहीं

भागांतील लोकांच्या उठावाचें स्वरूप डोळ्यांपुढें ठेवून हा प्रतिकार राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अभिलाषाचा द्योतक आहे, असें समजणारांसाठीं १८५७ सालापूर्वीं वेळोवेळीं देशभर होत गेलेल्या तशा प्रतिकाराचीं अनेक उदाहरणें देऊन त्या प्रतिकाराला राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अभिलाषाचा मान कां देऊं नये, अशा अर्थाचा डॉ. मुजूमदार यांनीं उपस्थित केलेला मार्मिक प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे. ( Book 1, chapter III ) सदर प्रश्नाच्या विवेचनाची राजकीय, आर्थिक, धार्मिक व आदिवासी अशी डॉ. मुजुमदार यांनीं वर्गवारी केलेली आहे. त्या प्रकरणाचा सारांश उपयुक्त म्हणून पुढें दिलेला आहे.

१७८१—चेतसिंगाचें बंड, १७९२ तील मलबारच्या राजाचें बंड, १७९४—विजयनगरच्या राजाचें बंड, १७९९—अयोध्येच्या नबाव वझीर अलीचें बंड, त्याच वर्षांतील धोंडजी वाघाची दक्षिणेंतील धामधूम, १८०५ नंतर बुंदेलखंडांत कांहीं ठिकाणीं इंग्रजी राज्यस्थापनेला झालेला प्रतिकार, १८३०,-३५-३९ या वर्षीं आसामांत इंग्रजाविरुद्ध झालेलीं कारस्थानें, १८१३ व १८४२ मधील सहारणपुरांतील बंडें, १८४९ तील नागांचा उठाव, १८३०-३२-३६ या काळांतील सावंतवाडीचीं बंडें; १८४४—कोल्हापूर १८५८ पुनः सावंतवाडी, १८२४ व १८४०—विजापूर जिल्हा; १८३२—३४ विजगापट्टम जिल्हा, १७९८, १८०० व १८०१, पुनः १८३४ व १८३५—गंजम जिल्हा, १८२४ कित्तूर, १८२६—२९—पुणें (रामोशी—उमाजी नाईक) जिल्हा, १८०४ व १८०८—त्रावणकोर, १८१५—१८१८—काठियावाड, याप्रमाणें देशाच्या उत्तर दक्षिण भागांत इंग्रजांच्या प्रतिकाराचे प्रयत्न झाले. हीं राजकीय वर्गांतील उदाहरणें आहेत. आर्थिक (त्यांचा कालावधि १७६७—१८५२ आणि बंगाल, मलबार, ओरिसा, रोहिलखंड, बुंदेलखंड, महाराष्ट्र हे प्रदेश) धार्मिक (यांत १७७२ तील संन्याशांचें बंड-बंकीमचंद्राच्या 'आनंदमठा'चा विषय, १८०४ तील फरैदी, १८२०—२१ पासून पुढें चालू राहिलेला वहाबी या मुसलमान धर्मपंथाचा बंडांच्या समावेश आहे.) आदिवासी कोल, भूमिज, खासी, खोंड, भील, मेर, जाट, मेवाती, भट्टी, कोळी, संथाळ इत्यादिकांच्या बंडाळीचा संक्षिप्त वृत्तान्त डॉ. मुजुमदार यांनीं ग्रथित केलेला आहे. प्रतिकाराचे हे प्रयत्न जवळजवळ इंग्रजी राज्याच्या प्रारंभापासून १८५७ पर्यंतच्या कालावधींत पसरलेले दिसून येतील. ही ठिकठिकाणची धुमश्चक्री अगदीं लहानशा किरकोळ टापूंत चाललेली नव्हती. कांहीं वेळीं या धुमश्चक्रीनें फार मोठा प्रदेश ग्रासून

तिच्या कित्येक पुढाऱ्यांनीं अशा निकराच्या लढाया केल्या कीं, इंग्रजांनीं त्यांची प्रशंसा गाइली आहे. १८०८ सालीं त्रावणकोरच्या दिवाणानें जें बंड आरंभलें त्याचा उद्देश ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराला प्रतिबंध करणें व इंग्रजाला स्वदेशांतून पिटाळून लावणें असा दुहेरी होता. हा उद्देश स्पष्ट करणारें त्यानें कालीकतच्या झामोरीनला पत्र लिहिलें होतें. बाकीच्या ज्या लोकांनीं बंडें उभारलीं त्यांचें सैन्यबळ व त्यांच्या झगड्याचें क्षेत्रफळ हीं दोन्ही डोळयांत भरण्याजोगीं मोठीं होतीं. इंग्रजांचीं पुष्कळदां त्यांच्याशीं लढतांना बरीच हानि झाल्याचे दाखले आहेत. त्यांचीं बंडें इंग्रजांनीं शिपायांच्याच साह्यानें मोडून काढलीं. परंतु शिपाईगर्दीपूर्वीं इंग्रजांना करण्यांत आलेल्या प्रतिकाराचें लोकांना जेथें स्मरणच नाहीं तेथें स्वातंत्र्ययुद्धाचा गौरव त्यांच्या वांट्यास आला नाहीं, यांत आश्चर्य कसलें? १८५७मध्यें जें शिपायांनीं व विशिष्ट सीमेंतल्या लोकांनीं केलें तेंच त्या पूर्वींच्या बंडांचे पुढारी व सामान्य जनतेमधील पाठीराखे यांच्या हातून घडलें. या घटनांचे अनेक चालक प्रत्यक्ष राज्यकर्ते होते. पण त्यांच्या कर्तबगारीला स्वातंत्र्याभिलाषाचा टिळा लागण्याचें सौभाग्य लाभलें नाहीं. १८५७तील शिपायांचा उठाव हा एकहि राज्यपदस्थ पुढारी नसलेला प्रसंग मात्र स्वातंत्र्याभिलाषाच्या उद्योगाचा धनी ठरण्याचा योग आला. अंधश्रद्धाळू व लहरी लोकमताचा हा खेळ समजावा लागतो. डॉ. मुजूमदार यांनीं निवेदिलेल्या १८५७ पूर्वींच्या लढाऊ इंग्रजविरोधाच्या वृत्तान्ताला पुस्ती-दाखल पेंढाऱ्यांची जोड देण्याला हरकत नाहीं. पेंढारी या नांवानें ओळखला जाणारा लढवय्यांचा जमाव इंग्रजांशीं बहुत काळ झगडला. त्याच्याशीं अनेक संस्थानिकांचें गुप्त स्नेहसूत्र असल्याचा इंग्रजांना साधार संशय होता. या जमावाच्या पुढाऱ्यांत दोन तीन उत्तम युद्धकुशल वीर होते. इंग्रजी वर्च-स्वाचा प्रतिकार हें त्यांचें कार्य १८५७च्या शिपाईगर्दीसारखेंच होतें. परंतु ते पेंढारी म्हणजे निर्भेळ लुटारू गणले जाऊन पेंढारी हा शब्द लुटारू-पणाचा वाचक होऊन बसला आहे. त्यांच्या पराक्रमाला स्वातंत्र्ययुद्धाच्या कल्पनेचा कोणी स्पर्शहि करूं देत नाहीं. १८५७तील शिपायांच्या उठावाशीं सादृश्य असणारीं त्या वर्षापूर्वींच्या काळांतील इंग्रजांशीं झालेल्या लढायांचीं उदाहरणें स्वातंत्र्ययुद्धाच्या व्याख्येंतून सहज वगळलीं जाऊं शकतात; शिपायांचे उठाव १८५७पूर्वीं अनेकदां झाले असतां त्यांना स्वातंत्र्ययुद्ध म्हणण्याची रीत नाहीं. देशाच्या स्वातंत्र्याचा प्रयत्न या नात्यानें

फक्त १८५७ च्या शिपाईगर्दीचा महिमा गाण्याची आवड ही डॉ. मुजूमदार यांच्या मतें १९व्या शतकांत खऱ्या अर्थानें राष्ट्रीयत्व किंवा देशभक्ति जनतेमध्यें उत्पन्न झालेली नव्हती या वस्तुस्थितीचें अज्ञान प्रगट करणारी गोष्ट आहे.

कम्युनिस्ट-लेखसंग्रह

शिपाईगर्दीच्या नव्या वाङ्मयांत कम्युनिस्ट पक्षाच्या विद्यमानें प्रसिद्ध झालेल्या 'Rebellion 1857–a Symposium' या नांवाखालीं प्रसिद्ध झालेल्या लेखसंग्रहाच्या पुस्तकांचा विचार करणें अवश्य आहे. या पुस्तकांतील पहिला लेख 'तलमिझ खलदुन' या लेखकाचा असून त्यानें एकंदर ५८ पानांत शिपाईगर्दीच्या अंगोपांगांचें विवेचन केलेलें आहे. या लेखाचा एक विशेष म्हणजे लेखकानें प्रकाशिताप्रमाणें भारतसरकारच्या दप्तरांतील अप्रकाशित कागदपत्रांची पाहणी केलेली आहे, हा होय. लेखाचे एकंदर ८ विभाग असून कारणें, संघटना, भौगोलिक विस्तार, (उठावानंतरची) राजकीय संघटना, सामाजिक वर्गभेद, अपेशाचीं कारणें, शिपाईगर्दी मोडल्यानंतरचे परिणाम, याविषयीं त्यामध्यें मार्मिक विचारसरणी पाहायला सांपडते. येथें महत्त्वाचीं विधानें सादर करून या लेखकाच्या अभ्यासाचें निष्कर्षदृष्ट्या जें पर्यवसान आढळतें तें निदर्शनास आणावयाचें आहे.

सुरुवातीस लेखकानें शिपायांच्या उठावाविषयींचें 'शिपायांचें बंड' आणि 'स्वातंत्र्ययुद्ध' असें अनुक्रमें इंग्रजांचें व भारतीयांचें मत नमूद करून या दोन्ही मतांचा निषेध दर्शविला आहे. इंग्रजांचें मत हें साम्राज्यशाहीचा उद्दामपणा व्यक्त करणारें असून दुसरें मत अविवेकी राष्ट्रीयत्वाचें फळ (Product of uncritical nationalism) असा लेखकानें आपला स्पष्ट अभिप्राय दाखल केलेला आहे. पूर्वीच्या सर्व ब्रिटिशविरोधी उठावाहून १८५७ चा उठाव मोठा होता म्हणून त्यावर 'स्वातंत्र्ययुद्ध' ही संज्ञा लादणें चुकीचें म्हणावें लागतें, कारण जेथून बंडखोर शिपाई व तसलेच वतनदार यांची हकालपट्टी होईल तेथें ताबडतोब शांतता नांदू लागे. ही स्थिति सांगितल्यावर लेखकानें स्वच्छ शब्दांत आजच्या अर्थाचें राष्ट्रप्रेम त्या काळीं हिंदी जनतेच्या ठिकाणीं अस्तित्वांत नव्हतें. There was no feeling of nationalism, as we know it today, extant among the Indian people

(पान ४) बजावलें आहे. बंडामागें योजना नव्हती व बंड उसळल्यावर त्याला योग्य मार्गदर्शन करणारी मध्यवर्ती संघटना नव्हती यामुळें वेगवेगळ्या पुढाऱ्यांच्या लढाया लहान लहान टापूंत होत राहिल्या. शिवाय या पुढाऱ्यांत मेळ नव्हता. ब्रिटिश राज्याचें अस्तित्व लोपतांच बंडवाल्या पुढाऱ्यांची व बहुसंख्य जनतेची वर्गनिष्ठा उफाळून परिणामीं ब्रिटिशविरोधी अघाडीचें बळ खालावलें. आणखी एक मुद्दा लक्षांत ठेवायला पाहिजे. देशाचा एक-षष्ठांश भूविभाग व एकूण लोकसंख्येचा दशांश शिपायांच्या उठावांत गुरफटला होता. (ही उठावाची व्याप्ति 'राष्ट्रीय' शब्दाची विटंबना करणारी आहे.) उठावाचें दैन्य एवढ्यानेंच संपत नाहीं. लज्जास्पद असलें तरी हिंदी जनतेच्या सक्रिय मदतीनेंच इंग्रजांना शिपाईगर्दीचा निकाल करतां आला याचें भान बाळगणें चांगलें, असें लेखकानें एका ठिकाणीं सुचविलें आहे.

तलमीझ खलदुन यांच्या लेखाच्या तिसऱ्या विभागांत संस्थानिक, शीख, पंजाबी, मुसलमान, स्वाती, पेशावरी, काबुली वगैरे लोक शिपायांविरुद्ध इंग्रजांना कां चिकटून राहिले, या प्रश्नांची मीमांसा आहे. शिखांना इस्लामी बादशाहीच्या पुनरुज्जीवनाचें भय वाटलें, तर पुनः शिखांचें पंजाबांत राज्य होऊं नये अशी तेथील मुसलमानांची इच्छा होती. राजस्थानी संस्थानिक आणि निजाम यांना नानांचा अर्थात् पेशवाईचा नवा अवतार अप्रिय होता. दुराण्यांच्या व शिखांच्या जुलमांतून इंग्रजांमुळें सुटलेल्या स्वाती, पेशावरी, काबुली वगैरे पठाण जमातींना इंग्रजांचें राज्य प्रिय होतें. अशा स्थितीचा इंग्रजांना फायदा मिळाला. याखेरीज स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा निश्चित बोध बंडखोरांमध्यें नसल्यानें परक्यांच्या वर्चस्वाचा द्वेष या कारणानें एकवटलेल्या लोकांत लवकरच बेबनाव उद्भवला, हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. The hatred of foreign rule had brought the rebels together, different concepts of "free" India threw them apart. यानंतर दिल्लीचा बादशहा, शहाजादे यांची दुर्दशा वर्णून पुनः लेखक स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा बोध कसा अंमलांत आला हें दाखवितांना म्हणतो— इंग्रजांचें राज्य नाश पावतांच स्वातंत्र्याच्या कल्पनेला जो आकार आला तो शिपायांनीं व सामान्य जनतेनें दुसऱ्यांच्या जमिनी बळकावण्याच्या, शहरें लुटण्याच्या, सरकारी दप्तरांचा व मालमत्तेच्या कागदपत्रांचा विध्वंस करण्याच्या स्वरूपानें दिसूं लागला. But with the disappearance of British

authority, the concept of "freedom," too began to take shape. The sepoys as well as the common people began occupying lands, "plundering" towns, and destroying government records and other deeds of property. शिपाई व जनता यांनीं लुटालूट, विध्वंस या कृत्यांच्या द्वारें स्वातंत्र्य रूपास आणलें, तर जमीनदार तालुकदार वर्गानें इंग्रजांची कांस बहुधा सोडलीच नाहीं. व्यापारी, सराफ, सावकार, इंग्रजी शिकलेला व इंग्रजांच्या नोकरींतला, वगैरे सर्व वर्गांनीं इंग्रजांना साह्य केलें. पुढारी तर सांगून सवरून बहुरूपी व बहुरंगी होते. ( Motley ) झांशीची लक्ष्मी-बाई १८५८ च्या मार्च महिन्यांत युद्धाला सिद्ध झाली. शिपायांच्या उठावाशीं व गोऱ्यांच्या कत्तलीशीं आपला संबंध नसल्याचें इंग्रजांच्या गळीं उतरण्यासाठीं लक्ष्मीबाईनें केलेला प्रयत्न वायां गेल्यानंतर बाई लढाईत उतरली. बहादुरशहा शिपायांच्या सत्तीमुळें तर नानासाहेब शिपायांचा कैदी म्हणून लढला. चमत्कार असा कीं, या बंडाळीनें एकहि उत्तम योग्यतेचा लष्करी पुढारी जन्मास घातला नाहीं. एकसूत्री संघटनेच्या अभावीं बंड अयशस्वी व्हावें हा परिणाम ठरलेलाच होता. जमिनी गमावलेले जमीनदार, धंदा बुडालेले कारागीर, दरिद्री शेतकरी, असंतुष्ट शिपाई आणि माथेफिरू मुल्ला व शास्त्री हे पुढारी व त्यापैकीं प्रत्येकाची स्वातंत्र्याची कल्पना भिन्न. शेवटीं जुनी राजेशाही अस्तित्वांत आली असती, निरुपयोगी पौर्वात्य राजेशाहीच्या स्थापनेच्या या खटाटोपाचा परिणाम जमीनदारीविरुद्ध व परक्यांच्या साम्राज्यशाहीविरुद्ध शेतकऱ्यांचें बंड असा हातीं लागतो. या खटाटोपाला शिपायांचें बंड समजणें जसें चुकीचें तसेंच राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्ध मानणेंहि चुकीचें, हा प्रस्तुत लेखकाचा अंतिम निर्णय आहे.

**सरदार पणिक्कर**

येथवर कांहीं नवीन ग्रंथांतील विचार जिज्ञासूंच्या निदर्शनास आणले. आतां कित्येक नामवंत विद्वज्जनांच्या लेखांचा परामर्श करून हा विषय संपवावयाचा आहे. १९५७ च्या मे महिन्यापासून १८५७ तील शिपाई-गर्दीकडे ज्या नियतकालिकांनीं विद्वानांना लक्ष द्यायला लावलें, त्यामधून हिंदुस्थान टाइम्सच्या अंकांतील ( १५ आगस्ट १९५७ ) सरदार पणिक्कर, ताराचंद या दोघांच्या लेखांत १८५७ चा प्रसंग स्वातंत्र्ययुद्धाचा होता असें म्हणत म्हणत त्यांना ज्या गोष्टी कबूल कराव्या लागल्या त्या

महत्त्वाच्या आहेत. सरदार मजकुरांनीं १८५७ चा लढा हा लोकांचा लढा होता, पण त्यांच्यांत कार्यक्षम संघटनेचें बळ नव्हतें. तो लढा विस्कळित आणि विखुरलेला होता, असें लिहिलें आहे. उठावाच्या पुढाऱ्यांना आरंभीं जो फायदा मिळाला तो त्यांनीं पहिल्या चार महिन्यांत उधळून टाकला. जेथें राष्ट्रीय भावना सर्वव्यापी होती त्या लखनौ शहरांतील राष्ट्रीय सैन्य रेसिडेन्सींतल्या अल्पसंख्य इंग्रजांना जिंकूं शकलें नाहीं. उठाव इकडे तिकडे एकमेकांशीं तुटकपणानें पसरलेला होता. मध्यवर्ती प्रभावशाली योजना त्यामागें नव्हती म्हणून नवें सरकार निर्माण करणें किंवा परिणामकारक रीतीनें मोहीम चालविणें या दोन्ही गोष्टी उठावाच्या पुढाऱ्यांना साधल्या नाहींत. उठावाला आलेलें हें शोचनीय स्वरूप भडकपणें न दिसण्यासाठीं तात्या टोपे व लक्ष्मीबाई यांची स्तुति गाऊन सरदारांनीं उभयपक्षीं झालेल्या क्रूर अत्याचारांकडे आपला मोर्चा वळविला. नंतर जुनें हिंदुस्थान १८५७ च्या धुमाकुळांत जळून गेलें. पुढें २० वर्षांनीं जेव्हां राष्ट्रीय चळवळ सुरू झाली तेव्हां नवे पुढारी उदयास आले. १८५७ हें वर्ष हिंदी इतिहासांतील नव्या जुन्या युगांतील सीमारेषा होय, असा सरदार पणिक्करांच्या लेखाचा मथळा आहे. शिपायांच्या उठावाला स्वातंत्र्ययुद्ध हें नांव देतां येईल कीं नाहीं, या प्रश्नाच्या उत्तरांत पणिक्करांनीं अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धांतील ब्रिटिशनिष्ठांचा निर्देश केला आहे व तिकडे यथावकाश लक्ष द्यावयाचें आहे.

**श्री. ताराचंद**

श्री. ताराचंदांनीं आरंभींच पणिक्करांप्रमाणें भारतीय मध्ययुगाचा शेवट १८५७ मध्यें घडला असें सांगून पुढें कोणी म्हणतात १८५७ ची घटना राष्ट्रीय नव्हती हें त्यांचें म्हणणें अंशतः खरें आहे. १८५७ मध्यें राष्ट्र शब्द भारतीय ज्ञानसृष्टीच्या उंबरठ्याखालीं होता. तेव्हां भारत हें राष्ट्र नव्हतें असे विचार मांडले आहेत. Some have said that 1857 was not a national event. This is partially correct. By 1857, the concept of "nation" has not risen above the threshold of India's consciousness. At that date India was not a nation... ताराचंदांनीं अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धांतील ब्रिटिशनिष्ठांच्या (Loyalist) संदर्भानें ज्यांनीं इंग्रजांना मदत केली, त्यांचा राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्धाच्या कल्पनेला अडथळा न व्हावा म्हणून खटपट केली आहे. डॉ. सेन यांनीं अमेरिकेंतील ‘लॉयलिस्ट’

इंग्लंडच्या क्रान्तींतले ' रॉयलिस्ट ' हे शब्द खेळवून शिपाईगर्दीची राष्ट्रीयता सांवरून धरण्याचा यत्न केला आहे. यासाठीं लॉयलिस्ट रॉयलिस्टाचा समाचार घेण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

**अमेरिकन स्वातंत्र्य-युद्ध**

स्वातंत्र्ययुद्ध हा शब्द अमेरिकन संस्थानांनीं इंग्लंडची सत्ता युद्धपूर्वक झुगारून जें स्वातंत्र्य मिळविलें त्या घटनेला लावला जातो. पारतंत्र्याविरुद्ध लढाई म्हणजे स्वातंत्र्ययुद्ध असा त्याचा सरळ अर्थ आहे. अमेरिकेंत स्वातंत्र्ययुद्ध व हिंदुस्थानांतील शिपाईगर्दी या दोन घटनांची तुलना केल्यास थोडासा तपशील सारखा दिसतो. उदाहरणार्थ इंग्लंडचें राज्य हा दोन्हीं-कडील सारखेपणाचा अंश आहे. बाकीचे अनेक अंश दोन्हीकडे समान असल्याचें आढळलें तरी ती दिखाऊ समानता थोड्याशा तपासणीनें खरी नसल्याचा अनुभव येतो. युद्धसामग्रीची कमतरता हा तपशील सारखा वाटतो, पण अमेरिकेंत स्वातंत्र्ययोद्ध्याजवळ प्रारंभीं युद्धसाहित्याचा तुटवडा होता तर हिंदुस्थानांत तशा तुटवड्यापायीं ब्रिटिशांचा पक्ष प्रारंभीं चिंताक्रान्त होता. अमेरिकेंत स्वातंत्र्यपक्षाला जसा कच्च्या व कमी मनुष्यबळानें ब्रिटिशांशीं सामना करावा लागला तसा सामना शिपायांच्या उठावाशीं येथें इंग्रजांना करावा लागला. असल्या समानतेचा आधार शिपाईगर्दीच्या विचारांत घेणें असमंजसपणाचें ठरेल. अमेरिकेचे स्वातंत्र्ययोद्धे व शिपाई या दोघांतील भेद स्पष्ट आहेत. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचा कालावधि उणापुरा दहा वर्षांचा आहे. शिपायांच्या उठावाच्या वाटणीस मारून मुटकून दोन वर्षे कशींबशीं देतां येतील. शिपायांच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्या नांवानें निघालेले जाहीरनामे व अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा यांची तुलनाच होणार नाहीं, असें दोघांमध्यें राजकीय तत्त्वज्ञानाचें आणि भावभावनांचें सहज आकळण्याजोगें अंतर दृष्टीस पडतें. पराजयानें अमेरिकेंतील स्वातंत्र्याची संघटना बळावली तर शिपाईगर्दीची संघटना (असल्यास) पराभवानें मोड-कळली. तिकडे एकजूट वाढली तर इकडे बेबनावाचा पारा चढत गेला. अमेरिकेनें फ्रान्स स्पेनकडून कर्ज काढून द्रव्याचा पुरवठा केला तर इकडे इंग्रजी खजिन्यांची लूट आपसांत खपवून शिपायांनीं आपल्याच देश-बांधवांच्या मालमत्तेवर हात मारण्याचा पंथ पतकरला. अमेरिकेंत नव्या राज्यकर्तृत्वाचें केंद्र क्रान्तीनें अस्तित्वांत आणलें तर इकडे तशा नियामक

च मार्गदर्शक केंद्राची कार्यक्षम निर्मिति कधींच झाली नाहीं. फ्रँकलिन, ओटीस, सॅम्युएल, ॲडाम्स प्रभृति अमेरिकेंतील स्वातंत्र्यपुरस्कर्त्यांच्या जोडीनें नांव घेण्याजोगा एकहि पुढारी इकडील धुमाकुळांत सांपडत नाहीं. शेवटीं शिपायांच्या कैवाऱ्यांना लॉयलिस्ट (ब्रिटिशनिष्ठ) हा एकच वर्ग साम्यासाठीं पुढें ढकलतां येतो. क्रांतिकारकांविरुद्ध चालू राज्याची निष्ठा बाळगून त्याप्रमाणें वागणारांचा गट सर्वत्र असतो, तसा तो हिंदुस्थानांत होता, हें समाधान शुष्क आहे. अमेरिकेंतील ब्रिटिशनिष्ठांचे जे हाल झाले ते येथील कोणत्या लॉयलिस्टाला किती सोसावे लागले, यावर लॉयलिस्टांच्या निर्देशाची समाधानकारकता अवलंबून आहे. येथें सारे संस्थानिक ब्रिटिशनिष्ठ होते. नवाबशाहींतील जमीनदार तालुकदारांचें वर्तन दुटप्पी होतें. बंगाल बिहारच्या (कुंवरसिंग वगळून) जमीनदारांनीं आपली ब्रिटिशनिष्ठा शेवटपर्यंत कायम ठेवली. पंजाब, सिंध, मुंबई, मद्रास, ओरिसा इत्यादि लाखों चौरस मैल क्षेत्रफळांच्या प्रदेशांत ब्रिटिशनिष्ठेला धक्का लागला नाहीं. अशा संस्थानिकांना, जमीनदारांना किंवा ब्रिटिशनिष्ठ सामान्य जनतेला शिपाईगर्दीमार्फत कोणतें प्रायश्चित्त मिळालें ? ग्वालेरचें लष्कर इंग्रजाविरुद्ध उठून असल्या जागीं चार महिने स्वस्थ राहिलें. ग्वालेरच्या राजाला त्यांनीं उपद्रव दिला, पण राजा सुरक्षित होता व त्याच्या ख्यालीखुशालींत फरक पडला नाहीं, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. १८५८च्या जूनमध्यें तेथील राजाला आग्र्यास पळविणारें लष्कर निराळें होतें. शिंद्याखेरीज इतर सगळे राजे इंग्रजांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें मदत करीत असूनहि त्यांचा सुखाचा जीव दुःखांत पडला नाहीं. शिपाईगर्दीच्या व्यापांतल्या भागांतील एकहि ब्रिटिशनिष्ठ जमीनदार दगावला नाहीं. शिपायांनीं इंग्रजांकडील हेरांना, कासिदांना (इकडून तिकडे पत्राची नेआण करणारांना) किंवा माल पुरविणारांना ठार केलें असेल; क्वचित् इंग्रजांना साह्य केल्याच्या अपराधाबद्दल दुबळीं खेडीं लुटलीं जाळलीं असतील पण अमेरिकेच्या लॉयलिस्टांना नोकर मिळेना, धान्य दळून मिळेना, त्यांच्याशीं लोकांनीं सर्व प्रकारचा व्यवहार बंद केला. कित्येक ब्रिटिशनिष्ठांनीं देशत्याग केला, कित्येकांनीं आत्महत्या केली, कित्येकजण क्रांतिकारकांच्या कैदेंत हालहाल होऊन मेले. अमेरिकेंतील क्रान्ति यशस्वी झाल्यानंतर त्यांची मालमत्ता ताब्यांत घेऊन क्रांतिकारकांनीं ती आपल्या मर्जीप्रमाणें विल्हेस लावली. ब्रिटिशांना मदत

करणारांच्या याद्या क्रांतिकारक संघटनेचीं स्थानिक पोटमंडळें वेळोवेळीं प्रसिद्ध करीत असत. एक तृतीयांश क्रांतिकारक, एक तृतीयांश तटस्थ व एकतृतीयांश क्रांतीला प्रतिकूल याप्रमाणें अमेरिकेची क्रांतिकालीन लोकसंख्या विभागलेली होती. तरते कोण व बुडते कोण हें पाहून त्याप्रमाणें तटस्थ वर्ग वागतो. तो अर्थातच क्रांतिकारक विजयी होऊं लागल्यावर त्यांत मिसळून गेला. प्रतिकूलांची अमेरिकेंत काय गति झाली हें वर सांगितलेंच आहे.

अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत लॉयलिस्टांच्या नशीबीं जी आपत्ति आली तीच आपत्ति इंग्लंडांतील राजनिष्ठांच्या बोकांडीस बसली. इ.स. १६४३-४५ च्या राज्यक्रान्तीमध्यें राजनिष्ठांचें काय झालें हें एका इतिहासांतील पुढील उताऱ्यावरून कळेल—Royalists all over the country were deprived of their estates or heavily fined, many of the victors profied by buying the forfieted lands at nominal prices. ( A People's History of England–by Morton पान २४ ) सर्व देशांतील राजनिष्ठांची मालमत्ता जप्त करण्यांत आली किंवा त्यांच्याकडून डोईजड भूर्दंड वसूल करण्यांत आला. विजयी पक्षानें जप्त जमिनी नाममात्र मूल्य देऊन आत्मसात् केल्या असा या उताऱ्याचा भावार्थ आहे. १७४५ सालीं इंग्लंडांत राजा होता, त्याच्याशीं दुसऱ्या जेम्सच्या तोतया नातवानें जेव्हां स्कॉटलंडच्या साह्यानें स्पर्धा आरंभली तेव्हां त्याच्या पाठराख्या राजनिष्ठांना इंग्लंडच्या सैन्यानें असें चोपलें कीं स्कॉटलंडची समाजरचनाच बदलून गेली. या इतिहासांत येथें खोल शिरण्याची गरज नाहीं. डॉ. सेन यांनीं सदर वर्षाचा निर्देश केला आहे म्हणून थोडक्यांत तत्कालीन राजनिष्ठांच्या फजीतवाड्याची हकीकत येथें सांगावी लागली. फ्रेंच राज्यक्रान्तीमध्यें राजाप्रमाणेंच राजपक्षाच्या लोकांचा संहार घडला हें प्रसिद्ध आहे. प्रस्तुत विषयाचा अधिक विस्तार नको. कारण शिपाईगर्दींतील पुढाऱ्यांनीं जमविलेले बारगीर आणि इंग्रजांची चाकरी करणारीं लक्षावधि हिंदी माणसें असे दोन्ही बाजूंचे लोक केवळ पोटाचे पाईक होते, हें मत डॉ. सेन यांनीं दिलें आहे. The common folk went wherever they could find employment. ( पान ४०९–४१० ) पोट हेंच जिचें ध्येय अशी तेव्हांची सामान्य जनता होती, तर तिच्या हातून स्वातंत्र्यप्राप्तीची कामगिरी कितीशी झाली असेल याचें निराळें विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. येथें सादर केलेल्या

' राष्ट्रीय शब्दाच्या मीमांसेचें अवलोकन करतांना निरनिराळ्या विद्वानांना जी ओढाताण व धरसोड करावी लागली ती वाचकांनीं लक्षांत घ्यावी. १८५७ सालीं हिंदुस्थान देश राष्ट्राच्या थोरवीला पोंचला नव्हता असें स्वच्छ कबूल करून पुनः शिपायांचा उठाव राष्ट्रीय स्वरूपाचा होता असें बेधडक सांगून टाकायचें, किंवा राष्ट्रीयत्व जन्मास आलें नव्हतें असें एकदां वजावून तें शिपाई-गर्दीच्या वेळीं प्रत्ययास आलें असें ठासून भासवायचें या प्रकाराला ओढाताण व धरसोड म्हटलें आहे.

१८५७ मध्यें मध्ययुग संपलें किंवा आजच्या अर्थानें तेव्हां हिंदुस्थान हें राष्ट्र नव्हतें, हें विद्वानांचें बहुमत पाहिलें आणि तेव्हां स्वातंत्र्याच्या कल्पने-विषयीं निश्चित ज्ञान व एकवाक्यता नव्हती हा अभिप्राय त्या बहुमताला जोडला म्हणजे राष्ट्रीय व स्वातंत्र्य हे दोन्ही शब्द बाद होऊन शेवटीं युद्ध हा शब्द तेवढा शिल्लक राहतो. तोच एक शब्द घेऊन शिपाईगर्दीचा विचार करणें श्रेयस्कर आहे.

## उपसंहार

ज्वालामुखीचा स्फोट व्हावा व त्यासारखा शिपायांचा उठाव आणि त्यानें व्यापलेल्या प्रदेशांतील लोकांचा दंगा होता. ज्वालामुखीचा स्फोट आकस्मिक वाटला तरी ज्याप्रमाणें त्याची कारणपरंपरा अनुमानानें सांगतां येते, त्याप्रमाणें शिपाईगर्दीचीं कारणें दाखवितां येतात. शिपायांनीं ज्या अर्थीं गोऱ्या-काळ्या ख्रिस्त्यांचें पुष्कळ ठिकाणीं प्राण घेतले त्याअर्थीं त्यांना ख्रिस्ती म्हणजे पर्यायानें त्यांचा धर्म खुपत होता, असा तर्क शिपाईगर्दी संबंधांत प्रामुख्यानें स्वीकारला गेला आहे. चरबीदार काडतूस हें कारण धर्महानीच्या भयाला पुष्टि देणारें असून शिपायांच्या आपसांतील पत्रव्यवहारांत, जे शिपाई इंग्रजांना पकडतां आले त्यांच्या जबानींत, हेरांमार्फत मिळालेल्या माहितींत काडतूस हेंच एकमेव कारण तेव्हां चौकस अधिकाऱ्यांच्या दृष्टीस व कानावर पडत होतें. दिल्लींतील तत्कालीन मुसलमान नागरिकांचीं आत्मचरित्रें काडतुसाच्या भीतीला दुजोरा देणारीं आहेत. पंजाबचा चीफ कमिशनर जॉन लॉरेन्स यानें बादशहाचा खटला संपल्यावर लिहिलेल्या विस्तीर्ण अभिप्रायांत शिपायांना त्यांचें संख्याबळ चेतवीत होतें, असें आणखी एक कारण नमूद केलें होतें. कट किंवा निश्चय असलाच तर चरबीचें काडतूस न वापरण्याचा

होता. काडतुसापुरत्या प्रतिकारानें मीरतला शिपायांनीं उठाव केल्यावर दिल्लीस जाण्याची कल्पना निघाली व ती इतक्या उशीरां निघाली कीं, उठावाचा पुढाकार घेणारे दहाव्या घोडदळाचे बरेच स्वार दिल्लीऐवजीं दुसरीकडे जाऊं शकले. दिल्लीस जाण्याची कल्पना अंमलांत आली तेव्हां बादशाही राज्य स्थापण्याचा उपाय स्वीकारला गेला. आधींपासून तशी योजना नव्हती. पुढें काय घडलें याचा वृत्तान्त वाचकांनीं मागें पाहिलाच आहे. इंग्रज हा शत्रु जेथें नाहींसा झाला त्या प्रदेशांत अराजक माजलें. अराजकाला स्वातंत्र्य ठरवून त्यांतून स्वराज्य निर्माण झालें असतें या अपेक्षेला स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न समजायचें, अशी शिपाईगर्दीला स्वातंत्र्ययुद्ध म्हणणारांची विचारसरणी आढळते. देशाचा अतिशय मोठा भाग इंग्रजांच्या ताब्यांत, तो शिपाईगर्दीला प्रतिकूल, मदत आणण्याला इंग्रज चोहोंकडून मोकळे, अशा स्थितींत हिंदुस्थानी शिपायांचा बिनडोक ( योग्य पुढारी नसलेला ) उठाव विजयी होईल, असें इंग्रज राज्यकर्ते कधींच मानीत नव्हते व यदाकदाचित् तो विजयी झाला असता तर इंग्रजांच्या ताबेदारीचीं पेंढारी पुढाऱ्यांच्याप्रमाणें आणखी दोन चार नवीं लहान संस्थानें उदयास आलीं असतीं. जेव्हां कंपनीसरकारनें सर्व देश पादाक्रान्त केलेला नव्हता तेव्हां जर तें सरकार हैदर, टिपू, मराठे, पेंढारी, अफगाण, सिंधी अमीर व शीख यांना जिंकूं शकले तर शिपायांच्या प्रादेशिक उठावापुढें त्या सरकारानें हार खाल्ली असती असें मानणें हें आत्मवंचनेसारखें आहे.

इंग्रजांची थोडीफार हत्या, त्या हत्येच्या भीतीनें इंग्रजांचा कांहीं ठिकाणीं पळ व परिणामीं तेथें कांहीं काळ इंग्रजी राज्य लोपणें एवढेंच काय ते शिपाईगर्दीचे विशेष आहेत. या गर्दीमागें धर्महानीचें भय, त्यानिमित्त ख्रिस्त्यांचा अतोनात द्वेष, इत्यादि भावनांची प्रेरणा होती. स्वराज्य, स्वातंत्र्य अशा राजकारणाचें भव्य तत्त्वज्ञान नव्हतें. शिपाई हा सांगून सवरून अडाणी, जीर्ण विचाराचा, इंग्रजांच्या गुलामगिरींत उठावाच्या दिवसांपर्यंत काया व बुद्धि झिजविणारा इसम होता. त्याच्यापाशीं राजकीय तत्त्वज्ञान नव्हतें, यांत आश्चर्य नाहीं. परंतु शिपायानें ज्यांना पुढाकार दिला ते कांहीं बाबतींत शिपायाहून जास्त मागसलेले होते. शिपाई निदान शूर होता, शिस्तीचा व रणांगणाचा ज्ञाता होता. त्याचे पुढारी रणांगणाची ओळख नसलेले व आपल्या जीवाची काळजी बाळगणारे होते. शिपायांनीं शक्य तोंवर युद्ध-

क्षेत्रांत प्राण वेंचावे, मांसभक्षी पशुपक्ष्यांचें अन्न बनावें आणि त्यांच्या पुढाऱ्यांनीं पळून जावें, लपून राहावें, असें शिपाईगर्दीचें साधारण स्वरूप आहे. या स्वरूपाला झांशीच्या लक्ष्मीबाईचा काय तो एक अपवाद आहे. पुढाऱ्यांचा दुसरा भडक दोष म्हणजे चालू राजकारणाच्या ज्ञानाचा अभाव. मग देशोदेशींच्या जुन्या नव्या राजकीय घडामोडींच्या दीर्घ चिंतनानें स्फुरणाऱ्या तत्त्वज्ञानाचें त्यांच्या संबंधांत नांवच घ्यायला नको. नानासाहेबांच्या नांवानें एक घोषणापत्र शिपाईगर्दीच्या साहित्यामध्यें वारंवार दृष्टीस पडतें. त्यांत इजिप्तच्या बंदरांत ३० हजार गोऱ्या सैनिकांनीं भरलेल्या आगबोटी खेदिवाच्या हुकमानें बुडविण्यांत आल्याची कथा आहे. कां बुडविल्या तर म्हणे तुर्की सुलतानानें खेदीवाला तंबी दिली ! ही अद्भुत यक्षकथा येथें दरदिवशीं इंग्रजांचा विजय सोसाव्या लागणाऱ्या शिपायांत लढण्याचा उत्साह कसा उत्पन्न करणार ? पुढाऱ्यांना शिपाईगिरीचा अनुभव नव्हता म्हणून त्यांचे लढाऊ गुण पाहण्याचें सोडले, शिक्षणाच्या व चौकसपणाच्या अभावीं प्रत्ययास येणारी त्यांच्या ज्ञानाची उणीव दृष्टीआड केली आणि चारित्र्यांत कांहीं लोकोत्तर गुण पाहण्याचा प्रयत्न चालविला तर त्या संबंधांतहि निराशाच पतकरावी लागते. वरसईकर गोडसे यांच्या प्रवासवृत्तांत लक्ष्मीबाईच्या औदार्याचें वर्णन आहे. बाकीच्या पुढाऱ्यांविषयीं अशी माहिती उपलब्ध नाहीं व जी आहे तिच्यांत केवळ चारित्र्याचा आदर्श म्हणण्यासारखा उज्ज्वल अंश सांपडत नाहीं.

तरीसुद्धां सुमारें पन्नास साठ वर्षें विस्मरणांत पडलेल्या शिपाईगर्दीचें व तिच्या पुढाऱ्यांचें कोडकौतुक गाण्याची हौस कां उत्पन्न व्हावी हें कोडें उलगडतांना इंग्रजांचा द्वेष वाटण्याइतकें त्याच्या विषयींचें अप्रेम अद्यापि लोकांमध्यें जीव धरून आहे, असा अनुभव येतो. इंग्रज गेला, त्याचें राज्य जाऊन दहा वर्षे लोटलीं, या कालावधींत जन्मास आलेल्या प्रजेला इंग्रज हा काय प्रकार होता, हें समजावून सांगावें लागेल. परंतु दहा वर्षांमागील पिढी १८५७च्या शिपाईगर्दीचा उदो उदो करतांना पाहिली म्हणजे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. या प्रकरणाचा विचारच कर्तव्य असेल तर सव्वा लाख शिपाई व जवळ जवळ तेवढेच सामान्य लोक यांची शक्ति वायां कां गेली याचा विचार करणें अवश्य आहे. ही शक्ति ज्या दोषामुळें वायां गेली ते दोष नाहींसे करण्याच्या दृष्टीनें शिपाईगर्दीचा अभ्यास केल्यास तो नव्या पिढींला मार्गदर्शक होईल. योग्य पुढाऱ्यांचा अभाव, जातवारीचे अंतःस्थ कलह,

इत्यादि दोषांनीं शिपाईगर्दी थोड्या अवकाशांत नामशेष करून सोडली आणि इंग्रजी राज्याची घडी वळावली. पुढें ज्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप लादला जातो त्या इंग्रजी शिकलेल्या लोकांनीं इंग्रजी राज्याविरुद्ध नव्या विचारांची व उपायांची चळवळ आरंभून आणि ती चिकाटीनें चालवून इंग्रजाला हिंदुस्थान सोडून जाणें बरें असें वाटायला लावलें, शिपाईगर्दी आणि तिच्यामागून सुमारें वीस वर्षांनीं जन्म पावलेली देशभक्तीची चळवळ यांत महदंतर आहे व ज्या देशभक्तीनें स्वराज्य संपादन केलें त्या देशभक्तीची शिपाईगर्दी ही जन्मभूमि नाहीं. शंभर वर्षांमागील एक घटना या नात्यानें तिच्याकडे पाहिजे तर दृष्टिक्षेप करावा, एवढेंच तिचें महत्त्व आहे. हिंदुस्थानांत राज्य स्थापन करणाऱ्या इंग्रजांना शिपाईगर्दी हें अखेरचें विघ्न आडवें आलें व त्यांनीं तें विघ्न आपल्या गुणांच्या शिकस्तीनें दडपलें. हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या विजयाचें तें शेवटचें प्रकरण आहे. त्या प्रकरणानंतर इंग्रजांच्या हिंदी राज्यकारभाराचा नवा ग्रंथ सुरू झाला, त्यांनीं पुनः शिपाईगर्दी उद्भवणार नाहीं, अशी व्यवस्था अमलांत आणली. हिंदी जनतेनें शिपाईगर्दी विसरून आपल्या कर्तव्याचा नवा मार्ग स्वीकारला. शेवटीं स्वराज्याचा मुक्काम गांठला. आतां शिपाईगर्दीची ढोलपीट भावी प्रगतीला पोषक होणार नाहीं. कारण शिपाईगर्दी सामाजिक व राजकीय प्रगतीला धर्महानि समजून त्या प्रगतीला मारण्यासाठीं उसळलेली होती. कै. केळकरांनीं आयर्लंडच्या इतिहासांत १८५७च्या बंडाची १६४१तील आयरिश बंडाशीं तुलना करून जें म्हटलें आहे तें सांगितलें कीं शिपाईगर्दीविषयीं उत्तम कल्पना येईल—'दोहोंतहि धर्मवेड आणि जातिद्वेष यांचा पुढाकार असून प्रच्छन्न राजकीय हेतूचा त्यास मागून पाठिंबा होता. परंतु तो पुरेसा नव्हता असेंच दिसून येतें. दोहोंतहि उभय पक्षांकडून सारखींच निंद्य व अनन्वित कृत्यें घडून आलेलीं असून दोहोंमध्यें विशिष्ट वर्गाच्या देशी लोकांनीं त्वेषाच्या भरांत आपल्या शौर्याची कमाल केली, तथापि अखेर स्वतः इंग्रजांच्या धिमेपणाच्या अमोलिक गुणामुळें व दुसऱ्या एका वर्गाच्या देशी लोकांच्या साहाय्यामुळें त्यांस त्या बंडाचा मोड करितां आला.'

• • •

# संदर्भ-साहित्याची माहिती

१९५७च्या १० मे रोजीं कलकत्याचे इतिहास लेखक डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांचें '१८५७' हें पुस्तक सरकारीरीत्या प्रसिद्ध झालें. त्याच्या शेवटीं जी संदर्भ साहित्याची सूची आहे. ती संपूर्ण नसली तरी भरपूर मोठी आहे. १९१५मध्यें जस्टिन मॅकार्थीचा History of our own times हा ग्रंथ वाचण्याचा योग येऊन त्यासारखा आपल्या देशाचा अर्वाचीन इतिहास रचण्याची शक्याशक्यता चोखाळतांना १८५७कडे साहजिकच लक्ष गेलें व त्या सालांतील शिपायांच्या उठावाचें साहित्य चाळण्याला प्रारंभ केला. त्यांतून जी माहिती महत्त्वाची अथवा चटकदार वाटेल तिचीं टिपणें लिहून काढण्याचा क्रम ठेवला. ऐपतीप्रमाणें ग्रंथाचा संग्रह चालू राहिला. सारांश डॉ. सेन यांनीं ज्या पुस्तकांची यादी दिलेली आहे, त्यांतील पुष्कळशीं पुस्तकें पूर्वीं आणि गेल्या वर्षांत पुनः एकदां नजरेखालून गेलेलीं आहेत. या पुस्तकांची वर्गवारी केल्यास शिपाई-गर्दींत ज्यांनीं जातीनें भाग घेतला अशांच्या स्मृतिसंग्रहांची संख्या मोठी आढळते व तत्कालीन उभयपक्षांची – त्यांतल्या त्यांत इंग्रजांच्या अनुभवाची आणि मनोवृत्तीची कल्पना आणून देण्याला त्यांचा अधिक उपयोग होतो हें सहज कळण्याजोगें आहे. तेव्हांच्या कित्येक अधिकाऱ्यांच्या रोजनिशा व पत्रेंहि १८५७ चा धुमाकूळ संपण्यापूर्वींच लोकांसमोर आल्याचीं उदाहरणें आहेत. उदाहरणार्थ–दिल्ली गॅझेटच्या संपादकानें Indian Mutiny to the fall of Dehli व हॅरिएट मार्टिनोचें British Rule in India हीं पुस्तकें १८५७मध्यें प्रसिद्ध झालेलीं आहेत. जी. डी. हीं नांवाचीं आद्याक्षरें प्रस्तावनेखालीं देणाऱ्या लेखकानें The History of the Indian Revolt and the Expeditions to Persia, China and Japan 1857-58 हें पुस्तक १८५८च्या डिसेंबरांत तयार केलें व १८५९ सालीं तें प्रकाशांत आलें. माँटगामरी मार्टिन याचा त्रिखंडात्मक The Indian Empire हा ग्रंथ १८५८–६० या वर्षांत प्रसिद्ध झाला. त्याच्या दुसऱ्या खंडांत १८५७चा वृत्तान्त आहे. फ्रेंड ऑफ इंडिया पत्राचा संपादक मीड यांचें पुस्तक असेंच अगदीं पहिल्या कालखंडांतील आहे. दिल्लीचा वेढा चालू असतां ग्रेथेड या

अधिकाऱ्यांनीं लिहिलेलीं पत्रें १८५८ सालीं उजेडांत आलीं. १८५९-६० या दोन वर्षांत चिक नांवाच्या इसमानें Annals of Indian Rebellion 1857-58 हें एक संग्रहात्मक पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकाचा विशेष म्हणजे शिपायांच्या उठावासंबंधीं जो पत्रव्यवहार येथें किंवा इंग्लंडांत छापला जात होता, त्यांतला पुष्कळसा एकत्रित केलेला आहे. ब्रिटिशांना शिपाई-गर्दीचें किती महत्त्व वाटत होतें याची थोडीशी कल्पना प्रस्तुत ग्रंथनिर्देशानें होऊं शकेल.

१८६४ मध्यें के ( Kaye ) यानें आपला इतिहास छापण्याला प्रारंभ केला. दहा वर्षांनीं दिल्लीच्या पाडावापर्यंत या इतिहासाचा गाडा येऊन पोंचला आणि लेखक मृत्यु पावल्यानें मॅलेसननें तो गाडा शेवटपर्यंत पुढें नेला. के व मॅलेसन या जोडनांवानें सहा खंडांचा इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे. परंतु केनें 'शिपायांचें युद्ध' Sepoy War असें आपल्या पुस्तकाला दिलेलें नांव बदलून मॅलेसन यानें हिंदी ( शिपायांचें ) बंड असें नांव दिलें. मॅलेसन यानें बंड चालू असतांना 'लाल चोपडें' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्यावर लेखक—नेपियरच्या हाताखालीं काम केलेला एक अधिकारी असें नांव होतें. याविषयीं लेडी कॅनिंगनें आपल्या इंग्लंडच्या नातेवाईकाला जें मत कळविलें तें वाचनीय आहे. It is quite full of lies from one end to the other. हें पुस्तक ओतप्रोत खोट्या विधानांनीं भरलेलें आहे. मॅलेसन यालाहि पुढें तें पुस्तक रुचेनासें झाल्याचा पुरावा आहे. १९३१ मध्यें मॅक्मुनच्या The Indian Mutiny in perspective या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत तरुण मॅलेसनचें हें पुस्तक हिंदुस्थानांतील राज्यद्रोही मंडळीला आप्तवाक्यासारखें प्रामाणिक आणि विश्वसनीय वाटतें अशा अर्थाचा शेरा आहे. के व मॅलेसन या दोघांबद्दल १८५७ सालीं हिंदुस्थानांत मोठ्या अधिकारावर असलेला इंग्रज कॅम्बेल काय म्हणतो तें देखील नजरेखालीं घालून ठेवणें बरें. केनें वस्तुस्थिति सांगण्याचा विवेकाला जागून यथामति प्रयत्न केला असला तरी भडक रंग हा धंदेवाईक इतिहासकाराचा दोष त्याच्या लेखनांत आहे. As regards his political views I do not think him at all reliable त्याचे राजकीय विचार मुळींच विश्वसनीय नाहींत असें कॅम्बेलनें ठासून म्हटलें आहे. वस्तुस्थितीला अनुसरून मतें बनविण्याऐवजीं के हा वस्तुस्थिति आपल्या मताच्या चौकटींत बसवितो, यासाठीं त्याचा पहिला खंड साफ

नाहींसा केला पाहिजे. तेथें त्यानें आपल्या मनोगतानुसार बंडाळीचा राजकीय पाया ऐसपैस भरून काढला आहे. He does not deduce his opinions from facts, but seeks to make his facts fit his opinions. I should like entirely to cut off his first volume, in which he constructs out of his inner consciousness an elaborate political foundation for the Mutiny. मॅलेसनबद्दल कॅम्बेलचें मत जास्त कठोर आहे. त्यानें केचा दुसरा व तिसरा भाग बदलून टाकला. केचीं मतें उलट फिरवायचीं असा त्याचा उद्देश होता. केनें ज्यांची निंदा केली त्यांची स्तुति आणि त्यानें ज्यांची स्तुति केली असेल त्यांची निंदा असा मॅलेसनचा खाक्या आहे. कॅम्बेलच्या मतें मॅलेसनची माहिती जास्त अविश्वसनीय आहे. (Memoirs of my Indin Career Vol. 1 पान २१०-११) मॅलेसनला चुकीच्या माहितीबद्दल चिमटे घेणारे दुसरे अनेक इंग्रज आहेत. मॅलेसननें केचा इतिहास पूर्ण केला, पण आणखी एक १८५७ बद्दल स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध केलें. के किंवा मॅलेसन या दोघांची माहिती तत्कालीन इतर लेखकांच्या माहितीवर घासून पुसून घेतली पाहिजे हें ध्यानांत येण्यासाठीं येथें किंचित् विस्तार केला आहे.

मॅलेसनप्रमाणें शिपाईगर्दीचे समग्र इतिहास पुष्कळांनीं लिहिले आहेत. सेनबाबूंच्या सूचींत असे इतिहास जिज्ञासूंना विसाहून जास्त दिसतील. त्यांमध्यें टी. राइस होम्सचा ग्रंथ उल्लेखनीय आहे. यामध्यें शिपाईगर्दीमागोमाग सामान्य जनतेमध्यें जी दंगल चालली होती तिचाहि परामर्श आहे. शिपाईगर्दी मोडण्यासाठीं देशांतील मूठभर इंग्रजांनीं जो पराक्रम गाजविला तो एखाद्या महाकाव्याचा विषय होईल, असें अनेक इंग्रजांना वाटत असल्यामुळें इंग्लंडच्या लेखकांनीं बऱ्याच निरनिराळ्या नांवांखालीं वेगवेगळ्या रंगाढंगाचीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्या प्रसंगांत ज्यांना भाग घ्यावा लागला, त्यांच्या आठवणींचीं पुस्तकें सेनबाबूंच्या यादीप्रमाणें साठाइतकीं असलीं तरी त्यांनीं गाळलेलीं आणखी कित्येक पुस्तकें आहेत. उदाहरणार्थ जॉन्सनचे Twelve years of Soldier's life व फील्डमार्शल एव्हलीन वुड याचें From Midshipman to Fieldmarshal. वुडनें १९०७ मध्यें शिपाईगर्दीबद्दल एक स्वतंत्र पुस्तक लिहिलें; परंतु सदर आत्मवृत्तपर पुस्तकांत तात्याटोप्यांच्या पाठलागांतील कांहीं अनुभव विस्तारानें आलेले आहेत. जॉन्सन हा पंजाबच्या सरहद्दीवरून दिल्लीस गेलेल्या डॅलीच्या गाईड पलटणीचा एक अधिकारी होता. आठवणी, पत्रें असल्या वाङ्मयांत कुठें कुठें शिपाईगर्दीच्या

माहितीचे महत्त्वाचे कण सांपडतात. ज्यांनीं आत्मकथा ग्रथित केल्या नाहींत, त्यांपैकीं ज्यांचें कर्तृत्व असामान्य वाटलें त्यांचीं मोठालीं चरित्रें उपलब्ध असून त्यांच्याकडे अभ्यासकाला लक्ष द्यावें लागतें. हा बिनसरकारी साहित्याचा थोडासा आढावा सादर केला. सरकारानें अधिकृतरीत्या प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचा संभार फार मोठा आहे. शिपायांचा उठाव चालू असतां दर आठवड्याला पंध्रवड्याला येथून जी माहिती पार्लमेंटाच्या सभासदांकरितां रवाना होत असते ती माहिती 'पार्लमेंटरी पेपर्स' या नांवानें छापली जात होती. या माहितीचीं बाडें किती तरी आहेत. येथील दप्तरखान्यांतल्या दिल्ली, कानपूर, लखनौ, मध्यभारत (Central India झांशी, ग्वालेर) लष्करी हालचालींचे व कत्तलीच्या चौकशीचे कागद फॉरेस्टनें संपादून सरकारमार्फत प्रसिद्ध केले. १८९२ ते १९१२ या वीस वर्षांत त्याचे चार खंड उजेडांत आले. त्या खंडांना जोडलेल्या प्रस्तावना पुढें स्वतंत्र पुस्तकाच्या स्वरूपांत प्रसिद्ध करण्यांत आल्या. शिपाईगर्दी मोडून इंग्रजी राज्य पुनः एकवार चालू करण्यासाठीं जिल्ह्याजिल्ह्यांतून जे अधिकारी गेले त्यांनीं शिपाईगर्दीच्या काळामध्यें आपल्या जिल्ह्यांत झालेल्या धुमाकुळाच्या तपशीलवार हकीकतीचे अहवाल सरकारांत रुजू केले. त्यांचे रजिस्टराच्या आकाराचे बारीक टायपांत छापलेले सुमारें अडीच हजार पानें होतील असे दोन खंड Narrative of Events regarding the Mutiny in India of 1857-58 and Restoration of authority या नांवानें १८८१ सालीं प्रसिद्ध करण्यांत आले. यांना पुरवणी म्हणून Further Papers relative to Mutinies या नांवाचें साहित्य आहे. त्यांतील हकीकतींचें उत्तरप्रदेशाच्या जिल्हागॅझेटियरकारांनीं पूर्वीं संक्षेपानें संकलन केलेलें होतें. कलकत्त्याच्या शशिभूषण चौधरींच्या Civil Rebellion in the Mutinies 1857-1859 या पुस्तकांचा भर पूर्वोक्त ग्रंथांतील माहितीवरच आहे. याखेरीज सदर वर्षांतील प्रांतोप्रांतीच्या राज्यकारभाराचे अहवाल आहेत ते निराळेच.

शिपाईगर्दीच्या साहित्याची चालना करतांना लक्षांत येणारी एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे. सरकारच्या विद्यमानें व स्वतंत्रपणें पुस्तकें लोकांसमोर येत असलीं तरी १९०७ हें वर्ष १८५७ नंतरचें ५० वें, त्या सुमारास देशामध्यें स्वदेशी बहिष्काराची चळवळ जोरावली होती. पंजाबांत बंड होईल या भयानें इंग्रज राज्यकर्ते ग्रासलेले होते. हिंदुस्थानांत दर पन्नास

वर्षांनीं बंड माजतें असा भ्रम त्या भयामागें होता. येथील राजकीय अस्वस्थता शांत करण्यासाठीं राज्यसुधारणांच्या मोर्लेमिंटो वाटाघाटी चालू होत्या, या प्रकारांकडे लक्ष वेधून अनेक इंग्रजांनीं शिपाईगर्दीविषयीं आठवणींचीं व इतिहासाचीं पुस्तकें छापलीं. हिंदी जनता लोकशाहीच्या प्रयोगाला अयोग्य आहे, असें निदर्शनास आणून देणारा रोख तेव्हांच्या बऱ्याच पुस्तकांतून दिसतो. वुडचें पुस्तक त्या वेळीं जन्मास आलें. त्याच सुमारास वीर वि. दा. सावरकर हे इंग्लंडांत होते. शिपायांच्या उठावाला बंड लेखून त्याच्या अनुरोधानें हिंदी जनतेला नालायक ठरवूं पाहणाऱ्या मत-प्रणालीची प्रतिक्रिया म्हणजे वीर सावरकरांचें पुस्तक असून त्याला प्रति-क्रियेपुरतें संदर्भसाहित्याच्या परंपरेंत अवश्य स्थान आहे. त्या पुस्तकांबद्दलचीं मतें येथें नमूद करून जागा अडविण्याचें कारण नाहीं. १९११मध्यें इंग्लंडचा राजा पांचवा जॉर्ज हा दिल्लीस राज्याभिषेकासाठीं आल्यावेळीं दिल्लीच्या इतिहासकालीन अर्थात् १८५७ सालांतील रक्तपाताचीं शब्दचित्रें रेखाटून ब्रिटिश जनतेमध्यें भीति उत्पन्न करावी अशा धोरणाचीं कांहीं पुस्तकें प्रगटलीं. त्यांचा उद्देश कसाहि असला तरी त्यांतून वस्तुस्थितीचा थोडा बोध घेतां येतो.

१८५७ पासून आतांपर्यंत जिज्ञासूंच्या अभ्यासांत खंड पडला नव्हता. भारतीयांनीं १८५७च्या ग्रंथसंपत्तीला हातभार लावण्याचें काम १८६० पासून चालविलें होतें. १९४७ मध्यें भारत स्वराज्यसंपन्न झाल्यानंतर सरकारी दप्तरखात्यांत डोकावण्याची आडकाठी ढिलावल्यामुळें अनेक इतिहासप्रेमी लेखक आपल्या प्रदेशांच्या दप्तरखान्यांतील कागद पाहून त्यांतील ज्ञान जनतेला देऊं लागले. ऐतिहासिक दप्तराचें मंडळ Historical Records Commission, अखिल भारतीय इतिहास परिषद History Congress यांच्या वार्षिक बैठकीं-तून संशोधित कागदपत्रांची किरकोळ चर्चा होऊं लागली. ठिकठिकाणच्या इतिहासविषयक नियतकालिकांतून विविध प्रबंध बाहेर पडूं लागले. १९५७ साल जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी १८५७ विषयींच्या लेखनाला भरती चढावी हें स्वाभाविक आहे. हें साल उगवल्यावर सरकारनें सेनबाबूंचा ग्रंथ प्रसिद्ध केला. परंतु स्वतंत्रपणें प्रकाशांत आलेलीं देशी व इंग्रजी भाषेंतील पुस्तकें थोडीं नाहींत. बरींचशीं पुस्तकें शताब्दीची पर्वणी साजरी करणारीं असलीं तर कित्येक नवी माहिती, विचाराची नवी दिशा लोकांना दाख-

विण्याच्या उद्देशानें लिहिलीं गेलीं आहेत. इंग्लंडांत सुद्धां १८५७ च्या शताब्दीनें कांहीं जागृति होऊन नवीं पुस्तकें रचलीं गेलीं. येथें अद्यापि नवीं पुस्तकें छापलीं जात आहेत. हा गेल्या शंभर वर्षांतील ग्रंथांचा थोडासा तपशील शिपाईगर्दीच्या साहित्याचा अवाढव्यपणा लक्षांत येण्याकरितां दिलेला आहे. प्रस्तुत शिपाईगर्दीच्या लेखकाला प्रकाशितांपैकीं सगळ्या साहित्याचें परिशीलन करतां आलेलें नाहीं. येथील आणि विलायतच्या सरकारी दप्तरांतील अप्रकाशित साहित्य परिशीलनाच्या आटोक्यांतील नसल्यामुळें पाहतां आलें नाहीं; परंतु ज्यांनीं त्याचा उपयोग केला त्यांच्या उपयोगावरून एखादा बारीक तपशील पुरविणें किंवा संदिग्ध स्थळ स्पष्ट करणें एवढ्यापुरतें त्या दप्तरी साहित्याचें महत्त्व आढळून येतें. खुलाशादाखल झांशीच्या लक्ष्मीबाईनीं किंवा नानासाहेबांनीं इंग्रजांना पाठविलेल्या पत्राचें उदाहरण पुरेसें आहे. लक्ष्मीबाईच्या पत्राचें ज्ञान १८९४ मध्यें लक्ष्मीबाईचें चरित्र लिहिते वेळीं कै. पारसनिसांना होतें. हीं पत्रें लक्ष्मीबाईजवळच्या लोकांनीं इंग्रजांकडे जाऊं दिलीं नाहींत. हा पारसनिसांचा समज लो. टिळकांनीं अमान्य केला आहे. आतां तीं पत्रें संशोधकांना मिळालीं. नानासाहेबांच्या पत्रांचा निर्देश इंग्रजी साधनांत येऊन गेला होता. सांप्रत तीं मूळ पत्रें उजेडांत आलीं आहेत. यावरून दप्तरखान्यांतील कागद शिपाईगर्दीच्या इतिहासाला नवें वळण लावण्याच्या किंवा त्याची रूपरेषा बदलण्याच्या योग्यतेचे नाहींत हा निष्कर्ष स्वीकारतां येतो. साहित्याच्या एवढ्या ऊहापोहानंतर ' शिपाईगर्दी ' चे संदर्भग्रंथ नमूद करायला हरकत नाहीं.


| | |
|---|---|
| Adye | Defence of Cawnpore. |
| Adye | Recollections of a military life. |
| Anson | With H. M. 9th Lancers during the Indian Mutiny. |
| Atkinson | Campaign in India. |
| Baldwin | Indian gup. |
| Ball | History of Indian Mutiny 2 vols. |
| Barker | Letters from Persia and India. |
| Basu | Story of Satara. |
| Bourchier | Eight months campaign against in the Bengal Sepoy. |
| Browne | Cawnpore and the Nana of Bithoor. |
| Burne | Clyde and Srathnairn. |

| | |
|---|---|
| Campbell | Memoirs of my Indian career 2 Vols. |
| Case Mrs. | Day by Day at Lucknow. |
| Cave-Browne | The Punjab and Delhi in 1857 2 Vols. |
| Cavenagh | Reminiscences of an Indian official. |
| Chalmers | Letters written from India during the Mutiny and Waziri campaigns. |
| Chick | Annals of Indian Rebellion. |
| Chunder Bholanauth | Travels of a Hindu 2 Vols. |
| Churcher | Some Reminiscences of three quarters of a century in India, |
| Colvin | Life of John Russell Colvin. |
| Cooper | The crisis in the Punjab from 10th May until the fall of Delhi. |
| Coopland | A Lady's escape from Gwalior and life in the Fort of Agra during Mutinies of 1857. |
| Cunningham | Earl Canning. |
| District Gazetteers. | |
| D. G. (G.D.) | History of Indian Revolt. |
| Duberley Mrs. | Campaigning Experiences in Rajputana and Central India during the suppression of the Mutiny. |
| Duff | The Indian Rebellion—a series of letters. |
| Dunlop | Service and Adventure with Khakee Ressalah or Meerut Volunteer Horse during the Mutinies. |
| Durand | The life of H. M. Durand 2 Vols. |
| Edwardes and Merivale | The life of Henry Lawrence. |
| Edwards | Personal Adventures during the Indian Rebellion in Rohilkhand, Futtehghur & Oude. |
| Fitchett | Tale of Great Mutiny. |
| Forbes | Havelock. |
| Forbes-Mitchell | Reminiscences of the Great Mutiny. |
| Forjett | Our real Danger in India. |
| Forrest | History of Indian Mutiny 3 Vols. |
| Gilbert | The story of the Indian Mutiny. |
| Gimlete | A Post-script to the Records of the Indian Mutiny. |
| Goldsmidt | James Outram 2 Vols. |

Gordon-Alexander Recollections of a Highland Subaltern during the campaigns of the 93rd Highlanders in India under Colin Campbell, Lord Clyde.
Gough Old Memories.
Graham The Life and work of Sir Syed Ahmed Khan.
Grant and Knollys Incidents in Sepoy War.
Greathed Letters written during the Siege of Delhi.
Griffiths Siege of Delhi.
Gubbins An account of the Mutinies of Oudh and of the siege of Lucknow.
Hall Two months in arrah.
Hare Story of two Noble lives.
History of the siege of Delhi by an officer who served there.
Hodson 'Hodson of the Hodson's Horse.
Hodson Twelve years of a soldier's life in India. Being extracts from letters of the late Major Hodson.
Holloway Essays on the Indian Mutiny.
Holmes History of the Indian Mutiny.
Inglis Lady Letters containing extracts from a journal kept by mrs Inglis during the siege of Lucknow.
Innes Lucknow and Oude in the Mutiny.
Innes The Sepoy Revolt : a critical narrative.
Jacob Western India before and during the Mutinies.
Jocelyn History of Royal and Indian Artillary in Mutiny.
Johnson Twelve years of a soldier's life.
Jones O. J. Recollections of a Winter campaign in India. 1857-58.
Kavanagh How I won the Vicitoria Cross.
Kaye History of the Sepoy war in India 3 Vols.
Kaye Lives of Indian Officers. 2 Vols.
Keen Fifty Seven.
Lang Wanderings in India and others sketches of life in Hindustan.
Lawrence Reminiscences of forty three years in India.
Lecky Fictions connected with the Indian outbreak of 1857 exposed.
Lowe Central India during the Rebellion of 1857 and 1858.
Mackay From London to Lucknow.

Mackenzie Mutiny Memoirs.
MacMunn Indian Mutiny in perspective.
Majendie Up amongst the Pandies.
Malet Last links in the Indian Mutiny.
Malleson Indian Mutiny 3 Vols.
Malleson Indian Mutiny 1857.
Malleson Red Pamphlet.
Marshman Memoirs of Havelock
Martin Indian Empire 3 Vols.
Maude with Sherer Memories of the Mutiny 2 Vols.
Mead Sepoy Revolt.
Metcalfe Two Native Narratives of the Mutiny at Delhi.
Muter Mrs. My Recollections of the Sepoy Revolt.
Nash Volunteering in India.
Norgate and Phillot–Sitaram From Sepoy to Subadar.
Norman A narrative of the campaign of the Delhi army.
North Journal of an English officer in India.
Pitt Incidents in India and Memories of the Mutiny.
Prichard The Mutinies in Rajputana.
Raikes Notes on the Revolt in the N.W. Provinces of India.
Raines Derbyshire campaign series.
Ramsay Rough Recollections of Military Service and Society.
Roberts Forty one years in India.
Roberts Letters written during the Mutiny.
Robertson District duties during the Revolt.
Rotton Chaplain's Narrative of the siege of Delhi.
Ruggles Recollections of a Lucknow veteran.
Russel My Diary in India. 2 Vols. याची नवी आवृत्ति १९५७ मध्यें My Indian Mutiny Diary या नांवानें निघाली आहे.
Savarkar The Indian War of Independence.
Seymour How I won the Indian Mutiny Medal
Shadwell Life of Colin Campbell Lord Clyde. 2 Vols.
Shepherd Personal Narrative of the outbreak and massacre at Cawnpore.
Sherer Daily life during the Indian Mutiny.
Sherring The Indian church during the great Rebellion.

| | |
|---|---|
| Showers | A missing chapter of the Indian Mutiny. |
| Sieveking | A turning point in the Indian Mutiny. |
| Smith | Life of Lord Lawrence. |
| Stent | Scraps from my sabretasche. |
| Stewart | Through Persia in disguise, with Reminis. Cences of the Indian Mutiny. |
| Taylor | Patna Crisis |
| Taylor | Thirty-eight years in India. 2 Vols. |
| Temple | Men and Events of Time in India. |
| Thackeray | Reminiscences of the Indian Mutiny. |
| Thackeray | Two Indian Campaigns. |
| The Indian Mutiny to the fall of Delhi—By former Editor of the "Delhi Gazette." | |
| Thompson | The other side of the Medal. |
| Thomson | Story of Cawnpore. |
| Thorhill | The Personal Adventures and experiences of a Magistrate (Muttra) |
| Trevelyan | Cawnpore. |
| Trotter | Life of John Nicholson. |
| Trotter | The Bayard of India. |
| Trotter | Hodson of the Hodson's Horse. |
| Turnbull | Letters written during the siege of Delhi. |
| Verney | The Shannons Brigade in India. |
| Vibart | Sepoy Mutiny as seen by a subaltern. |
| Walker | Through the Mutiny. |
| Wilberforce | An unrecorded chapter of the Indian Mutiny. |
| Wolseley | The story of a Soldiers' life. |
| Wood | Revolt in Hindustan. |
| Wood | From Midshipmän to Field Marshall 2 Vols. |
| Yeoward | An Episode of the Rebellion and Mutiny in Oudh |
| Young | Delhi 1857. |


**सूचना**—डॉ. सेन यांच्या पुस्तकांतील सूची इंग्रजी वर्णानुक्रमाची असल्यानें तिचें साह्य वरील यादी तयार करतांना घेतलें आहे. त्यांच्या सूचींत नसलेलीं पुस्तकें येथें दाखल केल्याचें तुलनापूर्वक वाचणारांच्या सहज लक्षांत येईल. बार्टल फ्रीअर, हेन्री डॅली, अल्फ्रेड ल्याल, नार्मन यांसारख्या तत्कालीन अधिकाऱ्यांचीं चरित्रें डॉ. सेन यांच्या सूचींत नाहींत;

परंतु त्यांत शिपाईगर्दीच्या माहितीमध्यें भर टाकणारा मजकूर पाहायला सांपडतो.

१८५७ सालीं शिपायांचा उठाव झाल्यावर इंग्लंडच्या वृत्तपत्रांतून जी हकीकत प्रसिद्ध केली जात असे, तिच्या अनुरोधानें कार्ल.मार्क्स अमेरिकेच्या वृत्तपत्रामध्यें लेख लिहीत होता. त्यांतील जीं पत्रें १९५७ मध्यें इतस्ततः प्रसिद्ध झालीं तीं गंभीरपणें विचारांत घेण्यासारखीं वाटलीं नाहींत. तीं तशीं कां वाटलीं नाहींत याचें विवेचन करून जागा अडविण्याचें हें स्थळ नाहीं.

अलीकडे स्वीडनच्या दोघां तत्कालीन लेखकांचीं पुस्तकें उजेडांत आलेलीं असून कित्येक फ्रेंच व जर्मन पुस्तकांचीं नांवें सेन बाबूंच्या सूचींत आहेत.

देशी भाषेंतील पुस्तकांपैकीं विष्णुभटजी गोडसे–माझा प्रवास, द. ब. पारसनिसांनीं लिहिलेलें झांशीच्या लक्ष्मीबाईचें चरित्र, के. सी. ठाकरे यांचें रंगो बापूजीचें चरित्र यांचा व नियतकालिकांतील लेखांचा उपयोग केला. उर्दूपैकीं सर सय्यद अहमद यांचें लेखन एकदां मुळांतून पाहतां आलें. गालिब, जहीर, फजले हक खैराबादी, यांच्या लेखनांतील आवश्यक मजकुराचा सारांश १९५७ मध्यें मराठी नियतकालिकांनीं प्रसिद्ध केला आहे. हिंदी व बंगाली भाषेंतील बरेंच वाङ्मय एकांगी स्वाभिमानाचें आढळलें. १९५७ मध्यें प्रसिद्ध झालेलीं कांहीं बंगाली पुस्तकें लोकप्रिय मताच्या आराधनानें शताब्दीची पर्वणी व्यापारदृष्ट्या साजरी करणारीं दिसलीं. गुजरातीमध्यें इ.स. १९२३–२४ व १९३१ सालीं एक तीन खंडांचा इतिहास प्रसिद्ध झाला होता. १९५७ तील जीं एक दोन त्या भाषेचीं पुस्तकें पाहण्यांत आलीं तीं माहितीच्या आणि विचाराच्या दृष्टीनें महत्त्वाचीं वाटलीं नाहींत.

## १९५७ मधील पुस्तकें.

डॉ. रमेशचंद्र मुजुमदार Sepoy Mutiny and Revolt of 1857.

डॉ. सुरेंद्रनाथ सेन Eighteen Fifty Seven.

People's Publishing House या संस्थेचें Rebellion 1857. A Symposium.

निगम एन्. के. Delhi in 1857.

शशिभूषण चौधरी Civil Rebellion in the Indian Mutinies 1857–1859.

हरप्रसाद चट्टोपाध्याय The Sepoy Mutiny A Social study and Analysis.

डॉ. के. के. दत्त : Biography of Kunwar Singh. and Amar Singh.

हिल्टन The Indian Mutiny.

लीसर The Red Fort.

कूपर Havelock.

मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेल्या स्वातंत्र्येतिहासाच्या पहिल्या खंडांत १८५७ ची माहिती असून पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारनें अशी माहिती आपल्या स्वातंत्र्येतिहासांत दिलेली आहे. उत्तरप्रदेश सरकारनें प्रसिद्ध केल्यापैकीं दोन हिंदी 'संघर्षकालीन नेताओंकी जीवनियाँ' आणि 'स्वतंत्र दिल्ली' हीं पुस्तकें सरकारी असून देखील प्रचारकी थाटाचीं आहेत. या सरकारचें Source Book of 1857 हें इंग्रजी पुस्तक उपयुक्त आहे. पाकिस्तानमध्यें कांहीं पुस्तकें प्रसिद्ध झाल्याचें कळलें तेव्हां तीं मिळविण्याचा यत्न केला. महमदशफी यांचें १८५७ हें एक पुस्तक हातीं आलें. दुसरीं पुस्तकें अंजुमन इस्लामच्या ग्रंथसंग्रहालयांतून श्री. सेतुमाधवराव यांच्या कृपेनें पाहायला सांपडलीं. हीं पुस्तकें विशेष महत्त्वाचीं नाहींत असें दिसून आलें.

• • •

परिशिष्ट : २

## शिपायांच्या उठावाचा कालानुक्रम

शिपायांच्या उठावाच्या तारखांची एक जंत्री पार्लमेंटाला सादर करण्यांत आली होती. गिमलेट नांवाच्या एका लष्करी डॉक्टरानें Post-script to the Records of Indian Mutiny नांवाच्या १९२७ मध्यें छापलेल्या पुस्तकांत उठावांत सामील झालेल्या किंवा सामील होतील म्हणून ज्यांचीं हत्यारें काढून घेतलीं अशा सर्व प्रकारच्या (पायदळ, घोडदळ व तोफखाना, रेग्युलर इरेग्युलर वगैरे) सेनाविभागांचा संख्यानुक्रमानें वृत्तान्त दिलेला आहे. के व मॅलेसन यांच्या विषयसूचींत उठावाचा महिना तारीख व ठिकाण याप्रमाणें नोंद पाहायला सांपडते.

डनलापच्या खाकी 'रिसाला' या पुस्तकाच्या शेवटीं अशीच सेना-विभागाच्या क्रमांकानें उठावांची नोंद आहे. मार्टिनच्या व जी. डीच्या इतिहासांतील सूचींतूनहि अशा नोंदी आहेत. डनलापनें तारखा दिलेल्या नाहींत. पार्लमेंटाच्या अहवालांत व इतर साहित्यांत क्वचित् एखाद्या दिवसाचा फरक दिसतो. पुढील यादीला मुख्य आधार के-मॅलेसनच्या सूचीचा आहे.

## १८५७

चरबीदार काडतुसाचा संशय जानेवारींत उत्पन्न झाला व फेब्रुवारी-पासून शिपायांचा क्षोभ कृतींत उतरला, म्हणून तशी मांडणी केलेली आहे.

१८५७ फेब्रु. २६ १९ वें पायदळ व ११ वें इरेग्युलर घोडदळ उठाव किंवा शिक्षा. बरहमपूर—काडतुसें नाकारलीं यासाठीं त्यांची ता. ३१ मार्च रोजीं हत्यारें काढून त्यांना बडतर्फ केलें.

**मार्च**

२९ बराकपूर ३४ व्या पायदळाच्या मंगलपांड्याचा उठाव. ईसरी पांडे पहाऱ्यावर तटस्थ राहिला. याकरितां या दोघांना अनुक्रमें ८ एप्रिल व २१ एप्रिल या दिवशीं फांशीं दिलें. ६ मे रोजीं ३४ व्या पलटणीची हकालपट्टी करण्यांत आली. या छावणींत २ रें, ४३ वें व ७० वें अशीं आणखी पायदळें होतीं. १४ जून रोजीं या तिन्हींचीं हत्यारें काढून घेतलीं. त्याच रात्रीं २ रीचे लोक पळाले. पुढें दहा दिवसांत ४३ व्याचे शंभरावर शिपाई छावणी सोडून गेले. ७०वें पायदळ निष्ठेनें राहिलें. तें नंतर चीनमध्यें पाठविलें.

**मे**

३ लखनौ ७ व्या अवधी पायदळाचा उठाव.

१० मीरत ३ रें घोडदळ, ११ वें आणि २० वें पायदळ, यांनीं उठाव केला. ११ व्याचे सारे शिपाई दिल्लीस गेले नाहींत. २० व्याचे कांहीं जण मीरतला राहिले. त्यांनीं पुढें पोलिसांचें काम बजावलें. मागें राहिलेल्या तोफखान्याच्या हिंदी तुकडीची ता. १० जून रोजीं हत्यारें काढलीं.

| | |
|---|---|
| २१ दिल्ली | ३८ वें, ५४ वें आणि ७४ वें अशीं तीन पायदळें. ३ व ५ क्र.चा तोफखाना. |
| १३ लाहोर | मीरतची बातमी तारेनें लाहोरास पोंचतांच तेथील छावणींत असलेलें १६वें, २६ वें आणि ४९ वें पायदळ, तसेंच ८ वें घोडदळ यांचीं हत्यारें काढून घेण्याचा समारंभ झाला. १३ मेच्या रात्रीं १६ व्याचे शिपाई छावणी सोडून गेले. १५ मे रोजीं घोडदळाचे घोडे ताब्यांत घेतले. ( गिमलेट ३ जून ) २६ व्या पादळानें ३१ जुलईला दंगा केला व पळ काढला, पण त्यांतला प्रत्येक शिपाई मारला गेला. उरलेल्यांची बंदोबस्तानें पंजाबांतून हकालपट्टी झाली. |
| १३ फिरोजपूर | ४५ वें,५७ वें पायदळ यांनीं उठाव केला. तेथील गोऱ्या सैनिकांनीं त्यांचें पारिपत्य केलें. १० व्या हिंदी घोडदळानें त्यांचा पाठलाग चालविला व दाणादाण उडविली. सदर हिंदी घोडदळानें १९ ऑगस्टला उठाव केला. पार्लमेंटच्या आढाव्यांत १३ व १४ मे अशा दोन तारखा आहेत. |
| १३ मुजफरनगर | २० व्या पायदळाचे कांहीं शिपाई खजिन्याच्या रक्षणासाठीं होते. तेथील इंग्रज अधिकारी पळाला. यामुळें लोक व शिपाई उठले. |
| २० अलीगड<br>२१ बलंद शहर<br>२२ मैनपुरी<br>२३ इटावा | ९ व्या पायदळाच्या तुकड्या या चार शहरांत होत्या. पार्लमेंटाच्या आढाव्यांत या सर्व तुकड्या चारी शहरांत एकाच म्हणजे मेच्या २० तारखेला उठल्या अशी नोंद आहे. परंतु अलीगडाची बातमी ऐकल्यावर त्या एकामागून एक उठल्या हें जास्त सयुक्तिक दिसतें. इटावा मैनपुरीस ता. २५ मेला उठाव झाला अशी गिमलेटची माहिती आहे. |
| २१ नौशेरा (सरहद्द)<br>२२ पेशावर | ५५ व्या पायदळाच्या दोन कंपूंचा उठाव. त्यांना होतीमर्दान येथें नेलें. नौशेराचा उठाव मोडण्यासाठीं पेशावरच्या २४, २७, ५१, ६४ या क्रमांकाचें पायदळ व ५ व्या क्र.चें घोडदळ यांचीं हत्यारें २२ मे रोजीं काढलीं व ५५ |

त्याचें पारिपत्य करण्यासाठीं कांहीं लोक होतीमर्दान या ठिकाणीं पाठविले. ६४ व्या पायदळाचे सारे लोक पेशावरास नव्हते. त्याच्या तुकड्या निरनिराळ्या ठाण्याकडे पाठविल्या होत्या. पेशावरास नसलेल्या तुकड्यांचीं हत्यारें घेऊन त्यास बडतर्फ करण्याचें काम जूनच्या प्रारंभापर्यंत चालू होतें.

२३ होतीमर्दान नौशेराच्या तुकड्या होतीमर्दानला पोंचल्या तों मागोमाग ता. २३ च्या सकाळीं त्यांना पेशावरचें लष्कर येत असल्याचें दिसलें. तेव्हां ५५ व्या पायदळानें हत्यारें, खजीना, दारूगोळा घेऊन स्वातच्या डोंगरांत पळ काढला. दिवसभराच्या पाठलागांत १२० जण ठार झाले, १५० पकडले. ता. १० जून रोजीं पकडल्यापैकीं ३४ जणांना तोफेच्या तोंडीं दिलें. १२० शिपाई किल्ल्यावर होते, त्यांना पगारावांचून बडतर्फ केलें. सुमारें ५००. जण पाठलागांतून बचावले. त्यांची पठाणांनीं दुर्दशा उडविली. त्यांतलें १२४ शरण आले. त्यांना मरणाची शिक्षा मिळाली. असा या पायदळाचा शोचनीय वृत्तान्त आहे. होतीमर्दानला १० वें व १८ व्या क्र. चें इरेग्युलर घोडदळ होतें. त्यानें ५५ व्याच्या पाठलागांत उत्साह दाखविला नाहीं म्हणून १० व्याची हकालपट्टी झाली. १८ वें निर्दोष ठरवून त्याला कामावर घेतलें.

२८ नसीराबाद येथें १५, ३०वें, क्र.चें पायदळ, तोफखान्याची तुकडी व मुंबईच्या सैन्यांतील घोडदळ एवढी फौज होती. पैकीं घोडदळ सोडून बाकीच्यांनीं उठाव केला. शिपाई-गर्दींत या शिपायांनीं आपली संघटना व शिस्त कायम राखली. दिल्लीस मिळालेल्या कागदपत्रांत सुभेदार भागीरथी मिश्र हा त्यांचा ब्रिगेडियर होता असें दिसून आलें. नसीराबादचा हा उठाव पहिला.

२९ हंसी हिसार } या ठिकाणीं 'हरिआना पायदळ' या नांवाची स्वतंत्र
सिरसा (पंजाब) } फौज होती. जोडीला ४थ्या इररेग्युलर घोडदळाचा विभाग होता. त्यांनीं उठाव करून दिल्ली गांठली. स्वारांपैकीं ९० जण दिल्लीस इंग्रजांबरोबर गेले. तेथें त्यांचीं हत्यारें घेऊन त्यांना पोलिसांच्या कामावर नेमलें.

३० लखनौ ७ वें पायदळ, २ रें व ७ वें घोडदळ, रेग्युलर फौजेचा २-३-४ क्र. चा तोफखाना १३, ४८, ७१ या क्र. चें पायदळ, याप्रमाणें एकूण लष्कर होतें. पैकीं १३ व्या ची मोठी संख्या, ४८ व्याचे बरेच व ७१ व्याचे अगदीं थोडे, इतक्यांनीं ब्रिटिशांना सोडलें नाहीं. रेसिडेन्सीच्या कोंडींत त्यांचें शौर्य ब्रिटिशांच्या उपयोगी पडलें. ७१ व्याचे बहुतेक सारे शिपाई सिकंदर बागेच्या लढाईंत मारले गेले.

३० मथुरा आग्र्याहून ६७ व्या पायदळाच्या दोन तुकड्या मथुरेस खजीन्याच्या रक्षणाकरितां पाठविल्या असतां त्यांनीं तेथें उठाव

३१ आग्रा केला म्हणून आग्रा येथें ६७ व्या व ४४ व्या पलटणीच्या शिपायांना हत्यारें घेऊन रजेवर पाठविलें. त्यांतले पुष्कळसे दिल्लीस गेले.

,, बरेली १८, ६८ क्र. चें पायदळ ६ व १५ तोफखाना, ८ वें इरेग्युलर घोडदळ यांचा उठाव आणि दिल्लीस प्रयाण.

३१ शहाजानपूर २८ वें पायदळ उठलें. बरेलीच्या व मुरादाबादच्या शिपायांबरोबर दिल्लीस गेलें.

## जून

१ बदायूँ बरेलीच्या फौजेची एक तुकडी येथें होती. तिचा उठाव.

२ मुरादाबाद येथील २९ व्या पायदळाची एक तुकडी सहारनपुरास होती. ती ११ जुलईपर्यंत इमानानें वागली. मीरतच्या उठावा-नंतर मे महिन्यांत मुरादाबादचे सैनिक इंग्रजांची सेवा निष्ठेनें करीत होते. २ जूनला त्यांनीं निष्ठा सोडली.

३ आझमगड १७ वें पायदळ (दोन कंपू वगळून) १३ व्या घोडदळाचे कांहीं लोक गोरखपूर, आझमगड येथील १७ लाख खजीना घेऊन फैजाबादला गेले. नंतर कानपुरास प्रयाण.

३ नीमच ४ था तोफखाना १ ल्या घोडदळाचा विभाग,ग्वाल्हेरच्या फौजेच्या ७ व्या पायदळासह ७२ वें बेंगाल आर्मीचें पायदळ. खजीना लुटून संथपणें दिल्लीस जातांना वाटेंत ता. ५ जुलई रोजीं आग्र्यास लढाई, शिपायांचा विजय.

३ सहारनपूर — ४ थें घोडदळ, २९ व्या पायदळाची एक तुकडी, यांनीं मे महिन्यांत जिल्ह्याचा बंदोबस्त ठेवला. नंतर ५ व्या पायदळाचे लोक आल्यावर उठाव झाला. २९ व्याची तुकडी त्यांत सामील झाली नाहीं.

३ सीतापूर — ४१ वें पायदळ, ९ वें, १० वें अवधी पायदळ, २ रें अवधी पोलीस यांच्यासह उठाव. अधिकाऱ्यांचा व शहाजानपुराहून पळणाऱ्या इंग्रजांचा वध. कोणी दिल्लीस, कोणी घरीं गेले व कोणी नबाबशाही मुलखांत राहिले. परंतु मोठी संख्या फत्तेगडास पोचली. इंग्रजांना यांनींच फत्तेगड सोडायला भाग पाडलें.

४—५ कानपूर — १ला व २ रा तोफखाना, १लें, ५३वें आणि ५६वें पायदळ यांचा उठाव. नंतर गोऱ्यांशीं २१ दिवस लढाई; २७ जूनला गोऱ्यांची गंगाकांठीं कत्तल.

४ बनारस — ३७ वें, पायदळ लुधियाना :शिखाचें पायदळ व १३ वें इरेग्युलर घोडदळ यांचा उठाव. जौनपुरास गेले.

५ जौनपूर व मालोन — लुधियाना शिखांची एक तुकडी जौनपुरास होती. तिला बनारसचें वृत्त कळतांच तिनें उठाव केला. खजीना लुटला. इंग्रजी राज्य उरलें नाहीं तेव्हां सामान्य लोकांनीं उठावांत शिरून इंग्रजांचीं घरें लुटलीं व जाळलीं.

मालोन हें हरडोई जिल्ह्यांतले कानपूरच्या उत्तरेस सुमारें ३८ मैलांवरील ठिकाण. येथें ४१ व्याची एक तुकडी व ४ थें अवधी पायदळ असें सैन्य होतें त्यांचा उठाव.

६ अलाहाबाद — ६ व्या पायदळानें रात्रीं उठाव करून ७ तारखेला खजीना लुटला. कांहीं शिपाई १६ जून रोजीं बांद्यास पोंचले. तेथें राजवाडा व शहर जाळण्याचा यत्न केला. कांहीं शिपाई कानपुरास गेले. कित्येकांनीं आपल्या घरीं जाण्याचा यत्न केला.

७ झांशी — १२ व्या पायदळाचा विभाग, त्याच्या अवधी घोडदळाची तुकडी व एक पायदळ तोफखान्याची तुकडी अशी फौज

होती. तिनें उठाव करून सर्व गोरे अंमलदार बायकांमुलांसह मारले. ही फौज आधीं दिल्लीस गेली. दिल्ली पडल्यावर तिचे कित्येक शिपाई झांशीस आले व कित्येक तात्या टोप्यांना मिळाले.

७ जालंधर — जालंधर येथें ६ वें घोडदळ, ३६ वें आणि ६१ वें पायदळ याप्रमाणें फौज होती. उठाव करून ते फिलोरला गेले. तेथें ३ रें पायदळ मिळवून सारेजण लुधियानास पोंचले. तेथें दोन तास लढाई करून मग शहर लुटलें व दिल्लीस रवाना झाले. ३ ऱ्या व ६१ व्या पायदळाच्या ३५० जणांनीं इंग्रजांना सोडलें नाहीं. 'वफादार' पलटण या नांवानें इंग्रजांनीं त्यांचा गौरव केला. लुधियानास शीख लष्कराच्या तुकडीशीं लढाई झाली. (ता. ८).

८ फैजाबाद — ५ वा आणि १३ वा तोफखाना, २२ वें पायदळ, ६ वें अवधी इरेग्युलर पायदळ, १५ वें इरेग्युलर घोडदळ एवढा लष्करी सरंजाम होता. हें लष्कर लखनौस जाऊन तेथेंच लढत राहिलें. गिमलेटनें ता. ८ ला उठाव झाला असें म्हटलें आहे.

८ फिलोर — जालंदरच्या शिपायांनीं ३ ऱ्या पायदळाला उठविलें हें वृत्त वर आलें आहे.

९ मुलतान — ६२ वें आणि ६९ वें पायदळ, १लें इरेग्युलर घोडदळ, तोफखान्याची तुकडी, याचीं हत्यारें घेतलीं. नंतर बऱ्याच शिपायांनीं छावणी सोडली. ३१ ऑगस्टला उरलेल्या शिपायांनीं दंगा केला, पण सुमारें १३०० शिपाई मारले गेले. गिमलेट-स्वार इमानी. त्यांनीं चांगल्या रीतीनें चाकरी बजावली.

१० दर्याबाद, फत्तेपूर, नौगांव, सिक्रोरा, सुलतानपूर — ६ व्या इरेग्युलर घोडदळानें उठाव केला. खजीना लुटला. दर्याबाद, सिक्रोरा व सुलतानपूर हीं ठिकाणें लखनौच्या नबावशाहीपैकीं. अलाहाबादच्या ६ व्या पलटणीचे ६० शिपाई फत्तेपुरास खजीना राखण्यासाठीं ठेवले होते. अलाहाबादच्या बातमीनें ते बिथरले होतेच. त्यांनीं उठाव केला. फत्तेपूर लुटलें.

नौगांवास १२ व्या पलटणीची एक तुकडी, ४ थ्या व १८ व्या तोफखान्याच्या तुकड्या, १४ व्या इरेग्युलर घोडदळाचा विभाग या लष्करानें झांशीच्या बातमीनंतर उठाव केला. हें ठिकाण बुंदेलखंडांतलें आहे.

सिक्रोरा येथें १ ला तोफखाना, १ लें घोडदळ व कांहीं पायदळ होते. हें अवधी इरेग्युलर फौजेपैकीं.

सुलतानपुरास १५ वें इरेग्युलर पायदळ अवधी लष्करी पोलीस या सर्वांनीं उठाव करून अधिकारी मारले. शहर व खजीना यांची लूट केली व ते सर्व लखनौस गेले. रेसिडेन्सीच्या वेढयांत व इतर लढायांत शौर्य गाजविलें.

१० सालोनी गोंडा (अयोध्या) — सुलतानपुराच्या बातमीनें १ ल्या अवधी इरेग्युलरचे जे सहा कंपू सालोनीस होते त्यांचा उठाव. ३ ऱ्या इरेग्युलर पलटणीचा गोंड्यास उठाव. या पलटणीच्या दोन तुकड्या बऱ्हेचला होत्या. त्यांनीं गोंड्याचा कित्ता गिरविला.

१० रोहटक (पंजाब) — ६० व्या पायदळाचा उठाव (पार्लमेंटचा आढावा) अधिकारी पळाले.

१२ ललितपूर (बुंदेल) — ग्वालेरच्या फौजेचे ३०० लोक होते. त्यांचा उठाव. खजीन्याची लूट. गोरे अंमलदार वांचले.

१४ बांदा (बुंदेल) ग्वालेर हमीरपूर (बुंदेल) — बांदास ५६ व्या पायदळाचा एक विभाग होता. या पायदळानें कानपुरास उठाव केला होता. शिवाय जवळच्या १२ व्या पलटणीनें इंग्रजी हुकमत झुगारली होती. यामुळें बांदास उठाव होऊन तेथील नबाबाचें सैन्य मिळालें. खजीना लुटून हें सारें लष्कर कानपूरकडे गेलें.

ग्वालेरला उठावाच्या वेळीं तोफखान्याचा २ रा व ४ था कंपू, १ ल्या घोडदळाच्या कांहीं तुकड्या, १, २, ३ व ४ क्रमांकाचें पायदळ एवढी फौज होती. १४ मे रोजीं १ लें व २ रें घोडदळ अलीगडास पाठविलें होतें. तेथें २३३ स्वारांपैकीं १०० स्वारांनीं बंडखोरांचा

पाठलाग केला. जुलईत अशीरगड व बऱ्हाणपुरास ६ व्या पायदळाच्या तुकड्यांनीं उठाव केल्यावर त्यांचीं हत्यारें काढून घेतलीं. या कामीं १९ व्या मुंबईच्या पायदळाची मदत झाली. ७ वें ग्वालेरवाले पायदळ नीमचला होते.

हमीरपूर येथें ५३ व्या पायदळाचा विभाग होता. त्यानें उठावांत सारे गोरे काळे ख्रिस्ती मारले.

२५ औरंगाबाद — येथें निजामाच्या सैन्यापैकीं १ लें, ३ रें घोडदळ, २ रें पायदळ, तोफखान्याची एक तुकडी एवढे विभाग होते. त्यांचे अधिकारी इंग्रज होते. २३ जूनला मुंबईचा इंग्रज सरदार वुडबर्न तेथें पोंचला. हत्यारें टाकण्याचा हुकूम १ ल्या घोडदळाखेरीज सर्वांनीं ऐकला. बाकीचें घोडदळ पळालें.

२८ फत्तेगड (दुआब) — १० वें पायदळ. खजीना हालविण्याखेरीज इतर हुकूम ऐकले. सीतापूरचें ४१ वें पायदळ येतांच हें १० वें पायदळ उठलें. खजीन्याकरितां दोन्ही दळांत मारामारी होऊन तडजोड निघाली, तेव्हां किल्लयांतील गोऱ्यांना वेढून ता. २५ ला लढाई सुरू झाली. गोऱ्यांनीं पळ काढला.

२५ होशारपूर फिलोर (पंजाब) — ३३ वें (होशारपूर) आणि ३५ वें पायदळ (फिलोर) या दोन पायदळांचीं हत्यारें निकल्सननें काढून घेतलीं. ५९ व्याचीं हत्यारें ९ जुलैला घेतलीं.

साताऱ्यास छत्रपतींच्या अभिमानानें रंगो बापूजींनीं योजलेला कट ३० जूनच्या परळी येथील दरवड्यानें उघडकीस येऊन धरपकडीला सुरुवात झाली. १७ जणांवर खटला. सर्वांना मरणाची शिक्षा. सप्टेंबर ८ १८५८ मार्च एप्रिलपर्यंत धरपकड, चौकशी व शिक्षा चालू होती. रंगो बापूजी बेपत्ता. (महाराष्ट्र—खानदेशांत भिल्लांनीं, गुजरातेंत कोळ्यांनीं आणि कर्नाटकच्या हद्दींत बेरडांनीं धामधूम केली. ती १८५७—५८ मध्यें चालू होती. ही धामधूम किरकोळ स्वरूपाची होती.)

जुलई

१ हाथरस (दुआब) ग्वालेरचें १ लें व २ ऱ्या पायदळांच्या कांहीं तुकड्या शिवाय तोफखान्याची तुकडी, यांनीं हाथरस व सांसी नजीक (ता. २) या ठिकाणीं उठाव केला. सर्व गोऱ्या अधिकाऱ्यांना आग्ऱ्यास जाऊं दिलें.

,, इंदूर, महू याच तारखेस इंदूरला होळकराच्या सैन्याचा व महूस २३ वें पायदळ आणि १ ल्या घोडदळाचा विभाग यांचा उठाव.

,, सागर (बुंदेल) सागरला ३१ वें, ४२ वें पायदळ व ३ रें इरेग्युलर घोडदळ यांपैकीं ४२ वें पायदळ व घोडदळ यांनीं उठाव केला. ३१ वें इंग्रजाकडे राहिल्यानें त्यांचें व उठाववाल्यांचें युद्ध होऊन उठाववाल्यांनीं सागर सोडलें.

४ आग्रा आग्ऱ्यास या वेळीं इंग्रजांच्या तालमींतली फौज नव्हती. मे अखेरीस त्यांचीं हत्यारें घेऊन त्यांना रजा देण्यांत आली होती. कोटा, किरौली, भरतपूर येथील संस्थानी फौजा होत्या. त्यांपैकीं कोट्याच्या व भरतपुराच्या लोकांनीं उठाव केला. किरौलीचे शिपाई निरुपयोगी म्हणून त्यांची किरौलीस आधीं रवानगी झाली होती.

९ झेलम (पंजाब) १४ वें पायदळ. त्यांचीं हत्यारें घेण्यासाठीं गोरे सैनिक आलेले पाहून सदर पायदळानें लढाई आरंभली. गोऱ्यांची मात्रा चालली नाहीं. पण रात्रीं शिपाई पळाले. पुढें पकडले जाऊन बहुतेकांवर मरणाची पाळी आली.

९ सिआलकोट (पंजाब) ४६ वें पायदळ व ९ वें घोडदळ—एकूण सुमारें हजार शिपाई. यांनीं कांहीं अधिकारी मारले. बरेच किल्ल्यांत गेल्या-मुळें वांचले. कित्येकांनीं आसपासच्या खेड्यांत जाऊन प्राण वांचविले. शिपायांनीं लूट, हत्या व जाळपोळ यांत वेळ घालविला. नंतर त्रिमुघाटावर त्यांना गांठून निकल्सननें त्या सर्वांचे मुडदे पाडले.

११ सहारनपूर (दुआब) जूनच्या प्रारंभीं एकदां उठाव होऊन गेला तरी २९ व्या पायदळाचा जो विभाग इंग्रजांच्या अधीन राहिला त्यानें आतां उठाव केला.

| | |
|---|---|
| २५ दीनापूर (बिहार) | ७ वें, ८ वें, ४० वें पायदळ उठावानंतर आरास गेलें. त्यांना कुंवरसिंगाचें नेतृत्व लाभलें. ८ व्याचा एक विभाग हजारीबागेस होता. |
| २५ सेगौली (बिहार) | १२ वें इरेग्युलर घोडदळ. याचा एक विभाग गोरखपुरास होता. त्याचीं गुरखा सैनिकांनीं हत्यारें काढलीं, पण ती पुन: घेऊन पळ काढला असतां त्यांचा इंग्रजभक्त साथीदारांनीं पाठलाग केला. ८५ इंग्रजभक्त स्वारांनीं हेवलॉक-आउटरॅमच्या मोहिमेंत चांगली कामगिरी केल्याची नोंद आहे. सागरला उठाव करणाऱ्या स्वारांपैकीं कांहीं इंग्रजभक्त या स्वारांबरोबर होते. |
| ३० हजारीबाग (बिहार) | दीनापूरच्या ८ व्या पायदळाचा जो विभाग हजारीबागेस होता, त्यानें (गिमलेटच्या मतें जुलई २९ ला) उठाव केला. हा उठाव शिपायांना लाभदायक झाला नसला तरी रामगडच्या शिबंदीनें इंग्रजांवर उलटून आसपासच्या प्रदेशांत किंचित् काळ इंग्रजी राज्य नामशेष केलें. लवकरच पुन्हा इंग्रजी राज्य उभें राहिलें. |
| ३१ कोल्हापूर | येथें २७ व्या मुंबईच्या पायदळानें उठाव केला. हें पायदळ मुंबईचे पण त्यांत २५० वर परदेशी किंवा हिंदुस्थानी शिपाई होते. कोल्हापूरच्या इरेग्युलर पायदळानें हा उठाव आटोक्यांत ठेवला. इरेग्युलर पायदळ व २७ व्याचे इंग्रजभक्त यांनीं उठाववाल्यांची छावणी काबीज करून बरेच शिपाई लुटीच्या मालासह कैद केले. ३ ऑगस्टला साताऱ्याहून मराठ्यांचें घोडदळ येऊन पोंचलें ता. ११ ऑगस्टला उठाव मोडला. उठावाच्या दीडशें जणांपैकीं ६३ आसामींवर देहान्ताची व इतरांना निरानिराळ्या मुदतीच्या कैदेची शिक्षा भोगण्याची पाळी आली. |

## ऑगस्ट

| | |
|---|---|
| ५ चैबासा पुरूलिया | येथें रामगडच्या पलटणी होत्या, त्या उठल्या. सगळीकडे धामधूम माजली. मद्रासचें लष्कर आल्यावर हळूहळू शांतता स्थापन झाली. |

१० नसीराबाद (राजस्थान) — पहिल्या उठावानंतर मुंबईच्या १२ व्या पायदळाचा एक विभाग येथें आणला होता. त्यांत हिंदुस्थानी शिपाई होते. त्यांनीं उठाव केला. पण दुसरें लष्कर इंग्रजनिष्ठेचें असल्यानें हा उठाव ताबडतोब मोडतां आला. ५ जणांना फांशीं दिलें.

१२ नीमच (राजस्थान) — नसीराबादसारखीच येथील दुसऱ्या उठावाची हकीकत आहे. मुंबईचें २ रें घोडदळ व १२ व्या पायदळाचा विभाग यांनीं उठावाची तयारी केली. घोडदळांत मुंबई इलाख्याबाहेरचे ५०० स्वार होते. अर्थात् हिंदुस्थानी होतेच. १२ पायदळाचे लोक व गोरे सैनिक यांनीं उठाव मोडला.

१४ भागलपूर (बिहार) — येथें ५ वें इरेग्युलर घोडदळ होतें. त्यानें बोसीच्या ३२ व्या पायदळाकडे मोर्चा वळविला, पण पायदळानें गोळ्या झाडून त्याचें स्वागत केल्यामुळें घोडदळानें आरास प्रयाण केलें.

२१ अनाद्रा (राजस्थान) — आबूच्या डोंगराखालच्या या गांवीं जोधपूरच्या शिबंदींचे लोक होते. त्यांनीं आबूस जाऊन सोजरांना मारण्याचा यत्न केला तो फसला.

२२ एरिनपुरा (राजस्थान) — एरिनपुरा जोधपुरी शिबंदीचें मुख्य ठिकाण. अनाद्राचे लोक आबूहून परतल्यावर येथें धामधूम उडाली. तेथें लूट झाली पण गोऱ्यांची हत्या घडली नाहीं.

२७ नागोद (बुंदेल) — ५० वें पायदळ कुंवरसिंग आल्याच्या बातमीनें उठलें. अंमलदारांना मिरझापुरास पोंचविलें. शिपायांनीं शहर लुटून धामधूम चालविली.

## सप्टेंबर

९ हैद्राबाद (सिंध) — ५ व्या तोफखान्याचे गोलंदाज. त्यांत जास्त संख्या हिंदुस्थान्यांची होती—उठाव करणार हें कळल्यावरून त्यांचीं हत्यारें काढून घेतलीं.

१३ कराची — २१ व्या पायदळाचा उठाव. यांत दुपटीहून जास्त हिंदुस्थानी होते. गोऱ्या लष्कराच्या मदतीनें या दळाचीं हत्यारें जप्त केलीं. १८ जणांना देहान्ताचें प्रायश्चित्त मिळालें.

| | |
|---|---|
| १५ अहमदाबाद (बुंदेल) | २ ऱ्या ग्रेनेडियर पायदळांचा उठाव. ७ व्या पायदळानें मोडला. उठाववाल्यांत हिंदुस्थानी होते. १८ आसामींना भिन्न भिन्न प्रकारें देहान्त. |
| १८ जबलपूर | ५२वें पायदळ उठलें व छावणी सोडून गेलें. याची बुंदेलखंडांत धामधूम सुरू राहिली. |
| २३ शिकारपूर (सिंध) | ३ ऱ्या तोफाकंपूचे गोलंदाज उठाव करणार होते. यांत बहुतेक सारे हिंदुस्थानी होते. पुष्कळ गोलंदाज उठावाविरुद्ध होते. ३ ब्राह्मण, १ खत्री (क्षत्रिय), ६ अहीर हे अवघे १० जण पुढारी. ते सर्व मारले गेले. |

### ऑक्टोबर

| | |
|---|---|
| ९ देवगड | ३२ व्या पायदळाचे दोन कंपू उठले. ७ नोव्हेंबराला त्यांचा दंचुआ नांवाच्या गांवीं पराजय झाला. |
| १५ कोटा (राजस्थान) | कोट्याच्या शिबंदीनें उठाव, इंग्रज रेसिडेंट करून व त्याचे मुलगे व आणखी इंग्रज यांना मारलें. १८५८ च्या मार्चपर्यंत त्यांचा उठाव कायम होता. कोट्याच्या राजाला त्यांनीं नजरकैद्याप्रमाणें वागविलें. |

### नोव्हेंबर

| | |
|---|---|
| १८ चितागांव (बंगाल) | मंगलपांड्याच्या ३४ व्या पायदळाचे तीन कंपू येथें होते. बराकपुराच्या प्रकरणानंतर त्यांनीं इंग्रजभक्ति जीवंत ठेवून आतां तिचा निकाल केला व इंग्रजाच्या बळापुढें स्वतःचा निकाल करून घेतला. |
| २० डाक्का | ७३ व्या पायदळाचे दोन कंपू डाक्क्यास होते. या दळामध्यें वारंवार उठावाचे कट फुटत असल्यामुळें डाक्क्याच्या कंपूंचीं हत्यारें घेते वेळीं जोराची लढाई होऊन कंपूचे लोक भूतानच्या डोंगराळ भागांत गेले. गिमलेटनें या लढाईचा ता. २२ नोव्हेंबर हा दिवस सांगितला आहे. |

### डिसेंबर

| | |
|---|---|
| ४–५ मदारीगंज जलपैगुरी (बंगाल) | ११ व्या इरेग्युलर घोडदळाचे दोन कंपू मदारीगंज व जलपैगुरी येथें होते व त्यांनीं उठाव करून आपल्या संचारांत बऱ्याच ठिकाणीं गोंधळ माजविला. इंग्रजांनीं त्यांचा पिच्छा पुरविल्यानें हें घोडदळ नेपाळांत गेलें. |

ता. ५ कोल्हापूर या उठावांत कोल्हापूरच्या राजाचा धाकटा भाऊ चिमा-साहेब याचें अंग होतें. त्यानें दक्षिणेंत जहागीरदार व बडोद्याचे कांहीं लोक यांच्याशीं कारस्थान चालविलें होतें. ता. ३१ मार्च १८५८ रोजीं चिमासाहेबाला पकडलें व कराचीस पाठविलें.

• • •

परिशिष्ट : ३

# इंग्रजांची मोहीम

## दिल्लीची आघाडी

| | | |
|---|---|---|
| सर सेनापति ॲन्सन सिमल्याहून अंबाल्यास येऊन दिल्लीच्या स्वारीचा आरंभ | मे | २३ |
| कर्नाल येथें ॲन्सनचें निधन व बर्नार्ड सेनापति | मे | २७ |
| विल्सन मीरतहून निघतो | मे | २७ |
| विल्सनच्या गाझीउद्दीननगर व हिंडनवरील लढाया | मे | ३०-३१ |
| बर्नार्ड व विल्सन एकत्र | जून | ६ |
| दिल्लीनजीक बादलीकीसराईची लढाई | जून | ८ |
| दिल्लीसमोर इंग्रजसेनेची ठाणबंदी | जून | १० |
| बर्नार्डचा मृत्यु व रीड सेनापति | जुलई | ५ |
| रीड आजारामुळें अधिकार सोडतो. विल्सन सेनापति | जुलई | १७ |
| निकल्सन पंजाबांतून शेवटची कुमक घेऊन येतो | ऑगस्ट | १४ |
| तटबंदी फोडणारे तोफांचे मोर्चे | सप्टेंबर | ७-१३ |
| दिल्लींत प्रवेश आणि शहराचा संपूर्ण कबजा | सप्टेंबर | १४-२० |
| बहादुरशहा शरण येतो | सप्टेंबर | २० |
| त्याचा खटला व निकाल | १८५८ जानेवारी | २७ |
| | मार्च | ८ |

इंग्रज दिल्लीसमोर आले तेव्हां ६०० घोडदळ व २४०० पायदळ एकूण ३००० सैनिक होते व २२ तोफा होत्या. दिल्ली काबीज करतेवेळीं प्रत्यक्ष लढण्यालायक ८००० फौज होती. तिच्यांत ४३८० हिंदी सैनिक होते.

## दुसरी आघाडी

### कलकत्ता, कानपूर, लखनौ

| | |
|---|---|
| मद्रासहून नील कलकत्त्यास येतो | मे ३ |
| नील—बनारस | जून ४ |
| „ अलाहाबाद | जून ११ |
| हेवलॉक अलाहाबाद | जून ३० |
| कानपुरास रेनोची ( Renaud ) रवानगी | जून ३० |
| हेवलॉक व रेनो एकत्र. फत्तेपूरची लढाई | जुलै १२ |
| „ „ औंग, पांडू नदी कानपूर | जुलै १५-१६ |
| हेवलॉकची बिठूरवर स्वारी. | जुलै १८ |
| नील कानपुरास येतो | जुलै २० |
| हेवलॉक लखनौकडे | ऑगस्ट ३ |
| हेवलॉक कानपुरास परत. | ऑगस्ट १३ |
| बिठूरची लढाई | ऑगस्ट १६ |
| आउटरॅम कानपुरास आला | सप्टेंबर |
| हेवलॉक आउटरॅमचें लखनौस प्रयाण | „ २१ |
| या दोघांचा लखनौच्या रेसिडेन्सींत प्रवेश | सप्टेंबर २५ |

कानपूरचें आक्रमण करतेवेळीं हेवलॉकजवळ रेनोचीं माणसें धरून १९६४ एवढें लष्कर होतें. त्यांत हिंदी सैनिक ५६ होते. हेवलॉक आउटरॅम-सह पुन: लखनौकडे निघाला तेव्हां त्याचे सैनिक २५०० होते.

### सर सेनापतीची नेमणूक व कामगिरी

| | |
|---|---|
| कॉलिन कॅम्बेल कलकत्त्यास येतो | ऑगस्ट १३ |
| कॅम्बेलचें अधिकारग्रहण | ऑगस्ट १७ |
| दिल्लीची कुमक | ऑक्टोबर २६ |

[ दिल्लीहून २४ सप्टेंबरला लहानशी फौज निघाली, ७५० गोरे व १९०० हिंदी. ती ता. २८ ला बलंदर शहर जिंकून व ता. १ ला मालागड जमीनदोस्त करून ५ ऑक्टोबरास अलीगडास पोंचली. नंतर अक्राबाद, बिजेगड व शेवटीं आग्र्यास १० ऑक्टोबरला आली.तेथें ग्वालेर, महू, दिल्लीच्या

अनु. 23233 दि. 1/7/67
क्रमांक 1006 नों. दि. 6/5/68



शिपायांना हारवून मग कानपूरकडे प्रयाण. मार्गांत मैनपुरी, कनोज येथील शिपायांचे जमाव उधळून २६ ऑक्टोबरला या फौजेनें कानपूर गांठलें. ]

| | | |
|---|---|---|
| कॅम्बेल कलकत्ता सोडतो | ऑक्टोबर | २७ |
| ,, अलाहाबाद | नोव्हेंबर | १ |
| ,, कानपूर | ,, | ३ |

[ दिल्लीची फौज ता. ३० ऑक्टोबरला लखनौकडे निघाली होती. ३१ला बंथीरा गांवीं मुक्काम. लखनौच्या आलमबागेकडे कुमक रवाना. ]

कॅम्बेलबरोबर लखनौस जातांना ४२०० सैनिक होते.

बिंढॅमला कानपूरच्या संरक्षणासाठीं ठेवलें.

ee9

| | | |
|---|---|---|
| कॅम्बेल बंथीरा येथें | नोव्हेंबर | ९ |
| ,, आगेकूच | ,, | ११ |
| ,, आलमबाग | ,, | १३ |
| ,, लखनौवर चाल | ,, | १४ |
| ,, रेसिडेन्सीला भेट | ,, | १७ |
| ,, रेसिडेन्सीचा कोंडवाडा रिकामा केला | ,, | २२ |
| ,, हेवलॉकचा मृत्यु | ,, | २४ |
| कॅम्बेल बायका, मुलें, आजारी, जखमी यांची कानपूर यात्रा | नोव्हेंबर | २७ |

[ इकडे कानपुरास टोप्यांच्या फौजेशीं लढाई जुंपली. २६ नोव्हेंबर, दोन दिवसांनीं इंग्रजी सैन्याची हार व माघार २८ नोव्हेंबर. ]

कॅम्बेल कानपुरास तोफखाना आणला. नोव्हेंबर २९

[ कानपूरच्या ब्रिटिश फौजेवर तात्यांच्या तोफखान्याचा भडिमार. ता. १ डिसेंबर ते ६ डिसेंबर भडिमार चालू. ]

| | | |
|---|---|---|
| कॅम्बेल ब्रिटिशांचा तात्यावर हल्ला आणि विजय | डिसेंबर | ६ |
| ,, सराई घाटावर शिपायांचा पराभव | डिसेंबर | १० |
| ,, मैनपुराकडे एका सेना विभागाची रवानगी | डिसेंबर | १८ |
| ,, फत्तेगडास कानपुराहून प्रयाण | डिसेंबर | २४ |
| ,, बिठूरचा विध्वंस | डिसेंबर | १५ |
| ,, फत्तेगडाजवळ काला नदीची लढाई | २ जानेवारी | १८५८ |
| ,, फत्तेगडांत मुक्काम | जानेवारी | ३ |

[ दिल्लीहून दुसरी कुमकः—दारूगोळा, दाणागोटा घेऊन फार मोठा काफिला दिल्लीहून ता. ६ डिसेंबर १८५७ रोजीं निघाला.बरोबर १९०० लोकांचें लष्कर होतें. अलीगड, खासगंज, पटियाली येथें लढाया मारून हा काफिला पूर्वीं मैनपुरीस आलेल्या फौजेसह ता. ६ जानेवारी १८५७ रोजीं फत्तेगडास पोंचला. ]

[ गुरख्यांची मदतः—जुलईत ३००० गुरखे गोरखपुरास आले. ता. १३ आझमगड. १५ रोजीं जौनपूर येथें त्यांना ब्रिटिश कवाइतीचें शिक्षण. १९ सप्टेंबर पुनः आझमगड ता. २० मंडोरीची लढाई. ३१ ऑक्टोबर चंदाची लढाई ४ नोव्हेंबर जौनपूरजवळ पुनः लढाई व शिपायांची हकालपट्टी. गुरख्यांच्या वरील कामगिरीनें नेपाळहून आणखी मदत बोलावली. जंगबहादुर स्वतः १० हजार फौजेसह २१ डिसेंबरला सरहद्दीवर आला. गोरखपूरजवळ १३, जानेवारीला (१८५८) लढाई. १८५७ जानेवारी २६, रोहिलखंडाच्या बाजूस शम्सावादची लढाई.

## माळव्यांतील मोहीम

कानपूर लखनौच्या भागांत कॅम्बेल मोहिमेची तयारी करीत होता, (ऑक्टोबर—नोव्हेंबर) त्या वेळीं माळव्यांतील उठावाचा मोड करण्यांत ड्यूरंड गुंतला होता. त्याच्याजवळ जेमतेम दोन हजाराच्या आंतबाहेर सैनिक होते.

| | | |
|---|---|---|
| मह्रू सोडून धारवर स्वारी, गुजरी गांवचा ताबा | ऑक्टोबर | १२ |
| धारच्या शिपायांचा पराभव | ” | २२ |
| आठवडाभर धारच्या किल्ल्यावर तोफांचा भडिमार, शिपायांनीं किल्ला सोडला, किल्ला उध्वस्त केला. | ऑक्टोबर | ३१ |
| मंदेसरवर चाल. चंबळपार | नोव्हेंबर | २० |
| मंदेसरला मुक्काम | ” | २१ |
| मंदेसरच्या उठाववाल्यांचा पराभव | ” | २४ |
| नीमचच्या शिपायांना उधळून लावलें | ” | २५ |
| इंदूरला जातो | डिसेंबर | १४ |
| इंदूरच्या संस्थानी सैन्याचीं हत्यारें घेतलीं | ” | १५ |

अनुक्रम 23233 दि. ४४१
क्रमांक 0060 नों: दि:

परिशिष्ट ३ रें

## १८५८ मधील मोहिमा

| कँबेल | | व्हिटलॉक | |
|---|---|---|---|
| फत्तेगड सोडतो | फेब्रु. १ | कामटीस येतो. | जाने. १० |
| कानपूरला मुक्काम | फेब्रु. ४ | जबलपूर | फेब्रु. ६ |
| कॅनिंगला भेटण्यास अलाहाबादेस जातो | फेब्रु. ८ | जखानी | फेब्रु. २४ |
| तेथून परत कानपूर | फेब्रु. ९ | दमोह | मार्च ४ |
| फत्तेपूर चौरासी नानांचा गांव | फेब्रु. १५ | सागर | मार्च ५ |
| मीयागंजची लढाई | फेब्रु. २३ | पन्ना | मार्च २९ |
| लखनौच्या स्वारीचा प्रारंभ | मार्च २ | बांदाकडे | एप्रिल ६ |
| लखनौच्या लढाया व त्याचा पूर्ण ताबा | ,, ८-२० | छत्रपूर | एप्रिल ९ |
| रोहिलखंडांत भिन्न दिशांनीं चार दळें | एप्रिल | महोबा | एप्रिल १२ |
| बरेलीचा विजय | मे ५ | बांदाचा विजय | एप्रिल १९ |
| शहाजहानपुराहून मौलवीस पळविलें | मे १६ | किरवीचा नाश | जून २ |

या मोहिमेच्या वेळीं कॅम्बेलची फौज तीस हजार व १६० तोफा होत्या. या फौजेंत जंगबहादुर व त्याचे १० हजार गुरखे यांचा समावेश आहे.

व्हिटलॉक हा मद्रासची फौज घेऊन आला होता. त्याच्या हाताखालीं सुमारें दोन हजार सैन्य होतें.

## ह्यू रोज

| | | | |
|---|---|---|---|
| महू सोडतो १८५८ | जानेवारी १६ | झांशीचा वेढा सुरू | मार्च २२ |
| राहतगडावर हल्ला | जानेवारी २८ | तात्यांशीं लढाई | एप्रिल १ |
| सागरची मोकळीक | फेब्रुवारी ३ | झांशींत प्रवेश | एप्रिल ३ |
| सनोदा किल्ल्याचा विध्वंस | फेब्रु. ८ | झांशीचा पूर्ण कबजा | एप्रिल ५ |
| गऱ्हाकोटा जिंकलें | फेब्रु. १२ | कूंचची लढाई | मे ६ |
| गऱ्हाकोट्याचा विध्वंस | फेब्रु. १४ | काल्पीचा विजय | मे २२ |
| सागरला मुक्काम. प्रयाण | फेब्रु. २६ | ग्वालेरवर चाल | जून ४ |
| बरोडिया जिंकलें | फेब्रु. २७ | ग्वालेर गांठलें | जून १६ |
| मदनपुरास विजय | मार्च ३ | कोटाकी सराईची लढाई | जून १७ |
| झांशीकडे स्वारी | मार्च १९ | ग्वालेरचा ताबा | जून १९ |

ह्यू रोजच्या नेतृत्वाखालीं सुमारें ५ हजार लष्कर होतें. यांतल्या गोऱ्या सैनिकांचे उन्हाळ्यामुळें अतिशय हाल झाले. ग्वालेर जिंकल्यावर तात्या टोप्यांचा पाठलाग हें काम राजस्थान माळव्यांत १८५९ च्या एप्रिलपर्यंत अविश्रान्त चालू होतें.

समाप्त